म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. नं.
REFBK-0000043

परचुरे पुराणिक आणि मंडळी
बुकसेलर्स माधवबाग, मुंबई नं. ४

सत्कार्योत्तेजक सभा–धुळे

श्री

# रामदास आणि रामदासी

## भाग साहावा

# श्री स्वानुभवदिनकर

REFBK-0000043

जो केवळ असेल गुरुभक्त ।
स्वानुभवप्रत्ययें पूर्णभरित ।
जो चि विचारूनि पाहेल आद्यंत ।
स्वानुभवदिनकरीं ॥

सर्व हक्क राखून ठेविले आहेत.

श्रावण १८३२

किंमत १॥ रुपये

धुळे येथें श्री आत्माराम छापखान्यांत
छापून शंकर श्रीकृष्ण देव यांनीं
प्रसिद्ध केला



ATM. P. P.

श्रीवृद्धेश्वर-तिसगाव.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

# प्रस्तावना

॥ श्रीराम ॥

## श्री रामचंद्र दिनकर रामदास

श्री रामचंद्र दिनकर रामदास ।
हा चि मना घे निदिध्यास ।
तेणें भेटेल जगन्निवास ।
श्रीरामराय ॥

श्रीसमर्थसांप्रदायाविषयीं आपणांस संपूर्ण व यथार्थ ज्ञान कधीं तरी होईल काय ? खुद्द श्रीसमर्थांविषयीं आपणास अजून किती तरी अपुरें ज्ञान आहे, मग त्यांच्या हजारों शिष्यांविषयीं तर बोलावयास च नको. श्रीसमर्थांनीं आपला अवतार शके १६०३ त संपविला व शके १६१६ पूर्वी च त्यांच्या चरित्राचे अनेक ग्रन्थ झाले होते, असा दाखला सांपडतो. तंजावर-मठपति भीमस्वामी यांनीं लिहिलेल्या पांच पचवीस पृष्ठांच्या त्रोटक चरित्राशिवाय वरील अनेक ग्रन्थांपैकीं एक हि विस्तृत चरित्र अजून उपलब्ध होऊं नये, याचें वाईट वाटतें. श्रीसमर्थांची अगाध लीला त्यांचे ते च जाणत, फार तर श्रीकल्याणस्वामी किंवा श्रीशिवाजीमहाराज तीविषयीं कांहीं साक्ष देतील. आपल्या सारख्यांना त्या लीलेची यथार्थ कल्पना होणें शक्य नव्हे. तथापि मनाला इतकी तळमळ वाटते कीं, श्रीसमर्थांच्या खुद्द एकाद्या शिष्यानें लिहिलेलें त्यांचें एकादें तरी सविस्तर चरित्र उपलब्ध व्हावें. श्रीसमर्थप्रताप व श्रीदासविश्रामधाम हे दोन ग्रन्थ बरें च समाधान करितात, तथापि पूर्ण समाधान होण्यास दुसऱ्या कोणाच्या पेक्षां श्रीकल्याणस्वामींनीं च वर्णिलेल्या चरित्राची अपेक्षा आहे ! असो. तात्पर्य इतकें च कीं, जेथें प्रत्यक्ष श्रीसमर्थचरित्राविषयीं अजून इतकें अज्ञान आहे, तेथें त्यांच्या शिष्य-प्रशिष्यांविषयीं, नुसतें अज्ञान च नव्हे तर, विपरीत ज्ञान असावें यांत नवल नाहीं. श्रीसमर्थशिष्यांत, त्यांच्या इतका तर राहू द्या च पण, कांहीं विशेष आटोपाचा किंवा साक्षात्काराचा पुरुष कोणी झाला नाहीं अशी कित्येकांची

समजूत आहे, पण ती बरोबर नाहीं असे ह्मणण्यास श्रीस्वानुभवदिनकराचा आज आपणास आणखी आधार, मिळत आहे. श्रीसमर्थांचे मठ ह्मणजे त्या वेळचीं विद्यापीठें होत. अशा पीठापैकीं तिसगावच्या पीठाचे अधिपति श्रीदिनकररामदास हे होत. हे दिनकर कोण, कोठील राहणारे, त्यांनीं कोणता व्याप केला, श्रीगुरुकृपा कशी संपादन केली, श्रीसांप्रदायांत त्याचें कार्य कोणतें, त्यांनीं कोणते ग्रन्थ केले, त्यांची परंपरा कशी, इत्यादि प्रश्नांचीं उत्तरें आज येथें द्यावयाचीं आहेत.

नगराजवळ भिंगार शहर आहे तेथील जोशीपणाची वृत्ति करून दिनकराचे पूर्वज तेथें राहत असत. त्यांची परंपरा अशीः प्रथम विष्णु, त्यापासून ब्रह्मा त्यापासून भृगु. भृगूवरून च त्या शहरास भिंगार असें नांव मिळालें आहे.

तेथें होतें भृगूचें आगार। यास्तव त्यासी ह्मणती भिंगार ॥

भृगूपासून च्यवन, त्यापासून पुढें कवि, शुक्र, वत्स, आप्नव, ऊर्व, जमदग्नि, परशुराम, अशी पुत्रपरंपरा आहे. अशा

त्या भृगुवंशीं वत्सगोत्रीं। अपरमीत जाले पुत्रपौत्री ॥

त्यांचीं नांवें कोठवर सांगावीं. या च वंशांत पुढें लक्ष्मींद्र पाठक झाले. त्यांचा पुत्र जनार्दन पाठक. हे निःसीम सूर्योपासक होते.

ज्याचें ऋण फेडावयासी। सूर्य खोळंबला मुहूर्तत्रयेंसीं।
ऋण फेडून आक्रमिले पंथासी। त्या जनार्दनासी पुत्र गोपाळ ॥

गोपाळांचा पुत्र कोनेर पाठक, त्यांचा पुत्र नन्देर पाठक आणि त्या नन्देरांचे पुत्र बहिणाजी ऊर्फ दिनकर. कागदोपत्रीं त्याचें नांव बहिणाजी असें आहे, परंतु त्याचें मूळचें नांव दिनकर असून श्रीसमर्थांनीं दिवाकर असें नांव ठेविलें, असें दिनकराचे पुत्र रामचंद्र ह्मणतात; परंतु श्रीसमर्थप्रतापांत

दिनकर नामा स्वधर्ममार्गी। माहा वित्पन्न शास्त्रमार्गी।
तीक्ष्ण बुद्धि देखूनि स्वामी भर्गों। दिनकर नाम ठेविलें ॥

अशी ओवी आहे. अशा स्थितींत नांवाबद्दल मुलाला प्रमाण मानावें व विद्वत्तेविषयीं गिरिधराची शिफारस मान्य करावी असें वाटतें. दिनकरांच्या मातुःश्रींचें नांव द्वारका होतें. या घराण्याचें मूळ उपनांव मुळे, परंतु ज्योतिषाच्या व्यासंगामुळें पाठक हें उपनाम पडलें. जेजुरीचा खंडेराय हें यांचें कुलदैवत व मातापुरची देवी ही यांची कुलस्वामिनी होय.

दुःखाची गोष्ट अशी कीं, दिनकराची नक्की जन्मतिथि तर नाहीं च,

पण जन्माचा नुसता शक हि आज नक्की देतां येत नाहीं. तेव्हां त्यांच्या जन्मशकाचा अदाज च केला पाहिजे.

श्रीमत् भागवताच्या एकादश स्कधाच्या एकतिसाव्या अध्यायाचें शेवटचें च एक पृष्ठ श्रीदिनकराच्या हातचें सापडलें आहे. त्यांत पुढील मजकूर आहेः

यदक्षरं पदभ्रष्टं मात्राहीन तु यद्भवेत् ।
तत्सर्वं क्षम्यता देव नारायण नमोस्तु ते ॥
यादृशं पुस्तकं दृष्ट्वा तादृशं लिखितं मया ।
यदि शुद्धमशुद्धं वा मम दोषो न विद्यते ।

शके १५६४ चित्रभानु नाम संवत्सरे उत्तरायणे ज्येष्ठमासे शुक्लपक्षे तिथौ ५ इंदुवासरे पुण्यदिवसनक्षत्रे तद्दिवसे इद एकादशस्कंधाख्यं ग्रन्थलेखन समाप्तमिति ॥ दिनकररामदासगोस्वामि रुछाई भिंगारकर जोसी तस्येदं पुस्तक ॥

या लेखानें मला विनाकारण कांहीं काळ घोटाळ्यांत टाकलें. हा लेख शके १५६४ त दिनकरानीं लिहिला असें मानावें तर श्रीसमर्थांचा त्यांना अनुग्रह शके १५७६ त झाला असतां १५६४ त च दिनकररामदास असें नामाधिकरण कोठून येईल ? त्याना श्रीसमर्थांचा अनुग्रह १५७६ त झाला ही गोष्ट निर्विवाद आहे. तर मग १५६४ त दिनकरानीं आपल्या नांवापुढें गुरूचें नांव कसें योजावें ? तेव्हा मला असें वाटतें कीं, पानावरील १५६४ हा शक दिनकराच्या लेखनाचा नसून ज्या प्रतीवरून त्यांनीं आपली प्रत केली त्या मूळ प्रतीचा असावा. ह्याशिवाय या लेखावरून कोणाला कांहीं निराळी कल्पना सुचत असल्यास ती सुचविण्यास साधन व्हावें ह्मणून तो येथें उतरून घेतला आहे.

दिनकराना श्रीसमर्थांचा अनुग्रह १५७६ त झाला व तो कसा झाला वगैरे हकिकत इतक्यात च पुढें सांगतों, परतु त्या वेळीं त्याचें वय सुमारें पंचवीस सवीस वर्षांचें मानल्यास दिनकरांचा जन्म शके १५५० चे सुमारास झाला असावा, असें होतें. दिनकराचे आजोबा कोनेर यांनीं शके १५७२ त लिहिलेल्या गणेशचतुर्थीव्रताची पोथी मिळाली आहे व वडील नऱ्हेर याच्या हातच्या हि कांहीं पोथ्या आहेत, त्यावरून दिनकराना बाळ-

पणीं वडील व आजोबा यांचेपासून च धर्मशास्त्राचें, ज्योतिषाचें व वैद्यकीचें शिक्षण मिळालें असलें पाहिजे.

लहानपणापासून च दिनकराचा ओढा परोपकाराकडे विशेष असे. कोणता हि प्राणी कष्टी पाहिला ह्मणजे यांचा जीव तळमळे. सर्व जीव सुखी असावेत अशी याची सात्त्विक वासना असे. दाराशीं आलेला याचक यानीं केव्हां हि विन्मुख जाऊ दिला नाहीं. जो जें मागेल तें त्यास यानीं द्यावें! दुसऱ्यास सुख व्हावें ह्मणून यानीं स्वतःच्या तनमनधनाची हि पर्वा करू नये. घरात असेल नसेल तें धनधान्य यानीं, मागताच याचकास द्यावें. ही त्याची वृत्ती मातुःश्रीस साहजिक च आवडत नसे. अशानें या मुलाचा प्रपच कसा चालावा याची त्याना काळजी वाटे. मातुःश्रींनीं कधीं असें ह्मटल्यास किंवा चिंता केल्यास हे च उलट त्याना ह्मणत, आई, आपल्यापाशीं जें आहे तें तरी आपण कोठून आणलें, सर्व च देवाचें आहे आणि देव सर्वां भूतीं आहे, तेव्हां ज्याचें त्यास दिलें तर वावगें काय झालें! या उत्तरानें आईचें नेहमीं च समाधान होत असे, असें नाहीं.

जननी ह्मणे बापा। ऐके दिनकरा।
अज्ञान तूं खरा। कळलें मज ॥ १ ॥
मज शिकविसी। दानधर्म करी।
लोक घरोघरीं। पाहे कैसे ॥ २ ॥
कैसे पाहे जन। नांदे धनधान्यें।
मिर्वती भूषणें। परोपरीं ॥ ३ ॥
परोपरीं कां रे। छळिसी आह्मांसी।
काई या धर्मासी। ह्मणों तुझ्या ॥ ४ ॥
तुझ्या संगें आह्मी। दिनकरा जाण।
जालों हीन दीन। माता ह्मणे ॥ ५ ॥

शामराज आणि त्र्यंबक असे दोघे दिनकरांना धाकटे बधु होते व सई बहिण होती. रामचद्र हे त्यांचे एकुलते एक चिरंजीव व द्वारका एकुलती एक मुलगी होती. आपल्या आईचें नांव त्यांनीं मुलीला ठेविलें होतें. दिनकराना दोन स्त्रिया होत्याः एकीचें नांव सोयेरी व दुसरीचें नाव गगा. तात्पर्य, प्रपचात गुंतून राहण्यास जे पाश असावे लागतात ते सर्व पाश त्यांना होते. अशा स्थितींत ते पाश त्यानीं कसें तोडले किंवा ते असून हि त्याना मात्र नाहींसारखे कसे झाले, याचा विचार करणें बोधप्रद होणार आहे.

दिनकरांनीं आपल्या भोंवती नजर फेंकली तों प्रपंची जनांच्या चार पायऱ्या त्यांच्या निदर्शनास आल्या: ( १ ) एक, आपला प्रपंच जीवें भावें करून कांहीं थोडासा परमार्थ हि पाहत, ( २ ) दुसरे, केवळ आपला प्रपंच मन घालून करीत, परमार्थ ह्मणून कांहीं आहे याची त्यांना वार्ता हि नसे, ( ३ ) तिसरे, आपल्या प्रपंचात गोडी मानून फावल्यास परमार्थाची थोडी टवाळकी करीत, आणि ( ४ ) चवथे, स्वतःच्या प्रपंचांत गढून जाऊन पुढिलांची निंदा करण्यास व परमार्थाची टवाळकी करण्यास हापापलेले असत. ह्या चारी प्रकारचे लोक पाहून, साहजिक च, कोणता हि प्रकार त्यांना पसंत पडेना. त्यांच्या मनाला सारखी हुरहुर वाटे. हे लोक आपले आयुष्य व्यर्थ दवडीत आहेत, हें आपणांस कळत असून हि आपण त्यांच्या च प्रमाणें वागणें श्रेयस्कर नव्हे असें वारवार त्यांच्या मनात येई. प्रपंचाला गौण लेखून परमार्थ साधणें हा च नरदेहाचा मुख्य हेतु होय, असा बोध ते आपल्या मनाला करूं लागले. वरील चारी प्रकारच्या लोकांची त्यांना मनापासून कींव येई. संसारात सारखें गुतून राहणें योग्य नव्हे असा त्यांच्या मनाला हृद्रोग लागला होता.

जळो त्याचा संसार । जळो त्याचा विचार ।
जळो त्याचा आचार । जो स्वार्थमूळ ॥ ३-१-२३
जळो त्याची वित्पत्ति । जळो त्याची संतति संपत्ति ।
जयाचें आर्त भगवंतीं । अणुमात्र नाहीं ॥ २४ ॥
ऐसा जो कां पतित । तयाचा भार धरणी मानित ।
भुमीभार पापी अभक्त । कासयासी वांचावा ॥ २५ ॥

केवळ स्वार्थासाठीं जगण्यापेक्षा मरण बरें, असें त्यांना वाटे; आणि असला स्वार्थी मनुष्य जिवत राहिला ह्मणून तरी काय झालें !

ऐसें जिणें प्रेतवत । तें जाणिजे चालतें बोलतें प्रेत ।
खातें जेवितें भूत । प्रत्यक्ष तें चि ॥ २८ ॥

प्रपंच शाश्वत कल्पून बायकापोराच्या नादात श्रीरामरायाला विसरून जावें, यापेक्षा देह आज च पडला तर काय वाईट !

तरी कां प्राण्या भुललासी । माझें माझें जल्पसी ।
अंत आलया कोणासी । संगें नेसील पैं ॥ २-२-३२
ह्मणौनि होई सावधान । जंव आलें नाहीं मरण ।
भजे नारायण । सोहंभावें चि ॥ ३३ ॥

अरे जाणतां जाणतां । कां होसी नेणता ।
सोडूनियां स्वहिता । विषयस्वार्थें करूनि ॥ ३४ ॥
आतां संसार हा दुस्तर । त्यजूनियां अघोर ।
ह्मणे दिनकर । श्रीरामदास ॥ ३५ ॥

नरदेहासारखी वारवार प्राप्त न होणारी वस्तु अनायासें प्राप्त झाली असतां ती वायां दवडणें यासारखें घोर पातक नाहीं, तरी आतां या देहाची सफलता केली पाहिजे असा दृढ संकल्प करून, घरादाराला राम राम ठोकून, शके १५७४ त दिनकरांनीं भिंगारची वेस ओलांडली. परमार्थाला योग्य असें स्थळ पाहण्यासाठीं त्यांना फार लांब जावें लागलें नाहीं. भिंगारच्या ईशान्येस सुमारें चवदा कोसांवर डोंगरांत वृद्धेश्वराचें पुरातन स्थान आहे तेथें दिनकर गेले. एकवार तें पवित्र स्थळ प्रत्यक्ष पाहून मुमुक्षु जीवानें आपल्या डोळ्याचें पारणें फेडावें! तोंपर्यंत व नंतर हि प्रतिमारूपानें त्या स्थलाचें दर्शन घडावें व स्मरण व्हावें ह्मणून ग्रंथारंभीं त्याचें चित्र दिलें आहे. आज मित्तीला हि ( वैशाख शु. १२ शके १८३१ ) तें ठिकाण जर इतकें रम्य आहे, तर त्या वेळीं त्याची रमणीयता किती असेल हें काय सांगावें! कोसा दीड कोसांत वस्ति नसल्यामुळें तेथें जनसंपर्क होत नाहीं. चौफेर डोंगराचा घेर असून मध्यभागीं शंकराचें प्रचंड देवालय आहे. स्थान स्वयंभू आहे. देवालयांत जी घंटा टांगलेली आहे तिजवर संवत् ११५१ चा उल्लेख आहे.

संवत ११५१ चैत्र सुदि ५ सोमे श्रीभरा वर्षे विजय राजा। प्रानदेव राजनें सशृा श्रीपरमात्मसिवाय शिवदेवसुखाय घंटा प्रदत्ता ॥

असा लेख त्या घंटेवर कोरलेला आहे, ह्मणजे ती घंटा च आठशें सोळा वर्षांची जुनी आहे. त्यापूर्वीचें आणखी किती शतकांचें पुरातन हें स्थान आहे, कोण जाणे. देवालयाचे पाठीमागून वृद्धगंगा वाहात आहे. झाडी इतकी गर्द आहे कीं, देवालय इतकें मोठें असून हि अगदीं जवळ जाईपर्यंत तें दिसत नाहीं. पण त्या स्थळाचें वर्णन करण्याच्या भरीस मी विनाकारण कां पडूं! दिनकर च ह्मणतात:

झडकरि झडकावें स्थीर कोठें न व्हावें ।
न पुसत सकळांला गुप्त होऊनि जावें ।
स्थळ गति न वदावी जावया यावयाची ।
प्रकटित न करावी मात जे अंतरींची ॥ १ ॥

अचळित हि न व्हावें झाडखंडीं भरावें ।
स्थळ सुचिर पहावें साधतां स्थीर व्हावें ।
बहुविध न फिरावें रान तें वाउगें चि ।
सुगम जरि मिळालें वस्ति ते साधकांची ॥ २ ॥
गिरि खळि दरकूट्या कूहरें शीखरें ही ।
गवि गडि दरि गूहा गव्हरें भूयरें ही ।
जळमळित तडागें साजिरे कूप वावी ।
सरोवर विहिरे ही रम्य टांकीं असावीं ॥ ३ ॥
अमळ जळ तुटेना खंड वोर्वी पडेना ।
परम सुरस ऐसें स्थान कोठें दिसेना ।
खळखळ जळ वाहे दाटले वृक्ष जेथें ।
जनपद हि न पावे राहवें स्वस्थ तेथें ॥ ४ ॥
क्रिडति मयुर भारी फोडिती शब्द टाहो ।
पसरुनि वरिं पिछें नाचती ते पहा हो ।
वहुविध खग येती बोलती रम्य वाणी ।
तनु मन जिव नीवे ऐकतां शब्द कानीं ॥ ५ ॥
सुचिर सितळ छाया डोलती वृक्ष वातें ।
मघमघ कुसुमाचा गंध रंजी मनातें ।
संफळित तरु सैरा उंच आकाशमार्गें ।
सुरस महि सुजाणा भाग्यवंतांसि भोगे ॥ ६ ॥
जरि घडे मठ तेथें मांडणी मंडपाची ।
तरि मग मन आस्था काय वाहेल कैंची ।
नुतन हरिहरांचीं देउळें मारुतीचीं ।
रघुविरवरदाची प्राप्ति तैं जाण तें चि ॥ ७ ॥

आणि शेवटचा श्लोक तर फार च गोड आहे. अशा त्या प्रशांत, आल्हाद-कारक ठिकाणीं

रघुपति मग तेथें आठवे नाठवीतां ।
रघुपति मग तेथें धांवतो दूरि जातां ।
रघुपति मग तेथें सोडितां ही न सोडी ।
दिनकरवरदें हे लाविली नित्य गोडी ॥ ८ ॥

या सत्पुरुषांची चरित्रें आपण आपल्या शब्दांनीं काय सांगावीं ! होता होईल तों तीं त्यांच्या च मुखातून ऐकावीं ! श्रीसमर्थांनीं दिनकराना कोणती गोडी लाविली होती ती ते च सांगतात.

नावडे मज कांहीं वो कांहीं रे ।
रामस्मरणावांचुनि पाहीं रे ॥ ध्रु०
श्रीरामजयरामजयजयराम वो जयजयराम ।
निरंतर अंतरीं हा चि नेम ॥ १ ॥
झडो पडो तनु अथवा चिरंतन हो चिरंतन हो ।
परि रामस्मरणस्थितिभंग न व्हो हो ॥ २ ॥
दिनकर शर्मा रामदासकृपा रामदासकृपा ।
भवभय निरसुनि केला मोक्ष सोपा ॥ ३ ॥

सर्वसंगपरित्याग करून अशा त्या वृद्धेश्वराचे रम्य खोऱ्यांत शके १५७४ चे बहुधा फाल्गुनांत श्रीदिनकर जाऊन पोचले. तेथें त्यांची दिनचर्या कशी होती याची कल्पना च केली पाहिजे. आपल्या जन्माचें सार्थक त्यांनीं एक दोन वर्षांत केलें. शके १५७५ च्या बहुधा वर्षप्रतिपदेस त्यांनीं यथाविधि पुरश्चरण करण्यास आरंभ केला. वर्ष झालें, फाल्गुन शुद्ध १५ ला रात्रीं नामस्मरण करीत करीत दिनकराना निद्रा लागली. धड झोंप नव्हती, जागृती नव्हती व स्वप्न हि नव्हतें; तों एक मूर्ति त्यांचे पुढें आली. दिनकराची वृत्ति तटस्थ झाली, त्यांनीं हात जोडले व त्या मूर्तीनें त्यांच्या मस्तकीं डावा हात ठेवला. किंचित जागृत होऊन मूर्तीचे पाय धरावे ह्मणून दिनकर ह्मणतात, तों मूर्ति अदृश्य झाली ! पूर्ण जागे होऊन पाहतात तों मूर्ति वगैरे कांहीं नसून कोनाड्यात फक्त एक दिवा जळत असल्याचें त्याना आढळलें. त्यांची वृत्ति कावरी बावरी झाली. दृष्टीपुढें त्यांना कांहीं च दिसेना.

ठेउनि मस्तक श्रीपदिं भावें । स्वामिनें बाळ सनाथ करावें ।
ऐकुनि हास्य करी प्रभुराजा । दिनकराशिरीं हा कर माझा ॥१॥
बोधुनि बोध प्रबोधनमार्गें । ठेवित वाम करा शिरीं वेगें ।
विप्रकुळक्रमकर्म करावें । रामउपासन चित्तिं धरावें ॥ २ ॥
तत्त्वमसीसें प्रतिष्ठुनि दिल्हें । निर्शुनि देह निःसंदेह केलें ।
कर्म उपासन ज्ञान निजांचें । साधन नित्य अखंड परेचें ॥ ३ ॥

जागृति येउनि जों पुढे पाहे । दीप असे परि मूर्ति न लाहे ।
विस्मय तो येक राघव जाणे । मूढमती हिण कांहीं न जाणे ॥ ४ ॥

ती मूर्ति पुन्हा आपल्या दृष्टीस केव्हा पडेल असें त्याना झालें. आई न दिसल्यामुळें तान्ह्या मुलाची किंवा गाय घरीं न आल्यानें वासराची किंवा निधान चुकल्यामुळें कृपणाची जशी स्थिति होते तशी दिनकराची स्थिति झाली. त्याना अन्नपाणी गोड लागेना. ती मूर्ति पुन्हां नजरेस पडे-पर्यंत अन्नपाणी घ्यावयाचें नाहीं, असा त्यानीं संकल्प केला. बाह्योपाधींचें त्याचें भान हारपलें. जणू काय त्याची कांहीं वस्तु हारवली आहे, अशा रीतीनें त्या डोंगरात ते ती वस्तु शोधू लागले. बाहेरून पहाणाराला ते दुश्चित्त दिसत, परंतु श्रीसद्गुरूंचे पायीं सर्वस्वीं चित्त जडल्यामुळें ते अंतरीं सुचित्त होते.

गुरुराज माझ्या सोयरे जिवाचे । देखेन तयांचे पाय केव्हां ॥ १ ॥
पाय केव्हां दृष्टी पडतील साचे । उतरीन देहाचें निंबलोण ॥ २ ॥
निंबलोण सर्व भावेंसीं करीन । नुरोनि उरेन सेवेलागी ॥ ३ ॥
सेवेलागी देह देहेंविण राहे । दिनकरा पाहे नवलाव ॥ ४ ॥

त्याचा जीव अगदीं उतावीळ झाला होता. सारें जगत् त्याच्या पुढें असून हि तें त्याना तुच्छ होतें. डोळे असून त्यांना दिसत नव्हतें व कान असून ऐकू येत नव्हतें. अशी काहीं त्याची विलक्षण स्थिति झाली होती. जसजसे दिवस चालले तसतसा त्याचा धीर सुटत चालला.

न धरवे धीर वाटतसे खंती । केव्हां कृपामूर्ति देखेन मी ॥ १ ॥
देखेन केधवां जीवाचा विसावा । देहीं देहभावा नुरउनी ॥ २ ॥
नुरउनी भाव दिनकर ह्मणे । उठो हें धरणें वियोगाचें ॥ ३ ॥

अशी त्याच्या जीवाला सारखी तळमळ लागली होती. इतकी तळमळ लागल्यावर मनोरथ पूर्ण झाले नाहींत व श्रीसद्गुरूनीं कृपा केली नाहीं, असें कधीं घडलें च नाहीं ! सद्गुरुहृदय अत्यंत कोमळ आहे. आपण त्याचा ध्यावा तसा ध्यास घेत नाहीं. ते दयाळु, मवाळु, स्नेहाळु, कृपाळु आहेत. काय चमत्कार आहे पहा, दिनकरानीं बरोबर एक च वर्ष पुरश्चरण केलें व स्वप्नात चटक लावून सोडल्यामुळें एक च वर्ष त्यानीं सारखा छंद घेतला होता. स्वप्नात दर्शन दिल्यानंतर पुढें बरोबर एक वर्षानें ह्मणजे शके १५७६

च्या फाल्गुन शुद्ध १५ ला बरोबर निस्पृह परिवार घेऊन श्रीसमर्थांचें आगमन वृद्धेश्वराकडे झालें !

माझें पूर्व पुण्य थोर। मज भेटला गुरु दातार ॥

आदल्या वर्षी बरोबर ह्या च दिवशीं स्वप्नात पाहिलेली मूर्ति ती च ही मूर्ति होय. त्या वेळीं हातीं न लागलेले परतु हृदयात साठविलेले पाय दिनकरानीं आता घट्ट धरिले.

आहे आहे सद्गुरुराया। निरसी अहं माया।
कृपा करी लवलाह्या। काळ जाला सिद्ध खाया ॥ध्रु०॥
तव कृपेवीण जाण। वेदशास्त्र व्याख्यान।
हरिकथाकीर्तन। संगीत कळा।
योग याग तीर्थाटण। स्नान संध्या मुद्रा ध्यान।
सकळ हे फोल जाण। देवाधिदेवा ॥ १ ॥
हरिहरब्रह्मादिक। ते हि प्रभुपदीं रंक।
चालती सकळ लोक। तुझिया सत्ता।
व्यास अंबरीष शुक। साधु संत सकळिक।
तव कृपा निजसुख। भोगिती सदा ॥ २ ॥
भक्ति भाव निरूपण। भूतदया अनुष्ठान।
देवोदेवीं चिंतन। सप्रेम जर्‍हीं।
तर्‍हीं तव कृपेवीण। जो जो कीजे तो तो शीण।
दिनकर शरण। श्रीरामदासीं ॥ ३ ॥

श्रीसमर्थांनीं आपला सव्य कर दिनकराचे मस्तकीं ठेविला. पुढें त्या गुरुशिष्याचा काय सवाद झाला तो सगळा कळण्याचें थोडें च आपल्या नशिबीं आहे ! त्या सवादातील एक गोष्ट मात्र बाहेर फुटली कीं, दिनकराची निष्ठा व आतुरता पाहून श्रीसमर्थांचें रूप घेऊन आदल्या वर्षी प्रत्यक्ष श्रीरामानें च दिनकराना दर्शन दिलें होतें ! श्रीसद्गुरुचरणीं मस्तक अर्पण करून दिनकरस्वामी ब्रह्मानदाचा अनुभव घेऊं लागले. स्वसुखाचे दायक भेटल्याने त्याना धन्यता वाटली.

( सोरट )

धन्य जन्माचें सार्थक आजी जालें। येणें संगे देखिली पाउलें।
तुटला भ्रम मन निश्चयासी आलें। निजानंदें हें ब्रह्मांड कोंदलें ॥१॥

जय रामा हरहृदयविश्रामा । अभयंकर शिरीं ठेवी मेघश्यामा ॥ध्रु०
मज शोधितां ब्रह्मांडभांडोदर । धीर वीर शूर देखिले अपार ।
परि न दिसे हा पराक्रम थोर । त्रिभुवनीं येक स्वामी रघुवीर ॥२॥
कायावाचामनेंसीं आपदान । दास मारुती स्वामी रघुनंदन ।
विनटलों मी न सोडी चरण । दिनकर रामदासीं शरण ॥ ३ ॥

नित्यपूजेसाठीं समर्थांनीं दिनकराना श्रीरामाची मूर्ति दिली होती, तिची स्थापना वृद्धेश्वरापासून आडीच तीन कोस असलेल्या तिसगावीं करून दिनकरानीं श्रीरामोपासना परंपरेनें पुढें चालविली. तिसगावमठीं श्रीरामनवमीचा उत्सव सुरू झाला. काहीं वाडातून शके १६१२ ते १६१५ पर्यंतचा जमाखर्च आहे त्यावरून असें दिसतें कीं, प्रतिवर्षी उत्सवाला अवघे ६० पासून १५० पर्यंत रुपये खर्च होत असत.

अनुग्रहानंतर श्रीदिनकराना श्रीसमर्थांचा सारखा सहवास घडला असावा असें वाटत नाहीं. तसें असतें तर बखरींत व इतर चरित्रग्रन्थात जवळच्या शिष्यांचीं जीं नांवें आलीं आहेत त्यात याचें हि नाव आलें असतें. तथापि दिनकराच्या एकदर कवितेवरून मला असें वाटते कीं श्रीसमर्थांचा जरी नाहीं तरी श्रीश्रेष्ठाचा सहवास दिनकराना बरा च घडला असावा. श्रीसमर्थांनीं काहीं शिष्य नेहमीं च आपल्याजवळ ठेविले होते व काहीं काहीं काळ जवळ ठेवून घेऊन प्रांतोप्रांतीं पाठविले होते, त्यात नगरप्रांताची कामगिरी श्रीदिनकराकडे आली होती असें दिसतें.

दिनकराची वृत्ति सर्वकाळ उदासीन असे. पुत्र, गेह, दारा, धन वगैरे सर्व काहीं असून हि ते निस्पृहपणें वागत. ब्रह्मकर्मांत व अध्यात्मविवरणात ते नित्य मग्न असत. त्याच्या चरणीं जे लीन होत ते आपला उद्धार करून घेत.

कित्तेक होते बद्ध प्राणी । ते नाना साधनीं लाउनी ।
कित्तेक मुमुक्ष प्राणी । सिद्ध चि करूनि ठेविले ॥ १ ॥
अनुग्रहमात्रें ब्रह्मसविंति । जड जीवां जाली मोक्षप्राप्ती ।
नाममात्रें कित्येक तरती । माहादोषी होती जीवन्मुक्त ॥ २ ॥

दिनकराच्या शिष्यमंडळींत काहीं निस्पृह शिष्य होते व काहीं प्रपंची होते. ज्याना प्रपञ्च मुळीं च नसतो ते निस्पृह होत. अशा निस्पृह शिष्यांपैकीं गणेश, जनार्दन, शिवराम, श्रीधर, व्यंकटेश, हरि, रघुवीर, त्र्यंबक, विठ्ठल,

श्याम व दामोदर हे प्रमुख होत. भक्तिज्ञानवैराग्ययुक्त अशा प्रपंची शिष्यांत दिनकराचे उभयबंधु, शामराज व त्र्यंबक, हे अग्रगणी होते. आपल्या उभयता स्त्रियास हि दिनकरांनीं ज्ञानाधिष्ठित केले होते. त्या च प्रमाणें वहिण सई व कन्या द्वारका याना हि दिनकराचा अनुग्रह होता. बाबाजी, व्यंकटेश, कान्होजी राजे, हिरो पाटील, बाय पाटील, रुद्रराम, बाळकृष्ण, जनार्दन इतकी प्रपंची शिष्याचीं नावें आढळतात. रखमाजी राजे मोहिते, मलजी राजे निंबाळकर आणि रत्नोजी राजे, येकोजी राजे, व निंबाजी राजे घाटगे वगैरे मराठे जहागिरदारानीं दिनकराचें शिष्यत्व पतकरिलें होतें. नांवापलिकडे या शिष्यांचीं आज जास्त माहिती देता येत नाहीं. तथापि त्या प्रांतांतील आस्थेवाईक सांप्रदायिकास हीं नावें कळून जास्त शोध करण्याला साधन व्हावें ह्मणून कळालीं तेवढीं नुसतीं नांवें च येथें दिलीं आहेत. दिनकराचे पुत्र रामचंद्र, त्याना हि वडीलाचा च अनुग्रह होता. त्यानीं आपल्या सीतारामसंवादांत गोविलीं आहेत ह्मणून तरी आज आपणास वरील नांवें कळत आहेत. रामचंद्र ह्मणतातः—

> या हि वेगळे शिष्य अनेक। चहुं वर्णांचे लाहानथोर कित्तेक।
> त्यांचीं नांवें सांगतां पृथक। श्रोते आधीक वीट मानिती ॥

त्या वेळच्या श्रोत्याना सर्व वस्तुस्थिति प्रत्यक्ष असल्यामुळें सविस्तर वर्णनाचा कटाळा आला असता कीं काय कोण जाणे, पण आज मात्र रामचंद्रानीं सर्व नांवें साद्यंत माहितीसह दिलीं नाहींत ह्मणून आपला मात्र हिरमोड होत आहे. रामचंद्र ह्मणतातः—

> नाम जयाचें दिनकर। जो अस्तोदयाहूनि पर।
> आदिमध्यांतरहित साचार। सर्वांतर चाळक ॥१–१०॥
> जो निसंग निरोपम। असंभवनीय अरूप अनाम।
> परि शरणागतांचे पुरवावया काम। निष्काम काम अवतरे ॥११॥
> करावया भक्ताचें उद्धरण। नाना रूपें धरूनि भगवान।
> युगानुयुगीं अवतरोन। भक्तसंरक्षण परोपरीं ॥ १२ ॥
> तो चि श्रीदिनकररूपें। कळियुगीं अवतरे साक्षपें।
> नाना दीप जनांचिये कृपे। केलें सोपें मोक्षपद ॥ १६ ॥
> कित्येक जीव बद्ध मुमुक्ष। त्यांसी देऊनियां अपरोक्ष।
> साधक चि सिद्ध केले प्रत्यक्ष। लय लक्ष स्वपदीं ॥१४॥

ऐसा जो सर्वेश । दिनकर दिवाकर दिनेश ।
दीन जना देऊनि सावकाश । पूर्ण परेश पूर्णत्वें ॥ १५ ॥

अशी ज्या सत्पुरुषाची योग्यता त्याचें आजवर नुसतें नांव हि आपणांस ठाऊक नसावें, हा कशाचा महिमा ह्मणावा ! अनुग्रह झाल्यापासून तों अवतारसमाप्तीपर्यंत जीं तीस चाळीस वर्षें गेलीं तेवढ्या अवधींत श्रीदिनकरानीं काय काय केलें वगैरे सर्व इत्थंभूत वृत्तांत कळावा असे मनास फार वाटतें, पण उपयोग काय ? रामचंद्रानीं सीतारामसंवाद गायिला त्याऐवजीं श्रीदिनकरचरित्र वर्णिलें असतें आणि फार काय, श्रीस्वानुभवदिनकराऐवजीं दिनकरानीं श्रीसमर्थचरित्र सांगितलें असतें तर मला फार आनंद झाला असता ! इतक्याउपर कोणी सांगावें, हे दोन्ही अध्यात्मपर ग्रन्थ लाभून हि श्रीरामचंद्र दिनकर रामदास यांचे चरित्रग्रन्थ मिळण्याइतकें आपलें भाग्य असेल ! असो.

दिनकरांच्या बंधूपैकीं त्र्यंबकाची व बहिण सई यांची थोडी जास्त माहिती लागते ती येथें दिली पाहिजे. मौजे माके, आडगांव, महुज, कडगांव व शिंगवे या पांच गांवाची जोशीपणाची मिराशी जनार्दन गोसावी बिन केशव भट यास होती. त्यांना संतान नव्हतें ह्मणून त्यांनीं देडीगावचे राघभट यांचा मुलगा येकभट यास धर्मपुत्र घेतलें होतें. त्या येकभटास दिनकरांची बहिण सई दिली होती. भगवंताच्या मनास आलें आणि येकभटास देवाज्ञा झाली. त्यास संतान झालें च नव्हतें. तेव्हां सासरे जनार्दन आणि सून सई यांनीं विचार केला कीं वृत्तिरक्षणास व धर्मकृत्यें चालविण्यास कोणी पुत्र पाहिजे. सईबाईनीं सुचविलें कीं, आपला भाऊ त्रिंबकभट आहे त्यास बहिणाजी जवळ धर्मपुत्र मागून घ्यावें. हा सल्ला जनार्दनपंतांचे मनास आला व त्या उभयतांनीं बहिणाजी गोसावी याजकडे जाऊन त्याजपासून त्रिंबकभटास मागून घेतलें. जनार्दन गोसावी यांनीं शके १५९० कार्तिक शुद्ध १ ला बहिणाजी गोसावी यास व शके १५९२ कार्तिक वद्य ५ स त्रिंबकभटास एतद्विषयीं सनदा करून दिल्या आहेत. १५९० ला दिनकराचे वडिल विद्यमान नव्हते हें उघड होत आहे. असो. पुढें राघभटानें सदरहु पांच गांवाच्या वृत्तीसंबंधानें कांहीं कज्जा चालविला होता पण सरकारांत तो खोटा ठरला. याविषयींचें निवाडापत्र एक वीत रुंद व बारा विती लांब असून वाचण्यासारखें आहे, पण रामदासी कागदपत्रांचा जो पुढें भाग निघणार आहे त्यांत त्याचा समावेश करूं.

आतां दिनकराच्या विद्वत्तेविषयीं कांहीं लिहू. दिनकरांच्या संबधानें रामचद्र ह्मणतात:–

ज्यांसी वेदविद्या विराजमान । ज्योतिषज्ञान परिछिन्न ।
शास्त्राचर्चा पुराणश्रवण । वैद्यक जाण विशेष ॥ १ ॥
तर्कभाषा लीलावती गणन । जन्मकाळग्रहण द्वये ज्ञान ।
लग्नविचारणा परिछिन्न । घटित प्रश्न यथोक्त ॥ २ ॥
मंत्रशक्ती असाधारण । धर्मशास्त्रविचारपरिज्ञान ।
नित्यानित्यविवेकसंपन्न । अखंड विवरण अध्यात्माचें ॥ ३ ॥
यमनियमेंसीं प्राणायाम । प्रत्याहारें ध्यान धारणा निसीम ।
आसनेसीं समाधीसभ्रम । हें अष्टांगेसीं निभ्रम साधन ज्यासी॥

यावरून दिनकराचा अधिकार व्यक्त होत आहे.

स्वानुभवदिनकराला आधारभूत ग्रन्थ कोणते त्याचीं नावें कलाप १ किरण १ ओव्या ७१ ते ९३ यात दिलीं आहेत तीं वाचून दिनकराच्या परिश्रमाविषयीं वाचकानीं कल्पना करावी. अज्ञान, अनास्था व कालगति याच्या फेऱ्यात सांपडून हि दिनकराचें घर केव्हा हि आणि किती हि वेळा जरी झाडलें तरी त्यात अजून ज्योतिषाचीं, पचागाचीं, जन्मपत्रिकेचीं, औषधाचीं, अभगाचीं, सस्कृत प्राकृतग्रन्थाचीं चिटोरीं प्रत्येक वेळेला सापडतात च. ही मी अतिशयोक्ति करीत नाहीं. खरोखर हें विद्यापीठ फार मोठें होतें आणि त्या मानानें त्याची अनास्था हि फार झाली ! ती कशी झाली याचें वर्णन करण्यास माझें मन कचरतें. आपल्या च ओठानीं आपल्या च दातांविरुद्ध तक्रार काय करावी ! यापुढें तरी सर्वांनीं, विशेषत: नगर प्रातातील लोकानीं या सत्पुरुषाच्या कृतीकडे लक्ष देऊन तिसगांवमठाचा जीर्णोद्धार केला पाहिजे; असो. अशा विपरीत स्थितींत हि पूर्ण, अपूर्ण, सस्कृत, प्राकृत मिळून सुमारें १५० पोथ्या किंवा बाडें उपलब्ध झालीं हें नशीब च ह्मणावयाचें. या सग्रहात बराचसा भाग ज्योतिषाचा आहे. कांहीं धर्मग्रन्थ आहेत. काही सस्कृत काव्यें व स्तोत्रें आहेत. वेदाताचे सस्कृतप्राकृत थोडे ग्रन्थ आहेत. शके १५६५ तील गगासहस्रनाम, १५७०तील येकनाथी भागवत व १५८० तील सौंदर्यलहरी आहे. शके १५९९ तील वैद्यकसार ह्मणून प्राकृत ग्रन्थ आहे. १६०९ तील रामार्चनचद्रिकेची पोथी आहे. १६१४ तील विवेकसिंधु, १६१६ तील मेघमाळा, १६४० तील कृष्णदासमुद्गल-

कृत रामायण, १६८६ तील रामसहस्रनाम, याशिवाय भावार्थ रामायण, रुक्मिणीस्वयंवर, देवदासाचें व्यंकटेशस्तोत्र, परमामृत, अमृतानुभव, ज्ञानेश्वरी, मुक्तेश्वराचीं काही पर्वें, कृष्णदासदामाचें भारत, दादोसुतमुद्गलकृत अश्वमेध इत्यादि ग्रन्थ आहेत. श्रीसमर्थांचीं काहीं प्रकरणें आहेत हें सांगावयास च नको. श्रेष्ठाचा सुगमोपाय आहे. नामदेव, तुकाराम, केशवस्वामी, शिवदिनकेसरी, उद्धवचिद्घन, देवदास इत्यादिकाचे अनेक अभंग आहेत. श्रीज्ञानेश्वराच्या नंतरचा व श्रीएकनाथाच्या पूर्वीचा चोंभाकृत उषाहरण ग्रन्थ मिळाला आहे. ग्रन्थ अपूर्ण पण अनेक दृष्टींनीं महत्त्वाचा आहे. महाराष्ट्र-वाङ्मयसंशोधकाना चोंभा हे नाव अश्रुत आहे. हा अपूर्ण ग्रन्थ देखील संपादिला पाहिजे, कारण भाषाशास्त्राच्या अभ्यासाला त्याची फार मदत होणार आहे. रा. राजवाडे यानीं संपादिलेली ज्ञानेश्वरी श्रीनाथाच्या पूर्वीची का नंतरची आहे हें सिद्ध करण्याला हा ग्रन्थ मदत करील. ' पोथ्याची व वस्ताची ' अर्धवट यादी सांपडली आहे तींत नामदेवाचें बाळकांड व मुक्तेश्वराचा अश्वमेध अशा दोन अश्रुत ग्रन्थाचा उल्लेख आहे. श्रीसमर्थांप्रमाणें दिनकराची हि ' शुतीची कुबडी ' होती असें या यादीवरून दिसतें. रामचंद्राची व दिनकराची कविता आहे, तीविषयीं पुढें सांगतों. शें दीडशें वर्षें पोरानीं पतंग उडवून व गावढळ लोकानीं गावठी नाटकांत राजाला मुकुट चढवून हि ज्या मठांत अजून इतका संग्रह उरला आहे त्या मठांत श्रीदिनकराच्या वेळीं व सुमारें शंभर सवाशें वर्षें नंतर केवढा मोठा संग्रह असला पाहिजे याची कल्पना च करावी ! असें हें रामदासी विद्यापीठ होतें ! तिकडे श्रीरामदासांकित सांप्रदायिकाची दृष्टि वळो अशी प्रार्थना आहे. श्रीसमर्थांचे सर्व मठ या च योग्यतेचे होते. ह्या लहान मोठ्या हजारों विद्यापीठांनीं धर्मप्रसाराचें व विद्यादानाचें केवढें मोठें कार्य केलें असलें पाहिजे याची कल्पना च करावी.

दिनकराचा मुख्य ग्रन्थ श्रीस्वानुभवदिनकर.

अहो रामदासकृपा ते चि पूर्णिमा पूर्ण ।
तेथ स्वानुभवचंद्राचे पूर्णपण ।
दिनकरसुखाब्धि मर्यादा सांडून ।
अमर्याद उचंबळला ॥ १६-४-१०६

आणि मग दिनकराच्या मुखातून जे स्वसुखोद्गार निघाले ते स्वानुभवदिनकरग्रन्थरूपानें आज मुमुक्षु जनाच्या उपयोगी पडत आहेत.

हा ग्रन्थ श्रीसद्गुरुभक्तीचा केवळ अर्णव आहे. प्रत्येक सांप्रदायिकानें निदान एक वेळ तरी येथें समुद्रस्नान केलें पाहिजे, अशी माझी आग्रहाची विनंति आहे. या सागरांत कोणकोणतीं रत्नें साठविलीं आहेत तीं मी काय सांगू. विवेक, वैराग्य, सत्कर्म, उपासना, भक्ति, सद्गुरुभजन, ज्ञान, विज्ञान, देहचतुष्टयनिरास, महावाक्यविवरण, माया, ब्रह्म, योगाभ्यास, प्रपंच, अनुभव, बद्ध, मोक्ष, कीर्तन, गुरुरूप, पातकें, प्रायश्चित्तें, मनाचें स्वरूप, पुरश्चरण, रामोपासना इत्यादि शेंकडों विषयांचें जें स्वानुभविक विवेचन या ग्रन्थांत केलें आहे तें प्रत्येकानें आपआपल्या मनाशीं च मननपूर्वक वाचलें पाहिजे. श्रीसमर्थशिष्याचा असा हा पहिला च ग्रन्थ प्रकाशित होत आहे व त्यावर प्रेम बसण्यास निष्ठावंतास एवढेंच कारण पुरेसें आहे. या ग्रन्थांत पदोपदीं श्रीगुरुभक्तीचे जे प्रेमळ उद्गार आले आहेत ते वाचीत असतां श्रीगुरुभक्तिपरायणाचीं अंतःकरणें प्रेमानें भरून आल्यावांचून व प्रत्येक उद्गाराचे ठिकाणीं थांबावेसें वाटून त्याची वृत्ति तावत्काळ तदाकार झाल्यावांचून राहणार नाहीं. श्रीगुरुभक्ति कशी करावी व कशी केली असतां सद्गुरुकृपा होते, एरव्हीं नाहीं, याचा बोध या ग्रन्थापासून होणार आहे.

> जो केवळ असेल गुरुभक्त । स्वानुभवप्रत्ययें पूर्ण भरित ।
> तो चि विचारूनि पाहेल आद्यंत । स्वानुभवदिनकरीं ॥ १-१-११४

श्रीरामाच्या मूर्तीपुढें दिनकरानीं ध्यानस्थ बसावें, सद्गुरुचरणाचें चिंतन करावें, गुरुरूप आठवावें, सद्गुरूची सावयव मूर्ति हृदयांत स्थिर करावी आणि मग आपल्या च नादांत ग्रन्थरचना करावी. ग्रन्थराज श्रीदासबोध याची प्रभा स्वानुभवदिनकरावर सर्वत्र पडलेली आहे. भक्तिरहस्य व सुगमोपाय या श्रेष्ठांच्या ग्रन्थापासून हि दिनकराना स्फूर्ति झाल्याचें वाचकास आढळून येईल. कलाप १, किरणें ४ व ५ वाचीत असतां श्रीज्ञानेश्वरमहाराजांची हि कृपा दिनकरावर होती हें कोणाच्या हि लक्षांत येणार आहे. दिनकर स्पष्ट सांगत च आहेत. ग्रन्थरचना कोणी आणि केव्हा करावी ?

> आधीं पूर्णत्वें असावी श्रीगुरुकृपा । जियेकरितां स्वानुभव सोपा ।
> त्यावरी वेदशास्त्रपुराणांचिया स्वरूपा । साकल्य जाणितलें असावें ॥ १,०९
> त्यावरी पूर्वग्रन्थवक्ते महाराज । त्यांचिये कृपेची असावी वोज ।
> सत्कर्म उपासना ज्ञानबीज । विचारावें तत्वतां ॥ ११० ॥

वैराग्य असावें विवेकयुक्त । सगुण निर्गुण साक्षात्कार व्यक्त ।
भाषाज्ञान संस्कृत प्राकृत । परिछिन्न असावें ॥ १११ ॥
इतुकें असोनियां परिपूर्ण । त्यासी साह्य असावें प्राक्तन ।
याहिवरी भगवद्भजन । केलें चि करावें उत्तरोत्तर ॥ ११२ ॥
इतुके हि पदार्थ अनुकूळ । स्वानुभवदिनकरीं परिपूर्ण सकळ ।
त्यासी आश्रय अनाश्रय केवळ । श्रीगुरुकृपा यथार्थ ॥ ११३ ॥

असा हा प्रासादिक ग्रन्थ आहे. त्याच्या वाचनानें रामदासी सांप्रदाय ह्मणजे काय याचें ज्ञान वाचकास होणार आहे. हीं सांप्रदायाचीं लक्षणें प्रसंगवशात् ग्रन्थांत सर्वत्र विखरलेलीं असल्यामुळें एकंदर ग्रन्थाला विशेष गोडी आलेली आहे. त्यातल्या त्यात पंधराव्या कलापाच्या पांचव्या किरणांत हीं लक्षणें विशेष प्रगट रीतीनें दृग्गोचर होत आहेत. कोणी हा ग्रन्थ वाचतील न वाचतील ह्मणून असें वाटतें कीं, तो सर्व भाग येथें उतरून घ्यावा. पण मी असा वेडेपणा का करूं. श्रीरामदास्य, श्रीगुरुभक्ति व श्रीसांप्रदाय यांनीं हा सर्व ग्रन्थ व्यापलेला आहे व ज्यांना या तीन गोष्टींचा छंद असेल ते तो साद्यंत वाचल्यावाचून कधीं राहणार नाहींत. हें सर्व खरें असून हि निदान अकरा ओंव्या येथें सादर करण्याविषयीं वेडें मन ओढ घेत च आहे. क्षमा असावी.

रामदासीं श्रीराम आराधिला । आराधुनी गुरुत्वें वरिला । स्वरूपसाक्षात्कार करूनि साधिला । प्रपंच परमार्थ ॥१॥ श्रीरामचंद्रें रामदासांसी । जेव्हां केलें निजअनुग्रहासी । तेव्हां निरविलें श्रीहनुमंतजीसी । रामदासपरंपरा ॥२॥ जितुके रामदासांचे शरणागत । जाले आणि होणार परंपरागत । तितुक्यांचा साह्यकारी श्रीहनुमंत । सुखदुखीं तो स्मरावा ॥३॥ केलिया मारुतीचें निजस्मरण । तत्काळ होईजे सुखसंपन्न । दुख संकट महा विघ्न । स्मरणमात्रें नाश पावे ॥४॥ त्यानंतर रामदासांची वर्तणुक । निस्पृहता आणि प्रपंचिक । त्यांत प्राक्तनयोगें ज्यासी जे योजेल सम्यक । तेणें ते चि साधावी ॥ ५ ॥ परंतु हो प्रपंची अथवा निस्पृह । तेणें वैराग्ययुक्त असावें निसंदेह । वर्णाश्रमधर्मकर्मसमूह । प्राणांतीं हि न सोडिजे ॥६॥ अहर्निश करावी श्रीरामभक्ति । वर्णाश्रमधर्माचिया युक्ति । श्रीरामउपासनेची अभिव्यक्ति । केलीच करावी निशंक ॥७॥ वैराग्य करावें विवेकयुक्त । प्रतिज्ञा ह्मणवावें श्रीरामभक्त । पदार्थमात्रीं कदापि आसक्त । प्राणांतीं हि न व्हावें ॥८॥ जितुकी गोष्टी

सुखें बोलावी । तितुकी क्रिया करूनि दाखवावी । सत्क्रिया उत्तरोत्तर चालवावी । धर्मशास्त्रविचारेंसीं ॥९॥ करावें वेदपारायण । शास्त्रचर्चा अध्यात्मनिरूपण । कां ते श्रीरामगुणानुवादकीर्तन । यथासांग करावें ॥१०॥ श्रीरामजयरामजयजयराम । नित्य स्मरणाचा हा चि असावा नेम । यावांचुनि सकळ मिथ्या श्रम । वायांविण करूं नये ॥ ११ ॥

ही शिकवण अखंड कंठीं धारण करावी असें कोण ह्मणणार नाहीं ! असा हा बहुमोल ग्रन्थ आहे. तो सावचितपणें वाचावा, एकांतात वाचावा, जनांत त्याचें निरूपण करावें. या ग्रन्थाच्या श्रवणमननानें श्रीसमर्थचरणीं वाचकाचें ध्यान स्थिरावेल, त्यास श्रीदासबोध समजूं लागेल, त्याचे विचार प्रबळ होतील, आचार शुद्ध होईल, प्रपंचाचा त्यास उबग येईल, संपत्ति कारणीं लागेल, नरदेहाचें सार्थक होईल. इतक्याउपर कोणी हा एवढा मोठा पांचशें पृष्ठांचा ग्रन्थ वाचावा, असा कोणाला कटाळा वाटेल तर त्यानें निदान एकवार आठवा कलाप वाचावा, सातवा वाचावा, सहावा वाचावा ! खरें सांगूं का, सर्व च ग्रन्थ वाचावा ! अमुक कलाप वाचावा आणि तमुक वाचावा हें उगी च नादामध्यें कांहीं तरी लिहून गेलों.

अभंग, श्लोक, पदें, सवया, घनाक्षरी वगैरे मिळून पांचशें पृष्ठें होतील इतकी दिनकराची इतर स्वानुभविक व प्रबोधकारक कविता उपलब्ध झाली आहे. ती फार प्रेमळ आहे. सांप्रदायिकांना ती चटका लावील याबद्दल मला शंका नाहीं. ती वाचकास सादर करण्याचा योग केव्हां येणार असेल तो खरा. दिनकराचे प्रपंचपरमार्थें निजात्मज श्रीरामचंद्र यांचा सीतारामसंवाद हा मुख्य ग्रन्थ व अभंग, श्लोक, पदें वगैरे मिळून पांचशें पृष्ठांचा भाग होईल इतकी त्यांची हि कविता आहे. असे पितापुत्र आणि गुरुशिष्य महाराष्ट्रांत वारंवार उदयास येवोत अशी अनन्यभावेंकरून प्रार्थना आहे.

श्रीदिनकराच्या इतर कवितेंतील एक च उतारा देऊन पुढें जाऊं.

विचारवंत संत हो । समस्त भाग्यवंत हो । तुह्मांस वीनती खरें । स्मरा श्रीराम राम रे ॥ १ ॥ तुह्मांसमान योग्यता । नसे अशी सभाग्यता । ह्मणौनि सांगतों बरें । स्मरा श्रीराम राम रे ॥ २ ॥ अपाय फार ये युगीं । नसे उपाय तो जगीं । उगे चि काय निस्तुरे । स्मरा श्रीराम राम रे ॥ ३ ॥ शिवासि लागली सवे । महाविषाग्नि तो निवे । तसें चि सर्व आदरें । स्मरा श्रीराम राम रे ॥ ४ ॥ तपोधनांसि


आवडे । अनु दुजें तें नावडे । स्वहित मूळ हें चि रे । स्मरा श्रीराम राम रे ॥ ५ ॥ स्वहितसें करावया । दुजें नसे तरावया । भवार्णवीं विशेष रे । स्मरा श्रीराम राम रे ॥ ६ ॥ मतिभ्रमासि वारिता । नसे असा विचारितां । समर्थ मोक्षधाम रे । स्मरा श्रीराम राम रे ॥ ७ ॥ बहुत क्लेशकारकें । तपें वयासि हारकें । शिणों नका उगे चि रे । स्मरा श्रीराम राम रे ॥ ८ ॥ कित्तेक निग्रही जनें । वृथा अटव्य-सेवनें । श्रमासि थार होत रे । स्मरा श्रीराम राम रे ॥ ९ ॥ हिमाग्नि धूम्रपान रे । भुगर्भशून्यवास रे । ह्मणे दिनेश व्यर्थ रे । स्मरा श्रीराम राम रे ॥ १० ॥

असो. स्वानुभवदिनकर ग्रन्थ लिहिण्याला आज च बरोबर दोनशें सतरा वर्षें झालीं. शके १६१६ चैत्र शुद्ध नवमी इंदुवासरे तिसगावीं हा ग्रन्थ निर्माण झाला. ज्या प्रतीवरून हा ग्रन्थ छापला आहे तेवढी एक च प्रत प्रथम आह्मास मिळाली. रा. अमृत बापूजी रसाळ याना ही प्रत मिळ-विण्यासाठीं फार परिश्रम पडले. प्रत मूळची तिसगावची. तेथून ती कड्यास गेली. तेथून पुढें कारखेलास एका कुणब्याचे घरीं ५।४ वर्षें धूळ खाण्याचें तिच्या नशिबीं होतें ! त्या स्थितींतून तिला सोडवून रा. शिवरामपत रसाळ यानीं तिला आपल्या गावीं देउळगाव घाट येथें नेलें. तेथून नतर घाटशिरस येथील कुळकर्णी रा. यादवराव श्रीराम याचे घरीं प्रतीनें काहीं वर्षें काढलीं. सुमारे तीन वर्षांमागें प्रगट व्हावें अशी इच्छा होऊन ती रा. अमृत बापूजी रसाळ यांचे हातीं आली व तिची इच्छा पूर्ण व्हावी ह्मणून रा. रसाळ यानीं तिला आमच्या हवालीं केली. तात्पर्य, महाराष्ट्राच्या नशिबीं असला अमोलिक ग्रन्थ होता ह्मणून रा. रसाळ यांच्या प्रयत्नाला यश आलें. रा. रसाळ यांचे सामान्यपणें महाराष्ट्रावर व विशेषतः सत्कार्योत्तेजक सभेवर हे मोठे उपकार आहेत. वरील अनेक स्थलांतरात ज्यानीं ज्यांनीं प्रतीचें सरक्षण केलें त्याची त्याची सभा आभारी आहे. प्रतीच्या शेवटीं “ बायाजी सोळोंखी याचें पुस्तक सपूर्ण ” असा मजकूर आहे. त्या बाया-जींना माझे शतशः प्रणिपात असोत. अकरा किरण छापून झाल्यावर श्रीक्षेत्र-चाफळास दिवाकराचे वशज रा. विनायकराव बापु राहतात त्याचेकडे स्वानुभवदिनकराची आणखी एक अपूर्ण प्रत मिळाली. रा. बापुरावाचा मी आभारी आहे. कलाप ९ व १० खेरीज करून बाकीच्या ग्रन्थाला टीपा देण्याचें काम रा. दाजीबा देव यांनीं केलें आहे व सदरहु दोन्ही योगकलापांवरील

टीपा येथील संध्याआश्रमाचे अधिपति रा. रा. वासुदेवराव शिदोरे यांच्या आहेत.

दिनकराचा जन्मशक जसा अनिश्चित आहे तसा च समाधीशक हि आहे ! काय करावें ! दिनकराची पुण्यतिथी कोणती ती हि आज सांगता येऊं नये याची लाज वाटते. स्वानुभवदिनकराचा रचनाकाल शके १६१६ आहे हें वर आलें च आहे. सनदापत्रांत रामचंद्राचें नांव प्रथम १६१९ त आढळतें. यावरून शके १६१६ ते १६१९ च्या दरम्यान दिनकरानीं आपलें अवतारकृत्य समाप्त केलें, एवढें च आज अनुमान काढता येतें.

दिनकराची समाधी तिसगावीं गांवाबाहेर एका शेतांत आहे. तेथें लहानसें च वृंदावन आहे. दिनकराची वंशावळ उपलब्ध होते ती अशी:




श्रीदिनकरापासून तों नारायणबुवापर्यंत चौघांच्या समाधी आहेत व त्या त्या च शेतांत आहेत. पैकीं दोन समाधींवर लेख आहेत, पण फक्त एका च समाधीवरील लेख काहींसा लागतो. तो असा:

॥ आद्या तिथी कृष्ण जिग्राथ जेष्ठ ॥ त्रिअष्ट सोळा शके काळपृष्ठा ॥
॥ दिनादास राम प्राण जाला ॥ श्रीरामचंद्रस्वरूपीं मिळाला ॥

या लेखात जीं महत्त्वाचीं अक्षरे आहेत तेवढ्याबद्दल च खात्री नाहीं ! ' त्रिअष्ट ' का ' त्रिषष्ठ ' हीं अक्षरें बरोबर लागलीं नाहींत. शके १६६४ तील रामचंद्राच्या नावचें एक दानपत्र उपलब्ध असल्यामुळें त्रिषष्ठ नसून त्रिअष्ट असावें, असें वाटतें. " दिनादास राम " हीं हि अक्षरें चांगली उमगत नाहींत. जिग्राथ आणि 'काळपृष्ठा' याचा अर्थ लागत नाहीं. तथापि लावलेला मजकूर बरोबर असल्यास शके १६८३ च्या ज्येष्ठ वद्य १ स रामचंद्रानीं समाधी घेतली असा अर्थ होतो.

हल्लीं श्रीगुरुभक्तिपरायण लक्ष्मणबुवा व श्रीगुरुभक्तिपरायण सीतारामबुवा मठाची व्यवस्था पहात असतात. त्याच्या व श्रीगु. भ. प. गोविंदबुवाच्या मनात मठाचा जीर्णोद्धार करण्याचें फार आहे. गोविंदबुवानीं मठातील होता नव्हता तो सर्व संग्रह मला दाखविला व उपयोग करण्यासाठीं जरूर तो माझ्या स्वाधीन केला याबद्दल मी त्याचा ऋणी आहे.

श्रीरामदास आणि रामदासी मालेंतील पुढील पुष्पांविषयीं विस्तृत माहिती श्रीदासबोधाच्या तिसऱ्या आवृत्तींत नुकती च दिली आहे. आज हा सहावा भाग महाराष्ट्रास अर्पण होत आहे. या भागात अतर्बाह्य श्रीसद्गुरु-स्वामीसमर्थ स्वलीळा व्यापून राहिले आहेत. अशा स्थितींत

तेणें वाटे मुखीं रामदास गावे । जिव्हें रामदास उच्चारावे ।
निजकरीं रामदास पुजावे । अनंतां उपचारीं ॥ ११-५-१०९
नेत्रीं रामदास पाहावे । कानीं रामदासचरित्र ऐकावें ।
रामदासपदींचें जिघ्रावें । निर्माल्य घ्राणें ॥ ११०
वोष्ठीं रामदासपदीं चुंबन । पदांगुष्ठ चोखावे चुरचुरून ।
रामदासांपुढें करावें नर्त्तन । निजपदीं सहजस्थितीं ॥ १११
मस्तकीं रामदास वंदावे । हृदईं रामदास आलिंगावे ।
कडकडूनि सर्वांगेंसीं भेटावें । रामदासीं सहजस्थितीं ॥ ११२
निजहृदईं रामदास सांठवावे । स्कंधीं रामदास बैसवावे ।
पाठीसीं रामदास घालावे । वाम सव्य सहजस्थितीं ॥ ११३

यापरीस जास्त काय लिहावें आणि मागावें !

धुळें
श्रीरामनवमी १८३३ } शंकर श्रीकृष्ण देव

॥ श्रीरामदासार्पणमस्तु ॥

## श्रीसद्गुरुस्तवन

१

नमन श्रीगुरुनिजपाया । साधक तारक उपाया ।
संकट दुर्घट अपाया । सोहं हंसा खुण पाया ॥ ध्रु० ॥
पतीतपावन ब्रिद् गाजे । श्रवणें निर्भय मन माझें ।
भाविक सात्विक सुख माजे । षड्रिपुमंदिर मग लाजे ॥१॥
कृपा अंजन लेउनियां । ब्रह्म परात्पर होउनियां ।
सज्जनपद्रज सेउनियां । अष्ट काया निरसुनियां ॥ २ ॥
अपार महिमा गुरुराया । बंद भवार्णव उतराया ।
कल्याण अनुभव विवराया । अनाथ हिन दिन उधराया ॥ ३ ॥

२

मज तो आवडतो मम स्वामी । निशिदिनि अंतर्यामीं ॥ ध्रु० ॥
काय बोलों मी कीर्तीसी । न दिसे तुळणेसी ॥ १ ॥
भक्तीमार्गाच्या गजढाला । चालविल्या आढाला ॥ २ ॥
अक्षै पदाचा सुखदाता । निरसुनि माया ममता ॥ ३ ॥
छत्र बहुतांचें दासांचें । नाम चि कल्याणाचें ॥ ४ ॥

# ॥ श्री स्वानुभवदिनकर ॥

## अनुक्रमणिका


॥ कथाप्रशंसा कलाप पहिला ॥ १

१ ग्रन्थपरिभाषावर्णन
२ ॐकारस्वरूप
३ मंगलाचरण गणेशस्तवन
४ शारदास्तवन
५ सद्गुरुनामव्याख्या
६ संतश्रोतेवक्तेकुळदैवतस्तवन

॥ संसारलक्षण कलाप द्वितीय ॥ २

१ संसारदुःखस्त्रीसुखवर्णन
२ प्रपंचदुःखवर्णन
३ संसारलक्षण बाळतारुण्यवृद्धावस्था-वर्णन
४ यमयातना
५ त्रितापलक्षण

॥ वैराग्य कळाप तिसरा ॥ ३

१ संतसंगवर्णन
२ गर्भविवक्षाशरीरवर्णन
३ बाळतरुणावस्थावर्णन पांडुरंगमाहात्म्यकथा
४ नरदेहनिंद्यप्रकारवर्णन
५ नरदेहवंद्यनिरूपण

॥ विवेक कळाप चवथा ॥ ४

१ सद्गुरुवर्णन
२ नरदेह बहुजिनसवर्णन
३ श्रीगुरुलक्षणपरीक्षावर्णन
४ शिष्यपरीक्षालक्षण
५ गुरुकर्तव्याकर्तव्यलक्षण

॥ कर्म कळाप पांचवा ॥ ५

१ श्रीगुरुपूजनपद्धति
२ देहस्वभावकर्म
३ त्रिगुणस्वभावकर्म
४ वर्णाश्रमधर्मसंस्था
५ चतुर्वर्णउपजीविकावर्तन

॥ उपासनानिश्चय कळाप ॥ ६

१ गुरुनिश्चय
२ प्रणवउपासनानिश्चय
३ प्रणवसर्वेश्वरनिश्चय
४ पंचउपासनानिश्चय प्रणवेश्वरस्वरूप
५ स्त्रीशूद्रादि नानायातीतरणोपाय

॥ उपासनारहस्य क० सप्तम ॥ ७

१ सूर्यगणेशउपासनारहस्य
२ आदिशक्तिउपासनानिश्चय
३ शंकरब्रह्माउपासनारहस्य
४ विष्णुउपासनारहस्य
५ श्रीरामचंद्रउपासनारहस्य

॥ पंचधाभक्तिलक्षण कळाप ॥ ८

१ बहुविधभक्तिनिरूपण
२ त्रिविध भक्तिनिरूपण
३ चतुर्विध भक्तिनिरूपण
४ नवविध भक्तिनिरूपण
५ येकविधभक्तिनिरूपण

॥ हटयोगलक्षण कळाप नवम ॥९

१ चतुर्युगधर्मनिरूपण

२ अष्टांगयोगसाधन

३ देहशुद्धि

४ कुडलिनीऊर्ध्वभेदन

५ योगसिद्धिप्राणायामसाधन

॥ सप्तचक्रशोधन कळाप ॥ १०

१ स्वबुद्धिज्ञाननिर्शन

२ देहदुर्गशोधन

३ चत्वारचक्रशोधन

४ द्विदळचक्रनिरूपण

५ सप्तमचक्रविवरण

॥ चतुर्विध ज्ञान क० अक्रावा॥११

१ चतुर्विध ज्ञान लक्षण

२ स्थूलसूक्ष्मदेहद्वयअन्यथाज्ञाननिरसन

३ अज्ञानात्मक कारणदेहनिरसन

४ महाकारणदेहनिरसन ज्ञानप्राप्ति-निरूपण

५ देहचतुष्टय महावाक्यविवरण वि-ज्ञानस्थिति

॥ब्रह्मांडदेहचतुष्टयनिरास, पिंड-ब्रह्मांडऐक्य आणि मायाब्रह्म-निवाड कळाप बारावा ॥ १२

१ विराटदेहनिरसन

२ हिरण्यगर्भनिरसन

३ अव्याकृतब्रह्माडदेहकथन

४ ब्रह्मांडचतुर्थदेह पिंडब्रह्माडऐक्य

५ नानामतप्रतिपादन

॥ मायाब्रह्मविवरण कळाप ॥१३

१ मायाब्रह्मविवरण नानातर्कपरिछेदन

२ परब्रह्ममूळमायाविवरण

३ प्रकृतिपुरुषयोगविवरण

४ पिंडब्रह्मांड, चतुर्दशभुवनरचना चत्वारमुक्तिकथन

५ पंच प्रळय

॥ विज्ञानस्थिति पंचभूत त्रिगुण-लक्षण नानाविध आशंका ॥१४

१ स्वानुभवपरिपूर्ण

२ विज्ञानस्थिति

३ पंचभूतपरस्परानुक्रमधर्मकर्म

४ त्रिगुणस्वरूप

५ परब्रह्मविवक्षा कूटविवरण

॥ मनउन्मनस्थिति मोक्षलक्षण कूटविवरण ॥ १५

१ मनउन्मनत्वलक्षण

२ मनउन्मनस्थिति तुर्यालक्षण षोडश महावाक्य

३ मोक्षनिश्चय नाना आशंकानिरसन

४ जडचचळनिश्चळ भाग कूटविवक्षा

५ स्वात्मस्थिति निजउपासनामंत्ररहस्य

॥ ग्रंथस्तव श्रीगुरुपरंपरा पूर्णत्व-प्रतिपाद्य ॥ १६

१ ग्रन्थस्तवन

२ रामदासनामव्याख्या

३ श्रीगुरुउत्तरपूजा

४ श्रीगुरुपरंपरा

५ श्रीगुरुपूर्णत्व

# ॥ स्वानुभवदिनकर ॥

83

## ॥ कथाप्रसंग कलाप पहिला ॥ १ ॥

॥ श्रीराम ॥

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीसरस्वत्यै नमः ॥ श्रीगुरुभ्यो नमः ॥ श्रीरामसमर्थसखा ॥ श्रीआंजनेयाय नमः ॥ ॐ नमो येकाक्षरब्रह्म ॥ स्वानुभवदिनकरीं परम सुगम । स्त्री पुं नपुंसक नाम । त्रिपुटी निरसूनि ॥ १ ॥ जें पूर्वपक्ष सिद्धांतादि । द्वंद्वतारहित जें अनादि । वाच्यांश लक्ष्यांश पक्षभेदीं । उर्वरीतपणें जें ॥ २ ॥ त्यासी येकाक्षर हें हि आड-नांव । समजावया वेदें धरूनि हांव । बोलों गेला तव स्वयमेव । कुंठित जाला सहजें ॥ ३ ॥ जेवि मुकियानें साकर भक्षिली । ते न जाय आणिकां सांगितली । का ते मुग्धा स्त्री निजपुरुषें भोगिली । तियेसी सुख सांगतां न ये ॥ ४ ॥ तेवि वेदें निजसुखानुभव ध्यावया । ब्रह्मासी बाहे हाक मारूनियां । तेथ काहीं न दिसे परि ॐ ह्मणोनियां । ध्वनी उठिला परब्रह्मीं ॥ ५ ॥ तये ध्वनीचा विचारितां अंतर्भाव । वेद निवांत होऊनि स्वयमेव । भोगीत राहिला निजसुख टेवें । स्वानुभव-दिनकरीं ॥ ६ ॥ वेद गीर्वाण भाषा बोलतां सीणला । परि ॐकार ध्वनीचा प्रांत न देखिला । मग प्राकृत भाषां अर्थ विवरता जाला । स्वानुभवदिनकरीं ॥ ७ ॥ तेथ मुळींहूनि सेवटवरी । निरूपण चालिलें येकाक्षरी । स्वानुभवदिनकरामाजी चतुरीं । विवरूनि पहावें ॥ ८ ॥ ग्रंथराज स्वानुभवदिनकर । भक्तिज्ञानवैराग्याचें माहेर । श्रोतीं आद्यंत पाहोनि साचार । स्वीकार अथवा त्याग कीजे ॥ ९ ॥ ग्रंथ सपूर्ण

---

१ हौस, आवड. २ भाषेनें.

पाहिलियांवीण । ग्रंथासी उगें चि नेदिजे, दूषण-[1] यद्यपि दिधलें तरि अन्याय कोण । समर्थासी ह्मणों शंके ॥ १० ॥ परतु थोरपणाचें हें चि उचित । ग्रंथ पाहोनियां आद्यंत । मग भूषण दूषण यथोचित । समर्थासी मानेल तें ॥ ११ ॥ परी संतांसी, प्रार्थना इतुकी चि । प्राकृत ह्मणोनि अवगणनें चि । सांडी न कीजे या ग्रंथाची । न पाहातां आद्यंत ॥ १२ ॥ परी ग्रंथीं काय असे निरूपण । तें संतांप्रति कीजेल निवेदन । तेथ सोळा कळाप आणी कीर्ण । येक्यासी प्रकाशमय ॥१३॥ प्रथम कळाप षट्कीर्ण । स्वानुभवदिनकरीं विराजमान । तेथील आद्यंत निरूपण । सांगिजेल यथाक्रमें ॥ १४ ॥ प्रथम कळापीं प्रथम कीर्ण । तेथें ग्रंथपरिभाषाकथन । दुजां श्रीरामचंद्रदर्शन । तिजां स्तविजे गण-पति ॥ १५ ॥ चतुर्थ कीर्णीं शारदास्तवन । पंचमामाजि श्रीगुरुवंदन । षष्ठीं संतश्रोतेसज्जन । तथा कुळदैवतें ही ॥ १६ ॥ एवं प्रथम कळाप षट्कीर्णमंडित । कथा प्रशंसिली आद्यंत । द्वितीय कळाप पंचकीर्ण उत्फुल्लित । संसारलक्षणेंसीं ॥ १७ ॥ प्रथमीं गर्भदुःख बाळकावस्था । दुजा तरुणपण तिजां वृद्धावस्था । चतुर्थीं यमयातनेची अवस्था । पंच-मामाझारी त्रिविधताप ॥ १८ ॥ त्यानंतर पंचकीर्णी तृतीय कळाप । बोलिजेल आद्यंत वैराग्यानुरूप । तेथ प्रथम कीर्णीं संक्षेप । नरदेहस्तवन ॥ १९ ॥ द्वितीय कीर्णीं सांगिजेल गर्भविवक्षा । तिजां बाळतरुण-देहींची साक्षा । त्यांत चि पांडुरंगमहात्मपक्षा । दृष्टांतासी योजलें ॥ २० ॥ चतुर्थीं नरदेह निखदिजेल । पंचम कीर्णीं त्याचा उपकार वर्णिजेल । एवं तृतीय वैराग्यकळाप संपेल । पंचकीर्णेंसीं सुगम ॥२१॥ चौथा विवेककळाप पंचकीर्ण । प्रथमीं बहुदेव दुजां नरदेह आद्य वर्णन । तिजां साकल्य श्रीगुरुलक्षण । चतुर्थीं शिष्यलक्षणपरीक्षा ॥ २२ ॥ पंचम कीर्णीं गुरुत्वनिश्चय । एवं चतुर्थ कळाप सांगिजेल विवेकान्वय । तथा पंचम कळापीं सत्कर्मसमुच्चय । सांगिजेल पंचधा ॥ २३ ॥ तेथ

---

१ निषेध केला पाहिजे.

प्रथम कीर्णीं श्रीगुरुपूजन । दुजां देहेंद्रियअवस्था कर्मकथन । तिजा त्रिगुणस्वभाव कर्माचरण । चतुर्थीं वर्णाश्रम यथोचित ॥ २४ ॥ पंचमीं सांगिजेल उपजीविकावर्त्तन । एव कर्मकळाप पंचकीर्ण । त्यानतर उपासनानिश्चय पूर्ण । साहावे कळापीं ॥ २५ ॥ त्यांत प्रथम कीर्णीं उपासनाक्रम । दुजां एकाक्षर ब्रह्म कर्मसंभ्रम । तिजां मूळपुरुषसहित पंचदेवतोद्गम । येकाक्षर प्रतिपाद्य ॥ २६ ॥ चतुर्थीं मूळपुरुषकर्तृत्वप्रशंसा । पंचमीं स्त्री शूद्र अन्ययाति तरणोपाय धीवसा । एवं उपासनानिश्चय कळाप सहसा । सांगिजेल पंचकीर्णीं ॥ २७ ॥ त्यानतर सप्तम कळाप पचकीर्ण सौरस्य । तेथें बोलिजेल पचउपासनारहस्य । तेथ प्रथम कीर्णीं सूर्यगणेशकळास्य । अति कौतुकान्वित ॥ २८ ॥ दुजां आदिशक्तीचें रहस्य । तिजां शकरब्रह्मादिकळास्य । चतुर्थीं विष्णूचें सौरस्य । सांगिजेल लाघवेंसीं ॥ २९ ॥ पचमीं श्रीरामचद्रउपासना । न्यासध्यानजपमुद्राविधाना । रामार्चनचद्रिकाभिधाना । शास्त्रप्रमाण मुख्यत्वें ॥ ३० ॥ येव उपासनारहस्य यथाक्रमेंसीं । सागिजेल सप्तम कळाप पचकीर्णेंसीं । त्यानंतर अष्टम कळाप पचविधा भक्तीसी । यथाक्रमें सांगिजेल ॥ ३१ ॥ तेथ प्रथम कीर्णीं बहुविध भक्ति । दुजां सांगिजेल त्रिविध युक्ति । तिजा चतुर्विध भजनाची व्यक्ति । चतुर्थीं नवविध भजन ॥ ३२ ॥ पंचमीं येकविध भक्तिलक्षण । एव अष्टम कळाप पचकीर्ण । तेथूनि ग्रंथपूर्वार्द्धकथन । समाप्तीसी येईल ॥ ३३ ॥ पुढें उत्तरार्द्धीं नवम कळाप । तेथें योगसिद्धीचें सांगिजेल पडैप । प्रथम कीर्णीं चतुर्युगानुरूप । कळीयुगधर्म यथाक्रमें ॥ ३४ ॥ दुजां सांगिजेल हटयोगक्रम । तिजां देहशुद्धि करूनि निभ्रम । चतुर्थी कुंडलिनीचा ऊर्ध्वागम । यथाक्रमें सागिजेल ॥ ३५ ॥ पचमीं योगसिद्धिपूर्णता । लाधोनि सर्वोत्कर्ष साम्राज्यता । पुढें दशम कळापीं सप्तचक्रशोधनता । सागिजेल यथाक्रमें ॥ ३६ ॥ तेथ प्रथम कीर्णी शिष्यशिक्षापण । दुजा देहदुर्गाचें बळकटपण । तिजा यथाक्रमें चक्रशोधन ।

---

१ धैर्य. २ शोभा, कौतुक.

चतुर्थीं हो तें चि पैं ॥ ३७ ॥ पचमीं ब्रह्मरंध्रस्थानकथन । येवं नवम दशम योगसिद्धिनिरूपण । यानतर येकादशीं सांगिजेल चतुर्विध ज्ञान । विज्ञानस्थितीसी ॥ ३८ ॥ तेथ प्रथम कीर्णीं चतुर्विध ज्ञानलक्षण । दुजां अन्यथाज्ञान तिजां अज्ञान । चतुर्थीं सांगिजेल आत्मज्ञान । पचमीं विज्ञानस्थिति ॥ ३९ ॥ एवं पिंडात्मक देहचतुष्टयनिर्शन । येकादश कळापीं परिछिन्न । करूनि द्वादश कळापीं ब्रह्मांडशोधन । पंचकीर्णेंसीं यथाक्रमें ॥ ४० ॥ प्रथमीं ब्रह्मांडीचें विराटदेहकथन । दुजां हिरण्यगर्भ तिजां अव्याकृतनिर्शन । चतुर्थीं मूळमायेचें विवरण । पंचमीं मायाब्रह्मनिवाड ॥ ४१ ॥ एवं द्वादश कळाप पंच कीर्ण । अद्वैत प्रतिपाद्य सपूर्ण । त्रयोदशीं मायाब्रह्मविवरण । आत्मगुरुशास्त्रप्रत्ययें ॥४२॥ प्रथम कीर्णीं सांगिजती मत्तांत्तरें । दुजां मायाब्रह्मविवरण चौं प्रकारें । तिजां प्रकृतिपुरुषांचिया उभारें । पिंडब्रह्मांडउभारणी ॥ ४३ ॥ चतुर्थीं चराचरसृष्टीची उभारणी । पचमीं सांगिजेल सकळसंव्हारणी । एवं त्रयोदश कळाप पंचकीर्णीं । उद्धवलयेंसीं ॥ ४४ ॥ त्यानंतर चतुर्दश कळाप पंचकीर्णेंसीं । सांगिजेल नाना आशंकाप्रतारणेसीं । तेथ प्रथम कीर्णीं स्वानुभव पूर्णतेसीं । दुजा विज्ञानस्थिति सम्यक ॥ ४५ ॥ तिजां पंचभूतीं भूतानुक्रम । चतुर्थीं साकल्य त्रिगुणसंभ्रम । पचमीं कूटविवक्षेसीं परब्रह्म । एवं चतुर्दश कळाप ॥ ४६ ॥ पुढें पचकीर्णीं पचदश कळाप । प्रथमीं सच्चिदानदव्याख्या मनउन्मनरूप । दुजां मनाचें स्थळ आणि तुर्यास्वरूप । षोडश महावाक्येंसीं ॥ ४७ ॥ तिजां नाना आशंकाप्रतारणरूप । बंधमोक्षलक्षणाचें स्वरूप । नाना निश्चय मत्तांत्तरानुरूप । सांगिजतील यथाक्रमें ॥४८॥ चतुर्थीं क्षराक्षर उत्तमपुरुषभाग । जड चंचळ निश्चळ योग अव्यंग । पंचमीं भगवद्भक्ति सांगिजेल यथासांग । एव पंचदश कळाप ॥ ४९ ॥ त्यानंतर षोडश कळाप पंचकीर्णप्रकाश । सांगिजेल ग्रंथगुरुगरिमा विशेष । तेथ प्रथम कीर्णीं ग्रंथगरिमेस । यथाविधि वाखाणिली ॥ ५० ॥ दुजां ग्रंथगरिमा श्रीगुरुस्तवन । तिजां रामदासनाम व्याख्याविज्ञान । चतुर्थीं श्रीगुरुपरंपरा

अनन्यपण । पंचमीं श्रीगुरुपूर्णपूजा ॥ ५१ ॥ एवं षोडश कळाप पंचकीर्णेसीं सपळियां । ग्रंथ परिपूर्ण श्रीगुरुपदीं तेथूनियां । स्वानुभव-दिनकर विचारुनियां । पाहिजे श्रीगुरुकृपा ॥ ५२ ॥ स्व म्हणिजे आपुला अनुभव । घेइजे या नाव स्वानुभव । दिनकरा ऐसा स्वयमेव । अस्तोदयरहित प्रकाश ॥ ५३ ॥ दिनकरीं विलसती षोडश कळा । त्यामाजि चारी गुप्त प्रगटा द्वादश मेळा । कीर्णप्रकाशीं तेजस्वी सोज्वळा । शीतऊष्णतारहित ॥ ५४ ॥ एवं सोळा कळाप एकऐसीं कीर्णें । आद्यंत स्वानुभवदिनकर विवरणें । श्रीगुरुकृपां स्वानुभव लाहाणें । सहजस्थिति एकात्मता ॥५५॥ जाणों काय हे सोळा कळाप । चंद्र-कळा चि सोळा अमृतरूप । कीं हे सोळा हि स्वानुभवदीप । येका-हारीं विराजले ॥ ५६ ॥ कीं ते सप्तद्वीप आणि नवखंड । मिळोनि सोळा कळाप हे प्रचंड । कीं चतुर्दशभुवनेंसीं प्रकृतिपुरुष अखंड । ऐक्यते आले कळाप सोळा ॥ ५७ ॥ कीं हे अष्टसिद्धि होती द्विविध । किंवा अवतरले सोळा ही सिद्ध प्रसिद्ध । कीं ते पंचभूतें त्रिगुण द्विधा होऊनि शुद्ध । सोळा कळाप मिरवले ॥ ५८ ॥ नाना[1] हे नवग्रह आणि सप्तऋषि । मिळोनि सोळा कळाप यथाक्रमेंसीं । नाना ते नवविधि आणि सप्तांबुधींसी । येके ठाईं निवास हे ॥ ५९ ॥ कीं हे पिंडब्रह्मां-डीचे अष्टदेह । द्विधा जाले कीं निसदेह । तेणें सोळा कळापांचा समूह । यथाक्रमें शोभला ॥ ६० ॥ नाना ते सप्ताद्रि आणि नवनाथ । कीं हे अष्टदिक्पाळ दिग्गजेंसीं समर्थ । कीं त्या चौदा विद्या शिवश-क्तियोगें कृतार्थ । मिळोनि सोळा कळाप हे ॥ ६१ ॥ किंवा हे प्रण-वाचे सोळा स्वर । कीर्णरूपेंसीं सकळ साचार । माजीं प्रणवरूपें स्वा-नुभवदिनकर । ग्रंथ आद्यंत शोभला ॥ ६२ ॥ कीं हे सोळा ही विष्णूचे अवतार । स्वानुभवदिनकरीं अवतरले साचार । भागवतीं यांचा चरित्र-विस्तार । यथाक्रमें सांगितला असे ॥ ६३ ॥ कीं हा स्वानुभवगगनीं साचार । विलसे षोडशकळीं अपूर्व दिनकर । सभंवता कीर्णप्रकाशें

---

1 नाहीं तर, किंवा.

सविस्तर । निजप्रभा देदिप्यमान ॥६४॥ कीं हा षोडशकळीं सुधाकर । सभंवतीं कीर्णरूपें तारागणें साचार । कीं मध्यें मेरु शोभे स्वानुभवदिनकर । सभंवतीं कीर्णे सृष्टिरचना ॥ ६५ ॥ एव आद्यत स्वानुभवदिनकर । सोळा कळाप येकऐसीं कीर्णें परिकर । अध्यात्मनिरूपणें ब्रह्मसाक्षात्कार । सहजस्थिति पाविजे ॥ ६६ ॥ ग्रथ आद्यंत करावा श्रवण पठण । तदनुसार साकल्य मनन । मननानुरूप निजध्यास पूर्ण । ब्रह्मसाक्षात्कारेंसीं ॥६७॥ ग्रथ सकळ पाहिलियावीण । उगा चि ग्रंथासी ठेवी जो दूषण । ब्रह्महत्येचें पाप केलियावीण । माथां बैसे अकस्मात ॥ ६८ ॥ ह्मणौनि ग्रथ आधीं आद्यंत वाचावा । वाचूनि अनन्यभावें विवरावा । स्वानुभवें ऐक्यता करूनि जीवशिवा । परब्रह्मीं समरसावें ॥ ६९ ॥ ग्रंथ न द्यावा अभक्तदुर्जनांहातीं । दिल्हा तरी उभयतां जाती अधःपातीं । ह्मणौनि प्रार्थना हे चि कीं संतीं महतीं । ग्रथ यत्न कीजे बहुत ॥ ७० ॥ ग्रंथराज स्वानुभवदिनकर । यासी आश्रय श्रीगुरु साचार । तदनुसार थोर थोर कवेश्वर । व्यासवाल्मिकादिक ॥ ७१ ॥ ब्रह्मा आणि हरिहर । इद्र चद्र यमधर्म कुबेर । वरुण वायु अग्नि दिनकर । शुक्र आणि बृहस्पति ॥ ७२ ॥ मरीचि अत्रि अगिरा कश्यप । नारद तुंबर कपिल काश्यप । विश्वामित्र गौतम शातातप । पातजळी भरद्वाज ॥७३॥ वशिष्ठ याज्ञवल्कि सनक । सनदन सनातन सनत्कुमारादिक । हस आदिनारायण जनक । रामकृष्ण अवतार ॥७४॥ दत्त गोरक्ष हनुमत । आदिनाथ मीन गैनी अवधूत । चौऱ्हासी सिद्ध आणि योगी समस्त । नव ही नाथ ॥ ७५ ॥ मत्स्य कूर्म बौद्ध वाराह । कल्की वामन नरसिंह । फरशराम रामकृष्णादि समूह । अवतारमूर्ति ॥ ७६ ॥ सुरनर सिद्ध मुनेश्वर । सत महत ऋषेश्वर । सकळ पृथ्वीचे राजेश्वर । योगी आणि भक्त ज्ञानी ॥ ७७ ॥ वेद शास्त्रें पुराणें स्मृति । इतिहास काव्य वित्पत्ति । धर्मशास्त्र प्रस्थें[1] नाना समति । ग्रथसमूह ॥७८॥ शंकरस्वामी मधुसूदन श्रीधराचार्य । भाष्यकार जे कां सद्गुणवर्य । ग्रथ-

---

1 प्रस्थानत्रय.

कर्ते जे सन्मति आर्य । संस्कृत प्राकृत ॥ ७९ ॥ उपनिषदें श्रुतिसमुच्चय । शाखाध्ययनें असंभवनीय । नाना भाषादि ग्रंथान्वय । अध्यात्मवेत्ते ॥ ८० ॥ ऋग्वेद यजुर्वेद साम अथर्वण । शाखाध्ययनें भिन्न भिन्न । सहिता पदक्रम अरण्य ब्राह्मण । दशग्रंथोक्त ॥ ८१ ॥ वेदांत न्याय वैशेषिक । पातंजल सांख्य मीमांसक । उपशास्त्रें तर्कभाषा अनेक । संवादकर्ते ॥ ८२ ॥ मार्कंड मत्स्य भविष्योत्तर पुराण । भागवत विष्णु वैजयंती वामन । ब्रह्मांड बृहन्नारदीय पुराण । ब्रह्मोत्तरखंड ॥ ८३ ॥ स्कंद कूर्म वाराह पुराण । गणेश तथा गोपद्म पुराण । अग्नि गरुड लिंग पुराण । एवं मिळोनि अष्टादश ॥ ८४ ॥ योगवाशिष्ठ आणि महाभारत । हरिवंश रामायण काव्य संमत । नाना धर्मशास्त्रपद्धति सतंत । ज्योतिषांग सकळ ॥ ८५ ॥ आश्वलायन अत्रिस्मृति । विश्वामित्र जमदग्निस्मृति । पराशर वशिष्ठ गौतमस्मृति । आणि नाना ऋषिमतें ॥ ८६ ॥ ब्रह्मस्मृति आणि शंकरस्मृति । नारदस्मृति अंगिरास्मृति । बृहस्पति तथा विष्णुस्मृति । गणेशस्मृति यथोक्त ॥ ८७ ॥ गुरुगीता भगवद्गीता । हंसगीता अवधूतगीता । रामगीता उत्तरगीता । पाडवगीता यथोक्त ॥ ८८ ॥ दत्तगीता गोरक्षगीता । शिवस्कंद गणेशगीता । गर्भगीता लक्ष्मणगीता । हनुमंतगीता यथोक्त ॥ ८९ ॥ जितुके ऋषि तितुकिया गीता । जितुके देव तितुकिया सहिता । स्मृति हि तैस्या चि यथोचिता । अध्यात्मविषई ॥९०॥ आणि चहु युगादि संत महंत । गत भविष्य वर्तमानयुक्त । त्यांचे ग्रंथ सस्कृत प्राकृत । भाषा छपन्न ही ॥ ९१ ॥ चतुर्वर्ण च्यान्ही आश्रम । लोम विलोम अनुलोम प्रतिलोम । नाना यातींचे कुळक्रम । तेथें उत्पन्न महापुरुष जे ॥ ९२ ॥ त्या सर्वांचिया आश्रयेंकरून । स्वानुभवदिनकर विराजमान । कर्म उपासना भक्ति ज्ञान । कळाप कीर्णीं मंडित ॥९३॥ परंतु ग्रथ आहे प्राकृत भाषेचा । ह्मणौनि पंडितासी न मानेल पैं साचा । पारि उपजतां चि कांहीं संस्कृताचा । अभ्यास नव्हता ॥ ९४ ॥ तेहीं आधीं प्राकृत भाषेचिया योगें । अभ्यास केला विद्वज्जनसगें । नाना

क्लेश केले जेव्हां निजांगें । वर्षानुवर्षी अहर्निश ॥ ९५॥ सूत्रार्थ प्राकृत भाषां घोकिले । प्राकृतें श्लोक वाखाणिले । नाना प्रकारें सायास केले । व्याकर्णसिद्धीसाठीं ॥ ९६ ॥ त्यात ही कोण्हास शतसहस्त्रांत । व्याकर्ण-सिद्धि होय कदाचित । कोण्ही काव्यें चि ह्मणतां त्रासत । जन्मवरी आद्यंत ॥ ९७ ॥ कोण्हासी येक दोनी वृत्ति सारस्वत चि ह्मणतां । जन्म लोटे अवघा स्वभावतां । मा शास्त्राध्ययन त्यासी पूर्ण तत्त्वता । कधीं व्हावें कितां दिसां ॥ ९८ ॥ त्याहीमाजीं प्राक्तनानुयोगें । जन्मांतर-पुण्य अंवगें । तरी शास्त्राध्ययन हातीं लागे । पूर्ण वित्पत्ति जालियां ॥९९॥ तरी जो कां वित्पन्न पुरुष । तो सहसा न करी प्राकृताचा द्वेष । जेविं पूर्णकुंभांतील उदकलेश । बाहेरी न जाय कदापि ॥ १०० ॥ आणि जो कुंभ असे आंधा तिजा विभागें । त्यासी डिगीमिगी उगी चि होऊं लागे । उदक हिसळूनि जाय सर्वांगें । पुन्हां रिता तो होय रिता चि ॥१॥ याकारणें पूर्णविद्याप्रकाशी । तो प्राकृत ग्रंथासी सहसा न द्वेषी । जो कां आतुर अज्ञान निश्चयेंसीं । प्राकृतद्वेष्टार तो चि पैं ॥ २ ॥ तरि विज्ञापना हे चि प्रस्तुत । हो कां संस्कृत ग्रंथ अथवा प्राकृत । परि ग्रंथ पाहिलियांवीण आद्यंत । द्वेषावें ना वंदावें ॥ ३ ॥ तथापि ग्रंथ जरि संपूर्ण पाहिला । तरि निंदक ह्मणती काय आश्रय याला । तरि आश्रया-वीण करितां वेदशास्त्राला । उणीव येऊं पाहे पा ॥ ४ ॥ मुळीं त्यासी आश्रय आहे कोणाचा । सर्वांसी आश्रय येका जगदीशाचा । त्या जग-दीशेंवीण कोण्हीं कोणाचा । आश्रय न धरावा कदापि ॥ ५ ॥ हा सूर्य जाले कोणाच्या आश्रयें । चंद्रामृतासी आश्रय काये । पूर्वीं वेदशास्त्रपु-राण होये । यासी आश्रय कोण पहिले ॥ ६ ॥ पूर्वीं ग्रंथकर्त्ते जाले थोर-थोर । व्यासवाल्मिकादि ऋषेश्वर । कपिलपातंजलिगौतमादि साचार । आणिक शत सहस्र पैं ॥ ७ ॥ छपन्न भाषांचे ग्रंथ अनंत । वर्तमान भविष्य जाले गत । ते ज्या आश्रयें बोलिले प्रस्तुत । स्वानुभवदिनकरीं तो चि असे ॥ ८ ॥ आधीं पूर्णत्वें असावी श्रीगुरुकृपा । जियेकारिसां

१ तर मग. २ होय, असेल तर. ३ अर्धा.

स्वानुभव सोपा । त्यावरि वेदशास्त्रपुराणाचिया स्वरूपा । साकल्य जाणितलें असावें ।। ९ ।। त्यावरि पूर्वग्रंथवक्ते महाराज । त्याचिये कृपेची असावी वोज । सत्कर्म उपासना ज्ञानबीज । विचारावें तत्वता ।।१ १०।। वैराग्य असावें विवेकयुक्त । सगुण निर्गुण साक्षात्कार व्यक्त । भाषाज्ञान संस्कृत प्राकृत । परिछिन्न असावें ।। ११ ।। इतुकें असोनिया परिपूर्ण । त्यासी साह्य असावें प्राक्तन । याहिवरि भगवद्भजन । केलें चि करावें उत्तरोत्तर ।। १२ ।। इतुके हि पदार्थ अनुकूळ । स्वानुभवदिनकरीं परिपूर्ण सकळ । त्यासी आश्रय अनाश्रय केवळ । श्रीगुरुकृपा समर्थ ।।१३।। जो केवळ असेल गुरुभक्त । स्वानुभवप्रत्ययें पूर्ण भरित । तो चि विचारूनि पाहेल आद्यंत । स्वानुभवदिनकरीं ।। १४ ।। जैसा सूर्य निजप्रकाशें उद्यत । तो कोण्हाचा आश्रय न पाहात । चाले स्वता तेवि निजप्रकाशें विराजित । स्वानुभवदिनकर ।। १५ ।। या स्वानुभवदिनकराचिया स्वप्रकाशें । अहं कोहं सोहं तम निरसे । मायाईश्वरउपाधिनिरासे । परब्रह्मीं येकात्मता ।। १६ ।। दिनकर रामदासीं रिघोनि शरण । ग्रंथ आद्यंत केला रामींरामदासार्पण । आतां ग्रंथाचें दूषण भूषण । लज्जा सर्वस्वें त्याची त्यासी ।। १७ ।। रामींरामदासकृपा ग्रंथ सपूर्ण । स्वानुभवदिनकरीं कळाप कीर्ण । रामचंद्रीं आद्यंत समर्पून । श्रोते वक्ते रामदास ।। १८ ।। दिनकर रामींरामदास । होऊनि सर्वस्वेंसीं उदास । स्वानुभवदिनकरीं स्वयंप्रकाश । परब्रह्मीं एकात्मता ।। ११९ ।। स्वस्ति श्रीस्वानुभवदिनकरे । गुरुशिष्यान्वये प्रथमकळापे ग्रंथपरिभाषावर्णननिरूपण नाम प्रथम कीर्ण प्रकाश. ।। १ ।। श्रीराम जयराम जयजयराम ।।

---

॥ श्रीराम ॥

ॐ नमो जी श्रीराम । स्वसंवेद्य प्रणवैक आराम । स्वानुभवदिनकरीं भक्तकाम- । कल्पतरु फळद ।। १ ।। जय जय जी श्रीराम । आवाप्त सकळ काम । सच्चिदानंदैकधाम । सर्वोत्तमत्वें ।। २ ।। जय जय

---

१ पूर्ण.

जी श्रीराम । उपमे द्यावा कल्पद्रुम । तरी तो काल्पनीक, तूं निसीम । आकल्पदानी ॥ ३ ॥ जय जय जी श्रीराम । सीतळ पूर्णत्वें चंद्र ह्मणों तुजसम । परी तो क्षई कळकी हें छळें छद्मं । तू अक्षई निष्कळंक ॥४॥ जय जय जी श्रीराम । भाग्यसपत्ति ह्मणावासी मेरुसम । तो अविनई तू निसीम धाम । उदारपणाचें ॥ ५ ॥ जय जय जी श्रीराम । ह्मणावें तव गाभीर्य सागरोपम । परतु तेथें क्षारता परम । त्वत्कृपा सौरसु अति ॥ ६ ॥ जय जय जी श्रीराम । कीर्तिप्रभा बोलों सूर्योपम । तेथं दाहकता परम । स्वामी सपूर्ण सीतळ ॥७॥ जय जय जी श्रीराम । उपमे द्यावी जरी गौकाम । ते कामेछाफळदाती तू निष्काम-। फळप्रद ॥ ८ ॥ जय जय जी श्रीराम । परिस लोहाचें करी येकदा चि हेम । तूं वस्तु-मात्रीं पूर्णत्वें निसीम । पारिसाचा चि दाता ॥ ९ ॥ जय जय जी श्रीराम । ह्मणों चिंतामणी तुजसम । तो प्रथम चिंताकारी तू निसीम । अचिंत्यदानी ॥ १० ॥ जय जय जी श्रीराम । तू केवळ पूर्णानदैक-धाम । ह्मणौनि तुजसमें निसीम । न दिसे काहीं ॥ ११ ॥ विचारितां सकळ वस्तुजात । न दिसे किमपि स्वसामर्थ्ययुक्त । तुझिया अशसत्ता विलासत । येकदेशीपणें ॥ १२ ॥ ऐसीं जें अल्पकें येकदेशी । तें देवों पाहें तव उपमेसी । तरी जेवि दिधलीं अक्षयाकाशीं । अभ्राचीं थिगळें ॥ १३ ॥ कीं जेवि सूर्या उपमिजे खद्योत । कीं ह्मणिजैल कांजीसा-रिखें अमृत । अथवा तो क्षीरसागर उचबळत । थिल्लिराऐसा ॥१४॥ कीं जो हस क्षीरनीर विभागित । तया देइजे डोंबे दृष्टात । कीं अहो हा मेरु काय विराजत । गीर मोळी ॥ १५ ॥ पाहा समुद्र कैसा हेला-वत । जेवि तो मृगाबूर्‍हद उच्चबळत । किं ह्मणिजे गरुड हा सेलैत ।

---

१ तू दाता असा आहेस की तुझ्या दानानें याचकजन कल्पपर्यंत ह्मणजे अक्षयींचे तृप्त होतात. २ सळु=न्यूनत्व, वाईट ? ( हसकोश ) ३ लाछन. ४ नम्र नाहीं असा. ५ सुरस, प्रासादिक. ६ चिंतामणीपासून लाभ करून घेण्यास अगोदर एकाद्या गोष्टीचे चिंतन करावें लागतें ७ पूर्ण आकाशाला. ८ डबक्याप्रमाणें. ९ डोमकावळा. १० खाच, खळगा. ११ खाण. १२ मृगजलाचें सरोवर. १३ फिरतो, उडतो

पतंगासारिखा ॥ १६ ॥ अहो केसरीचया आवेशा—। पुढें जंबुक न सरे जैसा । कीं होईल इंद्रभाग्यलेशा—। सम रंक ॥ १७ ॥ कीं सर्वादि जो का प्रणव । शब्दब्रह्म जेथूनि प्रसव । तया वर्णव्यक्तिगौरव । शोभेल काय ॥ १८ ॥ तैसा केवळ जो का सर्वोत्तम । जगन्निवास आत्माराम । पूर्णकाम मेघश्याम । आनंदमूर्त्ति ॥ १९ ॥ वर्णितां श्रीराममहिमा निसीम । जेथ कुंठित वेद संभ्रम । बोलिका शेष परम । सहस्रमुखीं ॥ २० ॥ तो ही बोलिकेपणें आयणी । बोलतां रसना गेली चिरूनि । मग लाजिला शय्यासनीं । दडोनि ठेला ॥ २१ ॥ ब्रह्मादिकां परम दुर्गम । ह्मणौनि घेतलें नाभिकमळीं जन्म । हरहृदय-विश्राम । आराम मुनिजनांचा ॥ २२ ॥ ऐसा सर्वस्वें जो पूर्ण समर्थ । अनुपम्य बोलणें जेथ कुंठित । न कळे लाजिलेपणें चित्त । लपोनि ठेलें ॥ २३ ॥ चित्त श्रीरामपदीं समरसलें । ऐक्यपणें स्वरूप पाहिलें । तव असंभवनीय देखिलें । श्रीरामस्वरूप ॥ २४ ॥ पदींहूनि मुगुटवेर्‍हीं । राममूर्ति देखिली साजिरी । सच्चिदानंदात्मक गोजिरी । ॐकाररूप ॥ २५ ॥ पाहातेपणें पाहिलें जव निसीम । तव केवळ येकाक्षर ब्रह्म । अनंत जें कां शब्दब्रह्म । तया उगव येथूनि ॥ २६ ॥ ह्मणौनि श्रीराम केवळ ॐकाराद्य । वेद वेदांत प्रतिपाद्य । सच्चिदानंदैक स्वसंवेद्य । परमात्मा चि हा ॥ २७ ॥ पाहातां स्वरूप अगम्य अपार । परि भक्तानुयोगें मनोहर । धरिलें सगुणत्वें साकार । रमणीय अति ॥ २८ ॥ सगुण गुणें परम साजिरें । श्रीरामस्वरूप गोजिरें । येकांशें व्यापूनि जग-दंतरें । आपण वेगळें चि ॥ २९ ॥ पाहे जव निडारलीये दृष्टीं । तव साकार सगुण धाकुटी । देखिली मूर्त्ति सुंदर गोमटी । विराजमान ॥ ३० ॥ केवळ चंचळपणें पाहातां । श्रीराममूर्त्ति न लक्षे तत्वतां । मग अंतरीं निजनाम ऐक्यता । स्मरिलें भावें ॥ ३१ ॥ तिया नामस्मरणा चि सरिसें । ह्मणें दृष्टीचा मळ लागेल ऐसें । श्रीरामरूप देखिलें वृत्तिसमरसें । देदिप्यमान ॥ ३२ ॥ जाला अयोध्याभुवनीं जन्म । परि त्रैलोकीं कीर्त्ति

१ वेद. २ मत्त ३ पावेतों, पर्यंत. ४ पूर्ण. ५ वृत्ति तल्लीन झाल्याबरोबर.

निसीम । केवळ हरहृदयविश्राम । नाम जयाचें ॥ ३३ ॥ दिनकरवंशाचें जो मंडण । अजाचें जया पौत्रपण । दशरथकौसल्यानंदन । श्रीरामचंद्र ॥ ३४ ॥ दशेंद्रियात्मक राजा दशरथ । कौसल्या सुविद्या सर्वगुणें समर्थ । लीळा अवतार धरूनि तेथ । जगदुद्धरिलें ॥३५॥ मूर्ति सर्वांगें साळंकृत । पूर्णावयवी सुशोभित । आमस्तकापासूनि पदपर्यंत । प्रणवरूप ॥ ३६ ॥ पदतळीं चिद्रूपत्वें अकारु केवळ । आनंदमय उकार उदरीं सोज्वळ । मकारान्वित मस्तक विशाळ । साकारपणें ॥ ३७ ॥ निगमागमयुक्त दक्षिणवामांग । स्वरवर्णांकित सुतेर सर्वांग । सत्कारमंडित शोभे अव्यग । निज भाळ हें ॥ ३८ ॥ निर्विकल्प स्मरणानुरूप नाशिक । कर्णद्वय प्रवृत्तिनिवृत्यात्मक । आकर्ण विशाळ नेत्र सम्यक । ज्ञानयोगोन्मीळित ॥ ३९ ॥ तत्त्वमस्यादि महावाक्ययुक्त । मुखसरोज निजानंदें स्मित । शब्दब्रह्मरूप ग्रीवादि कटीपर्यंत । परम रमणीय ॥ ४० ॥ जेवि प्रणवानुयोगें च्यान्ही वेद । तेवि रामरूपीं चत्वार भुजा सायुध । धर्म अर्थ काम मोक्षें चतुर्भुजीं विविध । चापबाणाब्जें वरद ॥ ४१ ॥ तेथ वर्णाश्रमयोगें धर्मजात सकळ । वामकरीं पजिलें चाप सबळ । सव्यकरीं अर्थप्रातीचा केवळ । अर्द्धचंद्र सतेज ॥४२॥ वरि भवस्वर्गविवर्जित कामकमळ । वामभुजीं धरिलें सुगंध बहळ । मोक्षश्रिया अभयकरें केवळ । निजभक्ता वरद ॥४३॥ पूर्वपक्षसिद्धांतेंसीं स्कंधद्वय । वेदार्थयुक्त निज हृदय । कर्मउपासनाज्ञानवेळीत्रय— । युक्त उदर ॥ ४४ ॥ विधिविधानयोगें सखोल नाभ । निजसामर्थ्ययुक्त कटि स्वयंभ । श्रीरामगुह्याचा बोलतां प्रारंभ । वाचा कुंठित ॥ ४५ ॥ जीवशिवादि द्वंद्वतारहित । पदद्वय समासनीं विराजित । पदसाहित्यें चिदंबरें तडिद्वंत । निजांगीं शोभले ॥ ४६ ॥ मेघश्याम सुंदर सगुण मूर्ति । स्वर्णाळंकार निजांगीं शोभती । मुगुट

---

१ सूर्यवंशाचें. २ दशरथाच्या बापाचें नांव ३ वेदशास्त्ररूप. ४ सुंदर ? ५ मुखकमल ६ मानेपासून. ७ अब्ज=कमल. ८ बहुत. ९ कर्म, उपासना व ज्ञान या च तीन वळकट्या ज्याच्या उदराला आहेत १० चिद्वस्त्र. ११ विजेप्रमाणें

कुंडलें वैजयती । माळा कठीं ॥ ४७ ॥ भाळीं केशर मनोरम्य । नानाविध वस्त्रें समसाम्य । वामांगीं मूळमाया सीता अगम्य । महिमा जयेचा ॥ ४८ ॥ दक्षिणे उभा लक्ष्मण । अनुक्रमें भरत शत्रुघ्न । सन्मुख उभा वीर हनुमान । कर जोडूनि ॥ ४९ ॥ पदीं तोडर वाकी गर्जत । सिंहासनीं मूर्ति विराजत । पुढें सुर नर वानर रुक्ष¹ समस्त । अनुक्रमें उभे ॥ ५० ॥ मध्यमडळीं सिंहासनीं । सावळी मूर्ति विश्वसंजीवनी । अवलोकी प्रसन्न होऊनि । कृपादृष्टीं ॥ ५१ ॥ जाणों तिये वेळे कैसें गमलें । जेवि कूर्मियां² अपत्या अवलोकिलें । अथवा चकोरा पाहीलें । चद्राचें जेवि ॥ ५२ ॥ कीं चातकावरी मेघ वोळले । ना तें अमरा अमृत जोडलें । कीं जेवि मातेनें दिधलें । बाळा स्तनपान ॥५३॥ कां सत्शिष्यासि परम प्रीतीं । श्रीगुरु देइजे आत्मसंवित्ति⁴ । मग पूर्णत्वाची जेवि स्थिति । न बोलवे वाचां ॥ ५४ ॥ तैसें निजजनकल्पद्मे । वेदांतवेद्यें श्रीरामें । निजदासा अवलोकन संभ्रमें⁵ । सर्व ही सुखमय ॥ ५५ ॥ तया सुखासी दृष्टांत । देता सरलें वस्तुजात । उपरतलें⁶ चित्त । ठाईचा ठाईं ॥ ५६ ॥ तो आनद जिरऊनि पोटीं । श्रीरामीं घातली पूर्ण दृष्टि । तव सभा देखिली घनदाटी । श्रीरामयुक्त ॥ ५७ ॥ जेवि प्रणवासभवँते⁷ स्वरवर्ण । कीं सुरगणेसीं सहस्रनयन⁸ । किंवा शोभे चद्रमा पूर्ण । उडगणेसीं⁹ ॥ ५८ ॥ तेवि श्रीराममूर्ति सभास्थानीं । देदिप्यमान सिंहासनीं । भक्तसमूह पुष्पाञ्जुळी अर्पूनि । स्तवनें पैंढती¹⁰ ॥ ५९ ॥ जी जी परमात्मया श्रीरामा । निजजनमानसविश्रामा । जगज्जनका मेघश्यामा । पुराणपुरुषा ॥ ६० ॥ बाळपणीं ताटिका मारिली । ऋषियज्ञाची सिद्धि केली । शीळारूपी अहिल्या उद्धरिली । चरणस्पर्शें ॥६१॥ चाप भगूनि जानकी पर्णिली । रावणाची गर्वसींगें¹¹ हरिली । फरशरामाची पुरविली । समर्थ्या¹² पूर्ण ॥ ६२ ॥ निज प्रतापें अयोध्ये पेंट्टीं¹³

---

१ रीस, अस्वल. २ कासवानें ३ उजेड, प्रकाश. ४ आत्मज्ञान. ५ वैभवानें. ६ शात झालें. ७ सभोंवती. ८ इंद्र ९ उडुगणयुक्त, नक्षत्रांसहित. १० म्हणताहेत. ११ सींग=परिपूर्णता. १२ आकांक्षा. १३ सिंहासनावर. पट=पट्टाभिषेक

बैसतां । तवं ऐकिलें पितृवचनार्थी । सर्व त्यजूनि सौमित्रसहसीता । वनीं वासु वर्षें चौदा ॥ ६३ ॥ खरदूषणादि निशाचर । जनस्थानीं वधूनि चौदासहस्र । गौतमीतटीं स्वेच्छां ऋषिमुनिवर । सत्कर्में करिती ॥ ६४ ॥ तवं जय विजय निज भक्त । जे जाले ब्रह्मकुमरशापोपहत । रावण कुंभकर्ण बंधु विख्यात । त्रैलोक्यपीडक ॥ ६५ ॥ तयांचें करावया शापमोचन । आठऊनियां पूर्व वचन । निजछाया सीताहरण । लीळां करविलें ॥ ६६ ॥ मग जो अंजनीवायुकुमर । केवळ रुद्राचा चि अवतार । तयासह सुग्रीव वानर । शरणागत ॥ ६७ ॥ तयाचें सर्व सहाय करूनि । वाळी निजप्रतापें वधूनि । किष्किंधाराज्य सुग्रीवा देऊनि । रुक्षवानरां मेळविजे ॥ ६८ ॥ हनुमंतें सीताशुद्धि केली । मग लंकेवरी चाली आरंभिली । रुक्षवानरांकरीं करविली । सेतुरचना ॥ ६९ ॥ रामनामाचिया निजनेटें । उदकीं पर्वत जैसीं काष्टें । हें सामर्थ्य कधीं कोठें । दृष्ट ना श्रुत ॥ ७० ॥ केला शतयोजनें सेतुबंध । सुवेळे वानरासह सनद्ध[2] । रावणकुंभकर्णांसीं करूनि युद्ध । सपरिवारीं मारिले ॥ ७१ ॥ सोडविली देवांची बांदवडी[3] । बिभीषणा दिधली लंकाराज्यप्रौढी । दिव्यमिसें सीता चोखडी[4] । अग्नींतूनि काढिली ॥ ७२ ॥ चिच्छक्तीसह सर्व हि पुष्पकविमानीं । बैसोनि येइजे अयोध्याभुवनीं । स्वेच्छां प्रतापें राज्यभार चालऊनि । अकरा सहस्र वर्षें ॥ ७३ ॥ राज्य कीजे परम निर्मळ । भेणें चळीं[5] कांपे कळिकाळ । दरिद्र व्यथा मृत्यु दुष्काळ । नसोनि सदां सुखरूप ॥ ७४ ॥ ऐसे सभाजन लोक समस्त । नाना प्रकारें स्तुतिवाद पढत । श्रीरामचंद्र निजपरिवारयुक्त । भक्तवृंदां[6]सह ॥ ७५ ॥ तेथ दिनकरें कायावाचाचित्तें । प्रणमिजे साष्टांग दंडवतें । तव श्रीप्रभु उचलूनि निजहस्तें । आलंगिजे प्रीतीं ॥ ७६ ॥ तिया आलिंगनाचेनि मिसें । मी माझेंपण हरतिलें[7] कैसें । जेवि तया लोहासी परीसें । स्पर्शतां चि ॥ ७७ ॥ कीं तें उदकस्पर्शें लवण । अथवा

---

१ दंडकारण्यात. २ सिद्ध, सज्ज ३ अधीनता, परतन्त्रता. ४ शुद्ध होण्याकारितां अग्नींतून जाळून घेणें. ५ चळचळां. ६ समुदाय. ७ हरितणें=हरण करणें.

अग्निसगें इंधनपण । मळ्यानीळयोगें नाना वृक्षपण । हारपे जेवि ॥७८॥ किंवा सूर्योदयें जेवि हारपे तम । कीं वायूचया गतीं अभ्राम । तेवि श्रीरामालिंगनीं मी मम । नाहीं होइजे ॥ ७९ ॥ मग सर्वे चि स्वकरें । निगमागमदातारें । श्रीरामें देइजे कृपावरें । वरदान ॥ ८० ॥ निज-कृपां श्रीरामवरदान । लाहोनि दिनकर जाला सुखसपन्न । जेवि चकोरा लाधली तृप्ति पूर्ण । चंद्रकीर्णामृतें ॥ ८१ ॥ किंवा जैसें तें चातक । मेघा उँजु करिता घोकें । येकायेकीं जालें सपोखें । धारामृतें ॥ ८२ ॥ किं जेवि अमृतलेशें । गतायुष्या जालें जैसें । किं धेनूचया वोसरें । तया वत्सा ॥ ८३ ॥ इयापरि श्रीरामचद्रें । अनंतगुणसमुद्रें । त्रिभुव-नैक नरेंद्रें । । सुखिया केलें ॥ ८४ ॥ तिया सुखसामरस्यें कैसें । जालें द्वैतनिराशें अद्वय जैसें । केवळ तिये समई तैसें । जालें कौतुक ॥८५॥ पाहातां जेवि कल्लोळ जीवनीं । किं अळंकार सुवर्णीं । किं प्रकाशा आणि तरणि । सहज चि ऐक्य ॥ ८६ ॥ सहजें चि कळा चद्रीं । सहजें चि गंगा समुद्रीं । तेवि दिनकरा श्रीरामचद्रीं । सहज चि ऐक्य ॥ ८७ ॥ अहो रामीं ऐक्य दिनकर । ह्मणणें हें चि अतुर । गोडी आणि साकर । वेगळीं कैं होतीं ॥ ८८ ॥ दीपा आणि तये प्रभे । येकपण कई लाभे । अमृताचिये जीभे । अमरपण कैं ॥ ८९ ॥ तेवि श्रीरामा आणि दिनकरा । वेगळिकेचा पाहातां संसरा । क्षीरसागरा आणि क्षीरा । जेणें रीतीं ॥९०॥ मुळींची नाहीं वेगळीक । मां[१२] येकप-णाची कायसी हाक । सागता वाटे कौतुक । माझें मज चि ॥ ९१ ॥ असो ऐक्यपणें श्रीराम । शब्द बोलिले निसीम । दिनकरा तुझे पूर्ण काम । होतील सर्व ॥ ९२ ॥ सखया तुझेनि बोलकेपणें । वाटे ब्रह्मांड अवघें ठेंगणें । जेवि चंद्राचेनि पूर्णपणें । सागरा सौख्य ॥ ९३ ॥ तेवि

१ सर्पंण. २ मलयपर्वतावरील चदनाच्या वृक्षांवरून येणाऱ्या वाऱ्याच्या झुळुकेपुढें अनेक प्रकारचे सुगधित वृक्ष तुच्छ होत. ३ चतुर्वेद व षड्शास्त्रें याचा निर्माणकर्ता जो श्रीराम त्यानें. ४ अनुकूल, प्रसन्न. ५ घोख=घोष, गर्जना. ६ सपोख ? पुष्ट ७ मरणारास ८ लाटा, तरंग. ९ सूर्य. १० उतावळेपणा. ११ सस-रण=उद्भव, आश्रय १२ तर मग

तूतें पूर्णत्वें अवलोकितां । विश्रांति वाटली मम चित्ता । माग माग प्रसन्नता । माझी तुज ॥ ९४ ॥ यया वाक्यामृततुषारें । साजेपणें सुकेतेनि अंकुरें[1] । जी जी ह्मणौनि दिनकरें । होइजे पुढा ॥ ९५ ॥ तव भक्तभावभुवनदीपें । जगज्जनकें त्रिभुवनभूपें । प्रसन्नतां दिधले नि-जकृपें । वरदत्रय ॥ ९६ ॥ प्रथम स्वानुभवदिनकर । ग्रथ वदसी परिकर । तो स्वानुभवैक प्रकाशेल साचार । दिनकरोपम ॥ ९७ ॥ दुजें याचेया श्रवणमननिजध्यासें । निजसाक्षात्कार पाविजैल अनायासें । इह आणि परत्र परम संतोषें । सुख लाधसी ॥ ९८ ॥ तिजें येकवेळ निजानंदेंसीं । सुखें अवतरेन तव वशीं । श्रीरामरूपें दिनकरासी । त्रिवरदभाशे[2] ॥ ९९ ॥ लाधोनिया वरदत्रय । दिनकर जाला केवळ राममय । परमानंदें न समाय । त्रिभुवनीं ॥ १०० ॥ मग निःशब्दानु-वादें । नाचों लागला निजछंदें । सुखावलेंनि मानसें निजानंदें । अव-लोकी निजरूप ॥ १ ॥ निजरूप निहाळूनि पाहे । तव चतुर्भुज तें द्विभुज देखताहे । उगा चि चाकाटला[3] राहे । विस्मयपणें ॥ २ ॥ पुसों पाहे धीटपणें । परि न पुसवे सलज्जपणें । कासाविसी अंतःकरणें । होइजे माझया ॥ ३ ॥ तव जो सर्वांतरसाक्षी । वस्तुमात्रातें परीक्षी । तो श्रीराम स्नेहें निरीक्षी । मजकडे जव ॥ ४ ॥ तव मी रडत पडत । उकसाबुकसीं फुंदत । जे हें नवल काई दीसत । रूपीं इये ॥ ५ ॥ तिये समईं प्रभुराजें । आसुवांकित[6] नेत्र माझे । पुसूनि प्रीतीं समाजें । पुढां घेतलें ॥ ६ ॥ परम आवडीचया भरें । दाटौनि बोलिजे दातारें । का घाबिरलासी बा रे[7] । सांगैं मज ॥ ७ ॥ जी जी जगाचया जनका । स्वामी बाँ ह्मणसी मज सेवका । तरि राजेपणें पाचारितां रंका । श्लाघ्य काय ॥ ८ ॥ बरें याचें ही काय नवल । तू समर्थपणें जें कांहीं ह्मणसील । तें निश्चयेंसीं होईल । निसदेह ॥ ९ ॥ जी देवा धूवें आच-

---

१ सुकलेल्या अंकुराला टवटवी आली. २ वर या अर्थानें ‘ वरद ’ शब्द वापरला आहे. ३ भाक=वचन. ४ ब्रह्मस्वरूप ५ चकित होऊन ६ चिन्हित. ७ ‘ बा ’ हें विशेष सलगीचें व प्रेमाचें संबोधन मजसारख्या गरीब सेवकाला कसें दिलें. ?

रण काय केलें । [1]जे तया अढळ चि करूनि ठेविलें । दुधासाठीं उपमन्या दिधलें । क्षीरसमुद्रातें ॥ ११० ॥ सूर्यी च प्रकाश उदित । चद्रीं दिधलें परमामृत । क्षीरसागर उचबळत । दुधें चि पूर्ण ॥ ११ ॥ छपन कोटी वसुधरा । वरी मिती[2] नाहीं भारा । तें मानूनिया वारा[3] । शेषें चि धरिजे ॥ १२ ॥ देवा येक येक तुमचें करणें । बोलतां जें असाधारणें । मनुष्यरूपें उद्धरणें । [4]शिळेसी कोणें ॥१३॥ उदकीं कोणें तारिले पाषाण । ते ही शत योजनें विस्तीर्ण । निजभक्तां सायुज्यसदन । दिधलें प्रीतीं ॥१४॥ सुवर्णनगरीचें दान । शरणांगतां दिधलें सपूर्ण । सुरवरां सुटिका तुजवीण । कोण कर्त्ता ॥ १५ ॥ ह्मणौनि श्रीरामचद्रें समर्थे । काय येक न कीजे स्वसामर्थ्यें । [7]महद्वैर परि समरसिजे येका अर्थे । पचां ही भूतीं ॥ १६ ॥ असो आतां यया उपपत्ति- । वीण काय काज कैवल्यपति । समर्थपणें जें धरिसी चित्तीं । तें करिसील चि ॥१७॥ परि आता जी येक विनति । देखत होतों चौभुजांची आकृति । तव दोनि चि इया दिसती । काय निमित्य ॥ १८ ॥ ऐकोनि प्रश्न- वाक्य गहन । श्रीराम निजसुखें सुखावोन । देते जाले प्रतिवचन । प्रश्नासरिसें ॥ १९ ॥ तरि द्विभुजादि चतुर्भुजें । इयें तुह्मां भक्ताचेनि व्योजें । येऱ्हवीं निजस्वरूप जें का माझें । तें आन चि असे ॥१२०॥ जिये स्वरूपींचे अशांश- । रूपें अवतरलों बहुवस । तयाचया गणनेस । न करवे कोण्हा ॥ २१ ॥ अरे पृथ्वीचया परिमाणुवा । सुखें गणवेल प्रज्ञों सुहावीं । उदकाचया सकळ राशिवा । प्रमाण कीजैल ॥ २२ ॥ इयां सूर्यकिरणां होईल मिती । वायु धरवैल हातीं । अगुळें हि टाकें- वती । गगनासी पैं ॥ २३ ॥ आणिक ही जें जें असे अगण्य । तें तें क्षणीं कीजैल गण्य । परि माझें चरित्रलावण्य । न वर्णवे पैं ॥ २४ ॥

---

१ कीं ज्यामुळें. २ गणना. ३ वायूप्रमाणें हलकी. ४ अहल्या शिळा राघवें मुक्त केली । ५ बिभीषणास दिधली लका. ६ रावणाच्या बंदिशाळेतून. ७ पचभूतांत परस्परांत अतिशय विरोध आहे परतु तीं ही ज्यानें एकवटलीं ८ हेतूनें. ९ निमित्तानें १० विराटस्वरूप. ११ बुद्धीनें व कल्पनाशक्तीनें. १२ आवडत्या भक्ता. १३ गगनाची गणना बोटांनीं मोजून करतां येईल.

असख्य अवतारचरित्रें । तें कीजती येकांशमात्रें । त्रिगुण पचभूतें येकत्रें । अष्टधायुक्त ॥२५॥ सगुण गुणें अति साजिरें । धरूनि सुदर स्वरूप गोजिरें । भक्तसाह्याकारणें अवतरे । प्रकृतिसंगें ॥ २६ ॥ प्रथम म्या जन्मता चि कौशल्येतें । दाविजे चतुर्भुजात्मक ध्यानातें । तैसें चि आजि ही प्रेमप्रीतीस्तव तूतें । दर्शन जालें ॥ २७ ॥ येन्हवीं अवतारीं मज इये । सदैव असती भुजाद्वय । ऐसें ऐकतां चि श्रीरामीं तन्मय । चित्त समरसलें ॥ २८ ॥ समरसलेंनि चित्तें ऐक्यरूपें । दिनकरें स्वानुभव बोलिजेल सक्षेपें । तो श्रोत्यादरें साक्षेपें । श्रवण कीजैल ॥ २९ ॥ श्रवणानुरूप मनन । करितां यथाविधी निजध्यास पूर्ण । तेणें साक्षात्कारें सपूर्ण । निजपदप्राप्ति ॥ १३० ॥ येथूनि स्वरूप स्वानुभव । पाहाता आद्यत अपूर्व । दिनकर रामरूप स्वयमेव । रामदासकृपा ॥३१॥ दिनकर रामदासीं शरण । रामदासकृपा दिनकरीं पूर्ण । तेणें स्वानुभवदिनकर सपूर्ण । आद्यत पाहाता ॥ ३२ ॥ स्वस्ति श्रीस्वानुभवदिनकरे । गुरुशिष्यान्वये । प्रथम कळापे । ॐकाररामस्वरूपनिरूपण नाम । द्वितीय कीर्णप्रकाशः ॥ २ ॥

---

॥ श्रीराम ॥

ॐ नमो येकाक्षर मंगळमूर्ति । श्रीप्रणवाकारें स्वरूप आद्यतीं । स्वानुभवदिनकरीं सुख सवित्ती[2] । रामदासकृपा ॥ १ ॥ जय जय देव श्रीगणेश । सर्वात्मक सर्वेश । निजजनमानससंतोष । जगत्प्रिय ॥२॥ जय जय देव मगळ । मूर्त्याकारें साळकृत सकळ । सत्ता विश्वलयोद्भव केवळ । येकांशमय ॥ ३ ॥ जय जय देव सिद्धिद । जगदकुर मूळकद । शरणागतवरद । करुणाळय ॥ ४ ॥ जय जय देव सुमुख । निज जय जीत शतमख[3] । रमणीय सर्वाद्य श्रीमुख । प्रणवैकधाम ॥ ५ ॥ जय जय

---

१ परमेश्वर आपल्या मूळ स्वरूपाचा किंचित अश प्रकृति ह्मणजे मायेशीं सलग्न करून त्रिगुण व पचभूतें यानीं युक्त असें सगुण रूप धारण करितो. २ ज्ञान. ३ इंद्र

देवेकदंत । सुधामय विद्युतवत । विश्वदुरितेंध्वसनकृत । भवापवर्ग ॥६॥ जय जय देव कपिलें । मायाजनित गर्भ तुदिलें । मदोज्झित विश्वाद्यखिल । स्फुरदामोद ॥ ७ ॥ जय जय देव गजकर्ण । सत्कुंडलमंडित विशीर्ण । फडत्कृत प्रतापकीर्ण । प्रकाश द्युमणी ॥ ८ ॥ जय जय देव लंबोदर । नाभिसरोरुह रम्य गभीर । व्याळें विलसित सपुर । कटिवेष्टित ॥९॥ जय जय देव विकट । दुरितदहन हृतभक्तसंकट । कळित काळ कौतुकोद्भट । निःसंशय ॥ १० ॥ जय जय देव विघ्ननाशन । कृत त्रिपुरादि दैत्य लीळां शासन । विजयश्रिया शंकरतोशन । स्वसामर्थ्ययुक्त ॥ ११ ॥ जय जय देव गणाधिप । श्रीयाविराजित त्रिभुवनभूप । भक्तहृदयालय कृपादीप । तापोपशम ॥ १२ ॥ जय जय देव धूम्रकेत । शौर्यैश्वर्यप्रभा भास्वत । यशौदार्य अपरमित । गांभीर्यश्री ॥ १३ ॥ जय जय देव गणाध्यक्ष । स्वलीळां दातृत्व अपरोक्ष । उभय चामर वीजिती[13] प्रत्यक्ष । सिद्धि बुद्धि ॥ १४॥ जय जय देव भाळचंद्र । रम्य गजनरवेष गणेंद्र । चतुर्दशविद्यारत्नसमुद्र । वेदांतवेद्य ॥ १५ ॥ जय जय देव गजाननें । नमोनम प्रणवैकनिधान । स्वानुभवदिनकरीं पूर्ण । तव कृपा ॥ १६ ॥ जय जय देव सुप्रभ । सुंदर शोभा सिंधुराभे । अति रमणीय वदन इभें । सुवेष नराकृति ॥ १७ ॥ अहो नाम जयाचें मंगळमूर्ति । स्मरतियां होय अपरमित स्फूर्ति । पाहातां रूपाची संविती । असंभवनीय ॥ १८ ॥ मस्तकापासूनि शुंडापर्यंत । शोभे प्रणवाकार मूर्त । भाळीं चंद्ररेखा भिर-वत । अति मनोहर ॥ १९ ॥ अर्द्धोन्मीलितें निजदृष्टि । होत लयोद्भवाची सवसांटी । विशाळ कर्णद्वय परिपाटी । साळकृत ॥ २० ॥ रत्नखचित मस्तकीं मुकुट । सुवर्णमय लखलखाट । ईभकुंभद्वय बरवट । शोभला

---

१ दुरित=पातक. २ अपवर्ग=मोक्ष. ३ पिंगट वर्णाचा ४ दोंदिल. ५ विस्तीर्ण ? ६ सूर्य. ७ कमल. ८ सर्प. ९ बारीक. १० भयंकर. ११ उद्भट=प्रसिद्ध १२ सूर्य. १३ वारतात, वारा घालतात १४ सुमुखश्चैकदंतश्च । इत्यादि श्रीग-णपतीचीं बारा नांवें ओंवी ५ पासून ओंवी १६ पर्यंत क्रमानें आणलीं आहेत १५ गजाचें प्रतिबिंब. १६ हत्ती. १७ ज्ञान. १८ योगीजनाची दृष्टि असते त्याप्र-माणें. १९ कचोबरी. २० गंडस्थळें ?

शोभा ॥ २१ ॥ मुखामाजीं येक दंत। निज तेजें दीप्तिमंत। ऱ्हस्व ग्रीवा आजानु शोभत। भुजा चाऱ्ही ॥ २२ ॥ सव्य करीं देदिप्यमान। सक्षीर घृतसह मोदकान्न। स्वेच्छा करणें भोजन। यथावसरें ॥ २३ ॥ वामकरीं कमळ। सुगंधामोदें बहुळ। तयाचा घेणें परिमळ। अखंडित ॥ २४ ॥ फरश आणि अंकुश। भुजाद्वईं धरिले सावकाश। निजतेजें स्वप्रकाश- । मय केवळ ॥ २५ ॥ पाहातेपणें अति विशाळ। देखिलें हृदयकमळ। सामावले ब्रह्मांडगोळ। अनेक दिसती ॥ २६ ॥ नाभि-सरोरुह सखोल। लंबोदरेंकरूनि दोंदिल। माजी ब्रह्मांड सामावलें असे-ल। नेणों काय पैं ॥ २७ ॥ सलंब कमळमाळा कंठीं। तैसी चि दुजी मुक्तमाळा गोमटी। रत्नजडित पदकसह कटि- । पर्यंत विराजत ॥ २८ ॥ निजतेजें देदिप्यमान। शुक्लांबर परिधान। वरि उत्तम कटिवेष्टन। वासुकीऐसें ॥ २९ ॥ पद समत्वें विलासत। पद्मासनीं मूर्ति धवधवीत। सिंहासनावरि विराजत। सह उंदिर ॥ ३० ॥ निज सुंदरपणें अति सभ्रमें। शंकरासी दाऊं जाइजे कामें। तेणें न देखिजे गणेशासमें। मग दग्ध कीजे क्रोधें ॥ ३१ ॥ पाहातां आनन तरि इभ। परि कोटि-सूर्यसम प्रभ। स्कंदांतें नरवेष स्वयंभ। कोटिचंद्रोज्वळ ॥ ३२ ॥ दिव्य कांति जेवि सुवर्ण। अवयवीं शरीर संपूर्ण। चित्रांबर देदिप्य प्रा-वर्ण। मुक्तमंडित ॥ ३३ ॥ जयाचिया तेजासम। पाहातां उपमा न दिसे निसीम। सुंदरत्वाचें ओतलें धाम। मूर्तिमंतपणें ॥ ३४ ॥ आतां अळंकाराचा अळंकार। पाहातेपणें जो साचार। तयासी लेणियाचा शृंगार। कोठवरि ॥ ३५ ॥ तऱ्ही कांहींयेक देखिलें। जें उत्तमत्वें शोभलें। पदीं तोडर मिरवले। दैत्यांकित ॥ ३६ ॥ वाळे वांकी घाग-रिया। रुणझुणिती कडीं सांकळिया। तेणें नादें होत थैथया- । कारें नृत्य ॥ ३७ ॥ कटीं सुवर्णमेखळा जडित। वरि मुंजुमे पेटिया रत्नख-चित। तया नेहटीं क्षुद्रघंटिकान्वित। झुंकारमय ॥ ३८ ॥ कंठीं

---

१ माम. २ बहुत. ३ कडदोरा. ४ सर्पाचें नांव. ५ मदनानें. ६ खांद्यापासून खालीं. ७ स्वरूप. ८ दैत्यचिन्हयुक्त. ९ कटिसूत्र. १० जवळच

शोभे येकावळी । रामेटका हृदयकमळीं । अनेक माळांचिया वोळी । देदिप्यमान ॥ ३९ ॥ मणिगटीं वीरककणें । करागुळीं मुद्रिका जडित खेवणें । भुजीं केयूरादि भूषणें । उत्तमोत्तम ॥ ४० ॥ रदीं झळकती सुवर्णकट्ट । वरि हिरे जडिले बरवट । शुडादड सरळ नीट । शृखळान्वित ॥ ४१ ॥ मस्तकीं शोभती द्वय कुभें । त्यापासूनि श्रवतसे अभें । तेणें मद गंधानिळें इभ । अति शोभायमान ॥ ४२ ॥ कर्णीं कुडलें अति साजिरीं । मस्तकीं मुगुट शोभे कुसरीं । तुरा खोविला मुगुटावरी । अति तेज-पुज ॥ ४३ ॥ ऐसें परम लावण्ययुक्त । आद्यत पाहातां साळकृत । देखिलें ध्यान घवघवीत । मगळमूर्तिमय ॥ ४४ ॥ तन्मयत्वें तिये समई । दाटलेनि विस्मयें हृदई । प्रणम्यपूर्वक पाई । वृत्ति समरसिली ॥ ४५ ॥ अष्टभावेंसीं अति विनित । होऊनि जोडला करीं त्वरित । घालूनि सर्वांगें दडवत । सावकाश ॥ ४६ ॥ जय जय जी मगळमूर्ति । अपार महिमा अतुळ कीर्ति । वाचा वर्णूं गेलों तवं स्फूर्ति । कुठित जाली ॥ ४७ ॥ केवळ न बोलवें ऐसें जालें । मग अतरीं च वोहिलें । श्रीचरणातें स्मरिलें । निजात्मभावें ॥ ४८ ॥ तव तिया स्मरणा चि सवें । परम स्नेहाचिया कणवें । बोलिजे निजजनकृपाळुवें । श्रीगजाननें ॥ ४९ ॥ भला भला गा गुणनिधि । आजी निसीम देखिली तव बुद्धि । स्तवनमिसें निजसुख निरवधि । मज दिधलें तुवां ॥ ५० ॥ पाहाता स्तुति नव्हे हे केवळ । तुवां मज केलें वेळाउळ । माजीं शब्दसुवर्णरत्नीं सोज्वळ । सिंहासन निर्मिलें ॥ ५१ ॥ वरि सावयवाळकृत ध्यान । माझें जें का स्वरूप सगुण । तें निजभावें करूनि आवाहन । सस्थापिलें तेथ ॥ ५२ ॥ प्रबंध प्रमेयान्वित यथोचित । पूजिलें सदुपचारयुक्त । तेणें आजी ममात्मा आद्यत । सुखिया

---

१ एकेरी हार. २ भूषणें. ३ मुगुटकुडलादिक. ४ दाताचे ठिकाणीं. ५ गडस्थळें ६ पाणी. ७ हत्ती ८ चातुर्यानें. ९ त्वरित. १० तत्क्षणीं. ११ कृपेनें. १२ अलत, बहुत. १३ गृह, मदिर. १४ कवित्व. १५ प्रमेय=विषय

पूणे ॥ ५३ ॥ वरि यथार्थ मधमोदक । अर्पिले मज सम्यक । तेणें तरि अत्यंतिक । हर्ष वाटे ॥ ५४ ॥ निजभावें करूनि शुद्ध वृत्ति । सेवया घेऊनि सदुग्धवृत्तीं । निजानंदें शर्करामिश्रितीं । आतृप्तभोजन ॥ ५५ ॥ वरि सकर्पूर पुगीफळ । मिश्रित अर्थैक्यें दिल्हें तांबूळ । तेणें मज आजी प्रबळ । सौख्य जालें ॥ ५६ ॥ मग प्रबंधमय सुमनमाळा । निजभक्तीं घातली गळा । ऐसा नाना उपचार सोहळा । जो केला तुवां ॥ ५७ ॥ तो निजप्रीतीं पावला मज । तेणें संतोषासी जालें परम भोजें । आता जे अपेक्षा असेल तुज । ते सहजें पावसी ॥ ५८ ॥ असो आतां मम तृप्त्यावशिष्ट । अप्राप्तत्वें ब्रह्मादिकां वरिष्ठ । तें उर्वरित शेष विशिष्ट- । पणें जें उरलें ॥ ५९ ॥ तें घेईं गा तूं झडकरी । मम प्रसादरूप निर्द्धारीं । मग स्वानुभवदिनकरीं । उद्गारें दे सुखें ॥ ६० ॥ ऐसा मंगळमूर्ति मंगळमय । देतां चि वरदपसाय । तो लाहोनि स्वानुभवें दिनकर तन्मय । रामीरामदासीं ॥ ६१ ॥ स्वस्ति श्रीस्वानुभवदिनकरे गुरुशिष्यान्वये प्रथम कळापे मंगळाचरण गणेशस्तवननिरूपण नाम तृतीय कीर्णप्रकाशः ॥ ३ ॥

---

॥ श्रीराम ॥

ॐ नमो माय येकाक्षरी । प्रणवरूप तूं सचराचरीं । जगदंबिके जगदीश्वरी । त्रैलोक्यजननिये ॥ १ ॥ जय जय देवी ॐकारे । क्षराक्षरातीत परे । रामदासकृपा स्वानुभवदिनकरें । बोलिजैल तवार्णें ॥ २ ॥ जय जय देवी व्यापके । अनादि जगज्जनके । लीलां लयोद्भवकारके । जगन्माय तूं ॥ ३ ॥ जय जय देवी सुमुखे । चिद्गगनीं सुधामयूखे । दुरितधी कृत सुरेखे । सुधामाय तूं ॥ ४ ॥ जय जय देवी सर्वगे ।

---

१ आवड, संतोष २ माझी तृप्ति झाल्यानंतर जें अवशेष राहील तें (ह्मणजे अर्थात आनंद) ब्रह्मादिकांना देखील दुष्प्राप्य असल्यामुळें ते त्याकरितां आशा धरून असतात. ३ तो आनंद शब्दसृष्टींत प्रगट कर. ४ प्रसाद ५ ज्ञानाकाशीं किंवा परब्रह्माचे ठिकाणीं. ६ अमृतोपम चंद्रकिरणाप्रमाणें आल्हाददायक अशा. ७ पातकाचा संचय. ८ सर्वत्र संचार करणारी.

सत्वश्रिया श्रीरंगे । सर्वातीत निसंगसंगे । अपरमाय तू ॥ ५ ॥ जय जय देवी अ[2]नघे । जगदादिकंदे [3]अमोघे । भक्तज[4]नकामदुघे । भक्तमाय तू ॥ ६ ॥ जय जय देवी श्रीशां[5]र्ङ्गे । स्वजनजना पङ्गे । दैत्यदानवा पां[6]ङ्गे । स्वजनमाय तू ॥ ७ ॥ जय जय देवी विश्वकुचे । विश्वात्मके विश्वकवचे । शब्दब्रह्माद्य निर्वचे । विश्वमाय तू ॥ ८ ॥ जय जय देवी श्रीवछे । विश्वाद्यखिळभ्रम विकछे । भवापवर्ग वीभछे । वछमाय तू ॥ ९ ॥ जय जय देवी विश्वबीजे । कमळाळये कमळजे । त्रैलोक्यराज्य बुभुं[7]जे ॥ त्रिभुवनमाय तू ॥ १० ॥ जय जय देवी माय माझे । अति अपार जें कां स्वरूप तुझें । तें ऐसें कारिजे[8] मी सहजें बुझें । देवी माय तूं ॥ ११ ॥ जय जय देवी श्रीसूझे । ब्रह्मादि हरिहर तव आझे । कारिती कार्याकार्य संझे । हरिहरमाय तू ॥ १२ ॥ जय जय देवी विकटे । कळितकाळ कौतुं[10]कोद्भटे । लीळा हरिसी जनसंकटें । जनमाय तू ॥ १३ ॥ जय जय देवी वैकुंठे । त्रिपुरांतके धूर्जटे । धरणीधारके कमं[11]ठे । धरणीमाय तूं ॥ १४ ॥ जय जय देवी चामुंडे । आदिमध्यांतरहिताखंडे । लीळां रचिसीं ब्रह्मांडें । अनंत माय तू ॥ १५ ॥ जय जय देवी श्रीढुंढे[12] । क्षणें घालिसी विश्व चोंढें[13] । क्षणें करिसी जेवढें तेवढें । देवमाय तू ॥ १६ ॥ जय जय देवी परिपूर्णे । निजावतारापार विशीर्णे[14] । भक्तजन सुस्नात मनकर्णे । पूर्णमाय तू ॥ १७ ॥ जय जय देवी अनंते । ब्रह्मांडोदरभरिते । विश्वाद्यखिले योगप्रसूते । आद्यमाय तूं ॥ १८ ॥ जय जय देवी श्रीनाथे । स्वजन भजनीय कृतार्थे । अनाथनाथे समर्थे । श्रीमाय तू ॥ १९ ॥ जय जय देवी शारदे । चित्शक्ति परमानंदे । शरणागतज-

---

१ सर्वश्रेष्ठ २ निष्पाप ३ नेहमी फलद्रूप होणारी. ४ भक्तजनांची इच्छा पुरवणारी. ५ धनुष्यबाण धारण करणारी. ६ पराधीनपणा. ७ भूभुजे? ८ कर कीं. ९ जाणतां येईल. १० उद्भट=प्रसिद्ध. ११ कासव. १२ मुळात हा शब्द संशयात्मक आहे. ढुंढि=गणपतीचें एक नाव. १३ गर्ता, खड्डा. १४ विस्तीर्ण.

नवरदे । आदिमाय तूं ॥ २० ॥ जय जय देवी विशुद्धे । श्रीसज्जनमानस-बुद्धे । सच्चरितगुणसुधाब्धे । सज्जनमाय तूं ॥ २१ ॥ जय जय देवी पावने । सकळलोकसजीविने । सज्जनमनमोहने । लोकमाय तू ॥२२॥ जय जय देवी अमूपे । वेदां न वर्णवसी साक्षेपें । ते नेति ह्मणोनि राहिले तुजपें । वेदमाय तू ॥ २३ ॥ जय जय देवी श्रीगुंफे । अनादि गुणमायास्वरूपे । सैह्याद्रिनिवासिनी जगद्रूपे । अनादिमाय तूं ॥ २४ ॥ जय जय देवी जगदंबे । सिद्धिबुद्धिदायके हेरंबे । सुरनरवरदायनी अंबे । अंबामाय तू ॥ २५ ॥ जय जय देवी वल्लभे । शरणागतजनसुरभे । जगदबुदगर्भनभे । गर्भमाय तू ॥ २६ ॥ जय जय देवी निसीमे । भक्तकामकल्पद्रुमे । साधुजनमानसआरामे । निजमाय तू ॥ २७ ॥ जय जय देवी करुणालये । श्रीरेणुके जगज्जननिये । भृगुवंशसजीविनीये माये । राममाय तू ॥ २८ ॥ जय जय देवी उदारें । अपरमित गुण गभीरे । निज जयोर्जित दयावरे । जयमाय तूं ॥२९ ॥जय जय देवी विशाळे । करुणाकरे स्नेहाळे । त्रिगुणादि गुण-भेदें प्रबळे । गुणमाय तूं ॥ ३० ॥ जय जय देवी साधवे । निजजनोद्यानमाधवे । रमणीय क्षीरसिंधु सिंधुवे । साधुमाय तूं ॥ ३१ ॥ जय जय देवी श्रीनिवासे । जीवशिवादि उभय विलासे । प्रणवोद्भवैकरसे । जीवशिवमाय तू ॥३२॥ जय जय देवी चिदंशे । संतसमूहोडुगणावकाशे । दृश्याभास निःसरितनिशेषे । संतमाय तूं ॥ ३३ ॥ जय जय देवी दिनेशे । दिवाकरे दयार्णवे ब्रह्मांशे । नित्योदये स्वयप्रकाशे । दिनकरमाय तू ॥ ३४ ॥ जय जय देवी वर्णसमूहे । मध्यपीठे सिंहवहे । निज उदरीं सामावी ममात्मदेहे । मम माय तू ॥ ३५ ॥ जय जय देवी सकळे । विश्वाभास-गर्भतुदिळे । सच्चिदानंदरूपे चित्कळे । मूळमाय तू ॥ ३६ ॥ जय जय

---

१ अमृताचा जणूं समुद्र अशी तूं. २ साक्षेपें=पुष्कळ यत्न करून देखील. ३ तुझा आश्रय करून. ४ कामधेनु ५ जगद्रूपी मेघाना आकाशरूपी गर्भांचे ठायीं धारण करणारी. ६ परशुराममाता.

देवी अपरोक्षे । विदळीताखंडित बंधमोक्षे । निजाभयवरद दक्षे । मोक्षमाय तूं ॥ ३७ ॥ एव असो ऐसी जे सर्वाद्य । हरिहरब्रह्मादिकां वद्य । ते आजि निजभावें सद्य । वंदिली सर्वांगें ॥ ३८ ॥ नाम जिचें वागीश्वरी । स्वरूपाची अनुपम्य थोरी । परा पश्यति मध्यमा वैखरी । कुंठित जेथ ॥ ३९ ॥ तेथ बोलावयाची वित्पत्ति । मम वाणीस असेल किती । परि जिव्हेसी अवतरली सरस्वती । ते बोलवीतसे मातें ॥ ४० ॥ जें स्वरूप रूपें अति सुंदर । चांपे गोरटी सकुमार । सुवर्णमय कांति मनोहर । लावण्य जियेचें ॥ ४१ ॥ नखापासूनि पाहे केशपर्यंत । तवं केवळ चिच्छक्ति साळंकृत । सावयवीं सुदर शोभत । आदिमाया चि हे ॥ ४२ ॥ जयेच्या येकांशमात्रें व्यापार । तो हा सकळ जगडबर । मां केवळ मूळरूपाचा पार । कोणें जाणावा ॥ ४३ ॥ पाहातां त्रिगुणरूपें सचली । परि विश्वाकारें रूपासी आली । माजीं भूतपचकें ठसावलीं । देहाकारें सर्व हि ॥ ४४ ॥ तमोमय मस्तक केवळ । सत्त्वात्मक उदर विशाळ । रजोगुण चरणयुगुळ । आद्यंत जयेचें ॥ ४५ ॥ अतःकरण मन बुद्धि चित्त अहकार । हें आकाश चि जयेचें समग्र । व्यानोदान समान प्राण अपान हा समीर । आद्यंत जयेचा ॥ ४६ ॥ श्रोत्र त्वचा चक्षु जिव्हा घ्राण । हें तेजतत्त्व सर्व हि जियेचें मिळोन । वाचा पाणी पादोपस्थ गुद हें जीवन । सपूर्ण जयेचें ॥ ४७ ॥ शब्द स्पर्श रूप रस गंध । हे पृथ्वी मिळोनि येथविध । ऐसें आद्यंत सर्वांग विविध । प्रकारें बोलिलें ॥ ४८ ॥ येवं[४] दशेंद्रियावयवी तेजोदक । व्याप्यव्यापकपणें खंवायुदशक । विपयरूपें जडात्मक । पृथ्वीयेसें ॥ ४९ ॥ मुळीं सत्व रज तम । आणि पचभूतादि क्रम । मिळोनि मूळस्वरूपसंभ्रम[५] । आदिमायेचा ॥ ५० ॥ ऐसी सावयवीं अष्टागयुक्त । स्वरूपलावण्य घवघवीत । नेसली चिदंबर साळंकृत । कचुकी तेजोमय ॥ ५१ ॥ मस्तकीं खपुष्पांची[६] जाळी । सुवर्णमय आळकार निजांगमेळीं । वीणा दशनादें शोभे करतळीं । आरोहण

१ सरस्वती २ श्रीहरीची माया ३ मग ४ मायेचें पचीकृत पचभूतात्मक स्वरूप कसें तें येथें दाखविलें आहे. ५ सभ्रम=वैभव. ६ आकाशपुष्प.

निज हर्सी ॥ ५२ ॥ येसी आयत ब्रह्मतनया । जे का जगदादि मूळ-माया । ते साष्टांगीं प्रणमिली मियां । निजात्मभावें ॥ ५३ ॥ वदूनि जवं अवलोकीं नेत्रीं । तव जे केवळ ब्रह्मपुत्री । सुंदरपणाची तरी धात्री । अनुपम्यत्वें ॥ ५४ ॥ आतां अनंत ब्रह्मांडें इचें कर्तृत्व । तेथ इयेसी उपमावें कोणतें तत्व । न दिसे ह्मणोनि इयेचें लावण्यत्व । इये चि सारिखें ॥ ५५ ॥ पाहाता इयेसी न दिसे दृष्टांत । ह्मणोनि राहों पाहें जव निवांत । तव बैसों नेदी निश्चित । वळें चि बोलवी ॥ ५६ ॥ मग नाना स्तुति-वाक्योत्तरीं । बोलिजे समयावसरीं । जय माते वागीश्वरी । अनाथनाथे ॥ ५७ ॥ जय भक्तचकोरसुधाकरे । शरणागतचातकमेघोदारे । निज-जनमानसआधारे । अमृतरूपे ॥ ५८ ॥ जय माय विश्वसजीवनी । जय भक्तजनसरक्षणी । जगदंबे पतितपावनी । तुज नमो नमो ॥ ५९ ॥ नमो माय भक्तवरदे । जगदादि आनंदकंदे । स्वशरण-मनोहर वृंदे[3] । आराध्यदैवते ॥ ६० ॥ इया स्तुतिवाक्यासरिसें । शारदा उल्हासलेमि मानसें । देत परम संतोषें । भक्ता वरद ॥ ६१ ॥ जे कां अगम्य अगोचर । जयेचे आज्ञाधारक हरिहर । वेदादि शेष होऊनि किंकर । जयेतें नित्य स्तविती ॥ ६२ ॥ तें सगुण रूप धरूनि मनोहर । मम मस्तकीं ठेवी अभयकर । अंकीं बैसऊनि कृपामृतें मधुर । वाक्यें बोलत ॥ ६३ ॥ अति थोरसें करुणेचया । ह्मणे बा रे निज सखया । मातें तुवां आठविलें जया कार्या । तें निसंदेह जालें ॥ ६४ ॥ आंथिलेसि स्नेहें मम कृपावरद । हा चि येई का तू अक्षइ प्रसाद । मग केवळ स्वानुभवद । दिनकरा ऐसा ॥ ६५ ॥ आतां येकाग्र करूनि चित्त ।

---

१ नमन केलें. २ धारण करणारी, अधिष्ठान. ३ वृंद=समुदाय. ४ 'वर' या शब्दाऐवजीं 'वरद' असा शब्द या ग्रंथास सर्वत्र योजिलेला आढळतो. ५ स्नेहभरित पान्हा येऊन. ६ तू भाग्यवान् आहेस ह्मणून. ७ सूर्य स्वतः स्वयंप्रकाश असल्यामुळें त्याला दुसऱ्या उजेडाची अवश्यकता नाहीं व तो आपल्या प्रकाशानें सर्व प्राणिमात्रास सुख देऊन, त्यावर एक प्रकारचें उपकार करतो, त्याप्रमाणें च तू आपला जो शुद्ध व स्वच्छ अनुभव ( आत्मानुभव ) तो इतरांना कथन करून त्यांना सन्मार्गाला लावण्याचें श्रेय घे.

तवानुभव जो सकळ साद्यंत । वदसी तेणें ममात्मा बहुत । संतोष पावेल ॥ ६६ ॥ तरी आता विलंब न करी । ऐसें बोलोनि सरस्वती झडकरी । प्रवेशली मम मुखाभीतरी । येकायेकीं चि पैं ॥ ६७ ॥ पाहें तव हृद्‌यावकाशीं । प्रगटली निजानंदें सावकाशी । तेणें प्रेमसुखें स्वानुभवसंतोषीं । सुखावलों अति ॥ ६८ ॥ मग मम वाचे जो जो शब्द येत। तो तो आदिमाया चि स्वयें वदत । स्वानुभवदिनकर चि साद्यंत । बोलतसे स्वेछा ॥ ६९ ॥ तियेचिया निज आधारें । श्रीरामदासकृपावरें । स्वसुखानुभव दिनकरें । अनुवादिजेल ॥ ७० ॥ दिनकररामदास ह्मणे । स्वानुभवदिनकरीं स्वसुख लाहाणें । तें शारदेचिया निजकृपा बोलणें । येकात्मस्थिति सहजें ॥ ७१ ॥ स्वस्ति श्रीस्वानुभवदिनकरे गुरुशिष्यान्वये प्रथम कळापे शारदास्तवननिरूपण नाम चतुर्थ कीर्ण प्रकाशः ॥ ४ ॥

---

॥ श्रीराम ॥

ॐ नमो सद्गुरु जननीजनक । नमो संसृति[2]विपिनदाहक । नमो भवे[3]गजकेशरी मी ममात्मक । अज्ञानवनेंद्विरद[4] ॥ १ ॥ नमो निजयशें[5]दिग्धवलसूर्य । नमो सद्विलसित मोक्ष[6]श्रीवर्य । नमो सद्दुद्‌योत्कर्षितौदार्य । चिद्घनस्वरूप ॥२॥ नमो विज्ञान विजय प्रतापो[7]र्जित । नमो गांभीर्याब्धि[8] गुणमाधुर्यामृत[9] । नमो सच्चरिताखिल भास्वंत[10] । त्रितापोपशम ॥ ३ ॥ नमो सज्जनें[11]चकोरसुधांक । नमो भक्तजनहृत्कमलिनीमें[12]यंक । नमो कृपामृतकीर्णतुषारशशांक[13] । विश्वसजीवन

---

१ हा स्वानुभवदिनकर ग्रंथ आदिमाया सरस्वती ही स्वतः माझ्या मुखानें वदवीत आहे. २ जन्ममरणरूपी अरण्याला जाळून टाकणारा ३ संसाररूपी गजाचें छेदन करणारा सिंह. ४ ममत्वरूपी अज्ञानवनाचा उच्छेद करणारा हत्ती. ५ दिशांतें स्वच्छ प्रकाश देणाऱ्या दैदिप्यमान सूर्याप्रमाणें ज्या तुझें यश आहे. ६ चांगली शोभणारी जी मोक्षलक्ष्मी ती देणारामध्यें श्रेष्ठ. ७ ऊर्जित=शक्ति. ८ गंभीरपणामध्यें समुद्र ९ मधुरपणामध्यें अमृत १० सूर्य. ११ सज्जन हे कोणी चकोरपक्षी, त्यांना किरणामृतपान करविणारा चंद्र तो तूं च. १२ भक्तजनांचीं हृत्कमळें प्रफुल्लित करणारा चंद्र तूं च १३ चंद्र.

॥ ४ ॥ नमो स्वशरणचातकाब्दें । नमो सिद्धजनगणसिद्धिद । नमो साधुसमूहहंसक्षीरोदें । सुखसेव्यार्णव ॥ ५ ॥ नमो जगदादि आनदकंद । नमो मूळान्वय सच्चिदानद । नमो योगीजनमानसवृंद- । आराध्यलिंग ॥ ६ ॥ नमो शब्दब्रह्मानुभवगर्भ । नमो अनतब्रह्मांडोडुगणनभ । नमो सुंदरोल्लसित गगनाभ । ध्यानावयोत्तम ॥७॥ नमो भवापवर्गे दुरितदहनें । नमो जगद्भ्रमाब्दप्रभंजनें । नमो येकमेवाद्वितीय सनातनें । ब्रह्मानंदैक ॥ ८ ॥ नमो विश्वकळीतकाळ कृंदत । नमो सद्हृदयोद्यानवसत । नमो भक्तजनसमूहचातकार्त । चिदानदघन ॥ ९ ॥ नमो संतषट्पदपरागोत्पळें । नमो त्रैतापज्वरितमळयानिळें । नमो शरणागतजनवत्सळ । करुणाळय ॥ १० ॥ नमो श्रीगुरु प्रणवैकाक्षर । नमो परमगुरु परात्पर । नमो स्वानुभवदिनकर । श्रीसद्गुरु नमो ॥ ११ ॥ करावें सद्गुरुस्तवन । ह्मणौनि उदित मनांत करण । तव मन जालें केवळ उन्मन । निजनामस्मरणें ॥१२॥ मुळीं वर्णद्वयात्मक गुरुनाम । तयाचें बोलतां व्याख्यावर्म । निजानदें सुखावोनि निगमागम । स्वानुभवीं ठेले ॥ १३ ॥ तरि आद्य जो कां गुकारवर्ण । याचें समूळ करिता विवरण । तव हा केवळ अंधकारावरण । अष्टधा प्रकृतिमय ॥ १४ ॥ मुळीं सत्व रज तम हे त्रिगुण । ख वायु तेजोदक पृथ्वी मिळोन । अष्टधा प्रकृति जड क्षर भाव वर्ण । गुकारात्मक ॥ १५ ॥ तमोमय ह्मणौनि यया शून्यपण । स्थावर जडरूप केवळ अज्ञान । जितुकें नाशिवंत तें सर्व हि मिळोनि ग वर्ण । अज्ञानजनित ॥ १६ ॥ आतां द्वितीय वर्ण रुकार । ययाचा

---

१ अब्दु=मेघ. २ क्षीरसमुद्र ३ अर्णव=समुद्र ४ उडुगण=नक्षत्रें. ५ आनदी. ६ आभ=प्रतिबिंब ७ अपवर्ग=मोक्ष. ८ पातकाचें भस्म करणारा. ९ जगताच भ्रांतिरूप मेघ उडविणारा वायु १० शाश्वत, नित्य ११ जगताचा अत करणारा. १२ सत हे च कोणी भुंगे, ज्यातील मधरज चाखण्यासाठीं लोलुप झाले आहेत, असें ( पद ) कमल १३ त्रितापानें पोळलेल्यास मलयपर्वतावरील वाऱ्याप्रमाणें सुखकारक. १४ ॐ. १५ चारी वेद व सहा शास्त्रें. १६ अज्ञानरूपी वेष्टण. १७ नाशिवंत.

दृढ करितां विचार । तर्व देखिला आद्यंत अपार । महिमा तयाचा ॥ १७ ॥ जो कां निज तेजें देदिप्यमान । जो या आकारें-जाताचें जीवन । चंचळपणाचें माजवण । घेतलें जेणें ॥ १८ ॥ जो चराचरव्यापक । स्थावर जंगम जयाचें कौतुक । जयासी मूर्तामूर्त ह्मणतां निष्टंक । सांख्यज्ञांनी ॥ १९ ॥ अहंअविद्यासंगें जो जीव । नाहंमायायोगें शिव । केवळ गुणभूतीं मिश्रित सदैव । वेगळेपणें ॥ २० ॥ जो सकळ जगदंकुरकंद । साकाररूप चिदानंद । कार्यका-रणादि भेद । जयाकरिता ॥ २१ ॥ जयाचें न कळतां रूप । विश्व खरें वाटे अमूप । जाणितलया होइजे निष्पाप । क्षणमात्रें चि ॥२२॥ जो विश्वव्यापक विश्वोद्बुद्ध । तयाचें नमू चरणद्वंद । का जे विश्व देखतां होय निर्व्यवाद । ह्मणोनिया ॥ २३ ॥ हरिहरब्रह्मादिक । इच्छामात्रें होती सम्यक । पुन्हां लया जाती निष्टंक । जया देखतां ॥२४॥ जयातें सांख्यमत । क्षेत्रसंगें क्षेत्रज्ञ ह्मणत । अक्षर ऐसा हि संकेत । बोलती येक ॥ २५ ॥ निजांगें जो परम चंचळ । विश्वलयोद्भव जयाचा खेळ । प्रकृतिसंगें पुरुष आणि केवळ । जगत्प्राण हा ॥२६॥ जो अष्टधा प्रकृतिहूनि पर । षड्गुणासीं जेथ आधार । जो साक्षात् ईश्वर । शुद्धसत्व ॥ २७ ॥ ऐसा जो जगदात्मा सर्वगत । सर्वे इच्छा-शक्ति विलसत । जेवीं प्रभेसह द्युमणी कीं मिरवत । निजकाळीं चंद्र ॥ २८ ॥ कां जैसी आकाशीं साजे नीळिमा । का अग्निअंगीं शिखो-गरिमा । तद्वत्तन्वंगीसह शोभे जगदात्मा । रुकारवर्णी सतेज ॥ २९ ॥ ऐसा आत्मरूप रुकार । जो सर्वांगें सपरिकर । जगद्रूप तेजाकार । बोतला जो ॥ ३० ॥ असो जो सर्वगुणें संपन्न । तो दुजा आनंदाकार

---

१ ज्या ज्या पदार्थाला काहीं तरी आकार आहे अशा सर्व पदार्थांचें २ अधिकपण, उन्मत्तपण ३ निश्चयेंकरून. ४ तात्विक विचाराचे. ५ सत्य स्वरूपाचें ज्ञान झालें असता. ६ चांगले, प्रत्यक्ष ७ ज्ञान. वैराग्य, ऐश्वर्य, यश, कीर्ति, औदार्य, हे सहा गुण. ८ सूर्य ९ ज्वाला १० महत्व ११ तद्वत्+तन्वंगी=नाजुक स्त्री.

रुवर्ण । जयाचें वर्णितां महिमान । असंभवनीय ॥३१॥ तमोमय अज्ञानात्मक प्रथम गुवर्ण । दुजा ज्ञानैकघन सतेज रुवर्ण । उभयोद्भवल्यीं विज्ञा-नरूप संपूर्ण । गुरु ऐसें ॥ ३२ ॥ केवळ गुरु ऐसें निजनाम । ह्मणतां समाविस्त निगमागम । यासी हि मुळीं सत्शब्द योजिता निःसीम । महिमा येथीचा ॥ ३३ ॥ सत्छब्दयोगें केवळ सद्गुरु । आद्यंत नामाचा हा बडियारु । अगम्य अतर्क्य न कळे पार । श्रुतिस्मृतींसी ॥ ३४ ॥ जेव्हां सत्शब्दासी योजिलें । तेव्हां चि अज्ञानासह ज्ञान हारपलें । मग केवळ विज्ञानात्मक देखिलें । सद्गुरुनाम ॥३५॥ ऐसा सद्गुरु निजनामा-नुभव । सदाशिवें घेऊनि स्वयमेव । पार्वतीसी शास्त्रोपदेशप्रभेव । गुरुगीताख्यें ॥ ३६ ॥ मुख्य नामाचा विचारितां अर्थ । आब्रह्मादि लाभे स्वार्थ । लाभलिया ब्रह्मानुभव परमार्थ । यासी चि बोलिजे ॥३७॥ अहो या सद्गुरुनामासाठीं । अनंत ब्रह्मांडें न सरती थेकुटीं । आपणा हि सकट सेवटीं । जर्‍ही नाहीं होइजे ॥ ३८ ॥ तर्‍ही न कळे निज-नाममहिमा । जयाची अपरमित गरिमा । अनुर्वाच्य जेथें शब्दब्रह्मा । स्वानंदसुख ॥ ३९ ॥ एवं जें सर्वाद्य सुमहिम । सर्वात्मक सर्वेश सर्वोत्तम । स्वानुभवदिनकराऐसें वर्म । सद्गुरुनामीं ॥ ४० ॥ किंबहुना ज्याचें नाम ऐसें । त्याचें स्वरूप असेल कैसें । तें पाहों आद्यंत अमोसें । निजनाम सोई ॥ ४१ ॥ तेथ स्वरूप आधीं दृष्टीनें पाहावें । मग मनें स्वेच्छा कल्पावें । कल्पूनि शब्दें बोलावें । गुणवैभव ॥ ४२ ॥ तरि न कळे मुळीं स्वरूपाचा अंत । न चले हेतु दृष्टांत । नाना कल्पना-विवर्त्त । न सरे जेथ ॥ ४३ ॥ केवळ सद्गुरूचें शुद्ध स्वरूप । असंभ-वनीय अमूप । जयाचया थोरपणाचा संक्षेप । न बोलवे वाचे ॥४४॥ परादि वाचा कुंठित जेथ । वैखरी केविं बोलों शके तेथ । मनाचें

१ उत्पत्ति २ गुरुगीता या नावानें ३ सर्व ज्ञानांमध्यें श्रेष्ठ जें ब्रह्मज्ञान तें प्राप्त होईपर्यंत. ४ थेंकुलें=थोडें, ठेंगणें. ५ महत्व. ६ अमळसे. ७ सोय, मार्ग. स-द्गुरुनामस्मरणाच्या मार्गानें व सद्गुरुस्वरूपाचें ज्ञान करून घेण्याचा प्रयत्न करूं. ता प्रयत्न कसा करावयाचा न [illegible] [illegible] ८ अभिप्राय. ९ भास. १० अतिशय, [illegible]. ११ [illegible] व [illegible], १२ चारी वाणी

तर्कणें हि समर्थ । हों न शके चि ॥ ४५ ॥ ह्मणौनि वाङमनासी जें अगोचर । तें इंद्रियांसी केविं होय गोचर । न दिसे वेगळिकेची कोर । परब्रह्म यया ॥ ४६ ॥ अनगत्वें निजांग अनुपम्य । मृदपणें गगनापरिस रम्य । काठिणांतर जेणें गम्य । करूनि सोडिलें ॥ ४७ ॥ आब्रह्मादि येथपर्यंत । दिसे सस्वरूप चि आद्यंत । येका नखाग्रीं ब्रह्मांडें अनंत । न सरती चि ॥ ४८ ॥ स्वरूपासी कांहीं द्यावें उपम । तवं हें मुळींचें चि निरूपम । तेथ वर्णव्यक्तिसंभ्रम । काय बोलिजे ॥ ४९ ॥ दिसे सालंकरलें सकळ । प्रत्यक्ष जैसें निराकार केवळ । निरावयवत्वें निर्मळ । अवयव शोभती ॥ ५० ॥ इये स्वरूपीं उपाधियोग । पाहातां निरुपाधी दिसे अव्यंग । यया मज नित्य संग । निसंगपणें ॥ ५१ ॥ निष्प्रपंचासारिखा अपार । इये स्वरूपीं देखिजे प्रपंचप्रसर । पाहातां यासी आधार । निराधार केवळ ॥ ५२ ॥ गुण तरि येथ असाधारण । निर्गुण चि निजांगें संपूर्ण । यया सद्गुरुस्वरूपाचें सुंदरपण । अनिर्वचनीय ॥ ५३ ॥ ऐसिया स्वरूपासी आवर्णेकुसरी । योजावी जों कांहीं नवलपरि । तवं तें दशदिशांतर्बाहेरी । समांतरीं तें ॥ ५४ ॥ असो प्रगटतां लपतां जें केवळ । सगें चि देखिजे अळुमाळ । लावण्य पाहातां सकळ । अतर्क्य अगम्य ॥ ५५ ॥ परम गहन अंगकांति । शोभे केवळ जैसी ब्रह्मसंवित्ति । ध्यानावयवीं स्वरूपाकृति । अँप्रमेय अनादि ॥ ५६ ॥ ऐसें सस्वरूप अवघें आद्यंत । पाहिजें तसें जंव निवांत । तवं देखिजे आदिमध्यांतरहित । अपारपणें जें ॥ ५७ ॥ अपार ह्मणौनि पाहों गेला । तवं पाहातेपणें भांबावला । नकळे मग भुलला । आपआपणासी ॥ ५८ ॥ ह्मणे मी जो हें

१ कोणती हि वस्तु जाणण्याचे मार्ग तीन; काया, वाचा, आणि मन. जी परब्रह्म वस्तु जाणण्याला मन देखील समर्थ नाहीं, तेथे वाचा आणि इंद्रियें यांचे काय चालणार ? ह्या तिहींना अगोचर अशी वस्तु आपणाव्यतिरिक्त निराळी कशी असू शकेल ? २ आलंकृत झालें. ३ प्रपंचविस्तार. ४ धरून अडकवून ठेवतां येईल असें चातुर्य किंवा युक्ति. ५ किंचित्. ६ ब्रह्मज्ञान. ७ प्रमाणास अतीत. ८ पहावयास गेलें तर.

स्वरूप पाहें । तों मी पहिलें मुळीं कोण आहे । ऐसें न विचारूं कां हें । समूळ अवघें ॥ ५९ ॥ तरि मी जीव माझे देहावयव । हा तरि अविद्यामय अष्टधा प्रभव । जड अज्ञानात्मक हें नाशिवत सर्व । गवर्णी योजिलें ॥ ६० ॥ मग मी आत्मा अविनाश चिद्घन । यया दृश्यातीत केवळ अभिन्न । हे ज्ञानात्मक चंचळपणें परिछिन्न । तेजोमय रुवर्णांकित ॥ ६१ ॥ एव मी आणि मम हे दोन्ही । जीव शिव हे होते जे वेगळे-पणीं । ते गुरुरूपीं ऐक्यत्वें समरसुनी । सत्स्वरूप पाहिलें ॥ ६२ ॥ ऐसें पाहातेंनविणें[2] शिष्य गुरूसी । पाहों गेला जव निश्चयेंसीं । तवं दोहींचिया समरसीं । येक सत्स्वरूप चि कीं ॥ ६३ ॥ स्वयें मी सच्छि-ष्यत्वें सद्गुरुस्वरूपासी । पाहोनि समरसला निज ऐक्येंसीं । मग दोन्हीं-पणें निज येकपणेंसीं । समूळ वावें[3] ॥ ६४ ॥ ऐसें जालियावरि क्षणेक निवांत । होऊनि बैसलों निज स्वरूपानुभव घेत । तव दोहींविणें वृत्ति समरसत । जेथील तेथ ॥ ६५ ॥ ते समई कैसें जालें । जेविं दुग्ध-कणें क्षीराब्धीसी आळगिलें । किंवा स्फुलिंग मिसळलें । महा तेजीं ॥ ६६ ॥ किं लवण मिसळतां जीवनीं । अथवा अळकार सुवर्णीं । वायु समरसता गगनीं । तद्रूप जेविं ॥ ६७ ॥ तेविं चि मज हि आतां । सद्गुरु सर्वांगें अवलोकितां । जाली सत्स्वरूपीं ऐक्यता । येकसरी चि ॥ ६८ ॥ ऐसें चि सद्गुरुरूपीं सत्शिष्य । मिळणी होतां चि सामरस्य । ऐसें उघड बोले वेद भाष्य । गर्जोनि प्रतिज्ञा ॥ ६९ ॥ असो शुद्धस्वरूप निश्चळ तें चि सत्पद । जड गुकार तो जाणिजे चित्पद । चंचळपणें रुकार तो आनद । ऐक्यपणें केवळ ॥ ७० ॥ येवं सच्चिदानदमय सद्गुरु । ऐसया समर्थासी पूजाउपचारु । काहीं यथाविधियोगें करूं । शक्त्यनुसार ॥ ७१ ॥ तेथ पूजार्चनीं विधि गौरवीं । जे जे सपत्ति योजावी । ते नाशिवत जाणोनि त्यागावी । ऐसें चि होये ॥ ७२ ॥ आता दृश्य द्रष्टा दर्शन । हें चि अत्र गंध पुष्प संपूर्ण । ध्येय ध्याता आणि ध्यान । धूप दीप नैवेद्य ॥ ७३ ॥

---

१ उत्पत्तिकारण. २ पाहण्याचा प्रयत्न न करतांना. ३ व्यर्थ, अनस्तित्व. ४ अद्वैतपणें, ५ सद्गुरु व सच्चिदानंद या दोन शब्दांचें साम्य दाखविलें आहे.

मग ज्ञेय ज्ञाता आणि ज्ञान । फळ तांबूळ सदक्षिण । चौऱ्यासी लक्ष निपटून[1] । प्रदक्षिणा सारिली ॥ ७४ ॥ एव मी आणि मम हे सर्व । अर्पूनि घेणें स्वरूपानुभव । ऐक्ययोगें पूजागौरव । सहजस्थिति ॥ ७५ ॥ येथ जडचचळादि निश्चळ । सद्गुरुस्वरूप केवळ । स्वानुभवदिनकरीं निर्मळ । घवघवित देखिलें ॥ ७६ ॥ मग मी मम हें सर्व सारूनि । सर्वांगाचां नयनीं[2] । श्रीगुरुरूप अवलोकुनी । ठेविलें जवळां ॥ ७७ ॥ तिये समईचया आनदा । न बोलवे चि पैं कदा । जया सुखा भोगितां वेदा । पडिलें मौन ॥ ७८ ॥ यया सुखें आनंद हरिहरासी । मा इतराची गोष्टी काइसी । आजि मी हि तिया सुखासी । जालों येकायतन ॥ ७९ ॥ सीमा न करवे तया सुखाची । देखें केवळ अवघें सद्गुरुरूप चि । मजमाजी हि श्रीगुरूची । प्रतिमा देखें ॥ ८० ॥ मग सर्वांगत्वचा येकवटून । श्रीगुरुरूपीं तरसत् करून । स्वामीसी देऊनि आलिंगन । पदीं समरसलों ॥ ८१ ॥ एवं पूज्यपूजकातीत पूजा करूनि । निज कृपामृतवरद पसायदानीं[3] । सर्वांग श्रवणावधानीं[4] । आयकों इछी ॥ ८२ ॥ तव जेविं निराळी ध्वनि उठे । किं गगनीं वायु प्रगटे । तेविं बोलों आरंभिलें गोमटें । निजकृपा श्रीगुरु ॥ ८३ ॥ होतें बहुत दिवस सांचलें । तें उदारपणें प्रगट केलें । आपुलें निजरूप सांठविलें । मम हृदईं सकळ ॥ ८४ ॥ मग दुजेपणाविण आलुमाळी[5] । गभीर गिरा मंजुळी । अनुवादिजे कृपामेळीं । परम स्नेहें ॥ ८५ ॥ सखया तुवा प्रीतिभावेंकरून । केलें स्तवन अर्चन वंदन । शेवटीं आत्मनिवेदन । आपणासगट ॥ ८६ ॥ नाहंपणें[6] जें जें केलें । तें तें मज सर्वस्वें पावलें । यया सुखें सतोषलें । पूर्ण मानस ॥८७॥ आता जे जे तुझे मनोरथ । ते पूर्ण होतु कां समस्त । स्वानुभवदिनकर प्रस्तुत । वदसी सकळ ॥८८॥ कर्मउपासनायु-

---

१ चौऱ्यायसी लक्ष जीवयोनी समूळ नाहींशा करून. २ नेत्रा रिघोनियां मन । पांगुळे सर्वांगीं ॥. ३ प्रसादरूप. ४ अवधान=एकाकारवृत्तित्व. ५ किंचित्. ६ अहंकाररहित.

क्त ज्ञान । बोलिजे विवेकसह वैराग्यसाधन । वर्णाश्रमधर्म संरक्षून । वेदशास्त्रविधि ॥८९॥ भक्तीची महिमा पदोपदीं । बोलिजे पूर्वग्रंथानुवादीं । सगुणभक्तिउच्छेदीं । न प्रवर्तावें ॥ ९० ॥ पूर्वपक्षेंसीं सिद्धांत । आशंकाप्रतारणयुक्त । स्वानुभव दिनकरवित । बोलें केवळ ॥ ९१ ॥ मितला बोलीं बोलिजे । अर्थप्रमेय न सोडिजे । ऐसें बोलिलें श्रीगुरुराजें । कृपावरदस्नेहें ॥९२॥ तो कृपावरद लाहोनि पूर्ण । दिनकर रामदासीं सुखसंपन्न । देखिलें सद्गुरुरूप परिछिन्न । आता कर्म मांवों ॥९३॥ तरि बोलतां श्रीगुरु कर्मसंस्था । न कळे चि जेथ श्रुत्यर्थी । नइतिपणें केवळ निरास्था । अवगलो मग ॥ ९४ ॥ शेष बोलिकेपणाचिया गरिमा । बोलतां नाटोपे कर्मसीमा । जिव्हा चिरलिया केवळ श्रमा । पात्र जाला ॥ ९५ ॥ शंकर तपियांचा शिरोमणी । त्यास हि न कळे श्रीगुरुकर्मकरणी । मग तो निजनामस्मरणीं । राहिला सुखें ॥ ९६ ॥ याहिवेगळे अनेक । शास्त्रपुराणसमूह इतिहासादिक । त्यांस हि कर्मकरणी निष्टंकें । नाकळे चि ॥ ९७ ॥ ऐसें अकळ नकळे बोलिकेपणें । केवळ निष्कर्म हें चि सदैव करणें । शरणार्त्तांसी सुख देणें । स्वानुभवैक ॥ ९८ ॥ किंबहुना सद्गुरु हें चि निजनाम । निर्गुण निःसंग हा चि स्वरूपसंभ्रम । कर्म तरि अविक्रिय निष्कर्म । प्रसिद्ध करणें ॥ ९९॥ एव पाहातां नाम रूप कर्म । त्रिपुटि ही जयाची निस्सीम । पहा स्वानुभवदिनकराऐसें धर्म । श्रीगुरुप्रसादें ॥१००॥ ग्रंथ आद्यंत संपूर्ण । श्रोतीं कीजैल श्रवण । रामीं दिनकर अभिन्न । रामदासकृपा ॥१०१॥ स्वस्ति श्रीस्वानुभवदिनकरे गुरुशिष्याम्वये प्रथम कळापे सद्गुरुनामव्याख्यानिरूपण नाम पंचम कीर्ण प्रकाशः ॥ ५ ॥ श्रीरामचंद्रसमर्थ ॥

---

१ स्वानुभवाचें विवरण करतांना परब्रह्मस्वरूपाच्या निर्गुण रूपाचें कथन करावें लागेल; परंतु असें करतांना सगुण भक्तीचें महत्त्व कमी करूं नकोस. २ सीं=सह. ३ फसवणूक. ४ परिमित ५ भासला, कळला. ६ महत्त्व. ७ निश्चयेंकरून. ८ आर्त=उत्सुकता. ९ स्वरूपाचें वैभव.

॥ श्रीराम ॥

जय जय देव सकळ श्रोते संत । सर्वज्ञ शिष्ट परम गुणवंत । मोक्षश्रिया मंडित श्रीमंत । श्रीरामदास नमो ॥ १ ॥ जय जय देव महंत । जगद्भ्रम नित्य निरसंत । निजजनभवध्वंस विख्यात । श्रीरामदास नमो ॥ २ ॥ जय जय देव सिद्ध । वेदांतवेद्य प्रसिद्ध । श्रवणसौभाग्यनिधे[२] । श्रीरामदास नमो ॥ ३ ॥ जय जय देव साधो । शरणागतदीनबंधो । अपरोक्षज्ञानैकसिंधो । श्रीरामदास नमो ॥ ४ ॥ जय जय देव महापुरुष । निजाराध्य जगदीश । सर्वोत्तम भजनीय सर्वेश । श्रीरामदास नमो ॥ ५ ॥ जय जय देव दीनदयाळ । शरणागतजनवत्सल । काळकळनातीत[३] केवळ । श्रीरामदास नमो ॥ ६ ॥ जय जय देव स्वयंप्रकाश । स्वसंवेद्य[४] पूर्ण परेश । चळचित्तपानसंपोश[५] । श्रीरामदास नमो ॥७॥ जय जय देव महानुभव[६] । कृत निर्जित मायालाघव । स्वानंदाभ्यतुल वैभव । श्रीरामदास नमो ॥ ८ ॥ जय जय देव सर्वज्ञ । सकळकळानिधि सूज्ञ । निजानुभव दैवज्ञ । श्रीरामदास नमो ॥९॥ जय जय देव परात्पर । वर्ग[७]रहिताक्षय सुधाकर । तापोपशम स्वानुभवदिनकर । श्रीरामदास नमो ॥ १० ॥ एवं संत महंत महापुरुष । सिद्ध साधु दयाळ स्वयंप्रकाश । महानुभव सर्वज्ञ परात्परेश । श्रीरामदास नमो ॥ ११ ॥ वंदू सकळ श्रोतयांस । जे आद्यंत केवळ रामदास । ज्याचिया अपारपणास । वर्णिलें नवचें ॥ १२ ॥ सदैव जे चतुर्वेदाधीत[८] । सकळशास्त्रपारंगत । ज्यां अखंड वेदांत । विचारासी ॥१३॥ जे चतुर्दशविद्यारत्नसमुद्र । जे शांतिसौभाग्यअवनीं नरेंद्र । अभयादि गुणगणेंद्र । सद्गुणनिधि ॥ १४ ॥ जे चतुःषष्टी[९]कळाविद । जे अष्टसिद्धींचे सिद्ध वरद । अमानित्वादि[१०] गुणभेद । आका-

---

१ नष्ट करणारा. २ निधि ? ३ काळाच्या गणतीच्या पलीकडचा. ४ ज्ञानस्वरूप ५ चचल चित्ताचें प्राशन करून पुष्ट झालेला. ६ महानुभाव= ब्रह्मानुभवी पुरुष. ७ वर्ग=कलंक. ८ वेदाचें अध्ययन केलेले. ९ चौसष्ट, १० निरहंकारादि.

रिले जिहीं ॥ १५ ॥ पाहातां जे केवळ अदंभ । अहिंसेचे परम घालंभ । जे क्षमारूप स्वयंभ । आर्जवें वोतले ॥ १६ ॥ गुरुसेवेसी जे आगर । तें चि जयाचें माहेर । सहनशीळतेचे आधार । मूर्तिमंत जे ॥ १७ ॥ अतरीं ज्ञानें शुचिष्मंत । मृदुदकें बाह्यमळ क्षाळित । जे अतर्बाह्य शुचिर्भूत । सर्वदा शुद्ध ॥ १८ ॥ जैसा मेरु सदैव सधीर । तैसें जयाचें मानस स्थिर । आत्मनिग्रहीं परम सादर । अखंडित जे ॥ १९ ॥ दशेंद्रियात्मक जो जो व्यापार । तो तो करणें जयां अति वैराग्यपर । विधिनिषेधादि विचार । समायुक्त चालणें ॥२०॥ नित्यनैमित्यादि कर्मीं सादर । जया काम्य निषिद्धीं अनादर । असोनि केवळ अनाहकार । सदैव जे ॥ २१ ॥ जन्म मृत्यु आणि जरा । व्याधिदुःखदोषादि संसरा । हे पुढें चि असती जों सैरा । तों अनुदर्शनीं जे सावध ॥ २२ ॥ पुत्रदारागृहादिक । येथ असोनि अनास्था सम्यक । समता जयाची निष्टक । आपपरीं ॥ २३ ॥ जे यजनादि षट्कर्मी तत्पर । वर्णाश्रमयोगीं जे सादर । स्वधर्मरक्षणीं चतुर । सर्वज्ञत्वें ॥२४॥ सदुपासनेचे आचार्य । विधिविधानयोगें जे आर्य । सत्कर्माचे केवळ सूर्य । अति तपें तेजस्वी ॥ २५ ॥ विज्ञानाचे तरि जे निगम । शांतीचें वसतें धाम । जयां भक्तीचें वालभ परम । अपारपणें ॥ २६ ॥ सत्यप्रिया जे श्रीमंत । विरक्तियोगें भाग्यवत । ज्ञानाचे मूर्तिमत । अवतार जे ॥ २७ ॥ जैसा सूर्य सर्वांगें सोज्वळ । तैसें यश जयांचें निर्मळ । मोक्षश्रीआळकृत केवळ । अनस्युत ॥ २८ ॥ येथ योजावा विष्णूचा दृष्टात । तरि तो केवळ पदार्थलक्ष्मीवत । म्हणोनि सायोज्य-लक्ष्मीयोगें जे समर्थ । त्यासी साम्यता न ये ॥ २९ ॥ जयाचिया प्रतापासी । तुळणा न दिसे निश्चयेंसीं । औदार्य तरी विश्रांतीसी । आलें जेथ ॥ ३० ॥ सकळां ऐश्वर्याचें जें कारण । तें जयांपासीं असाधारण । गभीरता अति गहन । देखों जेथ ॥ ३१ ॥ जे ज्ञानी

---

१ आवड, प्रीति. २ स्थान ३ मृत्तिका व जल यांचे साह्यानें. ४ कर्म करा ठिकाणचें ममत्व टाकून. ५ एका मागून एक येणाऱ्या आपत्ति. ६ अफाट. ७ अनुस्यूत, अखड

असोनि परम भक्त । पंडित असोनि अति विरक्त । सर्वस्वें उदास परि आसक्त । परमार्थविषईं ॥ ३२ ॥ जे वक्तृत्वीं परम चतुर । श्रवणीं जे अति सादर । गुरुभजनीं आदर । बहु जया ॥ ३३ ॥ जे स्वसुखानुभवी अखंडित । निजप्रताप सौरस्यंमंडित । जयांपासीं रमा आळंकृत । विष्णुसह ॥ ३४ ॥ वरि सारासारविचारें । नित्यानित्यविवेकपरें । ऐसीं अध्यात्मशास्त्रें । श्रवणयुक्त जे ॥३५॥ जेथ भक्ति उपासना ज्ञान । वैराग्य विवेकयुक्त गहन । स्वकर्म धर्म संरक्षून । चालणें जयां ॥३६॥ गुरुभजनीं जे सप्रेम । गुरुसेवा जया नित्यनेम । मुखीं उच्चार जया निजनाम । श्रीगुरु ऐसें ॥३७॥ जे गुरुवाक्यें सदा सपोषें । आत्मानुसंधानीं परम दक्ष । नित्य करणें जयां पूर्वपक्ष । सिद्धांतयुक्त ॥ ३८ ॥ जे सर्व धर्मांचे अवतार । अर्थानुवादीं जे सादर । निष्कामकामीं तत्पर । मोक्षरूप जे ॥ ३९ ॥ जयांचिया दर्शनमात्रें । तीर्थें होतीं परम पवित्रें । ज्यांचिया निवासें सत्क्षेत्रें । विश्वमान्य जालीं ॥ ४० ॥ जयाचें होतां चि दर्शन । सर्व पापा होय क्षालन । बाह्यांतर शुचीपण । सर्वांग होय ॥४१॥ स्पर्शनाचा तरि अगाध महिमा । त्यासी देयासी न दिसे उपमा । म्हणोनि तीर्थें सांडूनि स्वगरिमा । सतस्पर्शा इच्छितीं ॥ ४२ ॥ सहजें हि करितां संभाषण । श्रवणें होतीं जड जीव पावन । मां प्रबोध करितां न तरे कोण । शरणागत ॥ ४३ ॥ ऐसे जे सर्वांग श्रोते । जे त्रैअवस्थातीत जागते । जयाचें अवधान संपुरतें । आब्रह्मपर्यंत ॥ ४४ ॥ जे साक्षात्कारी[१] महापुरुष । प्रत्यक्ष अवतारी स्वयप्रकाश । जयांचे वाणीनें स्वयें जगदीश । सारासार बोलत ॥४५॥ जे महानुभव योगी । जे सर्वसंगपरित्यागी । स्वाश्रमधर्मी असोनि वीतरागी । स्वरूपानुभवी जे ॥ ४६ ॥ ज्यांचें बोलणें सप्रचीत । स्वानुभवाचें यथार्थ । स्वप्रत्ययें नाना शास्त्रार्थ । विचारीत जे ॥४७॥ कर्मकांड उपासनाकांड । त्याहूनि प्रचंड ज्ञानकांड । सारूनि पूर्वपक्षाचें बंड । सिद्धांत स्थापिती जे ॥४८॥ पूर्वपक्षाचा आद्यंत समजोनि भेद । सिद्धांतस्थापक जे निर्व्यवाद ।

१ सुरसत्व किंवा प्रसादयुक्त. २ पुष्ट.

महत्सिद्धांतरूप होऊनि प्रसिद्ध । वर्तणें जयां ॥ ४९ ॥ विचार-चचूचे राजहस । सारासारक्षीर निर्दोष । निवडूनि ब्रह्मामृत सुडशे । ग्राहक जे ॥ ५० ॥ ऐसे संत महत साधु सिद्ध । सज्जन महापुरुष जे प्रसिद्ध । श्रोतेसमूह नानाविध । कळासूज्ञ जे ॥ ५१ ॥ एवमादि सकळ श्रोते सभानायक । जे वक्तृत्वपूर्णचद्र क्षीराब्धि सम्यक । पूर्णाव-लोकनें उचंबळती निशक । सर्वकाळ जे ॥ ५२ ॥ ऐसयां सकळ-सर्वांग श्रोतयासी । दडवत सर्वांगें निजभावेंसी । ज्यांचया श्रवणावधानासी । वार्णिलें न जाय ॥ ५३ ॥ जे या विश्वाचे परम सोयरे । विश्व जयांक-रितां पावन खरें । जयाचिया श्रवणादरें । ग्रथगरिमा ॥ ५४ ॥ अहो जरी हे श्रोते सज्जन नसते । तरी नाना ग्रंथसमूह कोण आइकते । ह्मणौनि वेद शास्त्रें पुराणें समस्तें । याचयायोगें समर्थें ॥ ५५ ॥ जयां-चया अव्यग्र सावधानपणें । सर्व ग्रथोक्ति जगमान्य होणें । ह्मणौनि वक्तया-परिस अनत गुणें । अधिक श्रोते ॥ ५६ ॥ ऐसें आवडतेनि प्रेमभरें । वक्ता इतुकें जव बोलों न सरे । तव श्रोते श्रीमत ह्मणती बारे । स्तवनीं प्रवाहसी[2] कां ॥ ५७ ॥ अरे हें स्तवन नव्हे अमृत खरें । उचबळौनि प्रेमतुषारें । श्रोतयांच्या मनोवल्ली आदरें । जीवविल्या येणें ॥ ५८ ॥ सखया तुझीं वाक्यें परम रुचिरें । आइकतां लागतीं मधुरें । तुवां बोलावें उत्तरोत्तरें । ऐसें चि गमे ॥ ५९ ॥ परि आमुचें स्तवन पुरे आतां । पुढे अनुवादें ग्रथ परमार्थता । परमार्थयोगें आह्मा समस्तां । होईल परम सौख्य ॥ ६० ॥ तुझें बोलणें चि आधीं गोड आर्ष[3] । त्याहीवरि परमार्थ अध्यात्मविलास । परि नवरसमडित सुरस विशेष । अष्टभावान्वित ॥ ६१ ॥ तरि सखया आतां विलब न करीं । परमार्थ-ग्रथअनुवादें झडकरी । स्वानुभवदिनकराचे परी । शब्द बोले निर्मळ ॥ ६२ ॥ इतुकें सतकृपेचें वरदान । लाहोनि दिनकर सुखसपन्न । स्वानुभवदिनकरऐसा परिछिन्न । ग्रथानुवादेल ॥ ६३ ॥ तो संतीं परम प्रीतीचया योगें । अव्यग्र निजावधान सगें । आइकोतु श्रोते सर्वज्ञ

१ ( ? ) सुदक्ष, ज्ञाता. २ वाहवतोस. ३ आर्ष, पवित्र.

सर्वांगें । ह्मणे दिनकर ॥ ६४ ॥ आतां परम प्रीतीचया योगें । कुळदैवत वदू सर्वांगें । तरो तयाचया सगें । भवसमुद्र हा ॥ ६५ ॥ जो सदैव देह जेजुरीनिवासिया । माया ह्माळसाविलासिया । तया आत्मराज खंडेराया । नमन सद्भावें ॥ ६६ ॥ सज्ज करूनि विवेकपर घोडा । हातीं घेऊनि सतेज ज्ञानखडा[1] । कामक्रोधादि मणिमल्लु होडा[2] । वधिले ससैन्य ॥ ६७ ॥ उधळलें प्रेमभडार । उभे सप्तकोटी गणपरिवार । जे दैवी संपदेचे नर । बळकटपणें ॥ ६८ ॥ ऐसें आद्यत घवघवीत ध्यान । देखोनि दिनकर सुखसंपन्न । लाहोनि निजकृपावरदान । स्वानुभवदिनकरीं सतृप्त ॥ ६९॥ आतां निजानदें ययावरी । वदू सद्भावें कुळेश्वरी । जे मूळमाया मोक्षपुरीं । असे सदैव ॥ ७० ॥ आदिशक्ति मूळमाया चित्प्रकृति । वोतली केवळ त्रिगुणपचभूर्ती । अष्टागयुक्त जयेची आकृति । विलसे मूळपीठीं जे ॥ ७१ ॥ जे सगुण स्वरूपें अति सुंदर । चांपे गोरटी सकुमार । रम्य कंचुकी कासे चिदबर । सुवर्णाभरणें शोभती ॥ ७२ ॥ ऐसी आदिमाया कुळस्वामिनी । दिनकरें सामावली[3] हृदयभुवनीं । आतां स्वानुभवदिनकराऐसी वाणी । भवानी स्वयें वदेल ॥७३॥ तो प्रसग असे अति नागर[4] । ग्रंथ केवळ स्वानुभवदिनकर । श्रोते सज्जनीं होऊनि सादर । श्रवण कीजे आदरें ॥ ७४ ॥ भृगुवंशीं जमदग्नि रेणुका सति । त्याचे उदरीं फरशरामाकृति । जगदीशें षष्ठमावतार उन्नति । घेतली दुष्टदलनार्थ ॥ ७५ ॥ सहस्रार्जुनें मायबापां गाजिलें । मातृशरीरीं येकवीस घाय केले । ह्मणौनि येकवीस वेळ निक्षत्री केलें । महिमंडळ फरशरामें ॥ ७६ ॥ आणि सहस्रार्जुन सपरिवारीं मारिला । त्याचिया धडाचा चौंडका[5] केला । मातापुरीं फरशरामें गोंधळ घातला । ये माये ये माये बोभाइलें ॥ ७७ ॥ तें चि नाम अद्यापि महा गजरीं । भक्त वाखाणिताती परोपरी । ते भृगुवंशीचे वत्सगोत्री असती भृंगारीं । ज्योतिषी उपनाम पाठक ॥ ७८ ॥ त्यांची भक्ति देखोनियां उत्कट ।

---

१ ज्ञानरूपी दुधारी तरवार २ होड=पैज? हुडा=बुरुज? ३ साठविली. ४ नांगला. ५ चौंडकें=गोंधळी लोकांचें एक वाद्य.

आदिमाया सोडूनियां मूळपीठ । सारोळां अधिष्ठान अति निकट । भक्त-सात्यतेकारणें ॥ ७९ ॥ तें भृंगारीहूनि अग्नि दिशेसी । सारोळें असे क्रोश त्रयेसीं । तेथें अधिष्ठान धरणें आदिमायेसी । निजभक्तसंरक्षणा-निमित्य ॥ ८० ॥ ते आदिमाया विश्वसजीवनी । दिनकरें पूजिली सकळ उपचार योजूनि । मग प्रसन्नता निज हृदयभुवनीं । सामाविली येकसरें चि ॥ ८१ ॥ तेणें स्वानुभवदिनकरीं आद्यंत । जाली मति अत्यत विस्फारित । ग्रथरचना जे होईल प्रस्तुत । ते श्रवण कीजे संतीं महतीं ॥ ८२ ॥ दिनकर रामदासीं रिघोनि शरण । स्वानुभवदिनकरीं निरूपण । आद्यत होईल तें श्रोतीं श्रवण । निजकृपां केलें पाहिजे ॥ ८३ ॥ स्वस्ति श्रीस्वानुभवदिनकरे गुरुशिष्यान्वये प्रथम कळापे संत-श्रोतेवक्तृकुळदैवतस्तवननिरूपणं नाम षष्टम कीर्ण प्रकाशः ॥ ६ ॥

---

## ॥ संसारलक्षणनाम कलाप द्वितीय ॥ २ ॥

### ॥ श्रीराम ॥

जय जय जी सद्गुरुराया । अनाथजनकैवारिया । साष्टांगें दंडवत तुझिया पायां । देहेंविणें अखड ॥ १ ॥ जय जय जी आनंदकंदा । मूळपुरुषा परमानदा । शरणागतजनवरदा । करुणालया ॥ २ ॥ जय जय जी कृपामूर्ति । मंगळधामा सुखसंवित्ति । दयानिधि कैवल्यपति । भक्तवत्सला ॥ ३ ॥ जय जय जी आदिपुरुषा । सर्वात्मक सद्गुरु सर्वेशा । पूर्णानदपूर्ण परेशा । परमानदा ॥ ४ ॥ जय जय जी श्रीगुरु-नाथा । मोक्षश्रीसपन्न समर्था । स्वामी स्वानुभवदिनकर सर्वथा । सरतौ कीजे स्वरूपीं ॥ ५ ॥ जी सरता कीजे ऐसें ह्मणतां । येथें चि येवों पाहे अहता । तें जेवि सांयखडांचें बाहुलें नाचतां । प्रार्थिजे सूत्रधारातें ॥ ६ ॥ किं जेवि ल्हारिया ह्मणती सागरासी । आह्मांसी आणावें जी रूपासी । तंव आपण नामरूपकर्मेसीं । निजरूप समूळीं ॥ ७ ॥

---

१ देहवीण लोटांगणी । तया प्रभूसी ॥. २ कृतकृत्य. ३ (?)

किं ते सूर्यासी प्रार्थूनि दूजेंपणें । आह्मांसी प्रकाशा ह्मणती कोणें । अथवा कळा चंद्रासी ह्मणे । मज वाढवीं तू ॥८॥ तेवि स्वानुभवदिनकरीं सहज । विरुढे सरतेंपणाचें बीज । मग येकसरें चि निजगुज । गुरुकृपा लाहोणें ॥९॥ तिया गुरुकृपासविंत्तिसुखें । सरतेंपण सहज चि पारखें । जेवि कां आकाशेंसी धावोनि हारिखें । आळगी नीळिमा ॥१०॥ तेवि जी गुरुवर्या तुमतें । मी प्रार्थित काकुलती बहुतें । किं स्वानुभवदिनकरालागि सरतें । स्वरूपीं कीजे ह्मणौनि ॥ ११ ॥ तरि स्व ह्मणिजे आपला आपण । अनुभव घेणें स्वरूपीं समरसोन । हें हि ह्मणतां वेगळेंपण । आधीं असलें पाहिजे ॥ १२ ॥ लवणें शुद्ध व्हावया लागून । समुद्रीं करूं गेलें जव स्नान । तव आपण चि नाहीं मग शुद्धपण । आणील कोठुनी ॥ १३ ॥ तेवि स्वानुभवदिनकरीं समरसोन । दिनकर जाला सुखसंपन्न । रामदासकृपानुभवीं अभिन्न । सहजस्थिति ऐक्यत्वें ॥ १४ ॥ ऐसा सहजस्थितीचिया सुखांत । शिष्य स्वानंदें डुल्लत । अष्टभावेंसीं लोटत । श्रीगुरुचरणीं ॥ १५ ॥ तव श्रीगुरु कृपाद्रवलेनि चित्तें । मस्तक कुर्वाळूनि निजहस्तें । बा रे आपुलिया सुखस्वानुभवातें । आठऊनि बोलें ॥ १६ ॥ ऐसें लाधोनि श्रीगुरुकृपामृत । शिष्य स्वानुभवदिनकरीं डुल्लत । मग सद्भावें होऊनि विनित । बोलों आरंभिलें ॥ १७ ॥ ह्मणे जी जी स्वामी कैवल्यपति । मंगळधामा कृपामूर्ति । संसारश्रांतांची विश्रांति । शरणागतवत्सला ॥१८॥ देवा मी तुज शरणागत । अनन्यभावें दंडवत । माझी फेडावी जी प्रस्तुत । संसारभ्रांति ॥ १९ ॥ जी मी संसारश्रमें श्रमलों । त्रिविधतापें पोळलों । स्वामी तुज शरण आलों । कृपानिधि ॥ २० ॥ ऐकोनि शिष्याची करुणा । कृपा द्रवला गुरुराणा । ह्मणे बा रे तू कवणकवणा । संकटें दाटलासी ॥२१॥ तुजलागीं कवणें गांजिलें । तुज काइसें संकट पडिलें । कोणाचें निर्वाण मांडलें । तुज चिंता काइसी ॥ २२ ॥ संसाराचे काइसे क्लेश । त्रितापाचे कोणते आयास । ऐसें ऐकतां कृपा-

---

१ वाढतें, विलसतें. २ एकदम. ३ लाभणे, ४ कृपाळू. ५ कठिण प्रसंग.

वचनास । शिष्य जाला सगद्गद ॥ २३ ॥ मग बोले करुणावचनीं । जी या संसाराची कहाणी । सांगितली नवजाय वाणीं । असंभाव्यपणें ॥ २४ ॥ जेवि कां मृगजळाचे पूर । हेलांवे धांवती अपार । तेथ जीवनाचा विचार । कदापि न दिसे ॥ २५ ॥ का ते गंधर्वनगरीचे हुडे । अपार उठताती जिकडे तिकडे । क्षणयेक पाहावें जवं निवाडें । तवं नाहीं चि होये ॥ २६ ॥ तेवि हा संसार माइक । वरिच्यावरि अवघा काल्पनिक । ऐसा असोनि ब्रह्मादिक । वेढां लाविले ॥ २७ ॥ सुर नर उरग यक्ष किन्नर । गण गंधर्व विद्याधर । खग नग म्हीस वानर । संसारें गांजिले ॥ २८ ॥ या संसाराचिये गुंतीवेगळा । प्राणी सुटला जाय विरळा । चराचर विश्वीं घेतां धुंडाळा । न दिसे कोणही ॥ २९ ॥ ब्रह्माआदिकरूनि समस्त । पिपीलिकादि जीव अनुरेणांत । संसारीं गुंतले निभ्रांत । सकळ प्राणी ॥ ३० ॥ अहो जो संसारासी प्राणी आला । तो सर्वे चि स्वार जाला । जेवि जीवनीं तरंग उमटला । तो सर्वे चि हारपे ॥ ३१ ॥ या संसारयोगें विश्रांति । न देखों कोण्हासी त्रिजगतीं । थोर थोर राजे चक्रवर्ति । समुद्रवळयांकित ॥ ३२ ॥ पाहातां याची उभारणी । तव असंभाव्य दिसे नयनीं । सर्वे चि हारपे गगनीं । आभाळ जैसें ॥ ३३ ॥ किं तो रंक बैसोनियां सिंहासनीं । सकळ लोक प्रजा सैन्य मेळऊनि । नाना सोहळे भोगितां स्वप्नीं । अवसेति चेइला ॥ ३४ ॥ अथवा तें नभीं इंद्रधनुष्य । देखिलें अति विशाळ सादृश्य । क्षणेक पाहातां अदृश्य । तत्काळ होय ॥ ३५ ॥ तेवि हा संसार असंभाव्यपणें । कारितां वाटे ब्रह्मांड ठेंगणें । सेवटीं दांत विचकूनि केविलवाणें । जावें येकलें चि ॥ ३६ ॥ नाना सायासें संपति मेळऊनि । शरीर पोसावें सुखालागूनि । तव अकस्मात येऊनि । धका बैसे काळाचा ॥ ३७ ॥ गृह धन पशु नाना संपति । क्षणार्धें

---

१ नवचे, जातं नाहीं. २ असंभावना=सत्य वस्तूचें सत्यत्व किंवा असत्य वस्तूचें असत्यत्व न पटणें, अशी जी मनाची साधारण प्रवृत्ति असते तांमुळें. ३ लाटा. ४ आकाशांतील ढगांचे. ५ बुरुज, किल्ले. ६ भुलविले ७ संसार ह्मणजे सर्वांचि स्वार ।. ८ अभ्र. ९ अवसात=अकस्मात्. १० जागा झाला.

पाहातां नाशती । स्त्री पुत्र कन्या सकळ हि अर्ती । कोण्ही नव्हे कोण्हाचे ॥ ३८ ॥ जये स्त्रीलागी नाना सायास । आजन्म केले बहुत आयास । तिचे पुरऊनि नाना हव्यास । मना वाटले ते ॥ ३९ ॥ जयेलागीं केले घातपात । चोरीमारी सेवा प्राणांत । करूनि उंपार्जना बहुत । मन रक्षिलें तियेचें ॥ ४० ॥ जयेकारिता आधिव्याधि । दुखणींबाहाणी नाना औषधी । स्वदेशीं विदेशीं प्राणसंधि । जीलागी सोसिल्या ॥ ४१ ॥ ऐसे क्लेश सोसूनियां आजन्म । जयेचे केले नाना सभ्रम । वस्त्रें भूषणें अळंकार उत्तम । केले मनासारिखे ॥ ४२ ॥ इतुकें करूनि जैसें श्वान । लुडबुडीत पुढें येऊन । सुहृदांसीं वसवसी तीलागून । मन रक्षी तियेचें ॥ ४३ ॥ तियेसी कोण्ही बोलतां वचन । प्राण देऊं धांवे आपण । मायबापासी निर्भत्सून । छळणा करी ॥ ४४ ॥ जिया नवमास वाहिला पोटीं । जन्मोनि वाढविला नाना संकटीं । तियेतें गाळिप्रदानें देऊनि सेवटीं । वेगळा निवे स्त्रीछंदें ॥ ४५ ॥ बापासी मारावया धांवे । तुच्छ मानी भाऊबद आघवे । कपटबुद्धीनें करूं धांवे । घातपात तयांचे ॥ ४६ ॥ इतुकें हि करूनि तत्वता । स्त्रीसर्गें सुख काय तें विचारिता । कामसुखावांचूनि सर्वथा । क्लेश चि आंघवे ॥ ४७ ॥ तया कामसुखाची गोष्टी । विचारितां सूक्ष्मदृष्टीं । क्षणभंगुरत्वें तत्काळ मन उठी । वीट घेऊनि तयाचा ॥ ४८ ॥ मासीं जव पाखडी पांख । तव सरोनि जाय विषयभोगसुख । सर्वें चि क्षणमात्रें असभाव्य दुःख । भोगातीं होय ॥ ४९ ॥ जया रतिसुखाकारणें । स्त्रियेचें सर्वस्व सोसणें । तें सुख क्षणभंगुरवाणें । बोलतां लाज वाटे ॥ ५० ॥ असो इतुकें करूनि स्त्रीचें वालभ । किमपि चुकतां तत्काळ क्षोभ । पाहाता हें आयुष्य परम दुर्लभ । हें हि वेची तीलागी ॥ ५१ ॥ ते चि स्त्री यासी विपत्तिकाळीं । नाना दुर्वाक्यवचनें छळी । ह्मणे पाहा हो यासी कदाकाळीं । मरण चि न ये ॥ ५२ ॥ जरि येक-

---

१ छंद. २ प्राप्ति, मिळकत. ३ प्राण जाण्यासारखे प्रसंग. ४ संपूर्ण. ५ प्रीति.

दांचा हा मरता । तरि याचा माझा समध तुटता । माझा जीव तन्ही निसुर होता । याचिया कष्टांमेण ॥ ५३ ॥ क्षणक्षणा दुर्वाक्यवचन । तयासी बोले निर्भत्सून । ह्मणे कधीं मी यापासून । सुटेन येकदांची ॥५४॥ ह्मणौनि आपटी भूमीवरी हात । जाजावोनि आक्रोशें रडत । नवस सायास बोलत । नाना प्रकारिचे ॥ ५५ ॥ असो ऐसी ते परम क्लेशी होतां । तव हा मरण पावला अवचिता । मग आडवा घेऊनि तत्वता । शोक करी आक्रोशें ॥ ५६ ॥ ह्मणे जैंपासूनि सग पडिला । तैंपासूनि सुखलेश नाहीं देखिला । परि सेवटीं येवढा लाभ जाला । मस्तकवपनाचा ॥५७॥ याचिये बैसोनि पोटीं । जन्में देखिली नाहीं सुखगोष्टी । विरूपाची धणी सेवटीं । कपाळीं होती ॥ ५८ ॥ ह्मणौनि रडे पडे आक्रंदे । शोक करी नाना छंदें । केंसासाठीं जल्पवादें । इंबरडा ह्मणे ॥ ५९ ॥ आतां कैंची वेणीफणी । आतां नाहींत लुगडीं लेणीं । न्हाण नगबजे पापिणी । भोगेल कैंचें ॥ ६० ॥ आता मज कैंचे भोगविळास । चिरा पडिला माझिया काजळकुंकास । ऐसी आपुलिया नाना भोगास । परोपरीं गौरवी ॥ ६१ ॥ असो आता स्त्रीविलास सांगतां । जन्म अवघा न पुरे सर्वथा । ह्मणौनिया ससारसगें गुरुनाथा । परोपरी विपत्ति ॥ ६२ ॥ जे स्त्रियेसी जन्में पाळिलें पोसिलें । सेवटीं तिनें ऐसें केलें । अहा देवा आयुष्य खर्चलें । व्यर्थ चि अवघें ॥ ६३ ॥ या संसारसंगें क्लेश पाहोन । दिनकर रामदासीं रिघाला शरण । तेणें स्वानुभवदिनकरीं निमग्न । स्वानदसुख उद्धावे ॥ ६४ ॥ स्वस्ति श्रीस्वानुभवदिनकरे गुरुशिष्यान्वये द्वितीय कळापे ससारदुःखस्त्रीसुखवर्णननिरूपणं नाम प्रथम कीर्ण प्रकाशः ॥ १ ॥

---

॥ श्रीराम ॥

स्त्रियेची जाली ऐसी निराश । आतां पुत्र तऱ्ही येईल कार्यास । ह्मणौनि केले नवस सायास । बहुतां प्रकारें ॥ १ ॥ टोंचिले गळ

---

१ निष्काळजी २ आरोळी. ३ पर्दा. ४ तृप्ति ५ निंदाव्यजक शब्दांनीं. ६ दागिने वगैरे. ७ प्रगट होये.

वाहिलीं भळंदीं । राहाडीं चालोनियां निज छंदीं । कुलुपें टोंचूनि जि-
व्हा छेदी । खोडे बेडी परोपरी ॥ २ ॥ घातल्या इष्टेचिया थापटिया ।
देवदेव्हारे पुसणें आर्तिया । भोग डाका भाका बायेणियां । यात्रा नवस
॥ ३ ॥ ऐसिया नाना क्लेशें पुत्रोत्पत्ति । करूनि वेंचिली बहुत संपत्ति ।
विद्याभ्यास सिकऊनि नाना युक्ति । शाहाणा केला ॥ ४ ॥ व्रतबंध
करूनि विवाह केला । महोत्छायें थोरपणासी आला । सेवटीं स्त्री घेऊनि
वेगळा निघाला । मायबापें सांडिलीं ॥ ५ ॥ धेडा बोलाची जाली
लिरांणी । क्षणक्षणां निर्भर्त्सी दुष्ट वचनीं । कैंचें वस्त्र कैंचें अन्नपाणी ।
नाचों लागे स्त्रीछंदें ॥ ६ ॥ पितरें पडती नाना आपदीं । अन्नासाठीं
फिरती बिदोबिदीं । पुत्र प्रतिपाळी परम आनंदीं । सासुसासऱ्यासी ॥ ७ ॥
कोड करी मेहुण्यामेहुणीचें । त्याहीपरिस धाकुटे सोलीचें । वालभ सो-
यऱ्याधायऱ्यांचें । परोपरीं करी ॥ ८ ॥ मातापितरें मागता अन्न ।
त्यांजवरि धांवे वसवसून । मेलिया मग जवळी रडत बसोन । ठेवणें
पुसे पितयासी ॥ ९ ॥ ह्मणे तुह्मीं जन्मवरी जोडिलें । तें नेऊनि
कोणासी दिधलें । किंवा भूमीमध्यें असे ठेविलें । तें सांगा मज झडकरी
॥ १० ॥ परोपरीं गोरऊनि रडे । ह्मणे कैसें नागविलें देहांचेनि उजेडें ।
मग फुदकुदों उरावरी धोंडे । हाणहाणों घेतसे ॥ ११ ॥ ह्मणोनि सां-
गावया हें चि कारण । पुत्रसौख्याची एवढी नागवण । ज्यासी पुत्र
नाहीं तो ह्मणे अपुत्रपण । कधीं फिटेल आमुचें ॥ १२ ॥ कधीं पाहेन
मी पुत्रमुख । ह्मणोनि अखंड उदरीं वाहे दुःख । पुत्र असता नसतां
अवश्यक । दुःखमूळ सर्वथा ॥ १३ ॥ यावरि आणिक संसारअवस्था ।
सांगतां अति दुर्घट सर्वथा । गृहधनाचे क्लेश विचारितां । हृदयस्फोट
होतसे ॥ १४ ॥ गृह केलें अति सुंदर । बत्तीस खणी दामोदेंर । द्रव्य
खर्चूनि अपार । माहाल बांधले ॥ १५ ॥ खाणूनि पाया उदकपर्यंत ।
वरि काम केलें अचुंबित । आजन्मपर्यंत कार्य चालत । नित्य नूतन
॥ १६ ॥ तयासी द्रव्य पाहिजे ह्मणोन । केलें असमाव्य ढालगजेपण ।

१ वायदा. २ खर्च केली. ३ अविच्छिन्न भाषण. ४ श्रेष्ठता, रेलचेल ५ मेहुणीचे
६ भर दिवसा. ( देहन्दिवस. ) ७ रत्नखचित मंदिर. ८ परिपूर्ण. ९ सढळपणा.

घेतलें बहुत लोकांचें ऋण । अधिकार थोर केले ॥१७॥ तंव ते व्यापार बैसले । मामले आंगीं सेकले । ऋणाइतीं धरणें घेतलें । तेणें जाली फजिती ॥ १८॥ तें धणियांसी कळलें । तेणें धरूनि कैद केलें । नाना विपत्ति पाय घातलें । खोडा बेडी कारागृह ॥१९ ॥ अथवा ते मार्गीं वस्त येतां । घाला पडिला अवचिता । किंवा ते सेत कुळवाडी कारितां । आंत सेकलिया ॥ २० ॥ तेणें दु:खें जालीं बहुत । धरणें बैसती घरीं ऋणाइत । मग करूनि शस्त्रघात । कां विषप्रळय ॥ २१ ॥ मग गृह जेथील तेथें राहिलें । द्रव्य जिकडे तिकडे बुडालें । स्त्रीपुत्रादि सकळ लोक थुकिले । अरे हा चांडाळ ह्मणौनि ॥ २२ ॥ जवळी जोंवारि होतें द्रव्य । तव भोंवतीं मिळालीं असंभाव्य । जो जो विषय जयासी सेव्य । तो तो घेती आपुला ॥ २३ ॥ मग यासी होतां चि अंत । स्त्री केंसासाठीं रडत । पुत्र द्रव्यठेवणें पुसत । कोठें आहे ह्मणौनि ॥ २४ ॥ लेकी हातें बडविती स्वउदर । पीटिती भूमीवरी शिर । न्हाण चोळी माहेर । बुडालें आजि ॥ २५ ॥ जावाई थोर थोर । ह्मणती कोपला शंकर । आमुचा सणवार । अंतरला येथूनि ॥ २६ ॥ व्याही आणि विहिणी । रडती स्मशानीं । आह्मांसी श्रावण-सणीं । नेईल कोण ॥ २७ ॥ नातु पणतु सुना । ह्मणती नारायणा । आमुच्या निर्वाणा । पावलासी ॥ २८ ॥ इष्टा मूत्र बळस । टाकिता रात्रिदिवस । खोकितां झोंपेस । नेणों कधीं ॥ २९ ॥ ऐसीं तियें रडतीं । आपुलिये स्वार्थी । पारि या प्राण्याची खति । नलगे कोण्हा ॥ ३० ॥ ऐसें ऐकता शिष्यवचन । सद्गुरु अंतरीं कळवळूनि पूर्ण । कृपावलोकनेंकरून । बोलते जाले ॥ ३१ ॥ तरि कां प्राण्या भुल-लासी । माझें माझें जल्पसी । अंत आलया कोणासी । संगें नेसील पैं ॥ ३२ ॥ ह्मणौनि होईं सावधान । जव नाहीं आलें मरण । भजें नारायण । सोहंभावें चि ॥ ३३ ॥ अरे जाणता जाणतां । कां होसी

१ योग्यतेपेक्षां अधिक. २ सावकारांनीं. ३ गावच्या अधिकाऱ्यास. ४ ऐवज ५ उदीमधंदा ६ आंतबट्याचा व्यापार झाला. ७ वल्गना करितोस.

नेणेता । सोडूनिया स्वहिता । विषयस्वार्थें करूनि ॥ ३४ ॥ आतां संसार हा दुस्तर । त्यजूनिया अघोर । ह्मणे दिनकर । श्रीरामदास ॥ ३५ ॥ स्वस्ति श्रीस्वानुभवदिनकरे गुरुशिष्यान्वये द्वितीय कळापे प्रपचदुःखवर्णननिरूपणं नाम द्वितीय कीर्ण प्रकाशः ॥ २ ॥

---

॥ श्रीराम ॥

तवं शिष्य चमत्कारोनि स्वानुभवें । ह्मणे जी जी स्वामी वाक्य परिसावें । मज स्वानुभवदिनकराऐसें करावें । कृपानिधि कृपाळुवा ॥ १ ॥ मज तारि या ससाराभेण । उमस[1] न पडे येक क्षण । देखिलें गर्भवासीं दुःख दारुण । तें न बोलवें जी ॥ २ ॥ जालया मातृपितराचा सभोग । जठरीं रेतरक्ताचा होय संयोग । दिवसमासें गर्भांग । वृद्धि पावे शनैःशनै ॥ ३ ॥ दिवसेंदिवस गर्भ वाढे । फुटती हातपायांचे ओंगरडे । आपाद्मस्तकपर्यंत निवाडें । गर्भांग निफजे ॥ ४ ॥ तव मातेसी डोहळयांचा आकांत । तेणें कट्वाम्लतिक्षणें आंग पोळत । भोंवतीं आंतडीं लवथवित । इष्टामुत्रीं पचतसे ॥५॥ गर्भासी बांधलें सेवरेंत । नाकीं तोंडीं रिघती जत । तेणें कासावीस बहुत होत । घाबिरेंपणें निर्बुजे ॥ ६ ॥ देहा लागले षड्विकार । त्यांचा सांगिजैल विचार । संभवापासूनि मृत्यु होय तवंवर । षड्विकारीं व्यापिलें ॥७॥ अस्तियंते जायते वृद्धेते । विपरिणमते अपेक्षीयते विनश्यते । एवं षड्विकारेंसीं प्राणीमात्र तें । व्यापिलें दिसे ॥८॥ अस्तियंते ह्मणिजे गर्भीं राहणें । जायंते ह्मणिजे तें जन्मणें । वर्द्धते ह्मणिजे वृद्धीसी पावणें । शरीर हळु हळु ॥ ९ ॥ विपरिण ह्मणिजे तारुण्यपण । अपेक्षीयते तें वार्द्धिक्य[2] जाण । विनश्यति तें मरण । एवं हे षड्विकार ॥ १० ॥ असो मग अंतरीं गजबजोन । प्राणी गर्भीं सोहंभावें करी स्मरण । तवं दिवस होतां पूर्ण । प्रसूतकाळ पावे ॥ ११ ॥ प्रसूति

---

१ चैन पडत नाहीं. २ अस्र.

होतां आडवें आलें । तरि शस्त्रें छेदूनि काढिलें । यद्यपि जन्मांतरपुण्यें नीट आलें । तरि अडके योनिद्वारीं ॥१२॥ तेथें हि होती परम कष्ट । वोढूनि काढिती पापिष्ट । बाहिर पडल्यां हि संकट । बाळपणीं बहुत ॥१३॥ दांत डोळे देवी गोंवर । नाना खेळ खेळतां अपार । तेणें क्लेश होताती बहुप्रकार । ते मुखें बोलवेतिना ॥ १४ ॥ आतां यावरि तरुणपण । तेथ कामवेळसा होय दारुण । तो सांगतां असाधारण । जन्म न पुरे अवघा ॥ १५ ॥ मी येक चतुर शाहाणा सपन्न । मजसारखें कोण्ही न दिसे आन । स्त्री माझी च सुंदर सुलक्षण । मनोहर नेटकी ॥ १६ ॥ ऐसा नाना प्रकारें वल्गना करी । स्त्रियेची मनधरणी बहुत करी । ते हि ठाके ठमके बहुतांपरि । गमजा उत्तम तियेचा ॥ १७ ॥ जैसी देखिलिया मांजरी । बोका मेउ मेउं करी । तेवि आसक्त होऊनि घराचारीं । फिरे स्त्रियेभोंवता ॥ १८ ॥ अतरीं अभिमानाचा फुंज । तेणें साडिली सत्कर्माची लाज । असत्कर्मांचा धरिला माजें । काम-क्रोधें सरसावला ॥ १९ ॥ मग कैंचा देव कैंचा धर्म । विधिविधान स्वधर्मकर्म । स्नानसंध्या आश्रमधर्म । सर्व हि सोडिले ॥ २० ॥ धरूनि अहंकाराचा फुंगारा । भलतें चि करूं धांवे सैरा । अहंपणें जाला माजिरा । तेणें न मनी कोण्हासी ॥ २१ ॥ माझें गृह धन माझी दार । पुत्र कन्या सकळ संसार । इष्टमित्र सोयरे व्यवहार । माझा चि सर्व ॥ २२ ॥ ऐसा तरुणपणीं अहंकारें फुंजे । सकळांसी ह्मणे माझें माझें । तंव तें अकस्मात मृत्युसमाजें । नाश पावे तत्काळ ॥२३॥ मग जें जें यथाकाळें मरोनि जाय । त्यासाठीं ह्मणे म्यां देवा तुझें केलें काय । तयासी रडे मोकलूनि धांय । तुझे दारी लागली कोटी ॥२४॥ ऐसा क्षणेक होय कासावीस । पुन्हां तैसा चि ससारसोस । पुढें अहंममता नाना सायास । करूं धांवे प्रपचाचे ॥ २५ ॥ ससाराचा धरूनि सोस । जों जों करी प्रपंचहव्यास । तों तों वरिच्यावरि होये नाश ।

---

१ वेटा, भोंवरा. २ मस्ती, आधिक्य. ३ अभिमान, बुडबुडा. ४ बेफाम होऊन. ५ उन्मत्त ६ अभिमानी होतो. ७ हवरडा फाडून.

मग कोपे देवावरी ॥ २६ ॥ येऱ्हवी तरी देवाच्या नांवें । सितोडा हि परी न शिवे । प्रपंचाचिये तारं हांवे । त्रिभुवन हि न पुरे ॥ २७ ॥ नित्यनैमित्यादि कर्म न करी । आणि धरणें बैसे घटभेरी । आस्ता नाहीं देवापितरांवरी । सोयरींधायरीं घरा यात्रे ॥ २८ ॥ ऐसे रूभ्रम केले सर्वांचे । मनोरथ रक्षिले बहुतांचे । परि अंतीं नव्हे कोण्ही कोण्हाचें । निद नैं मांडल्यां ॥ २९ ॥ जेव्हां त्यासी संकट पडिलें । तेव्हां सर्व हि पळोनि गेले । अतीं प्राणी आपण येकलें । पीडा भोगी सर्व हि ॥३०॥ बैसता काळाचा चपेट । अवघ्यांची हारपे लटपट । सेवटीं जाणें येकलें येकट । विपत्ति भोगीत पैं ॥ ३१ ॥ अहो नित्य काळाची जाचणी । प्राणियांसी होतसे प्रतिक्षणीं । परि ते यातना न कळे यालागुनी । यासी कीजे काय कोणें ॥ ३२ ॥ संसार तर्लक्षण बंदिशाळे । जन हे घातले तया काळें । त्यासी न सोडितां गुरदशाळें । हे पिडा पावे ऐसे चि ॥३३॥ प्राणियांसी स्त्रीची अति आवडी । हे चि काळें पाईं घालूनि बेडी । परम प्रीतीचया कडोविकडी । खळखळीत स्वलोभें ॥३४॥ पुत्रमोहाचा हातखोडा करूनी । वरि कन्याममतेची खिळी घालुनी । प्रपंचकोरडा काळें हातीं धरूनी । थडथडां मारित ॥३५॥ वरि मीठवणीं वचशुंकेचें । वरिच्यावरि सिंपणें काळाचें । सोयरे इष्टमित्र जेरबंद साचे । बहिणी बहिणी त्या पैजारा शिरीं ॥३६॥ ऐसा आजन्मपर्यंत मार । काळ करितसे वरिच्यावर । मान्यतां करिती थोर थोर । हा चि सुइमार नखोनखीं ॥३७॥ जात्राई हा चि कोलदांड । काळें घातलासे वितंड । सुना त्या चि

१ नावाचा विटाळ हातो. २ आपल्या स्थूल शरीराला घट्ट धरून असतो. ३ कठिण प्रसंगी. ४ संसाराचें लाक्षणिक स्वरूप बंदिशाळा हे होय. अज्ञानी, पापी मनुष्य मेल्यानंतर त्याला यमधर्माच्या बंदिशाळेंतील यातना ज्याप्रमाणें भोगाव्या लागतात, त्याप्रमाणें त्यास जिवंतपणीं देखील काळाच्या संसाररूपी बंदिशाळेंत कशा प्रकारच्या यातना भोगाव्या लागतात तें पुढील ओंव्यात सांगितलें आहे. ५ चाबूक ओढल्यावर मिठाचें पाणी वर शिंपतात तें कोणचे तर निरकदरामपणाचें किंवा टाळ्याटबाळ्या करण्याचें. ६ याला वरी शिक्षा होते आहे असें मोठमोठे लोक जे हिणवतात तो च या तुरुंगातील सुईमार. ७ कोलदंडा=पायांत हात अडकवून बांधून गुडघ्यांत दांडा घालणें. ८ अघटित, विशाळ.

जयराखा उदंड । तोंडावरि मारितसे ॥ ३८ ॥ ऐसीं काळाची नित्य जाचणी । प्राणियासी होताती अनुदिनीं । परि सावध नव्हे स्वहित-सावनीं । अहे देवा ह्मणोनि ॥ ३९ ॥ तरुणपणीं वरिच्यावर । अद-ळतां हि दुःखडोंगर । परि ते न जाणोनि गंवार । विषय भोगी आधिकें ॥ ४० ॥ असो यावरी वृद्धपणीं । तेथ कैंची सुखाची काहाणी । नि-त्य चिंता हे पापिणी । गळां पडे मनुष्याचिया ॥ ४१ ॥ काळ साह्य होता तो सरला । दरिद्रासी घरीं थारा जाला । स्त्री नाइके कदापि बोलां । पुत्र जाले पारिखे ॥ ४२ ॥ अन्न मिळेना खावयासी । क्षुधा पीडितसे अहिर्निसीं । सोयरे इष्टमित्र दारेसीं । न देती येऊं ॥ ४३ ॥ दात पडोनि वळे बोबडी । हातापायांची पडे वेंगडी । झोंक जातजातां पडे मुरकुडी । होऊनि भुमीसी ॥ ४४ ॥ पोरें ह्मणती बोंगुळ आला । यासी ढकलूनि बाहेरी घाला । कर्णनेत्रीं थारा सोडिला । आलें अंधब-धिरत्व ॥ ४५ ॥ खोकितां कटाळती घरींचीं । हागी वोकी नकेची ची । तन्हि नातोंडापणतोंडांची । चिंता वाहे अंतरीं ॥ ४६ ॥ जन्हि घातलासे अर्द्धोदकीं । तन्हि तयांलागी अवलोकी । पुढीलां करूनि नि-र्वणुकी । घळघळा रडतसे ॥ ४७ ॥ ह्मणे आतां याचें कैसें होईल । यासी कोण प्रतिपाळिल । तें देखोनि दिनकर करी नवल । आहे ह्मणे गुरुराया ॥४८॥ सांगतां वृद्धपणाची अवस्था । चित्त कांटाळतसे सर्वथा । संसारदुःख अनिवार आहे आहे आतां । ह्मणे दिनकररामदास ॥ ४९ ॥ स्वस्ति श्री स्वानुभवदिनकरे गुरुशिष्याम्वये द्वितीय कळापे संसारलक्षण बाळतारुण्यवृद्धावस्थावर्णननिरूपण नाम तृतीयकीर्णप्रकाशः ॥ ३ ॥

---

## श्रीराम

असो यापरि वृद्धपण । होतां अकस्मात चि आलें मरण । तवं यम-यातनेचें दुःख दारुण । होय प्राणियासी ॥१॥ संसारीं जें जें करणें ।

---

१ आहि-रक्षण कर. २ मूर्ख ३ वेग, गति ४ पिशाच्च. ५ अर्धा जमिनीवर अर्धा पाण्यांत असा, अर्थात कुडांतून प्राण जाईपर्यंत.

63·5

तें तें तेथें अवश्य भोगणें । ह्मणोनि सदैव सत्कर्म आचरणें । कोणिहि
येका प्राणियें ॥ २ ॥ जरी येथें सद्वासना अंतरीं धरोनि प्राणी
सत्कर्मे करी । तरि उत्तमलोकीं सम साजिरी । पदप्राप्ति होय ॥ ३ ॥
जरि दुर्वासनायोगें असत्कर्म । प्राणियासी घडे अति दुर्गम । तरि फळप्रा-
प्तीचा हि संभ्रम । तेणें चि रीतीं ॥४॥ आता सत्कर्म आणि सत्पद-
प्राप्ति । हें पुढें यथाक्रमें सांगिजती । प्रस्तुत असत्कर्म आणि प्राप्ति ।
तैसी चि सांगों ॥ ५ ॥ जो कां स्वकर्मरहित नर । त्यासी अखंड
नर्की थार । लाधोनिया कर्मशरीर । यमयातना भोगितसे ॥६॥ तरि तें
पापें आणि नर्कविवचना । आणि कैसी ते यमयातना । श्रोतीं सावध
होऊनि त्रासावया मना । ऐकिलें पाहिजे ॥ ७ ॥ यदर्थी बृहन्नारदीय
पुराणीं । वर्णिली नाना पातकांची खाणी । ते सांगता कंटाळा वाटे
अंतःकर्णी । परि काहींयेक सांगो ॥८॥ तेथें महापातकें अवघीं च्यारी ।
उपपातकें असंख्य निर्धारीं । ब्रह्महत्या मद्यपान सुवर्णचोरी ।
तथा गुरुदारागमन ॥ ९ ॥ आणि या चौघांचा जो संसर्गी ।
तो पांचवा महापातकी अव्यंगी । आता या पापासमान कोणकोणते
सर्वांगी । श्रवणादरीं आइके ॥१०॥ आणि ते यमावतीसी नरक । ते हि
अनुक्रमें आइक । धडधडां ज्वाळा जळती कढकें । त्यासी कुंभपाक बोलिजे
॥ ११ ॥ तिखटां लोहयंत्राचें ज्वाळामय वन घोर । दुर्गंधि वश्मळ वैत-
रणी नदी दुस्तर । मळमूत्रपुवांचीं कुंडें अपार । त्यासी महारौरव ह्मणती
॥ १२ ॥ तप्त लोहशूळ तप्त लोहखांब । तप्त लोहपिंड फुटाणे तप्तसाखळा
सळंबे । तप्त लोखडपुतळें करूनि स्वयंभ । आलिंगावया ठेविले ॥ १३ ॥
मत्त गज आखल मस्त माहिष । महाव्याघ्र श्वानें कृष्णसर्प सविष ।
काळे विंचु रक्त पिपलिका सदोष । प्राणियासी डसवावया ॥ १४ ॥
आणि जेणें सोडिले वर्णाश्रमधर्म । त्यांसी नर्क प्राप्त अंधतम । दुष्टकर्मी
घातक जो परम । त्यासी प्राप्त कुंभपाक ॥१५॥ ज्यसी घडे परद्रव्या-
पहार । त्यासी भोगणें नर्क अघोर । मास तोडूनि साडेस वर । परोपरीं

---

१ कढ येईपर्यंत (?). २ लांब. ३ पिपीलिका, मुंगी. ४ सोनाराचें एक हत्यार.

यातना ॥ १६ ॥ जो देवांब्राह्मणांची करी निंदा । ज्याचें चाहाडीवरी मन सदा । त्यासी जळत लोहकुटाणे सदां । भक्षावया देती ॥ १७ ॥ घडे जरि परस्त्रीसंग । तरि करविती तप्तलोहासीं भोग । असिपत्रतरुवरी तयासी मग । चढविती स्वइच्छा ॥ १८ ॥ परस्त्रियेचेनि आलिंगनें । जळतखांब घडे पोटाळणें । दासीसंगें नित्य पचणें । वैतरणीमाजीं ॥ १९ ॥ ज्यासी घडती पंचमहापातकें । त्यासी आकल्पवरि न सोडिजे नरकें । तयाचिये अनुक्रमणिके । सांगिजैल आतां ॥ २० ॥ ब्रह्महत्या आणि मद्यपान करणें । गुरुपत्निसंग सुवर्ण चोरणें । या चोघांचिया सांगातीपणें वर्तणें । तो पांचवा जाणिजे ॥ २१ ॥ या पंचमहापापासमान । यथाक्रमें सांगिजती कोण कोण । मातापितरें गुरु गोत्रज गो ब्राह्मण । याचे हननीं ब्रह्महत्या ॥ २२ ॥ ब्राह्मणदूषण पंक्तिभेद वृथापाक । वेदविक्रय दान संकल्पूनि करी नास्तिक । धर्मद्वेषी वर्जिता ब्राह्मणअन्नोदक । हें ब्रह्महत्येसमान ॥ २३ ॥ कळला नसतां तत्वता शास्त्रार्थ । प्रायश्चित्त ज्योतिष धर्मनिर्णय वेदकार्थ । देहाभिमानें प्रतिष्ठी निजवाक्यार्थ । हें ब्रह्महत्येसमान ॥ २४ ॥ विद्या का धनगर्वें ब्राह्मणासी । कदापि बोलणें नाहीं नम्रतेसी । सदैव करणें निग्रह ब्रह्मद्वेषासी । हें ब्रह्महत्येसमान ॥ २५ ॥ आत्मस्तुति करूनि परनिंदा करणें । परपीडासंतुष्ट होऊनि असत्य बोलणें । दंभार्थ कर्म करूनि पोट भरणें । हें ब्रह्महत्येसमान ॥ २६ ॥ यानंतर गुरुतल्पकादि दोष । ते हि सांगिजती धरावयासी त्रास । तरि रजस्वलासंग आणि परस्त्रीसगाम । गुरुतल्पक बोलिजे ॥ २७ ॥ अकाळ कर्माचरण शास्त्रनिंदा । भक्तिहीन असोनि निंदिजे वेदा । गुरुगृहीं व्यभिचार अथवा करणें गुरुनिंदा । या नांव गुरुतल्पक ॥ २८ ॥ माय माउसी गुरुपत्नि चुलती । आत सासु बहीण यांसगें रति । हे गुरुतल्पकासमान दोष होती । आतां सांगिजैल मद्यपान ॥ २९ ॥ परिट गणिका नृत्यकार पतित । निरग्निक देवळक[२] शिव-

१ गुरुद्रोहादि २ देवलक, देवल, देवाचा आश्रित, देवापुढें जें कोणी कांहीं ठेवतात त्यावर चरितार्थ चालविणारा.

निर्माल्यरत । याचें अन्नसेवन शूद्रस्त्रीसुरत । मद्यपानासमान ॥ ३० ॥
सिंदी सरो तमाखु आफु भांगी । कांदा लसण उन्मत्तद्रव्यसंगी । हें मद्यपानासमान आतां अन्यगीं । सुवर्णस्तेय सांगों ॥ ३१ ॥
सर्व धातु कर्पूरादि सुवास । गोरस आदिकरूनि सर्व हि रस । कंदें मुळें फळें पुष्पें चोरणें यास । सुवर्णचोरीसम दोष ॥ ३२ ॥
श्राद्ध पक्ष देवधर्माचा त्याग करूनी । द्रव्य साची धर्मकार्यें लोपुनी । यतिनिंदा वस्त्रचोरी रुद्राक्षहरणीं । सुवर्णस्तेय बोलिजे ॥ ३३ ॥
सोनें रुपें हिरा माणिक । मोतीं पोंवळें नवरत्नादिक । पद्माक्ष तुळसीमणी सम्यक । शख अठरा धान्यें समवेत ॥ ३४ ॥ हें इतुकें सुवर्णचोरीसमान । पांचवा याचा संसर्गी जाण । यां इतुकियांसी अघोर नर्कीं पचन । चंद्र सूर्य असती तव ॥ ३५ ॥ वेश्या आणि विधवासंग । याचें पाप तवं अति अभग । नर्कीं किडे होऊनि पचिजे अव्यंग । आकल्पपर्यंत ॥ ३६ ॥ हें पंचमहापातकांसम दोषालागी । प्रायश्चित्तें असती पैं कळियुगीं । आतां ज्या दोषासी प्रायश्चित्त चि नसे ते हि तुजलागी । सक्षेपें सांगिजेल ॥ ३७ ॥ स्त्री आणि शूद्रें केली हरिहरप्रतिष्ठा । तेथ जे पूजन नमस्कार करिती निष्ठा । ते प्रतिष्ठिते आणि पूजिते दोघे हि इष्टा । रौरवादि यातना भोगिती ॥ ३८ ॥
अथवा ब्राह्मणें प्रतिष्ठिले जे हरिहर । त्यासी स्त्रिया आणि जाती ज्या इतर । तेहीं दुरूनि करावा नमस्कार । स्पर्श करितां नर्कप्राप्ति ॥ ३९ ॥
आणि ब्रह्महत्येसी कदापि घडेल प्रायश्चित्त । परि ब्रह्मद्रुपासी न घडे यथभूत । विश्वासघातकी कृतघ्न आणि जे रत । शूद्राचिया स्त्रियांसी ॥ ४० ॥
गुरुनिंदा हरिहरनिंदा हरिकथेची निंदा । गुरुद्रव्य देवद्रव्य ब्रह्मस्वापहार[1] घदा । या पापास आकल्पकोटि हि कदा । सुटिका चि नाहीं ॥ ४१ ॥ अहो वेदनिंदक मुख्य बौद्ध । पूर्वींहूनि पाषांडी प्रसिद्ध । ह्मणौन बौद्धालया जाय तो नव्हे शुद्ध । प्रायाश्चित हि दिधलियां ॥ ४२ ॥

---

1 सुप (?)

जयासी प्रायश्चित्त चि नाहीं । ऐसे दोष बोलिले जे कांहीं । तयांसी कल्पकोटि दशायुतेंसीं पाहीं । महा नर्कीं पचिती ॥ ४३ ॥ मग तीन कल्पें कर्मविशेषें । स्थावरें शरीरें भोगिती अशेषें । मग इष्टेंतील कृमी होऊनि वर्षें । साठिसहस्रपर्यंत ॥ ४४ ॥ मग सर्प होय शतसहस्र संवत्सरीं । मग सहस्र वर्षें पशु होय परोपकारी । उपरीं उरलेंनि पापें मनुष्यशरीरीं । म्लेंच्छ गोळक कुंडगोळक ॥४५॥ यावरि ब्राह्मण होय परि अकिंचन । पापप्रतिग्रहें मळीन मन । तेणें सवें चि देहांतीं पात्रे पतन । नाना नर्कयोगें ॥ ४६ ॥ अप्रायश्चित्ता पापाची यातना । निरोपिली सकळ विवचना । आतां पंचमहापातकी जना । जो जो दंड तो सांगिजैल ॥ ४७ ॥ जे सकळ अनुक्रमें सांगितले जाच । ते प्रत्येकें येक येक युग भोगिती साच । मग गर्दभयोनि भोगूनि पाच पाच । वीस जन्में श्वान शूकर ॥४८॥ मुखकें होय शतजन्म । मृगयोनीचे शतजन्म सभ्रम । मग मनुष्यजन्म पावोनि निभ्रम । सप्त जन्म चांडाळ होय ॥ ४९ ॥ सोळा जन्म शूद्रादि नाना याति । मग वैश्य शूद्र परिबाध्य होती । सेखीं दरिद्री ब्राह्मण पापप्रकृति । वीस जन्में अवतरे ॥ ५० ॥ आणि गो अग्नि अथवा ब्राह्मण । यांसी अर्पिता जो वारी कृपण । तो सप्तजन्म होऊनि भुकर्ण । सेखीं चांडाळ होय सप्तजन्में ॥ ५१ ॥ मग तीन जन्में व्याघ्र विष्ठाकृमी । नाना नर्कीं पचविती अंधतमीं । तापले लोहपिंड घालिती मुखपद्मीं । सुया आदळिती नखोनखीं ॥ ५२ ॥ अधोमुख तप्तखांबीं बांधोन । मस्तकीं देती जळत पाषाण । मग श्रोणितकुंभीं पचविती प्रमाण । शतसंवत्सर पैं ॥५३॥ जे करिती परद्रव्यापहार । त्यासी उखळीं घालूनि मुसळीं करिती चूर । पाषाण ताऊनि तीन संवत्सर । धरविती हातीं ॥५४॥ सप्तजन्म काळसूत्रें भेदिजती । स्वकर्म स्मरत आक्रंदती । मग यथाक्रमें पचिजेती । सर्व हि नरकीं ॥५५॥ परअन्नचोरीचा सांगिजैल दंड । सहस्रयुगें चारिती तप्त लोहपिंड । जिव्हा उपडूनि स्वासकोंड । करिती सहस्र वरुषें ॥५६॥

---

१ मूषक. २ कृम.

आणि जे परस्त्रीचा ठाईं रत । त्यांसी ताम्रस्त्री ताऊनि धगधगीत । आळगीं इसी ह्मणती हे बहुत । सुंदर दिसताहे पैं ॥ ५७ ॥ अरे असत्य मानूनि सतांचे उत्तर । ह्मणत होतासी कैंचे यमकिंकर । तरि आता भागीं परस्त्रीसुखशेजार । ह्मणोनि लोळविती निजवरी ॥ ५८ ॥ आक्रंद निघातें बोढितां लिंग । येणें फार घेत होतासी परस्त्रीभोग । करकरां दांत खाऊनि मग । तप्तलोहखांबीं बांधती ॥ ५९ ॥ मग त्यावरि यथानुक्रमें । सर्व हि नर्क भोगाविती सभ्रमें । आतां जे परपुरुषीं स्त्री रमे । सांगिजेल यातना तयेची ॥ ६० ॥ लोहशयनीं लोहपुरुष लाऊनि भाते । त्यावरी लोळविती तियेतें । उल्मूक ह्मणिजे जळत भितें[1] । घेऊनि मारिती पापिणीसी ॥ ६१ ॥ सहस्रवर्षें लोहस्तभीं बांधती रांड । मग क्षारोदक पाजूनि करिती दंड । मग त्यावरि सर्व हि नरकजाच वितंड । भोगविती यथाक्रमें ॥ ६२ ॥ जे वधिती गौ ब्राह्मण आणि दुश्चित्त क्षेत्रीं । ते पांच कल्पें नर्की पचती सर्वत्रीं । सता महताची निंदा आइकती श्रोत्रीं । यातना सांगिजेल तयांची ॥ ६३ ॥ तप्तलोह कानीं गोळे घालिती । सर्वांगीं व्याघ्र कुतरे तोडिती । त्यानंतरें पचिजती । कुंभपाक नर्कीं ॥ ६४ ॥ कैंचीं वेदवाक्यें कैंचा ईश्वर । कैंचा मोक्ष कां भजों हरिहर । ऐसे जे नास्तिकादिक असुर । सांगिजेल यातना तयांची ॥ ६५ ॥ कोटीवर्षें पाजिती लवण । आकल्पवर्षें इष्टाभक्षण । तप्त लोहगोळ मुखीं घालून । रौरवामाजीं पचविती ॥ ६६ ॥ जे ब्राह्मणासी क्रोधदृष्टीं लक्षिती । त्याचे नेत्रीं सहस्र सुया ताऊनि आदळिती । मग घोर कर्वतें विदारिती । आणि क्षारोदकें दंड तयासी ॥ ६७ ॥ वेदमर्यादा गुरुमर्यादा उलंघून । आणि विश्वासघात करिती जे दुर्जन । अशुचि आणि परान्नीं ज्यांचें मन । आइका दंड तयांचा ॥ ६८ ॥ चारिती यथेष्ट श्वानाचें मांस । आणि श्वान व्याघ्राहातीं तोडिती तयास । प्रत्येकें सर्व नरक भोगास । अनुक्रमें दाविती ॥ ६९ ॥ पाप प्रतिग्रही नक्षत्र पाठक । देवळकान्न भोजी बहुयाचक ।

---

[1] काष्ठ.

त्यासी इष्टाभोगादि सर्व नरक । चांडाळ होय सप्तजन्म ॥७०॥ असत्य निष्ठुर[1] बोलती । त्यांची जिव्हा उपडूनि तेलांत तळिती । काळसूत्रें भेदूनि क्षारोदकें दडिती । मग घालिती मळमूत्रकुंडीं ॥७१॥ जे पंचमहायज्ञ न करिती । त्यासी वैतरणीमाजीं बुडविती । महारौरवीं पचिजेती । कोटिसंवत्सरपर्यंत ॥७२॥ जे ब्राह्मण ग्रामवृत्ति क्षत्रापहारक । त्यांसी सकुळेंसीं प्राप्त सर्व नरक । मग तप्तभूमिवरि कोटिवर्षें अवश्यक । लोळविती तयांसी ॥ ७३ ॥ जे अतितासी होती विन्मुख । त्यांसी प्राप्त नर्क कुंभपाक । संत महंत न भजे संम्यक । तो पचिजतसे महारौरवीं ॥७४॥ हें सांगता पैं असे बहुत अपार । तितुकें सांगतां हि समग्र । ग्रंथ होईल सविस्तर । ह्मणौनि थोडें चि सांगितलें ॥ ७५ ॥ ह्मणौनि त्राहे गुरुराया आतां । या संसारसंगें सुख अवलोकितां । केवळ दुःख चि दिसे तत्वता । ह्मणे दिनकररामदास ॥ ७६ ॥ स्वस्ति श्री स्वानुभवदिनकरे गुरुशिष्यान्वये द्वितीय कळापे यमयातनानिरूपणं नाम चतुर्थ कीर्णप्रकाशः ॥४॥

---

## श्रीराम

संसारसंगें अपार दुःखें । त्याहीवरि तापत्रय तडाखे । त्रिविधताप सांगतां तडके । हृदय प्राणियाचें ॥ १ ॥ आध्यात्मिक आधिभूतिक । तिसरा जाणिजे आधिदैविक । यांचें सांगतां परम कौतुक । शंका वाटतसे ॥ २ ॥ परि लक्षण जाणावया प्रस्तुत । कांहीं येक बोलों सकळित । समजल्याविण इत्थंभूत । न कळे ह्मणौनि ॥ ३ ॥ असता देहात्म उभय योग । निर्माण होतां जितुके रोग । अष्टोतरशत व्याधि अनेग । शरीरजन्य ॥४॥ नवज्वर विषम ताप धारे । खोकला पडसा पडजीभ अक्षरें । धाप दमा गांठी चढे उतरे । वायगोळा पानथरी ॥ ५ ॥ पोटदुखी अंतर्गळ मूळव्याधि । वाय तिडका लागती सर्व संधीं । नेत्र कर्ण कपाळ उदर शूळविधि । प्रमेह

---

[1] शद्वारे.

मूत्रकृच्छ्रादिक ॥ ६ ॥ खांडुक खरुज रक्तगुल्म । गळसुध्या गडमाळा मुरुम । गोटी काळफोड दुर्गम । अंडबेल टाळबेल ॥ ७ ॥ घामगलडें सुटरें चामखीळ । मस लांसें मस्तकशूळ । आवाळुं कुलुंच येकार्गळ । आणि अंगहीनता ॥ ८ ॥ ऱ्हस्व दीर्घ कुब्ज वामन । पृथुल कृश मोडके करचरण । तरळ मोडसी हागवण । आणि पित्तो-द्भव वोकारी ॥ ९ ॥ आणिक शरीरातील जितुकी व्यथा । या नांव अध्यात्मिक बोलिजे सर्वथा । आतां आधिभूतिक याची कथा । सांगिजेल कांहीं येक ॥ १० ॥ तरि अन्य पदार्थाचया योगें । व्यथा पाविजेल निजांगें । शस्त्रघात कीं पाषाणसगें । का सर्प श्वापद डशे ॥ ११ ॥ का उदकामाजि बुडिजे । अथवा अग्निसगें पोळिजे । कां ढकलूनि कोण्ही पाडिजे । कीं पर्वतपात ॥ १२ ॥ परसगें जे व्यथा उपजे । अथवा लात बुकी कोण्हीं मारिजे । कीं कोण्हेंसीं झोंबी घेइजे । अक-स्मात धका ॥ १३ ॥ विंचु सर्प डसोनि मेला । कां अरण्यांत व्याघ्रें फाडिला । किंवा कुतरीं लांडगीं तोडिला । कीं विज्जु पडिली मस्तकीं ॥१४॥ कांहीं दुर्वार्ता कानीं ऐकिली । तेणें अतरीं धुकधुक लागली । का ते अकस्मात तीर गोळी बैसली । शरीरांत येऊनि ॥१५॥ किंवा तो कोण्हीं ढकलिला । अथावा वृक्षावऱ्हूनि पडिला । किंवा आगावरी पाली सरड चढला । तेणें जाला कासावीस ॥१६॥ दुसऱ्याच्या सगें व्यथा उपजे । या नांव आधिभूतिक बोलिजे । आता आधिदैविक ताप समजे । ऐसें सांगीजेल ॥ १७ ॥ तरि प्राणियांसी दैविगति । स्वर्गनर्कादि प्राप्त भोग होती । शुभाशुभकर्में देहातीं । यमयातनादिक ॥ १८ ॥ नवस सायास देवाचे चुकता । यात्रा ब्राह्मणसंतर्पण राहाता । समध लागोनि दुःख भोगितां । आधिदैविक ताप ॥ १९ ॥ काम क्रोध शोक मोह भय । यांच्या उद्भवें नाना अपाय । या नांव मिश्र तापत्रय । बोलिजे श्रेष्ठीं ॥ २० ॥ तरि दिनकर हाणे गुरुवर्या । जी जी ससारत-मसूर्या । त्रिविधतापोपशम करुणालया । श्रीकृपामूर्ति ॥ २१ ॥

जी मी या संसारसंगें श्रमलों । त्रिविधतापें तापलों । ह्मणौनि तुज शरण आलों । करुणानिधि ॥ २२ ॥ सागता या संसाराचा सीण । मन वाचा होतसे उद्विग्न । तरि जी देवा या भवभयापासून । सोडवीं मज ॥ २३ ॥ ऐसा शिष्य बोलतां करुणावचनीं । कृपा द्रवला मोक्षपाणी । अभयंकर उभारूनि । मस्तकीं स्पर्शिला ॥ २४ ॥ आतां उभयतां गुरुशिष्यसंवाद । श्रोतीं होऊनि अति सावध । श्रवण कीजे निर्व्यवाद । स्वानुभवदिनकरीं ॥ २५ ॥ दिनकर रामीं रामदास । ह्मणे होऊनि सर्वस्वें उदास । निजभावें स्वानुभवदिनकरास । श्रवण कीजे स्वानुभवें ॥ २६ ॥ इति श्री स्वानुभवदिनकर । रामीं रामदास निरंतर । श्रवणें निरसला संसार । त्रितापासहित ॥ २७ ॥ स्वस्ति श्री स्वानुभवदिनकरे गुरुशिष्यान्वये द्वितीय कळापे त्रितापलक्षणनिरूपण नाम पंचमकीर्णप्रकाश । दोवी कळाप संख्या ॥ २५१ ॥ ७ ॥ ॥

---

## ॥ वैराग्य कळाप तिसरा ॥ ३ ॥

### ॥ श्रीरामचंद्रो जयति ॥

ॐ नमोजी श्रीगुरुदातार । न कळे नामरूपकर्माचा पार । स्वसंवेद्य स्वानुभवदिनकर । आद्यंत अवघा ॥ १ ॥ नामें पाहातां अनंतें अपार । रूप तरि निर्गुण निर्विकार । अंतर्बाह्य व्यापक सचराचर । कर्म निःसीमपणें ॥ २ ॥ ह्मणौनि नामरूपकर्मरहित । न चले जेथ हेत दृष्टांत । मन दशेंद्रियांसहित । पांगुळलें राहे ॥ ३ ॥ जयासी जें पाहों जाये । तें तद्रूपचि होऊनि ठाये[1] । मग पाहातेपणाची हि सोये । हारपली दिसे ॥ ४ ॥ ऐसें जें पाहातेनेविण[3] पाहाणें । तें येक गुरुकृपाचि जाणणें । मग स्वानुभवदिनकर चि होणें । सहज स्थिति ॥ ५ ॥ ते सहज स्थिति तैंचि[4] होये । जैं गुरुकृपासामर्थ्य अंगासि ये । मग हा जें जें जिकडे पाहे । तें तें आपणचि आघवा ॥ ६ ॥ ॥ जेवि तो अबुकण समुद्रीं पडे । मग आपण चि जिकडे तिकडे । का ते दीप-

---

१ थोटावलें, तटस्थ. २ ठाये, राहे. ३ पाहाणारावाचून. ४ तैं=तेव्हां.

कळिका दडे । निजतेजामाजी ॥७॥ तैसें गुरुकृपानिवाडें । माझें मीपण पाहों गेलों कोडें । तव घटभगीं न निवडे । घटाकाश जैसें ॥ ८ ॥ कां तो रंजरेणु पृथ्वी पाहों जाये । तव आपण ही तैसाचि होऊनि ठाय । अथवा जेवि का ते गगा ये । सागरासी भेटों ॥९॥ मग ते सागरचि अघवी जाली । आपण त्रिपुटीसहित हारपली । तेवि स्वानुभवदिनकरीं लाधली । ऐक्यता सहजें ॥ १० ॥ असोत आतां हे शब्दउपचार । स्वामी संसार वाटे परम दुस्तर । या ससारसंगें तिळाइतुकें साचार । सुख न दिसे सर्वथा ॥ ११ ॥ मीं जी ससारसगें बहुत श्रमलों । त्रिविधतापें पोळलों । ह्मणौनी जी मीं शरण आलों । कृपानिधि कृपाळुवा ॥१२॥ तरि यासी कांहीं जी प्रस्तुत । उपाय योजूनि त्वरित । मीं या ससार-सिंधूमाजी बुडत । तो काढीं देवा झडकरी ॥ १३ ॥ ऐसे हे संसार-श्रमाचे क्लेश । शिष्य आठऊनि बोले जव सविशेष । तवं निजकृपा सद्गुरु सर्वेश । प्रबोधी शिष्यासी ॥ १४ ॥ बा रे तू ससारसगें श्रम-लासी । तरि सांगेन याचिया उपायासी । सादर होऊनि भगवद्भजनासी । अनन्यभावें करावें ॥ १५ ॥ तरि भगवद्भजनाऐसें सार । भुवनत्रइं आणीक नाहीं थोर । ह्मणौनि साधकांसी हा निर्द्धार । निश्चयेसीं जाला पाहिजे ॥१६॥ भगवद्भजनाचें साधन । जयासी न मने तो परम हीन । तया-सी प्राप्त भवबधन । चौऱ्यासीं लक्षाचें ॥१७॥ यमयातनेचे उपचार । यम-दूत कारिती निरंतर । स्वर्गस्थ निर्बुजंति पितर । भगवद्भजनावांचुनी ॥१८॥ उदंड संसारचाळणा । कारिता उसत कैंचा तनुमना । ब्रह्मांड न पुरे स्वार्थसूचेना । करितां रात्रीदिवस ॥ १९ ॥ कन्या पुत्र बधु वनिता । व्याही विहीणी जामात दुहिता । सर्वें सोयरे प्रपच ममता । करिता नों-अराय क्षणभरी ॥ २० ॥ नाना घातपात करूनि जोडावें । चोरी-मारीनें द्रव्य मेळवावें । परंतु लौकीकासी रक्षावें । प्रयत्नेंकरूनी ॥२१॥

---

१ रज:कण, धुळीचा कण. २ कृपेनें. ३ कष्टी होती. ४ विवंचना. ५ सोबती (?) ६ (?)

ऐसी प्रपचाची चाळणा । चाळितां कल्पांतवरी पुरेना । कैसा भुलला प्राणी जगजीवना । अणुमात्र नाठवी ॥ २२ ॥ जळो त्याचा ससार । जळो त्याचा विचार । जळो त्याचा आचार । जो स्वार्थमूळ ॥ २३ ॥ जळो त्याची वित्पत्ति । जळो त्याची सतति सपत्ति । जयाचें आर्त भगवतीं । अणुमात्र नाहीं ॥ २४ ॥ ऐसा जो का पतित । तयाचा भार धरणी मानित । भुमीभार पापी अभक्त । कासयासी वाचावा ॥२५॥ नेणें कधीं देव धर्म । स्नान सध्या विहित कर्म । तीर्थ क्षेत्र दान सुगम । नेणे अतित अभ्यागत ॥ २६ ॥ नेणे स्वागत वैष्णवाचें । अथवा तिथी पर्व महोछायाचें । स्वागत नेणे नित्यनैमीत्यकार्चे । ऐसा प्राणी भूभार ॥ २७ ॥ ऐसें जिणें प्रेतवत । तें जाणिजे चालतें बोलतें प्रेत । खातें जेवितें भूत । प्रत्यक्ष तें चि ॥ २८ ॥ शाश्वत मानुनी ससारतरुछाया । आप मानिली धन जन जाया । विसरोनि गेला रामराया । ऐसा विषयांध ॥ २९ ॥ पावोनि नरदेहा ऐसें रत्न । पाडिलें विषयधुळींत न करी प्रेत्न । मोक्षसाधन सुवर्णीं जडूनि जतन । न करी चि प्राणी ॥ ३० ॥ थोंटा पांगुळ अध बहिरा । पिसा वेडा समर्थी फेंपरा । मुका रोगी अत्यत तोंतिरा । तरि तो नरदेह व्यर्थ ॥ ३१ ॥ इतुकीया अवलक्षणांवेगळा । नरदेह वर्णविशेषें आगळा । लाधोनि संसारसागरीं बुडविला । भजनेंविण ॥ ३२ ॥ अमोल्य नरदेहीं आयुष्य । गवाविलें व्यर्थचि निमिष्यें निमिष्य । अंतीं यमयातनेचे क्लेश । येकायेकीं भोगणें ॥ ३३ ॥ माता पिता बधु बहिणी । चुलते मामे व्याही विहीणी । पुत्र मित्रादिक कामीनी । न चालिती पाठीसीं ॥ ३४ ॥ अवघीं रडती प्रेतापासीं ।[1] परि कोण्ही नेणती गेल्याचे यातनेसी । दूतीं चालविला बांधोनि यमपाशीं । धुमैसिती दडें सावकाश ॥ ३५ ॥ मार्गीं नाना यातना करिती । व्यस्ताव्यस्त दडिलें चि दडिती । सव्यापसव्य अगें भेदिती । आठवीं हाणती कृतकर्में ॥ ३६ ॥ ऐसी होतां यमयातना । तेथें सखें कोण्हिच पावेना । अवघीं मडें

---

१ आपलीशी २ ओढाताण करून क्लेश देती

जाळूनि सदनां। आलीं सावकाश ॥ ३७ ॥ पुढें दोनी च्यारी दिवस। शोक करिती सावकाश। मग सोडूनि शोक संसारकृत्यास। निःशंक लागती ॥ ३८ ॥ मेलें तेंचि व्यर्थ गेलें। दोहींकडे स्वहितासी नाडलें अतीं भोगणें प्राप्त जालें। रौरवादिक ॥ ३९ ॥ रौरवादिक नर्कयातना। भगवद्भजनावाचुनी जाणा। होतसे ह्मणौनि नारायणा। आपलें ह्मणावें ॥ ४० ॥ जनक तो जननी बधु। सकळ कांहीं करुणासिंधु। भावें आकळावा विश्वकदु। जगजीवनु परमात्मा ॥ ४१ ॥ निमिष्योन्मिष्याचे व्यापार। जयावांचुनी न चले कीर। तो जगद्बधु सर्वेश्वर। भजतां बाधु नाहीं ॥ ४२ ॥ अरे आत्मज्ञानेंविण नर। तो पापात्मा अधःपाति खर। पुनरावृत्तीचें बिढारें। सर्वथा ही न सोडी ॥ ४३ ॥ वेद आणी श्रुतिस्मृति। शास्त्रें पुराणें समति बोलती। जे आत्महत्येचे दोष पाउलापाउलांप्रति। ज्ञानेंविण जीवासी ॥ ४४ ॥ ऐसें असोनियां यथार्थ। जीव न विचारिती स्वहित। ससारभ्रमें भुलोनि अकस्मात। जाती अधःपाता ॥ ४५ ॥ ह्मणौनि ऐसें न करावें। नरदेहा येउनी वायां न जावें। अत्यादरें स्वहित करावें। कोण्हियेकानें ॥ ४६ ॥ सोडुनियां कुळाभिमान। जातीगोत्रद्रव्याभिमान। सोडुनिया राज्याभिमान। स्वहित करावें ॥ ४७ ॥ कायावाचामनोभावें। सद्गुरुस्वामीसी शरण रिघावें। आपुलें स्वहित करूनि ध्यावें। निश्चयात्मक ॥ ४८ ॥ जो स्वहिताचा भुकेला। तेणें पाहिजे सत्सग धरिला। सत्सगेंविण स्वहिताला। ठाव नाहीं ॥ ४९ ॥ सत्संगाचें महिमान। स्वयें नेणत चतुरानन। सताचा महिमा जाणे ऐसा कोण। भूमंडळीं ॥ ५० ॥ याकारणें सतांसीं शरण। जाउनी साधावें ब्रह्मज्ञान। तेणें सायुज्यमुक्तीचें सदन। जीवासी लाभे ॥ ५१ ॥ येवढा अलभ्य लाभ। सत्सगें होय सुल्लभ। जो का अनतां साधनीं दुर्लभ। साधकासी ॥ ५२ ॥ ब्रह्मज्ञानाचा उपदेश। करी तोचि सद्गुरु सविशेष। दृश्य साभास निःशेष। निरसुनिया ॥ ५३ ॥ सद्गुरुसारिखा सखा सोइरा। भूमंडळीं कैंचा

---

१ निश्चयात्मक, खात्रीनें. २ बिऱ्हाड.

दुसरा । जेणें चुकविलिया वेरझारा । स्वर्ग ससारिकां ॥ ५४ ॥ उत्तीर्ण व्हावें जरी काहीं । तरी आपलें पाहातां कांहीं च नाहीं । आणि व्यर्थाचि प्रपचप्रवाहीं । जन पडिलें असे सर्वथा ॥ ५५ ॥ तरि तू सखया सावध होइं । लाधोनि सतसगाची नवाइ । सारासारविचार निजसोइ । स्वहित साधीं झडकरी ॥ ५६ ॥ ऐसें बोलतां गुरुराणा । शिष्य धाऊनि लागे चरणां । स्वामी आधीं सांगावी जी रचना । या नरदेहाची समूळ ॥ ५७ ॥ नरदेह कैसा जाला निर्माण । याचें कैसें जी उद्भवलक्षण । आद्यंत सागा जी विचारून । ह्मणे दिनकररामदास ॥ ५८ ॥ स्वति श्रीस्वानुभवदिनकरे गुरुशिष्यान्वये तृतीय वैराग्यकळापे सतसगवर्णननिरूपणनाम प्रथमकीर्णप्रकाश· ॥ १ ॥ श्री राम जय राम जय जय राम ॥

॥ श्रीगुरु ॥

षडरस अन्न पंचभूतात्मक । त्यांचे शुक्र श्रोणित होउनि सम्यक । तें कैसें आणी किमात्मक । तें चि सांगों आधीं ॥१॥ पुरुष अथवा हो कां स्त्री । जें अन्न पडे त्यांचे जठरपात्रीं । त्याचा पाक होय अहोरात्री । जठराग्निचेनि मेळें ॥ २ ॥ त्यात पुरुषदेहीं होती तीन प्रकार । उत्तम भागाचें रेत होय साचार । मध्य मांश श्रोणिताचा विचार । कनिष्ठ भागें मळ ॥ ३ ॥ स्त्रीदेहीं नाहीं रेतउद्भव । तेथ उभय भागाचा होय रक्तसभव । मध्य भागें मांस आणि कनिष्ठें प्रभव । मळासी होतसे ॥ ४ ॥ तेथ पुरुषाची जे जठराग्नि मुस । माजी पडती जे अन्नरस । त्याचे प्रकार होति बहुवस । येकापासुनि येक ॥ ५ ॥ अन्नाचें जें शुद्ध सत्व । त्याचा होय रेतप्रभव । उरला जो रससमुदाव । त्याचें रक्त निफजे ॥ ६ ॥ त्या रक्ताचे प्रकार द्विविध । उत्तम भागें मांस सिद्ध । आणि कनिष्ठ भागें मेद । यथान्वयें निफजे ॥ ७ ॥ मेदापासुनि अस्ति पुष्ट होती । अस्तिपासाव मज्जा उद्भवती । मज्जापासाव उत्पत्ति । हीन वीर्याची होय ॥ ८ ॥ असो याचि प्रकारें स्त्रियांचें शरीरीं । अनुक्रमें

---

१ शुक्र, शुक्लित, रेत. २ रक्त

होय वृद्धीची उंजरी। तियेसी वीर्य नाहीं ह्मणौनि साजिरी । पुरुषाचेनि अंगसगें ॥ ९ ॥ असो आतां जन्म धरावया निरावेव। लिंगदेहात्मक जो कां जीव। तो अन्नसगें. पावे ठाव । पुरुषगर्भकोशीं ॥ १० ॥ त्या अन्नाचें जैं होय रेत। त्यामाजी जीवही होय मिश्रित। मग तो स्त्रीपुरुषसंगीं प्रवेशत । जननीजठरगर्भकोशीं ॥ ११ ॥ इकडे स्त्रियेसी प्राप्त होतां रजोदर्शन। तद्दिनीं चांडाळत्व स्त्रियेलागुन । ब्रह्महत्येचें पाप सपूर्ण। दुसरें दिवसीं ॥ १२ ॥ तृतीय दिवसीं केवळ रजकी। दोष तद्वत् स्त्रियेचा मस्तकीं । चतुर्थ दिवसीं नक्षत्रावलोकीं। शुद्धता होय स्त्रियेसी ॥ १३ ॥ ऐसें धर्मशास्त्र बोलिलें यथाभूत। किं रजस्वला केवळ निंद्यवत। तेथ याचा संभव होत। चतुर्थ दिवसीं ॥ १४ ॥ तेथ स्त्रीपुरुषाचिया संयोगें । रेतरक्तसंम्मीलनसगें। गोळा विरजोनि अंवगे। बुद्बुदांडाकार ॥ १५ ॥ रेताचया अधीकपणें होय पुरुष। रक्ताधिक्यें निफजे स्त्रीवेष। उभयता समान तारि तदश। नपुंसक निफजे ॥१६॥ असो संभवानतर पांच दिवस। सम्मीलन होऊनि रेत रक्तास। बुद्बुदाडाकारीं निशेष। गोठोनि होये ॥ १७ ॥ पधरा दिवसीं अंडवत। मासातीं गोठोनि मांसयुक्त। मग त्या मासगोळीयासि यथायुक्त। अंकुर फुटों लागती ॥ १८ ॥ दुसरे मासीं फुटे शीर्षांकुर। तैसेचि करचरणाचे फडदर । दिवसेंदिवस हळु हळु साचार। वृद्धि होय अवयवांसी ॥ १९ ॥ तिसरे मासीं आकारासी येती। दिवसेंदिवस दृढ होती। मग चौथे मासीं आकारती। अगें आणि आंगोळीया ॥ २० ॥ पांचवा मासीं केश नखें श्रोणित। आणि अतःकर्ण चेतवे अतर्गत। षण्मासीं अस्ती मजा दृढ होत। सप्तमीं चेते इंद्रियसमुच्चय ॥ २१ ॥ अष्टमीं इंद्रियद्वारें उघडती। आणि त्वचा कचुक दृढत्वासि येती। निजस्मरणाची उद्भवे गति। अह ब्रह्म ह्मणौनि ॥ २२ ॥ पुढें नववां मास लागता। न्युनपूर्ण दिवसें तत्वता। प्रसूति होऊनि पृथ्वीवरी

---

१ उत्कर्ष. २ अव्यग, पूर्ण.

पडता। ब्रह्मस्मरण सोडितसे ॥ २३ ॥ देह उपजोनि लोळे अवनी। उत्पत्ति स्थिति आणि मरणी। स्थूळ देह न सोडी धरणी। तयेचा अंश ह्मणौनियां ॥ २४ ॥ तया स्थूळदेहाची रचना। विस्तरें आइक विवचना। जेणें करूनि तुझिया मनां। सर्वज्ञता होय ॥ २५ ॥ उद-रामाजी आतडें येक। प्रमाण येकत्रीस हस्तक। आणीक आइक पां कौतुक। फौर्यस अगुळें तेरा ॥ २६ ॥ अंगुळें सात स्नेहाळिका जाण। अंगुळें औठ पित्ताचें प्रमाण। मुत्रकोष्ट जालें निर्माण। नव अगुळें असे ॥ २७ ॥ अंगुळें अठरा मळकोष्ट। तुज हें कळों देइं गा स्पष्ट। आणीक हि अतरीचें कष्ट। किती ह्मणौनि सागावें ॥ २८ ॥ जठरा आंत अग्नी प्रदिप्त। कृमीं वेगळें औठ शत जंत। नाडी बाहा-त्तरी सहस्र परि विख्यात। चतुर्दश प्रसिद्धा ॥ २९ ॥ तेंहीं बाहात्तरी कोठे केले भीतरी। शडचक्र पंकोळिका नानापरी। दशद्वारें अति कुंसरि। गुप्त येक नव प्रगट ॥ ३० ॥ हें कर्तुत्व ज्या जगदीशाचें। त्यासी कोण्ही न पुसे साचें। आणी नानाप्रकारीं प्रपचाचें। कोड करी परोपरीं ॥ ३१ ॥ असो आणीकें मत्तें छिद्रें तेरा। दोनि गुप्त प्रकट अकरा। ब्रंह्मरध्र नाभिरंध्र अडकुनि येरा। स्तन द्वय आणी द्वारें नव ॥ ३२ ॥ मुख नाशिक मिळोनि त्रय। कर्णद्वय आणी नेत्रद्वय। गुदोपस्थ मिळोनि समुचय। नव ही द्वारांचा ॥ ३३ ॥ मस्तक कुक्षि करूनि वेगळी। औठ कोटी रोमावळी। तितुकिं ही रंध्रें असोनि आगळीं। अकरा इयें ॥ ३४ ॥ असो मुख रेखिलें च्यारि अगुळें। बत्तीस दंत दोनि उणे आगळे। भीतरी जिव्हा खेळे[1]। अगुळें आठ ॥ ३५ ॥ अगुळें दोनि विचित्र। असे जिव्हेचें मूळपत्र। लबिका अधोमुख स्वतंत्र। अंगुळ येक ॥ ३६ ॥ आणी औठशत अस्तिचे कुटके। सोळा सांदीं जडले नेटके। सवा घट रुधिर मासळ मोटकें। आणि स्वहस्तें औठ हात ॥ ३७ ॥ ऐसें हें देह सगुणपणें। निर्माण केलें असे जेणें। त्या देवाची वार्ता कधीं कोणें। स्वप्नीं ही न बोलिजे ॥ ३८ ॥ तरी दिनकर ह्मणे ऐसें न करावें।

---

१ नेटकें.

ज्यानें निर्माण केलें त्यासी विचारावें । ह्मणिजे सार्थकरूप सर्वस्वें । इह-परत्रींचें ॥ ३९ ॥ सांगितली निज गर्भींची अवस्था । आतां सांगिजेल बाळपण संस्था । तें निजावधानयोगें सर्वथा । श्रोतीं कीजे श्रवण ॥४०॥ स्वस्ति श्रीस्वानुभवदिनकरे गुरुशिष्यान्वये । तृतीय वैराग्य कळापे । गर्भविवक्षाशरीरवर्णन निरूपण नाम । [1]द्वितीय कीर्ण प्रकाशः ॥ २ ॥

---

॥ श्रीराम ॥

अहो उपजतां चि हा बाळ । सोहं विसरूनि तत्काळ । कोहं शब्दें अति कोल्हाळ । मांडिलें रुदन ॥ १ ॥ तेथ नाना प्रकारें मळीन काया । असतां आवरी मम माया । स्तनपान देऊनि तया । आपुल्या जीवें जीववी ॥२॥ शरीर असत लुळलुळीत कोमळ । त्याहीवरी जठराग्नि-पीडा प्रबळ । क्षुधा बहुतां दिवसाची तुबळ । तेणें स्तन चोखी चुरचुरा ॥ ३ ॥ शरीरीं साहों न शके वेधना । वैखरीसी शब्द उच्चारेना । ह्मणोनि करीतसे रुदना । दुःख जालिया तळमळी ॥ ४ ॥ हर्ष जालियां हांसे खेळे । हात पाय नाचवी मोकळे । बंधन होतें जें गर्भखोळे । सुटलें ह्मणोनि ॥ ५ ॥ ऐसा दिवसेंदिवस थोर जाला । पुढें चालों बोलों हि सिकला । तेथें कोहंत्वास हि विसरला । मग अहत्वें हुबतसे ॥ ६ ॥ लागली इंद्रियांची पारखी । अवघीं मिळालीं येकसारिखीं । आपण हि तयाचेनि सुखीं । सुखावत जाय ॥ ७ ॥ पाहा हो मुळींचें आत्मत्व विसरला । जीवत्वाचिया खडकीं निसरला । मग अहदेह-कर्दमीं घसरला । ममत्वचिखलें गिडबिडें ॥ ८ ॥ ऐसा अपभ्रंश जाला भारी । तव वडिलीं आरंभिली प्रमाद [2]उजेरी । मेळऊनि ब्राह्मण मंत्रोच्चारीं । गांठी दिधली सेंडीसी ॥ ९ ॥ ब्रह्मसूत्राची भारदोरी गळां । मंत्रोपदेश भिक्षेचा सोहळा । लेहण्यावाचण्याचा उपराळा । पोट भरावया-कारणें ॥ १० ॥ वर्ण धर्म चाऱ्ही आश्रम । यांचा साधावा जो काळ-क्रम । तो तितुका हि व्यर्थ करूनि श्रम । नेमधर्म सांडिला ॥ ११ ॥

---

१ दडपण. २ उत्कर्ष. उजिरी=रीत.

पुढें व्रतबंधाचे दुसरे च दिवसीं । व्रतोछर्ग[1] करूनि साधिलें विवाहासी । तेथें ब्रह्मचर्य आणि वेदाभ्यासासी । चिरा पडिला सर्वस्त्रें ॥ १२ ॥ पुढें जीविकेस्तव राहिला वेदाभ्यास । कदापि केला तो लाविला पोटास । तेथें कैंचे वानप्रस्थ आणि संन्यास । गृहिणीकडे चि गुतला ॥ १३ ॥ जीवलगें अवघीं दवडिलीं दुरी । मायबापासी कैंची उरी । जीवलग मानूनि सखीं सोयरीं । सर्वस्त्रें जाला स्त्रीअधीन ॥ १४ ॥ तारुण्याचिया भरें चढला माज । सांडिली लौकिकाची लाज । मातेचा हि तटका तोडिला ते वाज । विऊनि जाली तत्काळ ॥ १५ ॥ नवमास वाइला जिनें उदरीं । साहिली प्रसूतिवेधना थोरी । पचूनि जिनें नाना नर्की घोरीं । बहुतां कष्टीं वाढविला ॥ १६ ॥ स्तनपानें जिचें सर्वांग शोषिलें । ह्मणौनि शरीर तिचें क्षीण जालें । येणें जयेच्या आंगावरि बहुत केलें । मूत्र आणि वांती ॥ १७ ॥ याचे पाउलीं खडा रुततां बोटेंसीं । जिचा जीव येकवटूनि होय क्लेशी[2] । जेव्हां चि कांहीं बरें न वाटे यासी । तेव्हां जे सर्वस्त्रें वोसात्रे[3] ॥ १८ ॥ जिची कामधेनु हि न पवे सैरी[4] । ते अपराध होता तत्काळ सव्हारी । माता अधिक चि स्नेह करी । परम अपराध हि करितां ॥ १९ ॥ ऐसी सर्वस्त्रें माता ये संसारीं । अनाथां जीवाची सोयरी । ते मातेसी दुव्हाऊनि दुराचारी । जवळी मानी स्त्रियेतें ॥ २० ॥ पाहातां पित्यासारिखा न दिसे स्नेहाळ । आजन्में केला जेणें प्रतिपाळ । काढूनि आपुले मुखींचे कवळ । पुत्रमुखीं घातले ॥ २१ ॥ जेणें जन्म देऊनि आकार निज । ह्मणौनि यासी ह्मणती आत्मज । सर्वस्व आपुलें अर्पूनि भाजे । लळे[5] पाळिलें बहुत ॥ २२ ॥ तो बाप येणें मानूनि पारिखा । जाला अत्यंत स्त्रीचा सखा । आणि बाळपणीचा सांगाती पाठिराखा । तो भाऊ पिसुण मानिजे ॥ २३ ॥ अहो श्रावणें कावडी करूनि मायबापांची । स्कंदीं वाहोनि सेवा करी त्याची । पुंडरीकें सेवा

---

१ व्रतोत्सर्ग, सोडमुंज. २ संबंध. ३ उद्विग्न होते. ४ बरोबरी. ५ आवड, संतोष, मोठेपणा

करितां मातापितरांची । पांडुरंगीं हि परि अनास्था ॥ २४ ॥ पुंडरीकें निजभावें पितृसेवा करितां । जगदीश सर्वस्वें आभारोनि तत्त्वता । पुंडरीकाचें दर्शन घ्यावया अवचिता । पंढरीक्षेत्रासी पैं आला ॥ २५ ॥ जेथें चंद्रभागेसारिखें तीर्थ पवित्र । पंढरीऐसें पुण्यपरायण क्षेत्र । तेथें पुंडरीकाचें पाहावया चरित्र । जगदीशा गमन निजांगें ॥ २६ ॥ पाहे तवं तयासी पितृसेवेवाचून । कांहीं चि न मने सहसा आन । तुष्ट मानूनियां श्रीभगवान । पितृसेवासुखीं रातला[1] ॥ २७ ॥ मग जगदीशें गोपाळवेष धरून । सुरस केलें वेणुवादन । येरें ईट दिधली झुगारून । बैसावयालागीं देवासी ॥ २८ ॥ परि न पाहे चि देवाकडे । तेणें देवासी परम साकडें । मी आलों येथें इडेंपाडें[2] । तें येणें व्यर्थ केलें ॥ २९ ॥ मी याचें पितृसेवातप ढाळीन । ह्मणौनि आलों इद्रेसीं[3] पण करून । तव टाकिलें येणें मज उपेक्षून । यासी उपाय काय कीजे ॥ ३० ॥ मग अतरीं देवें गजबजोन । धाबिरेपणें बोलिजे वचन । पुंडरीका माग माग तुज प्रसन्न । सर्वस्वें जालों आजी ॥ ३१ ॥ तवं येरें देइजे प्रतिवचन । ह्मणे पितृसामर्थ्यें मज काय असे न्यून । तूं सदाचा भिकारी परतंत्र होऊन । दारोदारीं हिंडसी ॥ ३२ ॥ तूं ब्राह्मणाचें होऊनि बाळ । बळीसी भीक मागूं गेलासी निखळ । शेवटीं जालासी द्वारपाळ । पाताळीं घाळूनि तयासी ॥ ३३ ॥ देवा मधुकैठभासी प्रसन्न जालासी । आणि त्याच्या मेदमांसें भूगोळ रचिसी । गरुडासी देऊनि वरदासी । स्वारी घातली तयावरी ॥ ३४ ॥ प्रल्हादासी प्रसन्न होऊन । त्याचा पिता मारिला पोट चिरून । महिरावणाची नरडी दडपून । हनुमंताकरवीं मारविला ॥ ३५ ॥ पुरोचनाचें कपटें घर घेतलें । त्याची स्त्री होऊनि त्यासीं मारिलें । पोटा येऊनि कारागृहीं पीडिलें । देवकीवसुदेवासी ॥ ३६ ॥ अपराध नसतां मारिले वानर । पितयासी नरकपतन अघोर । आणि विश्वमारक जे निशाचर । त्यासी बैसविलें स्वपदीं ॥ ३७ ॥ जिचिया पोटीं जन्मलासी । तिचिया

---

१ रत झाला. २ वीट ३ ( ? )

केलें शिरछेदासी । स्तनपान द्यावया आली माउसी । ते शोषूनि मारिली ॥ ३८ ॥ चोरी आणि परदारागमन । याचें तुह्मासी माहा भूषण । वृंदेसारिखी पतिव्रता सुलक्षण । व्रतभग केला तयेचा ॥ ३९ ॥ बाइल अग्नीमाजी लपऊन । व्यर्थ चि मारिले रावणादि ब्राह्मण । ऋषि-पत्नीसी लाविला चरण । आणि स्त्री मारिली ताटिका ॥ ४० ॥ वानरहस्तीं तरले पाषाण । तेथें आपलें मिरवीतसा भूषण । आणि पूर्वजांवरी कानाडी वोढून । बाण टाकिला व्यर्थ चि ॥ ४१ ॥ सुलोच-नेसी प्रसन्न होऊन । बोलिलेत कीं इंद्रजीत उठवीन ह्मणोन । सेवटीं तें अवर्वें चि आलें घडोन । आणि येकवचनी हे हाक त्रैलोकीं ॥ ४२ ॥ तैसें चि आजि हि प्रसन्न होऊ आलेती । माग माग ह्मणोनि भोगीतसा महती । आणि पेव्हेसाठीं सुदामयाप्रति । दात किरवितसा कैसे ॥ ४३ ॥ दुर्वास ऋषीचें सकट जाणोन । द्रौपदी करी तुमचें स्मरण । तेथें भुकेलों ह्मणौनि भाजीचें पान । खातां लाज न वटे चि ॥ ४४ ॥ पुंडरीक ह्मणे जी धन्य देवा । ज्या ज्या तुह्मीं केलिया अनंत मावा । तो तो तुमचा आठऊनि यावा । हास्य कीं रुदन करावें ॥ ४५ ॥ तुह्मीं इंद्राचे साह्यतेकारणें । करूं आलेती माझिये छळणें । तरी माझें काय होणें । तुमचेनि दयाळा ॥ ४६ ॥ तथापि जरी तुह्मी आलेती मजलागून । तरी मीं जें ह्मणेन तें तुह्मीं करावें आपण । ऐसें द्याल जरी भाषदान । तरी सांगेन सर्वथा ॥ ४७ ॥ देवें आइकतां चि पुंड-रीकाचें वचन । तथास्तु म्हणौनि दिधलें भाषदान । येरु म्हणे उसटं-लिया ध्यानाचें दर्शन । कदापि न वेणें आपणासी ॥ ४८ ॥ आणि म्यां जेव्हां तुजला पाहावें । तोंवरि तुवां येथें असावें । हें ठाकेलें तरि येथें असावें । नाहीं तरि जाय स्वस्थानासी ॥ ४९ ॥ इतुकें बोलोनि पुंडलीक । देवें ह्मणतिलें अवश्यक । मग अंतरीं ह्मणोनि सम्यक । ध्यान धारणा धरीतसे ॥ ५० ॥ जरि शृंगारेंसीं धरावें ध्यान । तरि

१ आकर्ण धनुष्यदोरी. २ पोह्यासाठीं ३ (?) ४ माया, कपट. ५ धैर्य, कृति (?) ६ उच्छिष्ट. ७ हें वचन कायम राहील तर.

कृष्णावतारीं तो दाविला पूर्ण । वीररसें श्रीरामचंद्रध्यान । फरशराम रौद्ररसीं ॥ ५१ ॥ वामनावतार हास्यरसें । नृसिंह शोभे रस बिभत्सें । वाराहअवतार अद्भुतरसें । शांतरसें कूर्मावतार ॥ ५२ ॥ मछावतारीं भयानकरस । एवं पाहातां खर्चले आठ हि रस । मग करुणारसें धरूनि निःशेष । पांडुरंगध्यान ॥ ५३ ॥ टाकूनि शंखचक्रगदापद्म । कटीं कर ठेविले निभ्रम । मस्तकींचा मुकुट ठेऊनि उत्तम । लिंग शोभे निजभाळीं ॥ ५४ ॥ विटेवरी समतापदें विराजमान । ऐसें निष्कळंक धरूनि पांडुरंगध्यान । पुंडलीका पाहे पां आतां फिरोन । [१]अनुच्छिष्टध्यान माझें ॥ ५५ ॥ ऐकतां पुंडरीक मनीं विचारी । यासी पाहावयाची कायसी तऱ्हीं थोरी । तथापि पाहातां पितृसेवेसी निर्द्धारीं । विघ्न वोडवेल येखादें ॥ ५६ ॥ ह्मणौनि सांगावया हें चि कारण । जगदीश जऱ्हीं आला आपण । तऱ्हीं पितृसेवा पुंडरीक न टाकीं ह्मणौन । तेथें जगदीश उभा अद्यापि ॥ ५७ ॥ ह्मणे दिनकररामदास । देवों गेलों पितृसेवेचिया दृष्टांतास । तंव पांडुरंगमाहात्मकथेचिया सुखास । अकस्मात लाधलों ॥ ५८ ॥ कीं ते वाराणसीच्या पंचक्रोशामाझारीं । कुर्कुट ब्राह्मण मातृपितृसेवा करी । त्याचिया स्मरणमात्रें निर्धारीं । दोष जाती जन्मांतरींचे ॥५९॥ ह्मणौनि मायबापाचिये सेवेचा । येवढा महिमा असतां साचा । हा प्राणी त्याग करूनि तयांचा । करी सेवन स्त्रियेचें ॥६०॥ स्वस्ति श्रीस्वानुभवदिनकरे । गुरुशिष्यान्वये । तृतीय वैराग्य कळापे । बाळतरुणावस्थावर्णन पांडुरंगमाहात्मकथानिरूपणं नाम । तृतीय कीर्ण प्रकाशः ॥३॥

---

॥ श्रीराम ॥

तरि पुण्यपरायण पांडुरंगमहात्मकथा । अकस्मात दृष्टांतीं योजिली सर्वथा । श्रोतीं क्षमा करूनि मज अनाथा । न कोपावें सहसा ॥ १ ॥ अहो आधीं च हातसोंके लेंकरूं । मातेनें सहसा नये करूं ।

---

१ पूर्वी कधीं हि न धारण केलेलें २ ज्याची मातृपितृभक्ति पाहून पुंडलीक, जो पूर्वी द्रोही होता, तो भक्त झाला. ३ नेहमीं ज्याला घ्यावयास पाहिजे, घेऊं पाहरी.

यद्यपि केलें तरि मग आभारू। सांगेल कवणा ॥ २ ॥ कां तें श्रीमंतीं पाळिलें आवडीं वानर। तेणें केले जरि मग वेडेचार। त्यावरी कोपलियां समर्थासी अविचार। काय ह्मणणें असे ॥ ३ ॥ अथवा पक्षियासी सिकविला बोल। तें सुक्त असुक्त करील चि कीं किलबिल। त्याचा शीण मानिलयां नवल। काय करणें असे ॥ ४ ॥ तेवि मी आधीं च संतांचें लाडिकें। परि निजकृपां दिधलें प्रथमातुकें[1]। तरि मी जें बोलेन तें समर्थें निकें। करूनि घेतलें पाहिजे ॥ ५ ॥ जरि आवडीं पोसणें पोर घेतलें। तरि तें जें करील तें पाहिजे सोसिलें। उपेक्षीलियां बरें ह्मणिविलें। पाहिजे लोकीं ॥ ६ ॥ मां मी तरी तुमचें क्लेशार्जित तान्हें। वरि निजस्नेहें वाढविलों आदरें। तरि माझें सावडें बोबडें बोलणें। तेणें रिझाल चि तुह्मी ॥ ७ ॥ हा म्यां दृढ जाणोनि भरवसा। धरिला स्वानुभवदिनकरीं धींवसा[2]। तो तुह्मीं अंगिकारूनि निज संतोषा। रूढ केला पाहिजे ॥ ८ ॥ ऐसा स्वानुभवदिनकरचंद्रोदय। होतां चि उचंबळोनि क्षीराब्धिसतहृदय। तेणें अवधानामृतें दशदिशामय। पूर्णत्वें आक्रमिलें ॥ ९ ॥ कां जे आरुष आणि गोड बोल। अर्थभरित असोनि अति सखोल। ऐकतां चि परम सुखें आला डोल[3]। संत सज्जन श्रोतयांसी ॥ १० ॥ मग डोलोनि प्रेमाचिया पडिभरें[4]। रामदासीं दिनकर आलिंगूनि अत्यादरें। बोलिलें निजकृपा वाक्यें मधुरें। अति रसाळपणें ॥ ११ ॥ बा रे तुझया स्वानुभवदिनकरोदयें। संतस्वानंदहृत्कमळीं विकाश होये। आणि मुक्तिमोक्षचक्रवाकीं लाधोनि सोये। निज ऐक्यतेची ॥ १२ ॥ आधीं च अध्यात्मग्रंथ आणि रसाळ बोलणें। त्याहिमाजीं भगवत्कथान्वयें सांगणें। अर्थतात्पर्य असोनि ब्रह्मनिरूपणें। स्वानुभवदिनकरीं बोलसी ॥ १३ ॥ तरि आह्मासी याची बहुत आवडी। साबडिया बोलांची परम गोडी। सहसा न मनुनियां सांकडी। ग्रंथ बोलें निजसुखें ॥ १४ ॥ तथापि निजसत्तां तू न बोलसी। श्रीगुरूचिया सामर्थ्यें बोलों लाहसी। तरि तुज बाधा कायसी। बोलकेपणाची ॥ १५ ॥ या संतवाक्यचंद्रो-

१ बरें वाईट. २ धैर्य. ३ संतुष्ट होऊन मान डोलवणे. ४ अधिकपणें.

दयासरिसें । दिनकरमानस सोमकांती आपैसें । वक्तृत्वपाझर चालिले ते श्रवणवशें । चकोरश्रोते स्वीकारतील ॥ १६ ॥ आतां असोतु का यथा उपपत्ति । लाधोनि सतवाक्याची बळेंसविचि । स्वानुभवदिनकर ग्रंथोक्ति । रामदासकृपा ॥१७॥ तव श्रीगुरु ह्मणती निज शिष्यासी । सावध होइ पूर्वानुसधानासी । अनिष्ट जाणोनि ससारासी । साधीं स्वहित आपुलें ॥ १८ ॥ मायबापीं पुत्राचे नर्क बोझ सोसिले । मळ मूत्र धुऊनि नाना क्लेश केले । सेवटीं पुत्रें त्यासी बाहेर घालूनि आणिलें । सासुसासरयांसी घरा ॥ १९ ॥ ऐसेनि स्त्रियेसीं करिता घराचार । सर्व सोडिला आचार विचार । द्रव्य मेळवायासाठीं करितां अनाचार । पाहेना मागें पुढें ॥ २० ॥ पुत्रपौत्रीं वाढली सतति । पित्यासारिखे पुत्र ऐस्या श्रुति बोलती । कुटुंब पोसितां पाळितां विश्राती । तिळाइतुकी न दिसे पैं ॥ २१ ॥ ह्मणे येक मी आणि माझें सर्व हि । मी आजि सबळ इये देहीं । माझें जें कां सकळ काहीं । तें उत्तम चि आघवें ॥ २२ ॥ स्त्री तरि माझी येकी सुदर । सर्वानुकूळत्वें सादर । आणि माझे चि ठाईं आदर । हेतु प्रीति तयेची ॥ २३ ॥ पुत्र तरि माझा चि सगुण । स्वकार्यीं दक्ष असे पूर्ण । आजि मज विश्राति गहन । दिधली येणें ॥ २४ ॥ द्रव्याढ्य तरि मी चि येक । पृथ्वीचे धनद माझे सेवक । गृह परिवार सम्यक[1] । माझा चि आजि ॥२५॥ इष्ट मित्र बंधु बहिणी । कन्या जामात व्याही विहिणी । या विश्वामाजी परम सन्मानी । तो मी चि येक ॥ २६ ॥ अहो मजसमान आणिक दुसरा । संततिसपति-योगें पुरा । त्रैलोक्यामाजी ससैरा[3] । न देखों आणिकांचा ॥ २७ ॥ ऐसा सकळयोगें मी समर्थ । मज चि अनुकूळ सर्व हि अर्थ । मजवेगळें केवळ हें अनाथ । भुवनत्रय ॥ २८ ॥ येक मी आणि सर्व हें माझें । ह्मणोनि देहसगें वाहे बोझें । प्राणी अभिमानें चि फुजे । मी आणि माझें-पणें ॥ २९ ॥ तरि मी आणि माझेंपणें ह्मणणें हें केवळ । तें या देह-संगाकरितां सकळ । पाहातां आद्यत देहमूळ । तवं कौतुकवाटे ॥३०॥

---

१ ज्ञानरूप बळ. २ चांगला. ३ संसार.

देह पाहातां दिसे सुंदर । परि केवळ नर्काचें बिढार । ययासारिखें पैं अंतुर । नाहीं आणिक ॥ ३१ ॥ या देहाची कांहीं शाश्वतता । न दिसे पैं कदापि पाहातां । केवळ दुःखमूळ चि तत्वता । देहसंग संपूर्ण ॥ ३२ ॥ पाहातां या देहासी आद्यंत । तव हें केवळ अविद्याजनित । आणि समूळत्वें नाशिवंत । क्षणभंगुर ॥ ३३ ॥ देह विकल्पाचें बोतिंव । देह पापाची हैंवात्र । देह व्याधीचें चि पेंव । पूर्णभरित ॥ ३४ ॥ देह काळसर्पाचें खागें । देह गर्वाहंकारें दैंाटुगें । देह नाना दुःखीं सर्वांगें । भरलें दिसे ॥ ३५ ॥ देह यमाची जाचणी । देह निरयांची खाणी । नाना मळमूत्रपोहाणी । तें हें देह ॥ ३६ ॥ देह नाना दोषाचें वेंसौटें । किं हें क्लेशाचें चि गोमटें । देह अविधीचें मांजे- वटें । दिसतसे किं ॥ ३७ ॥ देहयोगें काम लैंाठा । देह क्रोधाचा दार- वठा । शोक अत्यंत कुरेठा । या देहसंगें ॥ ३८ ॥ देह मोहाचें दांगें । देह भयाचा परम पांग । त्रिविधतापेंकरूनि याचें सर्वांग । पोळलें दिसें ॥ ३९ ॥ देह दंभाचें भरिंव । दर्पाची जेथ रांणिव । अभिमानाचें सामर्थ्य अपूर्व । देहासी समूळ ॥ ४० ॥ आसुरी संपदा जितुली । ते या देहसंगें बळावली । कल्पना सांवेव भरली । दिसे जेथ ॥ ४१ ॥ ईषणा वासना कल्पना । असूया निंदा दुष्ट भावना । द्वेष तिरस्का- रादि नाना । या देहसंगें ॥४२॥ कुतर्का जेथ मोठेंपण । जेथील अधि- ष्ठात्रें अज्ञान । पापाचें उघड आचरण । अखंड जेथ ॥ ४३ ॥ जें देह कोंढियाचें क्षेम । नाना रोगांचें वसतें धाम । संदेहाचें केवळ ग्राम । मूर्तिमंत ॥ ४४ ॥ देह कुकर्माचें बोतिंव । निषेधाची जया अति हांव । देह भूलीचें चि भरींव । पोकळपणें ॥ ४५ ॥ देह लोभाचें आर्जव । देह मत्सराचें मार्दव । मदत्रयाची हवांव । मोठेपणें जें ॥ ४६ ॥ देह

---

१ उतावीळ. २ शोभा. ३ चंद्रसूर्याभोंवतीं ज्याप्रमाणें खळें असतें त्या- प्रमाणें देहाभोंवतीं काळरूपी सर्पाचें खळें आहे. ४ बलाढ्य, अनिवार. ५ वस्ति. ६ उन्माद. ७ मोठा. ८ उबरठा. ९ कुरठा=घरटें. १० अरण्य, वन. ११ राज्य. १२ शोभा.

निद्रेचें परम माधुर्य । आळस्या जेथ ऐश्वर्य । मैथुनाचें देह कार्य । कारणरूप ॥ ४७ ॥ ऐसें असोनि क्षणिक । निद्यपणाचें जेथ कौतुक । क्रिमीचें तरी निष्टंक । भांडार जें ॥ ४८ ॥ देहाचा समूळ पाहोनि विचार । त्राहे ह्मणौनि कांटाळे दिनकर । ऐसिया देहाचें सार्थक रामचंद्र । सत्वर करू सत्सगें ॥ ४९ ॥ अहो अन्न केवळ परब्रह्मात्मक । रस बोलिजे विष्णुरूप सम्यक । तें जया सगें निष्टक । मळ आणि मूत्र होये ॥ ५० ॥ पहा जया अन्नाकारणें । देवीं मृत्युलोक वसवणें । पितृलोक सपोशपणें[1] । जयास्तव ॥ ५१ ॥ मनुष्यां आणि तयां भूतां । जया अन्नें नित्य तृप्तता । पंचमहायज्ञ जयाकारितां । चालती नित्य ॥ ५२ ॥ ज्या अन्नें अग्नि संतृप्त । देव ब्राह्मण अतिथि अभ्यागत । जीवमात्र सुखी होत । ज्या अन्नाकारितां ॥५३॥ जया अन्नरसासाठीं । त्रैलोक्य भिडकलें[2] अति सकटीं । जें क्षणामधें विश्व आटी । नाहीं होतां चि ॥५४॥ जयाकारणें यज्ञ पर्जन्य । विश्व यासी अति अनन्य । जयायोगें सकळ मान्य । प्राणिमात्र होती ॥ ५५ ॥ ऐसें हि परि उत्तम । चतुर्विध योगें सुगम । लेह्य[3] पेह्यादि[4] यथाक्रम । खाद्य[5] चोष्य[6] ॥ ५६ ॥ येकें कडुवीं आणि क्षारें । तिक्षणें अंबीळें तुरटारें । येकें केवळ मधुरें । क्षुधाहारकें ॥५७॥ ऐसीं नाना प्रकारें दिव्यान्नें । भक्षितां अमृतोपमें सदन्नें । तें तत्काळ होती इष्टा वमनें । या देहसगें तत्काळ ॥ ५८ ॥ आणि त्रैलोक्याचें सजीवन । साक्षात् आपोनारायण । ज्याच्या योगें पुण्यपावन । विश्व सकळ ॥५९॥ सुगंधित आणि सीतळ । असतां हि तीर्थ गंगाजळ । तें पान करिता चि होय तत्काळ । देहसगें मूत्र त्याचें ॥ ६० ॥ ऐसा हा देह परम अपवित्र । शुद्धता नसे यासी अणुमात्र । आणि मृत्युलोकीचें तरी मिराशीपत्र । घेतलें येणें ॥ ६१ ॥ ऐसिया देहाचें तें चि सार्थक । धरूनि सतसंग सम्यक ।

---

१ सपोष=पुष्ट २ धाधावले. ३ चाटून खाण्याचे पदार्थ ४ पिण्याचे पदार्थ. ५ भात, वरण ५ [illegible] सिद्ध जे खाण्याचे पदार्थ ते. ६ चोखण्यास योग्य असे पदार्थ.

सारासारविचारें घडे सुख । ह्मणे दिनकर रामदास ॥ ६२ ॥ स्वस्ति श्रीस्वानुभवदिनकरे गुरुशिष्यान्वये तृतीय वैराग्यकळापे । नरदेहनिंद्यप्रकार वर्णननिरूपणं नाम चतुर्थ कीर्ण प्रकाशः ॥ ४ ॥ ॥ श्रीराम ॥

---

॥ श्रीराम ॥

अहो हें नरदेह सर्वांसी आद्य । थोरपणें सर्वांत प्रतिपाद्य । परि हें अल्पायुष्य जाणार सद्य । क्षण न लगतां सरे ॥ १ ॥ कमळदळावरी अंबुकण पडिला । तो न कळे केव्हां निसरोनि गेला । तेवि या जीवत्वाचा भर्वसा धरिला । न जाय कोण्हाचेनि ॥ २ ॥ नाव तरता ते उदकावरी । अणुप्रमाणें छिद्र पडता भीतरीं । क्षण न लगतां अवसरीं । उदक भरोनि ते बुडे ॥ ३ ॥ नवल वाटतसें हें चि थोर । शरीरनाव असोनि शत जर्जर । वायु होऊनियां स्थिर । शरीरातें चाळीतसे ॥ ४ ॥ पाहातां हें सामर्थ्य नव्हे शरीराचें । अथवा मायबापां सख्या सोयऱ्याचें । हें करणें ज्या परमात्मयाचें । त्यासी कोण्हीं पुसेना ॥ ५ ॥ व्यर्थ चि कावाडीं गुतला । प्राणी मी माझें ह्मणतां चि मेला । अतीं यासी सोडवायाला । कोण्हीं हि न येती सर्वथा ॥ ६ ॥ आयुष्य व्यर्थ जातसे पळेंपळ । हें लक्षकोटी वेंचिता हि नव्हे निश्चळ । प्राणी ससारीं उगा चि करी तळमळ । परि सार्थक न करी आपुलें ॥ ७ ॥ शरीरीं जीवित्व परम चचळ । तत्काळ नाशे न लगतां पळ । मग नरदेह लाधलियाचें फळ । काय प्राणियासी फळलें ॥८॥ पाहा ते मसकेमद्धें वायु फुगला । तो वाळाग्र छिद्र पडता तत्काळ सरला । शरीरासी अनेक छिद्रें असोनि थांबला । हें नवल कोण्हीं उमजा पां ॥ ९ ॥ त्यात अकरा छिद्रें अति विशाळ । कर्ण नेत्र नाशिक मुखकमळ । गुदोपस्थ आणि स्तनयुगुळ । मिळोनि अकरा हे ॥ १० ॥ बारावें गुप्तद्वार मस्तकीचें । यावेगळे छेद औट कोटि रोमावळींचे । पाहा नवल वाटतें त्या परमात्मयाचें । जे ऐसियांत थांबला वायु ॥११॥ ह्मणौनि धन्य त्या आत्मयारामाची

१ पाण्याचा थेंब २ मसक=कातड्याची पिशवी. ३ कीं.

कळां । देहखोंकरीं भरोनि वायु जळा । विषयमत्त प्राणियां सकळां । आयुष्यद्वारा प्राशवी ॥ १२ ॥ ऐसें हातींचें हातीं देखतां नयनीं । परि विषयभोगीं लोधले प्राणी । अहंकारें अंतरीं मुसमुसुनी । अनहित करिती आपुलें ॥ १३ ॥ पाहा या नरदेहासारिखा नीधे । हातीं लागला परि न होती सावध । विषयभूलीं अहंकारें अंध । होऊनि कैसे राहिले ॥१४॥ ममता भ्रांति अडखळती । विषयकर्दमीं अंधकूपीं पडतीं । मग माझी स्त्री माझा पुत्र हाकलिती । गृहधनपरिवारालागीं ॥ १५ ॥ व्यर्थ आयुष्याचा करूनि मातेरा । प्रपंचालागीं धावतसे सैरा । असले वादाचा घालूनि पसारा । प्रपंच पोसी परोपरीं ॥१६॥ अतीत अभ्यागत आलियां घरासी । त्यावरी जैसें कुतरें वसवसी । कळांतरें काढूनि व्याह्याजावयांसी । पाया पडोनि समजावीत ॥१७॥ तरि आहा देवा कटांकटा । नरदेह लाधोनि गोमटा । नाना प्रकारें संसारकष्टां । प्राणी भोगिती परोपरीं ॥ १८ ॥ आपण कधीं न खाय पोटभरी । धर्मी ब्राह्मणांसी न खर्ची दुराचारी । स्त्रीपुत्रप्रपंचाची सर्वस्वें गारी भरी । विषयांध दुरात्मा ॥ १९ ॥ बाळपणीं खेळतां क्रमला काळ । तारुण्यामाजी घाली विषयांचा गोंधळ । वृद्धपणीं मोहममतेची तळमळ । व्यर्थ चि करीतसे ॥ २० ॥ सेवटीं आयुष्य सरलीया येकलें चि जाणें । अवघीं जेथील तेथें राहाती पीसुणें । केलें कर्म येकल्या जीवें भोगणें । स्वर्गनर्कादि भोक्तृत्व ॥ २१ ॥ नरदेहासी आलियाचें तें चि सार्थक । जें भोगणें चुकती नर्क । सद्गुरुकृपा होऊनि निष्टंक । मोक्षप्राप्ति जालियां ॥ २२ ॥ हा सर्वांस चांगला ह्मणोनि पाळिला । तरि हा सार्थकेंविण वाया गेला । जरी निकामी ह्मणोनि अवगणिला । तरि आत्महित चुकलें चि ॥२३॥ पाहातां दोहींकडूनि हा घातक । सत्संगें न घडे जव सार्थक । तवं योनी चौऱ्यासीं लक्ष अवश्यक । फिरणें सहसा चुकेना ॥ २४ ॥ नरदेह ह्मणों जरि उत्तम चांगला । तरि याकरिता प्राणियासी घाला पडिला । अहंकारा वरपडा

१ खोकरें=फुटकें. २ निधि. ३ कर्ज ४ कटकटा किंवा त्रुसतें कटा=१ भारंधा. १ खाच, खळगा.

होऊनि वहिला । जन्ममृत्यु भोगितसे ॥ २५ ॥ आणि याचें दिसे येक कौतुक । चतुर्विध अन्न सेवितां सम्यक । तत्काळ इष्ठा होय अथवा वमक । दुर्गंधी अमंगळ ॥ २६ ॥ गंगाभागीरथीचें प्राशितां उदक । त्याचें वोंगळवाणें मूत्रपाक । न होतां मळ मूत्र आणि वमक । हें तत्काळ पडे पृथ्वीवरी ॥ २७ ॥ पाहाता हें आद्यंत नर्कपोतले । आणि नर्कांत चि अवघें वाढलें । सेवटीं निर्माण हि जाहालें । नर्कद्वारेंकरूनि ॥२८॥ ज्या ठायाचें घेऊं नये नांव । तेथें चि याचा होतसे संभव । जें केवळ नर्कांचें सचलें पेंव । तेथें जन्म होतसे याचा ॥ २९ ॥ तो हि जन्मला नाना संकटीं । अधोमुख उकडला नवमास पोटीं । इष्ठा मूत्र पचत अति कष्टीं । बाहेर पडे अति सायासें ॥ ३० ॥ गर्भीं असे तंव ह्मणे सोहं । बाहेरी पडे मग रडे कोहं कोहं । दोन्ही राहोनि तरुणपणीं अहं । आपले ठाईं डुबे ॥ ३१ ॥ मग अहंकारें डुबतसे प्राणी । तेणें दृष्टीसी कोण्हास हि नाणी । वैभवाचा ताठा आंगीं भरोनि । मग चाले उत्ताणपणें ॥ ३२ ॥ तंव आंगीं बैसतीं प्रपंचतडाखे । तेणें आंरबळे[1] क्षणेक दुःखें । सवें चि तें विसरोनि हैरिखें[2] । संसार आटोपूं धांवे ॥३३॥ संसारीचें सुख जरि सांगावें । तरि तें सांगितलें संसारकीर्णीं आघवें । पाहातां या संसाराच्या नावें । ईश्वर हि होय अति दुःखी ॥३४॥ असो ऐसिया संसारामाजी । प्राणी लोळे जन्हि अति दुखसमाजीं । तऱ्हि सावध नव्हे आत्मस्वहितकाजीं । यासी कोणें काय कीजे ॥ ३५ ॥ ह्मणौनि कोण्हि येकानें ऐसें न करावें । नरदेहासारिखें रत्न लाधल्यां दैवें । सत्संगति श्रवणें मननें साधावें । निजहित आपुलें ॥ ३६ ॥ ऐसा शिष्य स्वानंदें वाडेंकोडें[3] । सद्गुरुपुढां शब्द बोले साबडे[4] । तें वैराग्य आयकोनि निवाडें । निवाले संत महंत ॥ ३७ ॥ इतुकेनि वैराग्यकळाप संपला । पुढें विवेककळाप निरोपिला । सावध होऊनि पाहिजे ऐकिला । संतश्रोतीं श्रीमंतीं ॥३८॥ तरि स्वामींसी ह्मणे मीं व्हावें सावध । हा चि येक थोर माझा अपराध । जे मीपणाचा धरूनि रोध । सरोबेरी[5] करूं पाहे ॥३९॥

---

१ आक्रोशे. २ आनंदानें ३ वाडेंकोडें=अत्यंत ४ भोळसर. ५ सरोभरी=आदर.

जेवि न विचारितां आपुलें लोखंडपण। परिसेंसीं देऊं धावें आलिंगन। किं तो चद्र धरूनि ठाके पूर्णपण। क्षीरसमुद्रापुढें ॥ ४० ॥ तेवि मीं न जाणोनि हीन दीन। स्वामीसी बोले अवज्ञा करून। परि काय जालें तन्हीं आपुला निजगुण। स्वामी करितील अवश्य ॥४१॥ अधकार जन्हीं सरसावोन। सूर्यापुढें उभा ठाके आपण। तवं सूर्यें तत्काळ देदिप्यमान। केला प्रकाशरूप ॥ ४२ ॥ तैसें या समर्थाचें करणें। असंभवनीय दिनकर ह्मणे। आपुलें सौरभ्य देऊनि झाकणें। अवगुण दुसरियाचा ॥४३॥ मां मी तव सर्वस्वें तुमचा चि। तेथ माझें साह्य करणें तुह्मांसी सहजें चि। तरि लाज राखोनि शरणांगताची। सरतें पुरतें करावें ॥ ४४ ॥ दिनकर रामींरामदासां ह्मणे। मी तुमचा कायावाचामनें। तरि न्यून तें पूर्ण करूनि थोरपणें। द्यावाल चि किं ॥ ४५ ॥ पाहातां तें ध्वजावस्त्र केवढें। परि राजा सर्वस्वें त्यासी वोढे। अथवा चालवी आपुलेनि पाडें[1]। मुद्रांकित पत्र जैसें ॥ ४६ ॥ तैसा मी तुमचा मुद्रांकित। मज स्वपदीं ठेवणें हें तुह्मांसी उचित। स्वानुभवदिनकराऐसें प्रस्तुत। खाजें देऊनि ॥ ४७ ॥ इति श्रीस्वानुभवदिनकर। जाला तृतीय वैराग्य॰ कळाप रुचिर। विवेककळाप सपरिकर। बोलिजेल पुढें ॥ ४८ ॥ दिनकर रामदासीं शरण। रामदास दिनकरांतर्बाह्य पूर्ण। दिनकरराम-दासीं अनन्यपण। सहजस्थितीसीं ॥ ४९ ॥ स्वस्ति श्रीस्वानुभवदिनकरे गुरुशिष्यान्वये तृतीय वैराग्यकळापे नरदेहवंद्यनिरूपणं नाम पचम कीर्ण प्रकाशः ॥ ५ ॥ येकुण कळाप ओवीसंख्या ॥ २६९ ॥ श्रीराम

---

## ॥ विवेक कळाप चवथा ॥ ४ ॥

### ॥ श्रीरामचंद्रः सहायः ॥

ॐ नमो जी सद्गुरुराया। अनाथजनकैवारिया। साष्टांग दडवत तुझिया पायां। कायावाचामनेंसीं ॥ १ ॥ नमो भक्तचातकांबुद। तुझिया

---

[1] मुबाचित्व, मोठेपणा

दर्शनें परमोल्हसित संतशिखिवृंद । करिती प्रेमाश्रुसहित नर्तन स्वानद । सोहं शब्दें निज टाहो ॥ २ ॥ नमो विरक्तिवनश्रिया निज वसंत । तवागमनें भक्तिकोकिळा कळिरवें कुजत । आणि गगनचुबित लगडले शिष्य अच्युत । निज मोक्षफळेंसीं ॥ ३ ॥ नमो संतसज्जनवनचदना । निजानुग्रहपरोग देऊनि मुमुक्षुजना । स्वानदसीतळता निवऊनि सतसज्जना । केलें त्रिविधतापोपशम ॥ ४ ॥ नमो भक्तभावभुवनदीपा । अज्ञानांधकार निर्शूनि स्वरूपा । ज्ञानप्रभा स्वयप्रकाशस्वरूपा । त्रिदोषतापोपशमना ॥५॥ नमो भोगमोक्षद्विशीर्षा पुरुषार्थचतुशृगा । सप्तावरणसप्तभुज निजप्रबोधमेशगा । त्रिस्थानत्रिपद सच्चिदानदत्रिशिखांगा । संसारवनदहना ॥ ६ ॥ नमो अज्ञानतमनिजोदयसूर्या । मुक्तिमोक्षचक्रवाक्यीं ऐक्य करूनिया । विरक्तिकमळविकाशीं सुगंध घेऊनिया । सतभ्रमर झुकारती ॥ ७ ॥ नमो सज्जनचकोरसुचद्रा । मुक्तिकुमुदोल्हसित सतोडुगणसाद्रा । आणि शिष्यस्वानुभवक्षीरसमुद्रा । भरितें दाटे तवोदयें ॥ ८ ॥ नमो स्वानुभवामृतक्षीरार्णवा । निजमथन आसुरीदैवीयोगें दैत्यदेवां । मग अमानित्वादि अष्टादश रत्नप्रसवा । आणि शिष्यचद्रदर्शनीं हेलावेंसी ॥ ९ ॥ नमो स्वानुभवमखेंअनतोत्तीर्णा । विरक्तिशचिपति सद्भावचतुर्दंतवहना । स्वानदसाम्राज्यअमरपुरविहरणा । सतसमूहसुरगणेंसीं ॥ १० ॥ नमो चतुर्वेदानुभवचतुरानना । करीं स्वानदकमडलु निजहंसवहना । स्वरूपा शारदा दशनादीं ब्रह्मविणा । घेऊनि अनुसधानीं गातसे ॥ ११ ॥ नमो नवविधभक्ति मुक्ति दश दिगबरा । शांतिक्षमाउमागगावर सद्गुरु शकरा । दशनाद डमरु त्रिगुणातीत त्रिशुळधरा । सद्भावनदीवरि आरोहण ॥१२॥ नमो कैवल्यक्षीराब्धितटनिवासा । सद्भावशेषशयन रमामुक्तिविळासा ।

---

१ सतसघ हा च कोणी मयूरसमुदाय. २ कलरव= मजुळ स्वर. ३ पराग= सुवास. ४ अग्नीच्या स्वरूपाप्रमाणें सद्गुरूचे स्वरूपाची कल्पना केली आहे. ५ आत्मज्ञान हें च ज्याचें वाहन (मेष=मेंढा यावर गा=गमन करणारा. ६ प्रस्थानत्रय. ७ त्रिशिख=त्रिशूल. ८ चद्रविकासी कमल. ९ संतरूपी नक्षत्रांची दाटी. १० नम्रता वगैरे अठरा गुण. ११ आनदानें हेलकावे घेतोस १२ मख=यज्ञ. १३ ऐरावत. १४ स्वैर सचार करणारा. १५ हें शारदेचें विशेषण.

निजानुभव पद्मजें प्रबोध खगेशा[2] । सुख संतोष नारद तुंबर ॥ १३ ॥ नमो नमो सद्गुरु पतितपावना । पुनःपुना नमो तुज जगजीवना । स्वानुभवदिनकर आणूनियां मना । सिद्धी पाववीं निजकृपा ॥ १४ ॥ गुरुराया तुझिया स्तवनामिसें । काटाळीं[3] रचिलीं असमेंसाहासें । तो परम अन्याय ऐसा निजमानसें । कळों सरला मज ॥ १५ ॥ येन्हवीं देवा तू निर्गुण निर्विकार निसंग । निरुपाधी निराधार अभंग । तया तुज म्यां अज्ञानपणें वगे । समतेचा लाविला ॥ १६ ॥ तरि देवा ब्रह्मादि इद्र चंद्र हरि हर । हे अनन्यभावें तुझे दास्यत्वें किंकर । असोनि तयाचिया स्वरूपें तुज साचार । वाचाळपणें स्तविलें ॥ १७ ॥ जेवि कां क्षीराब्धि कल्पिजे थिल्लरासम । कां तें अमृतासी देइजे कांजीचें उपम । अथवा गरुडासी पतंगभावें निभ्रम । मानूनियां वर्णिजे ॥१८॥ ऐसें जी सद्गुरुस्वामी कैवल्यपति । तुज वर्णू गेलों सखया स्वमतीं । परि प्रस्तावोनि मज वाटतसे खति । आपुल्या कर्तुत्वाची ॥ १९ ॥ तरि देवा असो निज तान्हयाचा अपराध । मातेवीण कोण क्षमा करिल येवंविध । तेवि माझा जालयां अनतापराध । क्षमा करणार तूं चि समर्थ ॥ २० ॥ इतुका परिहार जवं शिष्य बोलों न पुरे । तव श्रीगुरु आलिंगूनि बोलिजे पडिभरें । बा रे तुझिया वक्तृत्वें स्वानंदासी चेईरें । अकस्मात जालें माझया ॥२१॥ जेवि कां गजेंद्रें विष्णुस्मरण कारितां । कीं द्रौपदिया धावा पोकोरिता । लवडसवडीं अकस्मात न विचारितां । सत्वर तांतडीं धाविजे ॥ २२ ॥ तेवि तुझिया धाविरेंपणें आजि । जालें माझिये अतःकर्णसमाजीं । तरि कांहीं वेगळिक असे तुजमजमाजीं । जे तूं इतुकें बोलसी ॥२३॥ अरे दोहीं पदीं येक चि चालणें । कां दोहीं होटीं येक बोलणें । कां तें दोहीं डोळां येक चि पाहाणें । तेवि तुज मज ऐक्यता सहजें ॥२४॥ कां जैसा प्रकृतिपुरुषाचा समंध ।

---

१ ब्रह्मदेव. २ गरुडास. ३ उपमा. ४ असख्यात, अनिवार. ५ कलक. ६ डबक्याप्रमाणें. ७ पेज, धुवण. ८ झोपेंतून जागा झाल्याप्रमाणें माझा आनद मजमध्यें लीन होता तो स्फुरद्रूप झाला. ९ फोकरणें=प्रगट करणें. १० लगबगीनें.

अथवा तें सूर्य आणि प्रभेचें द्वद । किं साकर आणि गोडी द्विविध । काय वेगळिक असे ॥२५॥ किं त्या बुबुळा आणि त्यांतिल बाहुली । वेगळिक देखिजे का जितुली । तेवि तुझी आणि माझी बोली । वेगळेपणाची ॥ २६ ॥ असो पैं आकाशा आणि नीळिमेसी । भेद कां जितुला देखसी । तेवि तुज आणि मज निश्चयेंसीं । भेद नसे चि पां ॥ २७ ॥ तेथें तुवा करूनि काटाळें मजसीं । स्तविलें मजलागीं नाना रूपेंसीं । ह्मणौनि धाबिरेंषणें कासाविसी । व्यर्थ चि कां होणें ॥२८॥ अरे स्वानुभवें पाहातां इथभूत । आब्रह्मादि अनुरेणांतपर्यंत । आह्मांवेगळें काय असे तें निश्चित । दाखऊनि देई पा ॥ २९ ॥ आणि सगुण रूपें हि पाहातां स्वानुभवें । आह्मांवेगळें तुज जें जें का आंगवे । तें दाखवीं पां सत्वरीं आघवें । जें वेगळपणें देखसी तें ॥ ३० ॥ ऐसी ऐकता चि श्रीगुरुवाक्याची उजारि । सूक्ष्म दृष्टीं शिष्य जव अंतरीं विचारी । तवं सचराचरयोगें स्वानुभवदिनकरीं । सहजस्थिति निज ऐक्यता ॥ ३१ ॥ मग दृश्य पदार्थ दृश्यत्वें जितुका देखिजे । तितुका अशाश्वत असे पैं सहजें । अशाश्वत जाणोनि मग वारिजे । सकळ नाहींपणें ॥ ३२ ॥ दृश्य सकळ नाशिवंत ऐसें जाणिजे । मग काटाळें चि वेगळेपणें कां भाविजे । पाहाता स्तव्य स्तवन हें बोलिजे । स्तवीतयांचे आवडीं ॥ ३३ ॥ येऱ्हवीं सद्गुरुस्वरूप केवळ शाश्वत । तेथ काय चालेल हेतँ दृष्टांत । ब्रह्मादि हरिहर होती कुंठित । जया स्वरूपानुभवें ॥ ३४ ॥ वेदीं धरिलें जेथ निजमौन । शेष बोलों गेला जाणीव धरून । जिव्हा चिरलियां श्रमी होऊन । मग सहस्रानननी निवात ॥ ३५ ॥ वशिष्ठ कपिलादि व्यास वाल्मिक । भृगु भरद्वाज गौतम शुक । याज्ञवल्की जमदग्नि राजा जनक । जये स्वरूपीं निवांत ॥३६॥ वामदेव विश्वामित्र अवधूत । अत्रि अब्रऋषि दुर्वासादि महंत । आदिमीन गोरक्षी मछेंद्र दत्त । जये पदीं सुलीन ॥ ३७ ॥ श्रीराम सीता

---

१ मिळेल, आडळेल २ सरळ रीति ३ नाना प्रकारच्या उपमा देऊन. ४ स्तवन करणाराचे. ५ कल्पना, अभिप्राय. ६ सहस्रमुखी शेष.

लक्ष्मण भरत । शत्रुघ्न कौसल्या सुमित्रा हनुमत । सुग्रीव बिभीषण अंगद जांबुवंत । जये पदीं सुलीन ॥ ३८ ॥ श्रीकृष्ण रुक्मिणी बळि-भद्र अक्रूर । उद्धव धर्म भीम अर्जुन वीर । कोंती[१] नकुळ सहदेव द्रौपदी विदुर । गरुड तुंबर नारद ॥३९॥ भीष्म ध्रुव बळी रुकुमांगद । पुंडरीक शौनक प्रहराद । सनक सनत्कुमार सनंद[२] । जये पदीं निमग्न ॥४०॥ ब्रह्माआदिकरूनि येथपर्यंत । जितुके महापुरुष संत महंत । सकळ जये पदीं होऊनि निवांत । जाले सुलीन पैं ॥ ४१ ॥ ऐसें जें श्रीगुरुपद अगाध । अनिर्वचनीय शुद्धबुद्ध । त्यासी काटाळीं योजितां विविध । मूर्खत्व कीं शहाणपण ॥४२॥ आधीं दृश्य येक होआवें[३] । मग द्रष्ट्यानें दर्शन घ्यावें । तरि मुळीं दृश्यातीत स्वभावें । श्रीगुरुरूप ॥ ४३ ॥ अथवा श्रीगुरूसी ज्ञेयत्वें कल्पूनि । ज्ञात्यानें जाणावें ज्ञानेंकरूनि । तरि मनाची कल्पना न चले ह्मणौनि । उन्मन जालें जेथ ॥ ४४ ॥ तेथ ध्येय ध्यान काह्यांचें कल्पावें । आणि ध्यात्यासी कोठूनि आणावें । वाच्य वाचकता वाचन स्वभावें । श्रुतिसमत्तेंसीं[४] न चले ॥ ४५ ॥ परि आवडीचा स्वभाव न राहे । निर्गुणासी गुण लाऊनि पाहे । अनाम्यासी नाम ठेऊनि बोहे[५] । समजाव्रयाकारणें ॥ ४६ ॥ येऱ्हवि त्रिपुटी जेथ जाली नाशिवत । तेथ वर्णनें काय होईल शाश्वत । परि देहसंगें आवडी बोलवित । वाच्य वाचकतायोगें ॥ ४७ ॥ तेथ श्रीगुरु ह्मणती काय जालें । तुवां इतुके परिहार[६] कां सूचिले । तुजमजमाजीं असे काहीं उरलें । काय वेगळेंपण ॥ ४८ ॥ तू जें जें बोलसी आवडोन । ते गोष्टीचें काहीं भूषण दूषण । तुवां सहसा न मनूनि जाण । ग्रंथ बोलें निजसुखें ॥४९॥ ऐसा लाधोनि श्रीगुरुकृपावर । शिष्य स्वानंदें जाला निर्भर । ह्मणे या नरदेहासारिखें रत्न सुंदर । न देखों आणिक पैं ॥ ५० ॥ परंतु याच्या लाधलेंपणाचें । सार्थक तें चि जाणिजे साचें । संतां शरण जाऊनि स्वहिताचें । कार्य साधेल जैं ॥५१॥ तरि तें चि आतां निरू-

---

१ कुंती. २ सनंदन ? ३ असले पाहिजे. ४ वचाचें. ५ हाक मारतो. ६ निरास, निषेध.

पण । पुढिलिये कीर्णी विवेकसंपन्न । होऊनि स्वानुभवदिनकरीं निमग्न । श्रीरामदासकृपा ॥ ५२ ॥ स्वस्ति श्रीस्वानुभवदिनकरे । गुरुशिष्यान्वयें चतुर्थ विवेककळापे । सद्गुरुवर्णननिरूपण नाम प्रथम कीर्ण प्रकाशः ॥ १ ॥ श्रीराम ॥

---

## श्रीराम

नरदेह सर्वोच्चपणें थोर । सुंदर साजिरा सपरिकर । याचिया संगें थोर थोर । मान्यता पावले ॥१॥ ब्रह्मयासी ब्रह्मपण याजकरितां । विष्णु शंकर नारद देहें चि तत्वता । इंद्र चंद्र सूर्य ऋषि मुनि पाहातां । नरदेहसंगें श्रेष्ठ ॥ २ ॥ च्यारी खाणी चौऱ्यासी लक्ष जीवयोनी । माजीं धुंडितां हि अनुदिनीं । नरदेहासारिखें आणिक नयनीं । उत्तमत्वें न दिसे ॥ ३ ॥ अंडज उद्भिज स्वेदज जारज । नाना पशु पक्षी जीवसमाज । जड स्थावरजंगमीं धुंडिता सज्ञ । नरदेहासारिखें नाहीं ॥ ४ ॥ देहे डिसाळें मोलें मोनें । सैळें बळें उच्च मान्यपणें । असती परि उत्तम गुणें । येक नरदेह दिसे ॥५॥ तो प्राप्त होतां हि पूर्व पुण्यें । त्यासी उठती मध्यें अनेक विघ्नें । वेडा मुका बधिर अथवा अमान्यपणें । यातिहीन कां म्हटला ॥६॥ तथापि इतुकें हि न जालें । आणि कर्तुत्वें पुण्य फार योजलें । तरि देवपण प्राप्त जालें । तेणें रहिवासला स्वर्गीं ॥ ७ ॥ मग नाना प्रकारें स्वर्गसंपत्ति । पुण्यसंग्रह पदरीं तंव भोगिती । मग पुण्य सरलिया ढकलूनि देती । जेविं धन सरलियां वेश्या ॥ ८ ॥ अथवा पदरीं संग्रह केवळ पापाचा । असतां पापयोनी भोगी साचा । व्याघ्र सर्प विंचु कंटक वृक्षाचा । जन्म पावे फिरफिरों ॥ ९ ॥ अथवा पापपुण्याचिया समता । नरदेह प्राप्त होय अवचिता । पापाधिक्यें हीनयाति कीं अंगहीनता । किं वेडा मुका अंध पंगु ॥ १० ॥ तथापि पुण्याधिक्यें जन्मांतरयोगें । ब्राह्मणदेह पावला अव्यंगें । परि अव्हाटला असत्संगें । जाला संसारी का विवेकहीन ॥ ११ ॥ यद्यपि इतुके हि

---

१ मोठे. २ बरोबर. ३ सळ=आग्रह, अभिमान; सळु=न्यूनत्व. ४ आडवाटेस शिरला.

चुकतां अवगुण । जरि हा न धरी च सत्सगालागुन । तरि प्राणी हीना-
हूनि हीन । आत्महत्यारा बोलिजे ॥ १२ ॥ अहो बहुतां जन्मांचे
सेवटीं । नरदेह प्राप्त होय अवचटीं । तो लाधलिया हि परम संकटीं ।
तरि तेथ आयुष्य दुर्लभ ॥ १३ ॥ येकयेके योनीचा ठाईं । पूर्वोक्त फेरे
होती जई । तवं अवचटें प्राक्तनाचिये सोईं । नरदेह लाभे ॥ १४ ॥ त्या
नरदेहासी येऊनि नर । सुखावोनि करिती ससार । परि चौन्यासी
लक्ष योनींचे फेर । न चुकती सर्वथा ॥ १५ ॥ देवें निर्माण केल्या
चराचर योनी । मग त्यांकडे सवें चि पाहे फिरोनि । जे आत्मसाधना योग्य
कोणती ह्मणोनि । सूक्ष्मदृष्टीं विचारी जवं ॥ १६ ॥ तवं आत्मसाधना
योग्य येक हि नसे । मग राहे चिंतावलेनि मानसें । यांचें स्वहित घडेल पां
कैसें । मत्प्राप्ति कैसी होय ॥१७॥ आहार निद्रा भय मैथुन । हें तवं सर्वा
योनींसी समान । परि भगवत्प्राप्तीचें होये ज्ञान । ऐसें न दिसे येक हि ॥१८॥
ऐसी विचारणा जगदीशें करूनि । क्षणयेक निश्चळ होऊनि । आपुलें
सर्व सामर्थ्य योजूनि । नरदेह निर्मिला ॥ १९ ॥ नरदेहामध्यें हि
अनेक देह । यासारिखे चि दिसती निःसंदेह । परि जे देखतां चि
भयकटाह । देखणारासी होय ॥ २० ॥ सुर नर वानर न्हीस राक्षस ।
यक्ष किन्नर किंपुरुष । दैत्य दानव ब्रह्मराक्षस । भूतगण गंधर्व ॥२१॥
मर्कट विद्याधर चारेण । नाना जिनसाचे यवन । अश्वमुखी बस्तमुखी
गजवदन । रूमशाम फिरगी ॥२२॥ कीं जल्क पुल्कस जळमाणुस ।
कां वेंकाठें येकटांगें माणुस । नाना देशींचे नाना जिनस । माणसें
असती ॥ २३ ॥ कोळीक भीलडे हबसानी । कल्लाळ बकसरे मुल-
तानी । रचपुत पठाण दखनी । पंजाब द्रावड गुजर ॥ २४ ॥ पाहावें
सूक्ष्म दृष्टि करूनि । तव छपन कोटि हे अवनी । तितुकीं नाना मनुष्यां-
कृतींनीं । व्यापलीसे असख्य ॥२५॥ तितुकी गणना करितां समग्र ।
ग्रंथ विस्तारेल अपार । ह्मणौनि नरदेहासारिखें सार । येक हि न
दिसे ॥ २६ ॥ तवं श्रोता घेतसे अशका । चौन्यासी लक्षांचा झाडा

१ एक देवजाति आहे. २ बस्त=बोकड

सांगिजो कां । तवं वक्ता ह्मणे आइकीं जो कां । चित्त देऊनि ॥२७॥ तेथ वीस लक्ष वृक्षयोनि । दहा लक्ष पक्षियोनि । पशुयाति तीस लक्ष जाणोनि । नव लक्ष जळचर ॥ २८ ॥ क्रिमी कीटक अकरा लक्ष । मानवयोनि बोलिजे च्यारि लक्ष । येकूनि गणना चौऱ्यासी लक्ष । शास्त्रांतरीं बोलिली ॥२९॥ इतुकियां हि माजीं पाहातां स्पष्ट । नरदेहासारिखें न दिसे श्रेष्ट । याचियायोगें संसारकष्ट । निर्शती सत्संग लाधतां ॥ ३० ॥ तरि नरदेहासारिखें अनर्घ्य रत्न । अकस्मात लाधलें न करितां प्रेत्न । तें चि सार्थकें याचा करूनि यत्न । संतसंगति धरावी ॥ ३१ ॥ विनां सत्संग धरिल्यावांचून । नरदेह व्यर्थ वायांवीण । तस्मात् नरदेहाचें ज्यांलेंपण । संताचिया सेवनें ॥ ३२ ॥ तरि सतसंग कैसा धरावा । त्याचा महिमा कैसा जाणावा । कोणकोणा लक्षणीं वोळखावा । अनुभव तयाचा ॥ ३३ ॥ तें आद्यंत पुढिलिये कांणीं । सांगिजैल यथाक्रमेंकरूनि । संत वोळखावयालागूनि । लक्षणें तयाचीं ॥३४॥ दिनकर ह्मणे रामदास । ज्यांचीं लक्षणें असमसाहासें । वर्णितां ज्यांचिया गुणांस । आत्मज्ञान प्राप्त होय ॥ ३५ ॥ स्वस्ति श्रीस्वानुभवदिनकरे । गुरुशिष्यान्वये । चतुर्थ विवेककळापे । नरदेह बहुजिनसवर्णन निरूपणं नाम द्वितीय कीर्ण प्रकाशः ॥ २ ॥ ७ ॥ राम ॥ राम ॥ ७ ॥

---

## श्रीराम

आतां सद्गुरुलक्षणें श्रीमतीं । परिसावीं प्रथम यथानिर्गुती । त्यांत येक सद्गुरु प्रसिद्ध विलसती । येक ते असद्गुरु ॥ १ ॥ तेथ सत्शब्दें ब्रह्म शाश्वत । असतपणें प्रपंच अशाश्वत । जेथ ज्याची बुद्धि निरत । तें चि अभिधान तयासी ॥ २ ॥ सद्गुरूमाजीं शरण्य येक अशरण्य । असद्गुरूमध्यें हि वरेण्य येक अवरेण्य । क्रिया आणि हीनवर्ण । त्यांसी गुरुत्व चि नाहीं ॥ ३ ॥ तथापि साधारण असे वचन । जे सकळां-

---

१ अमोल २ जन्मल्याचें सार्थक. ३ असख्यान, अनिवार. ४ यथार्थ. ५ उत्तम प्रकारचें.

पासूनि संकटीं घ्यावें ज्ञान । तरि कदाचित् सद्गुरूचें पडेल आन्नर्षण । तेव्हां हें कर्तव्य ॥ ४ ॥ जरि गुरु केला वर्णहीन । तरि कैसें करावें तीर्थप्रसादप्राशन । तयाचें करितां अथवा न करितां भजन । पतन होय तयां दोघांसी ॥ ५ ॥ ज्यासी महावाक्यीं अनाधिकारत्व । त्यासी गुरुत्व हें धनेवीण दातृत्व । आणि पूर्वपरपरांचें हि कर्तृत्व । त्यासी ठावें न पडे ॥ ६ ॥ ह्मणौनि असोत आतां ते असद्गुरु । सांगिजैल गुरुपद द्विविध प्रकारु । येकाचा सेव्य अभयंकरु । येक असेव्य होती सर्वथा ॥ ७ ॥ व्यभिच्यारी अव्यभिच्यारी कामिक । जारणमारणमोहनादिक । जे मंत्रयंत्रकामनादायक । ते आत्मत्वीं काय करावे ॥ ८ ॥ जेवि कां आमिषविक्रई कश्मळ । तयासभंवतें मिळे कर्ककाककुळ । तेथें मुक्ताफळभोक्ते जे मराळें । ते कासयासी बैसतील ॥ ९ ॥ तथापि प्राप्त परंपरागत ज्ञान शुद्ध । परतु गुरु उत्शृंखळ आचारविचारें अशुद्ध । तो असद्गुरु परि शिष्य सज्ञान शुद्ध । तया संकटीं सेव्य होय ॥ १० ॥ कां जें अनर्घ्य रत्न पकीं पडिलें जन्हि । रत्नपणासी कदापि उणें न होय तन्हि । तें दुर्बळासी अकस्मात् सांपडलें जरि । तरि तेणें घ्यावें अवश्य ॥ ११ ॥ परतु गुरु असलियां आचारविचारहीन । मुमुक्षासी लागेल कोणाचें दीक्षालक्षण । ह्मणोन तें अग्राह्य सहसा जाणोन । सद्गुरुलक्षणें विचारावीं ॥ १२ ॥ अहो समर्था सद्गुरूचे पाय । न जोडती तवं शिष्य तरेल काय । आचारविचार देखतां चि तरणोपाय । शिष्यासी लाभे तत्काळ ॥ १३ ॥ एव असद्गुरूचें लक्षणद्वय । वर्णिलें सांग यथान्वय । आतां सद्गुरुलक्षण द्वय उपाय । सांगिजेल निर्द्वंद्वतेसीं ॥ १४ ॥ आतां सद्गुरु असोनि असेव्य होय । हें ऐकतां चि वाटे परम आश्चिर्य । तरि तें हि लक्षणें यथान्वयें । सागिजतील संक्षेपें ॥ १५ ॥ असो सद्गुरु सर्व लक्षणीं पूर्णभरित । आणि निरतर अतरीं निर्वृत्त । परंतु न लक्षी शिष्य आर्तभूत कीं अनार्त । किं तो भाविक कीं कोतर

---

१ आत्मज्ञानदान करण्याचे कामीं. २ खाटिक. ३ मळकट. ४ डोमकावळे. ५ हंसपक्षी. ६ स्वैर वर्तन करणारा. ७ चिखलात. ८ त्याची अतर्मुखवृत्ति असते. ९ कामनेनें पीडलेला. १० निरिच्छ, सुखी. ११ भ्याड

॥ १६ ॥ अथवा जोडलियां शुद्ध परमार्थ । स्वकीयानंदें आपण जाला कृतार्थ । परि शिष्यप्रबोधीं[1] नव्हे समर्थ । नित्यानित्य विचारेंसीं ॥१७॥ तो सद्गुरु होय प्रसिद्ध । परि तेथें शिष्याचें कार्य नव्हे सिद्ध । तरि तयाचें सेवन चि होय विरुद्ध । निजसाधनविषईं ॥ १८ ॥ अहो धनवंत भाग्येंकरूनि अति समर्थ । परतु याचकांसी प्राप्त नव्हे किमपि अर्थ[2] । त्यासी वोळंगणें[3] हा श्रम व्यर्थ । उभयतासी बोलिजे ॥ १९ ॥ एव असद्गुरु भेज्य[4] आणि अभज्य । तथा सद्गुरु असोनि त्याज्य । निरोपिले आता सद्गुरु सलक्षणें सुयज्यें[5] । यथायोगें सांगिजती ॥ २० ॥ पाहातां सद्गुरुनामस्मरणमात्रें । पावन होती तत्काळ गात्रें । नमस्कार करिती तें पात्रें । परमानंदाचीं होती ॥ २१ ॥ सहज सद्गुरूचें करितां स्तवन । परादि वाचा[6] पडिलें मौन । जरि त्याचें चि होय कृपावरदान । तरि च वर्णवेल महिमा ॥ २२ ॥ सद्गुरु ह्मणिजे सर्वेश्वर । त्याचिया गुणांसी कैंचा पार । तथापि करावया जगदोद्धार । मनुष्यवेष धरिला ॥ २३ ॥ होतां जयाची कृपादृष्टि । ब्रह्मरूप नांदे शरणांगत ये सृष्टीं । आकार निराकार हे गोष्टी । न उरे समूळ मिथ्यत्वें ॥ २४ ॥ प्रथम आसनाचिया साधनक्रमें[7] । यम नियम प्राणायामें । प्रत्याहार करूनि सभ्रमें । ध्यान धारणा समता ॥२५॥ समाधि प्राप्त होऊनि व्युत्थान[8] । नुरऊनिया सर्व देहभान । काष्ठादि देहीचें स्थानमान । तें सहज चि जेयां तुछ ॥२६॥ आणि देहप्रारब्धाचिये गती । आत्मा हि ब्रह्मांडासी नेती । परि पिंड ब्रह्मांड हे भ्राति । नाहीं चि उरली जया ॥ २७ ॥ योगसामर्थ्यें सकळ वोळगती सिद्धि । मृत्यूस हि करिती अमरत्वशुद्धि । परि तयासी नाहीं अहं देहबुद्धि । आत्माराम सर्वदा जे ॥ २८ ॥[9] येथ अशंका गहन उत्पन्न जाली । ज्याची देहबुद्धि ज्ञानानळें जळाली ।

---

१ शिष्याला ज्ञानी करण्याचे कामीं. २ द्रव्य. ३ आपलासा करून घेण्याचा प्रयत्न करणें. ४ सेव्य. ५ पूजनीय. ६ चारी वाणींस ७ अष्टांग योगसाधन यथाक्रमानें आचरण करून. ८ समाधिविसर्जन. ९ सद्गुरु हे आपलें स्वपद कोणत्या साधनांनीं प्राप्त करून घेतात, व त्यांची स्थिति कशी असते तें २५ ते २८ या ओंव्यांत सांगितलें आहे.

तेणें देहरक्षणाचिया अज्ञानसलिलीं[1] । देहजाड्यत्वें[2] का रिघावें ॥ २९ ॥ तरि या आक्षेपाचें प्रत्युत्तर । श्रोतीं श्रवण करावें सादर[3] । आत्मसाक्षात्कारें निर्विकार । स्वानुभवदिनकरीं ॥ ३० ॥ अहो निजात्मपद जन्हि प्राप्त जालें । परतु देह नुरलेंपणें तन्हि राहिलें । देहसंगें आचरण घडे वहिलें । प्रारब्धें कां स्वभावें ॥ ३१ ॥ पाहातां प्रारब्धावशेषें संसारीं । ब्रह्मत्वें चि वर्तिजे योगेश्वरीं । तेथ योगाभ्यासें जो देहशुद्धि करी । तो काय भ्रमें बांधिजे ॥३२॥ हरिहरब्रह्मादिपर्यंत । नवनाथ सोळा सिद्ध तथा अनत । ते हि योगाभ्यासें आचरोनि यथोचित । स्वभावशीळ राहिले ॥३३॥ आणिक हि निरंतर जगीं । ब्रह्मरूप वर्तती राजयोगी । ब्रह्मस्वरूप होऊनि निजांगीं । क्रियेसहित वर्तती ॥ ३४ ॥ नसतां ब्रह्मबोध अंतरीं । शुष्क काष्ठाचियेपरि समाधि धरी । ते समाधि निष्फळ हें काय उत्तरीं । बोलावें लागे ॥ ३५ ॥ असो ब्रह्मैक्यबोधपारावारीं[4] । आब्रह्मपूर्णत्वें जीवलहरी । स्वानुभवें सर्वदा क्रीडा करी । तो महा सिद्ध सद्गुरु ॥ ३६ ॥ जयाचें निज स्वरूप जालें देह । देहत्वें अनंत ब्रह्मांडाचें गेह[5] । जयासी त्रै अवस्थीं[6] शरीरसंदेह । समूळ न दिसे ॥ ३७ ॥ जयाची प्रकृति तरि दिसे मानुषी । परि सामर्थ्य सर्व अमानुषी । निज कृपाकटाक्षें ब्रह्मवेषी । जीव धरणें तत्काळ ॥ ३८ ॥ जे ब्रह्मसाक्षात्कारी महा पुरुष । जे प्रत्यक्ष अवतारी स्वयप्रकाश । ज्याचिये वाणीनें स्वयें जगदीश । सारासार[7] बोलिला ॥ ३९ ॥ जे केवळ ब्रह्मानुभवयोगी । जे सर्वसंगपरित्यागी । जे स्वाश्रमधर्मपरित्यागी । सस्वरूपानुभवी ॥ ४० ॥ जयां स्वरूपानुभवीं कहीं । निःशेष कर्तव्य उरलें चि नाहीं । सहज कर्म निफजे जें देहीं । तें तें आत्मत्वें चि करिती ॥४१॥ ज्यांचें बोलणें सप्रचीत । स्वानुभवाचें चि यथार्थ । स्वप्रत्ययें नाना शास्त्रार्थ । स्थापिती उत्थापिती ॥४२॥ जयाचिये श्वासोश्वासीं । जप आले विश्रांतीसी । क्रीडेमाजीं अनायासीं ।

---

१ अज्ञानरूपी खोल पाण्यांत. २ ज्याची देहबुद्धि नष्ट झाली आहे, त्यांनीं अज्ञानी जनाप्रमाणे या नाशवत जड देहाचें रक्षण करण्याच्या, ह्मणजे जिवंत राहण्याच्या भानगडींत कां पडावें ? ३ सत्वर. ४ ब्रह्मज्ञानरूपी समुद्रांत. ५ गृह. ६ जागृति, स्वप्न, सुषुप्ति. ७ नित्यानित्य.

तपें तापासी विसरलीं ॥ ४३ ॥ जयाची सहज सुगम वाणी । व्याकर्णतात्पर्याची खाणी । ज्याची स्वभावचर्चाश्रेणी । निश्रेणी परमपदांची ॥ ४४ ॥ कर्मकांड उपासनाकांड । ज्ञानकांड अति प्रचंड । निवटूनि पूर्वपक्षाचें बंड । सिद्धांत स्थापिती जे ॥ ४५ ॥ जयांची स्थिति परम सेवा । गति चि यात्रा आत्मदेवा । गोष्टी स्तुति श्रीराघवा । चित्तीं चिंतन निजध्यास ॥ ४६ ॥ निरसूनि पूर्वपक्षाचा भेद । सिद्धांत स्थापिती जे अभेद । महत्सिद्धांत निर्व्यवाद । सप्रचित स्थापिती जे ॥ ४७ ॥ जे सप्रचित राजहंस । विचारचंचूचा करूनि सांडस । सारामृत घेऊनि असार बाकस । करूनि सांडिती ॥ ४८ ॥ पूर्वपक्ष उभारूनि अनेक । सिद्धांत स्थापिती जे नेमक । प्रत्यय रक्षूनि सम्यक । नित्यानित्यविचारें ॥ ४९ ॥ जे परब्रह्मरूप सदैव । किं या चराचराचें निज दैव । किंवा शरणागताचें निज गौरव । कृपालुपणें ॥ ५० ॥ ब्रह्म स्पर्शासी न पडे ठावें । सद्गुरूसी दोहीं बाहीं आलिंगावें । ज्यासी वाटेल ब्रह्म दृष्टीनीं पाहावें । तेणें अवलोकिजे सद्गुरु ॥ ५१ ॥ ब्रह्मीं परादि वाचा निवर्तती । सद्गुरूची करिजेतसे स्तवन स्तुति । आणि श्रीगुरूसीं बोलणें घडे प्रेमप्रीतीं । सुखसंवादें स्वानंदें ॥ ५२ ॥ ब्रह्मीं भक्ति करितां न ये । श्रीगुरुभजनाचे नाना उपाय । ब्रह्मीं न पडे श्रवणाची सोय । श्रीगुरुवाक्य श्रवण घडे ॥५३॥ ब्रह्मीं नाहीं कथा कीर्तन । करावें श्रीगुरुगुण कथन । ब्रह्मीं न घडे स्मरण चिंतन । श्रीगुरु स्मरिजे सर्वदा ॥ ५४ ॥ ब्रह्मीं न घडे पादसेवनभक्ति । सद्गुरुपदीं पुजाभिव्यक्ति । अर्चनवंदनदास्यादि युक्ति । ब्रह्मीं न चलती सर्वथा ॥५५॥ श्रीगुरूचें करावें पूजन अर्चन । आवाहन अर्घ्य पाद्य आचमन । पंचामृतेंसीं रुद्राभिषेचन । सुगंध द्रव्यें तैलाभ्यंग ॥ ५६ ॥ शुद्ध स्नान प्रतिष्ठापन । रत्नखचित स्वर्णसिंहासन । नाना उत्तम दिव्य वस्त्रपरिधान । स्वर्णयज्ञोपवीत ॥ ५७ ॥ केशरकस्तुरीचें गंधाक्षत । मळयानीळ सर्वांगीं

१ प्रश्नोत्तररूप संभाषणाची पंक्ति २ सोपान, शिडी ३ निवटणें=निर्मूल करणें. ४ चिपाट, चोइटी. ५ अनुभव ६ अभिव्यक्ति=अनुभव. ७ मलय पर्वतावरील सुगंध वायु असा शब्दाचा अर्थ आहे, परंतु या ठिकाणीं चंदन असा अर्थ सयुक्तिक दिसतो.

चर्चित । नाना पुष्पयाती सुगंधित । आपुलिया स्वेच्छा समर्पिजे ॥५८॥ कृष्णागरादि[1] धूप जाळिजती । ब्रह्मांडभरि दीप उजाळिजती । नैवेद्य मनेस्वीत जे जे आवडती । ते ते स्वीकारिजे श्रीगुरु ॥ ५९ ॥ चतुर्विध अन्नादि खाद्य नैवेद्य । पक्वान्नें उत्तम घृतपाचित सद्य । आपुलिये आवडीं घडेल जें संपाद्य[2] । तें अंगिकारितील श्रीगुरु ॥ ६० ॥ ब्रह्मीं नैवेद्य कोठें दाखवावा । अथवा धूप दीप कोणीकडे करावा । ह्मणौनि ब्रह्मा-परिस अनंत गुणें योवा । श्रीगुरूचा अधिक ॥ ६१ ॥ येथें कदापि श्रोते वीट मानिती । कीं ब्रह्मापरिस अधिक गुरुमूर्ति । तरि गुरुकृपा न होतां ब्रह्मसंविति[3] । यासी प्राप्त[4] कायसेन[5] ॥ ६२ ॥ जेव्हां कायावाचामनो-भावें । शिष्यें सद्गुरूसी शरण रिघावें[6] । मग श्रीगुरुकृपा जालिया स्वभावें । ब्रह्मानुभव घडेल ॥ ६३ ॥ गांठी पडेल जेव्हा हस्तकमस्तकास । होईल अष्टदेहांचा निरास । जालियां महावाक्यउपदेश । ब्रह्मानुभव घडेल ॥ ६४ ॥ तो हि अनुभव तेव्हां घडेल । जेव्हां श्रीगुरुकृपा पूर्ण होईल । जालियां कृपा हा विश्वास धरील । आणि प्रवर्तेल जेव्हां साधनीं ॥ ६५ ॥ ह्मणौनि ब्रह्मापरिस अनत गुण । श्रीसद्गुरु स्वामी हें यथार्थ वचन । यदर्थी न द्यावें सहसा दूषण । संतीं महतीं सज्जनीं ॥ ६६ ॥ असो सद्गुरूसी नैवेद्य समर्पून । कर्पूरादि सुगंध करोद्वर्तन । नाना अमृतफळीं मुखशुद्धि करून । पुगीफळ तांबुळेंसीं ॥ ६७ ॥ लवग पत्री जातिफळ कंकोळ । येळा कर्पूरमिश्रित पुगीफळ । सुगधामोदें पर्णे बहळ[7] । मुखीं तांबोळ रंगलें ॥ ६८ ॥ ब्रह्मासी तांबुळ कोठें द्यावा । अथवा नीलांजन कैसा उजळावा । मंत्र-पुष्पें समर्पून कोठें करावा । साष्टांग नमस्कार प्रदक्षणा ॥ ६९ ॥ सद्गु-रूपुढें कर्पूरदीप उजळिजे । मस्तकीं मंत्रपुष्पांजुळी वाहिजे । प्रदक्षणा करूनि घालिजे । अनन्यभावें नमस्कार ॥ ७० ॥ ब्रह्मीं सख्य कैसें करावें । सद्गुरूसीं हितगुज सांगावें । सद्गुरूसी आत्मनिवेदन करावें । निज-

---

१ कृष्णागरु=एक प्रकारचा चंदन. २ जें जें मिळण्यासारखें असेल तें. ३ प्राप्ति, उदय. ४ ज्ञान. ५ कशानें. ६ नमस्कार करील. ७ बहुत.

देहेंसीं निवळोण ॥ ७१ ॥ एव नवविधभक्तीं श्रीगुरु अर्चिजे । अशीं पुजा कोठें समर्पिजे । ह्मणौनि ब्रह्मापरिस अधिक सहजें । अनंतगुणें सद्गुरू ॥ ७२ ॥ यन्हविं तन्हि परब्रह्माचा अनुभव । करितां येक श्रीगुरुराव । मायाजीवेश्वरादि नाना प्रभेव । सद्गुरुमुखें शिष्यासी ॥ ७३ ॥ पाहातां ब्रह्म केवळ निर्गुण । सद्गुरु सगुण असोनि निर्गुण । सद्गुरु वाच्यांशलक्षांशीं सांपडोन । वेगळा असे सर्वस्वें ॥ ७४ ॥ सद्गुरु सुखसाम्राज्यसोहळा । ब्रह्म सुखातीत चित्कळा । ह्मणौनि ब्रह्मापरिस दिसे आगळा । अनंत गुणें सद्गुरु ॥ ७५ ॥ ब्रह्म नामरूपकर्मावेगळें । संत त्रिपुटीमाजीं असोनि निराळे । पाहातां मूर्तिमत परब्रह्म सगळें । ते हे संत सज्जन ॥ ७६ ॥ संतीं ससार केला मोक्षरूप । सतकृपां सीतळ त्रिताप । स्वानुभवदिनकरा ऐसें पडेंप । सद्गुरूचिया अनुग्रहें ॥ ७७ ॥ संत विवेकाचे आगर सदा । सारासार विचार नित्य धदा । दृष्टिमात्रें संसारदैन्य आपदा । भाविकांची निर्शिती ॥ ७८ ॥ जे शुद्ध वैराग्यें वोतले । सत्क्रियाभूषणें अलंकारले । दयाधर्में अवतरले । मूर्तिमंत अवतार ॥ ७९ ॥ उपासना सोजिरी ज्याकरितां । शोभा शोभली विधिविधानता । जेथ निगमागम स्वभावता । विश्राति पावले ॥ ८० ॥ जे विद्यावैभवें सपन्न । मोक्षश्रिया विराजमान । नित्यानित्यविवेक परिछिन्न । वर्तणें अखंड ॥ ८१ ॥ सद्वृत्तीचें जें निवासस्थान । आत्मज्ञानाचें येकोयतन । सुखावलें निःशेष विज्ञान । सहजस्थिति जेथ ॥ ८२ ॥ ज्याकरितां शांति थोरावली । क्षमा ज्याचिया रूपें रूपासी आली । विश्रांति सपूर्ण विसांवली । पूर्णपणें जेथ ॥ ८३ ॥ दया जेथ सौरभ्यें पावली । करुणा मृदत्वें सरसावली । कृपा पूर्णत्वें फळासी आली । कृपाळुपणें जेथ ॥ ८४ ॥ सुख जेथ सुखावलें । स्वानंदासी वोर्क आलें । परमानंदें हेलावलें । सौरभ्य जेथ ॥ ८५ ॥ सतोषासी जेथ पूर्णपण । गांभीर्य जालें सुलक्षण । निजयेश पूर्णत्वें पसरोन । ब्रह्मांड भरलें

---

१ मुळें. २ उत्पात्ति. ३ बरोबरी, शोभा. ४ स्थान, घर. ५ सुशोभित. ६ अधिष्ठान ब्रह्म ७ सारभ, सुवासित्व. ८ शोभा, तेज.

॥ ८६ ॥ निजप्रतापें जे प्रतापवंत । रमारमण जे साळंकृत । औदार्य शोभलें मूर्तिमंत । निजऐश्वर्यें संपन्न ॥ ८७ ॥ वेदशास्त्रीं जे अति निपुण । षट्कर्मांचें जेथ अधिष्ठान । जयांसी नित्य पुराणश्रवण । अध्यात्मशास्त्र ॥ ८८ ॥ काइक वाचिक मानसिक । त्रिविध प्रकारें तप सात्विक । ज्यासी आचरणें सम्यक । वेदाधारें चि नित्य ॥ ८९ ॥ तव श्रोता बोले विनीत वचन । त्रिविध तपाची कैसी वोळखण । तरि ते सहजें यथाक्रमेंकरून । सांगिजेल सर्व ॥ ९० ॥ देव ब्राह्मण श्रीगुरुनाथ । अथवा कोण्ही संत महंत । यांचें पूजन यथोपचारयुक्त । भक्तिभावयोगें ॥ ९१ ॥ अहर्निश अंतर्बाह्य शुचि-ष्मंत । जीवमात्रासी आर्जवयुक्त । ब्रह्मचर्य नैष्ठिक्यवंत । अहिंसा वर्तणें ॥ ९२ ॥ मग बोलणें सर्वांसी प्रियकर । ह्मणे कोण्हाचें दुखवेल कां जिव्हार । उद्वेगरहित सत्य साचार । सर्वांसी हितकारक ॥ ९३ ॥ वरि वेदशास्त्राध्ययन । कां रामनामउच्चारण । मग मौनेंसीं हि निष्कपट होऊन । निजनिर्मळता ॥ ९४ ॥ वाचे मंत्रजप कां अध्ययन करणें । अथवा गुंतलियासी शब्दें उगवणें । यावेगळें मौनें चि सदा वर्तणें । नित्य नेमस्त ॥ ९५ ॥ कां तो अखंड सारासार विचार । करूनि घेणें आत्मसाक्षात्कार । एवं त्रिविध तपाचा प्रकार । हे मिरासी जयाची ॥ ९६ ॥ विधिविधानता अनुष्ठान । जे निज तेजें विराजमान । परम तपस्वी दे-दिप्यमान । स्वानुभवदिनकर जे ॥ ९७ ॥ ऐसिया लक्षणीं साळंकृत । जे कां ईश्वरावतार मूर्तिमंत । साधु महापुरुष संत महंत । शरण रिघावें तयांसी ॥ ९८ ॥ उत्तम साधुलक्षणें जेथ पूर्ण । तें चि सद्गुरूचें अधि-ष्ठान । तेथ साधकें रिघावें शरण । अनन्य प्रीतीचिया योगें ॥ ९९ ॥ ह्मणे दिनकररामदास । होऊनि सर्वस्वेंसीं उदास । शरण रिघोनियां सद्गुरूस । स्वहित आपुलें करावें ॥ १०० ॥ सांगितलें सद्गुरूचें ध्यान-लक्षण । आतां श्रीगुरु सच्छिष्य परीक्षणें । ते सांगिजतील निज अंतःक-

---

१ स्वस्वरूपानुसंधान. २ अंतःकरण. ३ अडचणींत सांपडलेल्या लोकांस त्यांतून सोडविणें

रणें । श्रोतीं श्रवण करावें ॥ १०१ ॥ स्वस्ति श्रीस्वानुभवदिनकरे गुरु-शिष्यान्वये चतुर्थ विवेक कळापे श्रीगुरुलक्षणपरीक्षावर्णन निरूपणं नाम तृतीय कीर्ण प्रकाशः ॥ ३ ॥ ॥ श्रीराम ॥ ॥ श्रीराम ॥ ॥-५ ॥

---

श्रीराम

आतां शिष्यलक्षण कळाप । सांगिजेल यथामति संक्षेप । संतीं श्रवण करूनियां सकृप । शिष्यपरीक्षा कीजे ॥ १ ॥ तरि तेणें स्वामियें श्रीगुरुनाथें । यथाधिकारें उद्धरिजे अनाथें । परतु शिष्यलक्षणें समर्थें । आदौ परीक्षावीं ॥ २ ॥ तव श्रोते करिती आक्षेप । जी कळलें सद्गुरुलक्षण सस्वरूप । आतां शिष्यलक्षणसंक्षेप । सांगितला पाहिजे ॥ ३ ॥ ऐसें ऐकोनियां वचन । वक्ता सांगे शिष्यलक्षण । श्रवण करोतु कां विचक्षण । अवगुणत्यागार्थ ॥ ४ ॥ तरि येक सत्‌शिष्य येक असत्‌-शिष्य । येक ते अपेक्ष[१] येक उपेक्ष[२] अवश्य । येक ते केवळ अशिष्य[३] । न कर्तव्य सहसा ॥ ५ ॥ पतित पुल्कस चांडाळ हिंसक । नट मातंग बुरुड रजक । अत्यज यवन पशुघाती चर्मक । इत्यादि केवळ न कर्तव्य ॥ ६ ॥ आणि परस्त्रिया ज्या कां सुवासिनी । त्या हि त्याज्य केवळ प्रबोधनीं[४] । ज्याचिया कटाक्षमात्रें अव्यसनी । योगी भ्रंशती तत्काळ ॥ ७ ॥ सुर सिद्ध ऋषि योगी मानव । ब्रह्मादि हरिहर इंद्र चंद्र देव । ज्ञानी योगेश्वर महानुभाव । दर्शनमात्रें भ्रशती ॥ ८ ॥ परवनिता पडतां दृष्टी । निष्कामासी हि अभिळाश उठी । त्या येकांतीं बोधितां सुखसतुष्टि । घडों शके कैसेनि ॥९॥ तथापि विरक्त सुशीळा न्यस्त-कामा[५] । मुमुक्षभावें धरूनि प्रेमा । भर्तारेंसहित सद्गुरु सर्वोत्तमा । शरण आलिया जरि ॥ १० ॥ तरि भर्तारसहित अनुग्रह । विरक्तासी करावा निःसंदेह । भर्तारेंविण कदापि स्त्रीसमूह । उपदेशू नये ॥ ११ ॥ आणि विधवा अथवा सुवासिनी । असलिया तरुण कामिनी । तयांसी

---

१ शका. २ स्वीकार अथवा त्याग करण्यासारखे. ३ शिष्य करण्यास केवळ अपात्र. ४ ज्ञानोपदेश देण्याचे कामीं. ५ कामविकार ज्यांचा नाहींसा झाला आहे.

कदापि हि भल्यांनीं । प्रबोधवार्ता करूं नये ॥ १२ ॥ जरि विधवा जाली सार्थकोद्युक्तों । तरि तीसी तीर्थाटण करवावें तत्वता । तीर्थाटणें निष्काम विरक्तता । प्राप्त होईल सहजें ॥ १३ ॥ सुवासिनी तरुण स्त्रियेसी । भर्तार देव निश्चयेंसीं । त्याचिया भजनें तियेसी । उत्तम गति सहजें ॥ १४ ॥ आतां सांगितले जे पतित जन । त्यांसी सर्वथा वर्ज्य अनुग्रहण । तथापि जन्मांतरयोगें योगभ्रष्ट असलेन । शरण आले तरि ॥ १५ ॥ तरि लावावे सगुणभजनासी । परि करूं नये वाक्यउपदेशासी । तळीं विहिरी कां देवाळयकार्यासी । शरीर लावावें साधनीं ॥ १६ ॥ परि प्रत्यक्ष अनुग्रह करूं नये । सांगावे नाना साधनउपाय । एवं पतित जन आणि परस्त्रिये । अशिष्य जाणावे संतीं ॥ १७ ॥ आतां असत्‌शिष्यांचीं लक्षणें । सांगतां व्यर्थ वाणी शिणे । परंतु सत्‌शिष्यप्रशंसेकारणें । बोलणें लागे अवश्य ॥ १८ ॥ तरि धूर्त लंडे विषयलंपट । उत्श्रृंखळ पापी धीट वांजट । निर्लज्ज निष्ठुर शठ । स्वकार्यतत्पर ॥ १९ ॥ अभावी कुभावी कुश्चिळें । कनिष्ट कर्मभ्रष्ट कुटिळ । क्रूर क्रोधी कश्मळ । कातर आणि कुरठा ॥ २० ॥ कामक्रोधें सरसावला । शोक मोहो भयें व्यापला । अहंकारें मुसमुसिला । तो असत्‌शिष्य बोलिजे ॥ २१ ॥ आसुरी संपत्तीचा आसुर । सकाम अनुष्ठानाचा भर । कुविद्याअभ्यासीं सादर । दंभाभिमानी जो ॥ २२ ॥ मंत्र यंत्र चमत्कार पाहे । रिद्धिसिद्धीची चिंता वाहे । क्षणयेक हि स्थिर न राहे । चित्त चंचळपणें ॥ २३ ॥ जो हीनविवेकी कुतर्की कातर । नष्ट व्रातकी अविचार । कुरुपी कुवेसनी कुश्चिळ क्रूर । तो असत्‌शिष्य त्यजावा कीं ॥ २४ ॥ भल्याचा करी जो द्वेष मत्सर । सत्कर्मी ज्याचा अनादर । आळसी अधर्मी कर्म अघोर । तो शिष्य उपेक्ष ॥ २५ ॥ वरि वरि भोळा अंतरीं कपटी । गुह्य गिवसी रिघोनि पोटीं । वर्म विदारूनि सेवटीं । आणिका सेवीत फिरे ॥ २६ ॥ आशा मनसा

१ आपल्या देहाचें सार्थक करण्याविषयीं उद्युक्त. २ बाडगा, उन्मत्त. ३ वाह्यात्या, वाचाळ. ४ नास्तिक. ५ घाणेरडा. ६ मळकट. ७ भ्याड. ८ उपेक्ष्य.

तृष्णा कामना । कल्पना ईषणा आणि दुर्वासना । इयां लक्षणीं विलसे तो राणा । असत्‌शिष्याचा जाणिजे ॥२७॥ जिगीषेपणें अति वाचाळ । आंगीं सर्वज्ञतेचा मद विशाळ । सज्जनापासूनि इछी प्रबळ । महत्व आणि सत्कार ॥ २८ ॥ जो रसनेंद्रियांचा आकिला । जो स्त्रियेचा होय विकिला । आसक्त जो पंचविषयांला । तो हि उपेक्ष सर्वथा ॥२९॥ आतां असोतु हे मोहमद्याचीं भाजनें । कैसीं भरावीं ज्ञानगंगाजीवनें । ह्मणोनि ब्रह्मज्ञ ब्राह्मणीं उदास मनें । परित्यक्त करावीं ॥ ३० ॥ ऐसिया अवलक्षणीं जे साजिरे । ते त्याज्य सर्वस्वें साचोकारें । आणि जे या अवलक्षणांबाहिरे । ते ग्राह्य अवश्य ॥ ३१ ॥ अहो सद्गुरु केवळ कारुण्यसागर । ह्मणऊनि न करी त्याचा अंगिकार । कां जे येथें घडलियां अनादर । कोण उद्धरूं शके तयातें ॥३२॥ असो या प्रकारीचे असत्‌शिष्य । उपेक्षावे हें प्रत्यक्ष वेदभाष्य । याहिमध्यें येक असे सादृश्य । तें चि आतां बोलिजैल ॥३३॥ तरि ब्रह्मज्ञानाकारणें केवळ । बुद्धि पाहिजे अति विशाळ । ते बुद्दिर्मुखा असली प्रबळ । तरि तो अवश्य अंगिकारावा ॥३४॥ स्वयें कर्मठपणें अति कर्मनिष्ठ । जनभयें जितेंद्रिय असला वरिष्ठ । तरि ते बुद्धि करितां अतर्निष्ठ । कष्ट न लागती कांहीं ॥३५॥ सहज बाह्यरगार्थ शरण रिघाला । तव तया अकस्मात अंतरंग प्राप्त जाला । आणि उत्तम बुद्धीनें हि असे आथिला । तो आळस कां पां करील ॥ ३६ ॥ तक्र याचितां लाभलें अमृत । तरि चतुरीं कां पा लपविजे हात । लंका देऊनि अमर करितां सीताकांत । काय न मने चि बिभीषणा ॥ ३७॥ पहिलें दीप प्रदीप्त कुंभीं होता । परि कोंडली होती त्याची प्रकाशता । तो चि मंदिरामाजीं स्वतां ठेवितां । स्वभावें चि प्रकाशमय ॥ ३८ ॥ तेवि विषयभोगसुखाची गोडी । धरूनि बैसली होती बुद्धि बापुडी । तयेसी स्वानंद प्राप्त होता फुंडी । न सोडी सोड-

---

१ इच्छा. २ स्पर्धेनें दुसऱ्याचा पाडाव करण्याची इच्छा धरून. ३ आंकिला= सेवक झाला, स्वाधीन झाला. ४ हीं मद्यानें भरलेलीं पात्रें रिकामीं झाल्याशिवाय त्यांत गंगामृत कसें भरतां येईल? ५ युक्त. ६ खरोखर. ७ खरोखर, निश्चयेंकरून.

बितां हि ॥ ३९ ॥ एव असत्‌शिष्य जे कां उपेक्षे । ते हि यायोगें संतीं करावे अपेक्ष । साधनचतुष्टयें लाऊनि भक्तिपक्ष । स्वब्रह्मामाजीं सोडावे ॥ ४० ॥ लावावे वैराग्याचिये साधनीं । सांगावी विवेकाची कडसणी । श्रवणमननाचिये अनुसंधानीं । निदिध्यासें योजावे ॥४१॥ जेवि का तें बाळ अज्ञान पंचवार्षिक । जडबुद्धि केवळ आरिख । कांहीं न कळे चि पां बहिर्मुख । गाढमूढपणें ॥ ४२ ॥ मग पितयानें त्यासी प्रेत्नपूर्वक । पाटीवरी खडे मांडूनि सम्यक । लेहावयासी बैसवी तव तें अधिक । रडे पडे आक्रदे ॥ ४३ ॥ मग कांहीं मारी कांहीं भय दावी । डोळे ताऊनि भेडसावी । सर्वे चि समजाऊनि लेहवी । तव तें उठूनि पळे ॥ ४४ ॥ पुन्हां आणूनि पाटी-वरी बैसवी । आपण शतवेळा ह्मणोन दाखवी । ऐसा महा क्लेशेंसीं त्यास शिकवी । ओनामा आणि येकाखडी ॥ ४५ ॥ त्यासी देतसे नाना प्रकारीं खाजें । ह्मणे आणिक देईन मागसील जें । ऐसें नाना प्रेत्नांचिया समाजें । गोडी लावी तयासी ॥ ४६ ॥ ऐसें मग पांचां सातां दिवसीं । तें आपण चि बैसे लेहावयासी । परि सवें चि उठोनि खेळावयासी । क्षणमात्रें पळोनि जाय ॥ ४७ ॥ मग बाहातां बैसतां रागेजातां । आपण चि येऊ जाऊं लागे तत्वता । ऐसें दिवसेंदिवस लेहणें येतां । पळों जावों विसरलें ॥४८॥ तव लेहणें जालें सपूर्ण । मग तेथें चि जाला सुलीन । मग पिता नको ह्मणतां हि आपण । परि न सोडी लेहण्यासी ॥ ४९ ॥ तेवि संत कृपाळु निजाचें । मायबाप या विश्वाचे । तारक पाळक अनाथांचे । शरणांगतरक्षक ॥ ५० ॥ तेंहीं नाना सायासें कृपाकटाक्षें । अभाविकें जें कां उपेक्षें । तें लाऊनियां साधनदीक्षे । उद्धरावीं अवश्य ॥ ५१ ॥ ज्या साधनचतुष्टय भूमिका । पितयानें साधिल्या निज बाळका । विक्षिप्ता गतायाता आणि सश्लिष्टता ।

---

१ जे खरोखर बुद्धिमान असून आपल्या बुद्धीचा उपयोग अशाश्वत सुख प्राप्त करून घेण्याकडे करीत असतील, त्याची गणना त्याज्य शिष्यांमध्यें जरी होत असेल, तरी संतानीं त्याची बुद्धि योग्य मार्गाकडे वळवून त्याना ग्राह्य शिष्य करून सोडावे. २ विचार. ३ आर्घ, रत्नदिक्षु. ४ धाक. ५ हाका मारून.

चौथी जाण सुलीनता ॥५२॥ पिता लेहूं बैसवितां हि कृपामेळें । परि न बैसे विक्षेपता उठे पळे । मग क्षणें बैसे क्षणें पळे निवळे । ते गतायाता जाणिजे ॥५३॥ ऐसी जातां येतां लागली गोडी । मग सक्लेश होय परि धरी आवडी । ते संश्लिष्टता जाणिजे धडफुडी । संलग्न ते सुलीनता ॥ ५४ ॥ एवं साधनचतुष्टय भूमिका । सद्गुरूनें लाउनि शिष्यटिळका । शनै शनै वृत्ति स्वरूपोन्मुखा । साधकाची करावी ॥ ५५ ॥ आतां सत्‌शिष्य वर्णाविया कोडें । केवळ बुद्धि प्रवर्तली निवाडें । तरी सज्जनीं श्रीमतीं स्वानंदसुरवाडें । श्रवण करावें अत्यादरें ॥ ५६ ॥ मुख्य ज्ञानामृतासी सत्पात्र । केवळ ब्राह्मण चि होय पवित्र । कां जे वेदबीज आरोपितें क्षेत्रें । सर्वज्ञ ह्मणौनियां ॥ ५७ ॥ वरि सद्गुरुकर्णधारजीवनें । अंकुरोनि विस्तारे अति मानें । तेथें फळप्राप्तीचिया महिमानें । अखंडीत कैवल्य ॥ ५८ ॥ अन्य वर्ण तरि सकळ भ्रष्टले । तथापि जे अनुतापें असती तापले । शमदमादि साधनयुक्त जाले । तरि ते हि योग्य होती ॥ ५९ ॥ पावोनि शास्त्रसाधनाचा पार । कळला सकळ विद्याविचार । सद्गुरुप्राप्तीकारणें थोर । आर्तभूत सर्वस्वें ॥ ६० ॥ उत्तम वौंशज आणि सुशीळ । समर्याद सहिष्णु बुद्धि विशाळ । निर्वाह मेधा धृति विमळ । आचारविचारवंत ॥ ६१ ॥ शिष्य पाहिजे परम चतुर । धीर वीर उदार शूर । भूतदया धार्मिक निर्मळ अंतर । भाविक परम कृपाळु ॥ ६२ ॥ सुंदर असोनि अति विरक्त । ज्ञानी असोनि परम भक्त । वैराग्यें देदिप्यमान परि शांत । लक्षणें जयाचीं ॥ ६३ ॥ तथापि कीर्तनीं परम आवडी । निरूपणाची परम गोडी । अशंकाप्रतोरण कडोविकडी । करूं जाणे नेमस्त ॥६४॥ विपन्न असोनि अति अगर्व ।

---

१ कोणता हि अभ्यास करण्याच्या या चार भूमिका आहेत. २ खरोखरीची. ३ कौतुक, नवल. ४ स्वानंदसुखांत निमग्न होऊन. ५ ब्राह्मणाच्या मनोभूमिकेवर वेदमन्त्ररूप बीज अगोदर च पेरलेलें असतें. ६ सहनशील. ७ वर्तणूक. ८ आनंद. ९ भय. १० शंका काढून त्या निरसन करून घेणे.

स्नान सध्या शुचि अपूर्व । जाणे वेदविधीचा गौरव । धर्म शास्त्र प्रस्थ ॥ ६५ ॥ वर्णाश्रमधर्म परिछिन्न । ठाउकें ज्यासी त्रिकाळज्ञान । भूत भविष्य वर्तमान । ज्योतिषांग जाणे ॥६६॥ वेदशास्त्र पुराणश्रवण । याचे ठाई नित्य निपुण । नित्य अनुष्ठान पुरश्चरण । सप्रदाययुक्त ॥६७॥ अष्टागयोगाचें ज्ञान । जाणे षट्चक्राचें शोधन । करी भगवत्कथाकीर्तन । टाळमृदांगयुक्त ॥ ६८ ॥ पवित्र उत्तम परस्त्रीशुचि । आज्ञा पाळणें भल्यांची । सेवा करूनि वडिलांची । नीतिन्यायमर्यादेसीं ॥ ६९ ॥ गुरुभक्तीचा ठाईं सादर । जो करी भल्यांचा आदर । अतिथीं अभ्यागतीं तत्पर । होऊनि अन्न देणें ॥ ७० ॥ करणें शास्त्रविचारें सत्कर्म । व्रत उद्यापनें आवडी परम । देवब्राह्मणसेवा नित्यनेम । श्रौतस्मार्तीं सादर ॥ ७१ ॥ अध्यात्म ग्रथाची आवडी । लिहिण्यावाचण्याची गोडी । आश्रमधर्माची परवडी । यथायुक्तपणें ॥ ७२ ॥ प्रपचावरी नित्य उदास । ससाराचा अत्यंत त्रास । नाना सायासें परमार्थास । लिगटोनि जाणें ॥ ७३ ॥ कार्य करूनि अति सावध । राजकारणी असोनि विविध । सोंवडेपणीं अति साध । वेष भाविक बावळा ॥ ७४ ॥ करुणाकीर्तन ताळबद्ध । गायनकळा सप्रदायशुद्ध । अध्यात्मनिरूपणें प्रबोध । करणें भाविकासी ॥ ७५ ॥ जो गुरुभजनीं अति सादर । गुरुसेवेविषईं परमादर । गुरुआज्ञेसी होऊनि तत्पर । जो अनन्यत्वें वर्त्ते ॥ ७६ ॥ जो सत्य साचार सात्विक । ज्यासी कदाकाळीं नावडे दाभिक । भोळा सावडा भाविक । तो सत्‌शिष्य जाणिजे ॥ ७७ ॥ कुंडें कपट नावडे ज्यासी । सदा मैत्रिकी सज्जनेंसीं । ज्याचिया भक्तिभाववैराग्यासी । सीमा न करवे ॥ ७८ ॥ असो सावध साक्षपी का जे दक्ष । सारासार-विचारी जे प्रत्यक्ष । ते तत्काळ चि पावती निजमोक्ष । सद्गुरुकृपावसरें ॥ ७९ ॥ श्रवण मनन निजध्यास । साक्षात्कारीं दृढ विश्वास । ते

---

१ प्रस्थानत्रय? २ उपचार अथवा प्रकार. ३ लागून, स्पर्श करून. ४ भोळसरपणांत. ५ वाईट, व्यर्थ. ६ अवसर=काळ. सद्गुरुकृपा होण्याबरोबर.

गांठी पडतां हस्तकेंमस्तकास । तत्काळें चि मोक्ष ॥ ८० ॥ असो शिष्यलक्षणें सांगतां समग्र । ग्रथ विस्तारेल पैं अपार । ह्मणौनि केवळ संकेळित प्रकारें । सागितलीं लक्षणें ॥ ८१ ॥ ऐसे जे का सत्‌शिष्य । ते मोक्षरूप चि सादृश्य । स्वानुभवदिनकर अवश्य । फळद्रूप त्यां ॥ ८२ ॥ ऐसिया सत्‌शिष्यें सद्गुरूसी । शरण रिघोनि सद्भावेंसीं । चुकऊनियां जन्ममरणासी । आत्महित साधावें ॥ ८३ ॥ नरदेह लाधलियाचें सार्थक । सत्‌शिष्यासी तें चि घडलें अवश्यक । स्वानुभवदिनकरीं सम्यक । जे रामदासकृपा घडे ॥ ८४ ॥ स्वस्ति श्रीस्वानुभवदिनकरे । गुरुशिष्यान्वये । चतुर्थ विवेककळापे शिष्यपरीक्षालक्षण निरूपण नाम चतुर्थ कीर्ण प्रकाशः ॥ ४ ॥ ॥ ७ ॥ श्रीराम ॥

---

॥ श्रीराम ॥

नित्यानित्यविचारें विवेकसंपन्न । सत्‌शिष्यें निजवैराग्ययुक्त होऊन । अनन्यत्वें काया वाचा मन । सद्गुरूसी अर्पावें ॥ १ ॥ गुरुमुखें देहचतुष्टय निर्शून । करावें महावाक्यविवरण । मग मी आणि माझेंपण । हें त्यक्त करावें तत्पदीं ॥२॥ ह्मणिजे सत्संग धरिलियाचें सार्थक । तेव्हां चि घडलें पैं अवश्यक । ह्मणौनि सद्गुरु पाहोनि सम्यक । शरण रिघावें तयासी ॥ ३ ॥ तरि सद्गुरु पाहणें किमात्मक । ऐसें हि ह्मणती कितीयेक । अहो आपला गुरु आपण अवश्यक । तेथें अन्य गुरु कासयासी ॥ ४ ॥ तरि हें पाषाडियाचें मत्त । भल्यानीं न बोलावें इथभूत । कां जे आपला आपण गुरु तरि किमर्थ । वेदशास्त्रपुराणें ॥ ५ ॥ जरि आपला आपण गुरु होता । तरि मग येककार चि जाला असता । उच नीच थोर लहान तत्वता । कासयासी होते ॥ ६ ॥ मग वर्ण आणि आश्रम । ह्मणते कोण उत्तम अधम । नाना यातींचा कुळक्रम । वेगळाला का होता ॥ ७ ॥

---

१ साधक भावें नमस्कार घाली । त्याची चिंता साधून लागली । सुगमपंथें नेऊन घाली । जेथील तेथ ॥ २ सक्षेपतः.

अहो ब्राह्मणें षट्कर्में चि आचरावीं । शूद्रें तयांची सेवा चि करावी ॥ क्षत्रियांनीं शस्त्रें चि परजावीं । वैश्यें उद्यम चि करणें ॥ ८ ॥ ह्या कैस्यस चालल्या मर्यादा । कोण मानिती पैं तया वेदा । शास्त्रपुराणाचा धदा । कैसेनि चालता ॥ ९ ॥ जरि आपला गुरु जाला आपण । तरि मग मानितें कोणासी कोण । वडिल आणि धाकुटेंपण । ह्मणेल कोण काइ ॥ १० ॥ ह्मणौनि हे गोष्टी चि अप्रमाण । जे का ह्मणती आपला गुरु आपण । हें बडपाखाडियाचें मत्त जाण । सूज्ञ सहसा न बोलती ॥ ११ ॥ गुरूनें दाखविले जे जे मार्ग । त्या त्या मार्गें चि चाले जग । ह्मणौनि गुरु नसलियां मग । कोणें कैसें वर्तावें ॥ १२ ॥ अहो गुरु न दाखविता मार्गसोय । तव चालावें कैसें कोणें काय । सांगितल्याविण नाना उपाय । कैसे कळती प्राणियासी ॥ १३ ॥ क्षुल्लक जें कां ससारिक ज्ञान । तें न कळे सहसा सांगितल्यावाचून । मां परवस्तुसाधन आपला आपण । कैसेन पावेल पैं ॥ १४ ॥ ह्मणौनि सर्वथा सद्गुरुवाचून । न घडे चि पैं आत्मसाधन । याकारितां पाहोनि उत्तम लक्षण । वर्णाश्रम विद्युक्त ॥ १५ ॥ तरि आतां गुरुत्वाचें अधिष्ठान । विचारितां सर्वांचा गुरु ब्राह्मण । वर्णांना ब्राह्मणो गुरु हें वचन । शास्त्रांतरीं प्रसिद्ध ॥ १६ ॥ ह्मणौनि सकळासी गुरु ब्राह्मण । ऐसें वेदवचन प्रमाण । अन्य याती जे का वर्णहीन । त्यासी गुरुत्व न घडे चि ॥ १७ ॥ पाहातां च्यान्ही वर्ण अठरापगड याती । लोम विलोम अनुलोम प्रतिलोम स्थिति । दर्शनें उपदर्शनें उदंड असती । छत्तीस हीं पापाडें ॥ १८ ॥ या हि वेगळीं अनेक बडपाषांडें । नवीं जुनीं जालीं आहेति उदडें । इतुक्या हि शासन ब्राह्मणदडें । अद्यापि चालत असे ॥ १९ ॥ वेद शास्त्र पुराण ज्योतिष । स्मृतिसमुच्चय धर्मशास्त्रसारांश । वैद्यक गायनविद्या नाना प-

---

१ परब्रह्मस्वरूपाची प्राप्ति २ ' याप्रमाणें सद्गुरूची सोय धरावी ' हे शब्द अध्याहृत आहेत. ३ वर्णसकराचे निरनिराळे प्रकार. ४ सांख्य इत्यादि निरनिराळीं शास्त्रमतें ५ या सर्व नास्तिक मतांवर सनातन ब्राह्मण धर्मानें आपली छाप अजूनपर्यंत पूर्णपणे बसविली आहे.

रिभाष्य[1] । ब्राह्मणगृहीं सर्व हिं ॥ २० ॥ सा राग[2] आणि भार्या छत्तिस । उपराग[3] सहस्र सत्ताविस । तानमान मूर्छना अवरोहास[4] । प्रशंसिते ब्राह्मण ॥ २१ ॥ ब्राह्मणाकरितां यज्ञ चालती । पृथ्वीवरी स्वाहास्वधाकार होती । तेणें पर्जन्याची वृष्टि होऊनि पिकती । सकळ हि धान्यें ॥२२॥ तीर्थें क्षेत्रें प्रतिमा मूर्ति । ब्राह्मणाकरिता त्यांची महती । व्रतें उद्यापनें सकळ चालती । ब्राह्मणांचेनि योगें ॥२३॥ ग्रहण नक्षत्रें भूगोळरचना । ब्राह्मणांवीण कोण्हासी कळेना । तिथि वार नक्षत्र योगकरण गणना । दिनमान संवत्सर ॥२४॥ पंचांग जन्मकाळ ग्रहण । सौरसिद्धांत[5] लग्नसाधन । रमलशास्त्र कळे परिछिन्न । ब्राह्मणाकरिता ॥२५॥ ब्राह्मणाचे घरीं जें नाहीं[6] । तें अमान्य कीजे लोकत्रईं । ह्मणौनि सकळ चराचराचा ठाईं । ब्राह्मण पूज्य सर्वत्रें ॥ २६ ॥ ब्रह्मचर्य आणि गृहस्थाश्रम । वानप्रस्थ तथा संन्यासधर्म । या चहू आश्रमाचें स्वधर्मकर्म । ब्राह्मणाकरितां चि ॥ २७ ॥ देवदेवताचा सकळ महिमा । ब्राह्मणमुखें तृप्त परमात्मा । अग्नीसी थोरपणाची गरिमा[7] । ब्राह्मणें दिधली ॥ २८ ॥ ह्मणौनि ब्राह्मण तो चि नारायण । ऐसें बोलिलें वेदवचन । याकरितां गुरुत्वें वरिष्ठ ब्राह्मण । सकळांसी निश्चयें ॥ २९ ॥ इतुकेन संपला विवेककळापकीर्ण । पुढें सांगिजेल सत्कर्माचें लक्षण । स्वानुभवदिनकरीं संपूर्ण । तुबळेल सुख ॥ ३० ॥ इति श्रीस्वानुभवदिनकर । रामदासीं शरण दिनकर । दिनकर रामींरामदास[8] साचार । कायावाचामनेंसीं ॥ ३१ ॥ स्वस्ति श्रीस्वानुभवदिनकरे । गुरुशिष्यान्वये । चतुर्थ विवेककळापे । गुरुकर्तव्याकर्तव्यलक्षणनिरूपणं नाम पंचम कीर्ण प्रकाश. ॥ ५ ॥ येकुण कळाप वोवसिंख्या ॥ ३०३ ॥ ॥ ७ ॥ ७ ॥

---

१ टीकाग्रंथ. २ गायनशास्त्रांत मुख्य राग सहा आहेत ३ रागिणी. ४ गायनात एकवीस स्वर तीन ग्रामाच्या धोरणानें होतात त्याचें नांव. ५ सूर्याच्या गतीवरून निघणारे सिद्धांत ६ ब्राह्मणांनीं ज्याचा अवलंब केला नाहीं ७ महत्व ८ श्रीरामाच्या ठिकाणीं ज्याप्रमाणें श्रीरामदास लीन असत, त्याप्रमाणें श्रीरामदासांच्या ठिकाणीं दिनकर कायावाचामनानें लीन होत आहे.

## ॥ कर्मकळाप पांचवा ॥ ५ ॥

### ॥ श्रीरामचंद्र समर्थ ॥

ॐ नमो जी श्रीगुरुराया । अनन्य भावें तुज स्मरोनियां । सत्कर्मकळाप आठऊनियां । निज कृपा देईं मज ॥ १ ॥ सपतां विवेककळापाचें कीर्ण । निश्चयेंसीं सकळांसी गुरु ब्राह्मण । त्यावांचूनि गुरुत्व अप्रमाण । वर्णहीन यातीसी ॥ २ ॥ ह्मणौनि सांगावया हें चि कारण । सर्वांसी गुरुत्वें श्रेष्ठ ब्राह्मण । गुरुत्वासी अधिकार ब्राह्मणेंवीण । सर्वथा घडेना ॥ ३ ॥ अन्य यातीचा गुरु करितां । ब्रह्मसभेंत लाजिरवाणें सर्वथा । न ये त्यासी नमस्कार करिता । अथवा पूजाउपचार ॥ ४ ॥ ह्मणौनि गुरूसी अमान्य करितां । गुरुहत्येचें पाप बैसे माथां । त्यासी पूजा नमस्कार ब्रह्मसभेंत होता । ब्रह्मक्षोभ घडे ॥ ५ ॥ हीन यातीचया गुरूचें तीर्थ । प्रसाद घेतां न ये ब्रह्मसभेंत । यद्यपि घेतलें तरि प्रायश्चित्त । घेणें पडेल ॥ ६ ॥ दोहींकडूनि पडते सांकडी । मां त्या गुरुत्वाची काय गोडी । तथापि घेतली जीवें जरि आवडी । तरि आपण चि भ्रष्टावें ॥ ७ ॥ परतु शास्त्रबाह्य कर्म करूं नये । करितां बहुत होती अपाय । त्यासी व्यथा कां मृत्यु तत्काळ चि होय । अथवा दरिद्र प्राप्त ॥ ८ ॥ असो आतां गुरुत्वासी निश्चय जाला । जें[४] गुरु ब्राह्मण चि पाहिजे केला । तो हि ज्ञानी सत्पुरुष पाहोनि भला । कर्मनिष्ठ सुशीळ ॥ ९ ॥ स्नानसंध्या आचारशीळ । सज्जन सात्विक परम दयाळ । शरणागतजनवत्सळ । प्रबोधकर्ता ॥ १० ॥ बुद्धि जयाची असाधारण । शांति क्षमा दया परिपूर्ण । अध्यात्म ग्रथमात्रीं परिछिन्न । दृष्टि पुरे जयाची ॥ ११ ॥ जाणे देहचतुष्टयानिर्शन । पचीकर्ण महावाक्यनिवरण । आत्मज्ञानाचा विचार सपूर्ण । सारासार नित्यानित्य ॥ १२ ॥ सगुण साक्षात्कारी असोन । ब्रह्मानुभवी परिपूर्ण । अध्यात्म

---

१ हीनयातीचा गुरु करू नये । (दासबोध) २ दासबोध द. ५ स. ११२. ३ सकट ४ कीं ५ कोणताहि अध्यात्म ग्रंथ असो, तो ज्याच्या अवलोकनात आल्यावांचून राहत नाही.

ग्रंथाचें निरूपण । प्रबोधूं जाणे ॥ १३ ॥ सगुण भक्तीचे ठाईं आवडी । कथा-कीर्तनीं नित्य गोडी । जयातिया महोत्साव यात्रापरवंडी । यथायुक्तीं करणें ॥ १४ ॥ वर्णाश्रमधर्म संरक्षून । सदा प्रपचावरी उदासीन । जयासी देहाचें नाहीं भान । विरक्त सदैव ॥ १५ ॥ ऐसें सर्वगुणसपन्न । तें चि सद्गुरूचें अधिष्ठान । साधकें तेथें चि रिघावें शरण । अनन्य भावेंकरूनि ॥ १६ ॥ काया वाचा आणि मनें । अर्थ सपत्ति जीवें प्राणें । सर्वस्वें श्रीगुरूसी अर्पणें । स्त्री पुत्र गृह वृत्ति ॥ १७ ॥ सद्गुरूचें लक्षूनि ध्यान । करावें यथाविधीं आवाहन । देऊनि मंत्रयंत्रोक्त आसन । अर्घ्यविधि करावा ॥ १८ ॥ निजभावें चरणक्षाळण । करूनि विध्युक्त द्यावें आचमन । मधुपर्कादि पूजाविधान । सद्गुरूसी करावें ॥ १९ ॥ देऊनि पीतांबरपरि-धान । स्वर्णमंडित यज्ञोपवीतधारण । मस्तकीं मुगुट कर्णभूषण- । युक्त कुंडलें घालावीं ॥ २० ॥ कठीं माळा नवरत्नाचिया । पदक साजिरें येकावळिया । नाना परिमळ पुष्पयातीचया । माळा हार झुबुक ॥ २१ ॥ भुजीं केयुरें करीं कडलगें । करांगळीं मुद्रिका सयोगें । पवित्रें रामनामांकित अव्यगें । रत्नखचित सुवर्ण ॥ २२ ॥ कटीं कटसूत्र रत्नखचित । रुणझुणित क्षुद्रघटान्वित । तोडर चरणीं मिरवत । कामकाळावरी ॥ २३ ॥ दिव्यांबराचीं परिधानें । पदरीं झालर मोतियें रत्नें । जाळिया गुफोनि सुमनें । परिधान करावया ॥ २४ ॥ मस्तकीं धरावें येकछत्र । ऊष्णनिवारणार्थ आतपत्र । निशाणें पताका व्यजनपत्र । विजनार्थ चामर ॥ २५ ॥ भाळीं केशरगंध रेखूनि चांगलें । वरी कस्तुरी अक्षताबिंदुलें । सर्वांगीं धुपेल मर्दूनि चर्चिलें । मळयकृष्णा-गर ॥ २६ ॥ कर्पूरयेळांमिश्रित उदक । धूप दीप खाद्य नैवेद्य सम्यक । नाना याती फळें अनेक । समर्पावीं सद्गुरुपुढा ॥ २७ ॥ षडरसान्वित चतुर्विध अन्नें । सद्गुरूसी देऊनि भोजन । नाना परिमळद्रव्यें मिश्रित करून । विडा द्यावा श्रीगुरूसी ॥ २८ ॥ मग पचारती करूनि वाद्य-

---

१ निरनिराळ्या प्रकारच्या यात्रा. २ एकेरी हार. ३ पखा. ४ चौरी. ५ वेलदोडे.

मेळीं । मस्तकीं समर्पावी पुष्पांजुळी । प्रदक्षणा सारूनि बद्धांजुळी । साष्टांगेंसीं दंडवत ॥ २९ ॥ अहो सद्गुरूसी कीजे जो जो उपचार । तो थोडा चि गमे मज साचार । कां जे शाश्वतासी नाशिवंताचा आभार । कायसा तऱ्ही देइजे ॥ ३० ॥ परंतु आपुलिये आवडीची जाती । वाटतसे रिकामेपणाची खंती । ह्मणौनि नाना उपचारसंपत्तीं । सद्गुरुसमर्थ पुजावा ॥ ३१ ॥ पाहातां सद्गुरुसमर्थासारिखे । कोण पां आणिक असे सखे । जेणें अनेकें संसारदुःखें । कृपाकटाक्षें वारिलीं ॥ ३२ ॥ सद्गुरु देव धर्म तीर्थ व्रत । सखा सोयरा साह्यकर्ता समर्थ । इष्टमित्र सुहृद बंधुत्वें विख्यात । मायबाप निजाचा ॥ ३३ ॥ त्यापरतें आणिक थोर दैवत । नाहीं नाहीं सहसा इथंभूत । ऐसिया समर्थासी उत्तीर्ण उचित । काइसेन पैं व्हावें ॥ ३४ ॥ सद्गुरूचा जो सकळ परिवार । तें चि देवतार्चन साचार । त्याचा करणें परामर्श प्रकार । ते देवपूजा आपुली ॥ ३५ ॥ गृहें गोपुरें गाई ह्मैसी । अश्वें वहनें दासदासी । जो पदार्थ प्रिय आपणांसी । तो गुरुगृहीं समर्पावा ॥ ३६ ॥ गुरुगृहीं जे जे पाहिजे औइती । ते ते समर्पावी संपत्ति । धान्यें जैसीं जितुकीं लागती । तें द्यावीं यथासमईं ॥ ३७ ॥ वस्त्रें द्यावीं लागती तितुकीं । अळंकार भूषणें मनासारिखीं । पात्रें द्रव्यें संपत्ति अनेकीं । सर्व अर्पिजे गुरुगृहीं ॥ ३८ ॥ मग येकपणें उरलें जें मीपण । त्याचें श्रीगुरुपदीं समर्पण । सद्गुरूसी या देहाचें निंबलोण । सर्व पदार्थें करावें ॥ ३९ ॥ ह्मणिजे जन्मासी आलियाचें । सार्थक घडलें पैं साचें । न घडे तरी व्यर्थ भातुकें काळाचें । पोसिलें जन्मवरी ॥ ४० ॥ जो जो पदार्थ आपणांसी आवडे । तो तो ठेऊनि श्रीगुरुपुढें । स्तवन करावें वाडेंकोडें । अति विनित होऊनि ॥ ४१ ॥ जय जय जी सद्गुरुस्वामी । बहुत गांजिलों संसारऊर्मी । अहंकारा वरपडा होऊनि माझा मी । ह्मणौनि भ्रांतीं भांबावलों ॥ ४२ ॥

---

१ उपकार, ऋण. २ सामुग्री. ३ अत्यत. ४ संसाररूप सागरावरील तर-[illegible]

या ससारश्रमें श्रमलों । त्रिविधतापें मी जी पोळलों । ह्मणौनि सखया तुज शरण आलों । कृपानिधी कृपाळुवा ॥ ४३ ॥ जय जय जी कृपासिंधु । अनाथनाथा दीनबंधु । कृपाकटाक्षमात्रें भवबाधु । छेदावा जी माझा ॥ ४४ ॥ ऐसा घाबिरेपणें अष्टभावेंसीं । स्वानदें दाटलो निज मानसीं । श्रीगुरुपदांवरी लोटला तवं हृदयेंसीं । आळगिला वरिच्यावरी ॥ ४५ ॥ मग श्रीगुरुनाथें बोलों आरंभिलें । जेवि ते निशब्दीं शब्द उठिले । जाणों परब्रह्मासी फुटले । कृपांकुर चि ते ॥ ४६ ॥ कां तो सुकलया झाडां पडला पाउस । कीं मरतया जोडला अमृत-लेश । तेवि स्वानुभवदिनकरीं सारांश । कृपाघन वोळला ॥ ४७ ॥ वा रे सखया शिष्यटिळका । काय तुझिये चित्तीं असेल अशका । तें तू स्वसुखें निःशंक बोल का । तुज आवडे तैसें ॥ ४८ ॥ ऐसा लाधता कृपावरद । स्वानदें शिष्य होऊनि सावध । सत्कर्म बोलता जाला विविध । श्रीगुरुकृपाप्रसादें ॥ ४९ ॥ दिनकर रामदासीं सभाग्य । होऊनि लाधला निज वैराग्य । जें प्राप्त जालियां सकळांसी योग्य । तें सत्कर्म सिद्ध फळेल ॥ ५० ॥ असो आता सत्कर्म बोलेल जें दिनकर । तें श्रोतीं श्रवण करावें होऊनि सादर । मग आचरण हि तदनुसार । केलें चि करावें ॥ ५१ ॥ स्वस्ति श्रीस्वानुभवदिनकरे गुरुशिष्यान्वये पंचम सत्कर्मकळापे श्रीगुरुपूजनपद्धतिनिरूपण नाम प्रथम कीर्ण प्रकाशः ॥ १ ॥

---

॥ श्रीराम ॥

तरी ऐक शिष्या सावधान । तुवां पुसिलें सत्कर्मलक्षण । तरी त्याचें पचधा असे लक्षण । तें समूळ आइक तू ॥ १ ॥ मुख्य आत्मा निर्गुण निर्विकार । तो गुणभूतसगें[1] धरी शरीर । मग आचरण हि तद्-नुसार । देहात्मयोगें[2] करी ॥ २ ॥ तेथ शरीर हें पचभूतात्मक । माजीं त्रिगुण विकारें वर्ते सम्यक । कार्यकारणयोगें निष्टंक[3] । दशेंद्रियद्वारें ॥ ३ ॥

---

१ त्रिगुण व पचभूतें या अष्टधा प्रकृतीच्या सगानें. २ देहबुद्धीचा अंगिकार करून. ३ निश्चयेंकरून.

तरी पंचभूतें आणि तिन्ही गुण । याचें समूळ रूप लक्षण । तुज उत्तरार्द्धी विशद निरूपण । सविस्तर सांगों ॥ ४ ॥ प्रस्तुत आतां सत्कर्मलक्षण । तुज सांगों साकल्य निरूपण । पंचधा प्रकारें विभागून । स्वकार्यकारणेंसीं ॥ ५ ॥ त्यात येक जाणिजे शरीरस्वभावकर्म । दुसरें इंद्रियस्वभावें घडे निभ्रम । तिजें गुणस्वभावें निफजे निसीम । चौथें वर्णाश्रमजातियुक्त ॥ ६ ॥ पांचवें बोलिजे उपकर्म । त्यांचा वर्णाश्रमजाति कुळक्रम । एवं पंचधा योगें सत्कर्मधर्म । निरोपिले तुज ॥ ७ ॥ तवं शिष्य बोले लडिवाळपणें । हें मज सांगा जी समूळ लक्षणें । सांगतसां जी सकळितपणें[1] । तें मज कैसें कळेल पा ॥ ८ ॥ मग कृपाद्रवलेनि[2] श्रीगुरुराजें । बोलिजेल शरणागताचिया काजें । तेथ आद्यंत सत्कर्माचिये वोजें[3] । दाविजेल आता ॥ ९ ॥ तेथ कर्में असती नानाविध । त्यामाजीं मुख्य जाणिजे द्विविध । प्रवृत्तिनिवृत्यात्मक समध । सीमा दोहींची ॥ १० ॥ तेथ प्रवृत्यात्मक जें का कर्म । त्याचें सांगिजैल प्रस्तुत वर्म । मग निवृत्यात्मक सहज निष्कर्म । उत्तरार्द्धी जाणसील ॥ ११ ॥ पाहातां प्रवृत्तिकर्माचा विचार । या देहाकरिता पंचधा उद्भव साचार । आणि कर्माकरिता देहाचा विकार । अंद्यत उद्भव ॥ १२ ॥ देहाकरितां नित्य नैमित्य कर्म । प्राणी करिती नाना संभ्रम । कर्मावेगळा देहाचा उद्गम । कदापि न घडे ॥ १३ ॥ तरी देहावेगळें कर्म न घडे । आणि कर्मावेगळें देह हि न बहुडे[5] । हें येकाविण येक असें घडे । जन्यजनकत्वें पाहातां ॥ १४ ॥ जेवि का तो बीजीं सामावला तरु । तरुकरिता निफजे बीजाकारु । तेवि देहीं जाणिजे कर्मप्रकारु । कर्मी उद्भव देहाचा ॥ १५ ॥ आता सांगतां हें सकळित । तुज न कळे पैं इथंभूत । तरी कर्मी देह तें प्रस्तुत । रूप करूनि दाऊं ॥ १६ ॥ तेथ स्त्रियेसी रजोदर्शन प्राप्त जालें । तेथ पुरुषें प्रथम कर्म

१ संक्षेपत २ कृपालु असल्यामुळें शिष्याची दया येऊन. ३ शुद्ध. ४ सकाम कर्मे करणाराची स्थितिगति देहामुळे कर्म व कर्मामुळें पुन्हां देहधारण अशी रहाटगाडग्यासारखी होत असते. ५ मागें फिरत नाहीं

आरंभिलें। नाना शास्त्रविधीं संपादिलें। गर्भाधानासी पैं ॥ १७ ॥ गर्भ संभवलिया पाठीं। चतुर्थ मासीं शास्त्रदिठी। पुंसवन कर्म परिपाठीं। डोहळे पुसती ॥ १८ ॥ मग सातवे मासीं सीमंतोन्नयन। नववे मासीं गर्भजनन। जाल्यां पुत्रमुखदर्शन। कर्मकळाप आचरती ॥ १९ ॥ करूनि शास्त्रविधीं पुण्याहवाचन। सत्कर्मीं देवब्राह्मणसंतर्पण। सुवर्णमुद्रा मधुसिंचन। वेदवाक्येंसीं पुत्रमुखीं ॥ २० ॥ ॐ आत्मावै पुत्र नामासी। ह्मणिजे जो चि मी गा तो चि पुत्र होसी। ऐसिया परमोत्सवेंसीं। कर्मीं जन्मप्रभव ॥ २१ ॥ मग बारावे दिवसीं नामकर्म। मासांतीं दुग्धपानसंभ्रम। सातवा मासीं अन्नप्राशनकर्म। कर्णवेध नवमासीं ॥ २२ ॥ तिसरे वर्षीं चौलकर्म। उत्सवें शिखामुहूर्तसंभ्रम। उपनयन आणि व्रत नियम। तथा गायत्रीउपदेश ॥ २३ ॥ हें पांचापासूनि आठव्यापर्यंत। करूनि वेदारंभ यथोचित। मग गोदानकर्म करूनि पश्चात। विवाहकर्म ॥ २४ ॥ सेवटीं सोळावें उत्तरकर्म। देहांतीं अवश्य कर्तव्य नियम। एवं कर्मीं देहाचा आद्यंत संभ्रम। मूळान्वयें पाहातां ॥ २५ ॥ जन्मांतरीं उत्तम सत्कर्म केलें। तेणें उत्तम देह प्राप्त जालें। असत्कर्में येणें घडलें। नाना पापयोनींसी ॥ २६ ॥ असो ऐसें कर्मीं देह निर्माण जालें। पुढें कर्मासी च आचरलें। सेवटीं शुभाशुभकर्में प्राप्त जालें। भोगणें गति अवगति ॥ २७ ॥ असो एवं पाहातां कर्मीं देह। निश्चयें जालें निःसंदेह। आतां देहीं कर्मांचा समूह। उद्भवे कैसा ॥ २८ ॥ तरी शरीरीं ज्या का तिन्ही अवस्था। जागृति स्वप्न सुषुप्ति व्यवस्था। शरीरस्वभावकर्मसंस्था। याची चालतसे नित्य तेणें ॥ २९ ॥ देहात्मयोगें शरीरस्वभावकर्म। अवस्थानुरूप चाले निभ्रम। कार्यकारणत्वें नित्यनेम। जागृति स्वप्न सुषुप्ति ॥ ३ ॥ शरीरसंगें आत्मयासी जागृति। तदनुसार सहज कर्में चालती। तेथ इंद्रियें हि

---

१ दिठी=दृष्टि. २ गरोदर स्त्रियेसंबंधाचा एक शास्त्रविधि आहे. ३ एक विधि आहे. ४ उत्पत्ति. ५ भिकबाळीकरितां कान टोचणे.

अनुकारती[1] । आपुलालिये कर्मीं ॥३१॥ आत्मराज शरीराचें लाहोनि ऊर्जितें[2] मग अंतःकर्णपंचकाचेनि हातें । ज्ञानेंद्रियकर्मेंद्रियाचेनि उचितें । स्वीकार त्याग करी ॥ ३२ ॥ तेथ श्रोत्र शब्द आइकों इच्छिती । त्वचा घेऊं धावे स्पर्शसंवित्ति[3] । डोळे नाना रूपें पाहाती । सुंदरकुरुपादिक ॥३३॥ जिव्हा रसविषय घेऊनि । गोड खारट कडु तुरटपणीं । आंबट तिखट विटंक[4] जाणोनि । करी त्याग स्वीकार ॥ ३४ ॥ घ्राण सुगंध दुर्गंध जाणतसे । वाचाइंद्रिय शब्द बोलतसे । घेणें देणें करिती आपैसें । करद्वय कार्यकारण ॥ ३५ ॥ पाय करिती संक्रमण । शिश्नद्वार मूत्रशुक्लोत्सर्जन[5] । गुदद्वारें मळविसर्जन । सहजें चि होय ॥ ३६ ॥ ऐसीं दशेंद्रियें आपुलालिये व्यवहारीं । परस्परानुयोगें त्याग स्वीकारी । कर्मे आचरती सहज शरीरीं । जागृति अवस्थेमाजीं ॥ ३७ ॥ कानीं ऐकोनि शब्दविषय । वाचें देणें उत्तरान्वय । त्वचा स्पर्शी घेण्यादेण्याचा उपाय । करद्वईं करणें ॥ ३८ ॥ नेत्रीं रूपविषय अवलोकितां । पदीं चालोनि तेथ जाणें तत्वता । रसगंधविषय जिव्हाघ्राणें घेता । शिश्न-गुदीं मळमूत्रोत्सर्जन ॥ ३९ ॥ हें आत्मा सकळ शरीरेंद्रियसंयोगें । कर्मे आचरे जागृतिचेनि संगें । तंव अकस्मात कार्यकारणयोगें । सुषुप्ति अवस्था प्रकटे ॥ ४० ॥ सुषुप्तीमाजीं गाढमूढता । इंद्रियांसी प्राप्त होत तत्वता । निचेष्टित आत्मा शरीर इंद्रियें होतां । तंव स्वप्नाव-स्था प्रकटे ॥ ४१ ॥ मग सूक्ष्म जें का लिंगशरीर । तेथ वासना-सहित आत्मा घेऊनि बिढार । करीत नाना प्रकारें मनोव्यापार । कार्यकारणरूपें ॥ ४२ ॥ इंद्रियसंगें जागृतीमाजीं । जें जें आत्मा कर्मे करी सहजीं । तें चि दिसती स्वप्नसमाजीं । वासनामय ॥ ४३ ॥ स्वप्न जागृतीचा पैं ठसा[6] । जागृतीमाजीं इंद्रियें करिसी ज्या ज्या अवस्था । तदनुसार नानापरी व्यवस्था । मन करी स्वप्नामाजीं ॥ ४४ ॥ जागृतिसंगें डोळां जें देखिलें । अथवा तें कानीं जितुकें आइकिलें ।

---

१ आकारास येतात, सरसावतात २ बल, आश्रय. ३ स्पर्शज्ञान. ४ विटलेलें. ५ शुक्रोत्सर्जन ? ६ ठसा, संस्कार

तें चि स्वप्नामाजीं दिसें वहिलें । येर कांहीं न देखे ॥ ४५ ॥ स्वप्नीं देखे जैसजैसी व्यवस्था । तदनुसार उमटे शरीराचिन्हसस्था । तवं अकस्मात प्रकटे जागृति अवस्था । कार्यकारणान्वयें ॥ ४६ ॥ मग स्वप्नींचिया नाना व्योवृत्ति । सकळ हि सांगतसे येऊनि जागृति । येथ जन्यजनकभावें अवस्थोत्पत्ति । होतसे हें शरीरस्वभावकर्में । मग त्यामाजीं परस्परानुक्रमें । इंद्रियें आचरती सहज कर्में । हें जाणावीं तुवां यथाक्रमें । स्वभावकर्में इंद्रियांचीं ॥ ४८ ॥ आतां पुढें गुणस्वभावकर्म । त्रिगुणसर्गें उद्भवे निभ्रम । त्याचा सांगिजेल यथाक्रम । पुढें श्रोतीं श्रवण कीजे ॥ ४९ ॥ स्वस्ति श्रीस्वानुभवदिनकरे गुरुशिष्यान्वये पचम कर्मकळापे देहस्वभावकर्म निरूपण नाम द्वितीय कीर्ण प्रकाशः ॥ २ ॥

---

॥ श्रीराम ॥

आतां श्रीगुरूसी करूनि प्रणाम । सांगिजेल त्रिगुणस्वभावकर्म । प्रथम शरीर लाधलियां उत्तम । तदनुसार गुण उठती ॥ १ ॥ मुळीं ब्राह्मण क्षत्री वैश्य शूद्र । यावेगळा नाना यातीसमुद्र । शरीरमात्र जितुके जीव सौंद्रं । तितुके त्रिगुणें व्यापिजे ॥२॥ तेथ चार वर्ण आणि गुण तीन । जाणोनि वेदें विभाग केले परिछिन्न । ते कैसे किमात्मक किंलक्षण । सर्व हि सांगिजेल ॥ ३ ॥ आता ब्राह्मण क्षत्री वैश्य शूद्र वर्ण । आणि सत्व रज तम मिळोनि त्रिगुण । तेथ केवळ जो कां ब्राह्मणवर्ण । तो सत्वगुणात्मक ॥ ४ ॥ सत्व रज मिश्रित क्षत्री वैश्य वर्ण । रज तम मिश्रित शूद्र वर्ण । केवळ तमोगुणात्मक जाण । नाना यातीसमूह ॥ ५ ॥ ऐसिया प्रकारें गुणवर्णविभाग । वेदें विभागूनि यथासांग । आपुलालिया कर्तुत्वें चांगें । आचरती कर्मकळापें ॥ ६ ॥ परि सूक्ष्मरूपें चि त्रिचा-

---

१ स्वप्नावस्थेमध्यें मन जे जे व्यापार करतें व त्यामुळें राग, द्वेष, भय, दुःख, आनद इत्यादि जे विकार मनाला होतात, तदनुसार जागृदवस्थेप्रमाणें इंद्रियें हि हालचाल करूं लागतात २ परिस्थिति, व्यापार ३ ओलसर, दवटीन, अर्थात

[illegible]

रितां । सचराचर त्रिगुणें व्यापलें तत्वतां । आकाश वायु तेज आप पृथ्वी पाहातां । त्रिगुणें व्यापलीं पचभूतें ॥ ७ ॥ शरीरमात्र पचभूता-चें बोतलें । त्यामाजीं त्रिगुण असती व्यापले । कोठें गुप्त कोठें असती प्रगटले । कार्यकारणरूपें ॥८॥ मग सत्वगुण जेथें धरी उन्नति[1] । तेथ रज तम दोन्ही खालावती । रजोगुणाची जालिया अभिव्यक्ति[2] । सत्व तम खालावे ॥ ९ ॥ तमोगुणाचें जेथ होय आरोहण । तेथ सत्व रज दोन्ही जाती गळोन । ऐसे येरयेरावरी गुप्तप्रगटोन । खांचैती[3] सरसावती ॥१०॥ जेवि कां ते राहाटाचे पाळणे । अधोर्द्ध फिरती बळसत्रांणें । तैसें शरीरमात्रें होणें निमणें । सत्वरजतमासीं ॥ ११ ॥ असो आता हे शरीरमात्रीं व्यापून । कार्यकारणत्वें असती त्रिगुण । त्यांची कैसकैसी वोळखण । सागों समजावयासी ॥ १२ ॥ आत्मा शुद्ध बुद्ध पूर्ण सनातन । तो प्रकृतिसगें गुणासारिखा होऊन । वर्तणूक करी कार्यकारण । त्रिगुणा-नुरूपें ॥ १३ ॥ तेथ प्रथम सत्वगुणाचें लक्षण । सांगिजैल यथा-क्रमें करून । तरी निर्मळपणें प्रकाशरूप सपूर्ण । अतर्बाह्य विलसे ॥ १४ ॥ अखड ज्याची वासना शुद्ध । सारासारविचारीं परम सावध । अहर्निश देवब्राह्मणांसन्निध । असोनि सेवा करणें ॥ १५ ॥ सत्क-र्माचें नित्य आचरण । धर्मशास्त्रविधीं परिच्छिन्न । वेदशास्त्रपठण कां नामस्मरण । नित्य अनुतापयुक्त ॥ १६ ॥ सत्वगुणी जो का नर । त्याचा वैराग्यावरी अखड भर । विवेकसपन्न असोनि सादर । परमार्थविषईं ॥ १७ ॥ ह्मणे जावें सतासी शरण । पुसावें श्रीगुरूसी मी कोण । देहचतुष्टय निरास करून । घ्यावा महावाक्यउपदेश ॥ १८ ॥ ऐसी जयासी आस्था पूर्ण । तो प्राणी जाणिजे सत्वगुण । करावें देव-ब्राह्मणसतर्पण । अतीतअभ्यागतीं अति प्रीति ॥ १९ ॥ कथा कीर्तन पुराणश्रवण । दान धर्म तीर्थ व्रत उद्यापन । यात्रा महायात्रा फिरोन । दक्षण उत्तर मानस ॥ २० ॥ बारा ज्योतिर्लिंगें हरिहरस्थानें । प्रयागीं

---

१ उन्नति धरी=प्रधानपणानें प्रगट होतो. २ प्राकट्य, अनुभव. ३ खालाव-तात, दडपले जातात. ४ सवेग

माघस्नानादि गयावर्जनें । अयोध्या द्वारिका आदिकरूनि सकळ स्थानें । जगदीशाचीं पाहावीं ॥२१॥ वैशाखस्नान कार्तिकस्नान । माघस्नान नित्य प्रातःस्नान । नित्यनेमेंसीं देवतार्चन । यथासांग करावें ॥ २२ ॥ नित्यकर्मीं परमादर । नैमित्यासी होय अति सादर । षट्कर्माचरणीं हि पडिभर । बहुत जयाचा ॥ २३ ॥ श्रौतस्मार्तकर्मीं अति आवडी । अध्यात्मनिरूपणाची गोडी । दातृत्वाविषईं नाहीं साकडी । मानसीं जयाचे ॥ २४ ॥ मठ मठिका देवाळयें अग्रेरें । वृंदावनें भुंयेरीं परम रुचिरें । वापी कूप तटाकें मनोहरें । वनवाटिका आराम ॥ २५ ॥ अन्नछत्रें आणि पोहे घालणें । पाथिकासी विश्रांतिस्थळें करणें । संकट पडिलयां साह्य करणें । कोण्हीयेका प्राणियाचें ॥ २६ ॥ स्वशरीराकडे न पाहणें । परोपकारीं झिजवणें । गाई ब्राह्मणाचें गाजिलें सोसणें । मातृपितृसेवेसी सावध ॥२७॥ ससाराचा अखड त्रास । प्रपचावरी नित्य उदास । सर्व हि सोडूनि आशापाश । निसगपणें मोकळा जो ॥२८॥ श्रीगुरुभजनाची नित्य गोडी । गुरुपूजनीं परम आवडी । गुरुसेवेची अखड पैरवडी । निजभावेंसीं विनित ॥२९॥ अखंड करणें ब्रह्मनिरूपण । सारासारविचार ब्रह्मज्ञान । सहनसीळता असोनि उदारलक्षण । जो जें मागेल तें द्यावें चि ॥३०॥ शांति क्षमा दया विनितता तितिक्षा । विरक्ति भक्ति मुक्ति लय लक्ष दीक्षा । सद्विद्या कृपा सम्मीळनता वस्तुपरीक्षा । नित्य न्यायमर्यादेसीं ॥ ३१ ॥ उत्तम आणि सद्गुणसपन्न । होऊनि कीजे जें सत्कर्माचरण । तो सकळ जाणावा सत्वगुण । उत्तम लक्षणयुक्त ॥ ३२ ॥ स्त्रीपुत्रगृहादिकीं अनासक्तता । कोण्हाची करणें नाहीं लालुंप्यता । परस्त्री मातृवत् स्वभावता । निःसशय जो निजांतरीं ॥ ३३ ॥ सदैव सुखसतोषें विराजे । तृष्णा कामना पळालिया लजें । मानापमान होतां न उपजे । सतोष विरह जया ॥ ३४ ॥ ऐसीं सत्वगुणाचीं अपार लक्षणें । सांगि-

---

१ श्रेष्ठता २ अग्रहार=देवब्राह्मणास दिलेला ग्रामादिक त्याचें नांव ३ तळघरें ४ गाई ब्राह्मणानीं किती हि छळलें तरी त्याचा प्रतिकार न करणें ५ चातुर्य, प्रकार, उपचार. ६ नम्रता ७ सुखदु:खादि सहिष्णुत्व ८ लाळ घोटणें या अर्थी.

तलियापरिस कोटिगुणें । वेद शास्त्रें स्मृति पुराणें । सत्वगुणश्रिया विराजती ॥ ३५ ॥ सत महत सिद्ध साधे¹ । महापुरुष ऋषि मुनि प्रसिद्ध । योगी ज्ञानी तपस्वी परम शुद्ध । सत्वगुणें श्रेष्ठ ॥ ३६ ॥ विष्णु केवळ सत्वगुणें वोतला । ह्मणोनि सर्वांचा वडील जाला । कोण्हींयेकें सत्वगुण जरी अवलंबिला । तरी तो हि पावे वडीलपण² ॥ ३७ ॥ जयत्या पर्वें महोत्सव । यांचा करणें नित्य उत्सव । पितृकार्यीं परमोत्सव । भक्तिपुरस्कर करणें ॥ ३८ ॥ फळास्थारहित जें कर्म करणें । यज्ञ दान अथवा तप आचरणें । किं कोण्हीयेक जन्हीं कार्य अवलबणें । तें निष्कामता स्थितीं आचरे ॥ ३९ ॥ या नाव जाणिजे सत्वगुण । सात्विका मतीं करी कार्यकारण । सत्वश्रिया बुद्धि विराजमान । तो निज औंश जगदीशाचा ॥ ४० ॥ असो यावरी उरले जे रज तम । त्यांचा हि सांगिजेल यथाक्रम । त्यात आधीं रजोगुणाचें वर्म³ । लक्षणयुक्त दाखऊ ॥ ४१ ॥ तरी रजोगुणी जो का नर । त्यासी बाह्याकारें करणें कर्मादर । स्नानसध्यादि सत्कर्मव्यवहार । कार्याकारण बाह्यत्वें ॥ ४२ ॥ सत्वगुणापरिस कर्माचा आरभ । करूनि दाखवणें अवष्टंभ । काहीं प्राप्त न होतां तत्काळ क्षोभ । कर्मावरि च करणें ॥ ४३ ॥ स्नानसध्या करणें लौकिका भाग । देवधर्मापरिस प्रपंचीं अति सांग । तीर्थक्षेत्राहूनि अधिक स्त्रीपुत्रप्रसग । व्याही जावाई अभ्यागत ॥ ४४ ॥ आधीं तव सत्कर्म करणें चि नाहीं । तथापि केलें तरी लौकिका भाग पाहीं । आणि जये कर्मीं फळप्राप्ति नाहीं । तें कर्म चि टाकीतसे ॥ ४५ ॥ प्रपचकार्यीं अति हव्यास । गृहांगोपुरांचे नाना सायास । शरीररक्षणाचिया उपायास । नाना प्रकारें करीतसे ॥ ४६ ॥ यज्ञ दान तप आचरण । हें करणें फळास्था धरून । नित्य नैमित्य कर्म टाकून । काम्य⁴ कर्मीं अति आस्था ॥ ४७ ॥ देवीपुढें घट भरून । धरणें बैसे फळप्राप्तिलागून । काहीं प्राप्त न होतां गाळिप्रदान । देवीलागीं देतसे ॥ ४८ ॥

---

१ साधु २ सत्वगुणी पुरुष सर्वांत श्रेष्ठ होय, त्याला वयाची, जातीची चाड नाहीं ३ सार, गुह्य ४ प्रपच ५ अन्यग. ६ सकाम.

यजन याजन अध्ययन । अध्यापन प्रतिग्रह दान । हें षट्कर्मे फळास्था धरून । आचरे प्रसगानुसार ॥ ४९ ॥ तळीं विहिरी कुळवाडीकारणें। का तें लावणें द्राक्षीआम्रवनें । कालवे बांधोनि उदक आणणें । केळी नारेळी पिकावया ॥५०॥ दुग्ध देतील तरी गाईसी पाळावें । ब्राह्मण सेवा करितील तरी अन्न द्यावें । अहेर येतील तरी करावें । तीर्थ व्रत कां सतर्पण ॥ ५१ ॥ जो जितुका जैसा आपणासी भजेल । त्यासी तैसा चि आदर कीजेल। आपणासी न भजलिया बाहेर घालिजेल। माता पिता सुहृद बंधु ॥ ५२ ॥ जेथूनि आपणासी काहीं होणार प्राप्त । त्याचें करावें आतिथ्य बहुत। प्राप्त न होतां लाऊनि दूत। बाहेर घालावें तयासी ॥५३॥ स्त्रियेची मनधरणी करावी । तियेचीं सुहृदें अगिकारावीं । तियेसी नावडती तें बाहेर घालावीं । निज देशातूनि ॥ ५४ ॥ घातपात करूनि वृत्ति[२] साधाव्या । गड कोट इमारती बाधाव्या । विश्व नागऊनि सपत्ती आणाव्या । आपुलिया घरासी ॥ ५५ ॥ जो देव आपुल्यासी बहुत पावेल । त्याचा महिमा बहुत वाढविजेल । व्यंग जालिया भडमा[३] कीजेल। देवदेवताची ॥ ५६ ॥ जो आपल्यासी होय धारजिणा । आणि करील आपुली उर्पार्जना[४] । तोंपर्यंत गुरु व्यंग जालियां छळणा । सर्वं चि कीजेल त्याची ॥ ५७ ॥ आणि मत्र यंत्र कीळनोत्कीळनें । आगमत-प्रोक्त नाना साधनें । शाक्त कौळिक[५] चौळिक सपादणें । भ्रष्टाकार कृत्यें ॥ ५८ ॥ ब्राह्मण आलिया घरासी । विन्मुख दवडी नाना सायासीं । व्याही जावाई येतां परिवारेंसीं । आतिथ्य करी परमोत्सवें ॥ ५९ ॥ कट्वाम्ल तीक्ष्णीं अति प्रीति । परस्त्रिया आणि वेश्या आवडती । नृत्यगायनीं उल्हास चित्तीं । वेश्यादर्शन होता चि ॥ ६० ॥ रजो-गुणी जो कां नर । कदापि शुद्ध नसे त्याचें अतर । भक्तिभावें भज-

---

१ तळीं, विहिरी बांधावयाच्या त्या परोपकारार्थ नव्हे, तर त्यावर बागाईत करून व्यापारधंदा करण्याच्या हेतूनें २ वतन ३ भडिमा=दंभ, परतु या ठिकाणीं भड=फजिती या अर्थानें हा शब्द योजला आहे ४ आपणास पैसे मिळवून देत आहे किंवा आपला योगक्षेम चालवीत आहे. ५ वैदिक व तान्त्रिक मिश्र क्रिया.

नादर । तिळमात्र नसे त्यापासीं ॥ ६१ ॥ तोंवरि धर्मकृत्य करणें चि नाहीं । यद्यपि केलें तरी दांभिक पाहीं । संत महंत देखिलियां काहीं । संतोष नवटे चित्तासी ॥ ६२ ॥ बाह्याकारें सोंगसपादणी । तितुकी याची पुरती मनधरणी । देव धर्म तीर्थ व्रत अंतःकर्णीं । खुपती जैसे हरेळ ॥ ६३ ॥ रजोगुणाचें निजवाणीं बोलतां लक्षण । ब्रह्मा[२] तत्काळ होऊनि ठेला[३] आपण । मज हि बोलतां तेचिपरी होईल ह्मणौन । आतां असो इतुकें चि ॥६४॥ संकळित समजावया कर्मकारण । ह्मणोनि बोलिलों कांहींयेक लक्षण । येऱ्हवीं सांगतां पैं असाधारण । याची लक्षण-स्थिति ॥६५॥ असो सांगितले सत्व रजोगुण । आतां उरला जो का तिजा तमोगुण । त्याचें समजावया कर्मलक्षण । बोलों संकळित प्रकारें ॥ ६६ ॥ तरी आपल्या पोटें खावें हें चि सत्कर्म । ल्यावें नेसावें हा चि स्वधर्म । मारावें कीं मरावें हा नित्यनेम । तमोगुणी प्राणियांसी ॥ ६७ ॥ कैंचा देव धर्म तीर्थ व्रत दान पुण्य । गाई ब्राह्मण कैंचा सत्पुरुष सल्लक्षण । आपणांवांचूनि त्रैलोकीं मान्य । कोण्ही नाहीं आणिक ॥ ६८ ॥ जेवि कां आवसेचें आधार काळोखें । त्याहीवरि अभ्रें व्यापिलें असेंकें[४] । तेवि तमोगुणी प्राणियांसी अति दुःखें । सवसार अवघा गडदे[५] ॥ ६९ ॥ न कळे देव धर्म तीर्थ व्रत । महापुरुष संत महंत । वेद शास्त्र पुराण संमत्त । सत्कर्मव्यवस्था ॥ ७० ॥ तथापि जरी काहीं कळों लागलें । तरी निषिद्ध कर्मी मन प्रवर्तलें । भूत प्रेत कां पिशाच्य साधिलें । कां बाळंतिणीप्रयोग ॥ ७१ ॥ मंत्र शिकला नाना साबरी । तदनुसार दुष्ट कर्में करी । वेताळ खकाळ साधूनि दुराचारी । मद्यपानीं प्रवर्ते ॥७२॥ जारण मारण स्तंभन मोहन । उच्चाटन उद्घाटन वशीकरण । आणि नाना प्रयत्नें परस्त्रीसाधन । दुष्ट कर्में करूं धांवे ॥ ७३ ॥ चोरी चाहाडी आणि परद्वार । याचा हव्यास[६] जयासी फार । अघोर कर्मी अति तत्पर । चेडें चेटकें कुजातें ॥ ७४ ॥ नाना क्षुद्र दैवतें साधनें ।

---

१ गवतांतील कुसळ. २ रजोगुणाचा ईश. ३ स्तब्ध राहिला. ४ असिकें=सर्व. ५ गाढ अंधकार. ६ सप्त व्यसनें.

मेदमासें करी होमहवनें। नाना जीव बळी देऊनि रक्तपानें। सतृप्त होय सावकाश ॥ ७५ ॥ नाना दुष्ट कर्मे द्रव्य मेळऊन। हीनयातिसंग अथवा दास्यादिगमन। क्रूर कर्मी प्रवर्तोन मन। असत्संग धरी तत्काळ ॥ ७६ ॥ अहो या तमोगुणाचीं लक्षणें मुख्य बोलतां। शंकर तमरूप होऊ पाहे अवचिता। मग सत्वगुणाशें विष्णुस्मरण करितां। निजसुखें जाला समाधिस्त ॥ ७७ ॥ ह्मणौनि तमोगुणाचें सांगतां संपूर्ण लक्षण। बिहों[2] पाहे माझें अंतःकरण। आता पुरे येऊ इतुकें चि पूर्ण। समजावयाकारणें ॥ ७८ ॥ असती प्राणिमात्रीं व्यापक त्रिगुण। परि कोठें प्रगट कोठें गुप्त होऊन। शरीरमात्रीं चालविती कार्यकारण। न्यूनाधिकपणें ॥ ७९ ॥ ह्मणौनि शरीरमात्रीं गुणस्वभावकर्म। तें हें चालतसे जें नित्यनेम। समयावसरें देहीं प्रगटोनि कर्म। तदनुसार चाले ॥ ८० ॥ असो प्रथम सांगितलें शरीरस्वभावकर्म। त्यानंतर इंद्रियस्वभावकर्म। तिजें हें गुणस्वभावकर्म। त्रिगुणलक्षणांसहित ॥ ८१ ॥ अतःपर सांगिजेल पुढिलिये कीर्णी। वर्णाश्रमयातिकर्मकरणी। दिनकर रामदासीं विनीत होऊनि। ग्रंथोद्यमीं प्रवर्ते ॥ ८२ ॥ स्वस्ति श्रीस्वानुभवदिनकरे गुरुशिष्यान्वये पंचम कर्मकळापे त्रिगुणस्वभावकर्मनिरूपण नाम तृतीय कीर्ण प्रकाशः ॥ ३ ॥

---

॥ श्रीराम ॥

तरी ब्राह्मण क्षत्री वैश्य शूद्र। यावेगळे नाना यातिसमुद्र। दर्शनी उपदर्शनी सुभद्र। कर्मकळाप ॥ १ ॥ तेथ ब्राह्मणासी षट्कर्मे प्रमाण। क्षत्री वैश्यासी कर्तव्य तीन[3]। आणि शूद्रासी अधिकार पूर्ण। येकें[4] चि कर्मी ॥ २ ॥ आतां षट्कर्मे तें कोण कोण। तरी यजन याजन तथा अध्ययन। अध्यापन आणि प्रतिग्रह दान। हें साहीं कर्मे ब्राह्मणासी ॥ ३ ॥ तेथ यजन ह्मणिजे स्वयें यज्ञ करावे। जे कां सोमादि अश्व-

---

१ तमोगुणाचा ईश. २ भीति वाटते. ३ यजन, अध्ययन, दान. ४ दान.

मेधांत बरवे । अथवा नित्यकर्मीं अभिभवे । श्रौतस्मार्तादिक ॥ ४ ॥ स्वयें यज्ञ करणें या नांव यजन । दुसरियासी दीक्षा देणें तें याजन । स्वयें करावें वेदपठण । त्या नाव अध्ययन बोलिजे ॥ ५ ॥ दुसऱ्यासी सांगावें वेदाध्ययन । त्या नांव बोलिजे अध्यापन । स्वयें द्यावें त्या नाव दान । घेणें तो प्रतिग्रह बोलिजे ॥ ६ ॥ ऐसा साही कर्मांचा अधिकार। तो येक ब्राह्मणासी च साजे वडिवार । मग यजन अध्ययन आणि दान-प्रकार । त्रिकर्मी ग्राह्य क्षत्री वैश्य ॥ ७ ॥ क्षत्रीं वैश्यें स्वयें यज्ञ करावे । त्यासी दीक्षादानीं सामर्थ्य न संभवे । स्वयें सांग वेदाध्ययन करावें । सांगायासी अधिकार नाहीं ॥८॥ क्षत्रीं वैश्यें स्वयें दान अवश्य द्यावें । परि प्रतिग्रहीं अधिकार न संभवे । एव तिहीं कर्मीं च अभिभवे । क्षत्री आणि वैश्य ॥९॥ मग उरला जो चौथा शूद्रवर्ण । त्यासी दानकर्मीं च अधिकार पूर्ण । उरलिया पांचा कर्मांचें आचरण । त्यासी न घडे सर्वथा ॥१०॥ उरल्या अठरापगड याति आणि उपयाति । त्याचीं यातिपरत्वें जें कर्में असतीं । तें सर्व हि धर्मशास्त्रानुवृत्ति । आचरिजे तेहीं ॥११॥ आता ब्राह्मणासी आचरणीय आश्रम । ब्रह्मचर्य तथा गृहस्थाश्रम । मग वानप्रस्थ आणि सन्यासकर्म । यथानुक्रमें ॥ १२ ॥ आता ब्रह्मचर्य ह्मणिजे काये । तें सांगिजेल पैं यथान्वयें । तरी जालिया व्रतबंध ब्रह्मचर्य । गुरुसेवा करावी ॥ १३ ॥ अभ्यासावें वेद शास्त्र पुराण । आचरावें शास्त्रोक्त कर्मविधान । नित्य करावें भिक्षाटण । शरीररक्षणार्थ ॥ १४ ॥ ऐसीं बारा अथवा चोवीस वर्षें । आचरावें विवेकयुक्त वैराग्य उल्हासें । मग श्रीगुरुआज्ञेचिया संतोषें । गृहस्थाश्रम आचरावा ॥ १५ ॥ वधु पाहोनियां अति सुलक्षण । दशविध घटितीं लग्न साधून । न्यायोपार्जित द्रव्य मेळऊन । आश्रमधर्म विध्युक्त ॥ १६ ॥ गाईब्राह्मणाचें संरक्षण । अतिथीं अभ्यागतीं अन्नदान । श्रीगुरुपूजा आणि देवतार्चन । नित्यनेमेंसीं पुजूनिया ॥ १७ ॥ अग्निहोत्र अथवा स्मार्ताधान—। योगें नित्य करावें अग्निसेवन । देवब्राह्मणसंतर्पण । जयंत्यादि पर्वोत्सव ॥ १८ ॥ मग

---

१ अभिभवणें=उदय पावणें, पसरणें. २ मोठेपणा. ३ स्मृत्युक्त कर्में आचरून.

शास्त्रविधीं करूनि पुत्रोत्पादन । त्याचें व्रतबंधविवाहादि कर्म करून । त्यासी मग सर्व हि आश्रमधर्म निवेदून । वनवासीं करणें वानप्रस्थ ॥ १९ ॥ स्त्री असलियां हि समागमें । ब्रह्मचर्यें असावें नित्य नेमें । नाना शरीरक्लेशसभ्रमें । वैराग्यसिद्धि साधावी ॥ २० ॥ वनीं वास्तव्य ह्मणौनि वानप्रस्थ । कंदें मुळें भक्षणार्थ । नाना क्लेशीं साधावा परमार्थ । विवेकवैराग्ययोगें ॥ २१ ॥ तेथ कामाचा लय करूनि । स्त्रियेची आज्ञा घेऊनि । उत्तम श्रीपाद सन्यासी पाहोनि । सन्यासग्रहण करावें ॥ २२ ॥ तेथ पचीकर्ण महावाक्य प्रचार । करूनि नित्य सारासार विचार । वेदशास्त्रमथितार्थ जो कां साचार । तो सन्यासविधीं विचारिजे ॥ २३ ॥ असो यापरि ब्राह्मणासी । अधिकार असे चहूं आश्रमासी । क्षत्री आणि वैश्यासी । तीन चि आश्रम ॥ २४ ॥ ब्रह्मचर्य गृहस्थ वानप्रस्थ । बोलिलें दों वर्णांसी इथंभूत । सन्यासग्रहणीं कदापि न होती समर्थ । क्षत्री आणि वैश्य ॥ २५ ॥ शूद्रासी येक गृहस्थाश्रम । बोलिला धर्मशास्त्रीं निभ्रम । ब्रह्मचर्य वानप्रस्थ सन्यासकर्म । शूद्रासी सर्वथा असेना ॥ २६ ॥ एवं क्षत्री वैश्य शूद्र वर्ण । यां तिघांसी नाहीं सन्यासग्रहण । मा इतरा यातींस सन्यासग्रहणीं पुसे कोण । धर्मशास्त्रमतें ॥ २७ ॥ मग शंकराचार्यें कलियुगीं । भ्रष्टसन्यास दिधला यांलागीं । कां जे वडपाशांडियांच्या संसर्गीं । अंन्योन्य जालें ह्मणौनि ॥ २८ ॥ देवधर्मकर्में गेलीं गळोन । मग तेथ सद्विधि विधानासी पुसे कोण । तीर्थ क्षेत्रें देवतांचें जालें उत्थापन । तेणें सत्कर्म नाशलें ॥ २९ ॥ कलियुगीं यवनाचें राज्य जालें । सत्कर्मविधान सर्व मोडलें । ब्राह्मण कर्मभ्रष्ट जाले तेणें राहिले । स्वाहास्वधाकार अवघे ॥ ३० ॥ या विश्वाचें गुरुत्व ज्याचिया आंगीं । ते ब्राह्मण सेऊं लागले भागी । षट्कर्मेंसी त्यागूनि स्नानांलागी । ज्ञानी ह्मणविती

१ वारवार उपयोग करणें, खल करणें २ परस्पर ३ षट्कर्मांचें आचरण सोडून देऊन फक्त स्नान केलें की, ब्राह्मणधर्मांचें नित्यकर्म संपलें, अशी ब्राह्मणांची समजूत होऊं लागली,

आपणांला ॥ ३१ ॥ आश्रमाचें नाम ठेऊनियां मठ । तेथें भरूनि ठेविती भांगीचे घट । सर्वब्रह्म उपदेशूनि कर्मभ्रष्ट । विधिविधान सोडतील ॥३२॥ गांजे तमाखूची धुमाळी करितील । गुर्गुडीची गवादि घालितील । ऐसिया भ्रष्टाचारें विख्यात ह्मणवितील । आपणांलागीं सत ॥ ३३ ॥ ह्मणौनि दिनकर ह्मणे युग कलीचें । त्यावरि राज्य परम उत्कृष्ट यवनाचें । ऐसियामध्यें रक्षण स्वधर्माचें । कोणें कीजेल पैं ॥ ३४ ॥ पापाची जाली बहुत वृद्धि । मोडली पुण्याची समृद्धि । ऐसें जाणोनि पद्धति पुराणविधि । निर्मिली श्रीआचार्यें ॥ ३५ ॥ श्रीपाद सन्यासालागीं । कोण्ही न मानितील कलौयुगीं । ह्मणौनि श्रीपादाचे साह्यतेलागीं । हें निर्मिलें श्रीआचार्यें ॥ ३६ ॥ असो चहु वर्णांचें आश्रमधर्मकर्म । एव तुवां जाणावें सुमहिम । आतां सांगों नित्य नैमित्य कर्म । काम्य निषिद्धेंसी ॥३७॥ तरि शरिरा लागलें नित्यकर्म । स्नान संध्या आश्रमधर्म । चहु वर्णांसी विहित तें यथाक्रमें । सांगिजेल सर्व हि ॥ ३८ ॥ प्राणिमात्रीं ब्राह्ममुहूर्तीं उठोन । करावें श्रीगुरु आणि रामनाम स्मरण । स्तोत्रें स्तवराज सकळ ह्मणोन । स्तवन करावें श्रीगुरूचें ॥ ३९ ॥ मग आपुलाल्या वर्णाश्रमाधिकारें । सत्कर्म आचरावें शास्त्राधारें । स्वधर्मकर्मे नित्य आचारें । वर्तणें सर्वत्रीं ॥ ४० ॥ असो आतां यावरी स्वभाविक । ब्रह्मकर्म जें कां नित्य नैमित्यक । तें सांगिजेल अवश्यक । धर्मशास्त्रविधीं ॥ ४१ ॥ सा घटिका रात्रि उरेल ते काळीं । उठोनि रामनामस्मरणमेळीं । श्रीगुरूसी आठऊनि बद्धांजुळी । नमस्कार करावा ॥ ४२ ॥ मग बाह्य प्रदेशीं करावें मळमूत्रोत्सर्जन । मृज्जळविधि[१] शौच गडूषप्रमाण । दंतशुद्धिसहित मुखमार्जन । सर्वांगीं भस्म चर्चावें ॥४३॥ यानंतर काकडार्ति उजळून । घ्यावें श्रीगुरूचें का देवदर्शन । मग शास्त्रविधीं करूनि स्नान । संध्या सांग करावी ॥ ४४ ॥ जरि श्रौत अथवा स्मार्त असलें । तरि पाहिजे अग्निउद्धरण केलें । नसलें तरि

---

१ हात पाय धुऊन शुद्ध होण्याचा विधि.

देवार्चन वहिलें । यथासांग करावें ॥ ४५ ॥ त्यानंतर करावें वेदशास्त्र-पठण । अथवा तें पुराणश्रवण । किंवा काहीं अध्यात्मनिरूपण । कथा आवडी करावी ॥ ४६ ॥ उपासनामन्त्रजप यथाविधीं । त्यावरि ब्रह्मयज्ञाची सिद्धि । माध्यान्हसध्या अर्घ्य शुद्धि । पचमहायज्ञ करावे ॥ ४७ ॥ देवयज्ञ आणि ऋषियज्ञ । मनुष्ययज्ञ तथा भूतयज्ञ । पांचवा जाणिजे पितृयज्ञ । हें वैश्वदेवाख्य कर्म ॥ ४८ ॥ अतिथिअभ्यागतपूजन । गाई-ब्राह्मणांचें करावें सेवन । प्रपचव्यासग उपजीविकावर्तन । न्यायोपार्जित करावें ॥ ४९ ॥ सायकाळसध्या करूनि देवांसी । पुजूनि उजळावें नीरांजनासी । नाना गायनें कथाकीर्तनेंसीं । शेजारति करावी ॥ ५० ॥ नित्यकर्म तें हें जाणावें । आतां नैमित्यक तें आयकावें । तरि कोण्ही-येका निमित्यें जें करावें । त्यासी बोलिजे नैमित्य ॥ ५१ ॥ पितरोद्देशें श्राद्धपक्ष करणें । किंवा दशावतारजन्मदिनीं उपोषणें । किंवा चद्रसूर्यादि असतां ग्रहणें । स्नान दान कर्तव्य जें ॥ ५२ ॥ किंवा विशुवादि मन्वादि तिथी । किंवा समयावसरें पूजणें सतमहतीं । किं त्या जयत्यादि नाना पर्वे तिथीं । अतिथिदेवपितरोद्देशें ॥ ५३ ॥ ज्योतिर्लिंगदर्शन महोत्साव । किं तो गयाश्राद्धादि प्रभव । किं श्रीगुरुप्रीत्यर्थ करणें यात्रा उत्सव । कां तें गगास्नान सिंहस्तविधि ॥ ५४ ॥ या नांव बोलिजे नैमित्य कर्म । आतां आइक काम्य निषिद्धाचें वर्म । तरि कामना धरूनि जें कीजे कर्म । त्यासी काम्य ऐसें बोलिजे ॥ ५५ ॥ देवद्वारीं घट भरूनि । धरणें बैसावें उपोशनी । का तें व्रत दान उद्यापनीं । अथवा यात्रा नवस ॥ ५६ ॥ किं तें कार्तिकस्नानें माघस्नानें । वैशाखस्नानें नाना व्रत उद्यापनें । का तें कुळदेवत का देवीदर्शनें । नवचंडीविधांन ॥ ५७ ॥ शतचडी अथवा सहस्रचडी । होम प्रदीप्त घालूनि घेणें कुडीं । लिंगेंलाखोली महारुद्राची परवडी । किं भोग डांकों

---

१ वसु, सत्य, क्रतु, दक्ष, काल, काम, धृति, कुरु, पुरूरवस्, व माद्रवस् या दहा विश्व नांवाच्या देवता आहेत २ चौदा मनु होऊन गेले त्यांच्या तिथी ३ प्रकार. ४ अगांत दैवत आणणें.

गोंधळ ॥ ५८ ॥ किं तें तळीं विहिरी वनवाटिका । देवाल्यें गोपुरें मठ मठिका । धर्मशाळा बांधोनि पोहे घालणें का । अन्नछत्रादिक ॥५९॥ अश्वमेध कां बस्तमेध । नरमेध कां नाना जीवमेध । करूनि यज्ञ करणें जे विविध । या नाव काम्य कर्म ॥ ६० ॥ इतुकेंन काम्य कर्म संपलें । आता निषिद्ध कर्म पाहिजे ऐकिलें । तरि देवद्वारीं नाना नवस केले । राहोंडीं का भैंळदीं ॥ ६१ ॥ गळ टोंचणें का जिव्हा छेदणें । खोडा बेडी का टांगूनि घेणें । का ते थापटिया घालणें । इष्टेचिया पैं ॥६२॥ अथवा अघोरमत्र उचिष्टचांडाळी । बाळाबगुळा मेसको मैराळी । झोटिंग मुज्या साधणें कंकाळी । का बाळांतीण साधणें ॥ ६३ ॥ उछिष्ट गणपति कां बटुभैरव । ब्रह्मराक्षस साधणें कां मानव । प्रेत-साधनादि नाना प्रभव । अघोर मत्रांचे ॥ ६४ ॥ कौळिक चौळिक मद्यपान । भागी तमाखु घोंटाघसन । गुर्गुडी गाज्या आणि सप्त वेसन । हें निषिद्ध कर्म जाणावें ॥ ६५ ॥ तव श्रोता करी विनंति । स्वामी सप्तवेसनें तें कोणतीं । वक्ता ह्मणे आइका यथामतीं । सागिजतसे ॥ ६६ ॥ तरि द्यूतकर्म आणि वेश्यागमन । चोरी चाहाडी आणि परदाररमण । किं लघुपक्षीक्रीडा किन्नरीगायन । एव मिळोनि सात हीं ॥ ६७ ॥ साबरी मत्र चेडें चेटकें । मुठी कौटालें तेलें अनेकें । नाना जाती मिळोनि येककार मुखें । भ्रष्टाकार करणें जें ॥ ६८ ॥ जारण मारण वशीकरण । स्तंभन मोहन उच्चाटन । उद्घाटन उप-शमन । हें निषिद्ध कर्म सर्व हि ॥ ६९ ॥ असो सांगता हें असा-धारण । परि काहींयेक सांगावया हें चि कारण । जे टाकावें काम्य निषिद्ध निपैटून । आणि नित्य नैमित्य करावें ॥ ७० ॥ जरि टाकावीं काम्य निषिद्ध कर्में । तरि सागितलीं का अति सभ्रमें । ऐसें ह्मणाल तरि वोळखीकारणें नामें । त्याज्य ह्मणौनि सांगितलीं ॥ ७१ ॥

---

१ बोकड २ धगधगीत निखाऱ्याची खाई (दा. ३–३–४, व २–६–२९) ३ मशाल. ४ ह्या क्षुद्र देवता आहेत (दा. ३ २-२७) ५ हसकोशांत जारणमारणादि हीं सप्त व्यसनें दिलीं आहेत. ६ निःशेष करणें.

वोळखोनि काम्य निषिद्धें न करावीं । नित्य नैमित्य आचरावीं । तथापि काम्यांमाजीं कांहींयेक कर्मपदवी । कार्यकारण ग्राह्य असे ॥ ७२ ॥ कार्तिक माघ वैशाख स्नानें । लिंगेंलाखोली कां व्रतें उद्यापनें । कुळ- देवत का देवीदर्शनें । नवचंडीविधान ॥७३॥ काम्यामाजीं या कर्मांसी । कोण्हीयेकें आचरावें निश्चयेंसीं । वरकड काम्य कर्म आणि निषिद्धासी । नाचरावें सर्वथा ॥ ७४ ॥ नित्य आणि नैमित्य कर्म । हें अवश्यमेव आचरणें निभ्रम । ब्राह्मणें सहसा याचा अतिक्रम । प्राणातीं हि करूं नये ॥ ७५ ॥ असो यावरी चहु वर्णांचें । उपकर्म सांगिजेल आचर- णाचें । त्यानंतर उपजीविकावर्तनाचें । सांगिजेल यथाक्रमें ॥ ७६ ॥ दिनकर शरण रामदासीं । सागितलें चतुर्थ कर्मविभागेसी । आतां सां- गिजेल पांचव्या कर्मप्रकारासी । तें श्रोतीं श्रवण करावें ॥ ७७ ॥ स्वस्ति श्रीस्वानुभवदिनकरे गुरुशिष्यान्वये पचम कळापे वर्णाश्रम- धर्मसस्था निरूपणं नाम चतुर्थ कीर्ण प्रकाशः ॥ ४ ॥ श्रीराम ॥

---

॥ श्रीराम ॥

आतां ब्राह्मणाचें आचरण । उपकर्मेंसीं जीविकावर्तन । सागिजेल यथाक्रमेंकरून । सप्रदायशुद्ध ॥१॥ तरि अंतर्वृत्तीसी शम करून । अनुसं- धानीं येकाग्र अतःकरण । सस्वरूपीं होऊनि निमग्न । ध्यानधारणायोगें ॥ २ ॥ मग प्रत्याहारें प्राणायाम साधणें । बाह्य इद्रियें नियमीं धरणें । सहजस्थितीचया आसनें । आचारिजे तप ॥ ३ ॥ काइक वाचिक मान- सिक । तप जें कां असे त्रिधातुक । तें निजसमाधीं आचरणें सम्यक । अनुतापयुक्त ॥ ४ ॥ ज्ञान तथा मृत्तिकाजळें । अतर्बाह्य शुचित्व निर्मळें । सात्विका शातिसगें विमळे । क्षमारूप समता ॥ ५ ॥ जीवमात्रीं समत्वें निज आर्जव । आत्मज्ञानविचार क्षीरार्णव । विज्ञानीं

---

१ ओव्या २ व ३ यांत अष्टांग योग सांगितला आहे. २ आत्मानुसंधानीं. ३ इद्रियांची अतर्मुखता.

लय अपूर्व । सहजस्थिति ॥ ६ ॥ आस्तिक्यें सर्वांशीं साजिरा । ब्रह्म-बोधें जाला माजिरा । विरक्तीचिया विहारा-। माजीं वर्तणें जयाचें ॥ ७ ॥ एव ब्राह्मणाचें सहज उपकर्म । तुवां जाणावें निभ्रम । यानतर उपजीविकाकर्म । किंलक्षण तें सांगिजेल ॥ ८ ॥ मुख्य भागवत शास्त्रप्रमाण । भिक्षेचें चतुर्विध लक्षण । उत्तम मध्यम कनिष्ठ अतिकनिष्ठ जाण । शीळ उच्च रुत अमृत ॥ ९ ॥ शीळ ह्मणिजे अयाचित वृत्ति । याचा न करिता जाली भिक्षाप्राप्ति । तेणें चालऊनि आश्रमधर्म रीति । सहज-स्थितियोगें ॥ १० ॥ प्रेत्न न करितां होय जें प्राप्त । त्यासी ह्मणावें अयाचित । आता उच्च वृत्तीचा सकेत । बोलोनि दाऊ ॥ ११ ॥ कृषी-वलु खळें झाडूनि जाय । मग तेथ जें कां चुकलें धान्य ठायें । तें वेंचूनि आणूनि आश्रमसोय । करणें यावरी ॥ १२ ॥ रुत ह्मणिजे माध्यान्ह समयावसरीं । घरोवरीं फिरोनि ग्रामातरीं । आंणी कोण्हीं जन्हि सूपभरी । तन्हि घेणें मुष्टि येक ॥ १३ ॥ ऐसें मेळऊनि आश्रमधर्मापुरतें । अग्नि ब्राह्मण गाई समवेतें । आश्रमधर्म चालवणें निरुतें । रुतें ह्मणिजे तयासी ॥ १४ ॥ आतां अमृता ह्मणिजे मधुक्रिया । शुचिर्भूत सोंवळें होऊ-निया । आणिजे अन्न मेळऊनियां । त्यावरी करणें आश्रमधर्म ॥ १५ ॥ ऐसें चतुर्विध भिक्षालक्षण । यामाजीं जें टाकेल तें अगिकारून । ब्राह्मणें करावें उपजीविकावर्तन । उपकर्म ब्राह्मणाचें ॥ १६ ॥ आता क्षत्रियाचें उपकर्म । सांगिजेल जीविकावर्तनसभ्रमें । येकाग्र होऊनि अविश्रम । श्रवण करीं आदरें ॥ १७ ॥ तरी समरगणीं ठाकलियां उभे । शत्रूंची निर्दा-ळणें चि क्षोभें । वाचूनि जीवित्वाचिया लोभें । पाठी न देणें सर्वथा ॥ १८ ॥ तेजें सूर्य जैसा अति सोज्वळ । धैर्याचा मेरू चि केवळ । दक्ष असोनि अति प्राजैळ । शस्त्रास्त्रविद्या ॥ १९ ॥ युध्य माडलिया हि

---

१ उन्मत्त. २ ब्राह्मणाची मुख्य दीक्षा । मागितली पाहिजे भिक्षा ॥ असें जें श्रीसमर्थांनीं ह्मटलें आहे, तें च या ठिकाणीं सांगितलें आहे. ३ याचना. ४ आणलें. ५ कोरडी भिक्षा. ६ माधुकरी जिला ह्मणतात ती; ओली भिक्षा. ७ स्पष्ट.

तुंबळ । वृत्ति ज्याची सुनिश्चळ । आणि जो जें मागेल निखळ । तें देणें चि त्यासी ॥ २० ॥ आणि ईश्वरभावना सर्वत्र । अतरीं समता अरि मित्र । बाह्य वर्तणें स्वतत्र समयासारिखें ॥ २१ ॥ स्वामीकाजीं देह खर्चणें । हा चि सकल्प जीवेंप्राणें । येणेंयोगें अन्न मेळवणें । धर्म न्याय युक्ति ॥ २२ ॥ त्या अन्नें करूनि आश्रमधर्म । नित्य वर्तणें अविश्रम । क्षत्रियाचें उपजीविकावर्तनकर्म । यथाक्रमें सांगितलें ॥ २३ ॥ एव क्षत्रियाचें जाणोनि उपकर्म । आइकें वैश्यकर्मांचा यथाक्रम । सेतकुळवाडी करूनि निभ्रम । उदरपूर्ति करावी ॥२४॥ करावें गाईचें संरक्षण । नाना वस्तु समर्वी घेऊन । महर्घी विकाविया सपूर्ण । क्रयविक्रययोगें ॥२५॥ इतुकेंनि जालें वैश्यकर्म । आतां सांगों शूद्रकर्माचा सभ्रम । ब्राह्मणसेवेचा नित्यनेम । कायावाचामनेंसीं ॥२६॥ ब्राह्मणाची परिचर्या करावी । नीच सेवा अंगिकारावी । त्यांचिया आज्ञा सेतकुळवाडी करूनि द्यावी । विश्रांति ब्राह्मणासी ॥२७॥ शूद्रासी ब्राह्मणसेवेवांचून । समर्थ कांहीं च नसे आन । ब्राह्मणाचे गोर्से स्वयें रक्षण । अत्यादरें करावें ॥ २८ ॥ ब्राह्मणाची आज्ञा प्रमाण । तें चि शूद्राचें उपजीविकावर्त्तन । अणुमात्र आज्ञाउलवन । शूद्रें सर्वथा न करावें ॥ २९ ॥ ब्राह्मणाची अवज्ञा जेथ घडे । तेथ व्यथा का दारिद्र तत्काळ जोडे । क्षोभ जालियां मृत्यु बहुडे । मेलियां नर्क अघोर ॥३०॥ ह्मणोनि ब्राह्मणाची शूद्रें अवज्ञा । न करावी सर्वथा हें सागतों सज्ञा । केलियां चद्रार्कि पतन हे आज्ञा । जगदीशाची असे ॥ ३१ ॥ या वेगळिया ज्या अन्य याती । लोमविलोमादि प्रभृति । तेंहीं आचरोनि यथाशास्त्र निर्गुति । ब्राह्मणसेवा करावी ॥ ३२ ॥ शूद्र क्षत्री आणि वैश्य वर्ण । हे हि मानावे ब्राह्मणासमान । भक्ति ज्ञान वैराग्य साधन । ब्राह्मणमुखें विचारावें ॥ ३३ ॥ एव शरीरस्वभाव आणि इद्रियस्वभाव । गुणस्वभाव आणि जातिस्वभाव । कर्म उपजीविकावर्तनस्वभाव । उपक-

---

१ गभीर, स्थिर. २ निष्कळ, शुद्ध ३ भगवतांनीं अर्जुनाला केलेल्या उपदेशाचें सार या ओवींत आलें आहे. ४ अव्याहत. ५ स्वस्त ६ महाग. ७ आज्ञेने. ८ गाईंस. ९ खूण, आज्ञा. १० यावच्चद्रदिवाकरौ. ११ निभ्रांत, यथार्थ.

मैसीं पंचधा ॥ ३४ ॥ ह्मणौनि कर्माकरितां देह उत्पन्न । मध्यें कर्में चि व्यापलें दिसे सपूर्ण । पुढें देह खचलियां जाण । कर्मकळाप सुटेना ॥ ३५ ॥ मेलियावरि पुत्रपौत्रीं । उत्तरक्रिया वेदमत्री । श्राद्ध अपरपक्ष पुरुंषत्रि–। पर्यंत कर्म न सुटे ॥ ३६ ॥ ब्राह्मणासी कर्तव्यकर्में सोळा । क्षत्री वैश्या द्वादशाद्वादशमेळा । शूद्रासी अष्टकर्मसोहळा । अन्ययातीस च्यारि कर्में ॥ ३७ ॥ सहज आणि स्वाभाविक कर्म । वर्णाश्रम जातीचें आणि उपकर्म । एव देहाचिया आदिमध्यातीं सभ्रम । केवळ कर्माश्रयें देह चाले ॥ ३८ ॥ असो तुवा पुसिलें सत्कर्मलक्षण । ह्मणोनि सागावयासी जालें कारण । ऐसें ऐकताक्षणीं शिष्य सुखावोन। जी ह्मणोनि पुढारला ॥३९॥ ह्मणे स्वामी बापैयाचे तृषेकारणें । पृथ्वी चि जळमय करणें । किंवा उपमन्यु मज दूध दे सहज ह्मणे । त्यासी दिधला क्षीरसमुद्र ॥४०॥ किं तो ध्रुव पितृअकीं बैसावया । धावा पोकारी हाक मारूनिया । त्यासी अढळपद देऊनिया । निजपदीं स्थापिला ॥ ४१ ॥ तेवि जी म्यां मदमतिकरूनि । अशका घेतली कर्मालागूनि । तेथ पचधा प्रकारें करूनि उपलैवणी । सावितलें सत्कर्म ॥ ४२ ॥ आतां उपासना ते किलक्षण । तयेची कैसी वोळखण । तें केलें पाहिजे निरूपण । मज कळे ऐसें ॥४३॥ आता पुढिलीये कीर्णीं । उपासनारहस्य प्रांजळ करूनि । सागिजेल तें यथाक्रमें श्रोतेसज्जनीं । श्रवण कीजे अत्यादरें ॥ ४४ ॥ इतुकेनि सपला सत्कर्मकळाप । केवळ स्वानुभवदिनकररूप । दिनकर रामदासीं साक्षेपें । सहजस्थिति ॥ ४५ ॥ स्वस्ति श्रीस्वानुभवदिनकरे गुरुशिष्यान्वये पचमकळापे चतुर्वर्णउपजीविकावर्तननिरूपण नाम पचम कीर्ण प्रकाशः ॥ ५ ॥ येकुण कळापवोवीसख्या ॥ २०४ ॥ शुभं भवतु । श्रीरामचद्रार्पणमस्तु ॥

---

१ कलाप ५ किरण २ ओवी १६ यात सांगितल्याप्रमाणें. २ तीन पिढ्यांपर्यंत. ३ कलाप ५–२–१७ ते २५. पहा ४ चातकपक्ष्याचे. ५ पुकारी. ६ वर्णन, ७ उत्कंठित.

## ॥ उपासनानिश्चय कळाप ॥ ६ ॥

॥ श्रीराम ॥

ॐ नमो सद्गुरु रामदास । होऊनि सर्वस्वेंसीं उदास । स्वानुभवदिनकरीं स्वयप्रकाश । दिधला निजकृपा ॥ १ ॥ तये निजकृपेचा लाधोनि आधार । दिनकर जव पाहे स्वरूपनिर्धार । तव अनिर्वचनीय अपार । देखिलें स्वरूप ॥ २ ॥ यासी कांहीं देऊं ह्मणे उपम । तवं ठाईचें चि हें निरोपम । सीमा करूं जाता हें निसीम । पहिल्यापासुनी ॥३॥ मग स्वरूपाचा पाहों गेलों गुण । तव दिसे अवघें निर्गुण । मग तैसा चि पाहे जव ठिकाण । तव निराधार हें ॥४॥ मग निराधारें चि याचें स्वरूप । पाहाता देखिलें सपूर्ण अरूप । अरूपपणें पाहे संभवारोप । तव असभवनीय ॥ ५ ॥ ऐसा असभवनत्वें पाहे आकार । तवं हें ठाईचें निराकार । मग निराकारें चि पाहे विकार । तव निर्विकार हें ॥ ६ ॥ निर्विकारें चि पाहाता कर्म । तवं ठाईचें चि हें निष्कर्म । निष्कर्में पाहातां प्रमचोद्गम । तवं निप्रपच हें ॥ ७ ॥ निप्रपंचतां पाहे अवयव । तवं हें ठाईचें चि निरावयव । निरावयवीं पाहातां संगसंभव । तव निसग ठाईचें ॥ ८ ॥ मग निसगें चि पाहातां उपाधि । तव देखिलें हें निरुपाधि । निरुपाधियोगें द्वद्वावधि । पाहे तवं हें निर्द्वंद्व ॥ ९ ॥ निर्द्वंद्वतां पाहे जव केवळ । तरि हें ठाईचें चि निश्चळ । ऐसें वर्णव्यक्तिरहित निर्मळ । सद्गुरुस्वरूप ॥१०॥ मग पाहों गेलों याची थोरी । तव हें व्यापलें दशदिशाबाहिरि । अनत ब्रह्मांडें याचे उदरीं । सामावलीं दिसती ॥ ११ ॥ तेथ मी हि होऊनि याहूनि थोर । पाहों गेलों याचा पार । तव येणें माझें अतर । व्यापिलें दिसे ॥ १२ ॥ ऐसा बाहेर पाहे तव अतरीं दिसे । अतरीं पाहे तव बाहेर उसासे ।

---

१ सद्गुरुस्वरूपाचें निश्चित वर्णन हें वर्णन व दास. द ७ स ७ यातील ब्रह्मस्वरूपाचें वणन यांत बरें च साम्य आहे २ उत्पत्तीची कल्पना ३ शीत, उष्ण; सुख दु ख, हे जे परस्परविरोधी विकार असतात ते. ४ उसळून येतें, श्वास टाकतें.

एवं पाहातेपणें मजलागीं वैंळसे । फार होताति पैं ॥ १३ ॥ ऐसा पाहातेपणें होतसें कष्टी । परि तें अणुप्रमाणें न पडे दृष्टीं । तेणें मनासहित इंद्रियें हिंपुटी । होऊनि चाकाटलों ॥ १४ ॥ एव पाहातेपणें घाबिरा जालों । मग मी तें सोडूनि निराळा राहिलों । नाहपणें निजस्मरणीं बाहिलों । श्रीगुरुरायासी ॥ १५ ॥ जी जी सद्गुरु निष्कामकामा । सच्चिदानदा आत्मयारामा । पुराणपुरुषा पुरुषोत्तमा । जी स्वसंवेद्या ॥ १६ ॥ जी तू स्वसवेद्य सच्चिदानद । त्रिपुटीरहित केवळ निर्द्वंद । तुमच्या स्मरणमात्रें जीवशिवादि भेद । निरसले सकळ हि ॥ १७ ॥ आतां असो जी देवा हे उपपत्ति । कळों सरली कर्मकळापव्यक्ति । पुढें उपासनेची व्याख्या वित्पत्ति । सांगितली पाहिजे ॥ १८ ॥ तरि जी सांगा ऐसें ह्मणतां चित्त । होतसे लज्जायमान बहुत । का जे आपुलें सामर्थ्य न विचारित । सूज्ञपणें भाबावलों ॥ १९ ॥ जेवि न कळोनि आपुलें मान । मशक आक्रमू धावे गगन । किं ते टिटवी ह्मणे मी उपसीन । समुद्र अवघा चि ॥ २० ॥ किंवा सरिसेपणें सूर्यमंडळीं । खद्योत घेऊ पाहे सर्वकाळीं । अथवा आटोपूं धाविजे पागुळीं । वारयासी जैसें ॥ २१ ॥ तेवि जी मी श्रीप्रभूप्रति । वाटिव करूनिया स्वमतीं । आक्षेपाचिया उपपत्ती । धीटपणें पुसे ॥ २२ ॥ तरि काय जालें जी श्रीदातारा । सत्रांणें ढिया'' ह्मणता हि वासुरा । तऱ्हि वोरसें दाटोनियां पुरा । धेनु पान्हा चि घाली ॥ २३ ॥ किं तया कल्पतरूसी अति उग्र बुद्धीं । मागतां हि दे सकळ समृद्धि । कां जे त्याची सहजस्वभावशुद्धि । उदारपणाची ॥२४॥ मा सताचिया तरि कृपाळुपणा । योजिता दृष्टांतमात्र ठेंगणा । उदारत्वें मेघ हि दिसे साना । वोसरलेपणें ॥ २५ ॥ परीस लोहाचें येकदा चि करी सुवर्ण ।

---

१ घोंटाळा, उपद्रव, फेरा झपाटा. २ कष्टी. ३ चकित झालों. ४ बोलाविलें. ५ ज्ञानस्वरूप वस्तु ६ पाचवा कलाप ७ शक्याशक्य विचार. ८ (?) ९ वाटीव= पुरुषार्थ, १० बलानें, सवेग ११ (?) कदाचित् गाय पान्हवण्याच्या वेळीं आचळाला वासरूं तोंडानें ज्या ढुशा देतें त्या अर्थाचा हा शब्द असावा. १२ तर मग. १३ प्रत्येक दृष्टांत. १४ कमी होतो, नाहींसा होतो ह्मणून

संत सेवकां करिती आपणासमान । क्षीरसमुद्र परि अपूर्ण । येकदेशीपणें ॥ २६ ॥ संत सर्वत्र समता सारिखे । न दिसे जयां आपलें पारिखें । स्वानुभवदिनकरीं स्वसुखें । नित्य पारगत जे ॥२७॥ ऐसें आवडीचेनि करुणारसें । शिष्य बोले स्वानुभव संतोषें । तत्र सद्गुरु सुखावलेनि मानसें । बोलिजे अभय वरदें ॥ २८ ॥ वत्सा तुझे अति आर्ष बोल । परि अमृताहूनि दिसती गोड । जे आइकतां चि बहुसाल । मज सौख्य जालें ॥ २९ ॥ तरि तू पूर्णत्वें केवळ पूर्णिमा । तेथ उदेजता सुशब्दचद्रमा । मर्मांतरक्षीरार्णवें सांडिली सीमा । कृपाभरितें उचंबळे ॥ ३० ॥ परि तो पूर्णमेसी च पूर्णत्वासी ये । आणि कळकें साजांवला होय । तू निष्कळक असोनि सदैव सोय । पूर्णत्वाची तुजमाजीं ॥ ३१ ॥ आतां असोतु कां उपपत्ती इया । तुज अपेक्षित तें सांविया । तरि आइकें सावध होऊनियां । मनाचिया श्रवणीं ॥ ३२ ॥ तुवां पुसिली जे कां उपासना । तिचिया दों प्रकारें असती भावना । प्रवृत्तिनिवृत्यात्मक भिन्ना । सगुण आणि निर्गुण ॥ ३३ ॥ त्यात प्रस्तुत जे कां सगुण । तियेचें रूप सांगों परिछिन्न । मग उरली जे का निर्गुण । ते उत्तरार्द्धीं जाणसी ॥ ३४ ॥ तरि उपासना ह्मणिजे उपास्य दैवत । उपास्य जाणिजे उप आस्तीकृत । उपआस्तिकीं धरिजे आर्त । देवभजनीं ॥ ३५ ॥ तरि देव पाहाता निर्गुण । नि.संग निर्विकार निरंजन । निराधार निरावेव तर्कविहीन । अगम्य अगोचर ॥ ३६ ॥ निर्गुण ह्मणिजे गुणासी येना । निःसगपणें सगीं आडळेना । निराकारत्वें सापडेना । विकारजातासी ॥ ३७ ॥ निरजनें जो जनावेगळा । आधार पाहाता न दिसे डोळा । अवयवहीन केवळ मोदेंळा । त्याहूनि भिन्न

१ अन्य, दुसऱ्याचें. २ वर या अर्थानें वरद शब्द सर्वत्र योजला आहे ३ आर्ष, बोबडे. ४ मधुर. ५ शोभला. ६ सहज. ७ आस्तिक भावानें केलेलें. ८ 'निर्विकारत्वें' असें पाहिजे ९ यालागीं मी निरंजन । अजन शब्दें उपाधि जाण । तैसें चि जनरहित करितां व्याख्यान । निरुपाधि पूर्ण घडतसे ॥ ९७ ॥ जनशब्दे प्रपचजात । जे जें कीं इद्रियेंगृहीत । किंबहुना दृश्यजात । दृष्टश्रुतार्थ सर्व हि ॥ ९८ ॥ तें निःशेष जेथें नसे । तया निरजन बोलिजेत असे । ( रगनाथी योगवासिष्ठ प्रकरण ५ आत्ममनन प्रकरण. ) १० मुद्गल.

॥३८॥ मनाचा न चले तर्क विचार । इंद्रियांसी जो न कळे साचार। ऐसियास उपास्तीचा[1] प्रकार । काइसेन तऱ्हि ॥३९॥ जो अनंत ब्रह्मांडीं भरला । भरोनि त्याचऐसा चि जाला । सेवटीं कोठें चि नाहीं साप-डला । गुप्तलेपणें ॥ ४० ॥ ऐसा जो सर्वोत्तम सर्वेश्वर । ज्याकरिता जालें सचराचर । त्यासी नाना पूजादि उपचार । कोठें कैसे अर्पावे ॥ ४१ ॥ ह्मणौनि मुख्य उपास्तीचें पेंडप[2] । तें केवळ सद्गुरुस्वरूप । सगुणनिर्गुणाचा जो बाप[3] । सर्वज्ञपणें ॥ ४२ ॥ विनासद्गुरु सगुण नि-र्गुण । कैसीं कळती प्राणियांलागून । मंत्र यंत्र आसन ध्यान । मुद्रा न्यास जपविधि ॥ ४३ ॥ प्राणियासी गुरुकृपा जव न घडे । तवं अज्ञानपणें जैसें वेडें । भावांवोनि फिरे चहुकडे । संसारघोरेंकरूनि ॥ ४४ ॥ संसारिक हि जऱ्हि जाला प्राणी । तऱ्हि गुरूविण न कळे कांहीं जनीं । देव धर्म तीर्थ व्रत उद्यापनीं । गुरु आधीं पाहिजे ॥४५॥ गुरु दाविती जो जो मार्ग । त्या त्या मार्गें चाले अवघें जग । ह्मणौनि गुरूविण उपासनामार्ग । व्यर्थ चि अवघे ॥ ४६ ॥ तस्मात् उपासनेची उपासना[4] । तो हा केवळ श्रीगुरुराणा । श्रीगुरुउपा-सनेवाचूनि भावना । सर्व हि मिथ्यारूप ॥ ४७ ॥ तथापि श्रीगुरूची आज्ञा । जे जे सांगिजतील मार्गसंज्ञा । ते आचरूनि शिष्य सूज्ञा । सगुण दैवतीं भजावें ॥ ४८ ॥ तरि कोण दैवत काय उपासना । आसन ध्यान मुद्राभिधाना[6] । मंत्र यंत्र पूजाविधाना । रूप करूनि दाऊं ॥ ४९ ॥ दिनकर रामींरामदास । स्वानुभवदिनकरीं स्वात्मसुखास । पावोनि सकळ उपासनाविधीस । यथान्वयें सांगेल ॥ ५० ॥ स्वस्ति श्रीस्वानुभवदिनकरे गुरुशिष्यान्वये षष्टम कळापे गुरुनिश्चयनिरूपणं नाम प्रथम कीर्ण प्रकाशः ॥ १ ॥

---

१ उपासनेचा, भक्तीचा. २ शोभा, शृंगार. ३ देवाचा हि देव. ४ आस्तिकता. ५ खूण. ६ खेचर्‍यादिक चार मुद्रा त्या.

॥ श्रीराम ॥

आतां जन्मांतरयोगें प्राणी । नरदेह सर्वांगें पूर्णपणीं । आणि ब्राह्मण क्षत्री कां वैश्यवर्णी । कां शूद्रवर्ण लाधला ॥१॥ नातरि सर्वोत्कृष्ट पुण्ययोगें । ब्राह्मणकुळीं जन्मला निजांगें । देहे दिसेंमासें अव्यगें । वाढता जाला निजगृहीं ॥ २ ॥ तवं पंच सप्त अष्ट वर्षी । वडिलीं मेळऊनि ब्राह्मण ऋषी । व्रतबंधन आरभूनि सतोषीं । दीक्षाग्रहणविधि ॥ ३ ॥ उत्तम पाहोनियां सुमुहूर्त । लग्न साधूनि ग्रहबळयुक्त । गुरुबळें चंद्रबळेंसीं यथोचित । दीक्षाग्रहण आरंभिलें ॥४॥ मग हा प्राणी स्ववीर्यें जेणें निर्मिला । ॐ आत्मावै पुत्र नामासी मत्र दिधला । तो चि पुढें दीक्षाग्रहणीं अधिकारी जाला । निजदीक्षागुरुत्वासी ॥५॥ का जेणें आपलें वीर्य खर्चूनि निज । निर्माण केला ह्मणौनि हा आत्मज । बोलिजे यतन्निमित्यें आचार्यत्व सहजें । त्यासी चि अधिकार असे ॥ ६ ॥ असो हा प्राणी अष्ट वर्षेपर्यंत । केवळ जडबुद्धि असतां बाळवत । नाना दोष घडले ह्मणौनि प्रायश्चित्त । थोर विधि करूनि ॥ ७ ॥ मग शुद्ध बुद्ध करूनि आचार्यापुढें । उभा कीजे ज्योतिर्विदीं निवाडें । घटिका साधूनि सुमुहूर्त सुर्वाडें । गुरुपदीं सल्लग्न कीजे ॥८॥ ऐसा आचार्यपदीं सल्लग्न केलियावरी । ब्रह्मचर्यदीक्षा अवलंबूनि साजिरी । श्रुतिस्मृतिवाक्य नाना मत्रोच्चारीं । अग्निब्राह्मणसान्निध्यें ॥ ९ ॥ मग नाना मत्र उत्साहमेळीं । श्रीगुरु मत्र उपदेशिता कर्णबीळीं । स्वर्गींहूनि सुरवर वर्षती पुष्पांजुळी । हा ब्रह्मत्वासी आला ह्मणौनि ॥ १० ॥ तें गुरुवाक्य निजकर्णासी येतां । पूर्वजासी परमोत्सव तत्वता । देव ऋषि पितर मनुष्य भूता । परमाल्हाद होतसे ॥ ११ ॥ जे हा प्राणी ब्रह्मत्वासी आला साचार । हा करील वेदपठण मत्रोच्चार । देवपितरोद्देशें स्वाहास्वधाकार । सकळां होईल सतृप्ति ॥ १२ ॥ असो निजकर्णीं गुरुवाक्यानुग्रह जाला । मुखीं उच्चार काहीं जाला न जाला । इतुकेन याचा अपार महिमा वाढला । तो मुखें न बोलवे सहसा ॥ १३ ॥ वेद जो

---

१ एतत्+निमित्य=या कारणाकरितां. २ शाहाणा. ३ जोशीबुवांनीं ४ प्रफुल्लित, आनदित होऊन. ५ कारण कीं.

कां त्रैलोक्यजनक । तेणें तत्काळ आश्राइलें मुख । औटकोटी तीर्थें येऊनि निश्चंकें । निजचरणीं राहिलीं ॥ १४ ॥ भिक्षा जे कां त्रैलोक्यजननी । शंकरादिक जिचे मिरासी धणी । तिये हा अधिकारी होऊनि । भिक्षा मागे मूळमंत्रें ॥ १५ ॥ श्रीगुरुवाक्य निजकर्णीं पडतां । स्वर्गीं दुंदुभि वाजिनलिया तत्वता । ब्रह्मादिक इच्छिती चरणतीर्था । हा ब्रह्मीष्ठ जाला ह्मणौनि ॥ १६ ॥ तें निजवाक्य मुखासी येना जवं । तवं सर्वांगीं उमटलें ब्रह्मवर्चस्व । ब्रह्मचर्याश्रम स्वयमेव । सर्वलक्षणसंयुक्त ॥ १७ ॥ तव शिष्य बोले सगद्गद होऊन । जी इतुका महिमा त्यासी कायसेन । इतुकें बोलेना तवं प्रेमाश्रु उचबळोनि नयन । निंडारली दृष्टि ॥ १८ ॥ सर्वांगीं थरकले रोमांच । घर्मबिंदु बारेले हृदईं च । न कळे हास्य कीं रुदन साच । नृत्यान्वित थरकंप ॥ १९ ॥ दाटला प्रेमाचेनि पडिभरें । चित्त सर्वांगें जालें चेइरें । ह्मणे जी कृपाळुवें दातारें । तैसें मज केलें पाहिजे ॥ २० ॥ इतुकें जवं बोले घाबिरेपणें । तव अति प्रीतीं आळगूनि श्रीगुरूनें । सखया जें इछिजे तुझिया मनें । तें क्षण न लगतां पावसी ॥ २१ ॥ ऐसें वाक्य निजकर्णीं ऐकतां । शिष्य जाला सर्वांगें श्रोता । तव श्रीगुरु सहज स्वभावतां । बोलों आरंभिलें ॥ २२ ॥ अरे ब्रह्माआदिकरूनि हरि हर । जये सुखीं निमग्न निरंतर । ऋषि मुनि सिद्ध योगेश्वर । ज्ञानी संत महंत ॥ २३ ॥ ऐसें जें निजसुख साचार । तें परब्रह्म निर्गुण निर्विकार । तेथ ध्वनिरूप येकाक्षर । उद्भवे निरक्षरें चि ॥ २४ ॥ तें निरक्षरें चि येकाक्षर । त्रिगुणपंचभूताचें माहेर । ज्याकारितां सकळ चराचर । रंचे खचे स्वलीळा ॥ २५ ॥ ज्यापासूनि शब्दब्रह्मासी उद्भव । मूळमायेचा जो विसांवता ठाव । मग ईश्वरें ऐसें त्यासी नाव ।

---

१ मुखाचा आश्रय केला २ निश्चयेंकरून. ३ दासबोध १४-२-४. ४ दास. १४-२-१. ५ ब्रह्मनिष्ठ ? ६ परिपक्क झाली पूर्णतेस आली. ७ बारणें=लादणें, किंवा बारें=थांबवून धरणें. ८ अधिकतेनें. ९ जागें १० प्रणवरूप ॐ या अक्षराचा ध्वनि ११ उत्पत्ति, स्थिति आणि लय होतो १२ परब्रह्माच्या ठिकाणीं सकल्परूप जी मूळमाया तिचीं चौदा नावें, दासबोध द. २० स. ५ ओवी ७ ते १० येथें दिली आहेत, तीं पाहावीं.

बोलती कित्तेक ॥ २६ ॥ ज्यासी कित्तेक ह्मणती हा शिव । कित्तेक ह्मणती शुद्धसत्व । कित्तेक ह्मणती आत्मा स्वयमेव । तो हा चि केवळ ॥ २७ ॥ कोण्ही ह्मणती अतरात्मा राम । कोण्ही ह्मणती सगुण ब्रह्म । मग कोण्ही कोण्ही निर्गुण ब्रह्म । ऐसें हि ह्मणती ॥ २८ ॥ कोण्ही ह्मणती परमेश्वर । कोण्ही ह्मणती अर्धनारीनटेश्वर । कोण्ही ह्मणती षड्गुणेश्वर । तो हा चि केवळ ॥ २९ ॥ कोण्ही ह्मणती हा जीवात्मा । कोण्ही ह्मणती हा परमात्मा । कोण्ही ह्मणती यासी सर्वात्मा । नामरूप चि नाहीं ॥३०॥ कोण्ही ह्मणती हा शुद्धसंकल्प । कोण्ही ह्मणती यासी मिथ्या आरोप । कोण्ही ह्मणती यासी विकल्प । परब्रह्मींचा ॥ ३१ ॥ कित्तेक ह्मणती यासी तदंश । हा केवळ ब्रह्माचा चि अंश । मग मायासगें अनत ब्रह्मांडास । रची खची स्वलीळां ॥ ३२ ॥ असो सांगतां लोकांचे प्रत्यय । राहों पाहेल चालता ग्रंथान्वय । ह्मणौनि याचा जो असेल अभिप्राय । तो सहजें जाणसी उत्तरार्द्धीं ॥ ३३ ॥ प्रस्तुत जें कां येकाक्षरब्रह्म । ज्यासी प्रणव ऐसा संकेत निजनाम । जेथूनी स्वरवर्णव्यक्ति यथाक्रमें । प्रसव होता जाला ॥ ३४ ॥ ज्यापासूनि वेदाचा जन्मप्रभव । शास्त्रें करिती नाना व्याख्यागौरव । पुराणें प्रशंसिती ज्याचें वैभव । श्रुति उपनिषदेंसीं ॥ ३५ ॥ ज्याची विचारितां स्वरूपठेवें । निजांगें तद्रूप चि स्वयमेव । न कळे कळा लीळा लाघव । ज्याची हरिहरब्रह्मादिकांसी ॥ ३६ ॥ ज्यांचीं विचारितां आकल्प अष्टांगें । अष्टदेहेंसीं निवती सर्वांगें । चतुष्पदीं अर्थ विचारितां अव्यगें । सायोज्यतापदप्राप्ति ॥३७॥ विचारितां ज्याचीं तिन्ही स्थानें । अकार उकार मकारेंसीं निजचिन्हें । उमटोनि पंचदैवतउपासने । अधिकार जाला सर्वत्रें ॥ ३८ ॥ जो पंचदैवतात्मक पाहातां सावेव । न विचारितां ऐसा अर्थगौरव । ब्राह्मणासी ब्राह्मणपणाचें अडनांव । सहजगतीं बोलिजे ॥३९॥ ह्मणौनि श्रीगुरु निज शिष्यासी थापटूनि । परमोत्सवें अनुग्रह देऊनि । ह्मणती बापा याचा

---

१ स्वरूप. २ दासबोध १२-५-१ व ९. ३ ठेवण, आकृति. ४ त्रिगुण व पंचभूतें मिळून. ५ चार पिंडाचे व चार ब्रह्मांडाचे असे अष्टदेह. ६ चार वेदांचा ?

अर्थ विचारूनि । तद्रूप होईं निजांगें ॥ ४० ॥ ऐसें श्रीगुरुनिजवाक्य ऐकतां । शिष्य निज अंतरीं चमत्कारोनि तत्वता । ह्मणे स्वामी हें माझें मजजवळ असतां । मी नेणपणें भांबावलों ॥ ४१ ॥ पाहातां साच जी हें निजकर्णांसी येतां । तत्काळ लाभे परब्रह्मींची योग्यता । मा याचा साकल्य विचारें अर्थ घेतां । ब्रह्मरूप चि होइजे कीं ॥ ४२ ॥ तरि जी स्वामी मज सकळ साद्यंत । सांगितलें पाहिजे अर्थभरित । उपासना आदिकरूनि पंचदैवत । कोणकोणतीं तें यथाक्रमें ॥ ४३ ॥ इतुकें ऐकतां शिष्यवचन । श्रीगुरु सुखावोन परिपूर्ण । ह्मणती बापा सावध होऊन । श्रवण करीं अत्यादरें ॥ ४४ ॥ तुवां आपुलें निजसुख विचारिलें । तें सांगतां आमचें काय वेचलें । जेणें ब्राह्मणपणासी आणिलें । देखतदेखतां पैं ॥ ४५ ॥ जन्मोनि आठ वर्षेंपर्यंत । केवळ आचरण होतें शूद्रवत । आचार विचार न कळोनि सतत । अज्ञानपणें भांबावला ॥ ४६ ॥ खेळे नाना प्रकारींचे खेळ । लेंकुरांमाजीं होऊनि बरळ । खाणें जेवणें आणि मूत्रमळ । उभेपणें चि संपादी ॥४७॥ केवळ जडबुद्धि होऊनि अज्ञान । खेळत होता होऊनि हीन दीन । तो ज्याकरितां येकायेकीं ब्रह्मसंपन्न । होऊनि ब्राह्मणत्व पावला ॥ ४८ ॥ जन्मापासूनि व्रतबंधपर्यंत । होता केवळ हा शूद्रवत । मग लग्नीं साधूनियां सुमुहूर्त । निजवाक्यउपदेश ॥ ४९ ॥ निजवाक्यउपदेशाकारणें । ब्रह्मादिक अनन्य तनुमनें । ते यासी सहजस्थितीं प्राप्त होता ह्मणें । यासी द्विजत्व प्राप्त तत्काळीं ॥ ५० ॥ होतां श्रवणीं किंचित् संस्कार । चरणीं तीर्थासी जाला आधार । मुखीं ह्मणावयासी वेदाक्षर । अधिकार जाला भिक्षेसी ॥ ५१ ॥ ह्मणौनि संस्कारमंत्रें येवढा महिमा । पावला द्विजपणाचिया नामा । मग वेदाभ्यासें शनै शनै वाढे गरिमा । मग विप्र ऐसें ह्मणती ॥५२॥ मग जालिया वेदशास्त्रसंपन्न । गुरुमुखें अर्थ विचारितां गहन । प्राप्त

---

१ छादिष्ट. २ निजवाक्योपदेश झाल्यामुळें ३ मुलाची मुंज झाल्यावर त्याला ब्राह्मणत्व, बटुत्व प्राप्त होतें, तो शुद्ध होतो, ' भिक्षा देहि ' ह्मणण्यास पात्र होतो, ह्मणून त्या वेळीं त्याला भिक्षा घालतांना त्याचें चरणोदक घेत असतात. ४ महत्व.

जालिया केवळ ब्रह्मज्ञान । ब्राह्मणत्व सहजें शोभलें ॥ ५३ ॥ ऐसें आपलें मुळींचें ब्राह्मणपण । प्राणी अहपणें न विचारून । संसारप्रवाहीं चालिला वाहोन । यासी कोणें काय कीजे ॥ ५४ ॥ तरि कोण्हीयेकीं ऐसें न करावें । संसारीं आलियानें सहज स्वभावें । अनन्यभावें स्वहित साधावें । शरण रिघोनि श्रीगुरूसी ॥ ५५ ॥ तथापि श्रीगुरूसी शरण गेला । तेणें मंत्र तंत्र यासी उपदेशिला । तेणें याचा सार्थकविचार काय जाला । अत्रींचा कीं परत्रींचा ॥ ५६ ॥ आपुली मुळींची जे कां उपासना । ते जोंपर्यंत हा प्राणी विचारीना । आणि मंत्र तंत्र सिकला नाना । तरि तेणें काय होणें यासी ॥ ५७ ॥ आणि कोण्ही ह्मणती आम्ही वैष्णव । कोण्ही आपणा ह्मणविती शांभव । कोण्ही गाणपत्याचा धरूनि अहभाव । तें चि नाम मिरविती ॥ ५८ ॥ कोण्ही ह्मणविती आपणा सौर । कोण्हासी शाक्तपणाचा बडिवार । परि जे उपासनेनें ब्राह्मणत्व पावले साचार । ते समूळीं भुलले उपासना ॥ ५९ ॥ तरि तें चि निरूपण पुढिले कीर्णीं । सविस्तर बोलिजेल विचारूनि । श्रोतीं श्रीमंतीं श्रवण करूनि । आचरण केलें पाहिजे ॥ ६० ॥ दिनकर रामदासीं मनोभावें । लाधोनि उपासनागौरवें । स्वानुभवदिनकरीं विचारावें । निजात्मउपासनेसी ॥ ६१ ॥ स्वस्ति श्रीस्वानुभवदिनकरे गुरुशिष्यान्वये षष्ठम कळापे प्रणवउपासनानिश्चयनिरूपण नाम द्वितीय कीर्ण प्रकाशः ॥ २ ॥

---

॥ श्रीराम ॥

पूर्वकीर्णप्रासादकळसीं । कथारत्नप्रभा आहे ऐसी । जे विचारूनि मुळींचे उपासनेसी । भजन करावें तदंगें ॥ १ ॥ तरि मुळींचें जें कां येकाक्षरब्रह्म । जें क्षराक्षरातीतें निसीम । ज्यासी स्त्रीपुन्नपूसक

---

१ करिती ब्रह्मनिरूपण । जाणती ब्रह्म संपूर्ण । ते चि जाणावे ब्राह्मण । ब्रह्मविद ॥ दास ६–४–२४. २ ब्राह्मणत्वाचें मुख्य लक्षण जें ब्रह्मज्ञानप्राप्ति तें. ३ येकाक्षरब्रह्म अथवा प्रणवरूप. ४ सूर्योपासक. ५ नाश व अविनाश यांपलीकडचें.

त्रिविध नाम। बोलती निजभक्त ॥ २ ॥ ब्रह्मनाम ह्मणतां जें नपुंसक। प्रणवेश्वर ह्मणता पुरुषवाचक। ध्वनिरूप अर्द्धमात्रा ह्मणता निश्चंक। स्त्रीवाचक हि होतसे ॥३॥ असो त्रिविधनामीं असोनि व्याप्त। अनाम्यत्वें जें केवळ नामातीत। पाहातां केवळ जगदीश्वर चि मूर्तिमत। सकलपरूप शुद्धसत्व ॥ ४ ॥ त्यास चि अंतरात्मा बोलिजे। षड्गुणेश्वर त्यास चि ह्मणिजे। अर्द्धनारिनटेश्वर तो चि सहजें। आणि पुरुषप्रकृति ॥ ५ ॥ वेदें करितां स्तुति स्तवन। बोलों गेला परब्रह्ममहिमान। तवं ध्वनिरूप उच्चार होऊन। निशब्दीं शब्द प्रगटला ॥ ६ ॥ ऐसा कित्तेक बोलताती अन्वय। परि स्वानुभवें पाहातां न घडे प्रत्यय। का जे वेदाचा मुख्य जनक होय। सर्वाद्य ॐकार आधीं ॥७॥ मुळीं ब्रह्म निर्विकार निर्गुण। तेथ निर्गुणत्वें चि नामस्मरण। अहं ब्रह्म ऐसें स्फुरण। ध्वनिरूप उमटलें ॥ ८ ॥ जेवि न दिसता दृष्टीसी आकाश। तेथें अकस्मात उद्भव होय वायूस। तो हि दृष्टीसी न पडे परि स्पर्श। आंगासी लागतां कळे ॥ ९ ॥ तरि जैसें आकाशीं वायूचें स्फुरण। तेवि ब्रह्मीं प्रणवोद्धरण। ध्वनिरूप अर्धमात्रा प्रगटोन। त्रिपदेंसीं आकारला ॥१०॥ प्रथम ध्वनीचिये पोटीं। अकार उकार मकारेंसीं उठी। निशब्दें चि शब्दचोउटी। प्रणवेश्वररूप ॥११॥ तो प्रणवेश्वर प्रगटोनि मूर्तिमत। निजमुखें परब्रह्मासी स्तवित। त्या स्तवनाचा जो जाला गांथ। त्यासी शब्दब्रह्म ह्मणिजे ॥१२॥ गाथरूप जे सकळ शब्द। वाणी वदली निर्व्यवाद। ह्मणोनि त्यासी नामसंज्ञा बोलिजे वेद। कर्मउपासनाज्ञानेंसीं ॥१३॥ असो पिंडे प्रचित शब्दें विश्वास। आतां हि कोण्हीयेका नामे कोण्हीयेकास। बा-

१ नांवरहित असल्यामुळें. २ प्रणवाचा उद्गम कसा झाला तें दिलें आहे. ३ प्रणवरूप ॐ असा ध्वनि एकदम निघणें. ४ निरनिराळ्या प्रकारचे शब्द. ५ गाणें, कवन. ६ अनुभवेंवीण भ्रम। या नाव बोलिजे शब्दब्रह्म ॥ दास. ७-३-११. ७ लोकमान्य, किंवा ज्याला सर्व जगतात दुसरी जोड नाहीं अशी. ८ या ठिकाणीं दिलेली वेदाची उत्पत्ति विचार करण्यासारखी आहे ९ ज्या ठिकाणीं शब्द किंवा ध्वनि उमटत आहे त्या ठिकाणीं पिंडाचें किंवा जड देहाचें अस्तित्व आहे, हें अनुभवाचें बोलणें आहे, त्यावर विश्वास ठेवावा.

हांतां काय उमटे तो मनास । सुक्षम आणिला पाहिजे ॥ १४ ॥ आणि यवनशास्त्रीं हि मुख्य विचार । ह्मणती गैबी[2] अवाज साचार । मग त्या अवाजयोगें सकळ चराचर । निर्माण जालें यथाक्रमें ॥ १५॥ आणिक हि दर्शनें उपदर्शनें । बडें पाशांडें गतभविष्य वर्तमानें । जन्हि मत्तांतरें बोलिजे साभिमानें । तन्हि सकळाचा प्रत्यय हा चि ॥ १६ ॥ ऐसा ध्वनिरूप जो कां प्रणव । जेथूनि स्वरवर्णव्यक्तीचा गौरव । सोळा हि स्वर आणि अपूर्व । वर्ण पचैतीस ॥ १७ ॥ येहीं सर्व हि त्रैलोक्य व्यापिलें । यांवेगळें नाहीं काहीं उरलें । यांचेनि वर्णव्यक्ति नाम ठाकलें । निर्गुण परब्रह्मासी ॥१८॥ वेद शास्त्र पुराणसमुच्चय । श्रुति स्मृति काव्य व्याकरणअन्वय । छयपन भाषा नाना लिपी आन्माय । स्वरवर्णीं व्यापले ॥१९॥ सोळा स्वर पंचतीस अक्षरें । मिळोनि येकावन साचोकारें । बावनावें उरलें तें सविस्तरें । गुरुमुखें विचारिजे ॥ २० ॥ एवं बावना मातृकांपरौतां । कोण मंत्र असे पैं तत्वता । किंवा भाषाशब्दमात्र विचारितां । यावेगळें काय असे ॥ २१ ॥ स्वर्ग मृत्यु आणि पाताळ । मिळोनि हें चि अवघीं अळुमाळ । विचारितां अनत ब्रह्मांडाचा खेळ । यांवेगळा न घडे कदा ॥ २२ ॥ याची व्याख्या कारितां पदत्रय । अकारउकारमकारान्वय । त्रिपदीं योजितां गुणत्रय । सहजें चि आहेति ॥ २३ ॥ त्रिगुणीं तिन्ही देव साचार । ब्रह्मा विष्णु महेश्वर । रज सत्व तम प्रकार । यथान्वयें योजले ॥ २४ ॥ मग अर्धमात्रात्मक जे कां ध्वनि । ते चि आदिशक्ति बोलिजे सज्जनीं । मूळमाया प्रकृति गुणक्षोभिणी । तियेचें चि नांव ॥ २५ ॥ तियेतें चि इछाशक्ति ह्मणिजे । जे शुद्धसत्वाचा अर्द्धांगीं विराजे । जेवि का सूर्यांचिये आगीं सहजे । जडली

---

१ हाक मारिली तर. २ आकाशवाणी, अदृश्य सृष्टीमधून निघालेले शब्द. ३ शास्त्रें. ४ व्यजनें तर ३६ आहेत! ५ वेद. ६ छत्तीस व्यजनांपैकीं च हें बावनावें अक्षर आहे, पण तें कोणतें असावें बरें ? ७ वेगळा. ८ कोणत्याहि भाषेंतील कोणताहि शब्द घेतला तरी या बावन मात्रांवेगळा असत नाहीं. ९ किंचित् व अळुमाळु=कांहींबाही.

प्रभा ॥२६॥ किं ते आकाशीं जैसी नीळिमा । किं वायूचे आंगीं स्पर्श-गरिमा । किं ते बुबुळीं शोभे गरिमा । बाहुलीची ऐक्यत्वें ॥ २७ ॥ एवं वेगळेंपणें चि निजऐक्यता । अखड असे स्वभावता । कां तें गोडी-साकरेचें विचारिता । वेगळेंपण ॥ २८ ॥ तेवि दों नामियांचें वेगळेंपण । जेवि प्रकृतिपुरुषाचें अखड सलग्न । का ते अळंकारसुवर्णसम्मीलन । ऐक्यत्व सहज ॥ २९ ॥ ऐसें वेगळेंपणें येक्यें असता । तेथ ज्ञानशक्तिसहित अवचिता । सत्वगुण सहज स्वभावता । उकारपदीं संभवे ॥३०॥ तव उकाराचे सव्यभागीं । ज्ञानशक्ति तरुणांगी । माजीं प्रकटला उभय-संगीं । सत्वगुण निजांगें ॥ ३१ ॥ तैसी च अकारपदीं क्रियाशक्ति । माजीं रजोगुण संभवे यथोनिगुती । मकारपदीं द्रव्यशक्ति । संभवे तमो-गुण ॥ ३२ ॥ ऐसी इछाकुमरी मूळपुरुषसगें । तीन अंडीं प्रसवली सशक्तियोगें । तें अंडीं फुटोनि अंकुरलीं सर्वांगें । ध्यानावयवेंसीं ॥३३॥ तेथ सत्वगुणीं जन्मली विष्णुमूर्ति । सुदर ध्यान अवयव आकृति । ज्ञानशक्ति ते चि स्त्रीचिन्हानुवृत्ति । लक्ष्मी विराजे अर्द्धांगीं [1]। मग रजोगुण क्रियाशक्तिसहित । प्रगटला ब्रह्मा सावित्रीसमवेत । आणि तमोगुण जो द्रव्यशक्तियुक्त । ते चि शकरपार्वती ॥ ३५ ॥ एवं मुख्य प्रणवरूप जो सर्वेश्वर । तेणें निर्मिले तिन्ही देव साचार । त्रिगुणरूपें ब्रह्मा हरि हर । निजशक्तिसहित ॥ ३६ ॥ सत्वगुणी विष्णु ह्मणौनि सात्विक । रजोगुणी ब्रह्मा सृष्टिकारक । तमोगुणी शंकर संहारक । सकळ चराचर ॥ ३७ ॥ मग सर्वेश्वरें अति देदिप्यमान । त्रिगुणेंसीं निजतेज येकवटून । प्रतिमा निर्मूनि सूर्यनारायण । नभ-पोकळीमाजीं सोडिला ॥ ३८ ॥ हें विष्णुपुराणीं असे आख्यात । जे सूर्य केवळ सर्वेश्वरनिर्मित । आणि कश्यपापासूनि जाला ऐसें ह्मणत । पुराणांतरीं ऋषेश्वर ॥ ३९ ॥ परतु कश्यपापासूनि अदितीउदरीं । बारा आदित्य जाले निर्द्धारीं । इंद्र यम वरुण धाता विधाता मुरारि ।

---

१ निभ्रांत, यथार्थ. २ सूर्याची उत्पत्ति प्रणवरूप जो सर्वेश्वर त्यापासून आहे. ३ सांगितलेलें. ४ वामन.

जो पंचमावतार ॥ ४० ॥ आणि भग मित्र पुषा आर्यमा सविता। विवस्वत मिळोनि बारा आदित्य तत्वता। याहिमाजीं असे येक विधाता। आणि ब्रह्ययास हि विधाता ह्मणती ॥ ४१ ॥ ब्रह्मा तरि कश्यपाचा प्रपिता। आणि कश्यपात्मज हि असे विधाता। ह्मणोनि येक नाम दोन्हीकडे असल्या तत्वता। येक ते कैसे होतील ॥४२॥ आणि सूर्याचीं हि बारा नामें विचारितां। अर्यमा पुषा विवस्वत सविता। हें येका सूर्यास चि इतुकीं नामें तत्वता। आणि कश्यपात्मज तरि वेगळाले ॥ ४३ ॥ ह्मणोनि येक नाम दोहींकडे असलें। तरि ह्मणावें काय दोघे येक जाले। ऐसें सांगतांचि पैं खंडण जालें। अशंकेचें इये ॥ ४४ ॥ अहो आणिके पुराणांतरीं कथा। किं दक्षयज्ञीं आदिनारायण उभा असतां। गर्व जाला ह्मणोनि गोसी तुटला अवचिता। तेणें शिर गेलें उडोनि ॥ ४५ ॥ तें चि आकाशीं भ्रमतसे ह्मणोन। यासी ह्मणती सूर्यनारायण। हें हि कथानक पुराणांतरीं सांगोन। गेले ऋषेश्वर ग्रंथकर्ते ॥ ४६ ॥ तरि हे गोष्टी पुराणांतरीं आहे खरी। परंतु प्रत्यय येत नसे निर्द्धारीं। कां जे सूर्यासी अवयव सर्व शरीरीं। आणि येकचक्ररथारोहण ॥ ४७ ॥ जरि केवळ शिर चि हें असतें। तरि हस्तपदेंवीण रथीं केविं बैसतें। आणि स्त्री पुत्र कन्या परिवार तें। काइसेन तन्हि ॥ ४८ ॥ ह्मणोनि केवळ शिर सूर्यनारायण। हे गोष्टी प्रत्ययेंवीण अप्रमाण। आणि ह्मणती हा कश्यपनंदन। हें हि तैसें चि भासतसे ॥ ४९ ॥ याहिवरी ईश्वरइच्छा काय तें नकळे। मनुष्य काय जाणे बापुडें आंधळें। परि धूर्तवादें कांहींयेक कळे। प्रत्यय मनाचेनि योगें ॥ ५० ॥ असो सांगतां मुळींची उपासना। मध्यें तर्क उठिले प्रकार नाना। ते तितुके हि जरि सांगावेना। तरि अशंकानिवृत्ति होय कैसी ॥ ५१ ॥

---

१ पणजा. २ गोशा, धनुष्याचें एक टोंक ३ वास्तविक सूर्याची उत्पत्ति कशी झाली व त्याचें स्वरूप कसें आहे, हें खरोखर एका परमेश्वरास माहित त्याची अगाध लीला जाणण्यास आह्मी अज्ञान दृष्टीची मानवें केवळ असमर्थ आहोंत. परंतु त्यातल्यात्यांत आपल्या विचारशक्तीच्या कसोटीला जो अनुभव उतरेल तो खरा मानावा हें योग्य दिसतें.

तरि मुख्य प्राणियांची उपासना । ते प्रणवरूप सत्य आणितां ध्याना । त्रिपदागायत्रीमाजीं अर्थविचारणा । पाहातां असंभवनीयत्वें ॥ ५२ ॥ हे गोष्टी प्रगट बोलता नये । बोलतां घडती नाना अपाय । ह्मणौनि त्रिवर्णासी मुख्य उपासना होय । प्रणवसहित हे[2] ॥ ५३ ॥ ब्राह्मण आपुलिया स्वानंद-मेळीं । संध्या प्रातर्मध्यान्ह सायकाळीं । पुरश्चरण आचरे त्यासी कदा काळीं । दरिद्र व्यथा मृत्यु नसे ॥ ५४ ॥ ह्मणौन ब्राह्मण क्षत्री आणि वैश्य । त्रिवर्णासी मुख्य दैवत हें सादृश्य । यावेगळे त्यासी इचें करितां भाष्य[3] । दरिद्र व्यथा का मृत्यु होय ॥ ५५ ॥ शूद्रवर्ण आणि इतर ज्या याती । त्यांसी इयेचा अधिकार नसे निश्चितीं । तथापि जरि बळात्कारें उच्चार करि-ती । तरी मृत्यु होईल निश्चयें ॥ ५६ ॥ अथवा कोण्ही ब्राह्मण होत्साता । शूद्र किंवा अन्य यातीस स्वभावतां । गायत्रीचें अक्षर येक सांगतां । तो हि मृत्यु पावेल तत्कोळ ॥५७॥ प्रणवरूप जो कां जगदीश्वर । गायत्री संपूर्ण त्याचें शरीर । तो पुरुष हे प्रकृति साचार । तो ईश्वर हे मूळमाया ॥५८॥ तो शुद्धसत्व हे इच्छाशक्ति । तो अर्द्धनटेश्वर हे अर्द्धनारी युवती । तो अतरात्मा हे चित्शक्ति । त्रैलोक्यजननी ॥ ५९ ॥ तो वेदजनक हे वेदमाता । तो षड्गुणेश्वर हे षड्गुण स्वभावता । तो सर्वेश्वर हे स्वभावता । सर्वसाक्षिणी ॥ ६० ॥ तो स्वानुभव हे चित्कळा । तो सूर्य हे प्रभा सोज्वळा । तो अग्नि हे धगधगीत ज्वाळा । देदिप्यमानरूप ॥ ६१ ॥ तो स्वसवेद्य हे प्रकाशमान । तो ज्ञेयं हे ज्ञप्ति परिछिन्न । एवं उभयता मिळोनि कार्यकारण । व्यापलीं त्रिगुणीं पचभूतीं ॥ ६२ ॥ याचिया महत्वें विस्तारले । त्रिगुण त्रिरूपें प्रगटले । मूर्तिमत ध्यानें साकारले । ब्रह्मा आणि हरि हर ॥ ६३ ॥ चौथा सूर्य निजतेजें निर्मिला । गायत्री-

---

१ गायत्रीमंत्रांचे तीन पाद आहेत, त्याचा अर्थ करूं ह्मटले तर तें केवळ अशक्य होय, आणि वास्तविक त्याचा अर्थ प्रगट करू हि नये असें ह्मणतात. २ गायत्रीमंत्र. ३ शूद्र, अतिशूद्र यांनीं गायत्रीमंत्राचें अर्थविवरण करूं नये. ४ तेव्हा या मंत्राची पवित्रता किती आहे पहा ! ५ जाणण्याची वस्तु ६ लय-साक्षी ज्ञान.

करितां रूपासी आला । आतां हि ये गोष्टीचे साक्षीला । बरें पाहा विचारूनि ॥६४॥ प्रत्यहीं प्रातर्मध्यान्ह सायकाळीं । ब्राह्मण गायत्रीमंत्रें अर्घ्य देती त्रिकाळीं । तेणें सूर्य प्रदीप्त होऊनि नभपोकळी । माजीं विचरे नित्यनूतन ॥६५॥ हे सारे साक्ष येतसे लाहानथोरा । ह्मणौनि गायत्री मूळ या चराचरा । ब्रह्मा विष्णु आदिकरूनि शंकरा । प्रणव गायत्री उपासनें ॥६६॥ असो रजोगुणी ब्रह्मा प्रगटला । तेणें ईश्वराज्ञें सृष्टिक्रम केला । पुढें वंशोपवंशें सकळ चालिला । सृष्ट्यादि व्यवहार ॥ ६७ ॥ च्यारिहि खाणीं चौऱ्यासी लक्ष जीवयोनी । सचराचर व्यापली हे अवनी । त्यांचा प्रतिपाळ विष्णु करी अनुदिनीं । आणि शंकर करी संव्हार ॥ ६८ ॥ असो यानंतर सर्वेश्वरें त्रिगुण । पुन्हा मागुतीं येकवटून । प्रणवाकारें श्रीगजानन । मूर्ति निर्मिली साळंकृत ॥ ६९ ॥ शंकरवरदें त्रिपुरदैत्य मातला । तो शंकरेसींच युद्धासी उठिला । मग सर्वेश्वरें गजानन निर्मिला । तेणें त्रिपुरासी वधिलें ॥ ७० ॥ तें सर्वेश्वरें महत्कृत्य जाणोन । गजाननासी सर्वस्वें प्रसन्न होऊन । सर्वहि सामर्थ्य सिद्धि देऊन । केला निजगणीं अध्यक्ष ॥ ७१ ॥ ह्मणौनि हे पांच हि सर्वेश्वरनिर्मित । यांची जननी गायत्री इथभूत । ब्रह्मा हरि हर सूर्य गणेश हे समस्त । परमेश्वरजनित पैं ॥ ७२ ॥ पुराणांतरीं गणेशाची कथा अनारिसी । जे पार्वतीनें निर्मिला करितां स्नानासी । परि गणेशपुराणीं सांगितलें निश्चयेंसीं । कीं हा सर्वेश्वरावतार ॥ ७३ ॥ असो यापरि प्रणवाचें विचारितां ध्यान । अष्टांग चतुष्पद आणि त्रिस्थान । तथा पंचदैवतीं शोभे विराजमान । सशक्ती सर्वेश्वर ॥ ७४ ॥ हें ध्यान साळंकृत जो न विचारी । तो अडनांवाचा ब्राह्मण निर्द्धारीं । ह्मणौनि याचिपरी अर्थविचारेंवरी । सायुज्यतामुक्ति जीवासी ॥ ७५ ॥ दिनकर रामींरामदासीं । निजअर्थ विचारूनि अनुभवेंसीं । स्वानुभवदिनकर

---

१ ब्रह्मा, विष्णु, शंकर हे परमेश्वरस्वरूप असल्यामुळें त्यांची उपासना त्यांचे भक्त करतात; परंतु त्या देवांचें स्वतःचें उपास्य दैवत ह्मटलें ह्मणजे प्रणवयुक्त गायत्री हें होय

सुखसंतोषीं । श्रोतयांप्रति निवेदी ॥ ७६ ॥ स्वस्ति श्रीस्वानुभवदिनकरे गुरुशिष्यान्वये षष्ठम कळापे प्रणवसर्वेश्वरनिश्चयनिरूपण नाम तृतीय कीर्ण प्रकाशः ॥ ३ ॥ श्रीराम ॥

॥ श्रीराम ॥

पूर्वकीर्णक्षीरार्णवकल्लोळीं[1] । कथामृत उचंबळों पाहे दिग्मंडळीं । तव शिष्यअगस्तीनें अवधानाञ्जुळीं[2] । आचमन केलें संपूर्ण ॥ १ ॥ तेणें[3] पूर्णपणें सरसावला । साजेपणें जी जी ह्मणोनि पुढारला । तव श्रीगुरुपदद्वंद्वकुंभ देखिला । तेणें निवांत उगमदर्शनें[4] ॥ २ ॥ मग निवांतपणेंचि श्रीगुरुपुढां । बोलों आरंभिलें शब्दीं गोडा । ह्मणे स्वामीनें मूळउपासनेचा निवाडा । सांगितला परिछिन्न ॥ ३ ॥ ऐसी मुळींची उपासना सोडून । प्राणी धांवती अग्राकडून । तरि यासी काहीं आश्रय असे ह्मणोन । किं निराश्रयत्वें ॥ ४ ॥ कोण्ही ह्मणती आह्मी गाणपत्य । कित्तेक शाक्तपणें होती कृतकृत्य । कित्तेक ह्मणविती आपणां सत्य । सूर्यउपासक सौरत्वें ॥ ५ ॥ कोण्ही म्हणती आम्ही शांभव । कोण्ही ह्मणविती आपणां वैष्णव । आणि या नामाचा अहंभाव । परोपरीं वागविती ॥ ६ ॥ परंतु ज्याकरितां ब्राम्हणत्व पावले । वेदाध्ययनीं अधिकारी जाले । भिक्षाप्रतिग्रहीं मूळमंत्रें योजले । आणि तीर्थदानीं समर्थ ॥ ७ ॥ तें साम्राज्यपद मुळींचें सोडूनि । मत्ताभिमानदारिद्रें व्यापले जनीं । मग आपणासी नाना नामाभिधानीं । गौरविती स्वइछा ॥ ८ ॥ तरि जी याचा कैसा असे विचार । हा मज सांगितला पाहिजे साचार । ऐसें बोलोनि श्रीचरणावर । मस्तक ठेविला निजप्रीतीं ॥ ९ ॥ शिष्याची देखोनि विनीतता । श्रीगुरु बोलती तत्वता । तू जें बोलिलासी तें यथार्थता । तैसी च या लोकींची रीति ॥ १० ॥ अरे जे लोकींचा चंद्र

---

[1] क्षीरसमुद्राच्या लाटामध्यें. [2] एकाकार वृत्तिरूप ओंजळीनें [3] कथामृतपान केल्यामुळें ताजातवाना होऊन [4] श्रीगुरुचरण हाच कथामृताचा मूळ साठा, त्याचें दर्शन झाल्यावरोबर. [5] उफराटे.

क्षई । पाहारांत चौदा इंद्रांची नवाई । सूर्य फिरफिरों नित्य अस्तोदई । मावळे आणि उगवे ॥ ११ ॥ पाणियांत बुर्बुडे निर्माण जाले । ते न कळती केन्हासे निमाले । तैसे ये मृत्युलोकीं प्राणी जन्मले आणि मेले । त्यांची शुद्धि हि नाहीं ॥ १२ ॥ या लोकाचे ठाईं नाहीं येक निश्चय । ह्मणौनि यांसी होती नाना अपाय । तन्हि आपुल्या स्वहिताचा उपाय । प्राणांतीं हि न देखती ॥ १३ ॥ आपणासी लागला रोग क्षय । आणि वैद्य दुसन्यासी करी औषधोपाय । आयुष्यभविष्याचा अन्वय । नाडिज्ञाननिदानेंसीं ॥ १४ ॥ अथवा तो गैणक ज्योतिषी । दुसन्याचें भविष्य सांगे चमत्कारेसीं । परि आपलें होणार तें न विचारी मानसीं । तेवि हे लोक भांबावले ॥ १५ ॥ पराव्यासी नाना उपदेश करिती । कर्तव्य नकर्तव्य स्थापिती । परि आपला मूळान्वय न विचारिती । गहिंसपणें मूर्खत्वें ॥ १६ ॥ दीप घरिच्यासी करी सभंवता उजेड । परि अधारें व्यापलें तें न देखे बुड । तेवि आपुलें स्वहित न जाणोनि मूढ । आणिकां बोधिती नानापरी ॥ १७ ॥ मुळींची उपासना कोण तें न विचारून । जीकरितां पावले ब्राह्मणपण । मग नसतें सौर शाक्त वैष्णव शांभवपण । गाणपत्य मिरविती ॥ १८ ॥ तथापि अवश्य हें सुखें मिरवावें । परि आपलें मुळींचें काय तें विचारावें । बाप टाकून सासन्याचें ह्मणवावें । हें भूषण कीं दूषण ॥ १९ ॥ अहो संसारीं कोणिहयेका प्राणियानें । आपुल्या वडिलाचें नाव मिरवणें । किं तें लोपूनि आणिकाचें ह्मणवणें । हें श्लाघ्य किं अश्लाघ्य ॥ २० ॥ निज पिता टाकूनि श्वशुरासी । कोणिहयेकें वाढवितां बडिवेंरासी । तत्काळ कारण होय दूषणासी । इहलोकीं परलोकीं ॥ २१ ॥ निज माता

१ प्रहर (?) २ जगांत काय घडामोड चालली आहे, ती कशाकरितां चालली आहे व तिचा उत्पादक कोण इत्यादि विचार गरीब बापड्या प्राण्याच्या मनांमध्यें हि येत नाहींत. ३ वैद्यास स्वतःस ४ जातक वर्तविणारा. ५ स्वत.चा शोध न घेता दुसन्याच्या उटाठेवी मात्र करतात ६ अविचारानें. ७ दिव्याखाली अधार. ८ नांवाचें. ९ परि त्या सकळाचें हि कारण । मुळीं पाहावें स्मरण । तथा स्मरणाचे अंश जाण । नाना देवतें ॥ दास. १९-५-५. १० मोठेपणा, कीर्ति.

टाकूनि माउशीसी । मागतां स्तनपान कां भोजनासी । तेथ मातृस्नेहाचिया समत्वासी । येणें न घडे कदापि ॥ २२ ॥ ह्मणौनि सांगावया हें चि कारण । प्राणी मुळींची निज उपासना सोडून । धरूनि नाना दैवताचे साभिमान । तदनुसार वर्तती ॥ २३ ॥ तरि सहसा ऐसें न करावें । मुळींचे उपासनेसी विचारावें । विचारूनि तदनुसार वर्तावें । प्रपंचपरमार्थीं ॥ २४ ॥ अहो जे. उपासनेनें ब्रह्मत्वासी आला । निजनाम ब्राह्मण ऐसें पावला । सर्वोत्कर्षें जगमान्य जाला । वेदवाक्यगौरवें ॥ २५ ॥ ज्याऱ्ही वर्ण आणि आश्रम । सर्व यातीकुळें-क्रम । शास्त्रविधि सत्कर्मधर्म । श्रेष्ठत्व पावला सर्वांचें ॥ २६ ॥ वेदवाक्याश्रई पूर्ण अधिकार । आगीं सर्व शास्त्राचा वडिवार । जे उपासनेकारिता पावला साचार । तियेसी सोडिलें सर्वस्वें ॥ २७ ॥ पाहा नवल वाटतसे अपूर्व । सोडूनि मुळींचा उपासनागौरव । आपणां ह्मणविती वैष्णव किं शाभव । शाक्त सौर कां गाणपत्य ॥ २८ ॥ विष्णुभजनें ह्मणविती वैष्णव । शंकरभजनें होती शांभव । शक्तीसी भजोनिया स्वयमेव । शाक्तपण मिरविती ॥ २९ ॥ सूर्यभजनें ह्मणविती सौर । गणेशभजनें गाणपत्यवडिवार । यावेगळे कित्तेक अविचारी नर । नाना क्षुद्र दैवतीं भजतीं ॥ ३० ॥ तरि हें मूर्खपणें प्राणी न विचारून । उगें चि भरंगळलें वायांविण । देखोवेखीं जैसें आचरे जन । तैसें आपण हि करितसे ॥ ३१ ॥ परंतु सूक्ष्मदर्शीं विचारितां । हा प्राणी ज्या विष्णूसी भजे तत्वता । त्या विष्णूसी कोणाची उपासना हें दृढता । निश्चयेसीं विचारावें ॥ ३२ ॥ विष्णु मुळीं निर्माण जाला कोठून । आणि तो कोणाचें करितसे भजन । त्याची उपासना कैसी विलक्षण । हें सदृढ विचारावें ॥ ३३ ॥ तैसे चि शंकर आणि श्रीगणपती । सूर्यनारायण आणि आदिशक्ति । हे ज्या देवासी सदैव भजती । त्याचें शोधन करावें ॥ ३४ ॥ मुख्य ब्रह्माआदिकरूनि हरि हर । हे ज्या देवाचे नित्य किंकर । त्यांसी

१ कुलकर्माचा प्रवर्तक पुरुष २ वाहवले, भटकले ३ अनुकरणानें, दुसऱ्याचें उदाहरण पाहून

ज्याचा ध्यास तो सर्वेश्वर । वोळखोनि भजावा ॥ ३५ ॥ ज्याचिया आज्ञां ब्रह्मा सृष्टि करी । विष्णु प्रतिपाळी सकळां परमादरीं । शंकर तत्काळ चि संहारी । क्षणयेक न लगता ॥ ३६ ॥ ज्याची आज्ञा करूनि प्रमाण । गगनीं सूर्य नित्य करी भ्रमण । अहोरात्र दिवस मास वर्ष ठाणन । युग कल्प पर्यंत ॥ ३७ ॥ कळिकाळ जो कां विश्वनियता । तो चळीं कांपे ज्याचिया सत्तां । विश्वप्राण हा वायु तत्वता । चळे आज्ञा जयाचिया ॥ ३८ ॥ सिंपोनि निज अमृतकिरण । आज्ञां चंद्र जीववी त्रिभुवन । इंद्रासहित सकळ सुरगण । ज्याचे आज्ञेमाजीं वर्तती ॥ ३९ ॥ चतुर्विध अन्नें पैं तत्वता । अग्नि पचवितसे ज्याच्या सत्तां । मेघ वर्षोनि अति उदारता । तृण धान्यें पिकती पृथ्वीसी ॥ ४० ॥ ज्याचा कुबेरु नित्य भांडारी । वरूण ज्याचा सकेंकरि । असभाव्य असोनि सप्तसागरी । मर्यादा नुलंघिती जया भेणें ॥ ४१ ॥ जेणें गगनाचा वोढूनि तंडवा । माजीं लाविला प्रभाकर दिवा । खाले भूगोळ रचूनि सुहावा । नाना जिनस निर्मिले ॥४२॥ येकें द्विपदें येकें चतुष्पदें । येकें षट्पदें येकें अष्टपदें । येकें बहुपदें येकें अपदें । येकें भूमिगत पदीं शोभती ॥ ४३ ॥ येकें हिरवीं च अति रसरसितें । येकें कोरडीं शुभ्र खसखसितें । येकें कोमळें अति लुळलुळितें । येकें वज्रप्राय कठिणें ॥ ४४ ॥ येकें प्रमाणुहूनि परम सानीं । येकें पर्वतप्राय येकें न माती गगनीं । येकें केवळ न दिसती नयनीं । विचरता अहर्निश ॥ ४५ ॥ येकें वक्रें येकें अति सरळें । येकें लघु येकें दीर्घें पृथुलें । येकें सुंदरें चांगलीं अति निर्मळें । कुरूपें येकें मळवीं ॥ ४६ ॥ येकें तिखटें तुरटें खारटें । येकें गोडें आंबटें कडुवटें । येकें मधुरें अलवणीं जोरटें । गौलें[10] येकें पानचटें पैं ॥ ४७ ॥ येकें तांबडीं हिरवीं सावेळीं । पारवीं भगवीं येकें पिवळीं । नारंगी गुलाली जांसनिळीं[12] ।

---

१ ब्रह्मा विष्णु आणि हर । त्यामां निर्मिता तोचि थोर । तो वोळखावा परमेश्वर । नाना यत्नें ॥ दास. ६-१-१२. २ यमराज. ३ केर काढणारा; केंकरें=केरसुणी, खराटा. ४ चांदवा ५ शुभ्र ६ परमाणुहून. ७ स्थूळ, जाड. ८ मळकट. ९ खुरगटलेलें. १० रुचकर, मधुर. ११ श्यामवर्ण, निळा. १२ जास्वदीच्या फुलाच्या रंगाप्रमाणें.

अरगें येकें बहुरगें ॥ ४८ ॥ येकें द्विभुजें चतुर्भुजें षड्भुजें । अष्टभुजें दशभुजें द्वादशभुजें । अष्टादशभुजें येकें विंशति भुजें । सहस्रभुजें अभुजें ॥ ४९ ॥ येकशीर्षें द्विशीर्षें त्रिशीर्षें । चतु:पचशीर्षें येकें षट्शीर्षें । दशशीर्षें आणि त्रिशत सहस्रशीर्षें । केवळ अशीर्षें पैं येकें ॥ ५० ॥ अचक्षु द्विचक्षु येके त्रिचक्षु । शडष्टदशद्वादश येकें वीस चक्षु । येकें सहस्र द्विसहस्र चक्षु । येकें केवळ चक्षुश्रोत्रें[१] ॥ ५१ ॥ येकें गगनचरें येकें भूचरें । येकें जळचरें येकें अरण्यचरें । येकें तृणचरें येके स्थावरे-[२] । चर यक अचरें पैं ॥ ५२ ॥ येकें अडजें येकें जारजें । येकें स्वेदजें येकें उद्भिजें । ऐसे चौऱ्यांशी लक्ष जीनस सबीजें । निर्मिले जेणें अपार स्वेछा ॥ ५३ ॥ पाहा हें उदक करूनि मृद पातळ । गोड क्षार ऊष्ण सीतळ निर्मळ । सर्वांचें संजीवन आणि आहाळबाहाळ[३] । हे करणी अगाध जयाची ॥ ५४ ॥ छपन कोटि योजनें हें भूमडळ । वरि सप्तसागर पर्वत अष्ट दिग्पाळ । मध्यें मेरुसारिखें महा ढिसाळ[४] । येकवीस स्वर्गेसीं विराजे ॥ ५५ ॥ येवढें हि ढिसाळ असोनि उदकीं । ज्याचिया आज्ञा शेषें धरिजे मस्तकीं । आणि पृथ्वीच्या दशगुणें आवर्णोदकीं । सभवतें असिजे ॥ ५६ ॥ उदकासभवतें दशगुणें तेज । तेजासबाह्य दशगुणें प्रभंज । त्या प्रभजनासभवतें सहज । असंभाव्य गगन ॥ ५७ ॥ तें गगन तमोगुणीं सामावलें । तमोगुणासी रजोगुणें व्यापिलें । रजोगुणावरी सत्त्वें व्यापक देखिलें । सत्वगुणासी पैं ॥ ५८ ॥ त्या सत्वगुणाचा जेथ होय सामाव । ते गुणक्षोभिणी बोलिजे स्वयमेव । आणि मूळमाया तियेचें चि नाव । ज्ञप्तिरूप[५] सर्वसाक्षिणी ॥ ५९ ॥ ऐसी ज्ञप्तिरूप जे कां अर्द्धमात्रा । तियेचा जो अधिष्ठात्रा । अर्द्धनारीनटेश्वर विश्वधात्रा । प्रणवरूप सर्वेश्वर ॥ ६० ॥ जो साक्षात् परब्रह्मजनितें[६] । सर्वाद्यपणें जो विलसे सतत । अनत ब्रह्मांडाचा लयोद्भव होत ।

---

१ कानाप्रमाणें चक्षूचा उपयोग करणारा, उ० सर्प. २ वृक्षादिकावर राहणारे प्राणी. ३ बहुत. ४ फार मोठें. ५ लयसाक्षी ज्ञानरूप. ६ परब्रह्म असतां निश्चळ । तेथें सकल्प उठिला चचळ । तयास बोलिजे केवळ । आदिनारायण ॥ मूळमाया जगदेश्वर । त्यासीच ह्मणिजे षड्गुणेश्वर । दास. १३-३-३।४

ज्याचिया स्वेच्छा ॥ ६१ ॥ जो सर्वेश्वर सर्वनियता । विश्व रचे खचे ज्याचिया सत्तां । त्यासी चुकोनि प्राणी अहममता । नाना भावना भाविती ॥ ६२ ॥ मूळ सोडूनि अग्राकडे धावती । तेणें प्राणी भ्रमचक्रीं पडती । मग चौऱ्यासी लक्ष योनी भोगीत फिरती । कोटि कोटि वेळे पैं ॥ ६३ ॥ तरि कोण्हीयेकें ऐसें न करावें । जे मूळ सोडूनि अग्राकडे जावें । अग्राकडूनि मुळासी यावें । ह्मणिजे श्लाघ्यवाणें ॥ ६४ ॥ पाहा सूक्ष्मदृष्टीं विचारूनि सहज । पंचभूतांचा मेळऊनि समाज । रेतरक्ताचा करूनि संयोज । जननीगर्भकोशीं ॥ ६५ ॥ कैसीं नवद्वारें निर्माण केलीं । [1]हस्तपादादि अवयवीं शोभलीं । परमितेंचि सरस साजाविलीं । परस्परानुमेळें ॥ ६६ ॥ पृथक आकारी पृथुकां करणी । असोनि वर्तती येके मिळणीं । हे ज्या सर्वेश्वराची उभारणी । त्यासी कोण्ही न विचारिती ॥ ६७ ॥ अहा जगदीशा हें काय जालें । [2]अमृत लाघोनि त्याचें समार्जन केलें । तैसें नरदेह पावोनि [3]गवांविलें । विषयभोगीं भुलोनि ॥ ६८ ॥ येकयेका इंद्रियाच्या मोलें । अनंत ब्रह्मांडासी जऱ्हि वेचिलें । तऱ्हि न मिळे तें यासी लाधलें । अनायासें च कीं ॥ ६९ ॥ ऐसें असोनि सहज स्वभावता । प्राणी स्वहित न विचारिती तत्वता । आणि विषयभ्रांतीं अहंममता । भुलोनि भाबावले ॥ ७० ॥ असो ज्या सर्वेश्वरें नरदेह निर्मिलें । त्यासी आधीं पाहिजे विचारिलें । ह्मणिजे सर्व सार्थकरूप जालें । इहपरत्रलोकीं ॥ ७१ ॥ तरि तो सर्वेश्वर कैसा किंलक्षण । आधीं पाहिजे वोळखोन । ह्मणिजे सहजें चि सर्वसंपन्न । होइजेल आपण ॥ ७२ ॥ तेथ मूळान्वय पाहातां सकळाद्य । साक्षात्परब्रह्मजनित जो सद्य । ध्वनिरूप प्रणव स्वसंवेद्य । अर्द्धमात्रेसहित ॥७३॥ त्यास चि बोलिजे शुद्धसत्व । अर्द्धमात्रा ते ज्ञानशक्ति महत्तत्व । उभयतासंयोगें त्रिगुणप्रभव । यथाक्रमें होता जाला ॥ ७४ ॥ अका-

---

१ निरनिराळ्या कृती पृथक शब्दाप्रमाणें योजना केली आहे. २ सेवन न करता शिंपडून टाकलें. ३ गमाविलें. (?)

रस्थानीं रजोगुण ब्रह्मा । उकारीं सत्वगुणें विष्णुगरिमा । मकारीं तमो-गुणें शिवनामा । हे त्रिगुण मुख्य प्रणवोद्भव ॥ ७५ ॥ पुढें त्रिगुणापा-साव पंचभूतें । पावलीं यथाक्रमें स्पष्टदशेतें । एव कार्यकारणयोगें अ-ष्टधा संमत्तें । सृष्टिक्रम होता जाला ॥ ७६ ॥ त्या सृष्टिक्रमामाजीं येक नवल । नरदेह खोंकरें जैसें फुटकें कावेल । असोनि नाना प्रकारीं करी ख्याल । जयाचिया अंशसत्तां ॥ ७७ ॥ असो ऐसा प्रणवरूप सर्वे-श्वर । जेथूनि उद्भवलें सचराचर । ह्मणौनिया विश्वाचें जो माहेर । सु-क्षमदर्ष्टी पाहाता ॥ ७८ ॥ मुख्य नाद बिंदु कळा ज्योति । स्वर वर्ण रूप रेखाकृति । या अष्टागीं ज्याची अभिव्यक्ति । स्वसवेद्य ईश्वर जो ॥ ७९ ॥ अकार उकार मकार अर्द्धमात्रा । या चतुष्पदांचा जो धात्रा । आणि चतुष्पदा गायत्रीचया पात्रा- । माजीं दुग्धरूप सांटवला जो ॥ ८० ॥ त्रिगुण त्रिस्थानेंसीं शोभला । पचदैवतीं परिवारला । ऐसा सर्वेश्वर जेणें न विचारूनि अव्हेरिला । तो अडनावाचा ब्राह्मण ॥८१॥ येथूनि उपासनेसी निश्चय जाला । सर्वेश्वर परिछिन्न वोळखिला । पुढें हा पंचदैवतरूप कैसा प्रगटला । तें सांगिजेल सप्तम कळापीं ॥ ८२ ॥ आतां पुढिलिये कीर्णीं प्रस्तुत । शूद्रवर्ण आणि अन्य याती समस्त । तैस्या चि स्त्रिया ज्या कां सार्थकोद्यत । त्याचा अनुक्रम सांगिजेल ॥८३॥ दिनकर रामींरामदासकृपा । स्वानुभवदिनकरीं लाधोनि सोपा । विचा-रितां निजउपासनास्वरूपा । सस्वरूपीं निजऐक्य ॥ ८४ ॥ स्वस्ति श्रीस्वानुभवदिनकरे गुरुशिष्यान्वये षष्टम कळापे पचउपासनानिश्चय प्रणवेश्वरस्वरूपवर्णनेनिरूपण नाम चतुर्थ कीर्ण प्रकाशः ॥ ४ ॥

---

१ क्षय पावणारें, नाशवत. २ जुनें मोडीचें भाडें ३ विश्रांतिस्थान. ४ पर-ब्रह्मापासून शब्दोत्पत्ति कशी झाली त्याचा क्रम दिला आहे ५ जिमाचें सार्थक करण्यास उद्युक्त झालेल्या. ६ पदवी, विश्रांतिस्थान, किंवा आश्रय.

॥ श्रीराम ॥

आतां पूर्वकीर्णप्रात बहळ । अच्युत लगडोनि सफळ । पांथिक-संतश्रांतांसी तुबळ । कैवल्यविश्राति देतसे ॥ १ ॥ पाहा अच्युत ऐसें कानीं चि ऐकतां । तनु मनु वेधलें निजस्वभावता । अर्थैक्यें निजकरीं स्पर्शतां । स्वानंदसुख येकसरें ॥ २ ॥ मग तें चि अच्युतफळ प्रणवरूप । निजज्ञानदृष्टीं पाहातां सुखरूप । रसस्वादन वैखरीं स्वानदपडेंप । परेस-हित लाधला ॥ ३ ॥ तें चि स्वसुखबोधामोदगंध- । ग्रहणें घ्राणांसीं सुख होय विविध । लाधलियां अच्युतछायासीतळबोध । निजविश्राति-दायक ॥ ४ ॥ एव पूर्वकीर्णांत अच्युत सुरस । लाधोनि पचविषयें शिष्य सपोर्शें । होऊनि बद्धांजुळीं श्रीगुरुस्वामींस । प्रार्थितसे निजभावें ॥ ५ ॥ जी जी स्वामी श्रीगुरुराया । शरणांगतजनकैवारिया । मोंजी ससृतिभ्राति फेडूनियां । मज अपैतें करीं ॥ ६ ॥ तरि देवा तुह्मीं जो सागितला उपाय । निजउपासनानिश्चयान्वय । तो जी यथार्थ होय निश्चय । माझिया हि प्रत्ययें ॥ ७ ॥ परतु स्वामी बोलिले वचन पूर्वीं । त्याची खती वाटतसे माझिये जीवीं । जे वर्णत्रई च हे उपासना पुजावी । येरा अधिकार चि नसे ॥ ८ ॥ तरि शूद्रवर्ण आणि अन्य याती । आणि स्त्रिया हि ज्या भजनायोग्य होती । तयांची काइसेन होय गति । हा सदेह गमला ॥ ९ ॥ ऐसा अशकारूप जव चतुर्दंत । उभारूनि शिष्यहृदयवनात । पुढारला तव अकस्मात । प्रबोधसिंह चमकला ॥ १० ॥ तो विचारचवेंडा उभारूनि । गुरुकृपाबळें सरसावोनि । कैसी सदेहगडयुग्मविदारणी । न कळतां कोण्हा करीतसे ॥ ११ ॥ तरि ब्राह्मण क्षत्री आणि वैश्य । यासी

---

१ बहुत. २ अच्युतावास=अजिराचें झाड, किंवा च्यूत=आम्रवृक्ष. ३ शोभा. ४ पुष्ट ५ माझी. ६ ऐतें, किंवा अपैतें=स्वाधीन ७ सार्थकोद्यता असा मागें शब्द आला आहे तो याच अर्थानें. ८ इंद्राचा ऐरावत. ९ पुढें होऊन बोलू लागला. १० विचाररूप पजा ११ शकारूपी गडस्थळें.

प्रणवसर्वेश्वरदर्शनसादृश्य । मग याचेया सेवनयोगें अवश्य । शूद्र हि पावन होतील ॥ १२ ॥ जेवि कां सुतें गुफिलियां पुष्पमाळा । सूत जाऊनि बैसे श्रीमताचिया गळां । तो चि दोरा होता पुष्पावेगळा । स्पर्श मानिती तयाचा ॥१३॥ का तें ब्राह्मणकंठींचें यज्ञोपवीत । असतां निर्दोष ब्रह्मग्रंथीसयुक्त । तें चि वेगळें होतां भंगता इत्थभूत । अपवित्र होतसे ॥१४॥ तेवि ब्राह्मण क्षत्री वैश्य हे त्रिवर्ण । याचिया सेवनें शूद्र पावन । यासी साक्ष भगवद्वचन । गीतेमाजीं बोलिलें ॥ १५ ॥ जे शूद्रें ब्राह्मणसेवा केली च करावी । नित्यनेमेंसीं सत्क्रिया आचरावी । परम प्रीतीं आवडी धरावी । ब्राह्मणाचे भजनीं ॥ १६ ॥ शूद्रें आपल्या कायाक्लेशेंकरूनि । अग्रारें करावीं ब्राह्मणांलागूनि । मठ मठिका आश्रम बांधोनि । समर्पावे उत्तमोत्तम ॥ १७ ॥ करावीं देवगृहें दीपमाळा । श्रौतस्मार्तस्थळें धर्मशाळा । नाना प्रकारींच्या पर्णशाळा । करूनि द्याव्या नूतन ॥ १८ ॥ ठाईं ठाईं सुंदर उदकस्थळें । तळीं कूप विहिरी निर्मळ जळें । वनवाटिका उपवनें सुसीतळें । करूनि द्यावीं उत्तमें ॥१९॥ करूनि कायाक्लेशें शेतकुळवाडी । ब्राह्मण संरक्षावे परम आवडीं । नाना धान्यें वस्त्रें लेणीं लुगडीं । ब्राह्मणांलागीं पुरवावीं ॥ २० ॥ आणि त्याचे निजआज्ञेमाजीं वर्त्तावें । कार्य सांगतील तें करावें । स्वयें सेवन करूनि करवावें । आणिकांकरवीं ॥ २१ ॥ नित्यनूतन सेवेचा हव्यास । करितां मानूं नये सहसा त्रास । ब्राह्मणपरिचर्या करितां जगदीश । संतुष्ट होय सर्वस्वें ॥ २२ ॥ या ब्राह्मणाचा अगाध जाणोनि महिमा । चरणसंवाहन करी परमात्मा । उरीं लात साहूनि श्रीवत्ससद्मा । मिरविजे भूषण अद्यापि ॥ २३ ॥ धर्मघरीं ब्राह्मणांचीं उचिष्टें काढिलीं । सकळ अवतारीं द्विजसेवा केली । ब्राह्मणवचनासाठीं

---

१ वरील तीन वर्णांच्या सेवेनें २ अस्पर्श, विटाळ. ३ परिचर्यात्मकं कर्म शूद्रस्यापि स्वभावजम् ॥ श्रीभगवद्गीता अ. १८-४४. ४ अग्रहार=देवब्राह्मणांस दिलेला ग्रामादिक त्याचें नाव. ५ आश्रम ६ सेवा ७ ब्राह्मणानें श्रीविष्णूच्या वक्षस्थळावर लत्ताप्रहार केल्यामुळें त्या ठिकाणीं जी खूण पडली तें च जणूं काय उपास्य देवतेचें मंदिर ह्मणून भूषण मानून ब्राह्मणाची थोरी गातात. ८ पांडवांच्या घरीं.

भक्तांची सोसिली । गर्भवासयातना ॥२४॥ युगानुयुगीं ब्राह्मणांलागीं । देवें अवतार घेऊनिया अव्यगी । नाना शरीरक्लेश सोसूनि दैत्यांलागीं । परोपरीं निर्दळिलें ॥ २५ ॥ ह्मणौनि सांगावया हें चि कारण । जे शूद्रें करावें ब्राह्मणसेवन । त्यासी ब्राह्मणसेवेवांचून । गति नाहीं सर्वथा ॥ २६ ॥ जन्हि ब्राह्मण असला हीन दीन । आनाचारी अत्यंत मळिन । तन्हि शूद्रासी सहसा पूज्य पावन । गुणदोषदर्शनीं नर्कप्राप्ति ॥ २७ ॥ जेवि मातेसी ह्मणता परद्वारिणी । पुत्रासी कारण होय नर्कपतनीं । तेवि ब्राह्मणाचिया गुणदोषदर्शनीं । प्राणिमात्रा नर्कपतन ॥ २८ ॥ त्यांचे गुणदोष सहसा न विचारून । करावें काया वाचा मनसा भजन । केलियां प्राणिमात्रीं होइजे पावन । न करितां होय अधोगति ॥ २९ ॥ ह्मणौनि शूद्र अथवा अन्य सकळ याती । येहीं ब्राह्मणीं भजावें अति प्रीतीं । ब्राह्मणेविण कोण्ही पूज्य त्रिजगतीं । आणिक न घडे सर्वथा ॥ ३० ॥ दृष्टीं देखतां चि दुरूनि ब्राह्मण । शूद्रें करावें साष्टांग नमन । आणि तीर्थप्रसादसेवन । नित्यनेमेसीं करावें ॥ ३१ ॥ शूद्रासी उपास्य दैवत ब्राह्मण । तें चि मंत्र यंत्र पूजाविधान । त्यासी ब्राह्मणाज्ञा मुख्य प्रमाण । अन्यथा ह्मणता नर्कप्राप्ति ॥३२॥ तैस्या चि अठरा हि पगड याती । लोमविलोमादि नाना संभूती । तया सकळ शास्त्राचिया संमत्तीं । ब्राह्मण पूज्य सर्वांसी ॥ ३३ ॥ ऐकोनि श्रोता निजभावें करी विनति । ह्मणे जी कोण त्या सांगिजो पगडयाती । तव वक्ता ह्मणे आइका अठरापगड याती । आणि उपयाती हि तितुक्या चि ॥ ३४ ॥ तरि तांबट पाथरट लोहार । सुतार सोनार आणि कासार । कुंभार देवैळक तथा धनगर । गौळी आणि लाडवाणी ॥३५॥ जैन कोष्टी साळी चितारी । माळी तेली तथा रंगारी । या अठराची उत्पन्नता शास्त्रांतरीं । यथाक्रमें सांगितलीसे ॥ ३६ ॥ तैस्या चि आणिक अठरा उपयाती । त्या हि सांगिजतील यथामतीं । भिल्ल कोळी मांग अंत्यज प्रभृति । चांडाळ आणि पुल्कस ॥ ३७ ॥

१ शंख, चक्र, गदा, पद्म यांनीं युक्त असें पूर्णस्वरूप धारण करून. २ उत्पत्ति ३ गुरव ४ लाडसके वाणी ५ महार ६ बाप शूद्र व आई ब्राह्मण यांपासून झालेली प्रजा

जीनगर सल्तानगर चर्मक । डोहर भाट बुरुड रजक । दांगट मोचे-करी खाटिक । लोणारी आणि कैकाडी ॥ ३८ ॥ याहिवेगळ्या देशपरत्वें नाना याती । तैसे चि यवनामाजीं अनेक भेद असती । दर्शनें उपदर्शनें आणि प्रभृति । छेतिसा पाषाडाची ॥ ३९ ॥ या इतुकियांस हि ब्राह्मण श्रेष्ठ । ब्राह्मणांसी इतुके हि ठाउके स्पष्ट । ह्मणौनि ब्राह्मणेविण यांसी वरिष्ठ । कोण्ही हि नसे कदापि ॥ ४० ॥ ह्मणौनि ब्राह्मणाची अवज्ञा करून । जे आणिकाचें करिती पूजन भजन । त्यासी इहलोकीं दारिद्र व्यथा का होय मरण । अतीं नरकप्राप्ति निश्चयें ॥ ४१ ॥ तैसें चि स्त्रियेसी केवळ दैवत भर्त्तार । तीर्थ व्रत क्षेत्र देव तो चि साचार । भर्त्तारसेवेवांचूनि नर्क अघोर । युगानुयुगीं स्त्रियेसी ॥ ४२ ॥ जे स्त्री पतिसेवेसी निजभावें सादर । तयेचें चरणरज वंदिती सुरवर । प्रत्यक्ष ब्रह्मा आणि हरि हर । जालीं बाळकें अनुसूयेचीं ॥ ४३ ॥ ज्या नित्य पतिसेवापरायणी । त्यांची कीर्ति वाखाणे शास्त्रीं पुराणीं । ज्यांच्या नामस्मरणें पापां पळणी । दिगांताबाहेरी होतसे ॥ ४४ ॥ ह्मणौनि ज्या सुवासिनी सभर्त्तृका । तेहीं अत्यादरें सेवावें निजनायका । तेणेंविण न भजावें सहसा आणिकां । कायावाचामनेंसीं ॥ ४५ ॥ सकळ तीर्थ व्रत क्षेत्र गुरु देव । स्त्रियेसी निजभर्तार चि स्वयेंमेव । त्याविण आणिकें स्थळीं धरितां भाव । नर्की पतन निश्चयें ॥ ४६ ॥ सकामता अथवा निष्कामता । स्त्रियेसी भर्तार चि पूज्य तत्वता । यद्यपि ज्ञानप्राप्ति व्हावी ऐसें वाटलें चित्ता । तरि भर्त्तारआज्ञा गुरु सेव्य ॥ ४७ ॥ आहे निजपतीसी आत्मज्ञानप्राप्ति । परतु नाहीं जरि प्रबोधशक्ति । तरि भर्तारआज्ञेनें यथानिगुति । ज्ञानविचार करावा ॥ ४८ ॥

---

१ सलतान=सैन्यभार, सडीफौज. २ ढोर=कातडें रगविणारे चांभाराची एक जात ३ दाग किंवा डाग=वन, अरण्य. ४ कोळशाचें किंवा चुन्याचें काम करणारी एक जात. ५ अहल्या द्रौपदी सीता तारा मदोदरी तथा । पंचक ना स्मरेन्नित्य महापातकनाशनम् ॥ यास अनुलक्षून हीं दोन चरणें असावीत. ६ आमला आपण. ७ ज्ञानदान करण्याची.

यद्यपि भर्तारासी नसली ज्ञानीं श्रद्धा । आणि स्त्रियेसी सत्संगें उपजली मेधा । तरि भर्तारआज्ञेवाचूनि कदां । ज्ञानविचार न करावा ॥ ४९ ॥ कदाचित् भर्तार असलिया दुष्टबुद्धि । तरि स्त्रियेनें आचरावी पुरश्चरणविधि । भर्तारासी उपजऊनि सद्बुद्धि । ज्ञानप्राप्ति साधावी ॥ ५० ॥ परि भर्तारेंविना करितां ज्ञानप्राप्ति । स्त्रियेसी सहसा होय अधोगति । ह्मणौनि भर्तारसेवेवाचूनि उत्तम गति । स्त्रियेसी सर्वथा घडेना ॥५१॥ येथें ज्ञानाची अवज्ञा दिसोनि आली । जे ज्ञानापरिस सेवा चि थोर जोली । ऐसी करितां सहसा बोली । दूषण उत्पन्न होईल ॥ ५२ ॥ कां जे भजनावाचूनि ज्ञानप्राप्ति । सर्वथा न घडे पैं निश्चितीं । आधीं जरि घडे भगवद्भक्ति । तरि ज्ञान साधे सहजें चि ॥ ५३ ॥ ह्मणौनि यथाशास्त्रें आचरणीय भजन । तें आचरावें यथाविधीकरून । ह्मणिजे अवश्य साधेल आत्मज्ञान । स्वधर्मकर्म आचरता ॥ ५४ ॥ तेथ मुख्य पतिव्रतेचें स्वधर्माचरण । त्रिशुद्धि करावें भर्तारसेवन । तें चि तियेचें विधिउपासन । तेणें चि होय ज्ञानप्राप्ति ॥ ५५ ॥ यानतर विधवा स्त्री जे कां तरुण । तिनें निष्काम करावें तीर्थाटण । तीर्थाटणें निजदोषक्षाळण । जन्मांतरींचें करावें ॥ ५६ ॥ ऐसेनि जालिया कामनिवृत्ति । मग उत्तम धरावी सत्संगति । स्वधर्माचरणें भगवद्भक्ति । उत्तरोत्तर करावी ॥५७॥ भगवद्भजनें ज्ञानप्राप्ति । साधूनि करावी गुरुभक्ति । स्वधर्माचरणें न्यायनीतीं । जन्मसार्थक करावें ॥ ५८ ॥ तैसें चि शूद्र अथवा अन्य याती । येहीं पाहोनि उत्तम धरावी सत्संगति । धर्मन्यायें यथाशास्त्रनीतीं । भगवद्भजन करावें ॥ ५९ ॥ सर्वत्रें ब्राह्मणासी अखंड भजावें ।

---

१ आवड. २ ही शंका आहे; इचें समाधान असें केलें आहे उत्तम गति प्राप्त होण्यास मूळस्वरूपाचें ज्ञान ही च श्रेष्ठ पायरी आहे; परंतु त्या ठिकाणीं पोंचण्यास साधनभूत असे भजन, पूजन, हे मार्ग आहेत पुरुषास ज्याप्रमाणें सगुण मूर्तीचें ध्यान, भजन, पूजन इत्यादिकेंकरून ज्ञानप्राप्ति होते असें सांगितलें आहे, त्याचप्रमाणें स्त्रियांचा देव ह्मणजे त्यांचा पति याची सेवा, भजन, पूजन, केल्यानें च त्यांना ज्ञानप्राप्ति होईल असें वर सांगितलें आहे. तसेच शूद्र व अतिशूद्र यांना ब्राह्मण हेंच दैवत व त्याचीच सेवा, पूजा केल्यानें त्याचा उद्धार होईल. ३ निश्चयेंकरून.

परंतु गुरुत्वाचें अधिष्ठान शोधावें । सद्गुरु सत्सेव्य पाहोनि जावें । शरण तयासी ॥ ६० ॥ ब्राह्मण असोनि उत्तमलक्षणयुक्त । भक्तिज्ञानविवेकवैराग्यवत । तेथें होऊनियां अति विनित । भक्तिभावें शरण ॥६१॥ अगर्वेता[1] होऊनि करावें सेवन । गुरुआज्ञेचें प्रतिपाळण । तीर्थ प्रसाद नित्य प्राशन । परिचर्या[2] करावी ॥ ६२ ॥ गुरूपुढें न बोलावें उच्छृंखळ[3] । न दाखवावें प्रौढी बळ । अति नम्र होऊनि असावें केवळ । हीन दीन अनन्य ॥ ६३ ॥ कोण्हीयेकें सद्गुरूसी अनन्य । असतां त्रैलोक्यीं होइजे धन्य । इहपरलोकीं अति मान्य । पूर्वजांसहित होइजे ॥ ६४ ॥ सद्गुरूसि गेलियां शरण । तत्काळ चुके जन्ममरण । सकळ उपासनेचें उपासन । श्रीगुरुदैवत प्रत्यक्ष ॥ ६५ ॥ ऐसें बोलतक्षणीं श्रीगुरुरावो । शिष्याचिये मनीं परम उत्सावो । अत्यंत धरूनियां सद्भावो । गुरुपदीं विनटला ॥ ६६ ॥ ह्मणे देवादिदेवा भक्तवत्सला । करुणाकरा जी स्नेहाळा । माझें अज्ञानदरिद्र दूरि करूनि हेळों[4] । ज्ञानसाम्राज्यपद मज द्यावें ॥ ६७ ॥ प्रस्तुत देव बोलिलें वचन । जे श्रीगुरु सकळ उपासनेचें उपासन । तरि जी सकळ उपासना त्या कोण । मज संक्षेपें सांगिजो जी ॥ ६८ ॥ ऐसें ऐकतां निजशिष्यवचन । श्रीगुरु बोलिजे सुखावोन । तरि तें चि सांगिजेल निरूपण । पुढिलिये कळापीं यथान्वयें ॥ ६९ ॥ येथें चतुर्वर्ण च्यान्ही आश्रम । स्त्रिया आणि सर्व यातिक्रम । यांचा सांगितला उपासनासभ्रम । अधिकारपरत्वें ॥ ७० ॥ दिनकर ह्मणे रामदास । करूनियां उपासनानिश्चयास । पुढें उपासनारहस्यविधीस । यथाक्रमें सांगिजेल ॥ ७१ ॥ स्वस्ति श्रीस्वानुभवदिनकरे गुरुशिष्यान्वये पष्ठम कळापे स्त्रीशूद्रादि नानायातीतरणोपायनिरूपण नाम पचम कीर्ण प्रकाशः ॥ ५ ॥ येकूण वोवीसंख्या ३४२

---

१ अहंकार सोडून. २ सेवा. ३ उतावीळ किंवा अविचारीपणानें. ४ सत्वर.

## ॥ उपासनारहस्य कळाप सप्तम ॥ ७ ॥

॥ श्रीरघुनाथायनमः ॥

ॐ नमो जी स्वानुभवदिनकर । सांगितला उपासनानिश्चय साचार । यानंतर सांगिजो उपासनारहस्यसार । प्रणवरूप पंचधा ॥ १ ॥ तेथ पूर्वकळापकीर्णप्रांतअस्तांचळीं । उपासनानिश्चय तो चि अंशमाळी । स्वानुभवदिनकररूप दिग्मंडळीं । सतेज प्रभा सहजें ॥ २ ॥ तें चि वक्षमाणकीर्णउदयाचळीं । अस्तोदयरहित निजतेजनव्हाळी । स्वानुभवदिनकरीं निजसुखसमेळीं । ॐकारसूर्य उदेला ॥ ३ ॥ तया प्रणवसूर्याचिया प्रकाशें । अज्ञानतम सहजें निरशे । ज्ञानप्रभा फांकोनि दिवसें । साम्राज्यसुख होय ॥ ४ ॥ ईषणा वासना कामना कल्पना । तृष्णादि चांदणिया माळवलिया नाना । हृत्कमळिनी विकाशोनि भिन्ना । जीवशिवभ्रमरीं ऐक्य ॥ ५ ॥ अज्ञाननिशीमाजीं अहपणें तवेंकें । अंडीत होतीं भक्तिभावचक्रवाकें । तें ऐक्यासी येऊनि निजस्वानदसुखें । समरसलीं स्वरूपीं ॥ ६ ॥ ज्याचा प्रकाश आब्रह्मपर्यंत । सचराचर व्यापिलें अणुरेणात । निजतेजें देदिप्यमान विलसत । स्वानुभवदिनकर जो ॥ ७ ॥ बाळदशा तल्लक्षण जे पूर्व । तेथें प्रबोधअरुणोदय होतां चि अपूर्व । अविद्यामय आधारें हारपोनि सर्व । दिगांत लघी अज्ञानेंसीं ॥ ८ ॥ तेथ सद्विद्येचिया आरक्त प्रभा । दशदिशा उजळलिया स्वयंभा । माजीं श्रीगुरुकृपेचिया निजतेजआभा । अस्तोदयरहित प्रकटे ॥ ९ ॥ निजधैर्याचा जुपूनि मर्गजरथ । स्मरणसर्परज्जुबंधनीं सुरथ । वर्णत्रय त्याच्हि आश्रम मिळोनि कृतार्थ । सप्तमुख अश्व योजिला ॥ १० ॥ उरला जो कां चौथा शूद्रवर्ण । तो ठेविला यांचे परिचर्येलागून । परिचर्या करितां होऊनि पावन । स्वानुभवें दिनकरीं शोभला ॥ ११ ॥ असो प्रवृत्तीचें येक चक्र येकी-

---

१ पश्चिम क्षितिजावर. २ अंशुमाळी=सूर्य ३ प्रांत. ४ इच्छा. ५ वेगानें, धैर्यानें. ६ आरडत, ७ आभा=प्रतिबिंब. ८ मौल्यवान पाषाणाचा रथ

कडे निजरथा । दुसरा कणाग्र निवृत्तिमेरूचया माथा । प्रबोधअरुण सारथी ऐसिया सुरथा । समतायोगें चालवी ॥ १२ ॥ निर्मूनि धर्म अर्थ काम मोक्ष । चहूखांबीं चवरंडोल प्रत्यक्ष । माजीं आसन रचिलें अपरोक्ष । चतुर्विधवाचेचें ॥ १३ ॥ परा पश्यति मध्यमा वैखरी । इया जाणिजती वाचा च्यारि । तेथ नाभिस्थानामाझारीं । प्रथम परेचा उद्भव ॥ १४ ॥ पश्यतीचें हृदयस्थान । कंठगत मध्यमेचें अवसान । वैखरी बोलिजे परिच्छिन्न । जिव्हास्थानासी पैं ॥ १५ ॥ तेथ प्रणवाचीं विचारितां अष्टांगें । नाभिस्थानींहूनि उमटे निजांगें । त्यासी नाद बोलिजे जो सयोगें । ध्वनिसहित निर्नाद ॥ १६ ॥ एवं निनादेंसीं अर्द्धमात्रात्मक । ध्वनि प्रकटे जो सम्यक । तो हृदय कंठ भेदूनि निष्टंक । मूर्ध्नीसी उमटला ॥ १७ ॥ प्रथम नाभिस्थानीं उद्भव जाला । त्यासी नाद ऐसा संकेत बोलिला । मग पश्यतीमाजीं हृदयस्थानीं उमटला । उकारध्वनि शब्द ॥ १८ ॥ तंव उकारामागें अकार उमटे । तेथ नाद बिंदु दोहींच्या सम नेहटें । कंठगत शब्दध्वनि प्रकटे । मध्यमा वाचेमाजीं ॥ १९ ॥ त्यासी कळा ऐसी संज्ञा बोलिजे । मग वैखरीमाजीं प्रत्यक्ष शब्द प्रकटिजे । कंठापासूनि वोष्ठपर्यंत ध्वनि उपजे । त्यासी ज्योति ह्मणावें ॥ २० ॥ मग दोहीं वोष्ठीं मिळतां मकार । उच्चार होतां चि उमटे ॐकार । तेथ प्रत्यक्षरूप जो जाला उच्चार । त्यासी ह्मणावें पैं रूप ॥ २१ ॥ एवं नाभिपासूनि वोष्ठपर्यंत । पंचांगेंसीं प्रकटला साद्यंत । नाद बिंदु कळा ज्योति रूप मिळोनि समस्त । पांच हि अंगें उच्चार ॥ २२ ॥ मग अकार उकार मकारेंसीं । पृथक वर्ण त्रिरेखेंसीं । तेथ रेखेचिया प्रकारासी । सहज चि देखिलें ॥ २३ ॥ जेथें रेखेसी ठाव जाला । तेथें स्वरवर्णी आकारला । एवं अष्टांगेंसीं विस्तारला । सचराचर आघवें ॥२४॥ नाभिपासूनि उद्भव जाला । मुखीं शब्दोच्चारीं प्रकटला । निजाकारें

---

१ चांदवा, छत, मंडपी. २ नाद, बिंदु, कळा, ज्योति, रूप, रेखा, स्वरवर्ण, आकृति हीं आठ अंगें. ३ आवाज. ४ पडशब्द. ५ त्यालाच बिंदु ह्मणतात. ६ एकाला एक चिकटून.

आकृतीसहित उदेला । निजकर कीर्णमंडित ॥ २५ ॥ असो ऐसा एक-चक्ररथावरी । पुरुषार्थचवैरडोलामाझारीं । चढु वाचासी अति कुसरीं । रचूनि आसन ॥ २६ ॥ वारि निजतेजें देदिप्यमान । स्वयप्रकाशेंसीं आरोहण । स्वानुभवदिनकररूप संपूर्ण । ॐकारसूर्य प्रगटला ॥ २७ ॥ पुढें ध्वजास्तभीं शब्दब्रह्मरूपें । चतुर्वेदनिशाण तळपे । श्रुति स्मृति उपनिषदें सभवतीं साक्षपें । लघु लघु निशाणें तळपती ॥ २८ ॥ तेथ निवृत्तिमेरूचिया माथा । कैवल्यअढळपदीं गुरुनाथा । प्रदक्षिणामिसें चालता रथा । प्रवृत्तिचक्रीं घडघडाट ॥ २९ ॥ अति सत्वर त्वरा चालता रथ । मनपवन कुंठित जेथ । ऐसा युगकल्पीं पाहीजे तत्र जेथींचा तेथ । रतिमात्र चळला न दिसे ॥ ३० ॥ ऐसिया प्रणवसूर्याचें घेतां दर्शन । आकल्प निरसे जन्ममरण । वेद शास्त्रें स्मृति पुराणें । महिमा वर्णिती जयाचा ॥ ३१ ॥ ज्याचा विचारिता साकल्य अर्थ । आब्रह्मादि लाभे शुद्ध परमार्थ । उपासना ज्याची कृतार्थ । शरणागतां करीतसे ॥ ३२ ॥ गायत्रीमाजीं ज्याचें रहस्य । द्वादशार्थेंसीं परम सौरस्य । परब्रह्मीं होय सामरस्य । ज्याचेनि योगें जडजीवा ॥ ३३ ॥ अस्तोदयरहित ज्याचा नित्योदय । स्वरवर्णकीर्णीं जो प्रकाशमय । स्वानुभवदिनकर हें आदित्यहृदय । संपूर्ण जयाचें ॥ ३४ ॥ ऐसिया प्रणवसूर्याची उपासना । सोडूनि अन्य पदार्थ किंबहुना । ह्मणौनि मुद्राध्यानविधाना । याचिया विचारावें ॥ ३५ ॥ येणेंकरूनि सकळ कृतार्थता । इहपरलोक सार्थकरूप तत्वता । हें आधीं साधूनि मग स्वभावता । भजन करावें या सूर्याचें ॥ ३६ ॥ ह्मणिजे तें सौरपण खरेंखुरें । ससारसार्थक जालें पुरे । त्रिकाळसध्येमाजीं परमादरें । उपासना नित्य जयाची ॥ ३७ ॥ ज्याचें आचरतां पुरश्चरण । होतसे अनंत जन्माचें दुरितें दहन । ब्रह्मप्राप्ति होऊनिया गहन । निजमोक्ष तत्काळ ॥ ३८ ॥ स्वानुभव-

---

१ प्रणवसूर्य २ मडपी ३ चातुर्यानें ४ शोभतें ५ पाहिलें तर ६ ऐक्यभाव, सुरसत्व ७ यापेक्षा आणखी जास्त काय करावयास पाहिजे? ८ खेचऱ्यादिक चार मुद्रा त्या. ९ निर्गुण स्वरूपाचा शोध घेऊन. १० पाप.

दिनकरीं याचें उपासन । दिनकरें रामदासीं विचारून । निजमोक्ष-प्राप्तीचें विंदान । गुरुकृपाबळें साधिलें ॥ ३९ ॥ तैसा चि प्रणवरूप जो का आद्य गणेश । आद्यत पाहातां होइजे निर्दोष । जो गजनर-वेष स्वयप्रकाश । स्वरवर्णीं आकारला ॥ ४० ॥ मकार तो चि शोभे मस्तक । अकार उकार कुंभद्वय सम्यक । अर्द्धमात्रेचीं बिंदुलें निष्टंक । शुंडादंड वक्रत्वें ॥ ४१ ॥ अकारद्वय शोभले द्विकर्ण । इकारद्वय सांनु नेत्र विशीर्ण । उकारद्वय नासापुटें गहन । ऋकारद्वय गल्लयुग्में ॥४२॥ लृकारद्वयें मुखताळु बरवटें । एऐकारें शोभे वोष्टपुट । ओऔकारें सार्द्ध एकदंत वरिष्ट । येक गुप्त येक प्रगट पैं ॥ ४३ ॥ अनुस्वारें शोभे कंबुकंठ । विसर्गें रसना बरवट । कपचवर्गें शोभे उत्कट । स्कंदोन्नत चतुर्भुज ॥ ४४ ॥ चवर्गें पद्माकुश कुठार क्षीर मोदकः। टवर्गें स्तनद्वय उदर नाभि सुंटक । तवर्गें पुष्टिस्थान जघन गुह्यद्वय सम्यक । निजशोभा शोभले ॥ ४५ ॥ उरु जानुं जघें गुल्फें पदद्वय । मिळोनि पवर्ग यवर्ग योजले यथान्वय । भाळचद्र सिंधुर गधाक्षत सकारत्रय । हकारें उदिर वहन ॥ ४६ ॥ ळकारेंसीं दुर्वायुग्म समर्पिलें । ज्ञकारें निजभक्तगण परिवारले । क्षकारें षोडशोपचार योजले । अत्र गंधनैवेद्येंसीं ॥ ४७ ॥ ऐसा आद्यत श्रीमहागणपती । ॐकाररूपें विस्तारला त्रिजगतीं । ध्यान मुद्रा न्यास बीजें सकळ शोभती । याचि या निजस्मरणें ॥ ४८ ॥ ज्याचें आद्यत प्रथम घेता दर्शन । अनत जन्माचें होय दुरित दहन । उपासना विचारूनि चालवितां जन्ममरण । समूळ नाशे जीवाचें ॥ ४९ ॥ सबीजेंसीं ध्यान न्यास विचारितां । अतर्लक्ष मुद्रा साधे स्वभावता । परब्रह्मसंवित्ति प्राप्त होऊनि तत्वता । साम्राज्यसुख लाभे ॥ ५० ॥ मग तदंगें चि निजभावें तदनुसार । गणपतीचे जाले जे येकवीस अवतार । त्यामाजीं कोण्हीयेकें ध्यान लक्षूनि तत्पर । सगुण-

---

१ लक्षण. २ मस्तकावरील दोन्ही बाजूचीं दोन गंडस्थळें. ३ अ व आ मिळून; न्हस्व, दीर्घ ४ लहान. ५ निरनिराळे. ६ गाल. ७ सुरेख. ८ शखाकृति; कंठ. ९ सुचिन्हित. १० गुडघे. ११ पोटऱ्या. १२ घोटे. १३ ब्रह्मज्ञान. १४ कोणतें हि.

योगें भजावें ॥ ५१ ॥ निर्गुणप्राप्तीविण सगुण भजन । तें जैसें शिरें-वीण शरीर अप्रमाण । किंवा आत्मारामेंवीण[1] निःकारण । अवयवेंसीं प्रकृति ॥ ५२ ॥ तेवि प्रणवगणपतीवाचून । सर्व हि जाणिजे निःकारण । ज्याचें सर्वारंभीं स्मरण भजन । करिता सर्व हि सफळ ॥ ५३ ॥ वेद शास्त्र पुराणें स्मृति । नाना काव्यंकळाप[2] संमति[3] । सकळ हि साजिरीं ज्याकारितां होती । प्रथम आधीं उच्चार ज्याचा ॥ ५४ ॥ ज्याचिया निजस्मरणमात्रें । तीर्थें क्षेत्रें व्रतें उद्यापनें पवित्रें । प्रथमात्र पावन मूळ-मंत्रें । उच्चार ज्याचा पुण्यपावन ॥ ५५ ॥ त्या प्रणवगणपतीचें निज-उपासन । दिनकरें रामदासीं विचारून । स्वानुभवदिनकरीं परिछिन्न । अनुभव लाभे तयाचा ॥ ५६ ॥ स्वस्ति श्रीस्वानुभवदिनकरे गुरुशि-ष्यान्वये सप्तम कळापे सूर्यगणेशउपासनारहस्यनिरूपण नाम प्रथम कीर्ण प्रकाशः ॥ १ ॥

---

॥ श्रीराम ॥

आतां यानंतर आद्यशक्ति । अर्द्धमात्रात्मक जे प्रणवसंवित्ति । जाणीवरूपें केवळ ज्ञप्ति । प्रथम स्फुरण ॥ १ ॥ प्रथम नाद बिंदु कळा ज्योति । रूप रेखा स्वरवर्णाकृति । या अष्टांगेंसीं जे त्रिजगती- । माजीं विस्तारलीसे ॥ २ ॥ जे मूळमाया सर्वसाक्षिणी । इच्छाशक्ति गुणक्षोभिणी । त्रिगुण आणि पंचभूतें जयेपासुनी । विस्तारलीं सकळ ॥ ३ ॥ मुख्य श्रीविद्या आणि महाविद्या । ह्या जियेच्या परिचारिका सद्या । अनंत ब्रह्मांडाचिया गद्या । रची खची जे स्वलीळां ॥ ४ ॥ चौसष्टी कोटी चामुंडिणी । छपनकोटी कात्यायनी । इया दासी जयेच्या सकळ होऊनि । कामारिंपणें[6] वर्तती ॥ ५ ॥ जिच्या विचारिता मंत्रमाळिका । असंभाव्यपणें असती अनेका । गणना करितां शेषादिका । मति न

---

१ जीवात्मा नसला तर. २ समुदाय. निरनिराळे काव्यग्रंथ. ३ अनुमोदन. ४ संपत्ति अथवा प्रपंचसंबंधी व पारमार्थिक. ५ तत्परतेनें किंवा पूर्णपणें रचिलेलीं. ६ सेवकाप्रमाणें, कामारें=सेवक.

पुरे सर्वथा ॥ ६ ॥ वेद जयेचा बंदीजन । अखंड करी गुणकीर्तन । शास्त्रें परस्परें संवादोन । गोष्टी सांगती जियेच्या ॥ ७ ॥ थोर थोर ऋषि मुनि सुर सिद्ध । शंकरादिक योगी जे प्रसिद्ध । जयेच्या चर्चा करितां विविध । आयुष्य न पुरे ॥ ८ ॥ पृथ्वीचे [1]रंजरेणु गणवतील । वायु हि मोटेसी बांधवेल । गगनाचें अंगुळप्रमाण होईल । मोजितां कदाचित ॥ ९ ॥ मेरूस हि मिळेल कांटाळें । आज्ञा हि पाळिजे कळिकाळें । हा सूर्य हि येके वेळे । पश्चिमे उगवेल ॥ १० ॥ आणिक हि जें जें न घडतें । घडों शकेल कदापि [2]निरुतें । परंतु यियेच्या अवतारगणनेतें । केलें न जाय कदापि ॥ ११ ॥ सांगतां गुणानुवाद कीर्तन । ब्रह्मादि हरिहरासी पडिलें मौन । मां इतराची तेथ कथा कोण । सुरसिद्धमानवादि ॥ १२ ॥ ऐसी अर्द्धमात्रा जे आदिजननी । वेदमाता विश्वसंजीवनी । अनंत ब्रह्मांडें जयेचेनि । आकारासी आलीं ॥ १३ ॥ मंत्रमाळा जयेच्या असंख्य । त्रिसंध्यारूप सविस्तर [3]आख्यें । सकळशास्त्रेंसीं वेदांत [4]सांख्य । बाखाणिती जयेतें ॥ १४ ॥ गायत्रीरूप जे आद्यंत । द्वादशार्थेंसीं विलसत । अकार उकार मकार उद्भवत । स्वरवर्णेंसीं जयेपासुनी ॥ १५ ॥ त्रिकोण षट्कोणादि यंत्रें । जियेकरिता होती पवित्रें । सामर्थ्यवंत [6]बीजमात्रें । सन्निधानें जयेच्या ॥ १६ ॥ सोळा स्वर पंचतीस वर्ण । मिळोनि बीजमात्राचें प्रावर्ण । ते सकळ हि बीजमात्रें सवर्ण । जयेकरितां मिरेती ॥ १७ ॥ जितुके अवतार तितुकीं ध्यानें । पृथकाकारें जपविधानें । मंत्र न्यास मुद्रा आसनें । वेगळवेगळीं ॥१८॥ येकाक्षरापासुनी सहस्रपर्यंत । मंत्र असती असंख्यात । तितुके हि पृथक्छंदें अपरमित । गणना न करवे ॥ १९ ॥ जितुके अवतार तितुक्या शक्ति । तितुकीं नामें वेगळीं असती । पृथक्रूपें कार्यसंपत्ति । वेगळवेगळ्या ॥ २० ॥ वि-

---

१ रजाचे रेणु ह्मणजे बारीक कण, कल्पनातीत सूक्ष्म कण २ उपमा. ३ खरोखर. ४ नावानें प्रसिद्ध. ५ विचार किंवा सांख्यशास्त्र, ६ एखाद्या मंत्रांतील किंवा तंत्रांतील महत्वाचें अक्षर

श्वनियंती विश्वयोनी । विश्व संभवलें जयेपासुनी । चौऱ्यासी लक्ष जीवयोनी । जयेचे अंश ॥ २१ ॥ जयेवेगळे सचराचरीं । न दिसे अणुमात्र दुसरी परी । परमात्मयासीं ऐक्य असोनि खरी । जे दुसरेपणें वर्ते ॥ २२ ॥ जितुका आकार तितुका इयेचा । व्यापला अंतर्बाह्य इणें चि साचा । पाहातां केवळ स्थावरजंगमाचा । मूळाश्रय चि हे ॥ २३ ॥ शरीरमात्रीं जे व्यापक । जाणीवरूपें सकळ चाळक । जीवमात्राची पाळक । येकांशरूपें जे ॥२४॥ अंत:कर्णरूपें जे चेते अंतरीं । मनोरूपें जे संकल्प विकल्प करी । बुद्धिरूपें निश्चय धरी । दृढ कार्याचा ॥ २५ ॥ चित्तरूपें चाळणा करी । कार्य साधलियां प्रवर्ते अहंकारीं । व्यानांशें सर्व शरीरीं । हात पाय चाळवी ॥ २६ ॥ समानांशें नाभिस्थानीं बैसे । मग पची जठराग्नीचिये मुसे । जेथील तेथें पावऊनि वेळसे । कामक्रोधाचे हि करी ॥ २७ ॥ सवें चि प्राणांशें बैसोनि हृदईं । सुखदु:खाची करी असैमाई । उदानांशें शब्दोच्चारनवाई । कंठीं बैसोनि करी ॥२८॥ अपानांशें मळमूत्रोत्सर्जन । करी अधारचक्रीं बैसोन । श्रोत्रद्वारें शब्द ऐकोन । वाचें देणें उत्तर ॥ २९ ॥ त्वचेनें स्पर्शविषय घेऊनि । हस्तीं करी कार्य करणी । डोळां रूपविषय पाहोनि । पदीं जाणें पदार्थपर्यंत ॥ ३० ॥ जिव्हाद्वारें षडरस चाखे । कटु तिक्षण मधुर वोळखे । गंधविषय घेऊनि तया नासिकें । गुदोपस्थीं उत्सर्जनरती ॥ ३१ ॥ ऐसें सकळ हि कार्यकारणरूपें । शरीरमात्रीं चाळक पाळक सौक्षपें । करूनि आपण वेगळी असे सक्षेपें । सर्वसाक्षिणी ॥ ३२ ॥ सर्वांतरीं असोनि सर्वांवेगळी । तुर्यारूप जे सकळाहूनि आगळी । जिचिया स्वरूपाची नव्हाळी । अनुभवी जाणती ॥ ३३ ॥ योगी जयेचा लाधोनि आधार । मनपवनेंसीं करिती व्यापार । षड्चक्रें भेदूनि ब्रह्मरंध्र । गिवसू

---

१ उपद्रव, फेरा झपाटा. २ हृदयात न समावणारें तें बाहेर टाकी ३ प्रयत्नानें, उत्कंठेनें. ४ अधिक. ५ प्राप्ति. ६ मूलाधार, स्वाधिष्ठान, मणिपूर, अनाहत, विशुद्ध, व आज्ञा अथवा अग्निचक्र. शरीरांतील वायूस या सहा चक्रातून कोंडीत कोंडीत मस्तकांतील शेवटचें जें ब्रह्मरंध्र तेथपर्यंत आणून समाधिसुखाचा अनुभव घेतात.

पाहाती ॥ ३४ ॥ जे औठा वटीं औठे वळनीं । निजेली असोनि जागेपणीं । शरीरीं ज्ञप्तिरूप कुंडलिनी । जयेसी ह्मणती ॥ ३५ ॥ अनत ब्रह्माडाची माळा । स्वयें रची खची जे स्वलीळा । उत्पत्ति स्थिति संव्हार काळा । स्वभावें प्रेरक जे ॥ ३६ ॥ गायत्री सावित्री उमा रमा । इया थोरावल्या जयेच्या गरिमा । पृथ्वी आप तेज वायु व्योमा । सामर्थ्य जयेचें ॥ ३७ ॥ सत्व रज तम हे त्रिगुण । जयेच्या अशें विराजमान । सकळ चराचरीं कार्यकारण— । रूपें जे व्यापली ॥ ३८ ॥ असो ऐसी आद्या शक्ति । तियेसी कोण्ही न विचारिती । आणि मध्यें चि थोतांडें उठविती । नाना प्रकारींचीं ॥ ३९ ॥ कोण्ही उपासिती बाळा बगळा । कोण्हा उच्छिष्टचांडाळीचा सोहळा । नाना जाती मिळोनि अन्योन्य कवळीं । येकंकार करिती ॥ ४० ॥ वनमाळिनी मेसको मैराळी । शिवा भवानी कंकाळी । काळिका काळरात्री भद्रकाळी । बनशकरी मातांगी ॥ ४१ ॥ कवळाॅर्णव क्रिया अघोरमत्र । शाक्तागम प्रेतसाधन विचित्र । भगमाळिनी-पुजा स्वतंत्र । मध्यरात्रीसमई ॥ ४२ ॥ कुंभपुजा कचुंकीविधान । अघोरक्रिया मद्यपान । आणि त्रिपुरसुदरीपूजन । कामाक्षा विधी ॥ ४३ ॥ बाह्याकारें शाक्तनाम मिरविती । आणि कर्म करू नये तें करिती । अभक्ष भक्षूनि अगिकारिती । मद्य आणि उन्मत्त द्रव्यें ॥ ४४ ॥ भगपूजा-मिसें परदारा भोगिती । कवळमिसें भ्रष्टाकार करिती । परस्त्रीहातीं स्वलिंगपूजा करविती । नाना विषयभोगार्थ ॥ ४५ ॥ मध्यरात्रीसमई कालिकामिसें । नैवेद्यार्थ आणविती नाना मासें । मग आपण भक्षिती प्रसादमिसें । शिस्नोदरपरायण ॥ ४६ ॥ शूद्रासी ब्राह्मण नमस्कार करिती । शूद्रमुखींचा तांबोल स्वीकारिती । अवघें येक चि आहे ह्मणती । भेद नाहीं कोठें हि ॥ ४७ ॥ असो सागावया हें चि कारण । जे

---

१ भुजगाकार—नागमोडीच्या आकारानें—शयन करणारी 'कुंडलिनी' नांवाची नाभिचक्राच्या मुळाशी वासनारूप शक्ति आहे २ निरनिराळ्या क्षुद्र देवता ३ एकत्रपणा ४ घास काढण्याची. ५ दुसऱ्यावरून चोळी उतरवून टाकण्याची क्षुद्र क्रिया.

मुळींचा शाक्तागम न विचारून। मध्यें चि बड पाषांड करून। न करावें तें करिती ॥ ४८ ॥ पाहा अर्द्धमात्रात्मक जे आदिशक्ति। अनादि जे साक्षात् ब्रह्मसंवित्ति। तियेसी न भजोनि बडें स्थापिती। वरिच्यावरी अनेक ॥ ४९ ॥ आधीं मूळमाया जे परमात्मशक्ति। जगज्योति जगद्रूपा प्रणव ज्ञप्ति। तियेची विचारितां स्वरूपस्थिति। सर्व हि घडे श्लाघ्यवाणें ॥ ५० ॥ तरि तियेसी प्राणी न भजोन। मध्यें चि करिती आनेंआन। सेवटीं मग फळश्रुति हि अति हीन। नरकप्राप्ति सर्वथा ॥ ५१ ॥ ह्मणौनि ज्यासी वाटेल स्वहित व्हावें। तेणें मूळमायेसी विचारूनि भजावें। तयेसी भजता रोकडें चि पावावें। कैवल्यपद सगळें ॥ ५२ ॥ अहो मूळ सोडूनि शेंडा धरितां। अकस्मात उताणा पडे खालता। तेवि आदिमाया सोडूनि क्षुद्रदैवतीं भजता। अधःपतन तत्काळ होय ॥ ५३ ॥ ह्मणौनि कोण्हीयेकें ऐसें न करावें। आधीं मूळमायेसी विचारूनि भजावें। ह्मणिजे खरेंखुरें जाणावें। शुद्धउपासनारहस्य ॥ ५४ ॥ दिनकर रामदासीं रिघोनि शरण। केलें या रीतीं आदिशक्तीचें पूजन भजन। तेणें निरसूनिया जन्ममरण। निजमोक्षप्राप्ति सहजस्थितीं ॥ ५५ ॥ स्वस्ति श्रीस्वानुभवदिनकरे गुरुशिष्यान्वये समाप्त कळापे आदिशक्तिउपासनानिश्चयनिरूपण नाम द्वितीय कीर्ण प्रकाशः ॥ २ ॥ श्रीराम ॥

---

## श्रीराम

आता मकरात्मक ॐकार शंकर। त्याचा सांगिजेल उपासनाप्रकार। श्रोतीं होऊनियां सादर। श्रवण केलें पाहिजे ॥ १ ॥ तेथें ध्वनिरूप जे का अर्धमात्रा। मूळकारण मुख्य प्रणवमंत्रा। आदिशक्ति परमपवित्रा। प्रणवसंजीविनी ॥ २ ॥ ध्वनिरूपें ब्रह्मीं निर्माण जाली।

---

१ शाक्तमार्ग काय आहे तें. २ योग्य. ३ अन्य अन्य. ४ प्रत्यक्ष. ५ शुद्ध उपासना रहस्य जाणून.

अउमकारेंसीं प्रगटली । कार्यकारणत्वें विस्तारली । ब्रह्मगोळ अवघा ॥३॥ जेवि का अर्द्धनारिनटेश्वर । येके शरीरीं दोनी आकार । तैसा चि इयेचा हि प्रकार । शिवशक्ति अनादि ॥ ४ ॥ कारण ध्वनिरूप मूळमाया । ते चि शिवशक्तिरूपें अवतरली कार्या । पुढें येकरूपें चि द्विधा होऊनिया । कार्यकारणत्वें प्रसवे ॥ ५ ॥ तेथ अकारीं प्रगटे रजोगुण ब्रह्मा । उकार सत्वगुणें विष्णुनामा । मकारीं तमोगुणाचिया गरिमा । शिव ऐसें बोलिजे ॥६॥ ऐसा जो का शिव अनादि । मायासगें नटे नाना छदीं । विश्व निर्मी सर्वें चि उछेदी । येक क्षण न भरतां ॥ ७ ॥ त्यातें चि महादेव ऐसें ह्मणती । ज्यापासुनी सकळ चराचरोत्पत्ति । पुन्हा सकळ हे सामावे निश्चितीं । येकसरें तयामाजीं ॥ ८ ॥ ज्याचें तमोमय मकारान्वित । मस्तक शोभें साळकृत । अर्द्धमात्रा अर्द्धेंदु विलसत । निजभाळीं समता ॥ ९ ॥ उकारें शोभलें निजहृदय । अकारें विलसे पदद्वय । एव आपदमस्तक अति रमणीय । प्रणवशकर जो ॥ १० ॥ तेथ अ इ उ ऋ ऌ पच समान । हें चि निजाकारें पचवदन । सध्यक्षरें अनुस्वार विसर्ग पच सवर्ण । मिळोनि नेत्र अकरा ॥ ११ ॥ ळकार ज्ञकार कर्णयुगुळीं । कवर्ग पचनाशिकें शोभती सरळीं । हकार क्षकारें नित्य नासाबिळीं । चाले प्रभजन[३] जो ॥ १२ ॥ चवर्ग टवर्गेसीं दशभुजा शोभती । तवर्ग पवर्गें दशायुधें विलसती । त्रिशूळ डमरु पिनाक[४]चाप अहि अभय[५] हस्तीं । बाण पात्रासी खट्वांग[६] ॥ १३ ॥ सकारत्रई कठ पृष्ठि निज नाभि । यकारचतुष्टय सर्वांग स्वयभीं । ध्वनिरूप अर्द्धांगीं प्रथमारभीं । अचळात्मजा[७] शोभतसे ॥१४॥ प्रणवबिंदुलें मस्तकींचें । तद्वत् निजभाळीं वास्तव्य गगेचें । सागता बीर्क[८] सौंदर्याचें । शेष विरची तटस्थ ॥ १५ ॥

---

१ ब्रह्मांड २ ए, ऐ, ओ, औ, यास सध्यक्षरें ह्मटलीं, कारण दोन स्वरांचा सधी होऊन हे स्वर बनले आहेत ३ वायु. ४ या नावाचें धनुष्य. ५ आशिर्वाद सूचक वर हात केलेला ६ खाडा नामक एक दुधारी तरवार ७ पर्वताची मुलगी, पार्वती ८ तेज

वर्णोच्चारनंदीवरी आरोहण । कर्पूरोज्वळ अर्थविभूतिउद्धळन¹ । दशग्रंथ दिगंबर परिधान । प्रमयव्याघ्रांबर शोभलें ॥ १६ ॥ पंचमुद्रात्मक पंचमुखी रुद्राक्षाच्या । माळा कंठीं शोभती पांचा प्रकारींच्या । कामक्रोधशोकमोहादि दैत्यमस्तकाच्या । रुंडमाळा शोभती ॥ १७ ॥ सकळ शास्त्रपुराणेंसीं वेद । पवाडे पढे पुढें निर्व्यवाद । श्रुति स्मृति काव्य उपनिषध । परिचर्या³ करिती ॥ १८ ॥ ब्रह्माचळ मेरूचिया मस्तकीं । प्रणवपीठ कैळास शोभे स्फटिकी । ऐसा महादेव सोडूनि दैवतीं आणिकीं । भजणें हे कोण गोष्टी ॥ १९ ॥ अनादि जो शिव विश्वनियता । काळीकाळासी शासनकर्ता । जगत्प्राण जो जगत्भर्ता । जगत्साक्षी जो ॥ २० ॥ ब्रह्मादि हरि हर आज्ञाधारक । सत्ता उत्पत्ति स्थिति सव्हारक । इंद्र चंद्र अग्नि यम कुबेर सेवक । नित्य जयाचे ॥ २१ ॥ अविद्याजनित जाळूनि इंधन । सर्वांगीं केलें भस्मोद्धळन । अहर्निश निजनामस्मरण । गंधाक्षत निजभाळीं ॥ २२ ॥ निजविस्मरणाचें हळाहळ⁴ । कंठीं धरिलें आळुमाळ⁵ । ब्रह्मास्मिबोधें कर्पूरधवळ⁶ । शोभायमान ॥ २३ ॥ ऐसा प्रणवशंकर सोडूनि । नाना उपासना धुंडिती प्राणी । तेणें फिरफिरों जन्ममरणीं । भ्रमचक्रीं पीडती ॥ २४ ॥ नसतें चि अहंपण धरूनि अंतरीं । नाना लिंगाची पूजा करी । मृत्तिका पाषाण कां पारजें⁷ प्रतिमेवरी । धरी अत्यंत भावार्थ ॥ २५ ॥ बाह्याकारें ह्मणवी शांभव । अंतरीं धरूनि नाना पृथक् भाव । धातु मृत्तिका का पाषाणदेव । कल्पूनिया पूजा करी ॥ २६ ॥ कांहीं फळप्राप्ति जालिया भाव धरिती । वाईट होतां देवावरी क्षोभती । विषम जालियां देवासी धिःकारिती । उत्तम होतां स्तुतिवाद ॥ २७ ॥ तरि कोण्हीयेकें ऐसें न करावें । स्वयें महादेव होऊनि महादेवासी भजावें⁸ । ह्मणिजे सर्व साधकरूप जाणावें । इहलोक परत्र ॥ २८ ॥ जो का सर्वाद्य प्रणवशंकर । आधीं पाहावा

१ उद्धूलन=चर्चन २ महत्व, थोरवी, कीर्ति, विस्तार. यांनीं युक्त. ३ सेवा. ४ विष ५ किंचित. ६ कापुराप्रमाणें शुभ्र अंगकांति आहे ज्याची असा शंकर. ७ पारद=पारा. ८ देव होऊनि यजावें देवासी।.

त्याचा ध्यानप्रकार । मुद्रा न्यास मंत्र जप विचार । कैसा तो शोधावा ॥ २९ ॥ ज्याचे शत सहस्र अवतार । गुण पराक्रम अनंत अपार । त्याहीमाजीं नावांनिगे थोर थोर । अकरा रुद्र विख्यात ॥ ३० ॥ तेथ अष्टागें ते चि अष्टभैरव । नववा अकार खंडेराव । दाहावा उकार हनुमंतदेव । मकार मुख्य महारुद्र ॥ ३१ ॥ तरि नाद बिंदु कळा ज्योति । रूप रेखा स्वरवर्णाकृति । अकार उकार मकार एव होती । अनुक्रमें रुद्र अकरा ॥ ३२ ॥ आता प्रथम नाद तो त्र्यंबकभैरव । बिंदु जाणिजे पिनाकभैरव । कळा तो जाणिजे काळभैरव । ज्योति तो कपाळीभैरव चौथा ॥ ३३ ॥ रूप तो कपर्दिभैरव पाचवा । रेखा तो हरभैरव साहावा । स्वर तो भैरव जाणिजे सातवा । वृषभध्वज नाम त्याचें ॥ ३४ ॥ वर्ण तो आठवा धूर्जटीभैरव । नववा अकारात्मक वृषाकपिदेव । तो चि साक्षात हनुमंत स्वयमेव । भक्तिकीर्णी जो प्रशंसिला ॥ ३५ ॥ आता बहुरूपी तो मार्तंडभैरव । उकाररूपें दाहावा रुद्र स्वयमेव । ज्याची विचारिता चरित्रलीळा लाघव । असंभवनीय पैं ॥ ३६ ॥ जो कैवल्यजेजुरीनिवासिया । मायाह्माळसाविलासिया । निजप्रकृतिबाणाईचिया । सुंदरपणा भाळला ॥ ३७ ॥ भुलोनि तिळा निजागीं धरिलें । मायाह्माळसेसी रुसविलें । मग तिजलागीं पाठीसी घातलें । निजवक्रगतीं ॥ ३८ ॥ विवेकाचा सज्जूनि घोडा । वरि वैराग्याचिया पाखेरा सुहाडा । सव्यकरीं शोभे ज्ञानखडा । वामकरीं कृपाखेटकं ॥ ३९ ॥ काम क्रोध शोक मोह भय । ते मणिमल्लादि वधूनि शत्रुसमुदाय । निजभक्तां देऊनि अभय । साम्राज्यसुखें नांदवी ॥ ४० ॥ निजप्रेमाचें उधळिलें भंडार । तेणें सर्वांग पिवळें सधुशरें । उभे सभंवते सप्तकोटि परिवार । दैवीसंपदेसीं निजगण ॥ ४१ ॥ निजशांतीचा शोभे मस्तकीं मुकुट । स्वतेजें देदिप्यमान अति तेजिष्ट । क्षमाकवच बाणलें बरवट ।

---

१ नामांकित. २ नववा अकारात्मक खंडेराव व दाहावा हनुमंतदेव असें वर ह्मटलें आहे व या ठिकाणीं त्याच्या उलट ह्मटलें आहे. ३ वृषाकपि=शंकराचें नांव. ४ बाणाईला ५ घोड्याच्या पाठीवरील झालर ६ विलासी, ७ दुधारी तरवार. ८ खेटक=ढाल, ९ धुरकट रंगाचें.

सदयताप्राबर्ण शोभलें ॥ ४२ ॥ कर्णीं कुंडलें मुक्तमोतियांचीं । तेणें आगळीक निजशोभेची । कंठीं सुमन पुष्पहार मुक्तमाळांची । शोभा शोभे मनोरम ॥ ४३ ॥ धर्म अर्थ काम मोक्ष सहज । चहु पुरुषार्थी शोभे चतुर्भुज । भुजीं केयुरें कडलगें सतेज । स्वधर्मकर्में साजिरीं ॥ ४४ ॥ सगुणसायुज्यतेची कंठीं येकावळी । निर्गुणसायुज्यपदकें शोभा आगळी । कटीं क्षुद्रघटिकान्वित भक्तिमेखळी । रत्नखचित विराजे ॥ ४५ ॥ पदीं निजऐक्यतेचा तोडर मिरवे । तेणें कामकाळामनीं भय उद्भवे । निजपदपादुकाचा महिमा नेणवे । ब्रह्मा हरि हर शेषादिकां ॥ ४६ ॥ निजभाळीं परिपूर्णतेचें । गधाक्षत रेखिलें सुरेख साचें । सच्चिदानंद पदत्रयाचें । कृष्णागर चर्चिलें सर्वांगीं ॥ ४७ ॥ प्रतिज्ञाकामादि मल्ल विध्वसिले । तेणें मल्हारि निजनाम शोभलें । निजभक्ता कैवल्यसुख दिधलें । चतुर्विध प्रकारें ॥ ४८ ॥ आर्तभक्ता दिधलें सलोकतागांव । जिज्ञासां दिधला समीपताठाव । अर्थार्थियां स्वरूपपद स्वयमेव । दिधलें निजप्रीतीं ॥ ४९ ॥ मग निजमोक्षरूप जो कां भंडारगडे । आपुलिये निजविश्रातीचें बिऱ्हाड । त्याचा ज्ञानियांलागीं करूनि सुरवाड । सुखवस्तीं त्यासी ठेविलें ॥ ५० ॥ दिधलें निजनामांकित मुद्रापत्र । नवविधा भक्तिरेठा वसविल्या स्वतंत्र । स्वानंदें साम्राज्यसुखें येकत्र । स्वानुभवदिनकरीं नांदिजे ॥ ५१ ॥ तेथ आसनपीठिकेचा साधूनि उद्भट । अष्टांगगड सज्जिला बळकट । नवखणी गोपुर अति बरवट । निजनिवासस्थान ॥ ५२ ॥ निज आसनाचिया अति दृढिवा । पाया शोधूनियां बरवा । तेथ धारणेच्या करूनि कालवा । पाया शुद्ध भरिला ॥५३॥ वरि यमनियमेंसीं गुडें घडिले । प्राणायामें वरिच्यावरी सज्ज केले । तेथें प्रत्याहारें दुर्ग पैंजासिलें । ध्यानदारवठीं योजूनि ॥ ५४ ॥ तेथ समाधिपर्वेळी

१ अधिकता. २ दंडावर बांधण्याचा अलंकार ३ एकेरी हार ४ कटिसूत्र. ५ तोरड्या किंवा वाळे ६ चंदन ७ चतुर्विधा भजते मां जनाः सुकृतिनोऽर्जुन । आर्तो जिज्ञासुरर्थार्थी ज्ञानी च भरतर्षभ ॥ (गीता) ८ चतुर्विधा मुक्तीपैका एक. ९ खंडाबाचें राहण्याचें ठिकाण १० स्वाधीन. ११ प्रसिद्ध. १२ गोटे, दगड. १३ किल्ला. १४ शृंगारला. १५ उंबरठा, मुख्य दरवाजा. १६ पवळ=होडगें?

शोभली । वरी व्युत्थानचेंरी[1] विराजली । माजीं नवभक्तीसीं रचना रचिली । नवाखणी गोपुराची ॥ ५५ ॥ आधीं चतुर्विध भक्तीचे च्यारी खांब । आर्त जिज्ञासा अर्थार्थ ज्ञान स्वयंभ ।' वरी गोपुररचना विविधारंभ । नवभक्तियुक्त सुंदर ॥ ५६ ॥ प्रथम श्रवणें गोपुर उभारिलें । कीर्तनें करूनि साकारलें । विष्णुस्मरणें सूत्रें अवसाधिलें । निजऐक्यतेसीं ॥ ५७ ॥ पादसेवनें दाविला गोपुरउठावा । अर्चनें केला पदार्थपुरावा । वंदनें ग्रीवों[2]घटिकेचा यावा[3] । संपूर्ण साधिला ॥ ५८ ॥ दास्यें पडिघाणियें[4] केला मेळावा[5] । सख्येंसी वरी कळस शोभला बरवा । वरी निशाणाचा तळपे यावा । आत्मनिवेदनेंसीं ॥ ५९ ॥ माजीं स्वानुभवदिनकराऐसें सिंहासन । वरी निजऐक्यते घालूनि आसन । तेथ श्रीगुरुमार्तंडभैरवनिवासस्थान[6] । आरोहण सहजस्थितीं ॥ ६० ॥ पुढें द्वारीं दिव्य तेजाचा दिसे उमाळा । कोटिचंद्रार्क शोभती दीपमाळा । पुढें सहनशीळतेचिया पडशाळा । निजभक्तपाथिकां विश्रांति ॥ ६१ ॥ निजपूर्णत्वाचिया पूर्णिमा[7] । निजभक्तसमूह यात्रागरिमा । स्वयंप्रकाशदिवटिया अपार व्योमा । निजतेजें आकळूं पाहाती ॥ ६२ ॥ निजानंदें सखोल भांडारगृह । निजमुद्रादीक्षेसीं पंचलिंगसमूह । तेथ निजशरणागत करूनि उत्साह । प्रेमभंडार उधळिती ॥ ६३ ॥ पुढें निजावकाशीं गगनचुंबित । सभामंडप शोभला अद्भुत । तेथ वायूचिया स्तंभा उचात । निजधैर्याचे पृथ्वीवरी ॥ ६४ ॥ त्यापुढें निजसमतेचिया आंगणीं । स्वसुखें कासव अवयव पसरी आवरुनी । नाना भक्तसमूह फिरती त्यावरुनी । स्वानंदाचिया संतोषें ॥ ६५ ॥ मुक्तद्वारीं निजदृष्टीपुढें सहज । उभे असती प्रबोधमत्तगज । पुढें साधनचतुष्टयादि पाइरियांचा समाज । चढोवढी शोभती ॥ ६६ ॥ संभवत्या

---

१ चर, लहान खदक. २ ग्रीवा=मान, गळा गोपुराची मान ह्मणजे कळसाच्या खालील घुमट, त्यामध्यें लाविलेली घटा. ३ उदय, प्राप्ति. ४ मध्यघटेची जागा. ५ समारंभ. ६ यावरून श्रीमार्तंडभैरव हें दिनकराचें कुलदैवत असावें असें वाटतें. ७ पौर्णिमेस. ८ पृथ्वी आणि आकाश यामधील पोकळीमध्यें.

स्वतेजतारांगणीं शोभल्या । सहजस्थितिदीपमाळा विराजल्या । समता-वोवऱ्या वैराग्यें रेखिल्या । निजभक्तसमुच्चयमंडित ॥ ६७ ॥ ऐसा कैवल्यजेजुरीनिवासिया । त्याची उपासना परिच्छिन्न विचारूनिया । स्वानुभवदिनकरीं जाला सुखिया । दिनकररामदास ॥ ६८ ॥ एवं दाहावा रुद्र उकारस्वरूपीं । सद्गुरु मार्तंडभैरव बहुरूपी । अकरावा मकार शंकर जाणिजे साक्षपीं । जो यापूर्वीं निरोपिला ॥ ६९ ॥ यांचीं पृथक् ध्यानें पृथक् बीजें । पृथक् मुद्रा न्यास मंत्र जाणिजे । हें सकळ हि विचारितां सहजें । साक्षात् होणें महादेव ॥ ७० ॥ ज्यासी दीक्षा घेणें असेल शांभवी । तेणें या प्रकारें अंतर्दीक्षा घ्यावी । ऐसें न होतां उ-गीच उठाठेवी । बाह्याकारें करूं नये ॥ ७१ ॥ मुख्य दीक्षाग्रहणाचें निजकारण । समूळ निवारावें जन्ममरण । स्वयें आधीं महादेव होऊन । मग महादेवासी भजावें ॥ ७२ ॥ महादेवासी आधीं वोळखोनि भजला । ह्मणिजे सर्व सार्थकरूप जाला । नरदेहासी तो येऊनि लाधला । निज-उपासना आपुली ॥ ७३ ॥ कोण्हीयेक संसारासी आला प्राणी । तेणें सद्गुरूसी शरण जाऊनि । मुळींची निजउपासना शोधूनि । आपणासीं पाहावें ॥ ७४ ॥ एवं स्वानुभवदिनकरीं महादेव । विचारूनि दिनकर स्वयेंमेव । अंतर्बाह्य जाला शांभव । श्रीरामदासकृपा ॥ ७५ ॥ असो पंचमुद्रा पंचमुख रुद्राक्ष । धरूनि हृदईं कंठीं मस्तकीं प्रत्यक्ष । भूचरी खेचरी चाचरी अगोचरी अंतर्लक्ष । तो साक्षात् शिव स्वयंभ ॥ ७६ ॥ तैसा चि अकाररूप रजोगुण ब्रह्मा । विश्वोत्पत्तिकर्ता जो विश्वात्मा । सचराचरीं ज्याचा अद्भुत महिमा । सर्वांचा मूळपुरुष जो ॥ ७७ ॥ ज्याकरिता स्वरवर्ण आकारले । वर्णव्यक्तिसहित मिरवले । अकारविरहित नाव पावले । समूळ हलंतें ऐसें ॥ ७८ ॥ अकारेंविण जितुका वर्ण । तितुका हि जाणिजे अकारण । अकारसहित होऊनि सवर्ण । अर्थगौरवीं यथोक्त ॥ ७९ ॥

---

१ उत्कंठेनें. २ या अकरा रुद्रांची. ३ हें च देव, धर्म, तीर्थ, व्रत, इत्यादिकांचें अंतिम फल आहे. ४ आपला आपण. ५ व्यंजनांत.

वेद शास्त्र पुराण स्मृति । अकार योजल्यां मान्य होती । अकारेंविण तें त्रिजगतीं । सर्व हि दिसे तृणतुल्य ॥ ८० ॥ ऐसा जो का अकारात्मक। रजोगुण ब्रह्मा संम्यक। चहु वेदेंसीं चतुर्मुख। स्वरवर्णी जो प्रगटला ॥८१॥ ऋग्यजु साम अथर्वण । चतुर्वेदेंसीं चतुरानन । धनुर्वेद तो पांचवें आनन । कळियुगीं आपदग्ध ॥ ८२ ॥ ज्योतिष आणि धर्मशास्त्र । विश्व देखणें हे दोन्ही नेत्र । गायन आणि वैद्यकशास्त्र विचित्र । श्रवण दोन्ही शोभले ॥ ८३ ॥ अध्यात्मशास्त्र जें का अति निर्मळ। तें नासिक शोभलें रमणीय सरळ । आत्मज्ञान जें का अनुपम्य निर्मळ । तें चि विराजलें मुख ॥ ८४ ॥ तेथ सकाम निष्काम जें कर्म । ते चि अधर शोभले दोन्ही सम । माजीं उपासना ते रसना उत्तम । मनोहर सुरस ॥ ८५ ॥ सांख्य मीमासा पातंजल वैशेषिक । च्यान्हि भुजा शोभल्या अजानु संम्यक । वेदांत कुमडंलीं ज्ञानोदक । न्याय तो चि दंड विलसे ॥ ८६ ॥ उपनिषंधांची पद्माक्षमाळा । दुजी स्मृतिरत्नांची घातली गळां । नीतिशास्त्रें विचार आगळा । कर्तव्य हें न कर्तव्य ॥ ८७ ॥ स्कंद कूर्म द्विपुराणें स्कंदोन्नत । विष्णुपुराणें निजहृदय शोभत । वैजयंती वाराहपुराणें विलसत । स्तनद्वय साजिरे ॥ ८८ ॥ भविष्योत्तरें शोभे कंठ । बृहन्नारदीयें केंकु बरवंट । ब्रह्मांडपुराणें ग्रीवा सुघट । मनोहर शोभली ॥ ८९ ॥ मत्स्यपुराणें पृष्ठिभाग । वामनपुराणें उदर अव्यंग । अग्निपुराणें अति चांग । जठराग्नि मिरवे ॥ ९० ॥ लिंगपुराणें गुह्यस्थान । गुदीं शोभे गरुडपुराण । गणेशपुराणें विराजमान । नाभि सखोल साजिरें ॥ ९१ ॥ पद्मपुराण मार्तंडपुराण । पद्द्वय समता विराजमान । बृहन्नृसिंहपुराणें निजवहन । हंसाचें साजिरें ॥ ९२ ॥ मुकुटस्थानीं रामायण । भारत भागवत कर्णभूषण । कौमुदी कुचमर्दनादि व्याकरण । करकंकणें शोभती ॥ ९३ ॥ हरिवंशाचें

---

१ चार उपवेदांपैकीं दुसरा. आयुर्वेद, धनुर्वेद, गांधर्ववेद व शस्त्र शास्त्र, हे चार उपवेद. २ न्याय, वैशेषिक, सांख्य, योग, मीमांसा आणि वेदांत हीं षड्दर्शनें आहेत. ३ कमंडलूंत. ४ श्रुति. ५ गळ्यामधील घाटी? ६ मान.

निजकंठीं पदक । काव्यरचना मुक्तावळी संम्यक । रजोगुणीं क्रियाशक्ति व्यापक । ते चि अर्द्धांगीं साविन्नी ॥ ९४ ॥ ऐसा अकारब्रह्मा रजोगुणमिश्रित । सकळ अवयवीं शोभला मूर्तिमत । निजस्मरणरूप वेदाध्ययन असे करित । तव अपूर्व काय वर्तलें ॥ ९५ ॥ अकस्मात विकल्परूप शखासुरें । विस्मरणाची हाक मारिली निकरें । तव ब्रह्मा होऊनि अति घाबिरें । स्मरणवेद विसरला ॥ ९६ ॥ तेणें जाला केवळ शुद्धबुद्ध । जाणीव नेणीव मिश्रित स्तब्ध । राहिलीं सृष्टयादि कार्यें विविध । उत्पत्ति जे करणें ॥ ९७ ॥ राहिला सारासार विचार । नकळे नित्यानित्य साचार । अवघा पडला अवकार । ज्ञानाज्ञानमिश्रित ॥ ९८ ॥ ऐसा निजविस्मृतीचिया योगें । अकारब्रह्मा स्तब्ध निजागें । त्यासी उकारविष्णूनें मत्स्यरूप सत्वागें । सद्गुरुवेषें धरिलें ॥९९॥ तेणें विवेकचक्र हातीं परजूनि । विकल्पशख प्रतिज्ञा वधूनि । तव ब्रह्मा स्वयें सावध होऊनि । निजस्मरणवेद लाधला ॥ १०० ॥ परतु घाबिरेंपणें जाला स्तब्ध । विसरला कार्याकार्य विविध । क्षणें सावध क्षणें असावध । सकल्पविकल्पीं पडिला ॥ १०१ ॥ ऐसी सकल्पविकल्पात्मक होतां वृत्ति । निजात्मजा[3] जे प्रवृत्तिसरस्वती । तिंचा अभिळाश धरूनि चित्तीं । मनोरूप सरसावला ॥ २ ॥ तव सद्गुरुरूप शकरावतार । दुर्वासदेव मुनेश्वर साचार । तयांसी कळों सरला हा विचार । रजोगुणप्रवृत्तीचा ॥ ३ ॥ तेणें निजवैराग्याचिया बळें । रजोगुणब्रह्मा निर्भर्त्सियिला सैळें । जे तुज आराधिती त्यासी कदाकाळें । मोक्षप्राप्ति न घडे ॥ ४ ॥ तेणें ब्रह्मा सलज्ज होऊनि । दडाला उकारविष्णूचे नाभिस्थानीं । सृष्टीची उत्पत्ति सपूर्ण तेथूनि । करिता जाला निजागें ॥ ५ ॥ ऐसा अकारात्मक ब्रह्मा रजोगुणी । सकल्पविकल्पात्मक अंतःकरणी । पुढें आपोक्तिकरिता तयासी कोण्ही । न भजती न पूजिती ॥६॥ येन्हवीं तरी तयाकरितां सृष्टि निर्माण जाली । तेणें

१ निक्षून २ या ठिकाणीं शून्यहृदय असा अर्थ असावा. ३ मुलगी. ४ निर्भर्त्सना करून शाप दिला. ५ आग्रहानें, बळानें किंवा वैरबुद्धीनें. ६ मुळे.

अकाररूपें अंतर्बाह्य व्यापिली । परतु प्रवृत्तिनिजात्मजा मनीं अभिळासिली । तेणें जाला तो अन्याई ॥ ७ ॥ ह्मणौनि ब्रह्मयाची मत्रउपासना । ध्यान मुद्रा न्यास विधाना । न कर्तव्य ऐसें दिनकरें आणूनिया मना । अंतरीं च मौन्यमुद्रा स्मरिलें ॥ ८ ॥ तेणें अकारब्रह्मा जाला लज्जायमान । कीं न करिती माझें पूजन उपासन । मग उकारमकारीं मिश्रित होऊन । ॐकाररूप प्रगटला ॥ ९ ॥ तो दिनकरें रामदासीं पाहिला । पाहोनि अतर्बाह्य विचारिला । विचारूनि निजांगें विवरिला । स्वानुभवदिनकरीं ॥ ११० ॥ स्वस्ति श्रीस्वानुभवदिनकरे गुरुशिष्यान्वये सप्तम कळापे शंकरब्रह्माउपासनारहस्यनिरूपण नाम तृतीय कीर्ण प्रकाशः ॥ ३ ॥

---

॥ श्रीराम ॥

यानंतर उकारविष्णु सत्वगुणी । प्रगटला प्रणवेश्वर सुंदर ध्यानीं । निजांगीं अर्द्धमात्रा विळासिनी । ज्ञानशक्ति लक्षुमी ॥ १ ॥ उदरीं अकाररूप रजोगुण ब्रह्मा । पाठीसीं मकाररूपें तमोगुणी शिवनामा । वरी बिंदुलयाचिया[1] शेषतुळकेंगरी पुरुषोत्तमा । सहजस्थितीं सुखासन ॥ २ ॥ परब्रह्मरूप जो कां क्षीरार्णव[3] । त्याचिया ऐल तटाकीं धरूनि ठांव । संकल्पमेरूचा[4] मस्तकीं वसविला गाव । अहस्फुरणरूप वैकुंठ ॥ ३ ॥ त्याखाले अतःकर्णादि अहंकारात । वसले कैळास सत्यलोक इद्रलोकादि समस्त । अनुक्रमें तत्वरूप दिक्पाळ एतावत । निजविश्रांतिसुखें राहिले ॥ ४ ॥ तेथ स्वरवर्ण मिळोनि सभवले समग्र । यथाक्रमें राहिले सुर सिद्ध मुनेश्वर । मध्यमणी शोभे विष्णु ॐकार । निजवैकुंठभुवनीं ॥ ५ ॥ स्वरूप रूपें सुदर घनसावळा । घोतला निजागें परब्रह्मपुतळा । अवकाशाचा गोठोनि गोळा । मस्तक शोभे निजां-

---

१ बिंदुलें+याच्या=बिंदूच्या. २ शेषरूपी मऊ बिछान्यावर; तूलिक=कापूस. ३ क्षीरसमुद्र. ४ थारा, आश्रय.

गीं ॥ ६ ॥ तेथ गगनरूप नीळ कुंतळ । वीरंगुंठी चांचर कुरळ । शून्याकारें जाले कुटील । शब्दाकुरीं वक्रगती ॥ ७ ॥ त्याखाले त्रिगुणत्रिवळी शोभल्या । निजभाळीं अनुक्रमें विलासल्या । तेथ प्रवृत्तिनिवृत्तिरूप विराजल्या । भवंया दोन्ही वक्रगती ॥ ८ ॥ माजीं पवनावतार अश्विनौदेव । प्राणरूपें शोभले स्वयमेव । त्यामाजीं शुद्ध पवन जो सावेव । तो चि विचरे स्वासोस्वासीं ॥ ९ ॥ मुख्य महातेज आणि सूर्यनारायण । हे चि उभयतां शोभले दोन्ही नयन । अष्टदिशा त्या निजश्रवणस्थान । आक्रमून राहिल्या ॥ १० ॥ चहूंवेदींचे शाखोपशाखी ब्राह्मण । तेहीं शोभेसी आलें निजवदन । निजवाचारूप शब्दोच्चारण । स्वयें अग्नि करीतसे ॥ ११ ॥ जिव्हास्थानीं शोभला वरुण । यम काळरूप दाढा दर्शन । षोडशस्वरीं निजकंठस्थान । शोभेसी पावलें ॥ १२ ॥ अग्नि आणि शबेळ वायु उभयता मिळोन । दोहीं वोष्ठीं करिती शब्दकथन । हनुवटीमाजीं कुबेर राहोन । शोभा पावला निजागें ॥ १३ ॥ मंदाकिनी नदी स्वर्गगामिनी । ते विराजली लबिकोंस्थानीं । आवर्णोदक अमृतसजीवनी । अहारधीं सतरांवी ॥ १४ ॥ वैकुंठ शोभे कपाळकवटी । कैळासें विराजली निजभृकुटी । सत्यलोकेसीं देखिली कर्णपाटी । अति शोभायमान ॥ १५ ॥ तपोलोक नेत्रसंपुटीं । जनलोक तो नासापुटीं । महर्लोक मुख हनुवटी- । माजीं विराजला ॥ १६ ॥ स्वर्लोकें स्कदोन्नत शोभले । बाहूंसी सकळ क्षत्री विराजले । इंद्रेसहित सुरवर देखिले । भुजास्थानीं प्रतापें ॥ १७ ॥ अनंत क्षत्री अनंत भुजा । अनंत कर शोभले अधोक्षजा । धर्म अर्थ हे स्तनद्वय वोजां । शोभती निजहृदईं ॥ १८ ॥ हृदयस्थानीं भूर्लोक । नाभीसी पृथ्वी शोभे सम्यकें । पृष्टिस्थानीं नैरुत्यनायक । शोभा पावला

---

१ काळे केश. २ बद्ध केश. ३ भुवकें. ४ वक्र. ५ तीन वळ्या, वळकट्या. ६ भिवया ७ अश्विनीकुमार. हीं सूर्याचीं मुलें ? ८ दात. ९ औपाधिक. १० स्वर्गगंगा. ११ जीभ. १२ सत्रावी जीवनकळा. १३ संपुटी=पोकळी. १४ स्वच्छ, शुद्ध. १५ चांगली.

॥ १९ ॥ मेरु शोभला निजपृष्ठीचा कणा । चौदा लोकेसीं ग्रथिका जाणा । शरीर त्वचा सकळ प्रभजना । सर्वांगीं वेष्टिलें ॥ २० ॥ महितळ निजकटिप्रदेशीं । दक्षप्रजापति गुह्य स्थानेसीं । गुदस्थानीं निरयाळयांसी । लोकालोक प्रजघन ॥ २१ ॥ वितळें शोभे जानुयुगुळ । तळातळें पोटरिया मृदुळें । गुल्फद्वय तें महातळ । रसातळ पदपृष्टि ॥ २२ ॥ पाताळें शोभती तळवे । उरुयुगळ ते वैश्यवर्ण जाणावे । आणि निजपदतळीं अभिभवे । शूद्रवर्ण जो चतुर्थ ॥ २३ ॥ श्रीपाद सन्यासी तें निजभाळ । वानप्रस्थाश्रम जाणिजे वक्षस्थळ । ब्रह्मचारी निजहृदयकमळ । ग्रहस्थाश्रम निजनाभि ॥ २४ ॥ समानरूपें कुकुर वायु नाभिस्थानीं । देवदत्त प्राणांशें हृदयभुवनीं । कूर्म उदानांशें विचरे कठस्थानीं । नाग व्यानांशें सर्वसधीं ॥ २५ ॥ धनजय अपानांशें अधोद्वारीं । एव पचधा वायु विचरे सर्व शरीरीं । केश रोम वनस्पती अठरा सभारीं । नाडी सकळ गगा नद नद्या ॥ २६ ॥ मांस तें कर्दम अस्थि पाषाण । मुत्र दैवर लाळ फेण । शुक्ल पर्जन्य श्रोणीत जीवन । मज्जा ते खडक जाणिजे ॥ २७ ॥ क्षुधाकाळीं दुर्भिक्ष पडे । तृषासमई जळशोष बहुडे । शीतकाळरूपें आळस उंबडे । शरीरामाजीं देवाच्या ॥ २८ ॥ उष्णकाळ तो निद्रा जाणिजे । पर्जन्यकाळासी मैथुन बोलिजे । जळवृष्टि होऊनि तृण धान्य निफजे । हा चि जेथें कामोद्भव ॥ २९ ॥ सव्हारकाळ तो क्रोध जाणावा । महदनर्थ शोक ह्मणावा । मोह प्रतिपाळैंनी समजावा । भय तें कल्पात मृत्यु ॥ ३० ॥ सात हि समुद्र त्या सप्त धातु । जठराग्नि तो प्रळयवन्हि विख्यातु । नवरत्नें आणि सकळ सुवर्ण धातु । तें नखें करचरणींचीं ॥ ३१ ॥ अष्ट दिग्गज आणि कुळाचळ पर्वत । ते करचरणीं आंगोळियां शोभत । निजांगें मुक्ताफळें भूषणें

१ बरगड्यांचीं हाडें. २ नरकाचें स्थान. ३ सप्तपाताळापैकीं दुसरें. ४ गुडघे ५ घोटे. ६ वश होऊन राही. ७ चिखल. ८ फिरणें, मागें सरणें, ९ उद्भव होई. १० प्रतिपाळ करणारा. ११ आगटे.

विलसत । नवलक्ष तारागणेसीं ॥ ३२ ॥ निजभाळीं गंधाक्षत मिरवे । ध्रुव आदिकरूनि सप्तऋषि आघवे । सर्वांगीं चंदन चर्चिलें बरवें । सकळ हि मेघाचें ॥ ३३ ॥ चौखाणीमाजीं[1] चौऱ्यासी लक्ष योनी । ते कृमि[2] जाणावे सर्व मिळोनि । सकळ चराचर ब्रह्माआदिकरूनि । पुत्रकन्यापरिवार ॥ ३४ ॥ औटकोटि ज्या का तीर्थावळी । त्या जाणिजे सकळ सिरावळी[3] । तितुकी च सख्या भूतावळी । तें रोमरंद्रें सकळ हि ॥ ३५ ॥ चंद्रमा जाणिजे मुख्य मन । चित्त ज्याचें स्वयें नारायण । बुद्धि निश्चयें चतुरानन । अहंकार शंकर ॥ ३६ ॥ नारद तुंबर सामगायनीं । किंनर अप्सरा नृत्य नर्तनीं । गंधर्व सकळ वाद्यें घेउनी । नित्य उभे सेवेसी ॥ ३७ ॥ यक्ष[4] राक्षस पिशाच गुह्यकें[5] । सिद्ध चारण[6] पक्षी पन्नगें[7] । दानव मानव इत्यादि सेवक । गुप्त प्रगट जाणावे ॥ ३८ ॥ विश्वात्मक जे सकळ शब्दश्रेणी[8] । स्तुतिनिंदात्मक नाना बोलणी । आणि तैसी च स्पर्शगति मृदु कठिणी । सुख दुःख जाणणें जें ॥ ३९ ॥ आणि सुंदरकुरूपादि रूपविषय सकळ देखणें । कां ते जिव्हेनें मधुर कट्वाम्ल सर्व रस चाखणें । तैसें चि सुगंधदुर्गंधादि गंधविषय घ्राणें । विश्वात्मक जाणती गति जे ॥ ४० ॥ ते पंचविषयादि सकळ हि । ज्यासी एकांशें[9] विश्वात्मक जाणणें निजदेहीं । यदर्थीं वेदप्रमाण साक्ष श्रुति हि । बोलतसे घडघडा ॥ ४१ ॥ विश्वतश्चक्षु आणि विश्वतोमुख । विश्व तो बाहु विश्व श्रोत्र देख । विश्व घ्राता विश्वांगें सुख दुःख[10] । पंचविषयादि भोक्तृत्व ॥ ४२ ॥ तैसें चि सर्वत.[11] पाणिपादांत । सर्वतोक्षी शिरोमुख श्रवण आंत । सर्वेंद्रिय गुणाभासीं असोनि व्याप्त । सर्वेंद्रियभोगीं विलसे ॥४३॥ आणि

---

१ जरायुज, अंडज, स्वेदज आणि उद्भिज्ज. २ पोटांतील व अंगावरील किडे. ३ शिरा. ४ राक्षसांचे सापत्न बंधु. ५ कुबेराचे धनरक्षक. ६ एक देवजाति. ७ पन्नग= सर्प. ८ शब्दाच्या ओळी. ९ विश्व आणि आपण एकरूप. १० विश्व तो च परमेश्वर असल्यामुळे विश्वाचीं जीं सुखदुःखें तीं प्रत्यक्ष परमेश्वरच भोगता आहे असें समजावें. ११ सर्व बाजूनीं, जिकडे तिकडे.

दशमीं सांगितल्या विश्वविभूति । येकादशीं दाखविली विश्वरूपाकृति । ह्मणौनि अंतर्बाह्य व्यापक हा त्रिजगतीं । विश्वात्मक विश्वद्रष्टा पैं ॥४४॥ ऐसेनि येकाशें पाहातां विश्वात्मक । स्वरूपाकृति व्यापली ज्याची सम्यक । जें जें गुणपराक्रमें होय अधिक । तो तो अंश जयाचा ॥ ४५ ॥ विश्वोत्पत्ति ज्याचा प्रातःकाळ । स्थिति पाळन मध्यान्ह संव्हार सायंकाळ । निमिष्य उन्मिमिष्य जाणिजे ज्याचें केवळ । दिवस आणि रजनी ॥ ४६ ॥ ऐसा सर्वेश्वर जो त्रैलोक्याधीश । विश्वव्यापक सर्वात्मा परेश । ज्याचिया अवताराचे गणनेस । कोण्हाचेन हि न करवे ॥४७॥ सकळ पर्वताची मैसें करूनि । समुद्राचिया पात्रामाजीं भरूनि । कल्पतरूची सुंदर करूनि लेखणी । लेहू बैसे आदिमाया ॥ ४८ ॥ ऐसे आकल्प गुणानुवाद अनंत लेहतां । येक हि चरित्र नव जाय तिचेनि सेवटा तत्वता । मग लाजोनि चरणीं संवाहन करितां । समरसैली निजांगीं ॥ ४९ ॥ मोजवतील पृथ्वीचे रजरेण । परि न करवे ज्याच्या अवताराचें गणन । अंगुळवरी गणवेल हें गगन । परि अवतारचरित्र अगण्य ॥५०॥ जे वेळेसी जैसें पडे भक्तकार्य । ते वेळे आपण हि तैसा चि होय । जळचर वनचर होय कां जाय । मानवयोनीसी पैं ॥ ५१ ॥ मत्स्य कूर्म ते बोलिजती जळचर । वाराह नृसिंह रूपें वनचर । वामन परशराम ते द्विजवर । राम कृष्ण क्षत्री वीर पैं ॥ ५२ ॥ बौध्य कल्की आणि हयग्रीव । नरनारायण कपिलदेव । दत्त हस जळसेन अपूर्व । त्रिविक्रमावतार ॥ ५३ ॥ ऐसे अनत अवतार अनत ध्यानें । अनत मुद्रा अनत आसनें । अनंत न्यास मत्र जप विधानें । कीळनोत्कीळन सबीज ॥ ५४ ॥ सत्क्रिया सदाचार सद्भक्ति । सद्भावें सदुपासना करिती । अतरीं धरूनियां मेधा विरक्ति । सद्विधीं आचरणें ॥ ५५ ॥

---

१ श्रीमत् भगवद्गीतेच्या दहाव्या अध्यायात. २ जेथें दिसती विशेष गुण । तें सद्गुरूचें आधिष्ठान ॥ दास ४-६-९ किंवा, जे जे काहीं उत्तम गुण । तें तें सद्गुरूच लक्षण ॥ दास ५-२-६५. ३ मसी=शाई. ४ ईश्वरस्वरूपात मिळून गली. ५ तुबर ? ६ बदरिकाश्रमीं तप करणारे ऋषी ७ स्मरणशक्ति.

सकळा उपासनादैवतांमाजीं श्रेष्ठ । ते हे विष्णुउपासना जाणिजे स्पष्ट । येथ भजले जे होऊनि येकनिष्ठ । त्यासी इहभोग मोक्षप्राप्ति ॥ ५६ ॥ इहलोकीं सकळ सपत्ति भोगणें । कैवल्यपद परलोकीं पावणें । ह्मणौनि काया वाचा शुद्ध मनें । भजावें पुजावें विष्णूसी ॥ ५७ ॥ तो उकारात्मक ॐकारविष्णु । सकळ भूतभार[1]सहिष्णु । सत्वगुणी सत्वश्रिया लोकजिष्णु[2] । विश्वनियता जो ॥ ५८ ॥ त्या विष्णूचे अवतार अनेक । असती विश्वामाजीं व्यापक । त्या सकळांत थोर विश्वतारक । रामकृष्ण अवतार ॥ ५९ ॥ राम आणि कृष्ण हे उभयतां । अनंत जीव उद्धरती येक नाम घेतां । ज्याचे गुण पराक्रम चरित्र वर्णितां । मोक्षप्राप्ति जडजीवासी ॥६०॥ साळकृत ज्याचें सुंदर ध्यान लक्षितां । मुक्ति प्राप्त होय सगुणसायुज्यता[3] । मुद्रा न्यास विधी मंत्र जप करितां । मनेप्सितें[4] प्राप्ति तत्काळ ॥ ६१ ॥ त्याहिमाजीं अति उत्तमोत्तम । सहजस्थितीं ह्मणतां राम राम । प्राप्त होय कैवल्यधाम । लव निमिष्य[5] न लगतां ॥६२॥ सहज येक रा ऐसें मुखीं उच्चारितां । सकळ दुरितें[6] मुखाबाहेरी येती तत्वता । पुन्हां मागतीं दोष प्रवेशों ह्मणतां । मकाराचें कपाट[7] बैसे ॥ ६३ ॥ पक्षीमिसें कुंटिणी[8] ह्मणतां राम राम । तियेसी तत्काळ प्राप्त वैकुंठधाम । मा निजभावें स्मरता राम राम । कवण प्राणी न तरे पा ॥ ६४ ॥ ऐसें रामनाम हें अनादि विश्वतारक । शंकरासी अखंड करितां ज्याचा घोक[9] । विषबाधा शमोनि सुखदायक । पार्वतीसहित जपतसे ॥ ६५ ॥ ह्मणौनि सहज

---

१ सकल भूतानीं घातलेलें ओझें सहन करणारा. २ तिन्ही लोकांना जिंकणारा, किंवा आपलेसें करून घेणारा. ३ विष्णूच्या सगुणरूपाचें ध्यान केलें तर त्या रूपांत भक्त तन्मय होऊन जाईल व शेवटीं मुक्तिपद मिळवील. ४ इच्छित. ५ क्षण. ६ पापें. ७ द्वार. 'रा' चा उच्चार करून जो श्वास टाकतो त्या श्वासाबरोबर शरिरांतील सर्व पातकें निघून जातात व परत श्वास घेण्यापूर्वी 'म' चा उच्चार होऊन तोंड बंद होतें, त्यामुळें पातकाना पुन्हां परत शरिरांत घुसण्यास अवसर च मिळत नाहीं. ८ शुकाकारणें कुंटणी रामवाणी । मुखें बोलतां ख्याति जाली पुराणीं ॥ (मनाचे श्लोक ९५). ९ घोख=घोष. विषा औषध घेतलें पार्वतीशें । ८२, उमेसीं अती आदरें गुण गातो । ८३, ८४ म. श्लो.

राम राम ह्मणतां । अनंत जीव उद्धरले तत्वता । मां उपासनाविधि गुरुमुखें विचारितां । मोक्षप्राप्ति अवश्य ॥ ६६ ॥ हें रामार्चनचंद्रिकेमाजीं केवळ । सांगितलें रामउपासनापटळ । त्याप्रमाणें गुरुमुखें सकळ । विधि विचारिजे आयत ॥ ६७ ॥ मुख्य ॐकार तो श्रीराम अर्द्धमात्रा सीता । अकार लक्ष्मण उकार भरत तत्वता । मकार शत्रुघ्न बिंदुलें हनुमंता- । सहित प्रणवपंचायत्न पैं ॥ ६८ ॥ अग्निबीजें बोलिजे केवळ रकार । सूर्यबीजें विलसे अकार । चंद्रबीजें-सहित मकार । एवं त्रिदैवतयुक्त राम ॥ ६९ ॥ ब्रह्मरंध्र तें जाणिजे अयोध्या । तेथ इडापिंगळामाजीं सुषुम्ना साध्या । ह्मणौनि सूर्याग्नि-चंद्रात्मक रामनाम हें आद्या । प्रणवपीठींचें प्रसिद्ध ॥ ७० ॥ राम-मंत्र येकाक्षर द्वि त्रि चतुः पंचाक्षर । षट् सप्ताष्ट नव दशाक्षर । येका-दश द्वादश त्रयोदशाक्षर । प्रसिद्ध मंत्र श्रीराम ॥ ७१ ॥ त्रयोदशापासूनि सहस्राक्षरपर्यंत । राममंत्र आहेति शतसहस्र अनंत । तितुकीं वेगळवेगळीं मुद्रा ध्यानें सतत । न्यास मंत्र जप विधी ॥७२॥ त्या सर्वांमाजीं सर्वोत्कर्षे प्रतापवंत । त्रयोदशाक्षरमंत्र अति विख्यात । सर्वसाधारण असोनि सर्वांसी युक्त । सकाम आणि निष्कामता ॥७३॥ याहिवेगळे मंत्र असती आणिक । अग्नि सूर्य सोमबीजेंसीं संम्यक । येक द्वि त्रि चतुः पंचवर्णक । तथा षडाक्षरी मंत्र ॥ ७४ ॥ यांत जें ध्यान आपणासी आवडे । ज्या मंत्रेंसी आपणांसी घटित पडे । तो चि मंत्र श्रीगुरूसी निजनिवाडें । प्रार्थूनि घेइजे सुमुहूर्तें ॥ ७५ ॥ षोडशोपचारीं करूनि श्रीगुरुपूजन । नमस्कारूनि अनन्यत्वें मंत्रग्रहण । पंचायत्नेंसीं श्रीरामपूजाविधान । विध्युक्त भक्तिपुरस्कर ॥ ७६ ॥ श्रीराम सीता लक्ष्मण । भरत शत्रुघ्न हनुमान । वाल्मीक मुनि आणि ऋक्ष-वानरगण । बिभीषणादि सकळ भक्तेंसीं ॥ ७७ ॥ तें चि ध्यान

---

१ छत्र, पडदा; किंवा रामउपासना या नांवाचा अध्याय. २ इडा आणि पिंगला यांचे मध्यसंधीस जी नाडी आहे ती. ३ श्रीराम जयराम जयजयराम. ४ रीस, अस्वलें.

पुजा विधी करणी । सांगिजेल यथोक्त पुढिलीये कीर्णीं । श्रोतीं स्वानु-भवदिनकररूप होऊनि । श्रवण कीजे निजउपासना ॥ ७८ ॥ दिनकर रामदासीं होऊनि विनित । उपासनारहस्य विचारूनि यथोक्त । स्वानुभवदिनकररूप विख्यात । निजात्मसिद्धीं साधिलें ॥ ७९ ॥ स्वस्ति श्रीस्वानुभवदिनकरे गुरुशिष्यान्वये सप्तम कळापे विष्णुउपासनारहस्यनिरूपण नाम चतुर्थ कीर्ण प्रकाशः ॥ ४ ॥

---

## श्रीराम

ॐ नमो जी श्रीराम । प्रणवैक[1] निजआराम । भक्तकामकल्पद्रुम । फळप्रद ॥ १ ॥ रामा तू चि जी मूळपुरुष । सच्चिदानंद निर्दोष । सर्वांगें अति सुवेष । परम रमणीय ॥ २ ॥ अर्द्धमात्रात्मकोराम । हा जाणोनि श्रुतिवाक्योद्गम । रामदासीं पूर्णकाम । स्वानुभवदिनकर ॥ ३ ॥ मकार तो चि मस्तक । हृदय तें उकारात्मक । निजपदीं सुशोभक । अकारु हा ॥ ४ ॥ पदींहूनि मस्तक । पाहातां पैं निष्टक । स्वरवर्णी सम्यक । श्यामांगशोभा ॥ ५ ॥ सव्यांग तो चि निगमें[2] । वामांगीं शोभे आगमें[3] । तेथें[4] चि ध्वनिरूपें मनोरमें । शक्तिसीता ॥ ६ ॥ सर्वाद्यपणें जें विशेष । तें ब्रह्मरध्र सुवेष । प्रवृत्ति निवृत्ति निर्दोष । कर्णस्थानीं ॥ ७ ॥ निर्विकल्प जें स्फुरण । ते चि नाशिका पूर्णपण । श्वासोश्वासश्वसन[5] । ते चि मार्गें ॥ ८ ॥ ज्ञानयोगयुगुळें[6] । ते चि द्वय नेत्रकमळ । आकर्णपर्यंत विशाळ । लावण्ययुक्त ॥ ९ ॥ सर्व हि जेणें मंत्रोच्चार । सयोगें सौभाग्यपर । तें चि मुख साचार । सर्वागमाद्य[7] जें ॥ १० ॥ ग्रीवादि कटिपर्यंत । जो हा शब्दब्रह्मादि गांथ[8] । कर्म उपासना ज्ञान युक्त । विलसे ज्यामाजीं[9] ॥ ११ ॥ तेथूनि चान्ही

---

१ केवळ ओंकारस्वरूप. २ वेद. ३ शास्त्र. ४ वामभागीं. ५ प्राणवायु आंत व बाहेर सोडण्याचा मार्ग तो च. ६ ज्ञानप्राप्ति व योगसाधन ही जोडी. ७ सकल शास्त्रांचे मूलस्थान. ८ गांठ=पिंजरा, किंवा गाथ=गान ९ शब्दब्रह्मरूप कोठ्यांतून.

कोंभ । मग निघाले स्वयंभं । तें चि चतुर्भुज डिंभ । पृथकत्वें जें ॥ १२ ॥ ऋग्यजु साम अथर्वण । स्वप्रतापें परिपूर्ण । आयुधेंसी विराजमान । देखिले चान्ही ॥ १३ ॥ निजसामर्थ्यें सपुरं । तो चि पैं नाभि गंभीर । रामगुह्याचा प्रकार । न वोलवे वाचा ॥ १४ ॥ पदें जीवशिवसंयुक्त । निजसमता विराजित । द्वद्वताभेदरहित । ऐक्यपणें चि जे ॥ १५ ॥ आघत सर्व साहित्याचें । प्रमर्थतेजें उज्जाळाचें । निजरगें निजांगीं साचें । अंबर वेष्टिलें ॥ १६ ॥ अर्थसिद्धींचे परिकरं । सर्वांगीं अळंकार । शोभले सनागरं । अपारपणें जे ॥ १७ ॥ आतां ययावरी निजकरीं । आयणींचें जे कां च्यान्ही । ते चि आयुधें करीं । विजयश्रीय ॥ १८ ॥ धर्मजात जें सकळ । वर्णाश्रमयोगें अळुमाळें । तें वामकरीं सबळें । पर्जिलें चाप ॥ १९ ॥ अर्थप्राप्तीचा सतेजपर । सव्यकरीं घेऊनि अंर्धचंद्र । अहकारादि निशाचर । वधिले होडीं ॥ २० ॥ उपरी भंवस्वर्गादि सकळ-। विवर्जित कामकमळ । वामकरीं धरिलें बहळ । सुगधित पैं ॥ २१ ॥ यावरी निजजनसाह्यतेचा । जो का सदैव मोक्षश्रियेचा । सव्यागीं वरद नाभीकाराचा । अभयकर ॥ २२ ॥ पदबध सुदरपणें । तें चि करीं वीरककणें । छदाकित खेवणें । रत्नजडित ॥ २३ ॥ अक्षयत्वें तुंणीर । आत्मानुसधान ते शर । सारासारविचार- । स्कदीं शोभत ॥ २४ ॥ ऐक्यतेची येकांवळी । वैजयंती हृदयकमळीं । ब्रह्मपदक मेळीं[१८] । अभंग शोभलें ॥ २५ ॥ देवतामय गोमटी । विराजे पचरत्नमाळा कंठीं । शोभती पदकासम नेहटीं । पाच ही टाकें ॥ २६ ॥ मुख्य विष्णु आणि शकर । गणेश देव्या दिनकर । हा समूळ पंचायत्नप्रकार । देवतामय ॥ २७ ॥ तेथ सायोज्यादि मुकुंळें । आनदामोदें

---

१ स्वतःसिद्ध. २ आकृति. ३ वारीक. ४ परमार्थ किंवा विषय. ५ वस्त्र ६ चांगले. ७ तत्वनिर्णयेच्छा ८ चतुर्विध पुरुषार्थ. ९ किंचित्, कांहींबाही १० औपाधिक ११ अर्धचंद्राकार बाण १२ होड=पैज. १३ इहपरलोक. १४ बहुत, अमित. १५ भूषण १६ बाणभाता १७ एकेरी माळ. १८ मेळ=संयोग. १९ निरनिराळ्या देवताचे मुखवटे धातूच्या लहान लहान तुकड्यावर करून ते पुजेमध्यें ठेवतात त्यास टांक ह्मणतात. २० कमलपुष्पें.

बहेंळें । जेथ परादि वाचा हुकारमेळें । सतषट्पेंद क्रीडती ॥ २८ ॥ जें वर्णाश्रमसंरक्षित । त्रिगुणरूपें यज्ञोपवीत । ब्रह्मग्रंथिकासयुक्त । शोभलें कठीं ॥ २९ ॥ दशउपनिपर्थी युक्त । कटिसूत्र विराजित । वरी पेटियाँ रत्नखचित । षड्दर्शनाचिया ॥ ३० ॥ क्षुद्रघंटिका उपदर्शनीं । मतेंमतांतर किंकिणी । अहशब्दैंकरूनि । रुणझुणिती ॥३१॥ ययावरी निजपदीं । अळकार सोहंशब्दीं । तोडर दशनादि । हुकारत पैं ॥ ३२ ॥ निज प्रश्नेंचियाँ आराणुका । बोलों गेला जवं आधिका । तवं मुळीं चि आधीं चुका । थोर पडिला ॥ ३३ ॥ असो जो सर्वी हि वरिष्ट । अर्द्धमात्रेचा मुगुट । स्वतेजें बरवट । शोभला कैसा ॥३४॥ जेवि कां सर्व वर्णाचा आदि । शोभे प्रणवाची शुद्धि । कीं तें शास्त्रसंवाँदीं । वेदातशास्त्र ॥ ३५ ॥ कीं तेजसामाजीं भास्कर । अथवा उडगणीं चद्र । जेवि सुरवरीं इद्र । कां मेरु नगीं ॥ ३६ ॥ तेवि सकळ भूषणीं श्रेष्ठ । सर्वांग देखणा मुकुट । जो देखिलीया प्रगट । ध्यान देखिजे ॥ ३७ ॥ असो अष्टांगयोगें विराजमान । मनोरम्य सिंहासन । तेथ श्रीरामचद्रआरोहण । सहजस्थितीं ॥ ३८ ॥ आता मुख्य जे कां निज प्रधान । विचाराचे साहीजण । श्रीरामआज्ञां कर जोडून । यथाक्रमें उभे ॥ ३९ ॥ तेथ वेदातेंसीं नित्य विचार । ह्मणौनि सुमतनामें अति चतुर । इतर हि स्वमतानुसार । प्रसगें बोलती ॥ ४० ॥ कोण्ही साख्याचया अनुकारें । बोलती समयावसरें । तैसें चि न्यायाचीं वाक्योत्तरें । बोलती येक ॥ ४१ ॥ कोण्ही पातजळमताधारें । कोण्ही वैशेषिकानुसारें । मीमांसादि प्रचारें । बोलती येक ॥ ४२ ॥ कित्येक ते स्वमतानुसार । बोलणें बोलती अपार । आपुलाले प्रज्ञाप्रकार । दाविती पुढां ॥ ४३ ॥ परि जो कां नामें सुमत । जया विचारीं नित्य वेदांत । तयापुढें निजमत । कोण्हाचें न चले ॥ ४४ ॥

---

१ आनदरूप सुवास जिकडे तिकडे पसरला. २ सतरूप भुंगे. ३ एक दागिना. ४ सौर, शाक्त, गाणपत्य, शैव, वैष्णव, स्काद हीं सहा दर्शनें. ५ बुद्धीच्या ६ विश्रातीस्तव. ७ सर्व शास्त्राचा उहापोह करण्याचे वेळीं. ८ षड्दर्शनें. ९ स्वरूपानें.

तया आणि श्रीराममूर्ति । वेगळेंपणाची खेंती । अखंडतां संवादती । येकमेकेसीं ॥ ४५ ॥ इयावरी खोलेणीयें । अठराजण बंदिये । बोलती कीर्तिप्रमेयें । श्रीप्रभूचें चि ॥ ४६ ॥ यावरि ज्योतिषाचिया समाजा-। माजीं सिद्धांत जो का राजा । तेणें दिवटेंपण पैजा । अंगिकारिलें ॥ ४७ ॥ पुढें आयुर्वेद जो कां आघवा । तो चि उभविला मंडप सुहावा । इतिहासादि स्तंभीं बरवा । पुण्यप्रभामय ॥ ४८ ॥ तेथ आचार विधी गौरव । धर्मशास्त्रादि प्रस्तावँ । नित्य स्वराज्याची टेंवं । चालिजे न्यायें ॥ ४९ ॥ रामायणादि काव्यसमूह । बैसलासे सभाकटाह । स्तुतिमिसें श्रीरामगुह्य । प्रगटिलें जेहीं ॥ ५० ॥ मस्तकीं पूर्णतेचें येकछत्र । निवृत्तीचें आतपत्र । प्रवृत्तीचें चामरें विचित्र । मनोरम्यपणें ॥ ५१ ॥ तेथ कर्म आणि औपासन । भक्ति वैराग्य नैराश्य ज्ञान । हें चि मोंही मोर्तब सूर्यपान । मेघडंबरें पताका ॥ ५२ ॥ सभंवते देदिप्यमान स्वरवर्णी । सुर नर बैसले सभास्थानीं । रिद्धि सिद्धि त्या नर्तनीं । नाचती पुढा ॥ ५३ ॥ आतां प्रणवीं जेवि कां ध्वनि । कीं ते चंद्ररेखा विलसे गगनीं । अथवा जेवि ते कीळें शोभती रत्नीं । कीं मेघीं विज्जु ॥ ५४ ॥ ययापरि ते वामांकीं । शोभली मनो-रमा जानकी । जैसी कां ते आदिपुरुषीं मायादेवी ॥ ५५ ॥ आतां प्रणवा मांजिवटे । अकार उकार मकार गोमटे । कीं ते शुद्धसत्वा धा-कुटे । सत्व रज तम ॥ ५६ ॥ कीं तया आदिपुरुषासवें । असिजे ब्रह्मा विष्णु सदाशिवें । का जैसे इंद्रासवें । मरुद्गण ते ॥ ५७ ॥ कीं त्या पूर्णचंद्रासवें । शोभिजे कळा वैभवें । तेवि पुष्टिभागीं गौरवें । बंधु-त्रय पैं ॥ ५८ ॥ जो कां साक्षात् शेषावतार । शौर्यप्रतापें रणरंगधीर ।

---

१ वेगळेंपणामुळें उत्पन्न होणारा खेद ज्या ठिकाणीं कधीं दिसावयाचा नाहीं. २ गमनास योग्य ३ बंदीजन=भाट; तीं च अठरा पुराणें. ४ प्रमेय=विषय. ५ उपवेदापैकीं एक, वैद्यशास्त्र ६ सुशोभित, आवडता. ७ प्रसंग, गोष्ट. ८ ठेव=आकृति. ९ कटाह=कंदई १० छत्र. ११ चवरी. १२ गृह्याग्नि, उपासना. १३ आशारहित असणें १४ छत्री. १५ अब्दागिरी. १६ मेघडंबरी=उंच छत्री. १७ प्रभा. १८ मध्यें.

जेणें अहंइंद्रजीतादि असुर । पराभविले ॥ ५९ ॥ कामावरी जयाचा कुरुठा । जितेंद्रियत्वें परम लाठा । सेवागौरव निजपट्टा । घेतलें जेणें ॥ ६० ॥ नाम जयाचें लक्ष्मण । मैत्रीचें जो आयतन । ह्मणौनि सौमित्राभिधान । विख्यात परम ॥ ६१ ॥ तो पाठीसीं उभा सधीर । करीं चंद्रमरीचिवत चामर । वीजिता श्रीरामचंद्र । संतोष पावे ॥ ६२ ॥ तयापासूनि दक्षण स्थानीं । भक्तीची जेथ आयैणी । श्रीरामसेवागवेशनीं । वृत्ति केली ॥ ६३ ॥ श्रीरामसुखावऱ्हूनि जेणें । देहासगट राज्याचें सांडणें । करूनि स्वेछां वसणें । नंदिग्रामीं जया ॥ ६४ ॥ जिया बाइला नवमास पोटीं । राज्य जोडिलें परम सकटीं । ते माता तृणाहूनि धाकुटी । मानिली जेणें ॥ ६५ ॥ ऐसा जो भक्तराज चूडांरत्न । श्रीरामभक्तीचा परम प्रेत्न । तो नामें भरत पूर्वकयत्न । विजी चामर ॥ ६६ ॥ मग सर्वां धाकुटा सगुण । जयाचें नाम शत्रुघ्न । तो हि वामभागीं कर जोडून । उभा असे ॥ ६७ ॥ आतां नवांमाजीं संसमीचा । मिरांशी धणी जो कां साचा । जेणें मनोरथ स्वामींचा । पूर्ण केला ॥ ६८ ॥ जेणें केली सीताशुद्धि । लंका जाळिली त्रिशुद्धि । राक्षस मारिले कोट्यावधी । प्रतिज्ञापणें ॥ ६९ ॥ रामनामाचया प्रबधें । सेतु बांधला निजछंदें । अठरा पद्मं वानरवृंदें । उतरिलीं कटकें ॥ ७० ॥ केली राक्षसां बोहरी[14] । दोनि वेळ आणिला द्रोणागिरी । लक्ष्मणा जीवऊनि सुखशेजारीं । सीता राम ऐक्य ॥ ७१ ॥ पुष्पकीं सैन्यसमवेत । राम आले इथंभूत । शुद्धि सांगोनि भरत । सुखी केला ॥ ७२ ॥ परस्परें जालियां भेटी । स्वामी विराजले सिंहासनपट्टीं । दृष्टि ठेऊनियां चरणांगुष्टीं । उभा ठेला आपण ॥ ७३ ॥ पुढें तिष्ठे कैसियापरी । जेवि

---

१ घरटें, खजाना २ थोर, समर्थ. ३ पदवी. ४ स्थान ५ चंद्रकिरणाप्रमाणें चमकणारें. ६ वारीत असतांना ७ प्रसर, समुच्चय. ८ गवेषणा=शोध, किंवा गवसणी=व्याप्ति, आच्छादन. ९ जिनें, जीमुळें. १० शिरोरत्न. ११ नवविधाभक्तीमध्यें सातवी जी सख्यभक्ति तिचा. १२ हक्कदार. १३ निश्चयेंकरून. १४ भस्म, राख, रांगोळी. १५ सेजार=शय्या, १६ पुष्पकविमानातून १७ शोध.

प्रणवापुढें वर्णाक्षरीं । कीं तो अरुण तमारि[1] । पुढां जैसा ॥ ७४ ॥ कीं जेवि विष्णुपासीं गरुड । कीं शंकराजवळी वक्रतुंड[2] । कीं तया मेरू-पुढां प्रचंड । मंदर जैसा ॥ ७५ ॥ अथवा नृसिंहापुढें प्रल्हाद । कीं अर्जुनरथीं गोविंद[3] । कीं ते हंसापासीं[4] योगीवृंद । सनकादिक ॥ ७६ ॥ किंवा तो सद्गुरुपुढां सत्‌शिष्य । कीं तें धेनुपासीं निजवत्स । कीं श्रीरामचंद्राजवळी रामदास । जियापरि ॥ ७७ ॥ किंबहुना ययापरि । हनुमंत अरिगजकेशरी । विनीत होऊनि जोडलां करीं । श्रीरामापुढें ॥ ७८ ॥ आतां जाति होत्सातां कोळिक[5] । परि नारदानुग्रहें सम्यक । समाधीं बैसिजे निष्टक । युगपर्यंत ॥ ७९ ॥ मग तेणें पुरश्चरणप्रभवें । राममंत्रोच्चार गौरवें । अनागत[6] रामायण बरवें । बोलिजे वाणीं ॥ ८० ॥ नाहीं श्रीरामाची गोठी । नाइकिजे कर्णपुटीं । भविष्यपरी शतकोटी । कथिलें जेणें ॥ ८१ ॥ त्रैलोक्यकळहावत्सेदें[7] । विभागितां शंकर आनंदे । विषबाधा हरली नामछंदें । समाधिसुखें डोलत ॥ ८२ ॥ म्हणौनि त्रिभुवनीं पावन । रामचरित्र परम गहन । भाषिलें तो वाल्मीक कविरत्न । रामसान्निध्यें विलसे ॥ ८३ ॥ तैसे चि दत्तकपिलादि सिद्ध । स्तविती शंकरादि योगीवृंद । तुंबर आणि नारद । बृहत्साम गाती ॥ ८४ ॥ शुकसनकादि संत । वसिष्ठव्यासादि महंत । दशरथजनकादि श्रीमंत । श्रीरामसान्निध्यें शोभले ॥ ८५ ॥ सुर नर उरग[8] किन्नर । दिग्पाळासमवेत इंद्र । बिभीषण सुग्रीव रीस[9] वानर । स्मरणोद्यत उभे ॥ ८६ ॥ पुढें नानाविध वाद्यध्वनि । कळावंत नवरस गायनीं । प्रेमळ भक्त नामस्मरणीं । बैसले सुखें ॥ ८७ ॥ ज्ञानी जे कां आत्मनिष्ठ । अध्यात्मशास्त्रविचारी पष्ट । श्रीरामचंद्रीं तन्निष्ट । होऊनि ठेले ॥ ८८ ॥ सभास्थानीं परिचर्याकार । सेवेसी सेवक उभे

---

१ सूर्यापुढें. २ गणपति. ३ अर्जुनरथीं गोविंद असताना अर्जुन कृष्णापुढें जसा नम्र ४ विष्णु किंवा नित्यानित्य विचारकर्ते ज्ञानी अ. सद्गुरु. ५ किरात, कोळी. ६ पुढें होणारें, भविष्यमान. ७ कळह+अवच्छेदें=कलहप्रियता हा त्रैलोक्याचा स्वभाव असल्यामुळें. ८ सर्प. ९ मानवजाति अस्वल.

अपार । धुंशराचे भडमार । परस्परें करिती ॥ ८९ ॥ मध्यमडळीं
सिंहासनीं । सावळी मूर्ति विश्वसंजीवनी । दासां प्रसन्नमय होऊनि ।
अवलोकिलें सक्रूप ॥ ९० ॥ तिया वेळां केवि गमलें । जाणों कूर्मी अपत्या
नोकिलें[2] । कां ते चकोरा पाहिलें । जेवि शीतांशीं ॥९१॥ कां ते चातका
मेघ बोळले । कीं तें मृता अमृत जोडलें । कीं बाळासी माता दिधलें । स्तन-
पान ॥९२ ॥ कां तया शिष्यासी निजप्रीतीं । श्रीगुरु देइजे आत्मसविति ।
मग तया पूर्णत्वाची स्थिति । न बोलवे वाचा ॥९३॥ तेवि निजजनकल्पद्रमें ।
वेदातवेद्यें श्रीरामें । दासा अवलोकनसभ्रमें । सर्वां हि सुखमय ॥ ९४ ॥
तया सुखासी दृष्टांत । देता सरलें वस्तुजात । उपरतलें चित्त । ठाईंचा
ठाईं ॥ ९५ ॥ तो आनद जिरऊनि पोटीं । श्रीरामीं घातली दृष्टि ।
तव सभेचा घनदाटीं । मूर्ति कैसी देखिली ॥ ९६ ॥ जेवि प्रणवासवें
स्वरवर्ण । कीं इद्रासहित सुरगण । कां जेवि चद्रमा कळीं पूर्ण ।
पूर्णिमेसी ॥ ९७ ॥ अथवा उडगणां मध्यमणी । ध्रुव जैसा कां
गगनीं । का निजप्रकाशेंसीं द्युमणी । कीं हेमीं रत्न तें ॥ ९८ ॥
तेवि श्रीरामसभास्थानीं । शोभा विराजली पचायत्नीं । सीता लक्ष्मण
भरत शत्रुघ्नीं । हनुमंत बिभीषणेंसीं ॥ ९९ ॥ मध्यमणी श्रीरामचंद्र ।
वामांकीं सीता सुभद्र । पुढें हनुमान गुणसमुद्र । निजपृष्ठीं सुमित्र
॥ १०० ॥ यथाक्रमें वायव्यकोनीं । भरत शत्रुघ्न उभे स्वस्थानीं । पुढें
दक्षवामभागें कर जोडूनि । रक्ष रुक्ष वानर ॥ १ ॥ असो यापरि
परिवारयुक्त । सिंहासनीं श्रीरामचद्र शोभत । सुर नर ऋषि
मुनि स्तवित । पुष्पांजुळीसीं ॥ २ ॥ मग यथोचित प्रकारें ।
कृपापसाय स्वाधिकारें । श्रीरामें देइजे कृपाभरें । प्रसन्न होऊनि
॥ ३ ॥ जें जें जया मनोगत । तें तें स्वलीळां चि श्रीराम देत ।
भोळेपणें न विचारित । आहे नाहीं ॥ ४ ॥ कोण्हा दिधलें सलोकता-

---

१ सुगधी द्रव्याचे. २ लपविलें. ३ चद्रानें. ४ स्वस्वरूपाचें ज्ञान. ५ शात झालें. ६ बरोबर. ७ नक्षत्रामध्यें. ८ सूर्य. ९ कृपाप्रसाद. १० अधिकारी आहे कीं नाहीं हें न पाहतां.

ग्राम । कोण्हां समीपतेचा संभ्रम । येकां निजस्वरूपाचा विश्राम । दिधला प्रीतीं ॥ ५ ॥ उरले जे परम जवळा । तयां दिल्हा सगुण-सायुज्यसोहळा । परम भक्त जे हृत्कमळा– । मध्य भ्रमर ॥ ६ ॥ सर्वांसी हि सगुंणसुख । देऊनि सुखी केले निष्टक । मग उरले जे का अधिक । पूर्वीलांहूनि ॥ ७ ॥ तयां निर्गुणसायुज्य । दिधलें अक्षई सामराज्य । मग भजक आणि भज्य । दोंघे राहिले ॥ ८ ॥ त्या भजकाची लक्षणस्थिति । आणि कैसी करावी भक्ति । हें पुढि-लीये कळापीं यथामति । कीर्णप्रभवें सांगिजेल ॥ ९ ॥ एवं याप्रकारें उपासनारहस्य । सागितलें आद्यंत पंचधा सौरस्यें । हें आइकोनि श्रोतयांसी हास्य । येऊनि बोलती कृपाभरें ॥ ११० ॥ भला भला बा गुणनिधि । निसीम देखिली तुझी बुधि । उपासनानिश्चयेंसीं रहस्यसिद्धि । सांगितली यथोक्त ॥ ११ ॥ तू स्वानुभवें जे जे गोष्टी बोलसी । ते आह्मांप्रति भासे दिनकराऐसी । पांचा हि उपासनारहस्यासी । बोलिलें तुवा यथोक्त ॥ १२ ॥ आता भक्तीचें कैसें लक्षण । हें तुवा सांगिजे परिछिन्न । जेवि स्वानुभवदिनकरीं ब्रह्म पूर्ण । स्वसंवेद्य प्रका-शमय ॥ १३ ॥ इतुकें सतकृपावरदान । दिनकरें रामदासीं लाधोन । बोलिलें निजउपासनालक्षण । आतां सागेल निजभक्ति ॥ १४ ॥ तें स्वानुभवदिनकररूप । श्रवण करावें होऊनि सकृप । दिनकररामदासीं अमूप । रामचंद्रीं[3] सुखप्राप्ति ॥ ११५ ॥ स्वस्ति श्रीस्वानुभवदिनकरे गुरु-शिष्यान्वये सप्तम कळापे श्रीरामचंद्रउपासनारहस्यनिरूपणं नाम पंचम कीर्ण प्रकाशः ॥ ५ ॥ ॥ श्रीराम ॥ येकूण कळापवोवीसख्या ॥ ४१५ ॥ श्रीराम जयराम जयजयराम ॥

---

१ सगुणरूपदर्शनसुख. २ प्रसाद किंवा सुरसत्व. ३ श्रीरामदासांना श्रीराम-चंद्राच्या ठिकाणीं ज्याप्रमाणें सुखप्राप्ति झाली त्याचप्रमाणें दिनकरांना हि तेथेंच सुखप्राप्ति झाली.

## ॥ पंचधाभक्तिलक्षण कळाप ८ ॥

### ॥ श्रीरामचंद्रोजयति ॥

ॐ नमो जय जय जी सद्गुरु । अकल्पनाप्यनादि कल्पतरु । तव कृपां स्वानुभवदिनकर करूं । सकळ पारायण ॥ १ ॥ पूर्व कळाप्रकीर्ण मावळतां । उपासनारहस्य सांगितलें तत्वता । आतां वक्ष्माण कळापकीर्णीं स्वभावता । भक्तिनिरूपण सांगिजेल ॥२॥ तेथ बहुत प्रकारें असती भक्ति । परतु प्रस्तुत सांगितली पचधा युक्ति । बहुविध त्रिविध चतुर्विधोक्ति । तथा नवविध येकविध ॥ ३ ॥ त्यांत प्रथम सांगिजेल बहुविध भक्ति । पुढें यथाक्रमें अन्य सांगिजती । अंतःकर्ण सावध करूनि श्रोतीं । श्रवण केलें पाहिजे ॥ ४ ॥ तरि धातु मृत्युकीं कां काष्ट पाषाण । कळौयुगीं चहूं ठाईं देवतपण । आणि नाना तीर्थांचें जें कां जीवन । नद नदी गंगा सागर ॥ ५ ॥ मग ज्याचा जैसा भावार्थ जेथ बैसला । तो प्राणी तेथें चि लोधोनि पडिला । ऐसा नाना दैवतांचा करूनि गलबला । नाना प्रतिमा पूजिती ॥ ६ ॥ सुवर्ण रौप्य कांस्य ताम्र पितळ । याच्या प्रतिमा करूनि निर्मळ । पूजाउपचार करूनियां सकळ । नेमनिष्ठा भावार्थें ॥ ७ ॥ नाना जिनसाचे नाना पाषाण । त्याच्या प्रतिमा करूनियां निर्माण । त्यांसी हरिहराचीं नामें ठेऊन । भक्तिभावें पूजिती ॥ ८ ॥ मृत्यकेचीं लिंगें लाखोली । कां ते गणेशाची प्रतिमा केली । किंवा पंचसूत्रीं सप्तसूत्रीं साधिलीं । स्फटिकांचीं लिंगें उत्तम ॥ ९ ॥ अथवा तें पारेजाचीं लिंगें । केलीं औषधीरसयोगें । तें महा चमत्कृत अभ्यंगें । साक्षात्कारी सत्वतें ॥ १० ॥ नाना काष्टाचिया करूनि प्रतिमा । तेथें चि धरिला भक्ति-

---

१ अकल्पन+अपि+ अनादि=तूं खरोखर कल्पनातीत आहेस, परंतु मुळापासून तुला 'कल्पतरु' हें विशेषण देत आले आहेत, कारण तू कल्पिलेली वस्तु देणारा आहेस. २ पुढें सांगितलेल्या. ३ पुढील चरणांत सांगितलेली पांच प्रकारची भक्ति. ४ मृत्तिका. ५ स्फटिकाच्या बाणामध्यें मूळचे च निरनिराळे दोरे दिसतात, ते. ६ पाऱ्याची. ७ रसायणाचे योगानें.

भाव प्रेमा । त्यांचिया प्रतापसामर्थ्यगरिमा । ब्रह्मांड तुछ मानिती ॥११॥ बाणगंगेचा आणूनि पाषाण । त्याचें केलें प्रतिष्ठापन । इतुकेन कृतकृत्य होऊन । जन्मसार्थक मानिलें ॥ १२ ॥ नर्बदेतीरींचा पाषाण आणिला । तो महा सत्यांचा देव जाला । कां पोवळ्यांचा गणेश करूनि पूजिला । तो महा सत्याचा जागृत ॥१३॥ उत्तम निघोटं पाषाण पाहिला । त्याचा तांदळा बैसऊनि पूजिला । तो नवससायास पुरऊं लागला । भक्तां प्रसन्न होतसे ॥१४॥ तैसीं चि नाना स्थळीं नाना दैवतें । अत्यंत चमत्कारी महा जागृतें । परम आनद होऊनि लोकांतें । यात्रासमूह मिळती ॥१५॥ जेणें जैसा तेथें नवस केला । तो तत्काळ चि सिद्धीसी गेला । आपलिया वाचा भक्त बोलिला । तें देव करीत तत्काळ ॥ १६ ॥ ह्मणौनि गळ टोंची वाहे भळदीं । कुलुपें जिव्हे निजशिर छेदी । राहाडीं चालोनि परमानंदीं । भोग डांका घालिती ॥ १७ ॥ का तें नाना तीर्थें नाना दैवतें । स्थळोस्थळीं असती असख्यातें । तितुके ठाईं धावडूनि मनातें । आपण सैरा हिंडती ॥ १८ ॥ दक्षणमानस उत्तरमानस । तीर्थें असती असमसाहास[1] । तितुके हि स्थळीं सावकाश । भक्ति धरूनि हिंडती ॥ १९ ॥ हरिहरांच्या अवतारमूर्ति । धातु पाषाणी मनुष्याकृति । नाना टांक नाणीं पूजिती । सूर्यकांत सोमकांत ॥ २० ॥ गंडकी नदीचे सुंदर पाषाण । त्यांच्या उत्तम मूर्ति करून । अथवा शाळग्रामशिळा आणून । भक्तिपुरस्कर पूजिती ॥ २१ ॥ दशावतारांच्या अपार मूर्ति । मत्स्य कूर्म वराहाकृति । नृसिंह वामन हयग्रीव मूर्त्ती । राम कृष्ण जनार्दन ॥ २२ ॥ चक्रावन्हूनि जाणिजे नामसकेत । शकलें सत्तांकित नवांकित । चक्रतीर्थीचे चक्रांकित । शंख दक्षिणवामावर्त[3] ॥ २३ ॥ ज्योतिर्लिंगें विष्णुमूर्तिस्थापना । गणेशभगवतीचीं स्थळें नाना । पुण्यक्षेत्रें असंख्य[2] गणना । तितुके स्थळीं धरी भावार्थ ॥ २४ ॥ छपनकोटि हे वसुमति । इयेवरी तीर्थें क्षेत्रें अनेक असती । देवतास्थळें अति जागृती । साक्षात्कारी नेमस्त ॥ २५ ॥ सेतुबधीं रामेश्वर । वाराणसीचा विश्वेश्वर ।

१ सघन, परिपूर्ण. २ असख्यात. ३ आवर्त=भोंवरा.

तथा ब्रह्मगिरीसी त्र्यबकेश्वर । सोमनाथ सोरटीं ॥ २६ ॥ उजेनीचा महांकाळ । तथा गोकर्ण महाबळ । घृपणेश्वर निवास वेरुळ । तथा बद्रिकेदार ॥ २७ ॥ नागनाथ अवतीचा । वैजनाथ पर्यळीचा । मल्लिकार्जुन श्रीशैलीचा । तथा भीमाशकर ॥ २८ ॥ वोडिया जगन्नाथ पूर्वेसी । श्रीरणसोडिराय द्वारकेसी । बद्रिनारायण मेरुप्रदेशीं । दक्षिणदिशे श्रीरग ॥ २९ ॥ श्रीव्यकटेश स्वामीकार्तिक । वीरण्णा तथा पंढरीनायक । प्रयाग माधव पितरा स्वर्ग दायक । गया गदाधर ॥३०॥ अयोध्या प्रथम मोक्षपुरी । जेथें राजा रामचद्र राज्य करी । तथा दुजी कृष्णनगरी । मथुरा नाम जयेचें ॥ ३१ ॥ वाराणसी मुक्तिक्षेत्र । तथा काबेरीसंगम अति पवित्र । पुष्करतीर्थ कुरुक्षेत्र । आणि विंध्याचळवासिनी ॥ ३२ ॥ कांतीनगर मातापुर । सप्तशृग तुळजापुर । ज्वाळामुखी मोरेश्वर । प्रेमपुर जेजुरी ॥ ३३ ॥ शरयु गौतमी भागीरथी । नर्बदा गंडकी सरस्वती । क्षिप्रा यमुना गोमती । तापी पपासरोवर ॥ ३४ ॥ भीमा कृष्णा ताम्रवर्णी । नीरा तुंगभद्रा पयोष्णी । प्रभास अरुणाचळ त्रिवेणी । ऋषिआश्रम रामतीर्थ ॥ ३५ ॥ ऐसीं सकळ हि तीर्थें केलीं । सकळ हि देवतें पूजिलीं । व्रतें उद्यापनें संपादिलीं । अग्निहोत्रादि कर्में ॥ ३६ ॥ जे जे तीर्थांचा जो जो महिमा । विध्युक्त वर्तांव्यांची[1] गरिमा । भक्तिभावें धरूनि प्रेमा । यथाशास्त्रें संपादिला ॥ ३७ ॥ सकळ हि यथाकाळीं आचरला । परि निश्चय येके[3] ठाईं न धरिला । बहुविध भक्तीनें गवांविला[2] । नरदेह व्यर्थ चि ॥३८॥ जेवि कां ते जारिणी स्त्री बहुभर्तृका । अहर्निश भोगीतसे अनेकां । परि येकें हि कामतृप्त न होनि आणिकां । उत्तरोत्तर वांछितसे ॥ ३९ ॥ येके स्थळीं तिचा नाहीं निश्चय । ज्यात्यापासीं इछितसे विषय । तृष्णा कामना असभवनीय । द्रव्यविषयइछा ॥ ४० ॥ तैसा हा सकळ तीर्थें फिरला । सर्व दैवतें पुजूनि आला । परतु येका हि निश्चयाला ।

१ वर्तण्याचें महत्व. २ गमविला. ३ एकानें.

ठाव नाहीं सेवटीं ॥ ४१ ॥ जेवी वेश्येचिया अर्भकासी । वोळखी नाहीं निज पितियासी । सेवटीं श्राद्धा आणि तिळोदकासी । अधिकारी होय कोणता ॥ ४२ ॥ तैसें बहुविध भक्तीचें कारण । येके ठाईं न बैसे अंतःकरण । जेवि का ते बेराडी अथवा श्वान । अवघे च घरीं हिंडती ॥ ४३ ॥ दिवसभरि गाव फिरलें । परतु नाहीं किमपि पोट भरलें । आणि तृष्णे वरपडे होऊनि वहिलें । उगें चि हिंपुटी होतसे ॥ ४४ ॥ तेवि बहुविध भक्तीचिया नरा । इहलोकीं न दिसे सुखासी थारा । आणि परलोकीं गतीचा संसरो । तिळमात्र न दिसे ॥ ४५ ॥ ह्मणौनि कोण्हीयेकें ऐसें न करावें । येके दैवतीं निश्चय धरूनि भजावें । जैसें कां तें शुद्ध पतिव्रतेचें बरवें । आचरण सोज्वळ ॥ ४६ ॥ सहसा न दंडळी अंतःकरण । निजपतीसीं चि निश्चय पूर्ण । ब्रह्मांड हि वरी पडल्यां मन । आणिकां न घली सर्वथा ॥ ४७ ॥ कैसा तऱ्ही असो निजपति । परि त्याचे चि ठाईं भाव भक्ति । आज्ञेविरहित किमपि निश्चितीं । वर्तणें चि न घडे ॥ ४८ ॥ भर्त्तारवचनीं पूर्ण विश्वास । धरूनि चालवी कार्यकारणास । त्यासी ज्या प्रकारें वाटे संतोष । तें तें स्वयें वर्तणें ॥ ४९ ॥ ह्मणौनि तयेसी ह्मणती पतिव्रता । जयेची आज्ञा पाळिती अग्नि सविता । गंगा आणि सागरासी भरितें येतां । तियेच्या वचनें उतरती ॥ ५० ॥ तैसा हा प्राणी नरदेहासी येऊनि । जरि विश्वास धरी गुरुवचनीं । तदनुसार वर्ते कार्यकारणीं । तरि हा विश्वतारक होईल ॥ ५१ ॥ अनंत जन्में पुण्य आचरला । तेणें नरदेहासारिखें रत्न लाधला । तेथें हि मृत्याचा असे घाला । भर्वसा नाहीं क्षणाचा ॥५२॥ कमळदळीं जळबिंदु पडे । तो जेवि अति चंचळपणें धांवडे । तेवि नरदेहीं जीवित्व बहुडे । क्षण न लगतां तरंगवत ॥ ५३ ॥ यानंतर देहीं अमोल्यपणें आयुष्य । ब्रह्मांड देतां न लंभे

---

१ दुकळलेलें, आशाळभूत २ गुतलेले. ३ सत्वर ४ कष्टी. ५ येणेंजाणें. ६ डळमळे. ७ नाना सुकृताचें फळ । तो हा नरदेह केवळ ॥ दास १-४-१. ८ पळतो. ९ मागें सरतें, नाहींसें होतें. १० ब्रह्मांड बदल देऊन, गेलेलें आयुष्य क्षणभर परत मिळवीन ह्मटलें तर मिळू शकणार नाहीं, ह्मणून तें अमोल आहे.

निमिष्य । तें येणें व्यर्थ दवडिलें बहु भाव्यें । मन-बाष्कळ करूनि ॥ ५४ ॥ तरि कोण्हीयेकें ऐसें न करावें । अनन्यत्वें कायावाचामनोभावें । श्रीसद्गुरूसी शरण रिघावें । देहाभिमान सोडूनि ॥ ५५ ॥ गुरुवचनीं दृढ धरूनि विश्वास । आचरावें कार्यकारणास । तीर्थे व्रतें सकळ देवदेवतांस । गुरुआज्ञेनें भजावें ॥ ५६ ॥ जेवि निजपतीचा मनोगतरक्षणीं । पतिव्रता सासुसासऱ्याची करी मनधरणी । देरा भावया नणदांची बुझावणी । भर्तृसुखाकारणें ॥ ५७ ॥ तद्वत् गुरुवचनीं ठेऊनि भावार्थ । आचरावा प्रपच परमार्थ । देव देवता व्रत उद्यापन तीर्थ । गुरुआज्ञेनें करावें ॥ ५८ ॥ जेवि का तो सेवक स्वामीआज्ञेनें वर्ते । जीवित्व करी स्वामीकाजीं सरतें । तो इहलोकीं कीर्तिवत होऊनि परलोकातें । अनायासें चि पावतसे ॥ ५९ ॥ तैसा विश्वास ठेऊनि श्रीगुरुवचनीं । तदनुसार वर्ते निज कार्यकारणीं । तो कैवल्यसदनीं मिराशी धणी । अनायासें चि होईल ॥ ६० ॥ अहो सकळां देवाचें निज दैवत । तो येक सद्गुरुराज पूर्णभरित । सकळ हि तीर्थें विश्रातीसी येत । श्रीगुरुचरणीं ॥ ६१ ॥ व्रतें तपें उद्यापनें दानें । गुरुपदीं होती सकळ पावनें । ह्मणौनि काया वाचा मनें प्राणें । शरण रिघावें श्रीगुरूसी ॥ ६२ ॥ ऐसा आइकता चि । सद्गुरूचा महिमा । शिष्या अतरीं दाटला प्रेमा । तेणें गजबजोनी मनोधर्मा । निज देहभाव विसरला ॥ ६३ ॥ विस्मयें दाटलें निजअतरीं । सर्वांग कापतसे थरथरीं । रोमाचित होऊनि साकुरीं । घर्मबिंदु वोरेले ॥ ६४ ॥ सगद्गदें दाटले निजहृदय । सजळ नयन आनदमय । नृत्यान्वित निजपदीं थयथय । होतसे श्रीगुरुपुढां ॥ ६५ ॥ चित्त निजानदें अति निर्भर । स्मितहास्यें उत्फुल्लित अधर । तव निजकृपां सपूर्ण साचार । श्रीगुरु अवलोकिलें ॥ ६६ ॥ अवलोकूनि बोलिजे रुचिर । जेणें गगना निघों पाहाती अकुर । कीं तें अवतरलें जाणों साचार । शब्दब्रह्म केवळ ॥ ६७ ॥ अहो तें बोलणें

---

१ वायफळ गप्पा मारून. २ भाव्या-भावसा=वडील दीर. ३ समजावणी. ४ कृतकृत्य, धन्य. ५ शोक आणि मोह. ६ वारणें=लादणें.

कैसें गमलें । जाणों सुकतया झाडा अमृत सिंचलें । कीं काय चातकावरी तें वोळलें । गगन चि मेघरूपें ॥ ६८ ॥ का तें चकोरासी चंद्राचें पाहालें[१] । कीं चक्रवाकावरी सूर्यबिंब उदेलें । तेवि निजशरणांगतासी जालें । श्रीगुरुवाक्योदयें ॥ ६९ ॥ तरि ऐकें शिष्या सावधान । तुज काय अपेक्षा[२] ते करीं श्रवण । ऐसें ऐकतक्षणीं स्वानंदेंकरून । शिष्य डोले निजांगें ॥ ७० ॥ साष्टांगें घालूनि लोटांगण । जोडला करीं विनीत होऊन । ह्मणे जी काइसेन हि निजउत्तीर्ण[३] । होणें न घडे समर्था ॥ ७१ ॥ स्वामींचिया निजपदावरूनि आवडीं । जरी करूं ह्मणे निजदेहाची कुर्वंडी[४] । तव तें नैश्वरपणें जेवि राखोंडी । तिजहूनि दिसे निष्कारण ॥ ७२ ॥ तरी जी स्वामींचें होता वाक्यश्रवण । कळों सरलें वैराग्येंसीं विवेकलक्षण । तथा सत्कर्माचें सविस्तर लक्षण । पंचधा प्रकारेंसीं ॥ ७३ ॥ तैसा चि निजउपासनेचा निश्चय । कळों सरलो साकल्य यथान्वय । आणि उपासनारहस्यसमुच्चय । षट्दैवतेंसीं यथाक्रमें ॥७४॥ आतां भक्ति कासियासी ह्मणिजे । कोण्या प्रकारें देवासी भजिजे । आणि श्रीगुरूसी शरण रिघिजे । कवणेपरी देवा ॥७५॥ त्यांत कळलें जी बहुविध भक्तिलक्षण । आतां सांगिजो त्रिविध चतुर्विध भजन । आणि नवविध तथा येकविध भक्तिकरण । कैसें कीजे भगवद्भक्तीसी ॥ ७६ ॥ आणि करावें सद्गुरुभजन । किंलक्षण चतुर्विधज्ञान । तथा देहचतुष्टयनिर्शन । आणि महावाक्य[६] तें काय ॥ ७७ ॥ आणि माया अविद्या आहे कैसी । कैसें जाणावें जीवईश्वरासी । आणि देहशोधन तथा योगाभ्यासासी । जाणिजे कैसें जी ॥ ७८ ॥ प्रपंचाचा कैसा लयोद्भव । परब्रह्माचा कोणे रीतीं अनुभव । आणि बद्धमोक्षाचा सकळ प्रस्ताव[७] । यथायोगें सांगिजो ॥ ७९ ॥ इतुकें जव शिष्य बोलों न पुरे । तव श्रीगुरुस्वानंदासी जालें चेइरें[८] । वोरेंसें दाटलेंनि निजकृपाभरें । बोलों आरंभिलें ॥ ८० ॥ जेवि कां वत्साचें मुख लागतक्षणीं । धेनूसी

१ पाहालणें=उजाडणें. २ इच्छा ३ उतराई. ४ ओंवाळणी. ५ मनात आला. ६ गायत्री, तत्त्वमस्यादि वेदतुल्य वाक्यें तीं. ७ प्रसंग. ८ जागृति. ९ स्नेहभरित पान्हा येऊन.

पान्हा न धरे स्तनीं । कीं तया चंद्राचिया पूर्णपणीं । हेलावे क्षीरसमुद्र ॥ ८१ ॥ कीं तया वसताचिया अनुकारें । वनश्रिया लोटली फळभारें । तेवि सत्शिष्याचिया श्रवणादरें । श्रीगुरूसी अवस्था ॥८२॥ मग कृपाद्रवलेनि श्रीगुरुराजें । वक्तृत्व शरणागताचिया काजें । आरभूनि त्रिविध भक्ति वोजें[२] । सकोळित[३] दाविजेल ॥ ८३ ॥ दिनकर रामीं-रामदासकृपां । स्वानुभवदिनकरीं अनुभवसोपा । तो निजात्मदर्शनाचिया साक्षेपा । श्रोतीं श्रवण करावें ॥ ८४ ॥ स्वस्ति श्रीस्वानुभवदिनकरे गुरुशिष्यान्वये अष्टम कळापे बहुविधभक्तिनिरूपण नाम प्रथम कीर्ण प्रकाशः ॥ १ ॥

---

॥ श्रीराम ॥

मुख्य पाहातां भक्तीचें लक्षण । येक सगुणभक्ति येक निर्गुण । निर्गुणभक्ति ह्मणिजे अनन्यपण । श्रीगुरूसीं असावें ॥ १ ॥ अहो भक्त ह्मणिजे ऐक्य होणें । विभक्त जाणिजे वेगळेंपणें । यात ज्यासी जैसें मानेल तेणें । सुखें तैसें आचरावें ॥ २ ॥ परतु भक्त असतां श्लाघ्यवाणें । अभक्तपणें दिसे दैन्यवाणें । आतां याचीं सविस्तर लक्षणें । अनुक्रमें परिसावीं ॥ ३ ॥ तेथ भक्तपणाचें करितां व्याख्यान । देखिलें त्रिविध प्रकारें लक्षण । त्याचें समूळ आधीं निरूपण । वोळखीकारणें सागों ॥ ४ ॥ तरि भक्त विभक्त आणि अभक्त । यावेगळा येक सहजभक्त । याचीं वेगळालीं रूपें प्रस्तुत । सक्षेपें करूनि दाऊ ॥ ५ ॥ जेवि येक चि उदक पदार्थसगें । उसीं गोड तिखट मिरियासगें । कारलियामाजीं तें अवगे । कडुपण सहजें चि ॥ ६ ॥ तैसें त्रिगुणयोगें त्रिगुणभक्तिलक्षण । नरदेहीं प्रगटे प्राणियांलागून । उत्तम मध्यम

---

१ स्वरूपानें, आगमनानें. २ स्वच्छ, शुद्ध. ३ सक्षेपतः ४ प्रयत्नास, ५ प्रशंसनीय. ६ भासतें

कनिष्ठपण । प्रकृति होय गुणासारिखी ॥ ७ ॥ त्यांत सत्वगुणें जो प्राणी आथिला । तेणें प्रेत्नपूर्वक सत्संग धरिला । सतसंग धरूनि शनै शनै लागला । ईश्वरभजनीं भावार्थें ॥ ८ ॥ स्नान संध्या विध्युक्त देवतार्चन । गाईब्राह्मणांचें करावें संरक्षण । श्रौतस्मार्तादि कर्माचरण । अन्न देणें अतिथीसी ॥ ९ ॥ पितृमातृक्षयतिथीं अपरपक्ष । पुण्य-परोपकारीं अति दक्ष । भूतदया धर्मन्यायें परापेक्ष । वर्त्तणें निजश-रीरें ॥ १० ॥ शास्त्रचर्चा वेदपठण । नित्यनेमेंसीं पुराणश्रवण । अहर्निश अध्यात्मनिरूपण । सारासारविचारेंसीं ॥ ११ ॥ संत साधु महापुरुष । यांचे सेवेचा परम हव्यास । सगुण प्रतिमेचे ठाईं विशेष । अत्यादरें भावार्थ ॥ १२ ॥ या लक्षणीं जो पुरुष विल-सत । सत्वश्रिया लक्षणें श्रीमंत । त्यासी बोलिजे शुद्ध सात्विक भक्त । आतां विभक्तलक्षण सांगों ॥ १३ ॥ तरी ज्याचें रजोगुणाश्रयें आच-रणें । बाह्याकारें राजसी क्रिया करणें । तीर्थ व्रत देव फळप्राप्तीकारणें । दान पुण्य लौकिका भाग ॥ १४ ॥ अंतरीं फळप्राप्तीचा निजध्यास । धरूनि कर्माचा करणें आयास । स्नानसंध्यादि पूजाविन्यास । लोक-रीति दाखवणें ॥ १५ ॥ सत्वगुणाहिपरिस मोटा खटाटोप । उप-करणसामग्री कर्मकळाप । धोत्रेंपात्रें निपुण कुंड मंडप । झळफळीत बाह्य क्रिया ॥ १६ ॥ दाता देखोनि करी वेदाध्ययन । पुजा आलियां देवतार्चन । घरोवरीं करूनिया गायन । उदरपूर्ति करी ॥ १७ ॥ अग्निहोत्रदीक्षा यज्ञकंकण । हातीं बांधोनि मिरवावें याज्ञिकपण । पुजा प्राप्त जालियां घरीं टाकूंन । आपण फिरे देशोदेशीं ॥ १८ ॥ आश्रम असलियां हि गंगातीरीं । आपण गंगा टाकून फिरे देशाउरीं । भगवत्कीर्तन करूनि घरोघरीं । जनासी बोधी पोटासाठीं ॥ १९ ॥ कथामिसें भल्यांची निंदा करी । लोकासी परमार्थ सांगे नानापरी ।

---

१ थोरपणासी आला. २ भाद्रपद महिन्यांतील पक्षश्राद्ध. ३ दुसऱ्याच्या इच्छेनुसार. ४ छंद, सुख ५ खटपट. ६ विस्तार, थाटमाट ७ घरीं दुसऱ्यास करावयास सांगून. ८ देशावर, देशोदेशीं. उरी=ठाव किंवा स्थिति.

रडे पडे आक्रोशें बाह्याकारीं । पोटासाठीं छद नाना ॥ २० ॥ लोकांसी बोधी नानापरी । आपण करूं नये तें कर्म करी । कांहीं प्राप्त न होतां धिकारी । द्वेषें मत्सरें निलाजिरा ॥ २१ ॥ मेध्यावर्ति घाळूनि करी शिष्य । परमार्थबोधीं बहु भाष्य । काहीं पुजा देईना जरि शिष्य । तरी गुरगुरी श्वान जैसा ॥ २२ ॥ परमोल घेऊनि जाय तीर्थासी । अंगिकारी नाना दुष्ट प्रतिग्रहांसी । धरणें बैसोनि देवापासीं । फळ-प्राप्ति न होतां रागासी ये ॥ २३ ॥ जनासी सांगे दानधर्म करणें । घरासी अतीत येतां आपण नाहीं ह्मणे । जनासी सांगे पुराण श्रवणें । आपण करी भलतें चि ॥ २४ ॥ जें दैवत आपणासी प्रसन्न होय । तेथें क्षणक्षणा धावोनि जाय । लोकांसी सांगे साधनउपाय । निजउप-जीविकेनिमित्य ॥ २५ ॥ अर्थ देखोनि भक्ति दाखवी । कथेंत बैसोनि मान हालवी । धन मान आस्था धरूनि जीवीं । भजनस्थिति आचरे ॥२६॥ परद्रव्यावरी अत्यंत चित्त । परदारेचा ठाईं आसक्त । बाह्याकारें साधपण दावित । त्रिभक्त ह्मणावें पैं त्यासी ॥ २७ ॥ अंतरीं धनदारेवरी आस्था । बाह्यस्थितीं आचरे भजनसंस्था । तो भक्तपणें वर्ते परि त्रिभक्तपणें अवस्था । जाणिजे परिछिन्न ॥ २८ ॥ यानंतर अभक्तांची लक्षण-स्थिति । ते सांगिजेल यथामतीं । तरी जैसी कां तमोगुणाची असे रीति । तद्वत् जाणिजे अभक्त ॥ २९ ॥ कैंचा देव धर्म तीर्थ क्षेत्र व्रत । स्नान संध्या सत्कर्म न कळे इत्थंभूत । वेद शास्त्र पुराण श्रौत स्मार्त । ठाउकें चि नाहीं सहसा ॥ ३० ॥ मळशुध्यर्थ स्नान मात्र करणें । चांगलेंपणासाठीं गंध लावणें । नाना दैवतीं कामतृप्त्यर्थ भजणें । जप-जाप्य कुंडमंत्र ॥ ३१ ॥ प्रेतसाधन कां उच्छिष्टचांडाळी । बाळा बगळा मेसको मैराळी । नाना भूतें झोटिंग भजणें वेताळी । कां मुंज्या मानव-बाळांतिणी ॥३२॥ चेडें चेटकें कीळनोत्कीळनें । जारण मारण स्तंभन मोहनें । उच्चाटण वशीकरण उद्धाटनें । हा मंत्रजप अभक्तांसी ॥ ३३ ॥

---

१ दुसऱ्यास मध्यें घालून. २ वाटेल तें दान घेतो. ३ साधुत्व. ४ वाईट मंत्र. ५ या सर्व क्षुद्र देवता आहेत. सप्त व्यसनें.

स्वमांसपरमांसें करणें हवन । आगमक्रिया[1] मद्यपान । सप्त व्यसनीं ज्याचें अखंड मन । तो अभक्त नर जाणावा ॥ ३४ ॥ भल्यांसी देखोनि निंदा करी । छळनोक्ति बोलोनि धिकारी । वर्णाश्रमधर्मासी अव्हेरी । तो अभक्त प्राणी जाणावा ॥ ३५ ॥ करी वेदशास्त्रपुराणउत्सेद[2] । सत्पुरुषांचा द्वेष छळवाद[3] । सभेमध्यें घाली भल्यासी वाद । नाना विंदानीं[4] शब्द बोले ॥ ३६ ॥ काम क्रोध मद द्वेष मत्सर । असूया निंदा भय तिरस्कार । तृष्णा कामना कल्पना बहु फार । असे अंतरीं जयाचे ॥ ३७ ॥ न मनी संत साधु सात्विक सज्जन । देव धर्म तीर्थ व्रत उद्यापन । सगुण भक्तीचें उपासन[5] । उच्छेद करी तत्काळ ॥ ३८ ॥ ऐसें साकल्य[6] सांगतां अभक्तलक्षण । अत्यंत कंटाळतसे मन । ह्मणौनि कळावयासी वोळखण । संक्षेपमात्र बोलिलें ॥ ३९ ॥ एवं सात्विक राजस तामस । आश्रौंउनि[7] देहसंगास । भक्त विभक्त अभक्त लक्षणास । यथाक्रमें सांगितलें ॥ ४० ॥ तें साधकें सकळ करूनियां श्रवण । अंगिकारावें उत्तम भक्तलक्षण । मध्यम कनिष्ठ लक्षण वोळखोन । प्रेत्नपूर्वक त्यागावें ॥ ४१ ॥ यानंतर शुद्ध सात्विका मतीं । सांगिजैल द्विविधं[8] सगुणभक्ति । ते आइकोनि श्रोतीं श्रीमंतीं । तदनुसार वर्तावें ॥ ४२ ॥ तेथ सजीव निर्जीव दोनी प्रतिमा । नित्यें पुजावा परमात्मा । भक्तीं निजभावें धरूनि प्रेमा । सगुणदैवतीं भजावें ॥ ४३ ॥ तरी धातु मृत्युका काष्ट पाषाण । निर्जीव प्रतिमा चतुर्विध प्रमाण । त्यांचें बहुविध भक्तीमार्गीं लक्षण । यथाक्रमें सांगितलें ॥ ४४ ॥ त्या सर्वांत उत्तम शाळग्रामशिळा । जिचा सर्वोत्कर्षत्वें[9] प्रताप आगळा । पूज्यत्वें प्रतिमा ज्या कां सकळा । त्या सर्वांत श्रेष्ठ मूर्ति हे ॥ ४५ ॥ चक्रप्रमाणें[10] नामसंख्या जाणावी ।

---

१ तन्त्रमार्गानुसारी. २ उच्छेद. ३ वर्मयुक्त भाषण. ४ दोषारोप. ५ उपासना मूर्तींचा. ६ पूर्णपणें. ७ आश्रयेंकरून. ८ सजीव व निर्जीव. ९ अधिक. १० शाळिग्रामशिळेवर जितकीं चक्रें असतील त्याप्रमाणे त्याचें नाव असतें; जसें, द्वि, त्रि चक्रांकित.

जाणोनि ज्यासी जे आवडी असे जीवीं । तेणें ते शाळग्राममूर्ति अवश्य पुजावी। प्राणप्रतिष्ठाविवर्जित[1] ॥४६॥ राम कृष्ण मत्स्य कूर्म नाम । वाराह नृसिंह त्रिविक्रम । हयग्रीव जनार्दन पुरुषोत्तम । लक्ष्मीनारायणमूर्ति पैं ॥ ४७ ॥ वासुदेव संकर्षण शिवनाभ । दधि वामन माधवमूर्ति पद्मनाभ । सप्तांकित नवांकित हिरण्यगर्भ । सीताराममूर्ति ॥ ४८ ॥ गोपाळ गोविंद अनंत श्रीधर । मधुसूदन विष्णुमूर्ति दामोदर । ऐसिया शाळग्रामशिळा अपार । निजभावें पुजाविया ॥ ४९ ॥ शाळग्रामशिळा असे ज्याचे गृहीं । त्यासी कामकाळाचें भय कदापि नाहीं । जन्म जरा दरिद्र मृत्यभय हें सर्व हि । त्यासी देखतां चळीं कांपती ॥ ५० ॥ सहज शाळग्रामशिळेचा ज्यासी होय स्पर्श । तो पुण्यवंतांमाजीं उत्कर्ष । त्यासी सदा संतुष्ट होऊनि जगदीश । निज-आज्ञेमाजीं वर्त्ते ॥५१॥ शाळग्रामतीर्थबिंदु करितां प्राशन । होय अनंता जन्मांचें दुरित[2] दहन । तो सर्वांगीं होऊनि पुण्यपावन । कळिकाळासी होय अजिंक ॥ ५२ ॥ शाळग्रामासी वाहाता तुळसीदळ । अनंत ब्रह्मांडांचें लाभे फळ । शाळग्राम जवळी असलिया सर्वकाळ । त्यासी नरकभय न बाधी ॥ ५३ ॥ एव निर्जीव प्रतिमांमाजीं शाळग्राम श्रेष्ठ । सजीवांमाजीं संत श्रीपादसंन्यासी वरिष्ट । यांच्या पूजनें जगदीश होऊनि संतुष्ट । कैवल्य[3] देतसे निजभक्तां ॥ ५४ ॥ श्रीपाद आलियां सहज घरासी । उद्धार होय सकळ पूर्वजांसी । केलियां अर्घ्यपाद्यपूजनासी । अनंत पुण्यफळप्रद ॥ ५५ ॥ परम आवडीं अत्यादरें करून । श्रीपादासी दिधलीयां अन्नदान । स्वयें संतुष्ट होऊनियां भगवान । साम्राज्य-पद देतसे ॥ ५६ ॥ ज्याचे गृहीं ईति[4] जेविला । तेथें स्वयें परमात्मा तृप्त जाला । इति आणि परमात्मयाला । वेगळिक नसे सर्वथा ॥५७॥ अहो परमात्मा स्वयें संतृप्त जेथ । जाणावें त्रैलोक्य जेविलें तेथ । कां जे जगीं व्यापक जगन्नाथ । त्रैलोक्यनिवासी ॥ ५८ ॥ तो चि इति-

---

१ रहित, न करितां. २ पाप. ३ निर्गुण सायुज्य ४ यति.

रूपें मूर्तिमंत । साक्षात प्रगटला भूतळीं भगवंत । त्याचें पूजन करितां उपचार[1]युक्त । केवळ जगदीश पूजिला होय ॥ ५९ ॥ पुजा करूनि षोडशोपचारीं । त्यासी भिक्षा द्यावी परमादरीं । कौपीन वहि[2]र्वास दिध-लीया श्रीहरी । संतुष्ट होय सर्वस्वें ॥ ६० ॥ ज्यासी वाटेल जगदीश पुजावा । तेणें श्रीपादसन्यासी घरासी आणावा । त्यासी निजभावें पूजिता श्रीराघवा । परम सौख्य होतसे ॥ ६१ ॥ ह्मणौनि श्रीपादसं-न्यासी संत सज्जन । यांचें निजभावें करितां सेवे[3]न भजन । स्वयें सतुष्ट होऊनि त्यासी भगवान । कैवल्यपद देतसे ॥ ६२ ॥ संत सज्जन साधु माहापुरुष । स्वानुभ[4]वदिनकररूप जे निर्दोष । ज्यांच्या स्वरूपें स्वयें अवतार घेऊनि जगदीश । युगानुयुगीं अवतरे ॥ ६३ ॥ अहो सतरूपें श्रीजनार्दन । मूर्तिमत स्वयें अवतरला आपण । उद्धरा-वया भाविक दीन जन । शरणागतरक्षक ॥ ६४ ॥ सत केवळ सात्विकाचे सोयरे । सत विश्वतारक निश्चयेंसीं खरे । संतांकरिता दिसे सोजिरें[5] । भुवनत्रय हें ॥ ६५ ॥ संतांसी निजभावें रिघता शरण । आकल्प चुके जीवाचें जन्ममरण । सायुज्यमुक्तिसाम्राज्यसदन । निजकृपां प्राप्त होय ॥ ६६ ॥ सत स्वयें सहज येतां घरासी । निज-मुक्ति घर रिघे[6] आपैसी । करिता त्यांच्या अर्चनवंदनासी । आत्म-ज्ञादि फळप्राप्ति ॥ ६७ ॥ होता सहज सतांचें दर्शन । पूर्वजासहित होइजे पावन । केवळ तीर्थरूप ह्मणता[7] सज्जन । तीर्थमहिमा येकदेशी[8] ॥६८॥ तीर्थ कोण्हा काळें होय फळदप । सत सद्य तत्काळें[9] चि होती सकृप । तीर्थ नाशी जन्मांतर[10]पाप । जन्ममृत्यु नाशी सतकृपा ॥ ६९ ॥ आणि गगादर्शनें शतजन्मार्जित पाप नाशे । स्पर्शें त्रिशत सहस्र जन्माचें स्नानवशें । सताच्या दर्शनमात्रें हरती निशेषें । अनतजन्म-दुरितें ॥ ७० ॥ आणि चद्रदर्शनें शरीरताप जाय । सतदर्शनें त्रिविध-

---

१ उपचार=गौरव. २ वहि:=वहि:+वास=वस्त्र. बाहेरील किंवा वरून पांघरण्याचें वस्त्र ३ सेवा ४ स्वयप्रकाशरूप असा जो स्वात्मानुभव त्याप्रमाणें. ५ सुशोभित. ६ घरीं प्रवेश करते. ७ उपमा देता. ८ अल्प. ९ येणें चि काळें. १० मागील जन्मातील शिल्लक असलेलें पाप.

ताप दूरि होय । तथा कल्पतरु दूरि करी दरिद्रभये । संत जन्ममरण-दरिद्र नाशिती ॥ ७१ ॥ ह्मणोनि सतदर्शनें नाशे अनंत जन्मींचें पाप। आलिंगनें नाशती त्रिविधताप । निजानुग्रहवरद होतां संकल्प । दरिद्र नाशे जन्ममृत्यूसीं ॥ ७२ ॥ ह्मणौनि संत सकळादि वरिष्ट । सतसेवनें परमात्मा संतुष्ट । स्वयें सतासी आपण होऊनि येकनिष्ट । परोपरीं त्यासी भजतसे ॥ ७३ ॥ त्यांचा स्वयें जगदीश होऊनि नाटीकार । संतांसाठीं धरी नाना अवतार । करूनि दुष्ट दुर्जनाचा संव्हार । सतांसी रक्षी सर्वस्वें ॥ ७४ ॥ जेथें संत तेथें भगवंत । सतस्वरूपें आपण मूर्तिमंत । संतावेगळें येक मुहूर्त । होणें नाहीं श्रीरामा ॥ ७५ ॥ ह्मणौनि संत आवडीं पुजावे भजावे । काया वाचा मनें त्यांसीं शरण जावें । त्यासीं असावें अनन्यभावें । अत्यादरें परम प्रीति ॥ ७६ ॥ त्यांचिया भजनाची हातवटी । चतुर्विध नवविध परिपाटी । सांगिजेल पुढिलीये कीर्णसंपुटीं । श्रोतीं श्रवण करावें ॥ ७७ ॥ दिनकर रामदासीं होऊनि अनन्य । स्वानुभवदिनकरीं लाधला सौजन्य । तेणें गुरुकृपेचें पावोनि लावण्य । श्रीरामचद्रीं ऐक्यस्थिति ॥ ७८ ॥ स्वस्ति श्रीस्वानुभवदिनकरे गुरुशिष्यान्वये अष्टम कळापे त्रिविध भक्तिनिरूपणं नाम द्वितीय कीर्ण प्रकाशः ॥ २ ॥

---

॥ श्रीराम ॥

आतां चतुर्विध भक्तीचें लक्षण । सांगिजेल यथामति निरूपण । श्रोतीं करूनिया श्रवण । तदनुसार वर्तावें ॥ १ ॥ तरी चतुर्विध भक्ति ते कोण । श्रोता आक्षेपी विनीत होऊन । त्यासी वक्ता देतसे प्रतिवचन । चतुर्विध भक्तींसीं ॥ २ ॥ तेथ प्रथम भक्ति जाणिजे आर्त ।

---

१ कृपाळुपणें. २ जन्ममरणाच्या फेऱ्या चुकविणें हा च दारिद्र्यनाश संत करतात. ३ नाटकी=बहुरूपी. ४ राहवत नाहीं. ५ धाटणी, प्रकार. ६ रीत. ७ सुजनत्व, मित्रत्व. ८ शंका घेतली.

दुजी जिज्ञासा तिजी अर्थार्थ । चौथी ज्ञानभक्ति ते परमार्थ । पंचीकर्ण-महावाक्येंसीं ॥ ३ ॥ आतां आर्त ह्मणिजे तें किंलक्षण । तरि जैसें धेनूचें वछासी चिंतन । कां तें कमळिनीचें अनन्यपण । सूर्यैसीं देखिजे ॥ ४ ॥ अथवा तें आर्तभूत होऊनियां चातक । मेघां उजूं करितसे नित्य घोक । कां तो निजदर्शी लक्षावया मयर्क । चकोर नित्य आर्त-भूत ॥ ५ ॥ कां ते पतिव्रता निजनार्थेसीं । आर्तभूत आळिंगावयासी । अथवा कुमुदिनी चंद्रोदयासी । निज आर्तें जेवीं इछी ॥ ६ ॥ तेवीं मोक्षदानीं जो कां समर्थ । शरणांगतवत्सळ श्रीगुरुनाथ । निजभावें आर्त धरूनि तेथ । सादरता अनुदिनीं ॥७॥ ह्मणे कायावाचामनोभावें सद्गुरूसी शरण जावें । वेगीं आत्महित साधावें । आर्तभक्ति बोलिजे यासी ॥८॥ नरदेह चालिलें हातोहातीं । वेगीं धरावी संतसंगति । साधूनियां ज्ञानसंपत्ति । सायुज्यतामुक्ति वरावी ॥९॥ ऐसी अंतरीं धरूनि आस्था । करूं धांवे सत्संगसर्था । जेवीं का बीजवरांची अवस्था । लग्नसाधनीं उद्यंत ॥ १० ॥ कां तें वाणिज्यवंता पुरुषीं । उद्यमविषईं अति साहासी । तेवीं उद्यत होणें स्वहितसाधनांसी । या नाव बोलिजे आर्त-भक्ति ॥ ११ ॥ मग जेवीं का ते भृंगवेधें[११] आळिका । शनै शनै वेध लागतां निका । तद्रूप होय निमिष्या येका । न लोटतां भृंग केवळ ॥ १२ ॥ तेवीं आर्तभक्तीचिया अनुकारें[१२] । वेध लागतां स्वहितानुसारें । मन श्रीगुरुपदीं करिता सलग्न साचारें । त्यासी जिज्ञासा बोलिजे ॥१३॥ लोह जड परि चुंबकदर्शनें । चालों लागे निकट सन्निधानें । आळिंगा-वया उदित तेवीं श्रीगुरुकृपाकर्षणें । जिज्ञासा लक्षण जाणिजे ॥ १४ ॥ अथवा अग्निस्पर्श होतां इंधनीं । निजाकार न मोडतां इंधन होय अग्नि । तेवीं गुरुकृपाकर्षणें साधकालागूनि । जिज्ञासा बोलिजे पैं त्यासी ॥ १५ ॥ निजवाचें श्रीगुरुनामस्मरण । निजमस्तक श्रीगुरुपदीं

---

१ अखंड चिंतन. २ सूर्यदर्शन होण्याकरितां. ३ नीट, अनुकूल, ४ चंद्र. ५ चंद्रविकासी कमलिनी. ६ तत्परता. ७ आवड. ८ सदिच्छा=निर्णय. ९ दुसरें लग्न करणाऱ्या पुरुषाची. १० उद्युक्त. ११ भुंग्याच्या अखंड चिंतनामुळें १२ स्वरूपानें. १३ एकरूप.

ठेऊन । निजकरें श्रीगुरूचें पूजन । नित्यनेमेंसीं कर्तव्य ॥ १६ ॥ निजकर्णीं श्रीगुरुचरित्रकथा । ऐकोनि लागावें भजनपथा । श्रीगुरूवाक्याचा शब्दगांथा । स्वहितासी श्रवण करावा ॥ १७ ॥ श्रीगुरूचें सगुण निर्गुण ध्यान । निजनेत्रीं करावें अवलोकन । श्रीगुरूचें निर्माल्यजिघ्रणें । निजघ्राणीं करावें ॥ १८ ॥ निजपदीं प्रदक्षिणा श्रीगुरूसी । नमस्कार घालावे साष्टांगेंसीं । मस्तकीं धरूनि श्रीगुरुआज्ञेसी । कार्यकारणीं वर्तावें ॥ १९ ॥ निज वाचे श्रीगुरूसी वर्णावें । निज हृदईं श्रीगुरूसी आलिंगावें । निजअंतरीं अहर्निश करावें । श्रीगुरूचें चिंतन ॥ २० ॥ जेवि कां प्रतिव्रतेचिये निज मानसीं । कार्यकारणयोगें निज भर्तारेंसीं । तेवीं श्रीगुरुवेगळें न जाणे निज मानसीं । या नांव जिज्ञासा बोलिजे ॥२१॥ अनन्यभावें जे जिगीषता³ । या नांव जिज्ञासा बोलिजे तत्वता । सहजस्थितीं भजन जें स्वभावता । अहंपणविवर्जित ॥ २२ ॥ जेवीं दुधेंसीं मिळता जीवन । नामरूपकर्मेंसीं अभिन्न । तेवीं श्रीगुरुपदीं होणें सुलीन । या नांव जिज्ञासा बोलिजे ॥ २३ ॥ जेवीं अनन्यपणें गंगा सागरीं । कां ते उदकावरी ऐक्यपणें लहरीं । कां जैसें सुवर्णीं आणि अळंकारीं । वेगळेंपण न दिसे ॥ २४ ॥ तैसें शिष्यें श्रीगुरूसीं येतां येका हारीं । जिज्ञासा बोलिजे यासी निर्द्धारीं । एवं ऐक्यत्वें चि भजनाची परी । सहजस्थितीं चाले जो ॥ २५ ॥ असो यावरी अर्थार्थभक्ति । विवचिजेलें यथामतीं । तरी आपुलें सत्स्वरूप श्रीगुरुप्रति । ऐक्यस्थितीं अर्थिजे ॥ २६ ॥ जेवीं ते प्रभा जाऊनि सूर्यापासीं । विचारू बैसली निजरूपासी । कीं तो स्फुलिंगें झंगटोनि अग्नीसी । ह्मणे निंजरूप दावीं माझें ॥ २७ ॥ कीं जेवीं घृतकणिका घेऊनि धांडोळी[11] । घृतामाजीं निजरूप न्याहाळी । कीं ते जळगार देऊनि बुडी जळीं । स्वस्वरूप गेली पाहों ॥२८॥ तेवीं शिष्यें रिघोनि

---

१ श्रीगुरूनें रचिलेली सर्व कविता. २ वास घेणें. ३ सर्वांत श्रेष्ठ अशी वस्तु मिळविण्याची महत्वाकांक्षा. ४ 'मिळतां' असा शब्द पुढें आध्याहृत समजावा. ५ तरंग. ६ एका पक्तीला, समानत्वाला. ७ निरूपिजेल. ८ अंतर्भाव कर. ९ ठिणगी. १० भाडून. ११ शोध.

श्रीगुरूपुढें । आपुलें निजरूप पाहीजे कोडें[1] । जेवीं तरंग आपणासी पाहों वावडे । सागरामाजीं ॥ २९ ॥ का ते चंद्रकळा होती चुकली । ते चंद्राची प्रार्थना करूनि वहिली[2] । आपुलें निजरूप पाहों गेली । चुकलेंपणें आपणां ॥ ३० ॥ तेवीं शिष्यें अनन्यत्वें अर्थार्थभक्तीं । शरण जाऊनि श्रीगुरूप्रति । निजरूप अर्थिजे जेवीं दीपज्योति । अन्य दीपीं मिळों जाय ॥ ३१ ॥ कां जैसें सैंधव जाऊनि वहिलें । सिंधूसी निजरूप अर्थूं निघालें । कीं ते अंबुकर्णे[4] वेगळेंपणें झगटले । आवर्णोदकेंसीं ॥ ३२ ॥ असो ते नीळिमा अति विनीत होऊनि । निजरूपअर्थीं[5] रिघोनि गगनीं । तेवीं शिष्यें श्रीगुरूसी ऐक्यत्वें प्रार्थूनि । स्वस्वरूप अर्थिजे ॥ ३३ ॥ या नाव बोलिजे अर्थार्थभक्ति । शिष्यें आत्मत्व अर्थिजे गुरूप्रति । घटाकाशें[6] घटभंगीं जेवीं करूनि विनंती । गगना भेटों जाइजे ॥ ३४ ॥ का तो रँजरेणु[7] ऐक्यत्वें ह्मणे पृथ्वीसी । माझें निजरूप भेटवीं मजसी । तेवीं शिष्यें प्रार्थूनि ऐक्यत्वें श्रीगुरूसी । आपुलें निजरूप आर्थिजे ॥ ३५ ॥ एवं निजरूप अर्थिता श्रीगुरुप्रति । श्रीगुरूनें उपदेशिली महावाक्यस्थिति । तत्वमसि वाक्याचिया आत्मसंवित्तीं । ज्ञानभक्ति चौथी जे का ॥ ३६ ॥ तेथ तत्वमसि या वाक्याचा अर्थ । निर्गुण ब्रह्म तें तूं आहेसि यथार्थ । हें चि परिछिन्न जाणतां परमार्थ[8] । ज्ञानप्राप्ति सहजें चि[9] ॥ ३७ ॥ प्रथम तत्‌शब्दें केवळ शुद्धब्रह्म । मायोपाधिविवर्जित जें नित्य. सम । जीवशिवभेदादि प्रपंचसंभ्रम । अविद्येसीं[10] नाहींत जेथ ॥ ३८ ॥ तें तूं ब्रह्म शुद्ध बुद्ध नित्य निरंजन । जें माया अविद्यादि मळविहीन । पूर्णचैतन्य जें स्वसंवेद्य सनातन । निर्गुण निर्विकार ॥ ३९ ॥ तेथ अहंब्रह्मरूप जें मुळीं स्फुरण । विवर्तरूपें मूळमायेचें अधिष्ठान । तीमाजीं बिंबलें तें शबळब्रह्म परिछिन्न । ईश्वरस्वरूप

---

१ कौतुकानें. २ सत्वर ३ सद्गुरूजवळ शिष्य स्वस्वरूप च मागावयास गेला. ४ पाण्याचा थेंब. ५ प्राप्त होण्याच्या इच्छेनें. ६ घटामधील आकाश. ७ मातीचा कण. ८ 'तत्त्वमसि' या महावाक्याचा बोध शिष्याला केंव्हां होतो तें यावरून चांगलें ध्यानांत येतें. ९ या उपदेशग्रहणावरोबर ज्ञानभक्ति सुरू झाली. १० अविद्येसहित

॥ ४० ॥ तो ईश्वर निजमायेतें अधिष्ठूनि । प्रसवला[1] पंचभूतीं आणि त्रिगुणीं । पुढें अष्टधा प्रकृति कार्यकारणीं । निजांशें तेथें प्रतिबिंबला[2] ॥४१॥ त्यासी शुद्ध त्वपदार्थ बोलिजे । तो प्रकृतिसगें शबळत्व ओपजे । जेवीं घटमठसगें आकाशीं नाम आरोपिजे । घटाकाश मठाकाशत्वें ॥ ४२ ॥ तेवीं ईश्वरांश केवळ प्रकृतिसंगें । शबळत्वें जीवपण अंवगे । मग अविद्येसी रातोनि[3] निजांगें । मीमाझेंपणें भुलोनि ॥ ४३ ॥ मग आपुलें मुळींचें जें ईश्वरपण । तें विसरोनि देखे प्रपंचस्वप्न । सकल्पविकल्पीं भरोनि मन । मीमाझेंपणें बरळतसे ॥ ४४ ॥ मी येक सर्वगुणसंपन्न । माझें देह गेहें[4] दारा धन । ऐसा बोसणांव तव थापटून । सावध केला श्रीगुरूनें ॥ ४५ ॥ अरेरे प्राणिया सावध होईं । तू कोण आहेसी बरळसी[5] कांई । अहंब्रह्म निजस्मरणाचिया सोईं[6] । सावध होईं कां सत्वर ॥ ४६ ॥ इतुकें श्रीगुरुवाक्य निजकर्णीं ऐकतां । ॐ ह्मणोनि स्वरूपीं सावध जाला तत्वता । ह्मणे मी हें काय देखत होता । प्रपञ्चस्वप्न सत्यत्वें ॥ ४७ ॥ जेवीं तो द्विज स्वप्नावस्थेच्चिया सगें । नसतें चि अत्यजपण अवंगे । कीं तो राजा रक होऊनि मागे । कोरान्नभिक्षा घरोघरीं ॥ ४८ ॥ तव अकस्मात जागा जाला । जागेपणें अतरीं लाजिला । तेवीं प्राणी ॐ ह्मणोनि चमत्कारला[7] । श्रीगुरुकृपा होता चि ॥ ४९ ॥ तव शिष्य चमत्कारोनि ह्मणे स्वामींप्रति । जी मी कोण असे मुळींचा निश्चितीं । आणि मध्यें चि काय देखतसे हे व्यक्ति । भांबावलेंपणें ॥ ५० ॥ हें देह तरी पांचा आणि तींचें[8] । सकळ मिळोनि शभरा तत्वाचें । मध्यें मी हें कोण काह्याचें । तें न कळे जी मज ॥ ५१ ॥ ऐसें शिष्य अज्ञानपणें बोलतां । श्रीगुरूनें मस्तकीं हस्त ठेऊनि तत्वता । सप्रदायशुद्ध ज्ञान शोधूनि वेदांता । महावाक्येंसीं निरोपिलें ॥ ५२ ॥ सकळ हि प्रपचजात निरसूनि । निजकृपां सप्रज्ञातसमाधि[9] लाऊनि । तें तू ब्रह्म

१ उत्पन्न करतो. २ भासला. ३ रत होऊन. ४ गृह. ५ बरळू लागला. ६ मार्गानें ७ आश्चर्यचकित झाला. ८ पाच तत्वें आणि त्रिगुण याचें. ९ सविकल्प समाधि.

स्वानुभवदिनकरीं लाधोनि । महावाक्यार्थ विचारीं ॥ ५३ ॥ तया महावाक्याचिया आधारें । रामदासीं लाधोनि स्वानुभव दिनकरें । ज्ञेय लक्षूं जाइजे निर्धारें । निजज्ञातेंपणेंसीं ॥ ५४ ॥ तव ज्ञातेपण चि मुळीं वांव । तेथ ज्ञेयाचा कोणें घ्यावा अनुभव । ज्ञातृत्व-निराशीं ज्ञान हि स्वयमेव । विज्ञानेंत्व पावलें ॥ ५५ ॥ जेवीं कां इंधनाकारिता अग्नि प्रगटला । त्याचिया निराशें सुलीन जाला । तेवीं अज्ञानास्तव ज्ञानोदय जाला । अज्ञाननिराशीं विज्ञान ॥ ५६ ॥ एवं ज्ञेयेसीं ज्ञाता जालियां लयंगत । तेथ ज्ञानदशा हि सहजें विरमंत । जेवीं कर्पूरसंगें अग्नि होऊनि प्रदीप्त । सेवटीं अग्नि ना कर्पूर काजळी ॥ ५७ ॥ तेवीं शिष्यें श्रीगुरूचें लक्षितां ध्यान । त्रिपुटीसहित ज्ञान चि होय विज्ञान । जालिया मग ध्येयरूप सपूर्ण । श्रीगुरूसी पाहे सकळ ॥ ५८ ॥ पाहातां ध्यानें चि ध्येयाची कसंवटी । ध्यातेपणें त्याची करूं गेला ठीं । जेवीं अळंकारें सुवर्णाची करूनि खोटी । आपणां पाहे तिजमाजीं ॥ ५९ ॥ तवं आपण नामरूपकर्मेंसीं । नाहीं चि जाला निश्चयेंसीं । आववें चि सोनें हें हि म्हणावयासी । न दिसे चि पा कोण्ही ॥ ६० ॥ तेवीं ध्यानेंसीं ध्येय लक्षूं गेला । तवं ध्याते-पणासी चि स्वयें मुकला । एवं त्रिपुटीनिराशें भोगूं लागला । निजसुख आपुलें ॥ ६१ ॥ ऐसें निजसुख आपुलें आपण । भोगूं बैसे धरूनि भोक्तेपणें । जेवीं वंध्यापुत्रें गंधर्वनगरा जाऊन । खंपुष्पें भरिलीं निज-खोळेसी ॥ ६२ ॥ मग त्या खपुष्पाचा हार गुंफिला । तो निजमातेचा कंठीं घातला । तें निजदृष्टीसीं पाहों बैसला । निजसुख जेणें रीतीं ॥ ६३ ॥ तेवीं भोक्तृत्वाचें करूनि दृश्य । भोक्ता भोगूं बैसला स्वसुख-

---

१ व्यर्थ स्वतःचा शोध घेता घेता मुळापर्यंत गेलें म्हणजे शोध घेणारा अखेरीस मिथ्या ठरतो २ ज्ञानाज्ञान दोन्ही मावळून जी उर्वरीत स्थिति तिचें नाव. ३ सर्पण. ४ एकरूप, सुलीन ५ विराम पावते, विरमणें=विरणें अ० लाजणें. ६ परीक्षा. ७ स्थिति, ठिकाण ८ गोळा, लगड. ९ ध्यानाची त्रिपुटी नाश झाल्यावर स्वात्मसुखाचा उपभोग घेऊं लागला, परंतु हें म्हणणें हि पुढील दृष्टाता-प्रमाणें खोटें आहे; कारण येथें हि पुन्हां भोक्तेपणाची त्रिपुटी उत्पन्न झाली. १० आकाशांतील नगराकृति ढग दिसतात तें. ११ आकाशपुष्पें

सादृश्य । तयं त्रिपुटीसीं भोक्तयास चि अदृश्य । निजदृष्टीसीं देखतसे ॥ ६४ ॥ जेवीं का साखरेचा पुतळा केला । तो साखरेचें कारलें भक्षूं बैसला । सेवटीं कडु ह्मणौनि थुकूं लागला । गर्भांधादेखता पैं ॥६५॥ तेवीं भोग्य भोक्ता आणि भोक्तृत्व । याचें समूळ अवघें मिथ्यत्व । द्रष्टयानें नसतें चि दृश्यत्व । निजदृष्टीनें देखिलें ॥ ६६ ॥ का जें ज्ञातेनेंसीं ज्ञान झेईं हारपलें । तेथें ध्यानेंसीं ध्येय ध्याता कोठें उरलें । मां भोक्तेंनि भोक्तृत्व भोगिलें । काइसेन तन्हि ॥ ६७ ॥ ह्मणौनि हें दृश्यत्वें अवघें सारिलें । मग निजरूपाचें दर्शन घेतलें । तेणें द्रष्टयाचें मन सतोषलें । उन्मन जालें सहजस्थितीं ॥ ६८ ॥ ऐसा उन्मनाचिया अवकाशें । निजरूप अवलोकूनि सतोषे । तिये समईं जालें तें कैसें । माझें मज न बोलवे ॥ ६९ ॥ जेवीं कासवीचें सिंपोनि घृत । चित्रींचा हुताशन केला प्रदीप्त । तेणें शून्यवन जाळिलें समस्त । तेवीं हें दिसोनि आलें ॥ ७० ॥ मुळीं दृश्यपण चि जेथ वाव । तेथ द्रष्टयासी कैंचा ठाव । मां निजरूपदर्शनाचा उछाव । काइसेन तन्हि ॥ ७१ ॥ ह्मणौनि दृश्य द्रष्टा दर्शन । याचें समूळ जेथ मिथ्यापण । ऐसें स्वसवेद्य जें निजकारण । चिन्मात्रस्वरूप ॥ ७२ ॥ परतु त्यासी कारण हि ह्मणतां बिहे[6] । का जें मज कर्तेपण येऊं पाहे । आणि कार्य हि उभें राहे । निजकारणयोगें ॥ ७३ ॥ तरी कर्तेपण आधीं खरें असावें । मग तेणें कारणाचें कार्य करावें । ह्मणौनि आधीं कर्तेपणाचिया नावें । शून्यांकार दिसे ॥ ७४ ॥ अहो डोळियातील बाहुली धांवोन । आणिलें ससयाचें शिंग मोडून । तेणें गगनाचे नाकीं व्येसण टोंचून । पृथ्वीवरी पाडिलें ॥ ७५ ॥ तेवीं हे गोष्टी दिसोन आली । कार्यकारणकर्त्याची बोली । आधीं कर्त्याची चि जेथें ली पुसिली । तेथें कार्यकारण काइसें ॥ ७६ ॥ ह्मणौनि कर्ता कर्मेसीं निजकारण । हें त्रिपुटसिहित दृश्यत्वें गेलें हारपोन । दृश्यमुळें द्रष्टा आणि दर्शन । भोक्तृत्वीं हारपलीं ॥७७॥

---

१ खोटे. २ ज्ञात्यावरोबर. ३ लीन ४ सामर्थ्येंकरून ५ शुद्धबुद्ध असे. ६ भितें. ७ नास्तित्व. ८ लयता. ९ नाहींशी झाली.

आतां भोक्तृत्वासी जेथ न दिसे ठाव । तेथ भोगणें हें ध्यानेंसीं वाव । मां ध्येय ध्याता स्वयमेव । झेईं सहजें चि सामावलीं ॥ ७८ ॥ विचारितां ज्ञेयाचें स्वरूप । ज्ञाता ज्ञानेंसीं जाला तद्रूप । जेवीं आंडीं वाळूनियां सर्प । पुन्हां मागतीं गिळीतसे ॥ ७९ ॥ तेवीं करितां ज्ञानाचें रूप सम्यक । उभारूनि त्रिपुटीसहित ज्ञानपचक । लयगत करूनि आपण चि निष्टक । विज्ञानस्थितीं उरलें ॥ ८० ॥ तेथ ज्ञेय ज्ञाता ज्ञानेंसीं । ध्येय ध्याता ध्यानेंसीं । भोग्य भोक्ता भोगणेंसीं । समूळ वाव ॥ ८१ ॥ दृश्य द्रष्टा दर्शनेंसीं । कर्म कर्ता कारणेंसीं । इया पाचा हि त्रिपुटींसीं । ज्ञानपचक ह्मणावें ॥ ८२ ॥ असो आर्तांचिया पडिभेरें । जिज्ञासेचिया अनुकारें । अर्थिजे अर्थानुसारें । आत्मज्ञान विज्ञानेंसीं ॥ ८३ ॥ एव सारासारविचारें ज्ञान । निजभक्तीं रामचद्र उपासन । स्वधर्मकर्म सरक्षून । भजिजे नित्य ॥ ८४ ॥ ऐसें चतुर्विध भक्तीचें निरूपण । सांगीतलें यथामतिकरून । दिनकर रामदासीं शरण । स्वानुभवदिनकरीं ऐक्यत्वें ॥ ८५ ॥ स्वस्ति श्रीस्वानुभवदिनकरे गुरुशिष्यान्वये अष्टम कळापे चतुर्विधभक्तिनिरूपण नाम तृतीय कीर्णप्रकाशः ॥ ३ ॥

---

॥ श्रीराम ॥

आतां पूर्णिमारूप स्वानुभवदिनकर । तेथ चतुर्विधभक्तिकीर्णसूर्यास्त होता साचार । वर्द्धमाण कीर्ण चद्रोदयकर । नवविध भक्तीसीं फाकलें ॥ १ ॥ त्याचें यथामति कीजैल निरूपण । श्रोतीं अत्यादरें करावें श्रवण । दिनकर रामदासीं अनन्य शरण । स्वानुभवदिनकरेंसीं ॥ २ ॥ तरि आधीं नवविध भक्ति त्या कोण । त्यांची कैसी समूळ वोळखण । त्या यथायुक्त करूनियां श्रवण । तदनुसार वर्तावें ॥ ३ ॥

---

१ चागलें २ आधिक्यानें, श्रेष्ठत्वामुळें. ३ स्वरूपानें. ४ पुढें सांगितलेलें.

तेथ श्रवण कीर्तन विष्णुस्मरण । पादसेवन अर्चन वंदन । दास्य सख्य आत्मनिवेदन । एवं आद्यंत नव हि ॥ ४ ॥ त्यांत प्रथम श्रवणाचें लक्षण चतुर्विध । कीर्तनाचे भेद दशविध । स्मरण करावें चतुर्विध । त्रिविध तें पादसेवन ॥ ५ ॥ तथा अर्चनाचीं सोळा अंगें । वंदन जाणावें अष्टांगें । दास्यभक्तीचीं अनंत अंगें । सर्वांगेंसीं कर्तव्य ॥ ६ ॥ सख्यभक्ति कीजे येकांगें । आत्मनिवेदन तें अनंगें । एवं नव हि यथाक्रमयोगें । सविस्तर सांगिजतील ॥७॥ तेथ प्रथम जे कां भक्ति श्रवण । तयेचें सांगिजैल लक्षण । अनन्यत्वें करूनि येकाग्र मन । श्रवण केलें चि करावें ॥८॥ जेवीं कां तो राजा परिक्षिती । भागवत श्रवण करी शुकोक्ति । किंवा तें शंकरमुखें पार्वती । करी रामायण श्रवण ॥ ९ ॥ किंवा याज्ञवल्कीमुखें विदेही[3] जनक । कीं तो सूतमुखें श्रवण करी शौनक । कीं तया वसिष्ठमुखें श्रीरामचंद्र सम्यक । योगवासिष्ठ श्रवण करी ॥१०॥ किंवा अष्टादश पुराणसमुच्चय । व्यासमुखें श्रवण करी जगत्रय । हरिवंशेंसीं महाभारत जनमेजय । वैशंपायनमुखें आयके ॥ ११ ॥ आणिक हि नाना ग्रंथसमुच्चय । अध्यात्म ग्रंथ गुरुशिष्यान्वय । ज्या ज्या योगें संसारतरणोपाय होय । तें तें श्रवण यथोक्त ॥ १२ ॥ वेद शास्त्रें स्मृति पुराणें । इतिहास काव्यें व्याकरणें । संस्कृत प्राकृत अध्यात्म निरूपणें । श्रवण करावीं ॥ १३ ॥ तेथ श्रवणाचें लक्षण चतुर्विध । तें यथाक्रमें बोलिजेल विविध । श्रवण मनन निजध्यास शुद्ध । साक्षात्कार चौथा ॥ १४ ॥ आदौ प्रथमात्र निजकर्णीं ऐकिजे । तया नांव श्रवण बोलिजे । मग सारासार अंतरीं विवरिजे । मनन बोलिजे त्यासी ॥ १५ ॥ अर्थ विवरितां अंतरीं सहजें । निश्चयेंसीं निजध्यास उपजे । तो चि दृढ धरितां निफजे । स्वरूपसाक्षात्कार ॥ १६ ॥

---

१ हीं लक्षणें कोणतीं तीं पुढें ज्या त्या ठिकाणीं सांगितलीं आहेत. २ शुकाचार्यांच्या मुखानें. ३ देह असून देहाची स्मृति नाहीं असा निर्विकल्प स्थितीचा अनुभव घेणारा. ४ महाभारताच्या पुरवणीरूप व्यासांचा ग्रंथ. ५ सविस्तर निरूपण कीजे. ६ ब्रह्मात्मैक्य; श्रवण, मनन, निदिध्यास यांच्या परिपाकेंकरून जें स्वरूपावस्थान तें.

एवं ग्रंथमात्र आइकिजे त्या नांव श्रवण । अतरीं अर्थ विवरणें त्या नांव मनन । निजध्यास धरणें त्या नांव ध्यासन । साक्षात्कार स्वरूपसमावेशें ॥ १७ ॥ ऐसी श्रवणभक्ति जाणावी चतुर्विध । श्रवण मनन निजध्यास साक्षात्कार शुद्ध । आतां कीर्तनभक्ति ते दशविध । यथाक्रमें सांगिजैल ॥ १८ ॥ तरी कीर्तनभक्तीचा मिरासी धनी । मुख्य जाणिजे श्रीनारदमुनी । तथा सामवेद बृहत्सामगायनी । दशविध लक्षणेंसीं ॥ १९ ॥ जैसा नारद तैसा चि तुबर । आणि गंधर्व कित्तेक गायनीं सादर । नित्य कीर्तन करी स्वयें शंकर । तेथें इतराचा केवा किती ॥ २० ॥ दशविध कीर्तनीं गणेश चतुर । तैसा चि हनुमंत साचार । शारदा हि कीर्तनाचा सर्व प्रकार । यथायुक्त जाणतसे ॥ २१ ॥ याहिवेगळे कित्तेक जण । करिती भगवद्गुणकीर्तन । सुर नर किन्नर यक्ष रक्षोगण । प्राणिमात्र त्रिभुवनींचें ॥ २२ ॥ तरी तें कीर्तन कैसें करावें । निजवाणीं भगवद्गुण वर्णावे । करुणारसें प्रेमप्रीतीं आळवावें । दशविधयोगें श्रीरामा ॥२३॥ तेथ कीर्तन नर्तन स्वर न्यास । मातृका मूर्छना तान विन्यास । धातमातेसीं भगवत्कीर्तनास । निजभावेंसीं कर्तव्य ॥२४॥ तरी कीर्तन ह्मणिजे मुखें गावें । नर्तन ह्मणिजे पदीं नृत्य करावें । स्वर ह्मणिजे कंठगत जो उद्भवे । आरोहअवरोहेंसीं ॥ २५ ॥ न्यास ह्मणिजे हस्तन्यास नेत्रन्यास । मातृका जाणिजे स रि ग म प ध नी स । मूर्छना बोलिजे याचिया उच्चारास । रागासी तान बोलिजे ॥२६॥ विन्यास बोलिजे ताळज्ञानास । धात बोलिजे गीतप्रबंधास । मात बोलिजे ग्रंथपाठांतरास । आणि मुखें गोष्टी सांगणें तें ॥ २७ ॥ यांत येक गुण असलीयां विकळ । तें अवघें चि दिसे पैं बाष्कळ । ह्मणौनि अभ्यास करूनि सकळ । भगवत्कीर्तन करावें ॥ २८ ॥ तथापि इतुकें नोहे अनकूळ । तरी करावा सोंबडे कथेचा गदारोळ । करुणाकीर्तनें हा ब्रह्मगोळ । दुमिदुमित भरावा ॥ २९ ॥ टाळ

---

१ पाड, थोरी. २ राक्षस जातीचे ३ खोटें, निरुपयोगी. ४ भोळसर. ५ पांडित्य, निरूपण.

मृदांग चंग उपांग । मेळऊनि करावा कथेचा धिंग[1] । कथाकीर्तनीं सतुष्ट श्रीरंग । पावे निजसमाधान ॥ ३० ॥ इतुकें न ठाके जीवें भावें । तेणें नित्य निरूपण तरि हि करावें । परि क्षणयेक रिकामें नसावें । भगवत्कीर्तनावाचूनि ॥ ३१ ॥ परतु निष्काम करावें । भगवत्कीर्तन । यावरी न करावें उदरपोषण । घरोघरीं करूनिया गायन । देशाउँर न करावें ॥३२॥ भगवत्कीर्तन करूनि द्रव्य मेळवणें । तें वेश्येपरिस हि निंद्यवाणें । जळो जळो त्याचें धिग्य जिणें । जो मोलें करी भगवत्कीर्तन ॥३३॥ असो यानतर विष्णुस्मरण । त्याचें चतुर्विध जाणिजे लक्षण । स्मरण चिंतन आणि अनुसधान । निजध्यास पैं चौथें ॥ ३४ ॥ विष्णुस्मरण प्रहरादें केलें । तैसें चि वाल्मीकास हि घडलें । शकरें निज विषबाधेसी हरिलें । रामनामस्मरणें ॥ ३५ ॥ इद्र सूर्य चद्र यम कुबेर । प्राणिमात्र स्मरणीं नित्य सादर । त्यांसी बाधू न शकती यमप्रहार । नामस्मरण निर्जनेटें ॥ ३६ ॥ जो कोण्ही नामीं विनटला । तो कळिकाळासी अजिंक जाला । ह्मणौनि रामनामस्मरणाला । कोण्हीं हि न करावा आळस ॥ ३७ ॥ त्या नामस्मरणाचे च्यार प्रकार । ते यथामति सांगिजतील सविस्तर । श्रोतीं श्रवण करूनि सादर । नामस्मरणीं दृढ व्हावें ॥ ३८ ॥ तरी स्मरण चिंतन अनुसंधान । चौथें येकात्मता निजध्यासन । एवं चतुर्विध प्रकारें नित्य स्मरण । निजउपासनेचें करावें ॥ ३९ ॥ तेथ स्मरण ह्मणिजे जें मुखें नाम उच्चारावें । चिंतन जें निज अतरीं च स्मरावें । अनुसधान तें चालतसे स्वभावें । इडापिंगळासंयोगें ॥ ४० ॥ चौथें निजध्यासन ह्मणिजे येकात्मता । नाहपणें सहजस्थितीं ब्रह्मीं ऐक्यता । एव विष्णुस्मरणभक्तीसी चतुर्विधता । यथाक्रमें सांगितलें ॥ ४१ ॥ आतां यानतर पादसेवन चौथी भक्ति ।

---

१ उपसाहित्य २ गजरधूम. ३ होईल, ठाकणें=राहणें, जवळ करणें. ४ देशावरी, परक्या देशात ५ ध्यान. ६ नामस्मरणाच्या आश्रयामुळें ७ मग्न झाला, रगून गेला. ८ वाम व दक्षिण नासापुटनाड्यांच्या सयोगाने किंवा कुंभक करून.

तिची त्रिविधप्रकारें कीजेल अभिव्यक्ति । जिची घडता यथासांग भज-नयुक्ति । सायोज्यता प्राप्त जड जीवा ॥ ४२ ॥ तरी सेवन भावन निजकारण । त्रिविध जाणिजे पादसेवन । पादसेवन ह्मणिजे चरण-संवाहन । सद्गुरूचें करावें भावार्थे ॥ ४३ ॥ जेवीं कां विष्णूचें चरण-संवाहन । लक्ष्मी करी नित्य निजभावेंकरून । कीं तें ब्राह्मणाचें अखंड करी सेवन । जगदीश स्वयें निजांगें ॥ ४४ ॥ तैसें चि सीता करिता श्रीरामदास्य । चरणसंवाहनाचें परम सौरस्य । लक्ष्मण भरत हनुमंतासी अवश्य । चरणसंवाहनीं अति आस्था ॥ ४५ ॥ उमा सावित्री रेणुका सती । लोपामुद्रा अनुसया अरुंधति । अति सादर भर्तारसेवेप्रति । चरणसंवाहनीं उदित ॥ ४६ ॥ तैसे चि निज-शिष्य आपुलालिया सद्गुरूप्रति । निजभावें चरणसंवाहन करिती । गोरक्ष अवधूतादि जनक नृपति । रामकृष्णादि अवतार ॥ ४७ ॥ आदिनारायणाचे चरणसंवाहनीं । ब्रह्मा सावध असे अनुदिनीं । आणि ब्रह्मयाचिया पादसेवनीं । वसिष्ठ नित्य सावध ॥ ४८ ॥ वसिष्ठाचें चर-णसंवाहन । श्रीराम करी येकात्मता भजन । श्रीरामजीचें नित्य पाद-सेवन । रामदासांसी अखंडित ॥ ४९ ॥ तैसें चि रामदासाचिया चरण-संवाहनासी । दिनकर सावध नवविध भक्तीसीं । आणि स्वानुभवदिन-कराचिया सेवनेंसीं । रामचंद्रीं निज ऐक्य ॥ ५० ॥ एवं दिनकरें करि-तां श्रीगुरुपादसेवन । अकस्मात निजअंतरीं सुखावोन । गुरुपरंपरा बोलोनि निमग्न । रामचंद्रीं सहजस्थितीं ॥ ५१ ॥ असो दिनकरें राम-दासकृपा लाधोन । रामचंद्रीं समर्पिली संपूर्ण । तेणें रामचंद्रदिनकरीं अभिन्न । रामदासकृपा ॥ ५२ ॥ तरी त्या पादसेवनाचें त्रिविध लक्षण ।

---

१ प्रगटता, अनुभव. २ श्रीरामाची सेवा. ३ आवड ४ उत्कंठित. ५ येथें दिनकरानी आपली गुरुपरंपरा सांगितली आहे. ६ यावरून दिनकरानीं आपले पुत्र रामचंद्र यांना अनुग्रह दिला होता असें होतें. ७ श्रीरामचंद्राच्या ठिकाणीं ८ श्रीरामदासकृपेनें दिनकराना जी वस्तु प्राप्त झाली ती तशी च त्यानीं आपले पुत्र रामचंद्र यांना अर्पण केली, त्यामुळें श्रीरामदासकृपा दिनकर व रामचंद्र या दोघांवर हि अभिन्नपणें झाली असें समजावयाचें.

सेवन अतर्भावन निजकारण । तेथ सेवन ह्मणिजे चरणसंवाहन । अतर्भावना[1] ते अंतरस्थिति ॥ ५३ ॥ निजकारण[2] तें मोक्षसाधन । एवं पादसेवनाचें त्रिविध लक्षण । तेथ अतर्भाव नसतां केलें पादसेवन । तरि तें निरार्थक चि कीं ॥ ५४ ॥ ह्मणोनि अंतर्भावें अतरस्थितीसीं । करितां पादसेवन भक्तीसी । तरी निजकारण कैवल्यपदेंसीं । सहजस्थितिसाम्राज्य ॥ ५५ ॥ असो यानतर अर्चनभक्ति पाचवी । षोडश लक्षणीं विराजली बरवी । पृथूनें यथाविधीं आचरतां पदवी । पृथ्वीवरी श्रेष्ठत्व पावला ॥ ५६ ॥ पृथूनें जगदीशाचें यथासांग । अर्चन केलें षोडशांग । तैसें चि सदाशिवें हि अव्यग । केलें विष्णुपूजन ॥ ५७ ॥ का तें विष्णु करी शंकरपूजन । कीं श्रीराम करी वसिष्ठार्चन । अथवा बिभीषण निजभावेंकरून । श्रीरामचंद्रासी अर्चितसे ॥ ५८ ॥ कां तें धर्म करी कृष्णाचें पूजन । कां तो प्रहराद पुजी नृसिंहालागुन । कीं तया दुर्वास देवाचें निज अर्चन । कृष्ण[3] करी निजभावें ॥ ५९ ॥ कां तें श्रीरामचद्रजीचें अर्चन । निजदास हनुमत करी आपण । कीं तें रामदासांचें निजभावें पूजन । दिनकर करी ऐक्यत्वें ॥ ६० ॥ आणिक हि जे जे शरणागत । ते गुरुपूजनीं होऊनि उद्यत । निजभावें सप्रेमता अति विनित । पूजिती षोडशोपचारें ॥ ६१ ॥ तरी आवाहन आसन अर्घ्य पाद्य आचमन । स्नान वस्त्रालंकार यज्ञोपवीत अष्टगधाक्षतलेपन । पुष्प धूप दीप नैवेद्य फळ तांबूळ सदक्षिण । निरांजन कर्पूर मंत्रपुष्पें ॥६२॥ तेथ आवाहन ह्मणिजे देवासी बाहावें[4] । आसन तें बैसावयासी द्यावें । अर्घ्य ह्मणिजे साक्षात उदक सोडावें । पाद्य तें चरणक्षाळण ॥ ६३ ॥ आचमन ह्मणिजे हस्तोदक[5] द्यावें । स्नान तें पंचामृत पुरुषसूक्तेंसीं करावें । वस्त्रालंकार परिधान करूनि घालावें । कठीं यज्ञोपवीत ॥ ६४ ॥ अष्टगंधाक्षतादि नाना पुष्पपरिमळ[6] । धूप दीप नैवेद्य खाद्य फळ तांबूळ ।

१ आस्तिक्यबुद्धि. २ निमित्त, हेतु. ३ श्रीकृष्णाचे गुरु तर सांदीपन या नामें होते? ४ बोलावणें. ५ सकल्पोदक. ६ सुवास.

दक्षणेसहित षोडशोपचार सकळ । कर्पूरदीप मंत्रपुष्पेंसीं ॥ ६५ ॥ आणिक हि नाना पदार्थउपचार । विध्युक्त पुजावा श्रीगुरु दातार । कां तें उपासनादैवत साचार । यथाविधीं पुजावें ॥ ६६ ॥ या नांव जाणिजे अर्चन भक्ति । यानंतर सांगिजेल वंदन यथायुक्तीं । वंदनाची त्रिविध जाणिजे अभिव्यक्ति । दंडवत अष्टांगें करद्वई ॥ ६७ ॥ वंदनीं सादर भक्त अक्रुर । दुजा देखिजे हनुमंत वीर । तैसें चि अठरा पद्में ग्हींस वानर । आणि बिभीषण भक्त ॥ ६८ ॥ लक्ष्मण भरत शत्रुघ्न सीता । वंदनीं सादर उद्धव प्रल्हाद तत्वता । पांच हि पांडव आणि कुंती माता । तैसा चि भीष्म विदुर ॥ ६९ ॥ कीं श्रीरामचरणीं साव-काश । वंदिती निजभावें रामदास । कीं रामदासीं दिनकर संपोश । वंदन भक्ति करितां ॥ ७० ॥ असो वंदन करावें त्रिप्र-कारें । दंडवत्तथा अष्टांग आणि द्वयकरें । तेथ दंडप्रायें शरीर सोडणें साचोकारें । या नांव शुद्ध वंदन ॥ ७१ ॥ कीं ते करूनियां निजभावें बद्धांजुळी । अष्टांगें न्यसावीं भूमंडळीं । कोणकोणतीं तें अवकाशमेळीं । श्रीमतीं श्रवण करावीं ॥ ७२ ॥ तरी मस्तक भूमंडळ बाहुद्वय हृदय । आणि नाभि उरु जानु पदद्वय । इतुका मिळोनि अष्टांगसमुच्चय । हा भूमीवरी न्यसावा ॥ ७३ ॥ ह्मणिजे या नांव साष्टांग नमस्कार । येणें प्राणीमात्र पावन होय साचार । शरणांगताचा तत्काळ उद्धार । साष्टांग नमस्कार करितां ॥ ७४ ॥ साष्टांग नमस्कारें पुण्य जोडे । आजन्माचें मोडलें सख्य घडे । आणि तो विकल्प हि तत्काळ मोडे । क्षण न लगतां पैं ॥ ७५ ॥ या नमस्कारायेवढें पुरश्चरण । त्रैलोकीं न दिसे दुसरें आन । सुर नर साधु सिद्ध पुण्यपावन । नमस्कारें चि जाले ॥ ७६ ॥ अनेक अपराध हि केले असतां । नमस्कारें क्षमा होती तत्वता । अनन्यभावें नमस्कार

---

१ पुष्ट. २ खरोखर ३ ठेवावीं. ४ मांड्या. ५ गुडघे. ६ हाडवैर असलें तरी.
७ परम अन्याय करूनि आला । आणि साष्टांग नमस्कार घातला । तरी तो अन्याये क्षमा केला । पाहिजे श्रेष्ठीं ॥ दास. ४-६-२०.

करिता । सायुज्यतामुक्ति प्राप्त ॥ ७७ ॥ असो नमस्कार कर्तव्य साष्टांग । श्रीगुरूस चि दंडवत यथासांग । सर्वांगेंसीं होऊनि अनंग । निजांगेंसीं विध्युक्त ॥ ७८ ॥ सद्गुरु देखतां चि अनन्यभावें । दंडप्राय देह सोडावें । काया वाचा मनेंसीं रिघावें । श्रीगुरूसी शरण ॥ ७९ ॥ आणि संत महंत योगेश्वर । कीं तें उपासनादैवत साचार । यांसी करावा साष्टांग नमस्कार । अनन्य प्रीतीं भावार्थें ॥ ८० ॥ कीं तें प्रत्यक्ष दैवत सूर्यनारायण । त्यासी करावें साष्टांग नमन । किंवा देखतां चि श्रीहनुमान । साष्टांग नमस्कार कर्तव्य ॥ ८१ ॥ आणि विष्णु शंकर गणेश भगवती । यांच्या प्रतिमा जेथें देखिजती । तेथ नमस्काराची अभिव्यक्ति । साष्टांगयुक्त कीजे ॥ ८२ ॥ यावेगळें सकळा अधिकारपरत्वें । मातापितरां नमस्कार अनन्यत्वें । मस्तकीं बद्धांजुळी न्यसूनि यथासांगत्वें । इतरां करदंई नमस्कार ॥ ८३ ॥ इतुकेन संपली वंदनभक्ति । आतां कीजेल दास्याची अभिव्यक्ति । दास्य येक केलें यथानिगुती । श्रीहनुमंतजीनें ॥ ८४ ॥ कायावाचामनें सर्वांगेंसीं । विनटोनि[3] श्रीरामपदकमळासी । दास्यभक्ति केली निजप्रतिज्ञेसीं । सर्वोत्कर्षप्रतापें[4] ॥ ८५ ॥ आणिक हि उदंड भक्त असती । थोर थोर राजे चक्रवर्ती । परंतु हनुमंताची निजदास्ययुक्ति । कोण्हांस हि नाटोपे ॥ ८६ ॥ आणिक असती दास कित्येक । कोण्ही काइक कोण्ही वाचिक कोण्ही मानसिक । परंतु त्रिशुद्धि[5] हनुमंतासारिखा सेवक । न भूतो न भविष्यति[6] ॥ ८७ ॥ हनुमंत निजदास येकांगें[7] । जे जे समईं योजला जो कार्यभाग । तो तो संपादिला यथासांग । परि दुजयाची वास[8] न पाहिली ॥ ८८ ॥ शतगावें उलथूनि उदधी[9] । प्रतिज्ञा केली सीताशुद्धि । लंका जाळूनिया त्रिशुद्धि । अशोकवनविध्वंस[10] ॥ ८९ ॥ रावणाचीं मुखें

१ दंडवत हे फक्त श्रीगुरूला, इतरांना साष्टांग नमस्कार. २ काठीप्रमाणें आंग धरणीवर टाकून द्यावें. ३ मग्न होऊन, रंगून जाऊन. ४ बलानें, प्रतापानें सर्वांपेक्षा वरचढ होऊन. ५ निश्चयेंकरून ६ आजपर्यंत कधीं झाला नाहीं व पुढें हि होणार नाहीं. ७ एकटा. ८ वाट, मार्गप्रतिक्षा ९ समुद्र. १० ज्या ठिकाणीं रावणानें सीतेला ठेवलें होतें त्या वनाचा.

जाळिलीं । अक्षयादि निशाचरां शांति केली । शुद्धि सांगोनि आनंद-विलीं । श्रीरामादि वानरकटकें ॥ ९० ॥ केला निजबळें सेतुबंध । पर्वततरुपाषाणीं सुबद्ध । राक्षसांसीं करूनि युद्ध । सपरिवारीं मारिले ॥ ९१ ॥ नागपाशीं ससैन्य राम पडतां । द्रोणाद्रि आणूनि जीवविलें तत्वता । पुन्हा जेथील तेथें नेऊनि ठेविला मागुता । न होतां पैं सूर्योदय ॥९२॥ तैसा चि लक्ष्मणासी होता शक्तिपात । च्यारि कोटि योजनें जाऊनि त्वरित । द्रोणाद्रि आणूनि केला सोचचित । पुन्हां पर्वत नेऊनि ठेविला ॥ ९३ ॥ मार्गीं काळनेमीनें छळिलें । विवसीसहित त्यासी मारिलें । अहिरावणें रामसौमित्र नेले । तेव्हां केला अकाळ प्रताप ॥ ९४ ॥ महिरावण स्वयें मारिला । अहिरावण कौशल्यें मारविला । मकरध्वज राज्यीं स्थापिला । सोडविला स्वामी प्रतिज्ञे ॥ ९५ ॥ श्रीरामा सीता भेटविली । भरतासी रामशुद्धि सांगितली । सर्वांची भेटी करूनि आनदविली । अयोध्यानगरी सकळ ॥ ९६ ॥ अकरा सहस्त्र वर्षें श्रीरामदास्य । ब्रह्मचर्याचें परम सौरस्य । हनुमतनाटक ग्रथकळौस्य । श्रीरामचरित्र वर्णिलें ॥ ९७ ॥ श्रीराम निजधामा गेलियां पाठीं । निजभक्त रक्षणें परम संकटीं । शरसेतु भगूनि केलें हिंपुटी । निजबळें अर्जुनासी ॥ ९८ ॥ अर्जुनाचें सहाय केलें । निजबळें अर्जुनासी रक्षिलें । बळिभद्रासी युद्ध करूनि सोडविलें । नाम निजस्वामीचें ॥ ९९ ॥ कळियुगीं घेतलें श्रीरामदर्शन । सहित सीता लक्ष्मण भरत शत्रुघ्न । बिभीषण सुग्रीव रीस वानरगण । पुढें आपण उभा असे ॥ १०० ॥ असो आणिक हि देव दानव मानव । यक्ष राक्षस किंन्नर गण गधर्व । ऋषी मुनी सिद्ध साधु संतसमुदाव । दास्यें करूनि थोरावले ॥ १ ॥ जेणें जैसें निजांगें

---

१ लक्ष्मणासी शक्ति लागेल जेव्हा । धरी रूप अकाळ विकाळ तेव्हां ॥ २ सावध. ३ रामरायाकडून. ४ कळासु=कौशल्य. ५ बलराम हें नाव. ६ कृष्णावताराच्या अखेरीस गरुडगर्व परिहार करून मारुतीरायाला रामरूपानें दर्शन दिलें. ७ श्रीरामसेवा करताना ज्यानीं जितक्या प्रमाणानें देह झिजविला असेल.

रामदास्य केलें । ते तैसीं चि महत्वें पावलें । रामदास्यावांचूनि कांहीं प्राप्त जालें । हें न घडे सर्वथा ॥ २ ॥ कोण्हीं रामदास्य केलें निजशरीरें । कोण्हीं संपत्तीच्या व्यवहारें । जेणें जैसें रामदास्य केलें त्यासी रामचंद्रें । पाविजे तैसें चि ॥ ३ ॥ वैराग्येंसी अतुळ रामदास्य । ग्रथवक्तृत्वीं परम सौरस्य । स्वानुभवदिनकरीं कृपाकळास्य । रामदासीं शोभलें ॥ ४ ॥ ह्मणौनि सर्वांगेंसीं रामदास्य भक्ति । हनुमतीं कीं रामदासीं शोभली युक्ति । तेणें स्वानुभवदिनकरीं निजकृपाभिव्यक्ति । परिपूर्णत्वें ठसावली ॥ ५ ॥ असो एवं सातवी रामदास्य भक्ति । सलक्षण सागितली यथामति । ऐसी चि सद्गुरूसीं दास्याची रीति । शिष्यें सहजस्थितीं आचरिजे ॥ ६ ॥ यानंतर आठवी सख्यभक्ति । सलक्षण सांगिजेल यथामति । अंतःकरणपूर्वक श्रोतीं श्रीमतीं । श्रवण कीजे ऐक्यत्वें ॥ ७ ॥ सख्यभक्तीचें येकविध लक्षण । मुख्य अंतरस्थितीचें कारण । देवा भक्तांचें जेवीं सख्यपण । कां तें गुरुशिष्यांमाजीं देखिजे ॥ ८ ॥ कां तें पतिव्रतेचें सख्य निजपतीसीं । कीं सेवकाचें सख्य निजस्वामीसीं । आक्रोशेंविण चाले सहजस्थितीसीं । तें निजसख्य जाणिजे ॥९॥ अहो जेवीं कां कृष्णेंसीं सख्य अर्जुनें । धरिलें काया वाचा आणि इंद्रियें मनें । तैसें चि श्रीरामचंद्रीं हनुमानें । निजसख्य चालविजे ॥ ११० ॥ कीं तें मातापितरीं सख्य साचें । कौशल्यादशरथेंसीं श्रीरामचंद्राचें । कीं रामसौमित्रभरतशत्रुघ्नाचें । बंधुत्वें सख्य देखिलें ॥ ११ ॥ किंवा स्त्रीपुरुषांमाजीं परम सख्य । श्रीरामसीता उभयतां सौख्य । कां तें स्वामीसेवकाचें शोधितां आख्य । श्रीरामचंद्र हनुमंत ॥ १२ ॥ आणि गुरुशिष्याचें सौख्य लाहाणें । वसिष्ठविश्वामित्रीं चाले श्रीरामपेर्खणें । प्रवृत्तिनिवृत्त्यात्मक उभयतां साजेणें । अतुळ देखिलें ये ठाईं ॥ १३ ॥ सुहृदत्वें सख्य विदेही जनकेसीं । अवतारशक्तीचें सख्य फरशरामेसीं । शत्रुत्वें रावणकुंभक-

१ भाळण तटा न होता पूर्ण समाधानयुक्त. २ अभिधान, नाम, कीर्ति. ३ लाभणें. ४ भूषण. ५ मैत्री.

ऐसीं । श्रीरामसख्य देखिलें ॥ १४ ॥ भक्तांमाजीं बिभीषणेसीं । प्रधानगणांमाजीं सुमंतेसीं । इंद्रादि सकळ सुरवरेसीं । श्रीरामसख्य देखिलें ॥ १५ ॥ कवेश्वरांमाजीं वाल्मिकेसीं । उपास्यत्वें परस्परें[1] सदाशिवेसीं । पूर्वजांमाजीं दिनकरेसीं[2] । श्रीरामसख्य देखिलें ॥ १६ ॥ शरणागतांमाजीं जटायूसीं । शिष्यांमाजीं हनुमंतेसीं । दासांमाजीं रामदासांसीं । श्रीरामसख्य देखिलें ॥ १७ ॥ ग्रंथांमाजीं स्वानुभवदिनकरेसीं । आवडतियांमाजीं निजनामेंसीं । कां तें दिनकररामींरामदासीं । श्रीरामसख्य देखिलें ॥१८॥ असो ऐसी सख्यभक्ति समग्र सांगतां । अपार वाढेल ग्रंथकथा । ह्मणौनि लक्षणें समजावयासी तत्वता । संकेतमात्रें सांगितलें ॥ १९ ॥ यानंतर आत्मनिवेदनभक्ति । यथाक्रमें बोलिजेल यथामति । जे नवमीमाजीं आत्माराम जन्म व्यक्ति । ते हे जाणिजे भक्ति नवमी ॥ १२० ॥ नवमी भक्ति आत्मनिवेदन । ह्मणिजे शोधावें आपणासी आपण । श्रीगुरुपदीं अष्टदेह निवेदून । आत्मत्व ठाईं पाडावें ॥ २१ ॥ ह्मणती बळीनें केलें आत्मनिवेदन । तरि तैसें नव्हे आत्मनिवेदनाचें लक्षण । तें त्यासी जालें निग्रहाचें कारण । तेणें देह निवेदिलें ॥ २२ ॥ तथापि सत्वधीर होय परिछिन्न । केले नव्याणौ अश्वमेध पूर्ण । तेणें[4] इंद्रासी भयकंप दारुण । ह्मणौनि जगदीश प्रार्थिला ॥ २३ ॥ जगदीशें भूमिदान मागितलें । तें याचेनि न जाय पुरतें दिधलें । मग पुरवणीस निजशरीर योजिलें । तस्मात् सत्वधीर सत्यत्वें ॥ २४ ॥ तिया सत्वश्रिया सामर्थ्यवंत । तेणें द्वारपाळ जाला भगवंत । पाताळींचें राज्य देऊनि सतत । अक्षई साम्राज्यीं स्थापिला ॥ २५ ॥ तरि तें नव्हे आत्मनिवेदनाचें लक्षण । आत्मनिवेदन आतां सांगिजैल परिछिन्न । करूनि देहचतुष्टयनिरशन । ब्रह्मीं आत्मत्व

---

१ श्रीरामाची उपासना श्रीशंकर व श्रीशंकराची उपासना श्रीराम, ह्मणून परस्परेंसीं असा शब्द योजला. २ श्रीरामचंद्राच्या वंशाची उत्पत्ति मूळ सूर्यापासून झाली, ह्मणून त्या वंशांतील राजांना सूर्यवंशी राजे ह्मटलें आहे. ३ अतिथी विमुख गेला तर आपलें सत्व जाईल, ह्मणून आपलें शरीर परमेश्वरास अर्पण करणें बळीस भाग पडलें, ह्मणून हें खरें आत्मनिवेदन नव्हे. ४ आणखी एक अश्वमेध यज्ञ केला असता तर इंद्राच्या पदाची प्राप्ति झाली असती. ५ त्रिपाद भूमि.

संयोजिजे[1] ॥ २६ ॥ सद्गुरूसी निजभावें रिघोनि शरण । विचारावें मी अमुका हें कोण । आणि परब्रह्माची वोळखण । कैसी ते पुसावी ॥ २७ ॥ ऐसें श्रीगुरुवाक्य निजकर्णीं ऐकता । शिष्य चमत्कारोनि पुढारिला तत्वता । जी जी स्वामी मज शरणागता । सनाथ केलें पाहिजे ॥ २८ ॥ स्वामी जें बोलिलेती[2] वचन । याची कैसी जी असे ऊर्णखूण । ते मज सांगावी सपूर्ण । निजकृपा कृपाळुवा ॥ २९ ॥ ऐसी ऐकतां शिष्यविज्ञापना । कृपां उचबळोनि श्रीगुरुराणा । ह्मणितिलें वाप आइकें आत्मनिवेदना । शुद्ध सप्रदायेंसीं ॥ १३० ॥ तरि मी अमुका आणि माझें हें सर्व हि । हें जें लटिकेंपणें वागविसीं निजदेहीं । यात तुझें असेल जें काहीं । तें हातीं धरूनि देईं आमुतें ॥ ३१ ॥ ऐसें ऐकतां श्रीगुरुवाक्य । शिष्य निजदेहीं विचारी तत्वपार्थक्य । वेगळेंपणें पाहातां शाश्वतेंसीं ऐक्य । कोठें चि न दिसे ॥ ३२ ॥ मग ज्या ज्या अवयवीं हात ठेवी । त्याची नैश्वरपणें दिसे पदवी । शिष्यें साकल्य विचारिता जीवीं । कांहीं न देखे आपुलें ॥ ३३ ॥ मग घाविरेंपणें बोले स्वामींप्रति । येथें माझें काहीं च न दिसे जी निश्चितीं । देह गेह स्त्री पुत्र धन संपत्ति । जाईजणें अवघें ॥ ३४ ॥ देह पांचा भूता आणि त्रिगुणाचें । वोतलें शंभरा तत्वाचें । तें अवघें चि नैश्वर दिसे साचें । तरि मी हें कोण ह्मणतसे ॥ ३५ ॥ जरि ह्मणावें हें शरीर ह्मणे । तरी हें येथें चि पडे नैश्वरपणें । जो करी ये सकळ शरीरचाळणें । त्यासी काय ह्मणों तें न कळे ॥ ३६ ॥ ऐसें ऐकतां सद्गदित शिष्यवचन । श्रीगुरु शिष्यासी ह्मणती सावधान । अयमात्माब्रह्म हें महावाक्य प्रमाण । वेदवेदांतप्रतिपाद्य ॥ ३७ ॥ अरे

---

१ सयोग कीजे. २ बोलू लागला. ३ बोललात ४ बाटाघाट. ५ आपल्या शरीरांतील सर्व तत्वें वेगवेगळीं करण्याचा प्रयत्न करू लागला व असें केल्यानतर त्यांपैकीं कोणचें तत्व शाश्वत आहे तें पाहू लागला, तों येक हि दिसलें नाहीं. ६ अशाश्वत ७ प्रत्येक जड शरीरांत चत्वार देह आहेत, त्यांमध्यें प्रत्येक देहाचीं, पांचांचीं पचीकरणानें झालेलीं पचवीस तत्वें आहेत, ह्मणजे चार देहाचीं मिळून शभर तत्वें झालीं ?

तुज जो न कळे तो आत्मा । परब्रह्मींचा अंश जो परमात्मा । तो प्रकृतिसंगें झाला जीवात्मा । घटमठाकाशवत ॥ ३८ ॥ घटीं व्यापलें तोंवरी घटाकाश । घटभगीं केवळ महदाकाश । तेवीं देहनिराशें आत्मा ब्रह्मींचा निज अंश । तो ब्रह्मीं समरसे सहजें चि ॥ ३९ ॥ त्यासी ह्मणावें आत्मनिवेदन । नवमी भक्तीचें निजलक्षण । ऐसें ऐकता महावाक्य विंदान । स्वानुभवदिनकरवत ॥ १४० ॥ तें स्वानुभवें महावाक्य ऐकोन । दिनकर रामदासीं सुखसपन्न । होऊनि केलें आत्मनिवेदन । श्रीगुरुपदीं सहजस्थितीं ॥ ४१ ॥ तेणें नित्य निजकर्णीं श्रीगुरुवाक्यश्रवण । मुखीं श्रीगुरुचरित्र नित्यकीर्तन । अतरीं श्रीगुरुनामस्मरण । करीं पादसेवन श्रीगुरूचें ॥ ४२ ॥ सर्वांगें श्रीगुरूचें नित्य अर्चन । अखड दंडवत श्रीगुरूसी वदन । निजांगें श्रीगुरुदास्य करून । सहजस्थितीं सख्य श्रीगुरूसी ॥ ४३ ॥ सेवटीं निजदेहेंसीं आत्मनिवेदन । श्रीगुरूसी सकळ केलें समर्पण । अतर्बाह्य स्थिति ऐक्यत्वें समरसोन । श्रीगुरुपदीं तत्सत ॥ ४४ ॥ दिनकर रामींरामदासीं समरसोन । सहजस्थितीं ऐक्यत्वें नवविध भजन । आतां येकविध भजनें पुढील कीर्ण । स्वानुभवदिनकरीं प्रकाशेल ॥ १४५ ॥ स्वस्ति श्रीस्वानुभवदिनकरे गुरुशिष्यान्वये अष्टम कळापे नवविध भक्तिनिरूपणं नाम चतुर्थ कीर्ण प्रकाशः ॥ ४ ॥

---

॥ श्रीराम ॥

ॐ नमो सद्गुरुदेव प्रसिद्ध । विश्वातीत विश्वोद्बुद्ध । निष्कळंक नित्यशुद्ध । पूर्ण परेश ॥ १ ॥ ॐ नमो देवादिदेव । चिच्छक्ति माया

---

१ एका च वस्तूस उपाधिभेदानें निरनिराळीं नांवें मिळतात. २ लक्षण. ३ मी कोण हें आधीं पाहावें, हें जड शरीर नाशवत असल्यामुळे मी नसून, मी कोणी तरी वेगळा आहे हें जाणावें, नतर ती वेगळी व्यक्ति, कोण हें शोधावें; तिचा शोध घेता घेतां शुद्ध परमात्मस्वरूप जें ब्रह्म तें च सर्व भरलें आहे, त्या व्यतिरिक्त जें दिसतें तें खरें नाहीं हें ओळखावें; श्रीगुरुस्वरूप हि तें च सत्य स्वरूप आहे; ह्मणून श्रीगुरुपदीं शिष्य समरसला ह्मणजे आत्मनिवेदन झालें असें समजावें. ४ उद्बुद्ध=जागृत झालेला, विश्व निर्माण करण्याची चेतना झालेली असा.

माधव । सर्व वर्णादि सेव्य[1] प्रणव । अक्षरैकाद्य[2] ॥ २ ॥ ॐ नमो देव नित्यानंद । अखंडितानुभव सुखद । विगळिताखिळ[3] भेद । स्वछंदपर ॥ ३ ॥ ॐ नमो देव अपरोक्ष[4] । क्षराक्षरातीत प्रत्यक्ष । मायाविद्या-निरस्त[5] निजमोक्ष । दानाध्यैक्षक[6] ॥ ४ ॥ ॐ नमो देव पूर्ण परेश । जगद्भ्रम नि:सरित निशेष । ब्रह्मानंदैक स्वप्रकाश । स्वसवेद्य ॥ ५ ॥ ॐ नमो देव निर्गुण । स्वसवेद्यैक पूर्ण । अनादि मायोत्तीर्ण । गुणा-तीत ॥ ६ ॥ ॐ नमो देव निसग । निजांग पूर्णत्वें अनंग । स्वप्रभा अपरमिताभंग । अप्रमेय[7] ॥ ७ ॥ ॐ नमो देव निष्कळ[8] । काळकळना-तीत केवळ । लीळा स्वब्रह्मांड[9] कृत कौतुहळ[10] । मायातीत ॥ ८ ॥ ॐ नमो देव अच्युत । परिपूर्णाद्यैकानंत । शब्दब्रह्माद्यखिलोद्भूत[11] । निश्व-सनें[12] ॥ ९ ॥ ॐ नमो देव श्रीआद्य । सच्चिदानंदैक प्रतिपाद्य । तव चरणीं दिनकर अभेद्य । श्रीरामदास[13] ॥ १० ॥ आता हे सच्चिदानदा-त्मक । त्रिपदयुक्त जें सम्यक । सद्गुरुनाम सकौतुक । पाहातेंपणें ॥ ११ ॥ पाहातां याचा मूळान्वयानुक्रम । तवं त्रिपुटीरहित जें निसीम । विचा-रितां आद्यत नाम रूप कर्म । अपरमित ॥ १२ ॥ पाहातेंपणें मूळा-धिष्ठान । पाहों गेला जवं सपूर्ण । तव नामरूपकर्मविहीन । अपार-पणें जें ॥ १३ ॥ तेथ नामाचा प्रथम निश्चय । करूं जातां केवळ अप्रमेय । आतां काय तन्हि नामान्वय । कल्पिजेल पैं ॥ १४ ॥ अहो निजप्रज्ञेचिया बळें[14] बहुत । शब्दब्रह्म ठेऊ गेला नामसंकेत । तवं नाम समुच्चयान्वित अनत । ध्वनी उठिलिया ॥ १५ ॥ तो[15] हि मग सोडूनि-यां जाणीव । पाहे निजनामसोय गौरव । तवं अनंता नामाचा प्रभंव[16] । देखे येके चि नामीं ॥ १६ ॥ तेथ निजानंदें प्रथम स्फुरण । निज-

---

१ चारी वर्णांनीं सेवा करण्यास योग्य. २ अक्षर+एक+आद्य=ॐ. ३ अखिल भेद विगलित ह्म. नाहीसे झालेले. ४ प्रत्यक्ष. ५ अविद्यारूप माया तिचें निरसन करणारा. ६ मोक्षाचें दान करणारांत अध्यक्ष ह्म. मुख्य. ७ प्रमाणास अतीत तें. ८ निर्गुण. ९ ब्रह्मांड. १० कौतुक. ११ शब्दब्रह्मादि+अखिल+उद्भूत. १२ वेद. १३ संबोधनार्थी. १४ शब्दज्ञानगर्वानें. १५ शब्दब्रह्म. १६ उत्पत्ति.

हर्षें आल्हादयुक्त होऊन । उच्चारी तवं आदिनारायण । सहजस्थिति पूर्णत्वें ॥ १७ ॥ तें नाम लाधोनि वेद निश्चित । ठेला स्वानुभवदिन-करीं निवात । तव मी हि पावलों अकस्मात । तये निजनामीं ॥ १८ ॥ करितां निजनामीं निवाड । तव तया मज येक चि पाड । तेणें उभ-यता जाणिवेचें बंड । विरोनि गेलें ॥ १९ ॥ मग तया आणि मज । नामीं ऐक्यता सहज । ऐसेंनि भोगू स्वानंदभोज । निजात्मयोगें ॥ २० ॥ तया नामगौरव निज लाहे । मुळींचा संकेत जव पाहे । तव अपार-पणें देखताहे । शुद्धस्वरूप ॥ २१ ॥ तेथ शुद्ध दृष्टीचा करूनि साक्षे-प । पाहे जव निखळ स्वरूप । तव नित्य शुद्ध बुद्ध अमूप । देखे सत्य सनातन ॥ २२ ॥ परी पाहातेंपणें न करवे ठी[२]। तेणें दृष्टि जाली उफ-राटी । मनें तर्कितां तें संदेठी । उन्मनत्वा आलें ॥ २३ ॥ वाचेसी पडलें मौन । वृत्ति गेली समरसोन । तेथ इंद्रियांचें चंचळपण । सहज चि ठेलें ॥ २४ ॥ ऐसें जव किंचित हो न सरे । तव कृपाळुवें श्रीगुरु दातारें । मम मस्तक स्वकरें । स्पर्शिजे कृपा ॥ २५ ॥ तो लाहोनि कृपापर्याय । तेणें वृत्ति जाली स्वरूपीं तन्मय । मग पाहात ठेला मूळान्वय । शुद्ध स्वरू-पाचा ॥ २६ ॥ जवं पाहातेंपणें चि आळुमाळ । पाहों गेलों स्वरूप केवळ । तव दुजेंपणें जेथ सबळ । संकल्प देखिला ॥ २७ ॥ शुद्धत्वें तरी जो अनादि । सबळत्वें तरी सर्वांची आदी । जेवीं आकाश वायु भेदी । परस्परानुयोगें ॥ २८ ॥ असो एव नररूपें जो शुद्ध संकल्प । सबळत्वें त्यासी होतां अयनारोप । ह्मणौनि आदिनारायण हा संक्षेप । बोलिजे निजनामीं ॥ २९ ॥ नार्मा तें नार ह्मणिजे उदक । स्वरूप सबळत्वें पाहाता सम्यक । तेथ गुणभूतसर्गें अयन निष्टंक । नारायण नाम हें ॥ ३० ॥ नाना ते भक्तशिरोमणी नररत्नें । त्याचें आयागमन चुकविजे यत्नें । ह्मणौनि हि बोलिजे प्रेत्नें । आदिनारायण ॥ ३१ ॥ एव सबळत्वें जव स्वरूप पाहे । तव आद्यंत मूर्ति चि

१ मोल, योग्यता २ ठिकाण ३ समूळ ४ प्रसाद. ५ किंचित् ६ सोपा-धिक. ७ अयन=ठाव, ठिकाण. ८ किंवा. ९ जन्ममरण.

देखताहें । मग पाहातेंपणाचया लेहें । पाहात ठेलों ॥ ३२ ॥ तवं मूर्ति तरी दिसे सगुण । परि निर्गुणत्वाचा साटोप गहन । जेवीं आकाश सघनत्वें पूर्ण । अष्टधायुक्त ॥ ३३ ॥ तेवीं पाहातां निजांग सकळ । दिसे अष्टधारूप केवळ । स्वरूप शोभे अति निर्मळ । देदिप्यमान निजाकारें ॥३४॥ तेथ मूळान्वयें मूळप्रकृति । रमलेपणें निजाकृति । तेणें राम ऐसी सविंत्ति । येकत्वें उठिली ॥ ३५ ॥ मग येकसरीं च मी मम वृत्ति । तिये स्वरूपीं जाली रमती । तेथ राम ऐसी सविंत्ति । ऐक्यत्वें उठिली ॥ ३६ ॥ असो ऐसी सगुणपणें आद्यतीं । शोभा शोभली चिन्मूर्ति । तेथ राम ऐसी सविंत्ति । निजात्मयोगें ॥३७॥ एव सच्चिदानदात्मक । श्रीरामचद्रमय सम्यक । श्रीगुरुमूर्त्ति निष्टक । साकारपणें ॥ ३८ ॥ तेथ आदिनारायण हें चि शुद्ध सत्पद । सबळत्वें केवळ श्रीराम चित्पद । उभयता ऐक्यें स्वानुभवीं आनंद । दिनकरा रामदासीं ॥ ३९ ॥ कां तें तत्पद शुद्ध आदिनारायण । त्वपद श्रीरामचंद्र गहन । स्वानुभवदिनकरीं असिपद पूर्ण । रामदासीं ऐक्यता ॥ ४० ॥ असो अपारपणें मम हृदयाकाश । शुद्ध चैतन्यान्वयें जो अवकाश । तेथ रत्नजडित सिंहासन सुवेश । सद्भावयुक्त ॥ ४१ ॥ पहिलें हृदयभूमिका अति शुद्ध । वारि प्रबोधकमळ विकाशे प्रसिद्ध । रचना अपूर्व देखिली अगाध । अष्टभाव दैळेंसीं ॥ ४२ ॥ वारि सात्विकादि अष्टभाव । तें चि सिंहासन अपूर्व । रचनेची केवळ हवावें । सुवर्णमडित ॥ ४३ ॥ जें निजतेजें अत्यंत तेजोमय । देखतां चि परम विस्मय । दृष्टि न थारे चि कपाय- । मान वाटतसे ॥ ४४ ॥ प्रभा पूर्ण ते रोमांचित । सर्व शरीरावयवीं थरकत । स्वेदांकित हिरकणियांखचित । हसित विकाशें ॥ ४५ ॥ परि अपारपणें गहन । शोभती अति सौम्य कीर्ण । तें स्पर्शतां चि सगद्गद कीं रुदन । ऐसें हि गमे ॥ ४६ ॥ नृत्यान्वित पदैक्यपणें । शोभा शोभिजे सिंहासनें । वारि मडपरचना अपारपणें । शृंगारमडित ॥ ४७ ॥ स्तभ अत्यत शृंगारिले । वीराकृति

---

१ हृदानें. २ पाकळ्यांनीं युक्त ३ शोभा

विराजले । करुणापर उभारले । रौद्रावेशें देदिप्य ॥ ४८ ॥ पाहातां मंडपाचा कळास्थें । तेणें हर्षे परम हास्य । आकृति भयानक परि सौरस्य । साहित्यशोभा ॥ ४९ ॥ वरि मुक्तलग रत्नगुच्छ । तळपती मेघडंबरमच्छ । तेणें कांहीं येक बिभत्स । मडप गमला ॥५०॥ आद्यंत पाहातां घवघवीत । रचना देखिली अति अद्भुत । वरि कळस सुंदर शोभत । शांतिरूप उत्तम ॥ ५१ ॥ एवं सिंहासन अष्टभावान्वित । वरि नवरसमय मंडप शोभत । माजीं अनन्यतेचें आसन आद्यंत । अंतिरंथीलें ॥ ५२ ॥ तेथें श्रीगुरुमूर्ति साजिरी । सच्चिदानंदत्वें गोजिरी । दिव्य तेजाची उंजरी । जाणों मुसावळी ॥ ५३ ॥ स्वयंप्रकाशत्वें स्वलीळा । उद्भट तेजाचा दिसे उमाळा । परंतु अति सीतळत्वें डोळां । देखिलें कैसें ॥ ५४ ॥ शारदीं पूर्णिमे पूर्णचंद्रु । अवलोकितां सुखावे चकोरु । कीं तो नवघनयोगें मयोरु । नाचतसे स्वसुखें ॥ ५५ ॥ किंवा ते सनकादि भक्त । विष्णुदर्शनें सौख्य पावत । अथवा निजसेवक आनंदत । स्वामी देखिलियां ॥ ५६ ॥ तेवीं निजरूप पाहातां निर्द्धारें । अहं सोहं समूळ विरे । सर्वांगीं आनंद भरे । स्वानुभवैक ॥ ५७ ॥ वर्णूं निजतेजाचा महिमा । ह्मणौनि शेष बोलिकेपणाचिया गरिसा । बोलों गेला तवं जिव्हा चिरोनि श्रमा । पात्र जाला स्वयें ॥ ५८ ॥ जया स्वरूपीं शंकर समाधिस्त । वेद नेतिपणें जाला स्वसुखें स्वस्थ । ज्ञानी योगी बैसले आसनस्थ । ज्या स्वरूपसमावेशें ॥ ५९ ॥ असो जया निजतेजविलासें । मीतूंपणाचा ठाव चिपुसे । ऐक्यत्वें वृत्ति समरसे । जेथील तेथ ॥ ६० ॥ जिया निजतेजदीप्तीं । चंद्रार्क प्रभेसह हारपती । अस्तोदय कल्पांतीं । नाहींत जेथ ॥ ६१ ॥ सतेजपणाचिया कोंदाटें । मी आणि मम हें समूळ आटे । बंध मोक्षासगटें । नाहीं होइजे ॥ ६२ ॥ ऐसें निजतेज परि सहज । अवलोकितां वाटे चोज । स्वानुभवदिनकरा ऐसें भोज । रामदासीं भोगिजे ॥ ६३ ॥ निजपदीं रत्नजडित पादुका । जीवशिवांकित

१ कळाशी. २ अथरलें. ३ उत्कर्ष.

सदीसिकां । खेवणीलीया सुरेखा । अति मनोहर ॥ ६४ ॥ तया पादुकांवरी युक्त । पद समत्वें विराजत । जेथ मूळमाया आसक्त । भुललेंपणें ॥ ६५ ॥ आरक्त शोभा पदतळीं । जेवीं बाळसूर्याची जावळी । ते क्षणिक हे सर्वकाळीं । देदिप्यमान ॥ ६६ ॥ देखोनि निजपदांचा महिमा । माया विसरली निजतेजगरिमा । मग ऐक्यभावें पदपद्मा । सेवा करी निजांगें ॥ ६७ ॥ मायेचा आवर्त सर्वांसी । बोलती वेदशास्त्रें सवादेंसीं । ते हि भुललेंपणें निजदासी । होऊनि ठेली पदैक्यें ॥ ६८ ॥ एव जेथ आमुची मूळमाया लुब्ध । तें चि ऐक्यत्वें ईश्वरपद । जेवीं प्रकृतिपुरुषां येकवद । सदैव ऐक्य ॥ ६९ ॥ शिवसनकादि परम विरक्त । ते हि निजपदीं होऊनि आसक्त । स्वानंदामोद सेवित । चिन्मयपणें ॥ ७० ॥ पदतळींचिया सामुद्रिकां । न वर्णवे हरिहरब्रह्मादिका । शेषा आणि वेदादिकां । अनुर्वाच्यत्व ॥ ७१ ॥ पदतळीं अति आरक्तता । मोक्षध्वज परम सुरेखता । ऊर्ध्वरेखांकित सगुण सायुज्यता । सतेजपणें ॥ ७२ ॥ निजपदीं स्वरूपतेचा अंकुश । समीपता वज्र सुवेश । पद्म यवांकित निर्दोष । सलोकता मिरवे ॥ ७३ ॥ ऐसें पदयुगुळ मनोहर । जे ससारश्रांताचें माहेर । जेथींचा महिमा अपार । वर्णिला नव जाय ॥ ७४ ॥ जया निजपदांकारणें । शकरें स्मशान वसवणें । विष्णूनें अनेक वेळा येणें । यया भूतळासी ॥ ७५ ॥ सुरवरासी जें अति दुर्लभ । ऋषींमुनींसी परम वाल्भे । ससारिकांसी तरि अलाभ । जया पदाचा ॥ ७६ ॥ सत साधु स्वानुभव । ज्ञानी योगी समुदाव । जेहीं सोडिली अह जाणीव । तयास चि प्राप्त ॥ ७७ ॥ येरें जें कां अभाविकें । छळकें आणि दूषकें । जे सदैव साधुनिंदकें । आत्महत्यारीं ॥ ७८ ॥ तया दोषजनिता जीवा । तये पदीं कैंचा रिगावा । जेहीं भवस्वर्ग हावा । कवळिलें आहाती ॥ ७९ ॥ असो ऐसें श्रीगुरुपदयुगुळ । निजतेजें तेजस्वी निखळ । जैसें कां गगन निर्मळ । निजाकारें चि ॥ ८० ॥ तिया गगनीं जेवीं पच तन्मात्रा । जालिया वेगळेंपणें स्वतत्रा । तेवी

---

१ खेवणी=जडित. खेवण=भूषण. २ भोंवरा. ३ एकत्व. ४ आवड. ५ शब्दस्पर्शादि पच विषय.

पदपंचांगुळतंत्रीं । शोभा आगळी ॥ ८१ ॥ मग जेवीं आकाशीं प्रथम स्फूर्ति । प्रसवे अंतःकरण संवित्ति । तेवीं निजांगुष्ठीं उत्पत्ति । गुप्तगंगेसी ॥८२॥ चरणांगुष्ठीहूनि निघाली । अपारपणें पुढें चालिली । त्रैलोक्यीं असंभवनीय व्यापली । दुरितदहनी ॥ ८३ ॥ दर्शनमात्रें शतजन्मार्जित । स्पर्शणें जन्मत्रयशत । स्नानें सहस्रजन्मसभूत । पाप जाय जीवाचें ॥ ८४ ॥ उगमदर्शनें तरि प्रत्यक्ष । जो का केवळ अपरोक्ष । तो भाविकीं पाविजे मोक्ष । स्वानुभवदिनकरीं केवळ ॥८५॥ ऐसी गंगा जे सुमहिम । तयेसी निजांगुष्ठीं जन्म । जियेनें शंकरासी परम । समाधिसुख ॥ ८६ ॥ असो निजांगुळाग्र नखें । शोभिजे अर्द्धचंद्रासारिखें । निजपदपृष्ठि देखें । कमळाकार ॥ ८७ ॥ जेवीं उपासकां यंत्रोद्धार पूर्ण । तैसीं निजपदीं घोंटीं त्रिकोण । गगनसदृश नीळवर्ण । शोभताती पैं ॥ ८८ ॥ यंत्रपीठीं वर्ण सुंदर । तेवी पोटरिया अति सकुमार । निराभिमानें सपुर । अति सरळा ॥ ८९ ॥ आत्मानुभवें वर्तुळ । विराजलें जानुयुगुळ । जयासी तुळणा नसे अतुळ । सदैवपणें जें ॥ ९० ॥ वोतले स्वानुभवाचे गाभार । कीं ते सत्वश्रिया सकुमार । ऐसिया मांडीयांसी चंद्रकर । खुपतील कीं ॥९१॥ संवित्ति आत्मत्वें सपूर्ण । निजतेजें विराजमान । शोभा शोभलें जघन । मनोहर द्वय ॥ ९२ ॥ स्वसुखें श्रुति आणि स्मृति । क्रीडारवें संवादती । ते चि वांकी अंदु गर्जती । निजपदीं ऐक्यत्वें ॥ ९३ ॥ दशोपनिषध तोडर । दशनादात्मक साचार । गर्जे तेणें ध्वनी अपार । दशवाद्ययुक्त ॥ ९४ ॥ ढोल दमामे मृदंग चंग । शंख रुंजीका स्वर्णशृंग । तत ठाळ उपांगीं अनेग । बुरुंग काहाळीं ॥९५॥ उपवेद अति क्रीडारवें । अंदु गर्जती निजवैभवें । जयाचिया नादगौरवें । निजपदीं सौख्य ॥९६॥ यावरी निजगुह्याची वित्पत्ती । करावी जव निगुती । तव चाऱ्ही वाचा वेडावती । न बोलवे पुढें ॥ ९७ ॥ जेथ वेदादिकाचे स्फूर्ति । नाक-

---

१ पायाच्या पाच बोटांना. २ पापाचे भस्म करणारी. ३ बारीक. ४ (?). ५ काहळ=चर्मवाद्यविशेष.

ळे चि जे संवित्ति । मग अनुर्वाच्यपणें न इति । ह्मणितलें तिहीं ॥९८॥ तेथें मींयां मंदमति । केवि बोलावी गुह्यख्याती । ब्रह्मादिकांची गती । कुंठित जेथ ॥ ९९ ॥ त्रैलोक्याचें जन्मस्थान । अपारपणें जें सघन । अनंत ब्रह्मांडें जेथून । निर्माण जाली ॥ १०० ॥ ऐसीया निजगुह्यासी आच्छादी । ऐसा योजावा पीतांबर आधीं । तरी अखंडता तनु वेधी । प्रवृत्ति निवृत्ति ॥ १ ॥ उभयतायोगें साद्यत । पीतांबर चिन्मय साळंकृत । तो निजानंदें दीप्तिमंत । निजांगीं वेष्टिला ॥ २ ॥ पीतांबर श्रीकासेसी । वेढिला सपूर्ण निजानंदेंसीं । तो आद्यत पुरला श्रीगुरुगुह्यासी । स्वानुभवादिनकरा ऐसा ॥३॥ असो अतिशयें निज नाभी सखोल । सहस्राब्द बुडतां जेथील । ब्रह्मा ही अंत पाहों ह्मणैल । स्वसामर्थ्यें जऱ्हीं ॥ ४ ॥ तऱ्हीं न कळे चि सहसा अंत । मग होईल हिंपुटी बहुत । दीनरूपें जोडूनि हात । स्तुति पढेल ॥ ५ ॥ जरि तो नाहंपणें भजेल । तरि निजकृपा आश्वासिजैल । अहंपणें उचक्या खाईल । नेणों किती ॥ ६ ॥ आतां स्वबुद्धि करूनि सोपारी[1] । पाहों निजमध्याची थोरी । ह्मणौनियां परमादरीं । स्वबोध सींहें[2] ॥ ७ ॥ भवगजसमूह विध्वंसुनि । चालिला अति आवेशें करूनि । मग स्वामींचा निजमध्य नयनीं । पाहात ठेला ॥ ८ ॥ सुक्षम दृष्टिचीया नेटें । पाहे जवं निजनिष्ठे । तवं आब्रह्ममाजी वटें । देखता जाला ॥ ९ ॥ पाहातां मध्य दिसे तरि साना । परि थोरपणा नसे तुळणा । तें देखोनि बोधपंचानना । सौख्य वाटलें ॥ १० ॥ ऐसा हा निजमध्य अपार । थोरपणें दिसे साचार । तया ही सामावी ऐसी थोर । कैंची मेखळा ॥११॥ मग परम प्रेत्नें करूनि । अभगतेची मेखळा योजुनी । रत्नजडीत भक्ति खेवणीं । बोधसींहाडे ॥ १२ ॥ इया मेखळा निज सामर्थ्यें । आकळिलें देखों यथातथ्यें । अन्य साधनभूषणें मिथ्यें । इयेपुढें पैं ॥ १३ ॥ भजीजे जेवी नाना दैवतीं । तेवी अधोमुखी मेखळेप्रती । क्षुद्रघंटिकांची पंक्ति । रुणझुणीत ॥ १४ ॥

१ सोपी, २ सिंहानें.

ऐसी शोभतसे कटीं मेखळा। तेथ निजमंत्रांच्या मंत्रमाळा। त्याची कींकीणी ज्वाळमाळा। मिरवलीया ॥ १५ ॥ असो आनंदमय केवळ। देखिलें उदर विशाळ। अनंत ब्रह्मांडगोळ। सामावले दिसती ॥ १६ ॥ वरि हृदयावकाशीं। आकाश हारपे स्वकार्येंसीं। ज्ञानी पावले जया ठायासी। आणि योगी ही ॥ १७ ॥ सिद्ध साधु मुनिजन। जडले ऐक्यत्वें अभिन्न। तें चि हृदईं पदक पूर्ण। कौस्तुभान्वित ॥ १८ ॥ निजधैर्ययुक्त स्वकर्म धर्म। तें चि शोभे स्तनयुग्म। वक्षस्थळ अति-सम। निजसाम्यता ॥ १९ ॥ उपाधिरहित कंबुकंठ। स्वरवर्णांकित स्पष्ट। जेथूनियां प्रगट। चार्‍ही वाचा ॥ २० ॥ शब्दब्रह्मासी जेथ उगव। शास्त्रांचा वसता ठाव। पाहातां केवळ प्रणव। निजकंठा-कारें ॥ २१ ॥ नित्यानित्य उभयस्कंध। निज औन्नत्यें अगाध। पाणिद्वंद्व ते प्रसिद्ध। निगमागम ॥ २२ ॥ अति विशाळ आजानुपर। करद्वय साजिरे परिकर। निजायुधेंसीं साळंकार। सौम्य सदैव ॥२३॥ करावया भवबंधमोचन। वरदहस्तें अभयदान। दुजा स्वसामर्थ्यें विराज-मान। प्रतापमंडित ॥ २४ ॥ पाहातां ठकारेंसीं निजठाण। वैराग्य-विवेकयुक्त धनुष्यबाण। धरूनि लीळा दैत्यनिर्दाळण। कामक्रोधादिक ॥२५॥ येथ कोण्ही घेईल आशंका। जे श्रीगुरूचे करीं धनुष्यबाण कां। तरि याचें हि उत्तर आइका। निवांत होउनि ॥ २६ ॥ आह्मां श्रीराम-चंद्रजीवांचुन। श्रीगुरु कवण असे जी आन। ह्मणौनी वर्णिलें धनुष्य-बाण। यथार्थरूप ॥ २७ ॥ तेथ सद्गुरु श्रीरामें आपण। निजप्रतापयुक्त परिपूर्ण। वैराग्यधनुर्ष्यीं विवेकबाण। निजकरीं योजिला ॥ २८ ॥ लक्षुनि कामक्रोधादि असुर। लीळा पराभविलें समग्र। निजभक्त-मस्तकीं अभयकर। कृपावरें विराजे ॥ २९ ॥ असो यावरी श्रीमुख जव पाहें। तव पाहातेपणें भूलोनी ठाये। तर्‍हीं प्रेमावलेनि मोहें। पाहों चि लागें ॥ ३० ॥ पाहातां निडोरली दृष्टी। चित्तचैतन्यां पडे मीठी। अभिनव जाहाली दाटी। सात्विकांची ते ॥ ३१ ॥

१ प्रफुल्लित झाली.

पाहातां मुख नव्हे हें साचार । उदेला कळंकरहित सुधाकर । कीं तीव्रताविहीन दिनकर । त्रितापोपशामक ॥ ३२ ॥ नांना हें मूर्तिमत अमृत । कीं हें पुण्याचें चि फळ गमत । किंवा निजतेज साद्यंत । येकवटलें ॥ ३३ ॥ अथवा नवल हें काय देखिलें । जाणों शब्दब्रह्म चि मुसावलें । कीं हें अक्षर चि प्रगटलें । प्रणवपीठीचें ॥ ३४ ॥ मुखसरोज हें परम सुंदर । केवळ क्षराक्षरातीत पर । तेथ अव्ययानंदें साचार । अधरद्वय ॥ ३५ ॥ माजी दंतपंक्ति सतेज । सुवर्णाकृति स्मीतत्वें सहज । तेथ अनुभवसुखाचें भोज । रसना शोभे ॥ ३६ ॥ स्वासोस्वासें परिपूर्ण । निजतेजें देदिप्यमान । वेदाचें जें जन्मस्थान । तें चि नाशिक ॥ ३७ ॥ चंचळत्वें जितुका प्रभंजन । तो चि आद्यंत मुख्य प्राण । त्रिकाडयुक्त यथाविधी पूर्ण । विचरणें जया ॥ ३८ ॥ कर्म उपासना आणी ज्ञान । हें चि इडा पिंगळा आणी सुषुम्न । तेथ जो जाला निमग्न । तो सुखरूप सदैव ॥ ३९ ॥ अनंतादृष्टीचें देखणेपण । जेथ अनन्यत्वें आलें शरण । तया देखणेपणासी कोण । पाहेल आता ॥ ४० ॥ तऱ्हीं दृश्य द्रष्टेनसीं दर्शन । त्रिपुटीभेदें जें वेगळेपण । ते समूळ गेलें गळोन । जीया दृष्टी ॥ ४१ ॥ ऐसी हे निजदृष्टी अपार । अवलोकनीं नाहीं सानें थोर । तीया देखणीयां समोर । कोण उरेल पां ॥ ४२ ॥ वरी अति सुंदर त्या भृकुटी । स्वरूपीं वक्रत्वें चापाकार व्यकटी । सकेतें ब्रह्मांडाचिया कोटी । होती जाती असंख्य ॥ ४३ ॥ आतां पूर्वोत्तर जे कां भाग । ते चि निजांगीं श्रवण अव्यंग । सत्कुंडलमंडीत अभंग । शोभा शोभले ॥ ४४ ॥ पाहातां स्वस्वरूपें अधिष्ठान निर्मळ । परब्रह्म ऐसें अति सोज्वळ । तें चि शोभलें विशाळ भाळ । सत्कारमंडीत ॥ ४५ ॥ असो यावरी उगाळूनि अहंपण । सोहंपणें शुद्ध सीतळ चंदन । केलें निजललाटीं चर्चन । निजात्माबोधें ॥ ४६ ॥ यां उभयतांचा जेथ लय । ते चि दुबोटीका केशरमय । वरि स्वानुभवदिनकरीं ऐक्यान्वय । कस्तुरी

---

१ चंद्र २ नाहीं तर, किंवा. ३ कमळ ४ (?).

अक्षता ॥ ४७ ॥ मस्तकीं पाहे मुकुटमहिमा । तव उपमा चि न दिसे निरोपमा । सच्चिदानंदैक मुगुटगरिमा । स्वानुभवदिनकरा ऐसा ॥४८॥ आतां वर्णावें निजांगें महिमान । तव मन जालें निजपदीं निमग्न । स्वानुभवदिनकरीं अभिन्न । पदैक्यें जालें ॥ ४९ ॥ तेथ आकाशीं अवकाशता पूर्ण । करूं गेलों स्वरूप निरीक्षण । तव दृष्टीभेदें श्यामवर्ण । भास देखिला ॥१५०॥ तेवि निजांगीं विलसे श्यामकांती । माजी अर्द्धांगी शोभे निजशक्ति । लावण्ययुक्त सतेज दीप्ती । जेवीं ब्रह्मीं माया ॥ ५१ ॥ आतां वर्णाश्रमसंरक्षक । त्रिगुणी गुणातीत सम्यक । केवळ जें कां शुद्ध सत्वात्मक । तें यज्ञोपवीत कंठीं ॥ ५२ ॥ ऐक्यतेची येकावळी । ब्रह्मानंद हृदयमेळीं । शोभा कौस्तुभीं आगळी । निजभक्तमंडित ॥ ५३ ॥ शाक्त सौर आणी शांभव । गाणपत्य तथा वैष्णव । पंच उपासनेसीं पदक अपूर्व । निजहृदईं मिरवे ॥ ५४ ॥ अछिद्र अजीर्ण परीकर । मुक्तमंडीत मनोहर पदर । सपुर सालंकृत चिदंबर । तें प्रावर्णिलें दिसे ॥ ५५ ॥ मस्तकीं पूर्णतेचें येकछत्र । तन्मयता आतपत्र । येकनिष्ठता चामर । वीजनार्थ ॥ ५६ ॥ कंठीं खपुष्पांचे हार । शोभती नागर[1]पणें सुंदर । ते चि मुकुटीं ही अपार । स्तबक[2] खोविले ॥५७॥ अमळ कमळांची माळ । दीप्ती सुवर्णमय झळाळ । आजानुपर्यंत विशाळ । कंठीं वैजयंती ॥५८॥ जेवी आकाश परम सुनीळ । तेवी शोभती नीळ कुंतळ[3] । स्वानुभवदिनकरवत सोज्वळ । मस्तकीं वीरगुंठी[4] ॥ ५९ ॥ एवं निजपदीहूनि आद्यंत । पाहों जय आब्रह्ममस्तकपर्यंत । तव देखिली श्रीगुरुमूर्ति धवधवीत । स्वानुभवदिनकरीं ॥ ६० ॥ तेथ हृदयावकाश सुभूमीके । बोधकमळावरी कौतुकें । अष्टभाव सिंहासन तुळीके । सुमनसेजे ॥ ६१ ॥ वरी नवरसमय मंडप गहन । माजी अनन्यतेचें आसन । तेथ स्वानुभवदिनकरेंसीं आरोहण । श्रीमूर्तिचें सहजस्थिती ॥ ६२ ॥ असो दृश्यपदार्थेसीं आवाहन । दर्शनाचें घालूनी आसन । तेथ द्रष्टयाचें करूनि आचमन । त्रिपुटीसहित ॥ ६३ ॥

---

१ नागर=चांगलें. २ पुष्पगुच्छ. ३ केश. ४ बद्धकेश.

कर्तुत्वाचें निजपदीं पाद्य । सत्कर्मेसीं अर्ध्य सपाद्य । कर्तेपणेंसीं स्नान सारुनी सद्य । त्रिपुटीसहित ॥ ६४ ॥ ध्यानेंसीं वस्त्रालंकार यज्ञोपवीत । ध्येयेंसीं गंधाक्षतादि पुष्पें समस्त । ध्यातेपणेंसीं धूपदीप सतंत । त्रिपुटीसहित ॥ ६५ ॥ भोग्याचा करुनी नानाविध नैवेद्य । भोक्तृत्वेंसीं फळतांबुळ दक्षिणा सद्य । भोक्तेपणेंसीं कर्पूर दीप संपाद्य । त्रिपुटीसहित ॥ ६६ ॥ ज्ञेयाचीं मंत्रपुष्पें समर्पुनी । ज्ञानेंसीं प्रदक्षिणा सारुनी । ज्ञातेपणेंसीं उदक सोडुनी । त्रिपुटीसहित ॥ ६७ ॥ एवं त्रिपुटीपंचकांचा लय । करुनी षोडशोपचारान्वय । भज्य भज्यक भजनीय । त्रिपुटीसहित ॥ ६८ ॥ असो अनन्यत्वें देहेंविण । घातलें सर्वांगें लोटांगण । तेथें आद्यत आत्मनिवेदन । श्रीगुरुपदीं ॥ ६९ ॥ ऐसें पूज्यपूजकातीत । पूजन घेऊनि साळंकृत । निजकृपापसाय दान देत । अति उदारपणें ॥ ७० ॥ जेवी ध्वनी उठी अंतराळीं । तेवी गंभीरपणें शब्द मंजुळी । अनुवादीजे कृपामेळीं । परमस्नेहें ॥ ७१ ॥ सखया जें तुवां कांहीं केलें । तें आह्मा सर्वस्वें पावलें । तेणें संपूर्ण तोषलें । मानस आमचें ॥ ७२ ॥ आतां जे जे तुझे मनोरथ । ते पूर्ण होतु कां समस्त । परि स्वानुभवदिनकर प्रस्तुत । अनुवादीजे ॥ ७३ ॥ ऐसा कृपावरद लाधोन । दिनकर रामदासीं सुखसंपन्न । स्वानुभवदिनकर गर्जोन । अनुवादतसे ॥ ७४ ॥ सांगितलें पंचधा भक्तीलक्षण । पुढें सांगिजैल हटयोग साधन । इतुकेन सपलें येकविध भक्तीकीर्ण । ह्मणे दिनकर रामदास ॥ १७५ ॥ स्वस्ति श्रीस्वानुभवदिनकरे गुरुशिष्यान्वये अष्टमकळापे येकविधभक्तिनिरूपणनाम पंचमकीर्णप्रकाशः ॥ ५ ॥ येकुन कळाप वोवीसंख्या ॥ ५६७ ॥

## ॥ हटयोगलक्षण कळाप नवम ॥ ९ ॥

॥ श्रीराम ॥

ॐ नमो सद्गुरु रामदास । आदिनारायणरूप निर्दोष । जगदुद्धरावया विशेष । अवतार तुमचा ॥ १ ॥ देवा सकळ सृष्टिये आदि । शुद्धस्वरूपीं निजानंदीं । संकल्परूपें तू अनादि । नारायणस्वरूप ॥२॥ निजभक्तसाह्यतेकारणें । युगानुयुगीं तुज लगे अवतरणें । दुष्ट दैत्यां वधूनि संरक्षणें । स्वधर्मकर्मसंस्था ॥ ३ ॥ जे जे समईं जें जें सकट । भक्तांलागीं पडे अचाट । तेव्हां अवतरोनि नाना दुष्ट । निर्दाळिसी स्वलीळा ॥ ४ ॥ जे वेळेसी जैसें कार्य पडे । ते समईं तुजलागीं तैसें होणें घडे । परि भक्तांचें साह्य करणें आवडे । कायावाचामनेंसीं ॥५॥ ब्रह्मयासी शंखासुराचा परम धाक । तेणें राहिला वेदांचा घोक । जाणोनि मत्सरूपें समुद्रीं शंख । लीळा वधिला ॥ ६ ॥ पृथ्वी जातां रसातळा । कूर्मरूपें धरिली अवलीळा । क्षीरसागरीं निजश्वासें करूनि डव्हळा[1] । चौदा रत्नें काढिलीं ॥ ७ ॥ हिरण्याक्षें धरेची चौघडी । घेऊनि पळों जातां तांतडी । वराहरूपें दडपूनि नरडी । मारिला बळें ॥ ८ ॥ भक्त प्रह्लाद गांजितां । स्थंभीं चि प्रगटोनि तत्वता । नृसिंहरूपें मारिलें क्षण न लगतां । हिरण्यकश्यपासी ॥ ९ ॥ शतमखमय बळीचें पुण्य देखिलें । वामनरूपें ब्राह्मणत्व धरिलें । विश्वरूप दाऊनि पाताळीं ठेविलें । आपणासहित ॥ १० ॥ सहस्रार्जुनें पितरां गांजिलें । जाणोनि परशरामरूपें तयासी मारिलें । येकवीस वेळ निक्षत्री केलें । महिमंडळ प्रतापें ॥ ११ ॥ ज्याचें शतकोटी चरित्र । जो केवळ हरहृदयमंत्र । त्रिभुवनीं तारक स्वतंत्र । नाम जयाचें ॥ १२ ॥ स्वरूप ज्याचें विश्वसंजीवन । कर्म सांगतां असाधारण । उदकीं तारिले पाषाण । नामें चि ज्याच्या ॥ १३ ॥ चरणीं उद्धरली शिळा । देवां सोडविलें अवलीळा । रावणकुंभकर्णा

१ ढवळणें.

सायुज्यसोहळा । दिधला वैरें ॥ १४ ॥ सेवेका कनकनगरदान । प्रतिज्ञापणें येक बाण । स्त्री येक आणि वचन । तें ही येक ॥ १५ ॥ आसमुद्रवळयांकित । राज्यभार चालऊनि समस्त । जन्म जरा दारिद्र सतत । नाहीं कोण्हा ॥ १६ ॥ असो यावरी सोमवंशीं जगद्रूपें । वसुदेव देवकीया खोंपे[2] । विश्वदुरि[3]तदहनार्थ कृष्णरूपें । आदिनारायणें ॥ १७ ॥ कळीचा प्रातुर्भव देखोनी । बुद्धियोगें आवडी उगेपणीं । बौद्धावताराचिया आयेंणीं । असीजे सुखें ॥ १८ ॥ पुढें म्लेंछाचा होतां उत्कर्ष । कल्किरूपें अवतरोनि दुर्धर्ष । कळीचा अंतीं निष्कर्ष । कीजैल सर्वा ॥ १९ ॥ याहीवेगळे अनेक अवतार । करावया दुष्टांचा संव्हार । आणी धर्माचा जीर्णोद्धार । भक्तसंरक्षणार्थ ॥ २० ॥ तरि देवा तुमचें येक येक करणें । बोलीलिया परिस अनंत गुणे । वेद शास्त्र स्मृति पुराणें । महिमा अपार वर्णिती ॥ २१ ॥ पृथ्वीचे प्रमा[5]णु गणवतील । परि तुमची अवतारगणना नव्हेल । जें जें समर्थपणें करू ह्मणाल । तें घडेल निश्चयेंसीं ॥ २२ ॥ अनंत चरित्रें अनंत गुण । अनंत अवयव कर चरण । अनंत शीर्षें शरीर[6]प्रमाण । कोण्हाचेनि न करवे ॥ २३ ॥ जी तुह्मीं सर्व गुणेंसीं समर्थ । विश्व तुमचेनि योगें कृतार्थ । आह्मां अनाथांचा प्रपच परमार्थ । तुह्माकारितां साजिरा ॥ २४ ॥ तरि जी देवा भक्तवछला । अनाथनाथा परम कृपाळा । करुणाकरा निजस्नेहाळा । शरणागतासी ॥ २५ ॥ ऐसा प्रेमा[7]थीलेनी आवडीचिया भरें । शिष्य स्वानंदाचेनि परमादरें । बोलिला नाना स्तुति वाक्योत्तरें । श्रीसद्गुरुपुढां ॥ २६ ॥ तें आइकोनी कृपाळुवें समर्थें । शरणागतवत्सळें अनाथनाथें । बोलों आरंभिलें निजकृपाकृतार्थें । जगदुद्धरणार्थ ॥ २७ ॥ तरि सखया तू जें जें बोलिलासी । तें यथार्थ चि निजनिश्चयेंसीं । परि तुवां स्मरिलें कवणा कार्यासी । ते [8]चाड सांघीजो ॥ २८ ॥ येर बोलण्यासीं

---

१ भक्त विभीषणाला. २ पेटीं. ३ दुरित=पाप. ४ मनानें ५ परमाणु. ६ परिमाण, माप. ७ आथिला=असला, झाला. प्रेमाच्या योगें करून. ८ इच्छा. ९ सांगावी.

नाहीं कार्य । तुज अपेक्ष तें चि बोलें वैर्य । तव येर ह्मणे जी जी आचार्य । योगसिद्धि सांगीजे ॥ २९ ॥ केवी जाणावा यम नियम । कैसा करावा प्राणायाम । प्रत्याहाराचा संभ्रम । कवणे रिती जी ॥३०॥ ध्यानधारणेची कैसी विधि । कैसी जाणावी आसनसमाधी । मनपवनजयाची सिद्धि । कैसी साधेल जी ॥ ३१ ॥ आणी ते देहशुद्धि कैसी कीजे । कैसी कुंडलणी साधिजे । आणि आत्मा ब्रह्मांडासी नेइजे । कवणे रिति ॥ ३२ ॥ हें सकल योगलक्षण । मज सांगा जी कृपा करून । ऐसें बोलोनी निजभावें नमन । प्रेमप्रीती करितसे ॥ ३३ ॥ आइकोनि शिष्य-विज्ञापना । निजकृपा बोले गुरुराणा । ह्मणे बापा हे योगविवंचना । परम दुस्तर कळियुगीं ॥ ३४ ॥ योगसिद्धि सर्वांगें होय समर्थ । साधलीयां करी साधकां कृतार्थ । नरदेहासी आलियाचें यथार्थ । सार्थक घडे तैं ची ॥ ३५ ॥ हा न साधे जोंवरी प्राणियांसी । तोंवरी नाना आघात जीवित्वासी । साधलियां आकल्प चंद्रसूर्यासी । जिंके याचें निज देह ॥ ३६ ॥ शंकर जेथील मिरासी धणी । तेणें साधिली सकळ योगकरणी । ह्मणौनी सकळसामर्थ्यशिरोमणी । योगसिद्धीकरितां ॥ ३७ ॥ तैसा चि विष्णु सकळसामर्थ्यवत । योगसिद्धीकरितां महंत । नाना अवतारचरित्रें करित । याचेनि बळें ॥ ३८ ॥ ब्रह्मयांसी ब्रह्मपण याकरिता । सृष्टिक्रम करी याचिया सत्ता । इंद्र चंद्र यम धर्म सविता । योगबळें समर्थ ॥ ३९ ॥ वायु वरुण अग्नि कुबेर । तेहतीस कोटी सुरवर । आणी अठ्यासीं सहस्र ऋषेश्वर । योगबळें समर्थ ॥ ४० ॥ नव ही नाथ सोळा सिद्ध । तैसे चि चौऱ्यासीं उपसिद्ध । हटयोगबळें जाले प्रसिद्ध । महासामर्थ्यवत ॥ ४१ ॥ ज्यानें जितुका यत्न केला । त्यासी तितुका चि योग साधला । धैर्यबळें फळद्रप जाला । अधैर्यें गेला हातीचा ॥४२॥ मुख्य यासी असावें धैर्याचें बळ । धैर्य धरिल्यां होय हा प्रबळ । तें चि जालियां तिळमात्र विकळ । आजन्म क्लेशी ॥ ४३ ॥ ह्मणौनि ज्यापासीं वसे धारिष्ट । तो योगसि-

---

१ अपेक्षित, इष्ट. २ श्रेष्ठा. शिष्यश्रेष्ठा. ३ कुंडलिनी.

द्धीसी होय वरिष्ठ । धैर्य चळलिया तत्काळ भ्रष्ट । क्षणमात्रें होतसे ॥ ४४ ॥ धैर्य असोनि जन्मांतरपुण्य- । संग्रह असला पाहिजे अगण्य । आणी सकळ इंद्रियाचें सौजन्य । तथा शरीरआरोग्य ॥ ४५ ॥ इतुकें असोनि आयुष्याची वृद्धि । असलीयां साधे योगसिद्धि । आयुष्य खौंशलियां सकळ हि विधी । निरार्थक होतसे ॥ ४६ ॥ त्याहिवरी असावा पुण्यभाजन देश । आणि शरीर असावें निर्दोष । तथा राजा असावा पुण्यपुरुष । धर्मवंत प्रजापाळक ॥ ४७ ॥ नितिन्याय-मर्यादावंत प्रतापी । गोब्राह्मणसंरक्षणीं अति साक्षपी । तळीं विहिरी वनवाटिका औरोपी । ठाइं ठाइ अनेक ॥ ४८ ॥ सेना सैनिक नागरिक प्रधान । असावे पुण्यपरायण । ग्रामाधिकारी सेटे महाजन । ब्राह्मणसंरक्षक असावे ॥ ४९ ॥ लोक स्वधर्मकर्मी तत्पर । यज्ञय-जनें व्हावीं अपार । ब्राह्मणसतर्पणें स्वाहास्वधाकार । प्रचुर असावे पृथ्वीवरी ॥ ५० ॥ पर्जन्य वर्षावा यथाकाळीं । धान्यें पिकावीं गोधूम शाळी । तृण धान्यें करूनि हे महीतळी । परिपूर्ण असावी ॥ ५१ ॥ गाई गोधनें असावीं प्रचुर । पचगव्याची समृद्धि साचार । परस्परें असावें निर्वैर । नृप आणि प्रजासी ॥ ५२ ॥ राजा असावा चक्रवर्ती । न्यायकर्ता स्वधर्मानुवृत्ति । यवन आणी दुष्ट संभूति । कदापि नसावी ॥५३॥ नसावा परस्त्रीपरद्रव्यापहार । परनिंदा परन्युनाधिकार । द्वेष मत्सर तिरस्कार । कोणिंहि कोणहाचा न करावा ॥५४॥ चालावे वर्णाश्रमधर्म । स्नान संध्या निष्ठा नेम । यथाशास्त्र विधी स्वधर्म कर्म । पुराणशास्त्र-श्रवणेंसीं ॥५५॥ शीत पर्जन्य उष्णकाळ । हे समत्वें चालावे सकळ । राजा प्रजा लोक धर्मशीळ । असावे वेदाध्ययनी ॥ ५६ ॥ प्रतिग्रामीं स्मार्ताग्निहोत्रें । असावें सत महत सत्पात्रें । त्यांचीं अन्नाछादनें वस्त्रपात्रें । सार्वभौमें चालवावीं ॥ ५७ ॥ लोक असावे स्वधर्मशीळ । मर्यादायुक्त गोब्राह्मणपाळ । हरिकथा कीर्तन सर्वकाळ । नित्यनेमें चालावें ॥ ५८ ॥

---

१ अव्यग्र. २ भाजन=पात्र. ३ लावी. ४ शेटसावकार, वैश्य. ५ गहू. ६ साळ, भात. ७ संबंध.

देश काळ वर्तमान समता । भूमंडळीं सकळ विधी विधानता । असावी प्राणिमात्रांची चित्तस्वस्थता । तेव्हां हा योग साधेल ॥ ५९ ॥ तरि हें इतुकें सत्ययुगीं वर्त्तलें । तेव्हां चि हे योग ही साधले । जे युगीं पुण्य चि अवघें संचलें । पाप न दिसे तिळमात्र ॥ ६० ॥ सत्ययुग ह्मणिजे कृतायुग । ते युगीं लक्ष वर्षे आयुष्य चांग । प्राणीमात्रीं सुखसंतोष अव्यंग । अस्तिंगत प्राण असे ॥ ६१ ॥ ते समईं जेणें जितुका योग साधिला । तो अनंतगुणें त्यासी फळला । त्याचे आंगीमाजी जगदीश वर्तला । सर्वस्वेंसीं प्रसन्न ॥ ६२ ॥ तेव्हां आदिनारायण अवतार । पृथ्वीवरी अवघें पुण्य चि साचार । जन्म जरा दरिद्र पापाचार । वार्ता कदापि असेना ॥ ६३ ॥ मत्स कूर्म वराह नृसिंह । कृतायुगीं अवतारसमूह । वामन फरशराम निसंदेह । त्रुतीं-युगीं अवतार ॥ ६४ ॥ तृतायुगीं अर्द्ध पुण्य अर्द्ध पाप । त्याप्रमाणें सकळांसी हें चि माप । योगसिद्धिचें ही पैंडप । साधकासी साधे अर्द्ध भाग ॥ ६५ ॥ कृतायुगीं ज्ञानोपदेशीं हंसावतार । तृतायुगीं बोलिजे दत्तदिगंबर । द्वैापारादि श्रीरामावतार । द्वापारांतीं कृष्ण बोलिजे ॥६६॥ द्वापारीं पुण्याचा चतुर्थ भाग । उरलें तीन वांटे पाप अभंग । राजा प्रजा लोक अनेग । विपरीत बुद्धि वर्त्तती ॥ ६७ ॥ तृतायुगीं दाहा सहस्र वर्षे । परमायु मांसगत प्राण असे । द्वापारीं जालें सहस्र वर्षे । त्वचामय प्राण वर्त्तत ॥ ६८ ॥ कळीयुगीं परमायु वर्षे सेंभर । अन्नमय प्राण वर्त्ते साचार । बौध आणि कल्की अवतार । या कळि-युगामाजी ॥ ६९ ॥ कळियुगीं पुण्याची वार्ता बुडाली । पापाची वृद्धि फार जाली । सांगतां या कळियुगाची चाली । चित्त कांटाळे सर्वथा ॥ ७० ॥ बोलतां कळीचें महिमान । धर्म जाला कपायमान । जे युगीं राजा यवन । तेथें अन्य वार्ता कायसी ॥ ७१ ॥ जे युगीं देव धर्म बुडाले । अवघें येककार जालें । सत्य जातीनसीं हारपलें । स्वधर्मासकट ॥ ७२ ॥

---

१ अस्थिगत. २ त्रेतायुगीं. ३ कौतुक, अपूर्वता. ४ द्वापाराच्या आरंभाला.

ब्राह्मण कर्मभ्रष्ट जाले । स्वाहास्वधाकार राहिले । वर्णाश्रमधर्म बुडाले । जाती कुळेंसीं ॥ ७३ ॥ राजा देवद्रोही जाला । देवस्थळांचा उच्छेद केला । तीर्थमहिमा सकळ मोडिला । ठाईंठाईंचा ॥ ७४ ॥ राज्याची अनेक बडें जालीं । गोब्राह्मणावरी पोलाणें[१] पडिलीं । पृथ्वी हलकालोळ जाली । कोणिंह नव्हे कोण्हाचें ॥ ७५ ॥ पर्जन्याचें आवर्षण अखड । राजा प्रजा लोक दुखड । पृथ्वी जाली शतसहस्र खंड । सौख्यवार्ता न दिसे ॥ ७६ ॥ कुळस्त्रिया भ्रष्टविल्या यवनीं । ब्राह्मण जाले दासी-गमनी । अंत्यजाचे गृहीं उत्तमवर्णी । बळात्कारें भ्रष्टिजे ॥ ७७ ॥ तेणें जाला वर्णसकर । वृद्धि पावला अनाचार । परस्त्रीपरद्रव्यापहार । परस्पुन्य स्वेछा बोलती ॥ ७८ ॥ कुळवधु निर्लज्जा जाल्या । त्या हीनयातीसीं रतल्या । लोकापवादें भ्रष्टल्या । देशोदेशीं फिरती ॥ ७९ ॥ श्रीपाद[३] जाले द्रव्याभिळाषी । साळी कोष्टी जाले जटिळ संन्यासी । ब्राह्मण फिरती देशोदेशीं । उपार्जना[४] करित ॥ ८० ॥ तीर्थे क्षेत्रें व्रतें उद्यापनें । सकळ ही उछेदिलीं यवनें । धर्मचर्चा पुराणश्रवणें । कथाकीर्तन राहिलें ॥ ८१ ॥ अवघा जाला धुंधुकार । कोण्हाचें कोणिंह नाइके उत्तर । बाहेर घालुनि मातापितर । सासुसासरा पाळिती ॥ ८२ ॥ भावांबहीणीचा घेऊनि त्रास । घरा आणिती सालीमेहुण्यास । परस्त्रीचा धरूनियां अभिळाष । नाना यत्नें भोगिती ॥८३॥ ब्रह्मद्वेष गुरुनिंदा तीर्थउछेद । संतसज्जनांचा करिती छळवाद । मद्यपान उन्मत्तद्रव्यस्वाद । घेती नाना प्रकारें ॥८४॥ ऐसे या कळियुगीचे धर्म । सांगितले न जाती निसीम[५] । तेथ योगसाधनाचा करितां उद्यम । केवी सिद्धीस जाईल ॥८५॥ ह्मणौनी बापा हा उपक्रम । सहसा करूं नको निभ्रंम । काळीमाजी दुप्राप्य दुर्गम । पापजनिता जीवांसी ॥ ८६ ॥ जेथ देश काळ वर्तमान उपहत[६] । कोण्हांसी कोण्हीं परस्परें न मानित । राजा प्रजा उत्छृंखळ लोक समस्त । आणि जीवित्व हें तरंगवत ॥८७॥ देहीं संचरती नाना

---

१ गोब्राह्मणावर कुरघोडी केली. २ घेदिल. ३ संन्यासी. ४ वित्त मिळवित. ५ निश्चित. ६ विस्खळित.

आधि व्याधि । कफ वात पित्त सन्निपात द्वंद्वज विधि । आणि आयुष्य क्षणभगुर असतां योगसिद्धि । केवी साधेल पैं विचारीं ॥ ८८ ॥ ह्मणौनी ये गोष्टीचा अतिशो सहसा । न करीं न करीं गा शिष्यवत्सा । आणिक जे तुज दुर्बाध्य असेल पुसा । तें करीं गा तूं अवश्य ॥८९॥ ऐसें धिग्वाक्य ऐकोनि श्रीगुरूचें । शिष्य घाबिरेपणें अत्यत खोंचे । ह्मणे हें वाक्य बोलिलें तें साचें । कळीयुग हें तैसें चि ॥ ९० ॥ आणि जे जे हे धर्म वाखाणिले । यापरिस कोटीगुणें असती राहिले । तरि योगसिद्धीचें साधन वहिलें । कळे कैसें आपणां ॥ ९१ ॥ आतां ते गोष्टी ज्यायोगें स्वामी बोलती । ऐसी करूनियां कांहीं युक्ति । स्वानुभवदिनकरीं सवादती । दिनकर रामदास ॥ ९२ ॥ स्वस्ति श्रीस्वानुभवदिनकरे गुरुशिष्यान्वये नवमकळापे चतुर्युगधर्मनिरूपण नाम प्रथम कीर्ण प्रकाशः ॥ १ ॥ श्रीरामजयरामजयजयराम ॥

---

॥ श्रीराम ॥

कळीयुगींचे युगधर्म । आयकोनि शिष्य चकित परम । ह्मणे ऐसें असता युग दुर्गम । योगसिद्धि केवी साधे ॥ १ ॥ जोंवरि नाहीं योगसिद्धि । तोंपर्यंत कैंची देहशुद्धि । आणि यम नियम प्राणायाम-विधि । केवी घडों शके ॥ २ ॥ कैसा घडेल आसनजय । आणि मन-पवनाचा विजय । ध्यानधारणेचा अन्वय । केवी पावों पां ॥ ३ ॥ प्रत्याहारेंसीं मनोजय । केवी साधेल आसनशुद्धीचा अन्वय । आणि आत्मबुद्धीचा उपाय । कैसा आंतुडेल ॥ ४ ॥ ह्मणौनि अंतरीं गजबजोन । घामेजला मुख जालें म्लान । सगद्गद कंठ दाटोन । नयनीं अश्रु चालिले ॥ ५ ॥ चित्त अत्यंत चाकाटलें ठाये । भरितेंनि दाटलें हृदय । ह्मणे आतां यासी करावें काय । स्वामी सांगतील हें कैसें

---

१ कष्टसाध्य. २ अतिसो, अतिप्रसग. ३ पृच्छा. ४ सांपडेल, प्राप्त होईल. ५ चकित झालें.

॥ ६ ॥ ह्मणे मांडलें हें परम संकट । सुखामाजी उद्विग्नता अचाट । संदेहाचें थोर पडलें कचाट । हें निरशेल पैं केवीं ॥ ७ ॥ ह्मणौनी उकसाबुकसीं स्फुंदन । आरंभिलें तेणें सजळ नयन । तें देखोनिया उद्विग्न लक्षण । कृपाळुवें जाणिजे ॥ ८ ॥ मग अंतरीं कृपास्नेहें द्रवोनी । आसुवांकित नेत्र पुसुनी । श्रीगुरु बोलिजे कृपावचनीं । शिष्यसंबोधनार्थे ॥९॥ सखया कां पां तू घाबिरलासी । कां पाणी आलें डोळयांसीं । काय संकट पडलें विशेषीं । कुचंबलासी कां ॥ १० ॥ आता काहीं तऱ्ही असो मनोगत । तू जें पुससील तें सांगों निश्चित । ऐसें बोलोनि मस्तकीं अभयहस्त । कृपावरें ठेविला ॥ ११ ॥ तेणें स्वानुभवदिनकरा ऐसा । लाधोनि सुखसंतोष सहसा । योगसिद्धिप्राप्ति जाली हा भरवसा । शिष्यें मानिला अंतरीं ॥ १२ ॥ आंगीं सद्बुद्धीचें त्राण भरलें । तेणें विवेकासी बळ दुणें चढलें । मग हळु हळु बोलों आरंभिलें । सुखावलेनि मानसें ॥ १३ ॥ जी जी स्वामी कैवल्यपति । मज सांगिजे योगसाधनवित्पत्ति । ऐसें ऐकतां चि त्रासोनि निर्भछिती । अरे हा दुःसाध्य ह्मणौनी ॥ १४ ॥ अरे तुज म्यां पूर्वींच सांगितलें । जे या युगीं यासी न जाय साधिलें । येणें बहुतासी तोंडघसीं पाडिलें । युगधर्माकारितां ॥ १५ ॥ बहुतांचीं दिवाळीं काढिलीं । बहुतांची गर्वसींग[1] भंगिली । कित्तेकाचीं सुकृतें हरलीं । योगसिद्धि साधितां ॥ १६ ॥ कित्तेकें वाटमार्गींहूनि च्यवलीं[3] । कित्तेकें अर्द्धबोबडीं जालीं । कित्तेकें ठायावऱ्हूनि ढकलिलीं । पावतपावतां ॥ १७ ॥ यासी कामाचें असे महाभय । क्रोध याची मोडितसे सोय । यासी लोभें कवळिता मग धैर्य । उरेल कोठें ॥ १८ ॥ आठां हि सिद्धींचे वळसे[4] । जयालागीं पडती फांसे । दिव्यांगनाचेनि आंविसें[5] । सगळें चि गिळिजे[6] ॥ १९ ॥ मग तृष्णेच्या आवर्तीं पडोनि । आडवाटा पडे स्वर्गभुवनीं । दिव्यांगना-

---

१ सांकडें, संकट. २ सींग=शींग=शिखर, डोकें. ३ भ्रष्टलीं. ४ वळसा=फेरा. ५ आवेशें, लोभानें. ६ याला अष्ट सिद्धि चोळल्या ह्मणजे त्यांचा याला मोह पडतो. हा त्यांच्या नादीं लागतो, दिव्यांगनांना वश होतो व अखेरीस सर्वस्वाला मुकतो. ७ नांवें-प्यांते.

भोग भोगुनी । अमृतपान करितसे ॥ २० ॥ परी तें पुण्यवशें केवळ स्वप्नवत । जेवी राज्य कीजे पृथ्वीचें समस्त । सर्वे चि क्षणमात्रें होतां जागृत । कोठें चि काहीं न दिसे ॥ २१ ॥ तेवी स्वर्गसुख क्षणभंगुरत्वें । योग भ्रशावया पुरते क्षणिकत्वें । पुन्हा पतन होय यासी आकल्पेंत्वें । योगसिद्धि साधिता ॥ २२ ॥ ह्मणौनि योगसाधनांचिया घोरांत । तुवां सहसा न पडावें इथंभूत । येणें आकल्प पुण्य अचुबितें । क्षणमात्रें नाशैल ॥ २३ ॥ तरि सहसा अंतिशो न करीं । याची वार्ता सोडूनि दे झडकरी । ऐसें ऐकोनि शिष्य विचारसागरीं । पुन्हां पडिला अकस्मात ॥ २४ ॥ ह्मणे आता यासी काय करावें । कोणे युक्तीनें स्वामीसी पुसावें । यद्यपि हे न सांगती तरि जिणें ज्यावें । कासियासी मग ॥ २५ ॥ मग हळु चि ह्मणे जी गुरुराया । थोर नवल देखिलें स्वामिया । अवसेचिया अधारीं सूर्य अडखळोनिया । अकस्मात पडिला जी ॥ २६ ॥ का तें धन्वन्तरीस क्षयरोगें व्यापिलें । किं अमृतासी मरणें जिंकिलें । किंवा अग्नीसी स्योरें आलें । तेणें थरथरां कांपतसे ॥ २७ ॥ तैसें जी हें दिसोनि आलें । जे तुह्मांसी कळीचें भय बाधिलें । देवा परब्रह्मीं मायामळें स्पर्शिलें । जावबेल केवी जी ॥ २८ ॥ तेवि स्वामीसी आणि युगधर्माचें भय । हे गोष्टी अघटित असंभवनीय । तथापि उगें चि सांगावयासी जालें काये । काय आह्मांसी करणें असे ॥ २९ ॥ पूर्वी स्वामी बोलिले होते वचन । जे विष्णूसी याकारिता विष्णुपण । तैसें चि शंकरासी थोरपण । येणें चि योगें ब्रह्मयासी हि ॥ ३० ॥ इंद्र चंद्र यम धर्म वायु वरुण । अग्नि सूर्य कुबेर मरुद्गण । रुपेश्वर सिद्ध साधु सुरगण । नवलक्ष तारागणेंसीं ॥ ३१ ॥ दत्त दुर्वासादि वशिष्ठ हनुमंत । कपिल मत्स्येंद्रादि गोरक्ष अवधूत । नवनाथ चौऱ्यासी सिद्ध युक्त । योगसिद्धिं थोरावले ॥ ३२ ॥ ऐसें स्वामींचें आइकोनि वचन । आह्मांलागी अपेक्षा याची गहन । जे

---

१ बहुत वर्षांनीं. २ संपूर्ण. ३ अतिप्रसंग. ४ जगावें, जिवंत रहावें. ५ थारें, शहारें. ६ ही तृतिया आहे. योगसिद्धीनें युक्त झाल्यामुळें.

ऐसें थोर जें कां असे साधन । तें श्रवणीं तऱ्हीं ऐकावें ॥ ३३ ॥ येऱ्हवीं मज हि जी हें कळों सरलें । जे या युगीं हें न जाय आचरलें । कां जे देशकाळवर्त्तमान विपरित जालें । या युगधर्मीसारिखें ॥ ३४ ॥ परि उगी चि त्याची पाहावी भोयें[१] । श्रवणें कांहीं तऱ्ही लागेल सोय । चित्त हें असे परम दुर्जय । चंचळपणें दुस्तर ॥ ३५ ॥ हें आयकोनी तऱ्ही कांहीं आंकळेल[२] । निजहिताची सोय धरील । स्वामींचे चरणरजीं निमग्न होईल । ह्मणौनियां प्रार्थितसे ॥ ३६ ॥ इतुकें करुणावाक्य आयकोनी । शिष्य मनोमळें दाटला देखोनी । त्या मनाची करावया झाडणी । कृपाभरितें उचंबळे ॥ ३७ ॥ मग परमानंदाचेनि भोजें[३] । बोलिजे निजकृपां श्रीगुरुराजें । शिष्यशरणागताचिया काजें । योगसिद्धिपटळ[४] ॥ ३८ ॥ बारे तुज आह्मीं बहुत भेडसाविलें[५] । तुझें धैर्य कसूनि पाहिलें । परि धारिष्ट अचाट देखिलें । पुरतेपणेंसीं ॥ ३९ ॥ आतां आमचेया निजमानसा । पूर्ण कळों सरला भरवसा । जे तूं कळिकाळासी अजिंक सहसा । निश्चयें जालासी ॥ ४० ॥ आणि जे कांहीं युगधर्म बोलिले । हे तुज बाधूं न शकती वहिले[६] । आणि योगसिद्धीसीं निश्चयें साधलें । योगजात सकळ ॥ ४१ ॥ इतुकी ऐकोनि श्रीवाक्यसंवित्ति[७] । तथास्तु ह्मणौनि शिष्य निजप्रीतीं । निजभावें देहेंवीण दडवतीं आत्मज्योतीं । बोबाळिलें श्रीगुरूसी ॥ ४२ ॥ ह्मणे जी जी स्वामी गुरुवर्या । अनाथजनकैवारिया । तुमचें उत्तीर्ण आह्मां व्हावया । देहेंवीण कांहीं न दिसे ॥ ४३ ॥ परि तें नैश्वरपणें बाळिलें[८] । क्षणभंगुरत्वें बोवाळुनी टाकिलें । आतां जें आत्मत्व तुह्मीं आह्मां दिधलें । तें चि समर्पूं ह्मणे जरी ॥ ४४ ॥ तरी तेथें दुजेपणें आधीं पाहावें । मग वेगळेपणें समर्पावें । तेथ या दोहीपणाचेनि नांवें । दिसे शून्याकार ॥ ४५ ॥ ह्मणौनि सर्व अवघें असे तुमचें । तेथ आह्मां उत्तीर्ण होणें काह्याचें । उलटें स्वामींपासीं असे निजसुख आमुचें । तें आह्मा दिल्हें पाहिजे ॥ ४६ ॥

---

१ भुई, भूमि २ आंवरलें जाईल. ३ संतोषानें. ४ पटल, आवरण. ५ भय दाखविलें. ६ सत्वर. ७ संविती=ज्ञान. ८ नष्ट झालें.

ऐसें निजशिष्याचें प्रीतिवाक्य आइकोन । श्रीगुरूसी हास्य आलें पूर्ण । निजांतरीं प्रेमसुखें सुखावोन । निजानंदें बोलिजे ॥ ४७ ॥ तुवां विचारिलें जें कां योगलक्षण । तें सावध होऊनि करीं श्रवण । तेथ मुख्य अष्टांग योग प्रमाण । प्रवृत्तिनिवृत्तिमाजीं ॥ ४८ ॥ आतां अष्टांगें तें कोण कोण । त्यांची बोलिजेल ऊणखूण । तेथ मुख्य यम नियम हे दोघे जण । अतर्बाह्य सांगाती ॥ ४९ ॥ मग तिजा यांचा पाठिराखा । तो प्राणायाम जाणिजे निजसखा । प्रत्याहारेंसीं चौथा वोळखा । आत्मराज पूर्णत्वें ॥ ५० ॥ वोळखोनि पांचवें ध्यान धरिजे । साहावें धारणेचिया समाजें । सप्तम आसन घालूनि वोजें[2] । आठवी समाधी घेइजे ॥ ५१ ॥ या अष्टांगयोगसाधनेंसीं । मनोजय घडे पैं निश्चयेंसीं । आता यांचिया सविस्तर लक्षणासी । यथाक्रमें बोलिजेल ॥ ५२ ॥ तरि निजअतरवृत्तीसी करणें जो सयम । या नाव बोलिजे प्रथम यम । मग बाह्येंद्रियांसी जो करणें नेम । नियम बोलिजे तयासी ॥५३॥ एव यमनियमसमायोगें । प्राणायाम चाले नित्य अव्यगें । प्रत्याहाराचेनि[3] नित्य-संगें । पळेंपळ अखड ॥५४॥ सस्वरूपाचेनि ध्यानसभ्रमें । धारणा धरिजे अविश्रमें । आसन दृढिवेचेनि विश्रामें । निजसमाधीं बैसिजे ॥५५॥ येथील मुख्य राजा प्राणायाम । याचे द्वारपाळ यम नियम । प्रत्याहार प्रधान तो नित्य नेम । कार्यभाग चाळवी ॥ ५६ ॥ तेथ धारणेसीं आत्मध्यान । हें ज्या प्राणायामाचें भुक्तिभोजन । बैसावयासी नित्य सिंहासन । आसनें विराजे ॥ ५७ ॥ तेथ धारणा ते निजअतौरी । इयेसीं जो नित्य भोगविहार करी । समाधीचिया सुखसेजारीं । सामरस्यें सुखावला ॥ ५८ ॥ ऐसा निजमुखें[4] स्वानुभवदिनकरीं । व्युथ्थानेंसीं[5] चालउनी राज्य कुसरी[6] । प्राणायाम आब्रह्मींचें राज्य करी । अनंत आकल्पेंसीं ॥ ५९ ॥ ऐसा तो राजा प्राणायाम । जो ज्ञानियायोगियांचें निजधाम । शकरादिकासी निजविश्राम । नित्य जयाकरिता ॥ ६० ॥ ब्रह्मा विष्णु इद्र चद्र दिन-

---

१ सोबती. २ उत्तम ३ प्रत्याहार=इंद्रियाची अतर्मुखता ४ " निज-सुखें " पाहिजे काय ? ५ व्युत्थान=समाधीचें विसर्जन. ६ चातुर्यानें.

कर । वायु वरुण यमधर्म अग्नि कुबेर । संत महंत योगी मुनेश्वर । सुर सिद्ध सकळ ॥ ६१ ॥ नर वानर राजे भूपति । प्राणायामाकरितां विश्रांति पावती । तया प्राणायामाची उपपत्ति । दों प्रकारें बोलिली ॥ ६२ ॥ त्यांत येक शुद्ध येक सबळ भाग । दों प्रकारेंसीं प्राणायामसयोग । तेथ सबळ जो कां ज्ञानी साधिती विहंगममार्गे । सारासारविचारें ब्रह्मप्राप्ति ॥ ६३ ॥ आणि योगयुक्तीचा जो प्राणायाम । तो शुद्ध जाणिजे केवळ निभ्रम । दुजा आत्मज्ञानसंवित्तिकारणें जो संयम । तो सबळ बोलिजे ॥ ६४ ॥ ऐसें ऐकतक्षणीं शिष्यचक्रवर्ति । निजभावें सद्गुरुस्वामीप्रति । ह्मणे कैसी उभय प्राणायामसंवित्ति । करणें किमात्मक ॥ ६५ ॥ आयिकोनि शिष्याचा प्रश्नादर । प्राणायामसस्था सांगेल श्रीगुरु साचार । ते श्रोतीं श्रीमतीं आकर्णिजे सादर । स्वानुभवदिनकरीं ॥ ६६ ॥ दिनकर रामीं रामदास । योगसिद्धि साधूनि जाला उदास । मायाविवर्जित आशापाश । सर्वसंग परित्यागुनी ॥ ६७ ॥ स्वस्ति श्रीस्वानुभवदिनकरे गुरुशिष्यान्वये नवम कळापे अष्टांगयोगसाधननिरूपण नाम द्वितीय कीर्ण प्रकाशः ॥ २ ॥

---

॥ श्रीराम ॥

श्रीगुरु ह्मणे निज शिष्याप्रति । आइकें शुद्ध प्राणायामसंवित्ति । हठें[1][2] करूनि योगी जो साधिती । पिपीलिकामार्गें ॥ १ ॥ मनपवन[3] समत्वें योजूनि । पिंडपदाचा ग्रास करूनि । सुप्त[4] कुंडलनी[5] चेतउनी[6] । भेदिती[7] ब्रह्मांड ॥ २ ॥ तें हि सामाउनी समग्र पोटीं । लाहुनी अमृतरसाची सतुष्टी । मग आब्रह्मानदैक अमरत्व पुष्टी । येकसरें पावती ॥ ३ ॥ तरी

---

१ ज्ञान. २ हश्च ठश्च हठौ सूर्यचंद्रौ तयोर्योगो हठयोग. ॥ ३ प्राणवायु. ४ निद्रित. ५ पाठीला जो कणा आहे त्यास पृष्ठवंश ह्मणतात; तो पृष्ठवंश पोकळ असून त्यात एक नाडीचक्र आहे, त्यास सुषुम्ना ह्मणतात, सुषुम्नेच्या पायथ्याशीं एक सर्पाकार चक्र आहे, त्यास कुंडलिनी ह्मणतात ६ जागृत करून. ७ कुंडलिनीशक्तीस जागृत करून तिला सुषुम्नेच्या द्वारानें योगी मस्तकातील ब्रह्मरंध्रांत आणितात आणि तेणेंकरून त्यांचें मन ज्ञानमय होऊन राहतें.

तें चि आद्यत कैसें । सांगिजैल मनाचिया अवकाशें । श्रोतीं नेंवेक अव्यग्र अमासें । अवधान दीजे ॥ ४ ॥ तरि प्रथम देश काळ वर्तमान । पाहोनि निजआयुष्याचें मान । मग शरीरस्वास्ति विचारणें परिछिन्न । आरोग्यसमता ॥ ५ ॥ मुख्य योग साधायाचें स्थळ । पाहिजे पुण्यभाजनशीळ । गिरिगुहा कां परम निर्मळ । गगातटाक ॥ ६ ॥ तेथ मठ अथवा देवाळय । असावें परम रमणीय । सीतळ निर्मळ रुचिर सुखमय । उदक हि पाहिजे ॥ ७ ॥ वन उपवनेंसीं पुष्पलतायुक्त । जेथें हस सारस नित्य क्रीडत । मयूर कोकिळ कळिरवें कुजत । नाना पक्षीसमूह ॥८॥ सभवतीं दाटलीं निर्मळ जळें । माजीं विकासलीं कुमुदें कमळें । जेथ जनपदमेळ कदाकाळें । न पावे किमपि ॥ ९ ॥ मग तेथ योगी होऊनि सुस्थिर । सोडूनि परिग्रहमात्र समग्र । सहजें चि मन हि येकाग्र । अपस्या चि होय ॥ १० ॥ मग शनै शनै आहारयुक्ति । जिंकोनि साधिजे रसपानव्यक्ति । इतुकेनि मनोव्यापाराची गति । खुटली सहजें ॥ ११ ॥ मग हटप्रदीपिकाशास्त्रसमतीं । करूनि देहशुद्धीची अभिव्यक्ति । धौतीकर्मयोगें मळमूत्राची उपहति । करूनि उदककोशशुद्धि ॥ १२ ॥ सवा हात वस्त्र बारिक धौत । मुखमार्गें घालूनि उदरात । वमनरेचनेंसीं समग्र अमांत । होय देहशुद्धि तेणें ॥१३॥ मग नासिकाद्वारें नवांगुळ परमित । कांकडा घालूनि शोधावें कफ श्लेष्मांत । इडापिंगळादि नाडी सुषुम्नापर्यंत । ब्रह्मांडशुद्धि करावी ॥१४॥ एव मळमूत्र आणि दुष्ट रक्त । श्लेष्मा कफ वात आणि पित्त । यां सर्वांचें हि करूनि उपहत । देहशुद्धि साधावी ॥ १५ ॥ याचा समूळ सांगतां विचार । ग्रंथ विस्तारेल पैं अपार । तेणें श्रोते मानिती अनादर । अप्रसंगीक म्हणौनी ॥ १६ ॥ अहो

---

१ क्षणभर. २ किंचित्. ३ मजुळ स्वरानें. ४ परिग्रह=सग्रह. ५ आरोग्य, वायूचें इष्ट स्थळीं अवधारण, अग्नीची प्रदीप्तता व नादाभिव्यक्ति इत्यादि क्रिया नाडीच्या शोधनानें साध्य होत असल्यामुळें अत शरीरशुद्धीकरिता योगमार्गाचें अनुष्ठान करणाऱ्या साधकाना ज्या सहा कर्मांचा उपदेश केलेला आहे, त्यापैकीं धौति हें एक कर्म आहे. ६ नाश.

हा हटयोग यथायुक्त सांगता । असंभवनीय असे पैं तत्वता । ययायोगें कैळासीं नित्य उमाकांता । सहजसमाधीसुख ॥ १७ ॥ असो या प्रकारें ते योगी जन । करिती पिंडब्रह्मांडशोधन । मग विधियुक्त वाळूनियां आसन । समसाम्यता साधिती ॥ १८ ॥ उच्च नीच ना सम विषम । वरि मृगव्याघ्राजीन घालूनि उत्तम । त्यावरि वस्त्राची चौघडी करूनि सम । वरि कुशास्तरण करावें ॥ १९ ॥ कोमळ सरिसेपणें सुबद्ध । सारिखे चि असावे अति शुद्ध । आसन साधूनि येवंविध । योगी बैसती समत्वें ॥ २० ॥ मग प्राणापानांचिया समता । आसन घालूनियां तत्वता । मुद्रा लाऊनि समसाम्यता । शरीरसंचकरिती ॥ २१ ॥ येकाग्रता निज अंतःकरण । करूनियां श्रीगुरुस्मरण । चतुर्विध प्रकारें वायुधारण । शनै शनै साधिती ॥ २२ ॥ पूरकें कुंभक त्राहाटक रेचक । यथाशास्त्र युक्तीचेनि सम्यक । श्रीगुरुनामस्मरणपूर्वक । इडापिंगळानाडीयोगें ॥ २३ ॥ करूनि शास्त्रोक्त भूमिशुद्धि । वरि मग साधावी

१ योगशास्त्रप्रणीत. २ श्रीसमर्थांचें सिद्धासन असे. ३ ही एक प्रकारची क्रिया आहे. गुरूपदेशाप्रमाणें साधक या क्रियेचा अभ्यास करितात. जोंपर्यंत इडा वगैरे नाड्यांत प्राण सञ्चार करीत असतो, तोंवर तो असिद्ध च असतो, ह्मणून सुषुम्नानाडीच्या द्वारें लय करण्याकरितां योगशास्त्रप्रणीत प्राणायामाच्या वेळीं साधक मुद्रांचा अभ्यास करितात. त्या मुद्रा दहा प्रकारच्या आहेत. ४ शरीर, डोकें व मान हीं गुरूपदिष्ट मार्गानें स्थिर धरून इकडे तिकडे न पाहतां साधक आपली दृष्टि नासाग्रीं ठेवितात ५ ज्याप्रमाणें कमलाच्या देंठावाटें तोंडानें पाण्याचें आकर्षण करावें, त्याप्रमाणें गुरूपदिष्ट पद्धतीनें बंध साधून बाहेरच्या वायूचें नाकपुडीवाटें आंत आकर्षण करून प्राणगतीचा निरोध करणें, याला पूरक प्राणायाम ह्मणतात. ६ प्रथम पूरक प्राणायामानें अथवा रेचक प्राणायामानें प्राणगतीचा निरोध करून पुढें रेचक किंवा पूरक याविरहित जी शून्य स्थिति तिला कुंभक प्राणायाम ह्मणतात. ७ गुरूपदिष्ट पद्धतीनें डोळे त्राहाटून नासाग्राकडे किंवा इष्ट ध्येयाकडे डोळ्याला पाणी येईपर्यंत एकसारखी दृष्टि लावण्याचा अभ्यास ज्या क्रियेनें होतो त्या क्रियेस त्राटक ह्मणतात. पूरक, कुंभक, रेचक आणि केवलकुंभक असा चार प्रकारचा प्राणायाम आहे. केवलकुंभकाच्या ऐवजीं येथें "त्राहाटक" योजिलें आहे. ८ गुरूपदिष्ट पद्धतीनें जिव्हाबंध करून बंध साधून पोटांतील प्राणवायूला नाकपुडीवाटें बाहेर सोडून प्राणगतीचा निरोध करणें, त्यास रेचक प्राणायाम ह्मणतात.

आसनशुद्धि । त्यानतर देहशुद्धीची विधि । यथाशास्त्रें करावी ॥ २४ ॥ तदुपरि प्राणायामशुद्धि । करूनिया यथाविधि । वाक्शुद्धि तथा मनोशुद्धि । आत्मशुद्धि त्यानंतरें ॥२५॥ इया सात हि शुद्धि आदौ करूनि । सादरता येकाग्र अंतःकरणीं । ब्रह्मस्वरूपाचिया अनुसंधानीं । ब्रह्मशुद्धि साधावी ॥ २६ ॥ लागतां सदैव ब्रह्मानुसधान । परब्रह्म होइजे स्वयें आपण । जेवी भ्रमरदशें अळिका वेधोन । भ्रमर होय निजांगें ॥ २७ ॥ कां ते जळीं पडता सहज जळगार । तियेसी न लागे विलंब होता नीर । तेवी मन करितां ब्रह्माकार । ब्रह्म होये निजांगीं ॥ २८ ॥ एवं ब्रह्मरूप जालिया आपण । सहजें हारपे कार्यकारण । मनाचें होऊनियां उन्मन । सहजस्थिति समाधि ॥ २९ ॥ लागतां केवळ स्वरूपसमाधि । सहजें हारपे आधि व्याधि । मी आणि माझेंपणें सकळ हे उपाधि । नाश पावे तत्काळ ॥ ३० ॥ स्वरूपीं समरसलियां वृत्ति । बाह्येंद्रियें निवांत राहाती । मनाची पागुळोनि चचळ गति । निवांत राहे केवळ ॥३१॥ मन स्वरूपीं जालयां निश्चळ । इंद्रियें निश्चित होती केवळ । मग नाना चेष्टाची तळमळ । सहज चि राहे ॥३२॥ वृत्ति जालिया स्वरूपीं येकाग्र । मन हि सहजें होय अव्यग्र । चचळपणाची गति समग्र । अपस्या चि खुटे ॥ ३३ ॥ मनाचें मनपण हारपलें । ब्रह्मीं ऐक्यत्वें समरसलें । तेंव्हा पवनाचें हि राहिलें । चंचळपण सहजें ॥ ३४ ॥ पवन चालत होता जो आलुमाळ । तो शनै शनै स्थिरावे केवळ । मग ब्रह्मस्मरणें सुनिश्चळ । ब्रह्मीं समरसे निजांगें ॥ ३५ ॥ पाहा जितुकी आकाशाची व्याप्ति । तितुकी चाले पवनाची गति । अनता ब्रह्मांडाची अभिव्यक्ति । या वायूकारिता ॥ ३६ ॥ त्रिगुणीं आणि पचभूतीं । मिळोनि सचराचराची होय उत्पत्ति । चौऱ्यासी लक्ष योनींची उपपत्ति । या वायूचिकारितां ॥ ३७ ॥ अडज स्वेतज जारज उद्भिज । याचा वायूचिकारितां होय उपज । चहु वाणींचा शब्दसमाज । या वायूचिकारिता ॥ ३८ ॥ स्थावर जगमीं जो चाळक । या वायूहूनि कोण असे

अधिक । पाहातां सूक्ष्मदृष्टीं सम्यक । वायो चि सकळ हि ॥ ३९ ॥ पिंडब्रह्मांडीं मिळोनि तत्वता । या वायूची परम चपळता । शरीरमात्रीं चाळकपोषणता । याची चि केवळ हे ॥४०॥ अफाट तरि हा अमर्याद । परि आकळुनी गुणभूतांचा समर्द । देहमात्रीं राहोनि सावध । पाळण करी सर्वांचें ॥४१॥ येक चि परि दशधा विभागला । शरीरमात्रीं दशधा व्यापला । ऐसा स्थावरजंगमीं फाकला । येकपणें चि अनेक ॥ ४२ ॥ नाग वायु राहोनि मस्तकीं । अनाहतध्वनीची करी उखिविखी[1] । कूर्म वायु श्रोत्रीं राहोनि सम्यकीं । करी शब्दाधिकरण ॥ ४३ ॥ नेत्रद्वारीं राहोनि आपण । कुकुर[2] वायु करी मीळनोन्मीळन । घ्राणीं राहोनि परिमळादिसेवन । देवदत्त करी निजांगें ॥ ४४ ॥ धनंजय वायु जिव्हाद्वारें । अन्नपानादि सेवी आदरें । सर्वांगीं सर्व संधी निर्द्वारें । व्यान लववी निजांगें ॥४५॥ नाभिस्थानीं बैसोनि समान । करी चतुर्विध अन्नपाचन । उदान कंठगत करी अवस्थोत्पादन । जागरस्वप्नसुषुप्त्यादि ॥ ४६ ॥ हृदईं राहोनियां वायु प्राण । स्वासोस्वासेंसीं क्षुधातृषाधिकरण । गुदद्वारीं राहोनि मळमूत्रशुक्रोत्सर्जन । अपान करी निजांगें ॥ ४७ ॥ एवं दशधा होऊनि वायु आपण । करी शरीरमात्रीं चाळण पोषण । येक चि परि अनेकत्व धरून । जीवमात्रांतरीं व्यापला ॥ ४८ ॥ व्यापक परि अति चंचळ । क्षणमात्रें फिरे ब्रह्मांडगोळ । या वायूचा अंश मन हें चपळ । पवनापरिस अनंत गुणें ॥ ४९ ॥ असो आकाशाचा अंश पवन केवळ । तें गगन निश्चळ पवन चंचळ । त्या पवनाचा अंश मन परि अति चपळ । त्याहिपरिस कोटिगुणें ॥ ५० ॥ तेथ पवन जो कां अति चपळ । तो साधनें ब्रह्मीं होतां निश्चळ । त्याचा अंश तें मन हि होऊनि पांगुळ । पवनसंगें वर्तत ॥ ५१ ॥ एवं मन पवनीं होय निश्चित । पवन परब्रह्मीं समरसत । तेव्हां मायादि द्वंद्वमळ समस्त । निर्मळ होती निजांगें ॥ ५२ ॥ मग

---

१ होय नव्हे. २ कृकल.

सुषुम्नाद्वारें प्रभंजन। अग्निचक्रीं बैसोनि आपण। सात हि चक्रें अहोरात्रीं भेदून। रिघनिघी[3] करितसे ॥ ५३ ॥ गुदस्थानीं चक्र आधार। तेथें चतुर्दळें कमळ सुंदर। वीसांत चतुर्दळीं चत्वार। मातृका विराजती ॥ ५४ ॥ लिंगीं स्वाधिष्ठान षड्दळान्वित। तेथ बालांत सा मातृका विराजत। दशदळीं नाभीसी मणिपूर शोभत। डँफात दश मातृकीं ॥ ५५ ॥ हृदईं अनाहत द्वादश दळ। तेथें कठांत मातृकीं शोभा बहळ। कठीं विशुद्ध षोडशदळ। तें सोळा स्वरीं विराजे ॥ ५६ ॥ भ्रूमध्य अग्निस्थानीं द्विदळ कमळ। तेथ हंसात्मक दों दळीं सुगध बहळ।

---

१ मनुष्याच्या लिंग व गुद याच्या मध्यभागी जी शिवण आहे त्या शिवणीपासून नऊ अगुलें वर नाभीखालीं एक कद आहे. तो मृदु, श्वेतवर्ण असून त्याचा विस्तार चार अगुलें लाबरुद आहे व त्याची आकृति कुक्कुटाडसम असून त्वगादिकानें भूषित आहे. या कदाच्या मध्यस्थानीं सुषुम्ना निघून अधोमार्गी वळून मेरुदडमार्गानें ऊर्ध्व येऊन ब्रह्मरंध्रात पोहोंचते. तिला शून्यपदवी, ब्रह्मरध्र, महापथ, स्मशान, शांभवी, मध्यमार्ग वगैरे अनेक सज्ञा आहेत. २ सुषुम्नेबरोबर सबद्ध झालेल्या शिराग्रंथी आहेत, त्यांना चक्रें किंवा पद्में ह्मणतात तीं चक्रें सात आहेतः–आधार, स्वाधिष्ठान, मणिपूर, अनाहत, विशुद्धि, अग्नि चक्र व ब्रह्मरध्र चक्र. ३ येणें जाणें, ये जा. ४ दळ=पाकळी. शिराग्रथींचे जे सूक्ष्म शिरातंतु त्यांना दल ह्मणतात. वं, शं, ष, स, या चार वर्णांनीं चिन्हित अशा चार पांकळ्यानीं युक्त जें आधार चक्र तें गुदस्थानीं आहे. त्याची देवता गणेश आहे. ५ व पासून स पर्यंत. ६ ब, भं, म, यं, रं, ल, या बपासून लपर्यंत सहा वर्णांनीं चिन्हित अशा सहा पाकळ्यांचें जें स्वाधिष्ठान चक्र तें लिंगस्थानीं आहे. अधिष्ठात्री देवता ब्रह्मा होय. ७ ड, ढं, णं, त, थ, द, धं, न, प, फ, या डपासून फपर्यंत दहा वर्णांनीं चिन्हित अशा दहा पाकळ्यांचें जें मणिपूर चक्र तें नाभिस्थानीं आहे. देवता विष्णु ८ क, ख, ग, घं, ङ, चं, छं, जं, झ, ञ, टं, ठ, या कठात बारा वर्णांनीं चिन्हित अशा बारा पाकळ्यांचें जें अनाहत चक्र तें हृदयस्थानीं आहे. देवता शंकर. ९ अ, आ, इ, ई, उ, ऊ, ऋ, ॠ, ऌ, ॡ, ए, ऐ, ओ, औ, अं, अः, या सोळा स्वरांनीं चिन्हित अशा सोळा पाकळ्यांचें जें विशुद्धि चक्र तें कठस्थानीं आहे. देवता जीव. १० ह व क्ष या दोन अक्षरानीं अंकित अशा दोन पाकळ्यांचें जें अग्नि चक्र तें दोन भोंवयामध्यें आहे. याला बिंदुस्थान किंवा आज्ञाचक्र असें हि ह्मणतात. देवता गुरु.

मस्तकीं ब्रह्मस्थान सहस्रदळ । तें प्रणवयुक्त विराजे ॥ ५७ ॥ एवं साता हि चक्रीं मिळोनि । पन्नासा मातृकाची वांटणी । तेथ पवन चाले निशिदिनीं । स्वासोस्वासात्मक ॥ ५८ ॥ या षट्चक्रांचें साकल्य निरूपण । पुढिये कळापीं सांगिजैल परिछिन्न । श्रोतीं सावध होऊनियां श्रवण । अत्यादरें करावें ॥ ५९ ॥ असो साटी घटिकांचें प्रमाण । अहोरात्रीं मिळोनियां स्मरण । येकवीस सहस्र सा शतें जाण । अंजपाजप चालतसे ॥ ६० ॥ तेथ हंसात्मक नित्य स्मरण । पळमात्रें होतसे षट्प्रमाण । येका घटिकेमाजीं गणन । तीनसें साटी ॥ ६१ ॥ योगी स्थिर करूनिया तेथें मन । शनै शनै साधिती पवन । पंचमुद्रांचें अतर्क्य विंदान । तें अभ्यासयोगें साधिती ॥ ६२ ॥ दृष्टि नासाग्रीं ठेऊनियां भूमिवरि । अनुदिनीं लक्षिजे या नांव भूचरी । लक्ष लक्षिजे भ्रूमध्यांतूनि आकाशवरी । खेचरी मुद्रा ते बोलिजे ॥ ६३ ॥ सूर्यीं लक्ष ठेविजे ते चांचरी । अंतरिक्ष लक्षावें ते अगोचरि । अलक्षमुद्रेची नवलपरि । तें गुरुमुखें विचारिजे ॥ ६४ ॥ इया पांचां मुद्रां माजीं । आपल्यास जे साधेल सहजीं । ते श्रीगुरुकृपासयोजीं । शनै शनै साधिजे ॥ ६५ ॥ श्रीगुरु सुखावोनि ह्मणे शिष्याप्रति । योगी पवन साधिती या रीतीं । लव पळ घटि याम दिन राति । मास वर्ष शनै शनै ॥ ६६ ॥ ब्रह्मीं चित्त जालयां लयगत । हळु हळु पवन हि होय सुनिश्चित । मग शीतोष्ण सुखदुखादि द्वंद्वजात । इंद्रियचेष्टा राहाती ॥ ६७ ॥ जेवीं कां तो निर्वात स्थानींचा दीप । निश्चळतां प्रकाश करी अमूप । तेवी पवन जालिया योगानुरूप । सस्वरूप होय निजांगें ॥ ६८ ॥ कां तो सागरीं पडतां सैंधवकण । क्षणेकें विरोनि होय जीवन । तेवी सहजस्थितीं साधलियां पवन । ब्रह्मरूप होय निजांगें ॥ ६९ ॥ ऐसा ब्रह्मरूप जालियावरि । स्वानंदें स्वानुभवदिनकरीं ।

---

१ हजार पाकळ्यांनीं युक्त जें ब्रह्मरंध्र चक्र तें प्रणवयुक्त ह्मणजे ॐ स्वरूप असून मस्तकीं विराजतें याची देवता परब्रह्म. २ दासबोध १७४५ पहा. ३ भूचरी, खेचरी, चाचरी, अगोचरी आणि अलक्ष अशा पाच मुद्रा आहेत.

प्राणायाम अष्टांगेंसीं निजराज्याधिकारी । आब्रह्मकल्पपर्यंत ॥ ७० ॥ दिनकर रामीं रामदास ह्मणे । ऐसें प्राणायामें ब्रह्मींचें राज्य करणें । ज्यासी हा प्राणायाम साधेल तेणें । ते चि पदवी पाविजेल ॥ ७१ ॥ तें चि पुढिलिये कीर्णीं निरूपण । जेणें ब्रह्मप्राप्ति होय परिपूर्ण । दिनकर रामदासीं शरण । अनन्यभावेंसीं ॥ ७२ ॥ स्वस्ति श्रीस्वानुभव-दिनकरे गुरुशिष्यान्वये नवम कळापे देहशुद्धिनिरूपण नाम तृतीय कीर्ण प्रकाशः ॥ ३ ॥

---

॥ श्रीराम ॥

आयकोनि अष्टांगयोगसाधन । तथा आठ हि शुद्धि सलक्षण । त्यानंतर मनपवनजयेंसीं पूर्ण । ब्रह्मीं सलग्नता ॥१॥ तैस्या चि षट्चक्राच्या गोष्टी । आणि पचमुद्राची लक्षदृष्टि । इतुकें श्रवण होतां सुखसंतुष्टीं । शिष्यमानस सुखावलें ॥ २ ॥ मग सुखावोनि ह्मणे देवादिदेवा । तुमच्या अकळ न कळती मजलागीं मावा[1] । स्वानुभवदिनकरा ऐसा मज यावा[2] । अकस्मात दिधला समर्था ॥ ३ ॥ तरि या उपकाराची उत्तीर्णता । कायसेन होऊ हें न कळे तत्वता[3] । आतां कायावाचामनसा येकात्मता । अनन्य शरण हें चि भलें ॥ ४ ॥ इतुकें शिष्य जव बोलों न पुरे । तवं कृपाळुवें श्रीगुरुदातारें । बोलिजे शब्दवाक्यें मधुरें । अमृतोपमें केवळ ॥ ५ ॥ सखया उपचाराचें या काय काज । तुज जे चाड असेल ते सांग मज । तें चि बोलिजेल बापा सहज । तुज रुचेल ऐसें ॥६॥ ऐसी आज्ञा होता चि सत्वर । शिष्य बोले वाक्य रुचिर । ह्मणे स्वामी सुप्त कुडलिनीचा प्रकार । कैसा तो सांगिजे ॥७॥ इतुकी शिष्याची आयिकोनि विज्ञप्ति । श्रीगुरु सर्वस्वें सुखावे चित्तीं । मग पवनजयाचिया निगुति । सुप्त कुडलिनी प्रबोधिजे ॥ ८ ॥ आतां पवनसाधनाची कैसी गति । ते सांगेन तुज यथास्थिति । येकाग्र

---

१ माया. २ प्राप्ति. ३ निभ्रांत, यथार्थ.

होऊनियां चित्तीं । श्रवण करी आदरें ॥९॥ तरि पवन ह्मणिजे स्वासोस्वास । शरीरीं चालतसे जो अहर्निश । तया स्वासीं ब्रह्मस्मरणास । उद्भव नित्य होतसे ॥ १० ॥ सकार उच्चारे स्वासपूरकीं । हकार उच्चारे स्वासरेचकीं । सोहं शब्दें पूरकरेचकीं । अनाहत ध्वनींसीं ॥ ११ ॥ ययाचा विचारितां शब्दार्थ । सहजें साधतसे परमार्थ । श्रीगुरुकृपा होऊनि कृतार्थ । जीव ब्रह्म होतसे ॥ १२ ॥ असो अनाहत ध्वनीचिया नादें । नित्य स्मरण चालतसे निशब्दें । तेथ दों अक्षरीं दोनि पदें । दोघां जणांचीं ॥ १३ ॥ ऐसें ऐकतक्षणीं शिष्यचक्रवर्त्ति । बोले पूर्णानंदाचिया संविति । तरि दों अक्षरीं दोनि पदें तें कोणतीं । आणि ते दोघे कोण पैं ॥ १४ ॥ ऐकोनि शिष्याचा प्रश्नादर । श्रीगुरु ह्मणती ऐक सादर । तरि सोहं या शब्दाचा प्रकार । साद्यों आद्यंत ॥ १५ ॥ तरि साकारीं बोलिजे तो ईश्वर । उपाधिरहित जो सर्वेश्वर । पूर्णानंदपद सत्य साचार । गुणागुणरहित ॥ १६ ॥ हकारीं बोलिजे तो जीव । अष्टधायुक्त ज्याचा प्रभव । सुखदुखादि नाना प्रस्ताव । भोगणें जयासी ॥ १७ ॥ ईश्वर मूळमायेचा आधिष्ठात्रा । दुजा अविद्याप्रकृतीचा धात्रा । उभयसंगीं अग्निचक्राचिया सूत्रा–। माजीं स्मरण ब्रह्मींचें ॥ १८ ॥ तेथ सकारीं हकाराचें होतां स्फुरण । तें चि अष्टधेसीं बोलिजे जीवपण । त्याच्या निरासें होय पूर्ण । केवळ परब्रह्म ॥ १९ ॥ असो योगी श्रीगुरुस्मरणें निजासनीं । अष्टधेसीं जीवपण निर्शुनी । हकारसकारीं लय करूनि । पूरक साधी शनै शनै ॥ २० ॥ तेथ योगी हकाराचा त्याग करूनि । सकार योजी ब्रह्मस्थानीं । पूरकयोगें नित्य साधनीं । सुषुम्नामार्गें ॥२१॥ हकाराचा सकारीं पूर्णत्वें लय होता । योगी अजिंत होय काळकृदांता । मग पळेंपळ पवन साधितां । सहजस्थिति योगी न सिणे ॥२२॥

---

१ कंदाच्या अग्रापासून मोठ्या वेगानें निघालेला प्राण हृदयगत जीवास आश्वासन देऊन इडा व पिंगळा याच्या मार्गानें जेव्हां बहिर्गमन करितो, त्या वेळेस " ह " असा ध्वनि होतो व जेव्हां अंतर्गमन करितो, त्या वेळेस " सो " असा ध्वनि होतो.

सूर्ये चंद्र समता अग्नियोगें। इडा पिंगळा टाकूनि मार्गें। योगी मान पाहोनि निजागें। सुषुम्ना निज निकटीं ॥ २३ ॥ तेथ पळें-पळ साधतां पवन। निजसुखें योगी चैतन्यघन। मनाचें सहज होय उन्मन। स्वसवेद्य सुख भोगितां ॥ २४ ॥ स्वासमात्र साधतां होय इतुकें। स्वासद्वयें होय समधातुकें। च्यार स्वास साधतां शरीर असेकें। निश्चळ होय अवघें चि ॥ २५ ॥ सा स्वासांचें येक होय पळ। पळ येक साधतां पवन निश्चळ। तेणें त्रै अवस्थीं अविकळ। मन होय येकाग्र ॥ २६ ॥ पळद्वय साधतां पवन। हृद्गत नाडीसी होय चेतन। तेणें अनाहत चक्रीं बैसोनि मन। त्रै अवस्थीं सावधता ॥ २७ ॥ चतुःपळें श्रवणीं उमटती शब्द। दशनादात्मक ध्वनि विविध। पळाष्टक पवन साधतां शुद्ध। काम निवटे अतरींचा ॥ २८ ॥ पधरा पळें साधतां पवन। सुषुम्ना नाडी होऊनि समान। मग हळु भेदी ब्रह्मस्थान। स्वसामर्थ्यें निजांगें ॥ २९ ॥ मग शक्ति जे का कुंडळेनी। आदिमाया विश्वसजीविनी। शरिरमात्रीं असे निजोनी। परी शरीर चालवी स्वसत्ता ॥ ३० ॥ असे पवनाची चि वोतली। परि सर्पाकारें रूपासी आली। जाणीवरूपें जे व्यापली। सर्व शरीरीं ॥ ३१ ॥ तिचें पुछाग्र असे ब्रह्मस्थानीं। मुख असे आधार चक्र व्यापूनि। औठा वेढीं औठें वळणें घालूनि। षट्चक्रीं पसरलीसे ॥ ३२ ॥ असो तीस पळें साधलियां पवन। तो भेदूनि जाय ब्रह्मस्थान। पुछाग्रीं स्पर्शतां चि सचेतनें। कुडलिनी होय

---

१ सर्व. २ कुडलिनी ही शक्ति आहे. तिला च कुटिलांगी, भुजंगी, शक्ति, ईश्वरी, कुडली आणि अरुंधती असे पर्यायशब्द आहेत. ज्याप्रमाणें मनुष्य किल्लीनें कुलूप काढून दार उघडतो, त्याप्रमाणें योगाभ्यासी साधक कुडलीच्या योगानें मोक्षाचें कपाट ह्मणजे सुषुम्नेचा मार्ग खुला करू शकतो. ज्या सुषुम्नामार्गानें ब्रह्मरंध्रास जावयाचें असतें तेथें द्वाराच्या तोंडाशीं च आपल्या आंगाचे साडे तीन वेढे देऊन व आपलें शेंपूट तोंडांत बळकट धरून सर्पाकार भगवती कुंडलिनी शक्ति निद्रिस्थ आहे. योगाभ्यासी साधक गुरूपदिष्ट पद्धतीनें मोक्षाचें कपाट खुलें करण्याकरितां कुंडली चालन करून तिला जागृत करतात. ३ साडे तीन. ४ प्रसुप्त अवस्था मोडून ऊर्ध्व होते.

तत्काळ ॥ ३३ ॥ स्वयें वायुस्वरूप असे आपण । परि सर्पाकारें आकार पूर्ण । सर्पासी वायुस्पर्श होतां चि जाण । जेवि सुखावे सर्वांगीं ॥ ३४ ॥ तेवी नाना साधनें साधितां योगी । संतृप्त होतसे सर्वांगीं । तेणें निजशक्ति हि संतत निजांगीं । योगसाधनें होतसे ॥ ३५ ॥ तव तिजलागीं अकस्मात वायुस्पर्श । होतां चि पावे सुख संतोष । मग सचेतन होऊनियां निजाश । सुखावोनि चळवळी ॥ ३६ ॥ तव योगी वरिच्यावरी करी पवन सावावो । कारितां शक्ति धरी निजागीं आवो । मग सर्वांगीं धरूनियां चेवो[१] । मुख फिरवी ऊर्ध्वा उजु ॥३७॥ जव योगी घटिका येकी साधी पवन । तव शक्ति पूर्ण होऊनि सचेतन । मग पश्चिममार्गें ऊर्ध्वगमन । लीळा आरंभी निजांगें ॥ ३८ ॥ आधार चक्रीं असे मुख । परि सर्वांगाचें जाणे सुख दुख । जाणीवरूपें निजसत्ता दाऊनि उल्लेख । शरीर चाळी सकळ हि ॥३९॥ निजसत्ता शरीर चाळऊनि सकळ । आपण आधारीं राहे निजेली निश्चळ । ते वायुस्पर्शें जागी होतां चि अति चपळ । तेणें डडळूं लागे सर्वांग ॥ ४० ॥ मग ते वायुबळें आधार चक्र सोडूनि । येऊ पाहे स्वाधिष्ठाना-लागूनि । तवं सर्वांगीं तिडका लागोनी । योगी विकळ होय तिये सधीं ॥ ४१ ॥ तिये वेळे साधक जवळी असावा चतुर । तेणें सजीवनीरसें

---

१ सबळ, प्रदीप्त. २ आकार ३ जागृति. ३ मनुष्याच्या लिंग व गुदयाच्या मध्यभागीं जी शिवण आहे त्या शिवणीपासून नऊ अंगुळें वर नाभीखालीं एक कंद आहे. तो मृदु श्वेतवर्ण असून, त्याचा विस्तार चार अंगुळें लांबरुंद आहे व त्याची आकृति कुकुटांडसम असून त्वगादिकानें भूषित आहे. या कंदाच्या मध्यस्थानीं सुषुम्ना नाडी निघोन अधोमार्गी वळून मेरुदंडमार्गानें ऊर्ध्व येते. ती प्रथम आधारचक्रात, नतर स्वाधिष्ठान चक्रांत, नतर मणिपूर चक्रात, नतर अनाहत चक्रांत, नतर विशुद्ध चक्रांत येते. तिला तेथें एक पश्चिमेकडे व दुसरा पूर्वेकडे असे दोन मार्ग फुटतात. पूर्वेकडील मार्ग भ्रूमध्यांत जें अग्निचक्र आहे. त्यातून ब्रह्मरंध्रापर्यंत जाऊन पोंचतो. पश्चिमेकडील मार्ग मानेच्या पाठीमागें मेरुदंड आहे, त्यातून ब्रह्मरंध्रापर्यंत जाऊन पोहोंचतो. बहुतेक योगाभ्यासी साधक पश्चिमेकडील मार्गानें ऊर्ध्वीं गमन करितात.

अति सत्वर । सर्व संधीमाजीं रस जिरऊनि अपार । सावध करावें योगियासी ॥ ४२ ॥ तेथ योगियें होऊनि अति सावध । सुप्त कुंडलिनीसी करूनि प्रबोध । आपण आसनपाढिकेसीं सुबद्ध । वज्रासनीं बैसावें ॥४३॥ तेथ अभ्यासाची पडतां वसवटी । वज्रासन साधे न होतां कष्टी । सहजें चि निजासन परिपाटी । क्षणार्द्धेसीं साधोनि जाय ॥४४॥ मग तेथ आंग चि आंगातें सावरी । पवनु चि पवनातें धरी । अतरीं अनुभवाची उजरी । सहजें चि हों लागे ॥४५॥ प्रवृत्ति सविया चि मागें सरे । समाधि समता ऐलाडी उतरे । तव अभ्यास सहजें वोसरे । आसनजय होता ॥४६॥ तेव्हां मुद्रेची प्रौढी होय कैसी । ते चि सांगिजैल आता परियसीं । तरि उर्वे इया जघनेंसीं । जडूनि घाली ॥ ४७ ॥ मग चरणतळें दोन्हीं देवढीं । नेटेकीं च संमत्वें गोंढीं । आधारदेमाचा बुडीं । सचैरीं अभ्यासें ॥ ४८ ॥ मग सव्य तें तळीं ठेविजे । तेणें सीवेणीमध्य पीडिजे । वरि बैसे तो सहजें । वामचरण ॥ ४९ ॥ ठेऊनि गुदमेंढ्रांतौति । च्यारि अगुळें समता निर्गुति । तेथ सार्द्ध सार्द्ध प्रातीं । सांडूनियां पैं ॥ ५० ॥ माजीं अगुळ येक निगे । तेथ टांचेचेनि उत्तरभागें । नेहटिजे योगियें निजांगें । वरि पेललेनि ॥ ५१ ॥ मग उचलिलें कां नेणिजे । तैसें पृष्ठांत उचलिजे । तेथ गुल्फद्वयें धरिजे । तेणें चि मानें ॥ ५२ ॥ सांगतां हे योगयुक्ति । बहुत कठिण याची निर्गुति । शब्द बोलतां आहाचँ दिसती । परि करणें गहन ॥५३॥ हा योग साधता

१ उत्कर्ष २ सहज ३ अलिकडे ४ मांड्या. ५ पोटऱ्या. ६ पोटऱ्या मांड्यांशीं बळकट संलग्न कराव्या ७ पायाचे तळवे ८ एकाशीं दुसरा सलग्न अशीं. ९ सुस्थिर. १० एकसारखी. ११ बळकट. १२ गुदस्थानीं. १३ शिरकावीं. १४ वृषण व गुद यांच्या मधील शिवणीचा मध्य १५ दाबावा. १६ मेंढ्र-जननेंद्रिय. १७ अनुसधानात्मक लक्ष देऊन; काळजीनें १८ दीड दीड बोट १९ गुद व जननेंद्रिय याच्या मध्यें जी चार बोटें जागा आहे, तीपैकीं मागें व पुढें दीड दीड बोट सोडून जी एक बोट जागा उरते तेथें. २० वरच्या भागानें २१ दाबावी. २२ तोलून धरून २३ तोलून धरलेलें शरीर उचललेलें आहे याविषयीं जाणीव न राहता. २४ पाठीच्या कण्याचा शेवटचा भाग. २५ घोटे. २६ काळजी. २७ सहज, सुगम.

इथंभूत। शंकरादिक होती समाविस्त। दत्त गोरक्षादि हनुमत। योगयुक्ती अेक्षई[1] ॥ ५४ ॥ सांगतां हे योगी समग्र। ग्रंथ विस्तारेल पैं अपार। ह्मणोनि असो योगयुक्ति परिकर[2]। सांगिजैल तुज ॥ ५५ ॥ ऐसा शरीरसच[3] करिता। योगी सुखावे पैं स्वभावता। तव हळु चि पार्ष्णीचा माथा तत्वता। स्वयंभु[4] होय ॥ ५६ ॥ या नाव केवळ गहन। आद्यत मूळबंदाचें[5] लक्षण। हें साधलियां वज्रासन। बोलिजे यासी ॥ ५७ ॥ ऐसी आधारीं[6] मुद्रा पडे। तेणें अधोद्वारींचा[7] मार्ग मोडे। मग सहजें आंतुलियेकडे[8]। अपान वोहटे ॥ ५८ ॥ मग करसपुष्ट अंपैसे[9]। वामचरणीं येऊनि बैसे। तव बाहुमुळीं[11] दिसे। थोरीवें[12] आली ॥ ५९ ॥ माजीं उभारलेनि दंडें। शिरकमळ होय गाढें। तव नेत्रद्वारींचीं कवाडें[13]। सहजें उन्मीळितें[14] ॥ ६० ॥ वरील पातीं वरती राहाती। तळींचीं तळीं पुजाळेती[15]। तेणें अर्द्धोन्मीळन[16] स्थिति। दृष्टि होतसे ॥ ६१ ॥ दृष्टि राहोनि अंतुळिकडे[17]। बाहिरें अवलोकन करी कोडें[18]। तव सहजें दृष्टि जाऊनि पडे। नासाग्रपीठीं[19] ॥ ६२ ॥ मग दिशाची भेटि घ्यांवी[20]। कीं अन्य रूपाची वाट पाहावी। हे अपस्था चि राहे उठाठेवी। घडी येक पवन साधतां ॥ ६३ ॥ मग कंठनाळ[21] सहजें आटे[22]। हनुवटी खालती दाटे। ते गाढी[23] होऊनि नेहटे। हृदयावकाशीं ॥ ६४ ॥ तव मांजिली[24] घटिका[25] लोपे। वरि बंदु[26] जो कां

१ चिरजीव. २ चांगली. ३ टाचेचा. ४ आश्रयाशिवाय, स्वतःसिद्ध. ५ येथवर वर्णन केलेल्या क्रियेनें योगाभ्यासी साधक योनिस्थान दाबून आणि गुदद्वाराला सकुचित करून अपानवायूची अधोगति मोडून ती ऊर्ध्व करितात व त्यायोगें प्राण आणि अपान यांचा संयोग करवितात. या क्रियेनें मूलस्थानाचें बंधन होतें ह्मणून तीस "मूलबंध" ह्मणतात. ६ गुदस्थानीं. ७ अपानाच्या अधोगतीचा मार्ग. ८ आंतल्या बाजूस. ९ द्रोणाच्या आकाराप्रमाणें ओंजळीचा आकार. १० आपोआप, स्वयंभू रीतीनें ११ बाहुल्याच्या जागीं. १२ उचवटा. १३ पापण्या. १४ मिटूं लागतात. १५ विस्तृत होतात १६ अर्धी मिटलेली व अर्धी उघडलेली. १७ अंतर्गत. १८ कौतुकानें. १९ नाकाच्या शेंड्याच्या ठिकाणीं. २० दुसरीकडे पहावें. २१ गळ्याची नळी. २२ सकुचित होते. २३ दृढ. २४ मधील. २५ कंठमणी. २६ बंध, मुद्रा.

आरोपे । तो जाळांधरु ह्मणिपें । नाम तयाचें ॥ ६५ ॥ आणि स्वाधिष्ठानावरौतें । नाभिस्थानाचिया हडौतें[3] । बद्धु जो आरोपे त्यातें । वोडियाँना बोलिजे ॥ ६६ ॥ तेथ नाभिस्थानावरी फोखे[5] । तेणें उदर हें थोरावे वायुवशें । माजीं अंतरीं[6] फाँकें निजसुखें । हृदयकोश ॥ ६७ ॥ ऐसी शरीरा बाहिरिलियेकडे । हळु हळु अभ्यासाची पाखर[7] पडे । तंव अंतरीं सहजें हांव मोडे । मनोधर्मांची ॥ ६८ ॥ तेथ कल्पना साहाजें निमाली । प्रवृत्ति आपस्या चि शमली । क्षुधा तृषा समुळीं हारपलीं । तेथ निद्रा कायसी ॥ ६९ ॥ तव दोनी घटिका निष्टक । पवन साधलियां सम्यक । तेथ मूळबदीं ऊर्ध्वमुख । सचेतन शक्ति होय ॥७०॥ तेथ होता जो मूळबदें कोंडला । अपान मैंघौता मुरडला । तो योगयुक्तीनें वरि साकडला । फुग धरी पवन ॥ ७१ ॥ दिसे क्षोभलेपणें माजें । परि ठाईंचा ठाईं चि गाजे । आणि स्वाधिष्ठानेंसीं जुझें[12] । घेतसे जें निजांगें ॥ ७२ ॥ तव ते कुडलिनी जैसी वाहाटुळी[13] । बैसली च परि घेतसे घेरडहुळीं । मग बाळपणीची कोहेंटळी[16] । धुइनि घेतसे ॥ ७३ ॥ भीतरीं जवळी न थारे । आवेशें कोठयामाजीं

---

१ जालधरबध नामक मुद्रा. या क्रियेनें योगाभ्यासी साधक कठाचें भोंक आकुंचित करून हनुवटी व हृदय याची अशी स्थापना करितात कीं, त्यायोगें इडा व पिंगळा यांचें वहाणें बद होतें. शिरासमूह व ताळूच्या मुळापासून अधोभागीं स्रवणारें चंद्रामृत याचा प्रतिबध होतो, ह्मणून यास " जालधर बध " ह्मणतात. २ लिंगाच्या पश्चिमभागीं गुह्य देशात ब, भ, म, य, रं, ल, या सहा वर्णांनीं चिन्हित असलेलें स्वाधिष्ठान चक्र. ३ अधोभागीं ४ उड्डियानबध नामक मुद्रा. या क्रियेनें योगाभ्यासी साधक नाभीचा ऊर्ध्व व अधोभाग आकर्षून पुढील उदराग पृष्ठाकडे ओढतात व वायूची गति सुषुम्नेंत करवितात. महापक्षी जो प्राण तो या क्रियेनें अनायासें पक्ष्यासमान सुषुम्नेतून ब्रह्मरध्रात उड्डान करितो ह्मणून यास " उड्डियानबध " ह्मणतात. ५ फुगतें. ६ अतर्यामीं. ७ विस्तृत होतो. ८ अभ्यासक्रियेपासून होणारा परिणाम ९ कुडलिनी. १० माघारीं ११ गुरगुरतो. १२ धडका १३ वावटळ. १४ सर्व शरीरभर १५ ढवळाढवळ. १६ बाळपणापासून सांचलेली कुचकी घाण.

संचरे । तेथ कफपित्ताचे थरे । समुळीं उरों नेदी ॥ ७४ ॥ धातूचे समुद्र उलडी । मेदाचे पर्वत फोडी । आंटली मज्जा काढी । अस्तिगंत जे ॥ ७५ ॥ तवं घटिका च्यारि साधतां पवन । तेणें कुंडलिनी होय सचेतन । मग आक्रमू पाहे स्वाधिष्ठान । आधारचक्रींहूनि ॥७६॥ ऐसी ते आधारचक्र सोडूनि । स्वाधिष्ठाना येता कुंडलिनी । योगी विकळ होय घाबिरेपणीं । परि बिहावें ना योगियें ॥ ७७ ॥ तेथ नाना व्याधी निर्माण होती । सर्व चि पुन्हा हारपती । आप आणि पृथ्वी येकवटती । तिये समई ॥ ७८ ॥ तवं तो वायु धरी अति फुगारा । तेणें आसनाचा होय उबारा । तव शक्ति करितसे उजगरा । कुंडलिनीते ॥ ७९ ॥ तवं वरिच्यावरि पवनाचें बळ । योगी साधितां होय आळुमाळ । तो वायु भक्षूनि कुंडलिनी सबळ । अति तेजस्वीतसे ॥ ८० ॥ तेथ प्रहर येक साधतां पवन । आहार निद्रा होय सहजें क्षीण । मूत्र पुरीशें जाय हारपोन । तेणें योगी नित्य सावध ॥ ८१ ॥ आता हे पुढिलीये कीर्णी । सात हि चक्रें भेदूनि । ब्रह्मस्थानासी जाऊनि कुंडलिनी । अमृतपान करील ॥८२॥ मग होईल स्वानुभवदिनकराऐसी । तेथ निजानंदें सहजस्थितीसीं । दिनकर रिघोनि रामीं रामदासीं । निजऐक्यत्वें शरण ॥ ८३ ॥ स्वस्ति श्रीस्वानुभवदिनकरे गुरुशिष्यान्वये नवम कळापे कुंडलिनीऊर्ध्वभेदेन नाम चतुर्थ कीर्ण प्रकाशः ॥ ४ ॥ श्रीरामजयरामजयजयराम ॥ ७ ॥

---

१ तो वायु पोटांत तळाशीं न मुरडतां कोठ्यात शिरतो. २ आश्रय, ठिकाण. ३ रस, असृज्, मांस, मेद, अस्थि, मज्जा व शुक्र अशा सप्त धातूंचीं स्थानें ओलांडतो. ४ आंतील (?) ५ हाडांतील ६ भिऊ नये. ७ कफ वगैरे ओलसर पदार्थ व मास वगैरे जड पदार्थ हे एकत्र होतात ८ उष्णतेच्या योगानें कोंडमारा. ९ जागें, जागृत. १० विष्टा. ११ गुरूपदिष्ट पद्धतीनें योगक्रिया करून, भगवती कुंडलीचें चालन करून तिला जागृत करितात व सुषुम्नामार्गानें कुंडलीसहित प्राणाचा एकामागून एकेक चक्रांत निरोध करीत करीत अखेर ब्रह्मचक्रात निरोध करितात व तो निरोध सतत सिद्ध करून परमात्मज्ञान, अतींद्रियशक्ति आणि आत्म्याचें सत्यस्वरूप ह्याची प्राप्ति करून घेऊन निरोधाच्या पर्यवसानात्मक कैवल्यमोक्षाची प्राप्ति करून घेतात.

॥ श्रीराम ॥

मग जेवि कां तें नागाचें पिलें । कुंकुमकेशरें सर्वांगीं नाहलें । तें वळण घेऊनियां चालिलें । निजसेजेसी ॥ १ ॥ तैसी ते निजांगें कुंडलिनी । निजेली होती औठें वळणीं । ते अधोमुख सर्पिणी । ऊर्ध्व चालिली सत्राणें ॥ २ ॥ नाना ते विद्युल्लतेची बिडी[3] । कीं ते अग्निज्वाळांची केवळ घडी । नातरि वावनकसाची चोखंडी । पुतळी वोतली ॥ ३ ॥ तैसी सुबंद्ध राहोनि आटली । पुंठीं सहजें होती दाटली । ते वज्रासनें होय चिंमुटिली । निजांगें सावध ॥ ४ ॥ तव योगी हि निजांगें अति चतुर । तो पवन साधूंनि द्वय प्रहर । कुंडलिनीयेसी करूनि पवनोपचार । स्वाधिष्ठानचक्र सोडवी ॥ ५ ॥ मग ते ऊर्ध्वमुखें स्वानंदेंसीं । शनैःशनै येत मणिपुरासी । तेथ समेंनसगें स्वात्मज्योतीसीं । प्रकाशे सूर्यासारिखी ॥ ६ ॥ तेणें प्रकाशें योगी आपण । स्वयप्रकाशरूप सनातन । विश्वामाजीं देदिप्यमान । कोटिचंद्रार्कसन्निभ ॥ ७ ॥ शक्ति पैठी[12] होतां मणिपुरीं । तवं योगी पवन साधी प्रहर च्यारी । तेणें आत्मत्व प्रगटे निर्द्धारीं । इंद्रियज्ञानेंसीं ॥८॥ मग हळु हळु साधतां पवन । अहोरात्राचें होतां गणन । कुंडलिनी मणिपुर सोडून । चाले ऊर्ध्वा उजु ॥ ९ ॥ तेथ नक्षत्र जैसें उंलडलें । कां सूर्याचें आसन मोडलें[14] । किंवा तेजाचें बीज विरूढलें । निजअंकुरेंसीं ॥१०॥ चाले वेढेंयातें उकलिती । कवतिकें होय आगेंडिती । अनाहतचक्रावरी शक्ति । उठिली दिसे ॥ ११ ॥ सहजें भुकेली होती बहुत दिवस । वरि चेवविली तें होय मीसें । मग मुख पसरी धरूनि आवेश । चाले ऊर्ध्वा उजु ॥ १२ ॥ तेथ हृदयकोशतळवटीं । जो

---

१ झोंप घेण्याकरितां. २ साडे तीन हात लांब असून वेटाळी घालून. ३ ककण. ४ चागली. ५ उत्तम बधांनीं युक्त. ६ आवळलेली. ७ पुटीं=दोन पडद्यामध्यें. ८ पेंचात सांपडली, दाबली गेली. ९ निरोधक्रिया करून. १० पंच-प्राणातील पांचवा वायु. ११ सन्निभ=सम, प्रमाणें. १२ बसली असतां. १३ पतन पावलें. १४ डळमळलें. १५ उगवलें. १६ वेटाळें मोडून १७ अगास आळेपिळे देऊन. १८ निमित्त.

पवनु भरे सम नेहटीं । तया सगळिया चि हीं मिठी । देऊं निघाली ॥ १३ ॥ मुख पसरूनि आलुमोळीं । सांपडे तें तळींवरी कवळी । मांसाचिया वडवोळी । आरोगू लागे ॥ १४ ॥ ऐसा येक दिवस लय होतां पवन । योगी निजासनीं असतां पूर्ण । पाहे चित्तवृत्ति निरोधून । तवं गंध जाणे त्रैलोक्याचा ॥ १५ ॥ दिनद्वयें सपूर्ण रसस्वादन । त्रिभुवनींचें जाणे न सोडितां आसन । दिनत्रयें त्रैलोक्यदर्शन । योगी देखे निजासनीं ॥ १६ ॥ च्यारी दिवस लय होता पवन । योगी निजासनीं जाणे त्रैलोक्यस्पर्शन । पच दिवसें त्रिभुवनींचें शब्दश्रवण । योगी आयके निजासनीं ॥ १७ ॥ षड्रात्रें पचेंद्रियज्ञान । योगियासी होय परिछिन्न । दिनसप्तकें बुद्धि होय सपन्न । विश्वज्ञानात्मक ॥ १८ ॥ दिनाष्टकें योगी होय निरामय । तव कुडलिनी गिवसीतें पावे हृदय । तव क्षुधातृषादि नाना स्वापदभय । बाधू न शके योगियासी ॥ १९ ॥ नवां दिवसीं शापानुग्रहसमर्थ । दशादिनीं देखे गुप्त वस्तु समस्त । येकादशा हें वस्तुमात्र हस्तगत । आकर्षिता होय निजासनीं ॥ २० ॥ मग बारा दिवस साधता पवन । त्रैलोक्य फिरे न लगता क्षण । तेरा दिवसीं खेचरी सिद्धि साधून । अदृश्यत्व यासी होय ॥ २१ ॥

---

१ किंचित्. २ ग्रास. ३ भक्षण करूं लागली. ४ व्याधिरहित. ५ शोध करीत. ६ योगाभ्यासी साधक, गुरूपदिष्ट पद्धतीनें आपली दृष्टि भ्रूमध्यावर नेहटून त्रिपथ ह्मणजे इडा, पिंगला आणि सुषुम्ना या तीन नाड्यांचा मार्ग जें कपाळाचें आंतील छिद्र ( ज्याला व्योमचक्र ह्मणतात ) त्यांत जिभेचें टोंक वळवून, जी क्रिया साधतो, त्या क्रियेस खेचरी मुद्रा अशी सज्ञा आहे या क्रियेच्या अभ्यासानें पूर्वीं जें चद्रामृत व्यर्थ सूर्यांत पडत होतें, त्याचा प्रतिबध होऊन हा योगाभ्यासी साधक सोमकलापूर्ण होतो त्या सोमपानाच्या प्रभावानें विषारी सर्पाच्या दशापासून त्याला बाधा होत नाहीं; जरा, मृत्यु, व्याधि यांचा घाला त्याच्यावर पडत नाहीं; क्षुधा, तृषा, निद्रा, मूर्च्छा किंवा तद्रा ह्या त्याला सोडून जातात; मलमूत्राचा उपसर्ग कमी होतो; तो पापपुण्यादि कर्मापासून अलिप्त होतो; त्याचें शरीर वज्राप्रमाणें बळकट होतें; शस्त्रास्त्र त्याला लागू शकत नाहींत, उलट त्याच्या वज्रभावामुळें शस्त्रादिक तुटून पडतात; तो नेहमीं ऊर्ध्वरेता राहू शकतो व शेवटीं आपला देह स्वेच्छेनें सोडू शकतो. सर्व मुद्रांत खेचरी मुद्रा श्रेष्ठ आहे

चौदा दिवस साधतां पवन । अणिमा सिद्धि[1] प्राप्त होय जाण । अणु-प्रमाणें होऊनि आपण । ब्रह्मांडामाजीं फिरावें ॥ २२ ॥ पधरा दिवस लय होतां पवन । कुंडलिनी चाले हृदय सोडून । हळु हळु ये विशुद्धचक्रालागून । जवं मास येक पवन साधे ॥ २३ ॥ अठरा दिवसें गरिमा सिद्धि । प्राप्त होय पैं त्रिशुद्धि । तेणें ब्रह्मांड सामावेल उदरीं ऐसिये विधीं । क्षणामाजीं थोरावे ॥ २४ ॥ बावीस दिवस पवन होतां स्वयंभ । तेणें प्राप्ति सिद्धीचा होय लाभ । तेणें पदार्थमात्र होय सुलभ । चिंतन करितां स्वेच्छा ॥ २५ ॥ चोविसां दिवसीं काम्या सिद्धि । कामना इच्छिली पावे पूर्ण विधी । सवीसा दिनें लाभे इषिका सिद्धि । तेणें जगदीशत्व प्राप्त ॥ २६ ॥ अठावीस दिवस पवन लयगत । होतां वशित्व सिद्धि होय प्राप्त । तेणें त्रैलोक्य तत्काळ वश्य होत । न प्रार्थितां हि ॥ २७ ॥ मास येक साधतां पवन । सकळ रिद्धि सिद्धि प्राप्त होऊनि जाण । करिती नानापरि योगियाचें छळण । परि पूर्णयोगी छळेना ॥ २८ ॥ असो आतां सिद्धिकथन । हें सांगतां असे असाधारण । याचें सविस्तर निरूपण । शास्त्रांतरीं असे ॥ २९ ॥ मासद्वय साधतां पवन । कुंडलिनी विशुद्धचक्र त्यागून । हळु हळु आटोपी अग्निस्थान । होतां पवन सावांवो ॥ ३० ॥ मासत्रयें होय पृथ्वीतत्व । वज्रापरिस ये कठिणत्व । षण्मासें योगी पावे उदकत्व । लय होतां पवन ॥ ३१ ॥ मग वर्षत्रय साधतां पवन । योगी तेजतत्व होय आपण । तव कुंडलिनी क्रमूनि अग्निस्थान । शनैःशनै चाले पुढां ॥ ३२ ॥ ऐसा साधतां वर्षें सा पवन । योगी वायुतत्व होय आपण ।

---

१ प्रत्येक भूताच्या ज्या स्थूलत्व, स्वरूपत्व, सूक्ष्मत्व, अन्वयत्व आणि अर्थवत्व अशा पांच विशेष अवस्था आहेत त्यांच्या ठिकाणीं योगाभ्यासी साधकास आत्मसंयमामुळें, पंचभूताच्या रूपाचें दर्शन होतें व तीं त्यास इतकीं वश होतात कीं, वासराच्या अनुरोधानें ज्याप्रमाणें गायी जातात, त्याप्रमाणें साधकाच्या इच्छेप्रमाणें पंचभूतांना वागावें लागतें. अशा भूतजयी साधकाला अणिमादि अष्टसिद्धि प्राप्त होतात. त्या सिद्धि व त्यांपासून होणारी फलप्राप्ति हीं ग्रंथांत पुढें दिलीं आहेत च. २ ईशत्वा. ३ अधिक, सबळ, प्रदीप्त, साद्य.

तवं कुंडलिनी सहस्रदळ भेदून । ब्रह्मस्थानीं झेपावे ॥ ३३ ॥ तें ब्रह्मस्थान अति सोज्वळ । जें परमात्मयाचें निवासस्थळ । जेथ कमळ असे सहस्रदळ । अति सुगंध साजिरें ॥ ३४ ॥ कमळपराग अति सुंदर । विविधप्रकारें अति मनोहर । रंग हि विचारितां साचार । अनंता प्रकारींचे ॥ ३५ ॥ तया कमळाचया सुगंधें । जीवभ्रमर झुंकारे दशनादें[2] । कोकिळा कुंजती सुशब्दें । चौघी[3] जणी मिळोनियां ॥ ३६ ॥ सारसें मयोरें मिळोनि बावॅन[4] । क्रीडती देखोनि चिदानंदघन । हंसें[5] अहर्निश करिती नर्तन । येकवीस सहस्र सा शतें ॥ ३७ ॥ तेथ वन शोभे अति सुंदर । माजीं अमृताचें सरोवर । सीतळ सुस्वाद मनोहर । सुगंध बहळ[6] ॥ ३८ ॥ केळी लागल्या पांचें[7] तीन । नारेळी डोलती च्यार दुगुण[8] । द्राक्षीमंडपी अति विराजमान । त्यासी डोलती पन्नास[9] वड ॥ ३९ ॥ नवें[10] खिरणिया विराजती । जांबळी तीनें[11] शोभती । बकुळ पारियातक डोलती । बारां[12] सोळां[13] सुगंधित ॥ ४० ॥ तेथें पोफळी असती सैंतरा[14] । उतोतीयों लागल्या अपारा । कवीठ आणि चिंचा समग्रा । मिळोनि छैंतीस ॥ ४१ ॥ मोह्ड आणि आवळिया । अठेंरा अठेंरा दोन्ही मिळोनिया । चांपे आणि निंबोणिया । दोनी[15] दोनी[15] असती ॥ ४२ ॥ येक वाहाडला असे पिंपळें[16] । तयासी असे ऊर्ध्वमूळ । अधःशाखीं आहाळबाहाळ । विस्तारला अद्भुत ॥ ४३ ॥ तया वनामाजीं येक अच्युंत[17] । सरसावलासे गगनचुंबित । केवळ प्रणवाकार मूर्तिमंत । शाखोपशाखीं शोभला ॥ ४४ ॥ असो ऐसें वन

---

१ उडी घेई. २ चिणो, चिंचिणी, घंटा, शंख, तंत्री, ताल, वेणु, मृदंग, भेरी व मेघ. ३ चार वाणी ४ मातृका. ५ प्राणवायु. प्रत्यहीं २१६०० वेळां मनुष्याचे श्वासोछ्वास होतात. ६ बहुत. ७ पंचभूतें आणि त्रिगुण मिळून अष्टधा प्रकृति. ८ चार पिंडीचे व चार ब्रह्मांडीचे असे अष्ट देह. ९ पन्नास शृंगार अथवा भूषण. १० दोन कान, दोन डोळे, दोन नाकपुड्या, मुख, मूत्रद्वार व गुदद्वार मिळून नऊ द्वारें. ११ त्रिगुण. १२ बारा सूर्यकला. १३ सोळा चंद्रकला. १४ पंच प्राण, पंच कर्मेंद्रियें, पंच ज्ञानेंद्रियें, मन आणि बुद्धि मिळून सतरा. १५ (?) १६ ऊर्ध्वमूलमधःशाखमश्वत्थं प्राहुरव्ययम् ॥ भ. गी. १५×१. १७ ओंकाररूप आम्रवृक्ष.

अत्यंत सरस । तयामाजीं अमृतसरोवर सुरस । चंदनवृक्ष असमसाहस । तथा येक वटवृक्ष ॥ ४५ ॥ तेथ ळ मातृकेसीं सुंदर गोपुर । निर्मिलें असे अति मनोहर । माजीं ध्वनिरूप मायादेवी सकुमार । जे विश्वसजीवनी ॥४६॥ तिचिया शेजारीं प्रणवेश्वर । उभयता मिळोनि प्रकृतिपुरुष साचार । कीं ते अर्द्धनारीनटेश्वर । येणें न्यायें वर्त्तती ॥४७॥ ऐसें तें ब्रह्मरंध्रस्थान । जें परमात्मयाचें अधिष्ठान । जेथें दशम द्वार असे गहन । गुप्तरूपेंसीं ॥४८॥ तेथें चि असे ककार अक्षर । त्यास चि काकीमुख ह्मणती साचार । तेथें आसक्त होऊनि योगेश्वर । भोगिती ऐक्यत्वें ॥ ४९ ॥ तेथ अग्निचक्रीहूनि कुंडलिनी । वायुबळें झेपावली ब्रह्मस्थानीं । तव द्वादश वर्षें वायु साधनीं । साधलीयां सबळ ॥५०॥ तेणें सावेये कुंडलिनी प्रबळ । जाऊनि आटोपिलें सहस्रदळ । तो परागं घेऊनि सुसीतळ । निवाली सर्वांगें ॥ ५१ ॥ तेणें निवालेनि परम संतोषें । सहस्रदळींहूनि परम आवेशें । झेप घाली जेथें सरोवर असे । अमृताचें तें ॥ ५२ ॥ त्या अमृतसरोवराची असे कुपिका । तियेसी शक्तीचा बैसता धका । कानवडोनि अमृत येऊनि पडे मुखा- । माजीं कुंडलिनीचा ॥ ५३ ॥ तेथ ककाराचें असे कपाट । तें कपाट उघडोनि चाले अमृतपाट । त्याचा शक्ति करूनि येक चि घोंट । तेणें सपोश होय निजांगें ॥ ५४ ॥ मग तें अमृत पिऊनि स्वानदें । संतृप्त होय परमानंदें । पुछ नेऊनि ठेवी निजछंदें । आधारचक्रामाझारीं ॥ ५५ ॥ तेव्हां स्वासरोधें पवन चालत होता । तो सगळा हि ग्रासूनि तत्वता । मग सहजस्थितीचिया समता । निवात जाली ॥ ५६ ॥ ऐसी निवात होऊनि आपुला ठाईं । ह्मणे दुजेपणें येथें असे काईं । पाहे तव पाच हि भूतें ऐक्यसोई । ग्रास केला सगट ॥ ५७ ॥ मग जैसा तो मुस करूनि वोतारी । रस वोतूनि मेणाची मुस विघेरी । धातुमूर्ति प्रगटे तेवी देहाकारी । दिव्य मूर्ति प्रगटली ॥ ५८ ॥

१ सुषुम्नानाडी. २ साद्यानें. ३ पुष्पाचे गंधरज. ४ सोई=मार्ग. ५ विरघळून टाकतो

पृथ्वी आप तेज वायु व्योम । पंचभूतेंसीं त्रिगुण सत्व रज तम । ग्रासूनि दिव्य देहेंसीं उत्तम । मूर्ति प्रगटे स्वलीळा ॥ ५९ ॥ बाहेरी दिव्य देह प्रगट केलें । आपणासीं आत्मत्वीं समरसिलें । एवं अंतर्बाह्य केवळ प्रगटलें । ईश्वरस्वरूप ॥ ६० ॥ कुंडलिनी होती ते वायुस्वरूप जाली । वायुरूपें आत्मत्वीं मिसळली । मग तो आत्मा चि मूर्तिमंत अन्य बोली । कांहीं च न चाले ॥ ६१ ॥ तो निजासनीं बैसला चि राहे । परि ब्रह्मांडीं व्यापला आहे । जेथ जें होय तें लवलाहे । येथूनि चि देखे ॥ ६२ ॥ आकारें तरि दिसे मनुष्य । परि स्वानुभवा दिनकराऐसा दृश्य । दिव्य देहीं गति तत्काळ अदृश्य । आत्मज्योति ज्योति केवळ ॥ ६३ ॥ पाहातां करचरणादि अवेव । दिव्य तेजें वोतले स्वयमेव । मस्तकींची दिसे केवळ ठेवें[1] । स्वानुभवदिनकररूप ॥ ६४ ॥ नेत्र जैसे चंद्र सूर्य । अस्तोदयरहित रमणीय । दंतपंक्ति अति तेजोमय । जेवि तारांगणें दुबाहीं[2] ॥ ६५ ॥ नखें जैस्या त्या चंद्ररेखा । जाणों हस्तपदांगुळीं जडिल्या सुरेखा । सुवर्णाच्या तारा तैसे देखा । मस्तकीचे केश ॥ ६६ ॥ हिरकणीं माणकुंलिया[3] । तेवी दीप्ति आंगींच्या रोमावळिया । बैसला चि परि विश्वींचें आयकोनियां । निजहृदईं ठेवी ॥ ६७ ॥ सहज ज्याची येक समाधी । शत सहस्र लक्षकोटि वर्षांवधी । आकल्प आयुष्याची साधे सिद्धि । चंद्र सूर्य तोंवरि ॥ ६८ ॥ जेथें जाऊं ह्मणेल या चि देहें । क्षण न लगतां तेथें चि आहे । ज्यासी जें देईन ह्मणेल तें राहे । पुढें येऊनि उभें ॥ ६९ ॥ मुंगीपासूनि ब्रह्मापर्यंत । सर्वांचें जाणे अंतर्गत । ज्याचा जैसा असेल मनोरथ । तो क्षणार्धें पुर्विजे ॥ ७० ॥ उदकावरि चालों ह्मणे तरि चाले । अग्निमाजीं स्नान करूं ह्मणेल तरि जालें । जो गगनेंसीं नित्य शब्द बोले । विचरे वायुसंगें ॥ ७१ ॥ पृथ्वीमाजीं जेथें रिघों ह्मणेल । तेथें ते तत्काळ स्थळ देईल । आणि जेथें जें असेल तें येईल । आकर्षण करितां ॥ ७२ ॥ सत्व रज तम हे

---

१ ठेवण, आकृति २ दोहीबाहीं=दोन्ही बाजूनीं. ३ हिरेमाणकांचे बारीक बारीक तुकडे.

त्रिगुण । यावेगळा जो शुद्ध सत्वगुण । त्याचें त्रिगुणातीत प्रकृतिलक्षण । तें योगियापासीं विलसे ॥ ७३ ॥ असो योगसिद्धीचीं साकल्य लक्षणें सांगतां । ग्रंथ अपार विस्तारेल तत्वता । तेणें श्रोते वीट मानूनि विक्षेपेंता । होतील ह्मणें येखादे ॥ ७४ ॥ इतुकें वक्ता स्वमुखें बोलेना जवं । तवं श्रोते ह्मणती आहा फळलें दैव । ऐसी निरूपणाची चालिली हेंवाव । केवळ अमृतोपम ॥ ७५ ॥ ऐसा कोण असेल जी निर्दैव । जे स्वर्गलक्ष्मी घरासी येतां स्वयमेव । तीतें परतें ह्मणतां मग सदैव । होईल कायिसेन ॥७६॥ तेवीं हें योगसिद्धीचें निरूपण । ब्रह्मादिकांसी याचें दुर्लभपण । तयासी विटों शके जी कोण । हें आइकावें चि वाटे ॥ ७७ ॥ इतुकें सतवाक्य आयकोनि । दिनकर रामदासीं सुखावोनि । श्रीगुरूचें स्मरण करूनि । योगसिद्धि निरोपिली ॥ ७८ ॥ तें आद्यंत श्रोतीं विचारिजे । न्यूनपूर्णत्वेंसीं क्षमा कीजे । दिनकरासी कृपावरद देइजे । स्वानुभवदिनकरैक ॥ ७९ ॥ श्रीगुरु ह्मणे सत्शिष्यासी । तुवां पुसिलें हटयोगासी । तो आइकोनि तू सलक्षणेंसीं । विचार कीजे अंतरीं ॥ ८० ॥ विचारूनि कार्याचें असेल जें । त्याचा शनैःशनै अभ्यास कीजे । अकारण तें सहजें वोंळिजे । निश्चयेंसीं पैं ॥ ८१ ॥ परि केवळ आचरावा हा साळकृत । हें कळीयुगीं केवळ निषिद्धवत । यद्यपि बळात्कारें आचरसी तरि घात । होईल तुझा ॥८२॥ कळीयुगीं पुत्र पित्यासी न मानिती । शिष्य गुरूसी बळात्कारें धिकारिती । सेवक स्वामींचा घात करिती । स्त्री भर्तारांचें नायके ॥ ८३ ॥ वेश्या पतिव्रतधर्में चालती । कुळांगना परपुरुषीं रमती । पुरुष बळात्कार करूनि हरिती । परद्रव्य परदारा ॥ ८४ ॥ विधवा निज स्वधर्मासी सोडून । करिती खट्वारोह ताबुळचर्वण । आणि परपुरुषीं स्वेछा रमण । बळात्कारें साधिती ॥८५॥ श्रीपाद करिती द्रव्यसंग्रह । श्रोत्री घेती दुष्ट प्रति-

---

१ अडथळा, विघ्न. २ शोभा. ३ दुर्दैवी ४ माघारी जा. ५ वीट येणें. ६ जें तुमच्या उपयोगी नसेल तें अर्थात च निषिद्ध ह्मणून टाका. ७ हट-योग.

ग्रह । ब्राह्मण फिरोनि यवनअंत्यजादिगृह । द्रव्यउपार्जना करिती ॥८६॥ ब्राह्मण अठरा याति मेळऊनि । भ्रष्टाकार करिती अन्नोदकमद्यपानीं । सेवटीं आपणा ह्मणविती ब्रह्मज्ञानी । अभेदज्ञान दाविती ॥ ८७ ॥ घरोघरीं करूनि गायन । देशाउर[1] फिरती ब्राह्मण । षट्कर्मेंसीं[2] स्वकर्म त्यागून । ज्ञानचर्चा यथेष्ट ॥ ८८ ॥ ऐसें कळीयुगीचे साकल्य धर्म सांगतां । आयुष्य न पुरे ह्मणौनि तें असो आतां । मुख्य योगसाधन-कर्तुत्वाची वार्ता । ये युगीं अकरणीय ॥ ८९ ॥ यद्यपि बळात्कारें केला जरि । तरि ह्मा नेऊनि घालील[3] अघोरीं । आणि साधनांची तिळमात्र वारी[4]। सिद्धि न जाय सहसा ॥ ९० ॥ ह्मणौनि सांगावयासी हें चि कारण । तुवां उगें चि पाहोनि याचें धोरण । दुर्निवार हे जे मन पवन । त्यासी शिक्षार्थ बोलिली ॥ ९१ ॥ प्रथम[5] ग्रथपरिभाषा श्रीरामदर्शन । त्यावरि गणेश शारदा सद्गुरु संतस्तवन । त्यानतर ससाराचें समूळ लक्षण । वोळखोनि त्यागावें ॥ ९२ ॥ तथा निजवैराग्याचें बाह्य साधन । करूनि विवेकयुक्त अंत:करण । सत्कर्मांचें विध्युक्त आचरण । उपासना निश्चयेंसीं ॥ ९३ ॥ मग उपासनारहस्य विचारूनि । त्याची निजभक्ति यथाविधि करूनि । हटयोग अष्टांगयुक्त साधनीं । षट्चक्रसहित ॥ ९४ ॥ विचारावें चतुर्विध ज्ञान । तथा विज्ञानस्थितीचें लक्षण । पिंडब्रह्मांडींचें विवरण । त्यानतर करावें ॥ ९५ ॥ करावी जीवेश्वर ऐक्यविधि । त्यावरी निरसावी मायेची उपाधि । त्यानंतर ब्रह्मप्राप्तीची सिद्धि । करूनि व्हावें निजांगें ॥ ९६ ॥ इतुकेन स्वानुभवदिनकर । तुज फळद्रूप जाला चि साचार । ह्मणौनि निज अंतरीं नित्य याचा विचार । केला चि करावा ॥ ९७ ॥ याचिया विचारें अष्टांग[6]शुद्धि । पाविजे

---

१ देशावरी. २ अध्यापनं अध्ययनं यजनं याजनं तथा । दानं प्रतिग्रहश्चैव षट्कर्माण्यग्रजन्मन. ॥ ( मनुस्मृति १०, ७५ ). ३ साहसकर्म करण्यास प्रवर्तक होईल. ४ वेळ किंवा फेरी. ५ या ग्रथांत आरंभापासून आतांपर्यंत काय काय विषय आले आहेत, ते येथें सकलित रीतीनें सांगितले आहेत. ६ भूमि, आसन, देह, प्राणायाम, वाक्, मन, आत्म आणि शेवटची ब्रह्मशुद्धि ( मागें ९-३-२४ ते २६ पहा )

प्राणायामाची साधनविधि । प्राणायामीं ऐक्यता जालियां सहज सिद्धि । आब्रह्म राज्य भोगिजे ॥ ९८ ॥ ब्रह्मींचा राजा प्राणायाम । तो जिंकिलिया निजांगें परब्रह्म । सहजस्थितीं लाभिजे निसीम । कैवल्यपद ॥९९॥ तरि मुख्य राजा प्राणायाम । त्याचे द्वारपाळ यम नियम । प्रत्याहार प्रधान निसीम । ध्यान भोग्य जाणिजे ॥ १०० ॥ धारणा प्राणायामाची अंतौरि[2] । तियेसीं नित्य भोग क्रीडा करी । आसनाच्या सिंहासनावरी । समाधीसीं निज राज्य ॥ १०१ ॥ आता तो प्राणायाम साधू इछिजे । तरि आधीं यम नियम द्वारपाळ साधिजे । हे साधलिया साधे सहजें । प्रत्याहार प्रधान ॥ १०२ ॥ साधलिया निजांगें प्रधान । तो हस्तगत करी निजासन । तेथ धारणा स्त्री अनकूळ जालियां आपण । राजा साधे सहज चि ॥ १०३ ॥ धारणेच्या योगें साधे प्राणायाम । मग प्रत्याहारेंसीं जिंकोनि निभ्रम । समाधियोगें राजभार चालऊनि निसीम । निष्काम कामें पूर्णता ॥ १०४ ॥ इये युक्तीं साधूनि प्राणायाम । दिनकर रामदासीं निष्काम काम । स्वानुभवदिनकरीं होऊनि आराम । ब्रह्मपद भोगीं सहजें ॥ १०५ ॥ स्वस्ति श्रीस्वानुभवदिनकरे गुरुशिष्यान्वये नवम कळापे योगसिद्धिप्राणायामसाधननिरूपण नाम पचम कीर्ण प्रकाश: ॥ ५ ॥ येकूण कळापवोवीसंख्या ४१९ ॥ ७ ॥

---

## ॥ सप्तचक्रशोधन कळाप ॥ १० ॥

### ॥ श्रीरामचंद्रसमर्थ ॥

ॐ नमो सद्गुरु श्रीराम । चित्‌शक्तिसीता वामार्की उत्तम । कैवल्यअयोध्या सुखधाम । साम्राज्यसदन ॥ १ ॥ अष्टभावाचें सिंहासन । त्यावरी सहजस्थितीं आरोहण । नवविधभक्तीसीं नव खण ।

---

१ हेंच रूपक मागें कलाप ९ किरण २ ओव्या ५६ ते ६० येथें आलें आहे. २ स्त्री.

धरी मंडप सुहाविला ॥ २ ॥ येकात्मतेचें येकछत्र । स्वानंदशत्रुघ्नकरीं स्वतंत्र । प्रेमाचें धरी आतपत्र । संतोषभरत ॥ ३ ॥ पाठीसीं सद्भाव-लक्ष्मण । आत्मत्वचामरें करी व्यंजन । प्रबोधहनुमान कर जोडून । निजदृष्टीपुढें उभा ॥ ४ ॥ अभयादि जे दैवी गुण । सभंवते उभे वानरगण । सुखस्वानुभव सुग्रीवबिभीषण । दोहीं भागीं उभे ॥ ५ ॥ सुमतादि साही जण । षड्शास्त्रवक्ते प्रधान । अठरा मागध करिती वर्णन । सगुणनिर्गुणचरित्रें ॥ ६ ॥ चहु वेदीं चतुरानन । पुढें नित्य करी वेदपठण । कर्म उपासना ज्ञान । त्रिकांड विधि ॥ ७ ॥ शांति क्षमा दया विरक्ति । तितिक्षा अनुसया उपरति । इया कामारिपणें भुक्ति मुक्ति । देती भाविक जनासी ॥ ८ ॥ रिद्धि सिद्धि करिती नर्तन । सामवेदाचें सुरस गायन । स्मृति उपनिषधें वाक्यपेखणें । परस्परें करिती ॥ ९ ॥ निजमोक्षदानीं वरिष्ठ । दक्षिण भागीं शोभला वशिष्ठ । तैसा चि निजबोध वाल्मीक श्रेष्ठ । अनागतचरित्रवक्ता ॥ १० ॥ सत्कर्मानुष्ठानें अति पवित्र । वामांगीं शोभे बिश्वामित्र । तेणें धनुर्विद्येसीं आगमशास्त्र । सांगितलें संपूर्ण ॥ ११ ॥ नारद तुंबर समसाम्यता । गायन करिती यथायोग्यता । कीर्ति स्मृति मेधा सगुणसायोज्यता । व्यंजनें जाणविती ॥ १२ ॥ सिद्ध साधु संत महंत । न्यायनीतीसीं धर्मचर्चा यथोचित । योगी ज्ञानी सगुण भक्त । यथान्वयें बैसले ॥ १३ ॥ जडभरतादि अदेहमुक्त । बैसले जनकादि विदेहमुक्त । ब्रह्मा हरि हर सूर्य नित्यमुक्त । जीवन्मुक्त आत्मज्ञानी ॥ १४ ॥ सुरवरेंसीं बैसला इंद्र । तैसा चि नक्षत्रेंसीं पूर्ण चंद्र । निजपरिवारें बैसला उरगेंद्र ।

---

१ कलिपला. २ छत्र. ३ विंझण. ४ अठरा पुराणें. ५ भाट, कवी. ६ ब्रह्मदेव. ७ सुखदु:खादि सहिष्णुत्व. ८ विषयनिवृत्ति ९ सेवकवृत्तीनें. १० भोग. ११ भूषण. १२ पूर्वी न झालेलें. १३ पखे. १४ देह असून देहधर्म न भोगणारा. १५ देह देहाचीं कर्में भोगीत असता, मनोनाश व वासनाक्षय याच्या अभ्यासानें सदोदित अचल समाधींत किंवा आत्मज्ञानस्थितींत निमग्न असा. १६ यांना कधीं नाश नसल्यामुळें नित्यमुक्त १७ गुरूपदिष्ट ज्ञान झाल्यापासून मरणापर्यंत सामान्यत: वैराग्यपर स्थितींत असणारे ते. १८ सर्पांचा राजा, वासुकी किंवा शेष

खगेंद्र कर जोडुनी ॥ १५ ॥ मध्यमणी सद्गुरु श्रीराम । सिंहासनीं शोभे पूर्णब्रह्म । दिनकर रामदासीं निष्काम । स्वानुभवदिनकरीं ॥ १६ ॥ इया स्वानुभवदिनकराचिये सोईं । लाधलों आत्मत्वाची नवाई । मी आणि माझेपणाच्या दुद्रभपाईं । बुडतां तरलों अकस्मात ॥ १७ ॥ जेणें सुखें सरसावलों । भोळेपणेंसीं भावावलों । तेणें श्रीगुरूसी वर्णूं गेलों । आवडीचेनि योगें ॥ १८ ॥ परि वर्णितां अंतर थोर पडिलें । जे सद्गुरूसी काटाळां तुकिलें । श्रीरामचंद्रासारिखें भाविलें । येकदेशिपणें ॥ १९ ॥ सद्गुरु निर्गुणस्वरूप स्वानदघन । राम सगुणमूर्ति सुखचिद्घन । उभयासी कैसें घडेल समान । अंतर थोर पडिलें ॥ २० ॥ कोणीकडे महातेज केउता स्फुलिंग । पूर्णचद्रेंसीं उपमिजे कें कळाभाग । सुवर्णेंसीं अळकाराचा सयोग । काय घडों शकेल ॥ २१ ॥ कें क्षीरसागर कें दुग्धसमुद्र । कें आवर्णोदक केउता शोणभद्र । तेवीं सद्गुरु कें श्रीरामचद्र । काटाळां तुळिजे ॥ २२ ॥ अहो कें ब्रह्म केउता ईश्वर । कोणीकडे गगन कें समीर । कें जळ केउती जळगार । कें हिरा आणि हिरकणी ॥ २३ ॥ तैसें मियां सद्गुरूसीं काटाळें । श्रीरामचद्राचें योजिलें बळें । ते उपेंसाहिजो सद्गुरुदयाळें । कृपासागरें ॥ २४ ॥ जैसें चद्रासी देखोनि अज्ञान बाळ । मातेतें ह्मणे मज दे पां तो नवनीतगोळ । तेवि म्यां श्रीगुरूसी नेणोनि बरळ । श्रीरामरूपें वर्णिलें ॥ २५ ॥ तरि ये हि गोष्टीचें काय नवल । जें म्यां वर्णिलें तें काय घडेल फोल । सद्गुरु आणि श्रीराम दोनी भावीलें । तो अज्ञान जाणावा ॥ २६ ॥ ऐसें बोलतक्षणीं शिष्यशिरोमणी । सद्गुरु श्रीरामें हृदईं आलिंगूनि । कुरवाळिजे परमस्नेहें करूनि । शिष्यवत्सासी ॥ २७ ॥ सखया तू जें जें बोलिलासी । तें यथार्थ चि पा निश्चयेंसीं । काय उदका आणि

---

१ गरुड. २ अपूर्वता. ३ तुलना करून पाहिलें, काट्यात घालून वजन करून पाहिलें. ४ कसा, कोठें. ५ तांबडा समुद्र. ६ क्षमा करावी. ७ लोण्याचा गोळा. ८ छांदिष्ट, आर्ष, भ्रमिष्ट ९ कल्पील.

कल्लोळांसी । वेगळिक देखिजे ॥ २८ ॥ श्रीराम तो केवळ सगुण । सद्गुरु निर्गुण असोनि दिसे सगुण । दृश्याभासें उभयांसी ऐक्यपण । सहजें चि जालें ॥२९॥ आतां सद्गुरु तरी सहजे चि निर्गुण । श्रीराम वशिष्ठकृपा जाला निर्गुण । एव उभयांसी निर्गुणत्वें ऐक्यपण । सहज चि असे ॥३०॥ ह्मणौनी वाच्यांशें लक्षांशें पाहातां । सद्गुरु श्रीरामेंसीं सहजस्थितीं ऐक्यता । आतां जो या उभयांसी ऐक्यत्वें लक्षिता । त्याचा काय विचार ॥ ३१ ॥ एव सद्गुरुश्रीरामासी करूनि समोर । आपणांसी पाहों बैसला दिनकर । जेवि पुढें आरिसा मांडूनि नर । त्यांत स्वरूप पाहे आपुलें ॥ ३२ ॥ तेवी सद्गुरुश्रीरामांसी करूनि समोर । दिनकर आपणासी पाहे साचार । मग आपुले ठाईं करितसे विचार । आपुलिया कर्तुत्वाचा ॥ ३३ ॥ ह्मणे म्या योगसिद्धि साधूनि समग्र । अष्टांग शुद्धिसीं पचमुद्रा अवग्र[1] । कुडलिनी ब्रह्मांडासीं नेऊनि अव्यग्र[2] । मी अक्षई चंद्रार्कपर्यंत ॥ ३४ ॥ माझें देह अक्षयत्वें थीर । ईश्वराहूनि जालों मी चि अपार । आज्ञाधारक ब्रह्मादि हरिहर । तेथें इतरांचा पाड किती ॥ ३५ ॥ माझेनि कर्तृत्वें ब्रह्मांड जालें । मी जें करीन तें होईल वहिलें[3] । शापानुग्रहसामर्थ्ये साधिलें । मजयेवढा कोण असे ॥ ३६ ॥ ऐसा योगसिद्धीचा अहंकार । चढला थोरपणें साचार । जेवी अन्नीं विष कालविजे समग्र । मग तें मारक होय भक्षित्यासी ॥३७॥ तेवि अहकारें मळावला साचार । न मनी काहीं लाहान थोर । मी येक ज्ञाता योगेश्वर । अन्य सकळ हें अज्ञान ॥ ३८ ॥ ऐसा योगसिद्धीचिया बडिवारें[4] । दाटला ज्ञातेपणाचिया अहकारें । हें जाणितलें श्रीगुरुदातारें । जे हा अहकृतीसी प्रवर्तला ॥ ३९ ॥ आता याचा हा अहकार । कोण्या योगें रिघेल पैं साचार । जैसा वैद्य चिकिछा[5] करूनि उपचार । कां पचाक्षरी भूत लक्षी ॥ ४० ॥ तेवि श्रीगुरु लक्षूनियां अहंकार । योगसिद्धीसी जो जडला साचार । त्यासी योजूनि उपाय-

---

१ लाट, तरग. २ अव्यग्र=शांतचित्त, एकाग्र. ३ सत्वर, लौकर. ४ मोठेपणानें. ५ रोगाचें निदान.

विचार । ह्मणे यासी काय कीजे ॥४१॥ सद्गुरु अंतरीं विचारी आधीं । ह्मणे याचे ठाईं असे दृढ देहबुद्धि । तेणें हा फांपावला[1] त्रिशुद्धि । यासी कांहीं सुचेना ॥ ४२ ॥ यासी न होता देहचतुष्टयनिर्शन । प्राप्त नाहीं जोंवरी आत्मज्ञान । नसता महावाक्याचें विवरण । देहबुद्धि कैसी जावों शके ॥ ४३ ॥ ह्मणौनि यासी हा उपाय करू जाइजे । तव हा आपुले ठाईं अभिमानें फुजे[2] । आतां उगें चि पाहों पैं हा करील जें । क्षणयेक निवातपणें ॥ ४४ ॥ ह्मणौनि श्रीगुरूनें कृपादृष्टीं पाहिलें । तें यासी तत्वता कळों सरलें । योगसिद्धीच्या बळें जाणितलें । अतरंगत सद्गुरूचें ॥ ४५ ॥ मग हा अहंपणाचें उभारूनि बंड । लपोनि बैसे स्थूळदेहाआड । तव श्रीगुरुकृपादृष्टि अति प्रचंड । ते पावली स्थूळदेहीं ॥ ४६ ॥ मग अतरीं उगा चि विचारी । ह्मणे मी बैसलों स्थूळदेहामाझारीं । येथें हि हे दृष्टि पावली झडकरी । आता लपावें पैं कोठें ॥ ४७ ॥ मग गेला सूक्ष्मदेहाआड । लाऊनि लिंगदेहाचें कवाड । आंगीं अहंकाराचें बंड । मुसमुसीतसे बळें ॥ ४८ ॥ तव सूक्ष्मीं हि पावली दृष्टि । लिंगदेहाचा नेहटीं[3] । न राहावें मग उठाउठीं । कारणीं[4] ठेला ॥ ४९ ॥ तवं दृष्टीसी परम चचळपण । कारण जें का अति गहन । तेथ हि पावली दृष्टि मग निदानें[5] । वोडवलें ह्मणे ॥ ५० ॥ मग पाहे जव मागें पुढें । तवं आंगीं अहंतेचें आंगडें । तें हि टाकूनियां निवाडें । बैसों ठेला जव ॥ ५१ ॥ तवं श्रीगुरु निजकृपा आवडीं । दृष्टीचिया लवडसवडीं[6] । पाहिलें अति तांतडी । निजकृपाबळें ॥ ५२ ॥ तवं हा गेला महाकारणाआड । लाऊनि तुर्येचें कवाड । आत्मानुसंधानगड । बळकाविला ॥ ५३ ॥ तव सद्गुरु ह्मणे निजअतरीं । येणें योगसिद्धीच्या बळेंकरीं[7] । चत्वार देह निरसूनि वारी[8] । अनुसधानाची लाधला ॥ ५४ ॥ आपुलिये स्वबुद्धीच्या तर्कें । बळें चि ज्ञानीं रिघों

---

१ विस्तारला. २ फुगला आहे. ३ नेहटणें=लक्ष लावून पाहणें. ४ कारण देहांत. ५ अंत. ६ लगबगीनें. ७ बळेंकरून. ८ वेळ, फेरी.

पाहे तवकें । तरि[१] स्वबुद्धियोगें ब्रह्मत्व घडों शके । काय हरिहरब्रह्मादिकां ॥ ५५ ॥ जऱ्हि जाला चतुर शाहाणा वित्पन्न । तर्कवादी वेदशास्त्रसंपन्न । तऱ्हि आकळूं न शके ब्रह्मज्ञान । स्वबुदीचया योगें ॥ ५६ ॥ जोंवरी नाहीं तीव्र वैराग्य आंगीं । नसे अतरीं विवेक सुहागी[३] । हस्तकमस्तकाचिया संयोगीं । गुरुमुखें नव्हे जों ज्ञानोपदेश ॥ ५७ ॥ तोंवरी येणें उदड जऱ्हि केलें । नाना तर्कवादें आत्मत्व साधिलें । तऱ्हि हस्तकमस्तकावांचूनि बहिलें । न घडे सप्रज्ञसमाधि[४] ॥ ५८ ॥ अहो स्त्रियेसी निजांगें चि सतान होतें । तरि मग पुरुष कासयासी असते । वीं फोंकिलियां[५] सेत पिकतें । तरि मग तिफणी[६] नागर कासया ॥ ५९ ॥ तथापि योगबळें हा साधू ह्मणेल । तरि हा केवळ आग्रह चि उरेल । तिफणीवेगळा दाणा निडारला निघेल[७] । परि कोळपणीमाजीं उपडे[८] ॥ ६० ॥ तेवी हे ज्ञानप्राप्तीची गोष्टी । स्वबुद्धीनें प्राप्ति न घडे होईल कष्टी । ह्मणौनि सद्गुरुमुखें जे विचारिजे गोष्टी । तें ज्ञान होय फळद्रूप ॥ ६१ ॥ याकारितां सद्गुरूसी शरण जावें । साधन सांगतील तें करावें । स्वमुखें सांगतील तें घेतां भावें । मोक्षप्राप्ति तत्काळ ॥ ६२ ॥ ह्मणौनि सद्गुरु ह्मणे शिष्यासी । अभिमान टाकूनि निश्चयेंसीं । शरण रिघोनियां सद्गुरूसी । आत्मज्ञान साधावें ॥ ६३ ॥ असो हा योगसिद्धीच्या बळें अभिमान । करूनि स्वबुद्धीं साधू पाहे आत्मज्ञान । त्याचें पुढीलिये

---

१ धिटाईनें. २ आपल्या बुद्धीच्या बळावर स्वरूपज्ञान मिळवूं गेला तर कधीं हि त्याचा प्रयत्न साध्य होणार नाहीं. त्याला सद्गुरूस शरण जाऊन गुरूपदेश च झाला पाहिजे. ३ स्वाहांगी? ४ समाधि दोन प्रकारच्या. सप्रज्ञात=सविकल्प व असंप्रज्ञात=निर्विकल्प. गुरूपदिष्ट पद्धतीनें कुंडलीसहित प्राणनिरोधाच्या स्थितींत योगाभ्यासी साधकास भाव्य (ध्येय) वस्तूचें रूप संशयविपर्ययरहित अशा उत्तम प्रकारानें प्रकर्षेकरून जाणतां येते, ती सप्रज्ञात समाधि. तिचे भेद चार आहेत:– १ वितर्कानुगत, २ विचारानुगत, ३ आनंदानुगत व ४ अस्मितानुगत. पैकीं वितर्कानुगताचे सवितर्क व निर्वितर्क व विचारानुगताचे सविचार व निर्विचार असे दोन दोन भेद आहेत. एकूण सप्रज्ञात समाधींचे सहा प्रकार झाले. ५ फोकणें=बी चौफेर फेकून जी पेरणी करतात ती. ६ तीन दात्यांचें बीं पेरण्याचें आऊत, पाभर. ७ कोंब येऊन वर निघेल. ८ उपटून येईल.

कीर्णीं निरूपण । साकल्य सांगिजेल ॥ ६४ ॥ दिनकर रामीं रामदास ह्मणे । तें श्रोतीं निज सादरतां श्रवण करणें । स्वानुभवदिनकरीं पाहाणें । निजस्वहितसोय ॥ ६५ ॥ स्वस्ति श्रीस्वानुभवदिनकरे गुरुशिष्यान्वये दशम कळापे स्वबुद्धिज्ञाननिर्शननिरूपणं नाम प्रथम कीर्ण प्रकाशः ॥ १ ॥

---

॥ श्रीराम ॥

मग स्वबुद्धीं बैसोनि महाकारणाआड । लाऊनि तुर्येचें अहंपणें कवाड । आत्मानुसंधानाचा गड । बळकाविला ॥ १ ॥ लाविलें नामनिशाण । अनुहातादि[1] वाद्यविंदान । सप्त हि चक्रेंसीं विराजमान । बुरुज सजिले[2] ॥ २ ॥ अक्षरकोठ सिद्ध केला । बावन्नेंसीं पन्नासिला । स्मरणेंसी सामान केला । हातियेरांचा[3] पैं ॥ ३ ॥ वरि भगवद्भजनाचिया बदुखा । माजीं वैराग्याची दारु देखा । तेथ विवेकाचिया रंजखा । केलिया सिद्ध ॥ ४ ॥ माजीं स्वानुभवदिनकराऐसा । गोळा दाटिला सहजस्थितीं सरिसा । निजहृदईं धरूनियां सैंहसा[4] । भावार्थाचिये निजकरीं ॥ ५ ॥ मनपवनाचिया समता । निजनेट गुरुवाक्य स्वभावता । ज्ञानाग्नीचिया स्वरूपसत्ता । स्वानंदें भडाडिलिया ॥ ६ ॥ तैसीं चि आत्मानुसंधानाचीं भांडीं[5] । बुरुजोबुरुज ठेविलीं अति कडाडी । दशनादेंसी धडाडिती तो नाद ब्रह्मांडीं । दुमदुमीत भरला ॥ ७ ॥ स्वानुभवाचे बाण ठाईं ठाईं । स्वानंदें गर्जती आपुले ठाईं । श्रीगुरुस्मरणाचिया सोईं । अति नेटके सुबद्ध ॥ ८ ॥ तेथ षोडश महावाक्येंसीं कोरलीं[6] । ते जाळिया शोभती विषम भाळीं । समविषमत्वें प्रति बुरुजीं ठेविलीं । अनुसंधानाचिया आधारें ॥ ९ ॥

---

१ अनुहातध्वनी=योगादि धारणेनें जो दशनादाचा ध्वनी ऐकू येतो तो. २ शृंगारला, रचला. ३ हत्याराचा. ४ एकाएकीं. ५ तोफा ६ खिळे वगैरे घालून बनविलेले लोखंडी गोळे.

आत्मत्वाचिया विशाळ धोंडी । ठाईं ठाईं ठेविल्या प्रचंडी । साधनचतुष्टयादि हातगुंडीं । दुर्ग पावलें शोभेसी ॥ १० ॥ स्थळोस्थळीं निजवृत्तीचिया समता । तोफा जोडिल्या अपरमिता । नामस्मरणेंसीं स्वभावतां । त्रैअवस्थीं धडाडिती ॥ ११ ॥ सुखसंतोषें सहजस्थितीसीं । निशाणें तळपती चिदाकाशीं । तेथ स्वानुभवदिनकराऐसीं । आलेपत्रें शोभती ॥ १२ ॥ वृत्ति अखंड स्वरूपीं सावध । फिरंगें साधिली अति शुद्ध । समरसतेचिया कवचें सुबद्ध । सर्वांग अभंगता ॥ १३ ॥ आत्मबोधाचा सतेज भाला । समताबुद्धीं करीं धरिला । विवेकाचा तीर योजिला । वैराग्यधनुषीं ॥ १४ ॥ ऐक्यताबरची हातीं घेतली । क्षमेची कटार माजीं बांधली । तये सेजीं शांतीची सुरी शोभली । साम्यताखंजीरेंसीं ॥१५॥ सत्कर्माचें निजकरीं खेटक । आत्मज्ञानाचें खड्ग सम्यक । तुणीर बाधलें सकौतुक । नवविधभक्तीचें ॥१६॥ ऐसा सर्वांगें सन्नद्ध होऊनि । पाहिली देहदुर्गाची उभारणी । नव दारवंठे अति सज्ज करूनि । विचित्रपणें शोभले ॥१७॥ नेत्रद्वयासारिखे दोनी देखणार । कर्णद्वयासारिखे दोनी आइकणार । स्वासोस्वासेंसीं गंधग्रहण घेणार । घ्राणद्वयाऐसे ॥ १८ ॥ अन्नपानकरिता येक विचित्र । दोनी मळमूत्रत्यागणार स्वतंत्र । ऐसे नव दारवठे असोनि अणुमात्र । परिश्रम नाहीं कोण्हाचा ॥१९॥ माजीं खिडकियें[11] औठकोटी । कोटाचे चिरे[12] तीनसें साठी । बाहात्तर चिरेयांची[13] दाटी । सोळा *सधीं[14] विराजती ॥ २० ॥ बत्तीसें[15] कोठे सेंभर कोठडियों[16] । रचिला पंचभूतांचा कर्दम करूनिया । माजीं त्रिगुणांचा चुना देऊनिया । अभंग केला अक्षई ॥ २१ ॥ सतचक्रेंसीं सात बुरुज । रचूनि केला कोठ सज्ज । अवयव सैंफेली स्वरवर्णी फांजें[16] । देहदुर्ग पन्नासिलें ॥ २२ ॥ बाह्यप्रदेशीं दुर्गासभवता ।

---

१ नित्यानित्यवस्तुविवेक, इहामुत्रफलभोगविराग, शमदमादिषट्संपत्ति, मुमुक्षुत्व. २ फेंकतां येण्यासारखे दगडी गोळे. ३ छत्रें. ४ फिरंग=तरवार. ५ कमरेस. ६ जवळ. ७ ढाल. ८ बाणांचा भाता. ९ सिद्ध. १० नऊ इंद्रियें ११ साडेतीन कोटी रोमरध्रें याच खिडक्या. १२ अस्थि ३६० आहेत. १३ (?) १४ कंडरा ह्मणजे मोठाले स्नायु १६ आहेत. १५ किल्ल्याची भिंत, १६ शहराभोंवतीं असणारा तट किंवा कोट.

वैराग्याचा खंदक करूनि तत्वता। अंतरस्थितिविवेक तो स्वभावता। आतील खदक ॥ २३ ॥ वर्णाश्रमधर्मांचें बांधोनि तळें। माजीं सत्कर्मांचें उदक तुबळें। स्वधर्मांचें टांकें सुंदर जळें। सीतळ निर्मळ ॥ २४ ॥ विज्ञानस्थितीचा भरिला खजांना। साधनसंग्रह धान्यें जिनस नाना। अंतरात्मारामाचिया अखंड उपासना- घडियाळें वाजे अहर्निश ॥२५॥ अमानित्वादि लक्षणीं सजिली पागा। अभयादि दैवी संपदापायदळ वेगां। सज्जूनि शमदमादि मत्तांगीं। स्वानुभवचवरडोलेंसीं ॥ २६ ॥ जुपूनि वारु च्यान्ही पुरुषार्थ। सहजस्थितीं संजोगिले रथ। ऐसा चतुरंग सैन्येंसीं अति समर्थ। दळभार सज्जिला ॥ २७ ॥ यमें नियमें दोवे द्वारपाळ। अखंडता सावध अविकळ। अंतर्बाह्य वृत्ति करूनि निश्चळ। दोवे दोहीं बाहीं उभे ॥ २८ ॥ सर्वे प्राणायाम पाठिराखा। तो चि अविश्रम करूनि निजसखा। प्रत्याहारप्रधानेंसीं विचारसुखा। सारासारेंसीं घेइजे ॥ २९ ॥ आत्मध्यानाचे भोग्य उपचार। वेऊनि धारणासयोगें क्रीडाविहार। निजासनसिंहासनीं बैसोनि साचार। समाधि-

---

१ खजिना. २ हत्ती ३ अबारी. ४ सज्ज केले. ५ अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य व अपरिग्रह. ६ शौच, संतोष, तप, स्वाध्याय व ईश्वरप्रणिधान. ७ मागें टीप आली आहे. ८ प्राणायाम भूमिकेच्या पूर्णावस्थेंत गुरूपदिष्ट पद्धतीनें कुंडलीसहित प्राणवायु चरणांगुष्ठापासून ब्रह्मरंध्रापर्यंत चढविण्याच्या व परत उतरविण्याच्या क्रियाभ्यासास प्रत्याहार हें नांव आहे. या क्रियाभ्यासानें इंद्रियें आपआपल्या विषयाचा परित्याग करून चित्तस्वरूपाचें अनुकरण करितात. ९ धारणा भूमिकेच्या पूर्णावस्थेंत गुरूपदिष्ट पद्धतीनें कुंडलीसहित प्राणाच्या निरोधस्थितींत धारणादेशीं एकतानत्व साधण्याच्या क्रियाभ्यासास ध्यान हें नांव आहे १० प्रत्याहार भूमिकेच्या पूर्णावस्थेंत गुरूपदिष्ट पद्धतीनें कुंडलीसहित प्राणाच्या निरोधस्थितींत नाभिचक्र, हृदय, ऊर, मस्तक, ज्योति, नाकाचा शेंडा, जिभेचा शेंडा, कंठ, दोन्ही डोळे, भुवयांचा मधला भाग इत्यादि आंतील स्थानांच्या ठिकाणीं, किंवा बाह्य ह्मणजे बाहेरच्या चंद्र, सूर्य, अग्नि इत्यादि पदार्थांच्या ठिकाणीं, किंवा मणिरत्न, वृक्षादि जातींच्या ठिकाणीं, किंवा शालिग्रामादि देवमूर्तींच्या ठिकाणीं चित्तवृत्तीची एकतानता करण्याच्या अभ्यासास धारणा हें नांव आहे. ११ ध्यान भूमिकेच्या पूर्णावस्थेंत गुरूपदिष्ट पद्धतीनें कुंडलीसहित प्राण सुषुम्नामार्गानें ऊर्ध्वीं गमन करून ब्रह्मचक्रांत पूर्ण निरोध पावून ज्ञानस्वरूप समरसतेच्या स्थितीचा जो परिपाक होतो त्यास समाधि ह्मणतात.

राज्य सहजस्थितीं ॥३०॥ ऐसें अष्टांगेंसीं प्राणायामसंयोज्य । अक्षईपणें कैवल्यसामराज्य । सायोज्यता सुखासन सुयज्य । आरोहण ऐक्यत्वें ॥३१॥ ऐसा आरुढोनि सुखासनीं । समागमें सकळ परिवार घेऊनि । आसुरी संपदेची करूनि झाडणी । ससैन्यसमवेत ॥ ३२ ॥ कामक्रोधादि नाना वैरी । सबळपणें मदमत्सरीं । शोकमोहादि इये ससारीं । बळक-टपणें जे ॥ ३३ ॥ ते सेना सहवर्तमान । काढिले निजदेशांतून । जेवि सूर्योदईं निपटून । तमें जाइजे ॥ ३४ ॥ कीं वायूचिया बहुवसें-पणें । अभ्रीं दिगत लक्षिजे येकक्षणें । कीं तें प्रकाशें तारांगणें । लोपती जेवि ॥ ३५ ॥ अथवा जालया आत्मज्ञान । स्वसंपत्तीसीं हारपे अज्ञान । तेवि कामक्रोधादि दुर्जन । विभांडूनियां ॥ ३६ ॥ बळदर्प-आणि अहं-कार । साभिमान द्वेष तिरस्कार । परिग्रहें पैशून्यतां अनाचार । हें नाशिलीं सकळ ॥ ३७ ॥ असूर्या निंदा तृष्णा कामना । कल्पना ईर्षणा दुर्वासना । ममतादि नाना दुष्ट कामना । दिगंताबाहेर घातल्या ॥ ३८ ॥ यमादि नाना तस्कर । पराभविले समग्र । दुसरेपणें कोण्ही समोर । न राहे उभें ॥ ३९ ॥ मग जिकडे पाहे तिकडे । दुजेपणें कोण्ही नावडे । सज्ञानतेचिया सुरवाडें । सरसावलों ॥ ४० ॥ तेणें दाटला परम आवेश । आंगीं भरला साहास । मी ज्ञातेपणें कोण्हास । दृष्टीसी नाणी ॥ ४१ ॥ आपुलिया बळकटपणें । सर्व मानिलें ठेंगणें । दैवी[10] सपदेच्या गुणें । भक्तिपेंठा वसविल्या ॥४२॥ भगवद्भजनाचे व्यवसाव । हरिकीर्तनाचा परमोत्सव । भक्तजनसमुदाव । टाळमृदग-युक्त ॥ ४३ ॥ दशविध वाद्यांचिया ध्वनीं । चौघडे वाजती अनुदिनीं । ढोल दमामे नौबता ध्वनी । नाना प्रकारें ॥ ४४ ॥ तत वितत घन सुस्वर । तार मंद्र विगत घोर । यामाजीं दशवाद्य अपार ।

---

१ श्रीभगवद्गीता अध्याय १६ श्लोक ४. २ बहुवसपण=सर्वज्ञत्व सर्वगत. ३ पराभव करून, जिंकून. ४ दुराग्रह ? ५ चहाडखोरपणा. ६ दोषारोप, मत्सर. ७ इच्छा ८ स्वाधीन होऊन किंवा प्रफुल्लित होऊन. ९ साहस, धैर्य. १० श्रीभगवद्गीता अध्याय १६ श्लोक १ ते ३.

नानाविध ध्वनी ॥ ४५ ॥ खालु कर्णे सहैने मृदग । डोलें नडघें गिडिबिडें चग । गुजगुजें झांझ नगारा उपांग । सिंग तुतारा पावा मोहरी ॥ ४६ ॥ चतुर्विध वाद्याचिया ध्वनीं । अपार वाद्यें वाजती निशिदिनीं । नागसँर डफडीं डफगाणीं । वीणा ध्याले किन्नरीसीं ॥ ४७ ॥ सप्तस्वरीं होती गायनें । राग उपराग तानमानें । सावडे भक्त हरि-कीर्तनें । करिती नाना प्रकारें ॥ ४८ ॥ सप्तताळेसीं नृत्यांगना नाचती । सुस्वर समता गायनें करिती । स्मृति मेधा धृति बुद्धि कीर्ति देती । परस्परें श्रुति पेखणें ॥ ४९ ॥ तेथ आनंदाचिया निजमेळें । विविध सुखाचे सोहळे । निजसंतोषासी आगळें । बीक चढलें ॥ ५० ॥ दुकान बैसलें दोहीं हारीं । प्रपंचपरमार्थाचिये परी । व्यवसाय करिती नाना प्रकारीं । सत्कर्मधर्म ॥ ५१ ॥ तेथ चतुर्विध भक्तीचे च्यार । चहुं पुरुषार्थी शोभले बाजार । नित्य अनित्य सार असार । खरें खोटें निवडिती ॥ ५२ ॥ ऐस्या समसाम्यता भल्या । दैवी संप-देच्या प्रजा शोभल्या । स्वानुभवदिनकरीं विराजल्या । भुक्ति मुक्ति विविध ॥५३॥ फिटला द्वंद्वतेचा दुकाळ । जाला समसुखेंसी सुकाळ । स्वानुभव-दिनकरीं तुबळ । स्वानदसामरस्य ॥ ५४ ॥ तेथ माझें सैन्य जितुलें । जें असे प्रतापशौर्यें आगळें । परि सर्व हि सत्वाथिलें । चतुरंगेंसीं ॥ ५५ ॥ अभयादि गुणगणेंसीं । पुढें पायदळ चाले सत्राणेंसीं । त्यामागें अमा-नित्वादि गुणेंसीं । स्वार चौताळले ॥ ५६ ॥ त्यामागें शमदमादि । मत्तांग गुढारिले योगसिद्धि । साधूनियां अष्टांग शुद्धि । चवरंडोल विराजले ॥ ५७ ॥ तयामागें चहुं पुरुषार्थांचे । वारु जुपूनि अति वेगाचे । सहजस्थितीसीं निजरथाचें । अनुपम्य चालणें ॥ ५८ ॥ ऐसें चतुरंग सैन्य अति बळकट । वीर्यशौर्यागळें परम धीट । प्रतापतेजेंसीं

---

१ सनई? २ ढोल? ३ नागाची पुगाणी. ४ भूषण. ५ अधिक. ६ सौंदर्य, शोभा, तेज. ७ दैवी संपत्तीचे गुण. ८ श्रीभगवद्गीता अ. १३ श्लोक ७ ते ११ यांत ज्ञानाचीं जीं लक्षणें दिलीं आहेत, तीं पाहावीं. ९ हत्ती. १० गुढार=हत्तीच्या पाठीवरील हौदा. ११ अबारी.

उद्भट । धगधगायमान ॥ ५९ ॥ तेणेंसीं मी परिवारला । दळभार सजोगला । सुखासनीं आरुढला । सज्ञानतेचया ॥ ६० ॥ मग आपुलें जें राहातें स्थळ । कोठें सबळ कोठें निर्बळ । तें शोधिलें पैं सकळ । मुळींहूनि आद्यंत ॥ ६१ ॥ तेथ अष्टांगेंसीं प्राणायाम । समागमें चालतसे निभ्रम । दोहीं भागीं यम नियम । द्वारपाळ उभे ॥ ६२ ॥ पुढें वाद्यें वाजती अपार । दशनादेंसीं अति गभीर । हरिकीर्तनाचा परम गजर । टाळमृदांगेंसीं ॥ ६३ ॥ पुढें स्वयंज्योतीचिया महतापीं । येकात्मतेसीं प्रकाशरूपा । जयांच्या प्रकाशें सस्वरूपा । योगी पाहाती ऐकत्वें ॥ ६४ ॥ तेथ मन पवनसंयुक्त । घेरटीकार पुढें चालत । ऐसेनि सत्वर आलों जेथ । आधारचौकी ॥ ६५ ॥ येऊनि पाहातसे जवं मुळीं । तव अति सुरेख मंडपातळीं । विराजित चतुर्दळीं । रम्य सिंहासन ॥ ६६ ॥ कुंकुमासारिखें आरक्त । गुदस्थानीं सुखकोंदत । गजानन सिद्धिबुद्धिसहित । व श ष स सिंहासनीं ॥ ६७ ॥ मुकुट शोभे रत्नखचित । निजभाळीं सिंधुर चर्चित । शुक्लांबर वेष्टिलें तडिद्वंत । आणि चतुर्भुज ॥ ६८ ॥ निजकरीं फरश अंकुश अंबुज । तैसें चि अभयवरदाचें भोजें । पाहा नवल मूर्तीचें चोजें । वाटे अद्भुत ॥ ६९ ॥ जया स्थूळ देहाची आकृति । अवस्था नित्य जागृति । विश्वाभिमानव्यक्ति । भोग सुखदुःखात्मक स्थूळत्वें ॥ ७० ॥ वैखरी वाचा मात्रा अकार । रजोगुण क्रियाशक्तीसीं व्यवहार । पृथ्वी तत्व निरंतर । अपान वायु ॥ ७१ ॥ सलोकता मुक्ति देणें । रुगवेद नित्य पठणें । आहवनाग्नि हवनें । असणें मायापुरीं ॥ ७२ ॥ मुळाधारें वसेन्माया । स्मृतिवाक्यावसानें इया । भौमवासरीं उद्भवणें जया । अखंडतेसीं ॥ ७३ ॥ चौवर्णी च्यारि शक्ति । चतुर्दळीं विराजती । गुप्ता प्रासका कराळा चौथी । विकराळा ते ॥ ७४ ॥

---

१ प्रसिद्ध. २ तेजःपुंज. ३ सज्ज केला. ४ महताव=चंद्रज्योती. ५ गस्तघालणार. ६ मागें पान २४३ वरील टीप ४ पहा. षट्चक्रापैकीं प्रत्येकाचें खुलासेवार वर्णन पुढें आलें आहे. ७ विद्युल्लतेप्रमाणें. ( तडित्=वीज. ) ८ आवड. ९ नवल. १० यज्ञ, वैश्वदेव वगैरेचा अग्नि. ११ मंगळवारीं.

परमानद सहजानद । वीरानद योगानद । चतुर्दळीं प्रमाण च्यारी आनद । कुडलनीये ॥ ७५ ॥ घटिका येकी पळें चाळीस । राहाणें पैं येथ आह्मास । जपेंमिसें सा शतास । दिधलें आश्वासन ॥ ७६ ॥ मग तिये आधारचक्रीं । गणेश ठेविला वर्णचत्वारीं । आपण चालिलों स्वाधिष्ठानावरी । अति सावधपणें ॥ ७७ ॥ आता तें स्वाधिष्ठान क्रिमात्मक । लावण्य स्वरूपें सम्यक । सागिजेल अति सकौतुक । पुढिलिये कीर्णी ॥ ७८ ॥ ग्रथ सुदरपणें अति नागरें । आद्यत स्वानुभवदिनकर । श्रोतीं होऊनियां सादर । श्रवण केला पाहिजे ॥७९॥ दिनकर रामीं रामदासीं । निजऐक्यता सुखसतोषीं । सागितलें आधारचक्रासी । पुढें षट्चक्रें पारिसावीं ॥ ८० ॥ स्वस्ति श्रीस्वानुभवदिनकरे गुरुशिष्यान्वये दशम कळापे देहदुर्गशोधननिरूपण नाम द्वितीय कीर्ण प्रकाशः ॥ २ ॥

---

॥ श्रीराम ॥

तवं स्वाधिष्ठानें षट्दळान्वित । व भ म य र ल संज्ञित । पीतवर्ण आधिष्ठानीं दैवत । चतुर्मुख हसवहन ॥१॥ षट्दळकमळीं आरोहण । पीत वसन अक्षमाळेचें भूषण । दड कमडलु अभयहस्तें वरदान । निजभक्तांसी ॥ २ ॥ वामागीं सावित्री क्रियाशक्ति । स्थूळ देहाची आकृति । अवस्था नित्य जागृति । विश्वाभिमानें ॥ ३ ॥ स्थूळभोगीं अति आसक्त । अकार मात्रा सयुक्त । रजोगुण मूर्तिमत । तत्व तें पृथिवी ॥ ४ ॥ वायु जेथ असे अपान । सलोकता मुक्ति जाण । वैखरी वाचा ऋग्वेदपठण । हवन आहवनाग्नीं ॥ ५ ॥ स्वाधिष्ठानें स्मृता कांची । वस्ति सहजस्थितीची । बुधवारीं जयाची । जन्मवेळ ॥ ६ ॥ आता षड्वर्णाचिया सा शक्ति । अनुक्रमें चि शोभती ।

---

१ अजपाजपाच्या मिषानें. एक दिवस म्ह० साठ घटका; एवढ्या वेळांत २१६०० अजपाजपाची सख्या होते; पैकीं आधारचक्राचे ठिकाणीं १ घटका ४० पळांत ६०० जप होतो. २ चागला. ३ मागें पृष्ठ २४३ टीप ६ पहा. ४ ब्रह्मदेव. ५ कमलाक्षाची माला. ६ सप्तपुरीपैकीं पाचवी.

नामाचिया अभिव्यक्ति । करूनि दाऊ ॥ ७ ॥ अभ्यंगता शारदा वाणी । अमृता पूर्णा रोहिणी । षडानदावसानीं । विराजती ते ॥ ८ ॥ प्रशस्त कुरग गर्वगत । अवज्ञ अविश्वास मूर्छित । कामशक्तीसीं अनु- कारत । कुंडलनीया ॥ ९ ॥ तिये स्वाधिष्ठानीं राहाणें आह्लास । घटिका सोळा पळें चाळीस । तेथ सा सहस्र सैन्यास । आश्वासू- नियां ॥ १० ॥ तथा षडगुळ परमित । आधिष्ठानीं ब्रह्मा दैवत । ठेऊनि मग मणिपुर चक्रात । प्रवेशलों पैं ॥ ११ ॥ तवं तें दशद- ळेंसीं उत्फुल्लित । नीळ वर्ण प्रभांकित । ड आदि फ पर्यंत । दश- दळकमळीं ॥ १२ ॥ तेथ जाणों कोटी सूर्यवडी । उपलेंविली चोखडी । तैसी तेजपरवडी । श्यामाग चतुर्भुज ॥१३॥ आदिपुरुष नारा- यण । विद्युद्वर्ण पीतांबर परिधान । श्रीवत्सांकित कौस्तुभ भूषण । अमळ जगदादि जो ॥ १४ ॥ शख चक्र पद्म गदा । शोभा जेणें सर्व आयुधां । ज्ञानशक्तिमय लक्ष्मी सदा । शोभे वामागीं ॥ १५ ॥ इंद्रनीळासम प्रभ । नाभिस्थानमंडपीं पद्मनाभ । सत्वगुण स्वयंभ । गरुड वहन ॥ १६ ॥ सूक्ष्मात्मक पचवीसा कळाचें । लिंगदेह नाम साचें । अवस्थातर स्वप्नाचें । तेथूनियां ॥ १७ ॥ तैजसाभिमानें करूनि । प्रविविक्तभोग अनुदिनीं । उकार मात्रा सजीवनी । आप तत्वासहित ॥ १८ ॥ समान वायु समतें । समीपता मुक्ति सकेतें । मध्यमा वाचा उचितें । पठणें यजुर्वेद ॥ १९ ॥ आवसथ्याग्नि हवन । गुरुवासरीं अवतिये जन्मदिन । यदर्थीं समस्त वचन । मणिपुरें अवतिका ॥ २० ॥ दशदळीं मातृकापरिवार । शक्तिदशक अनिवार । कोणकोणता प्रकार । बोलिजेल ॥ २१ ॥ सर्वगा सोमा जया भद्रा । तीक्ष्णी सौंदर्या शांतमुद्रा । विशाखा दर्शिनी

१ प्राकट्य. २ आकारास येत, अनुकूल होत. ३ २१६०० पैकीं १६ घटका ४० पळात ६००० अजपाजप करून. ४ मागें पृष्ठ २४३ टीप ७ पहा. ५ व्यक्त झाली ६ प्रकार. ७ मलरहित. ८ प्रभा, तेज. ९ नाभिस्थानातून कमलोद्भव झाल्यामुळें विष्णूला पद्मनाभ असें ह्मणतात. १० स्वत सिद्ध, मूळचा. ११ स्वप्ना- वस्था. १२ स्वप्नदेहाचा अभिमान धरून. १३ स्वप्नस्थान किंवा मनोराज्य यातील अस्पष्ट भोग ते. १४ गृह्याग्नि. १५ उज्जनी प्रांतात.

रुचिरा । दशानंदीं शोभती ॥ २२ ॥ सुषुप्त वृष्ण इछ पिशुण । सलज्ज मोह भय द्रोण । कशाय विशाद इतुके मिळोन । विष्णु दैवत ॥ २३ ॥ तया मणिपुर चक्राजवळा । पळें चाळीस घटिका सोळा । आज्ञां राहाणें प्राजळा । सा सहस्रां आश्राउनी ॥ २४ ॥ मग तेथूनि चाली केली । अनाहतावरी सैन्यें पेलिलीं । तवं द्वादशें वर्णे देखिली । रचना तयाची ॥ २५ ॥ धवळ मंडपामाझारीं । नदीस्कदावरी । क पासूनि ठ वरी । वर्णांकित सिंहासन ॥ २६ ॥ तेथें दैवत पचेंवदन । दशभुज विराजमान । चर्मांबर परिधान । मुकुटोज्वळ ॥ २७ ॥ जाणों कर्पुराचा पर्वत । कीं निजतेज चि मूर्तिमत । कीं कोटिचद्रोज्वळित । अगकाति ॥ २८ ॥ कर्णीं कुंडलें स्फटिकवत । नेत्रत्रय धगधगीत । कठीं हार शोभत । रुंडाकितें पैं ॥ २९ ॥ भाळीं चद्ररेखा मिरवत । जटेमाजीं गगा गुप्त । त्रिशुळ डमरु वरदयुक्त । भुजा आयुधीं विराजती ॥ ३० ॥ तमोगुण मूर्तिमंत । वामांकीं द्रव्यशक्ति मडित । परम लावण्य-युक्त । देवी पार्वती ॥ ३१ ॥ कारणदेहाची आकृति । सदैव अवस्था सुषुप्ति । प्राज्ञाभिमानें भोगप्राप्ति । आनदाची पैं ॥ ३२ ॥ मकार मात्रेचिया आईती । तेजतत्वीं समान वायूची गति । स्वरूपता मुक्ति । देणें नित्य भक्ता ॥ ३३ ॥ पश्यंतिवाचासयोगें । सामवेद पठणें अष्टागें । दक्षणाग्नीचया आगें । हवन नित्य ॥ ३४ ॥ भृगुवासरें मथुरापुरी । अनाहत चक्र हृदयावसरीं । द्वादशांगुळ परिवारीं । नाम राज्ञा ॥ ३५ ॥ पद्मिणी सदर्भा रतिप्रिया । वैजयती सौभद्रात्रिमाया । कुहवासिनी घोकिनी रेखा श्रीया । तरगिणी तारा ॥ ३६ ॥ इत्यादि द्वादश मातृका । आनदाचिया द्वादश झुळका । चालती त्या अशेखें । वर्णव्यक्ति ॥ ३७ ॥ त्रैलोक्य वित्कर प्राण स्वपद । अंशप्रकाश अनुताप कपर्द । चित्तसमत विकल्प महद । विवेक अहकृत ॥ ३८ ॥ अनाहतचक्र जें

१ मागील स्वाधिष्ठान चक्राइतका च अजपाजप २ लोटलीं. ३ मागें पृष्ठ २४३ टीप ८ पहा. ४ पांचमुखी परमेश्वर, शकर. ५ शिरविरहित शरीराचे. ६ सुषुप्ति अवस्थेतील अभिमान ७ आनदभोग=सुषुप्तिसुख. ८ सामग्री. ९ शुक्रवार. १० संपूर्ण.

कां ह्मणिजे । हृदयावकाशीं विराजे । द्वादशानदेसीं भोगिजीजे । वर्ण-मातृकीं ॥ ३९ ॥ सोळा घटिका चाळीस पळें प्रमित । आह्मांसी तेथ राहाणें निवात । सैन्य येकवटूनि समस्त । सा सहेस्र गणना ॥ ४० ॥ जो कां कैळासवासिया । नगतनुजाविळासिया । स्वसंपत्तीनर्सीं तेथें तया । प्रतिस्थापना ॥ ४१ ॥ तें द्वादशागुळ प्रमितें । अतिक्रमूनि चालिलों त्वरित । मग आलों विशुद्धचक्रीं जेथ । जीवात्मा असे ॥४२॥ तव तें विशुद्धचक्र कैसें दिसे । जाणों गधर्वनगर विळासे । नसतें-चिपणें भासे । जीवात्मेनसीं ॥ ४३ ॥ मी आणि माझें हें सर्व हि । लटिकेपणें हुबे निजदेहीं । सेवटीं पाहातां कोठें चि काहीं । क्षणभंगु-रत्वें न दिसे ॥ ४४ ॥ जेवि का श्वपचगृहीं ब्राह्मण । स्वप्नामाजीं करूनि भोजन । प्रायश्चित्त घेऊ धांवे आपण । तव अकस्मात होय जागा ॥ ४५ ॥ तेवि हा ब्रह्मींचा अश असोनि साचारें । देहसगें मी जीव-पणें हुबरे । जेवि सार्वभौम हिंडे पाच सात घरें । रकपणें स्वप्नामाजीं ॥ ४६ ॥ तेवि येणें मुळींचें आत्मत्व सोडूनि । देहसगें नसतें जीवपण धरूनि । अह सुखी अह दुखी भेरवसेनि । हर्षविषादीं चढे [10]वोहटे ॥ ४७ ॥ जें मृत्यूचें वेंसौटें । कीं नाना दोषांचें मोजिवटें[12] । कामक्रोध-लोभादि लाठे-[13]पणें जिये देहीं ॥ ४८ ॥ जें पाचां आणि तींचें । वोतलें सेंभरां तत्वांचें । वेगळेपणें जें चौचें[15] । मिळोनि येक ॥ ४९ ॥ त्रैलोक्य न पुरे क्षुधेसी । [16]तो जेथील मिरासी । स्वर्ग नर्क भोगणें जीवासी । सगें जयाचे ॥ ५० ॥ ऐसें जें अनता विकारें[17] । करूनि

---

१ परिमिति, प्रमाण. २ मागील स्वाधिष्ठान चक्राइतका च अजपाजप ३ नगतनुजा=पर्वताची मुलगी जी पार्वती. ४ नसीं हें सह या अर्थानें योजलें आहे. ५ शब्द करतो, सारखा ओरडत असतो. ६ अत्यजगृहीं. ७ भिक्षा मागत. ८ लटकें. ९ हें खरें आहे असा भरवसा वाटून. १० उतरे. ११ वसतें स्थान १२ उन्माद, आगर या अर्थानें १३ लाठपणें=आधिक्यानें, मोठेपणानें. १४ पचभूतें व त्रिगुण मिळून अष्टधा प्रकृतीचें १५ स्थूल, सूक्ष्म, कारण, महाकारण असे चार देह मिळून हें शरीर बनलें आहे १६ जीव.१७ विस्तारें.

दिसे संपुरें। आयुष्यमापें मापारें। भरूनि टाकी ॥ ५१ ॥ पाहा अहपणें बोलिजे जीव। नाहपणें ह्मणती शिव। दोहीं नामीं होतसे गौरव। या शरीरसगें ॥ ५२ ॥ पाहाता मुळींचा भेद। तरि सदैव जो शुद्धबुद्ध। ज्ञातपणें अगाध। चिदानंद जो ॥ ५३ ॥ चराचरीं जो व्याप्त। जया मूर्त्तामूर्त्त ह्मणत। गुणागुणभावीं युक्त। वेगळेपणें चि जो ॥ ५४ ॥ असो आतां हें प्रस्तुत। अहपणें जीवात्मा जो सतत। अविद्याशक्तीसमवेत। विशुद्धवासी ॥ ५५ ॥ आतां तें विशुद्ध चक्र कैसें। केवळ धूम्रमय असे। अकारादि षोडशदळीं विकाशे। कंठस्थानीं ॥ ५६ ॥ स्वरांकित स्तंभीं मंडप। मध्यें सिंहासन सुवर्णरूप। त्यावरी विराजे चिद्रूप। अहं जीवात्मा ॥५७॥ भरली विकारें बहुतीं। अष्टधा ऐसें जयेसी ह्मणती। ते चि स्वरूपाची आकृति। येकदेशीपणें ॥५८॥ वामागीं अविद्या शक्ति। कारणदेहाची आकृति। अवस्था नित्य सुषुप्ति। प्राज्ञाभिमानें ॥ ५९ ॥ आनंदाचें भोगायतन। मकार मातृकेचें स्थान। मूर्तिमंत तमोगुण। परि तेजतत्वें साजे ॥ ६० ॥ वायु जेथील उदान। स्वरूपता मुक्तीचें दान। पश्यंति वाचा पठण। सामवेद नित्य ॥ ६१ ॥ दक्षिणाग्निमाजीं हवन। द्वारिकापुरी सुखायतन। विशुद्धि-द्वारिकापुरी हें वचन। शास्त्रांतरींचें ॥ ६२ ॥ असो षोडश मातृकां-सहित। सोळां हि स्वरेंसीं मंडित। देवांगनायुक्त शोभत। देव जैसे कां ॥ ६३ ॥ सर्वतोभद्रा प्राणधारिणी। सप्तद्योतिनी ब्रह्मायणी। शबरी लोहिता यक्षिणी। आणि सौभाग्यदायका ॥ ६४ ॥ भानुमती मदळसा शिखरिणी छाया। विष्णुप्रिया विश्वोदरा माया। चित्रघटादि षोडश वर्णा यया। परिवार हा ॥ ६५ ॥ करिती परस्परें क्रीडा विनोद। सुखयोगें नाना छंद। तेथ स्वेच्छा उठिती आनंद। सोळा प्रकारीं ॥ ६६ ॥ हुं फट् वौषट् स्वाहा स्वधानंद। मन अमृत गांग तथा शुद्ध। पर धर नीळ धीमानंद। प्राणानंद सोळावा ॥ ६७ ॥ इत्यादि सोळा हि

---

१ बारीक. २ मापारी=माप करणारा, मापाड्या. ३ विशुद्धचक्राचे ठिकाणीं वास करणारा. ४ मागें पृष्ठ २४३ टीप ९ पहा. ५ नूतन.

आनंद । देवतारूप प्रसिद्ध । बोलिले जे विशद । शास्त्रांतरीं ॥ ६८ ॥ ऐसिया वर्णशक्ति आनंदसह । घेऊनि अविद्याजातसमूह । जीवात्मा विशुद्धीं करित उत्साह । कंठस्थानीं तिये ॥ ६९ ॥ घटिका दोनी पळें सेताळीस । तथा अक्षरें गणना चाळीस । विश्रांति घेऊनि सहस्र येक सैन्यासें । आश्वासिलें तेथ ॥ ७० ॥ मग तें षोडशांगुळ प्रमित । अतिक्रमूनि सैन्यसमवेत । चालिलों निजानंदभरित । अग्निस्थानासी ॥ ७१ ॥ तिया अग्निस्थानाचें परम लावण्य । स्वानुभवदिनकरीं अति सौजन्य । दिनकरें रामदासकृपां कीजैल गण्य । पुढिलिये कीर्णीं ॥७२॥ स्वस्ति श्रीस्वानुभवदिनकरे गुरुशिष्यान्वये दशम कळापे चत्वारचक्र-शोधननिरूपण नाम तृतीय कीर्ण प्रकाशः ॥ ३ ॥

---

॥ श्रीराम ॥

आतां जें अग्निस्थान अति पवित्र । सकळ चराचराचें जें पात्र । परमार्थआकळितें सूत्र । विश्वोद्धरण जें ॥ १ ॥ पाहातां तें अति रम्य मनोहर । मना न कल्पवे ऐसें थोर । देखता चि मी सपरिवार । विहाळों मानसीं ॥ २ ॥ त्या बिहाळेपणें चि होऊनि सावध । स्मरिलें आत्मारा-मपदद्वंद । तेणें बळें सनादबद्ध । पुन्हा सरसावलों ॥ ३ ॥ तव तिया स्थळातळवटीं । पाहे जव खोलिवां दृष्टीं । तेथ अपार मिळोनियां चावटी । करिताती सुखें ॥ ४ ॥ जे कां सत्वश्रिया श्रीमत । मनन-शीळ भाग्यवत । नीतिन्यायमर्यादायुक्त । सर्वकाळीं जे ॥ ५ ॥ जे गुरुभक्त परम धार्मिक । शुद्ध वासना जयांची निष्टंक । आत्मानात्म-विचारें संम्यक । परिपूर्ण जे ॥ ६ ॥ भक्तीचे तरि जे आगर । वैराग्यें-करूनि परम शूर । ज्ञानाचे हि जे सागर । अपारपणें ॥७॥ ऐसे देखिले अनत । अनुभवी साधु संत । स्वसुखानदें पेलैत । भुललेंपणें ॥ ८ ॥

---

१ २ घटका ४७ पळांत १००० अजपाजप होतो. २ मागें पृष्ठ २४३ टीप १० पहा. ३ आकळणें=जाणणें, आटोपणें. ४ डोळे उघडून. ५ पोहत, हळुवार तोलत.

येक शांत आणि वीतरागी । येक अनुपम्य हठयोगी । येक नित्यनैमित्यादि कर्ममार्गी । बैसले सुखें ॥ ९ ॥ येकीं यमनियमाचे खडे झाडूनि । प्राणायामासन घालूनि । प्रत्याहारेंसीं धारणा ध्यानीं । बैसले समाधीं ॥ १० ॥ येक ते कुंडलिनीमेळें । देह राखू बैसले सगळें । येक ते सांख्य सिद्धांतफळें । भक्षिती आइतीं ॥ ११ ॥ येक मीनमार्गें या स्थळा चालिले । येक मर्कटा ऐसे फळीं झोंबिले । येक पिपलिकामार्गें वाहिले । या स्थळासी येऊ पाहाती ॥ १२ ॥ येक येऊ ह्मणती विहगमाऐसे । सत्वरीं झेंपावती सरिसे । आपलाल्या मतिप्रकाशें । आकळू पाहाती ॥ १३ ॥ आता हे पृथुकाकारें सागतां । स्वमतीसी नाकळे पैं तत्वता । मुख्य जे सभानायक उभयतां । ते चि बोलिजती ॥ १४ ॥ तेथ येक ज्ञानी येक योगी । बैसले दोघे हि दोहीं भागीं । पाहातां हरिहरब्रह्मादिकालागि । ते चि मोहरे ॥ १५ ॥ ऐसा जों पाहे चहुकडे । तव जो तो प्राणी तेथें चि वांवडे । मग मी जो पाहे आपणाकडे । तवं आपली हि गति ते चि ॥ १६ ॥ एवं आपणासी पाहों गेलों निवाडें । तव पाहतेपणेंसीं जालें साकडें । का जे दृश्यद्रष्टादर्शनेंसीं बहुडे । जेथील तेथ ॥ १७ ॥ आब्रह्मापासूनि मश्यकपर्यंत । जो तो प्राणी देखिजे तेथ । परम रमणीय स्थळ शोभत । सर्वा सुसेव्य जें ॥ १८ ॥ तया स्थळाची येकी नवाई । प्राणिमात्रा वासु तरि तिये ठाईं । परि अज्ञानां झोल सखोल सर्वा हि । उर्वरितांसि पैं ॥ १९ ॥ सर्वांसी विश्रांतिदायक । मनोरम्य जें अत्यंतिक । तेथ द्विदळात्मकें । सिंहासन ॥ २० ॥ अग्निमडप उभविला । मुक्तस्तभीं शोभला । शुभ्रवर्णमय देखिला । अति

---

१ सर्व प्रकारचे विकार ज्यांनीं आपल्या ताब्यात ठेवले आहेत असे. २ ज्ञानी गुरु व योगी शिष्य. ३ सागतों. ४ मोहर=मार्ग, किंवा मुख्य मणी. ५ वावटणें=विश्राम पावणें. ६ सकट, ओझें, कठिण, सकोचित. ७ मागें सरे, परत फिरे. ८ अपूर्वता ९ अज्ञानी जीव मात्र त्या ठिकाणापासून अत्यत दूर झुगारून दिलेले दिसतात; त्याखेरीज इतर सर्वांना तेथें विश्रांति मिळते. १० ह व क्ष या दोन दलानीं युक्त.

तेजोमय ॥ २१ ॥ मध्यें कमळ मनोहर । विराजे अति सकुमार । भोंवते हस मयूर । टाहो कारिती ॥ २२ ॥ स्वानुभवें सुगंध बहळें । कमळीं सतषट्पदकुळें । निशब्दाचिया मेळें । झुकारती ॥ २३ ॥ जेथ सद्भावाऐसीं पारवीं । भक्तिभार्येचिया गौरवीं । घुमघुमिती क्रीडारवीं । सुखसतोषमेळें ॥ २४ ॥ कोह शब्दाचे काक बक कोकिळ । ते न पावती चि पैं तें स्थळ । मग ते अविद्याजुबाडेंसीं जें विशाल । ते दागीं जाऊनि राहिले ॥ २५ ॥ तेथ आर्तेंसीं जिज्ञासेचिया आवडी । अर्थु इछिती ज्ञानाचिये परवडी । ऐसीं भक्तिभावें पक्षीवृंदें चोखडीं । साधुत्वें क्रीडती असख्य ॥ २६ ॥ असो ऐसिये मनोहर स्थळीं । तया द्विदळात्मक कमळीं । चद्रसूर्याहूनि प्रभा आगळी । स्वानुभवदिनकराऐसी ॥ २७ ॥ त्यावरि सुवर्णी रत्नजडित । हसमय सिंहासन लखलखित । बारा सोळा कीर्णेंसीं झळाळित । प्रभा ज्याची अतुळ ॥ २८ ॥ तेथ इडात्मक जें दक्षिणें दळ । चंद्र दैवतेंसीं परम सीतळ । सोळा कळीयुक्त सुगध बहळ । सुरेख साजिरें ॥ २९ ॥ तैसें चि पिंगळात्मक दुजें वामदळ । सूर्यदैवतेंसीं अति उष्णता सोज्वळ । सोळा कळा त्यांत प्रगट बारा निर्मळ । च्यारि गुप्त असती ॥ ३० ॥ आतां चद्रकळा ज्या षोडशा । तेजें समान सीताशा । अमृतमय अति निर्दोषा । त्या सागिजतील ॥ ३१ ॥ शखिनी पद्मिणी अशोशिणी । सुप्रभा आणि कामिनी । आल्हादिनी तथा कुमुदिनी । आश्वासिनी ते ॥ ३२ ॥ व्यापिनी विग्रहाकर मडिनी । विकाशा सौम्या मैथुनी । अमृतकळा तथा द्राविणी । मिळोनि कळा षोडश ॥ ३३ ॥ यानतर सूर्याचिया कळा । प्रगट गुप्त मिळोनि सोळा । कोण कोण त्या अनुक्रमें सकळा । सागिजतील अन्वयें ॥ ३४ ॥ कीर्णी अकीर्णी ज्वाळिनी । दाहिनी

---

१ बहुत. २ अविद्यारूपी वृक्षसमुदायांनीं युक्त. ३ अरण्यात, वनात. ४ चतुर्विधाभक्ति. श्रीभगवद्गीता अ. ७ श्लोक १६. ५ पुढें ओवी ३२ ते ३६ यात सांगितलेल्या. ६ कित्येक ठिकाणी इडेला वाम व पिंगलेला दक्षिण नाडी ह्मटलें आहे इडा वामे स्थिता भागे पिंगला दक्षिणे स्मृता । सुषुम्ना मध्यदेशे तु गांधारी वामचक्षुषि ॥

ज्योतिनी दीपिनी। विद्युत्तेजा प्रकाशिनी। तापिणी आणि सुप्रभा ॥ ३५ ॥ सुकीर्णी तथा लोकनंदिनी। द्वादश प्रकट एव मिळोनि। आता गुप्त चत्वार त्या प्रळई प्रगटोनि। ब्रह्मांड दग्ध करिती ॥ ३६ ॥ लाहाकी दाहाकी शोषिणी। चौथी जाणिजे तीव्रकीर्णी। सोळा सूर्यकळा एव मिळोनि। स्वानुभवदिनकराऐस्या ॥ ३७ ॥ एव बारा सोळा मिळोनि। सूर्य चंद्र वाम दक्षणीं। पिंगळाइडात्मक द्विवर्णी। अग्नि-चक्रीं द्विदळ कमळ ॥ ३८ ॥ परम शोभा रमणीय। सिंहासन तेजो-मय। उपमे न येती चद्र सूर्य। ते लाजो[1] गगनीं राहिले ॥ ३९ ॥ असो सिंहासनीं दिव्य मूर्ति। जैसी कां कैळासीं शिवशक्ति। तिया रूपाची अभिव्यक्ति। वाचा न बोलवे ॥ ४० ॥ जो कां जगदंकुरकंद[2]। साकार सच्चिदानद। विगळिताखिळ भेद। ज्ञानरूप केवळ ॥ ४१ ॥ जयाचें न कळतां रूप। विश्व खरें वाटे अमूप। जाणितलिया होइजे निष्पाप। क्षणमात्रें चि ॥ ४२ ॥ सदैव जो कां परमानद। तयाचे नमू चरणद्वद। कां जे जागणा होय निर्व्यवाद। ह्मणौनियां ॥ ४३ ॥ हरिहरब्रह्मादिक। इछामात्रें होती सम्यक[3]। पुन्हा लया जाती निष्टक। जया देखतां ॥ ४४ ॥ जयातें साख्य मत्त। क्षेत्रज्ञ ऐसें ह्मणत। अक्षर ऐसा सकेत। बोलती येक ॥ ४५ ॥ पाहाता जो परम चंचळ। लयोद्भव जयाचा खेळ। पुरुष हें केवळ। अभिधान जया ॥ ४६ ॥ असो जो प्रकृतीसी पर। षड्गुणां जेथ आधार। जो साक्षात् ईश्वर। शुद्धसत्व ॥ ४७ ॥ एव जो अतरात्मा मूर्तिमत। वामांगीं इछाशक्ति शोभत। जेवि गोडी गुळीं भासत। प्रभा दीपीं ॥४८॥ कीं ते बुबुळीं बाउली[4]। कीं देहीं साउली। का जेवि देखिली। अग्नीं शिखा ॥ ४९ ॥ इयापरि तन्वंगी। लावण्य जिये सर्वांगीं। ते शोभली वामांगीं[5]। आत्मयाचा ॥ ५० ॥ देह पाहाता महाकारण।

---

१ लाजोनि. २ जगद्रूपी अंकुर ज्यापासून उद्भवला तो मूळ गाभा. ३ चांगले. ४ बाहुली ५ अर्धांगी.

अवस्था तुर्या जे परम गहन । प्रत्यगात्मत्वें अभिधान । नित्य जया ॥५१॥ आनंदाचा अवभास । तो चि भोग[2] पैं जयास । शुद्धसत्वगुणास । अंगिकारिलें ॥ ५२ ॥ आकाशतत्वें करूनि । प्राणयोगें अनुदिनीं । वायु विचरे भुवनी । सुषुम्नेचिया ॥ ५३ ॥ मग सगुणसायुज्यतादि । मुक्तिप्राप्ति जये पदीं । अर्द्धमात्राविधीं । पदैक्यता ॥ ५४ ॥ परा जे कां चौथी[3] । तियेचिया व्यक्ति । अथर्वणें निगुती । वेदध्वनि ॥५५॥ मग काम्यादि निषिद्धें । नित्य नैमित्य फळावछेदें[4] । सवर्तकाग्नि स्वकर्म-वेधें । नित्याग्निहोत्र ॥ ५६ ॥ अग्निचक्र स्मृता काशी । बोलिला जाबाळी श्रुति विशेषी । ह्मणौनि जे नित्य अग्निचक्रवासी । तया काशीवास सदैव ॥ ५७ ॥ तये काशीपुरीं जावया । तीन मार्ग योजले सवियां[5] । कोण कोण ते आर्यां[6] । आणिजती ॥ ५८ ॥ इडामार्ग तो केवळ तम । पिंगळा रजोगुणी सकाम । तिजा सत्वात्मक निजधाम । पाव-विता पैं ॥ ५९ ॥ आता द्वयवर्णोत्तमीं[7] । असिजे शक्तियुग्मीं । महाकाळी महालक्ष्मी । मातृकारूपी ॥ ६० ॥ सहज आणि नित्यानदीं । रमिजे शक्तिद्वंदीं । मग पैठें[8] होइजे महापदीं । निजात्मयोगें ॥ ६१ ॥ मग घटिका दोनि पळें सेताळीस । अक्षरें चाळीसापर्यंत आह्मास । राहाणें घडलें येक सहस्र सैन्यांस[9] । आश्वासिलें तेथ ॥ ६२ ॥ तें स्थळ परम गहन । कोण्हा न कळे तयाचें मान । कितेक आले कपायमान । तें देखता चि ॥ ६३ ॥ बहुतीं केला आवाकां[10] । परि कित्तेकां बैसला धका । ऐसें जाणोनिया निका[11] । विचार योजिला ॥ ६४ ॥ कोट्यानु-कोटि वीरगणीं । माजीं येक येक शोधूनि । काहींयेक सजोगूनि[12] । ऐक्य केलें मग ॥ ६५ ॥ ऐसिया कित्तेक सैन्यसमवेत । आत्मा

१ देहामध्ये व्यापून राहिलेलें ब्रह्म तें, कूटस्थ २ आनंदावभासभोग= तुर्या अवस्थेचें सुख. ३ चौथी वाणी ४ नित्य नैमित्तिक कर्में जीं फळ देण्या-बद्दल प्रसिद्ध आहेत असा एक अर्थ होतो, परंतु या ठिकाणीं फलापासून निराळीं ह्म० फलाशारहित जीं कर्में तीं, असा घ्यावा ५ सहज. ६ आकारास. ७ ह व क्ष या वर्णांनीं ८ पैठणें=बसणें. ९ एक हजार अजपाजप होईपर्यंत १० धैर्य. ११ चांगला. १२ सिद्ध करून.

आधिष्ठूनि दैवत । मग अंगुळद्वयाचें परिमित । साडिलें मागें ॥ ६६ ॥ मग परमानंदें करूनि । पिंडपद मागें साडूनि । चालिलों ऊर्ध्व भेदूनि । ब्रह्मांडवरि ॥ ६७ ॥ आतां तें ब्रह्मांडीं सहस्रदळ । कमळ असे सुगंध बहळ । त्याचें वर्तमान सांगिजेल सकळ । पुढिलिये कीर्णीं ॥ ६८ ॥ दिनकर रामीरामदास ह्मणे । ज्यासी सहस्रदळ असेल अवलोकणें । तेणें स्वानुभवदिनकरीं पाहाणें । सहजस्थिति ऐक्यता ॥ ६९ ॥ स्वस्ति श्रीस्वानुभवदिनकरे गुरुशिष्यान्वये दशम कळापे द्विदळचक्रनिरूपणं नाम चतुर्थ कीर्ण प्रकाश[1] ॥ ४ ॥ श्रीराम जयराम जयजयराम ॥

---

॥ श्रीराम ॥

आतां ब्रह्मस्थानीं सहस्रदळ । कमळ अत्यंत पराग बहळ । हरिहरब्रह्मादिकासी अतुळ । महिमा अगम्य जयाचा ॥ १ ॥ त्याची आइकोनियां थोरी । आनंदें स्वानुभवदिनकरीं । अग्निचक्राहूनि ब्रह्मरंध्रवरि । सोहं सिद्धि स्वानुभव ॥ २ ॥ करूनि निजहंसीं आरोहण । भेदू पाहे ब्रह्मस्थान । तंव तें स्थळ परम गहन । अपारपणें देखिलें ॥ ३ ॥ देखतां चि जालों भयभीत । चित्त अहंपणेंसीं विरमत । परि वाटतसे अति आर्त[2] । तें पाहावयासी ॥ ४ ॥ ह्मणौनि जावों पाहे पुढें । तंव जीवपण समुळीं बहुडे[3] । आत्मयासी हि साकडें । होतसे जेथ ॥ ५ ॥ जेथ जीवशिवा ऐसी गति जाली । तेथ आतां काइसेन[4] करावी बोली । जाणिवेची वार्ता बुडाली । अहंकारेंसीं ॥ ६ ॥ ऐसा घाबिरेपणें राहोनि स्तब्ध । बोलों विसरला वाचें शब्द । तेणें मग जाहालों निशब्दें[5] । त्रिपुटीसहित ॥ ७ ॥ गति खुटली मनाची । पवनु राहिला उगा चि । मां वरकड सैन्याची । कें[6] आशें[7] मग ॥ ८ ॥ सभोंवतें जंव पाहे । तंव ब्रह्मारण्य[8] दिसताहे । तेणें घाबिरेपणें निजदेह हें । खचों पाहतां ॥ ९ ॥ ह्मणौनि परतावया तांतडी । ज्यास्था

---

१ मागें पृष्ठ १४४ टीप १ पहा. २ आवड. ३ मागे सरे. ४ कोणत्या रीतीनें ५ शब्दरहित. ६ कोठें ७ आशा. ८ ब्रह्माशिवाय दुसरी वस्तु च दिसत नाहीं.

धरिली चोखंडी । तवं वळली वेंगेडी । जेथील तेथ ॥ १० ॥ मग अंतर जों पाहात । तव तें हि भयाचकित । तेणें टकमका पाहात । चहुकडे ॥ ११ ॥ अत्यंत विस्मयता वाटे । सर्व शरीरीं कंप सुटे । रोमांचित थरकटें । उभें राहिलें ॥ १२ ॥ सर्वांगीं स्वेदकणिका । उबरेल्या जेवि गगनीं तारका । हास्याचिया झुळुका । कांहींयेक ॥ १३ ॥ तव सवें चि आलें रुदन । गेला देहभाव विसरोन । तेणें सगद्गदें करून । अंतर दाटे ॥ १४ ॥ आनंदें करावें वाटे नर्तन । परि वृत्तीसी नाहीं सावधपण । ऐसा शक्तिपात गहन । वोडवला कीं ॥ १५ ॥ ऐसेन हि धरूनि आवांका । पुढें पाहें जव निका । तव देखिलें तिया कवतुका । न सगवे चि ॥ १६ ॥ तैसा चि बाबिरेपणें पाहे । तव शृंगारमय दिसताहे । सवें चि वीरवृत्ति हे । उद्भवली दिसे ॥ १७ ॥ तेणें भयभीत होऊनि । पाहे पुढें अवलोकूनि । तव करुणेचिया गगनीं । टाकिलें गमे ॥ १८ ॥ तैसा चि सावध होऊनि राहे । तव अद्भुत चि देखत आहे । देखोनि हासों पाहे । तव तें हि येतसे ॥ १९ ॥ सवें चि दिसे भयानक । तें चि पाहों बैसे कवतुक । तव दिसे क्षणयेक । बीभछ्वाणें ॥ २० ॥ मग निहाळूनि जव पाहे । तव शांतरूप चि देखत आहे । तेणें निज-अंतरीं होय । सुखसंतोष ॥ २१ ॥ ऐसें अंतर्बाह्य वाविरटें । भाव रस काष्ठद्वयें सघटे । तेथ श्रीगुरुस्मरणाग्नि प्रगटे । सश्रुतिवनदाहक ॥ २२ ॥ तो श्रीगुरुस्मरणाग्नि सहसा । प्रगटे स्वानुभवदिनकरा ऐसा । मग सस्वरूपीं तयाचिया प्रकाशा । रूढ होऊनि ॥ २३ ॥ श्रीगुरुस्मरणाचिया नेटें[10] । निजवृत्ति पाहे जव नेहटें[11] ।

---

१ निर्मळ, चांगली २ मुरकुंडी ३ अंतःकरण ? ४ कंप, रोमांच, स्फुराण, प्रेमाश्रु, स्वेद, हास्य, लास्य व गायन असे अष्टभाव उभे राहिले. ५ घर्मबिंदु. कणिका=कण, रज. ६ उभे राहिले ७ धैर्य ८ याप्रमाणें च नव हि रसयुक्त प्रदेश पाहिला. ९ अष्टभाव व नवरस, हीं च कोणी दोन काष्ठें, याचें संघर्षण सुरू झालें, त्याबरोबर जन्ममरणरूपी वनाचें दहन करणारा सद्गुरुस्मरणरूपी अग्नि प्रगट झाला. १० जोरावर, बळावर ११ लक्ष लावून पाहिलें

तवं तियें महारण्यीं गोमटें । देखिलें स्थळ येक ॥ २४ ॥ परि जावों न शके तया जवळी । मग दुरूनि च पुढें न्याहाळी । तव देखे येकवर्णकमळीं । सहस्रदळ ॥ २५ ॥ दिसे परम सुंदर मूर्धि-स्थान । वरी येकस्थंभी मंडप गहन । तेथ शोभती नाना वर्ण । सह-स्रदळीं ॥ २६ ॥ माजीं नित्यानंदाचें सिंहासन । निजतेजें देदिप्यमान । तयावरी आरोहण । श्रीगुरुमूर्तीचें ॥ २७ ॥ विश्वातीत असोनि विश्वीं व्यापक । आदिदेव निर्मळ निज निष्टंक । नित्य निरामय निष्कळंक । परात्पर ॥ २८ ॥ अनंता नामांचिया बडिवारा । वेद वाखाणू गेला येकसरां । सेवट नव्हे मग नेतिपणें लाजिरा । होऊनि ठेला ॥ २९ ॥ असो श्रीगुरुमूर्ति ययापरि । दुरूनि देखिली सर्वांगें साजिरी । अर्द्धांगीं शक्ति शोभे बरी । लावण्ययुक्त ॥ ३० ॥ सर्वांगशोभा मनोहर । काय उदेला स्वानुभवदिनकर । ब्रह्मस्वरूपपूर्णत्वाचा पार । न कळे कोण्हा ॥ ३१ ॥ आणिक कौतुक जवं पाहे । तव सरोवर येक पुढें आहे । पूर्णत्वें जळमेळित राहे । समसाम्यता ॥ ३२ ॥ तेथें हंसें आणि सारसें । चकोरें मयोरें राजसें । बदकें चक्रवाकें सम-रसें । क्रीडा करिती ॥ ३३ ॥ केळी दाटल्या सा तीन । नारेळी डोलती च्यारी दुगुण । सर्व हि वनस्पति मिळोन । तीन पांच ॥ ३४ ॥ येक पन्नासाचा मिळोनि बाग । लाविलीं झाडें अनेग । त्याची वेगळी च झगेमग । पाल्हाळेंपणें ॥ ३५ ॥ ऐसें स्थळ अति मनोरम । जेथ परमात्मया श्रीगुरूसी विश्राम । त्याचिया सुखें अविश्रम । सुख तयासी ॥ ३६ ॥ परि तेथ जावयास । गति न दिसे चि कोण्हास । येक तो योगाभ्यास- । वाचूनिया ॥ ३७ ॥ जेहीं केला मनोजय । साधिला पवनसमुच्चयें । भेदिलें बंदत्रयें । कुंडलिणीयोगें ॥ ३८ ॥

---

१ ळ वर्णाच्या आकाराचे कमळावर. २ मस्तक ३ निश्चित ४ कीर्ति, मोठे-पणा. ५ एकाएकीं. एकाकी, एकटा. ६ जलमय. ७ हे पक्षी ह्मणजे बावन मातृका. मागें पृष्ठ २५६ पहा. ८ अनेक. ९ झाक, झुळुक. १० विस्तारेंकरून. ११ पिंडींचे पांच व ब्रह्मांडींचें पाच वायु. १२ उड्डियानबंध, मूलबंध, जालंदरबंध.

अष्टांगे[1] साधनयोग साधूनि । पंचप्राण येकवटूनि । चतुर्दश ग्रंथी[2] भेदूनि । ब्रह्मरंध्रा गेले ॥ ३९ ॥ आता पचप्राणाची ऐक्यता । सागिजेल अन्वयें[3] स्वभावता । अपान आधारचक्रीं जो होता । तो कुडलिणीसगें ॥ ४० ॥ समानाचें आधिष्ठान । नाभिस्थानीं असे गहन । तेथ कुडलिणीसगें अपान । मणिपुरासी आला ॥ ४१ ॥ मग समान अपान मिळोनि । आले प्राणाजवळी हृदयभुवनीं । तेहीं व्यान सर्वांगींचा आकर्षूनि । तेथें चि आणिला ॥ ४२ ॥ मग चौघे हि मिळोन । आक्रमिलें कठस्थान । तेथें विशुद्धचक्रीं असे उदान । पाचवा वायु ॥ ४३ ॥ ते पिंडींचे पाच हि वायु मिळोन । करिती ब्रह्मांडवायूचें आकर्षण । नाग कूर्म कुकुर तथा जाण । देवदत्त धनजय ॥ ४४ ॥ नागवायु आकर्षिला मस्तकींहूनि । कूर्म श्रोत्रीं कुकुर नेत्रींहूनि । देवदत्त घ्राणीं जिव्हास्थानापासूनि । धनजय आकर्षिला ॥ ४५ ॥ ऐसे दशवायु कठीं येकवटोन । योगियाचे शरीरीं कुडलिणीसवें मिळोन । जाती ब्रह्मस्थान निजांशें भेदून । सहस्त्रदळश्वरी ॥ ४६ ॥ त्यात प्राणापानाची ऐक्यता । येक योगी करिती स्वभावता[4] । किं येक गतायुष्यें[5] जालिया तत्वता । ऐक्यता होय ॥४७॥ या उभयांवेगळी ऐक्यता । प्राणापाना न घडे सर्वथा । श्रोतीं कोपावेंना तत्वता । हें अप्रसगिक ह्मणौनि ॥ ४८ ॥ असो मनपवनसगें । पंचप्राण येकवटूनि हटयोगें । पाविजती स्वानदतडागें । अमृताचीं ते ॥ ४९ ॥ मग तें अमृत सेऊनि । अमर होइजे जव चद्र तरणी[6] । देह अक्षई[7] करूनि । राहिले सुखें ॥ ५० ॥ ते योगियावाचूनि कोण्हा । गति नव्हे तया स्थाना । जेथें विलसे श्रीगुरुराणा । परमात्मरूपें ॥ ५१ ॥ असो ळकार वर्ण जेथील अमळ । परिवेष्टित सहस्त्रदळ । मूर्ध्निस्थान केवळ । ब्रह्मरध्र जें ॥ ५२ ॥ परमात्मा

---

१ यमनियमादि. २ मार्गे सागितलेलीं सात मुख्य चक्रें व सात इतर चक्रें मिळून चवदा ३ व्याप्तिरूपानें ४ सहज रीतीनें, जिवत असताना ५ आयुष्य सपून हा जड देह टाकल्यावर ६ चद्रसूर्य प्रकाशमान आहेत तोंपर्यंत, आचंद्रार्क ७ नाशरहित.

मूळप्रकृति । विज्ञानाचिया आकृति । उन्मनी अवस्था स्थिति । निराभिमानें ॥ ५३ ॥ सदैव भोगणें निरानंद । निर्गुण गुणेंसीं प्रसिद्ध । आकाश तत्व महद । व्यान वायु ॥ ५४ ॥ निर्गुण सायुज्यता मुक्ति । अर्द्धमात्रेचिया सवित्ति । अपरा वाचेचिया युक्ती । निर्वेद पठण ॥५५॥ ज्ञानाग्निहोत्र असे नित्य । अयोध्यापुरीं वास्तव्य सत्य । यदर्थीं सुचलें येक साहित्य । वेदांतशास्त्रींचें ॥ ५६ ॥ ब्रह्मरंध्रादयोयोध्या । सहस्रारंतु तद्विदुवाक्य सद्या । सप्तचक्रानवद्वाराचेया । इया हेतुस्तव ॥ ५७ ॥ ळ मातृकेचिया उजेरी । प्रणवोच्चारें ब्रह्मस्थानवेऱ्हीं । सैन्य येक सहस्रवरि । आश्वासिलें पैं ॥ ५८ ॥ मग घटिका दोनि पळें सेताळीस । तैसीं च अक्षरें चाळीस । तेथ आह्मीं घेतलें विश्रांतीस । प्रणवपरमात्माश्रयें ॥ ५९ ॥ ऐसा सप्तस्थानेंसीं कोठ पन्नासिला । अंतर्बाह्य सर्व शोधिला । सैन्याचा विचार आणिला । मनासी जव ॥ ६० ॥ तव गणनां त्रिसप्तक । सहस्र आणि शत षट्क । परिवारला सम्यक । स्वानुभवदिनकरीं ॥ ६१ ॥ एव सकळ सैन्यसमवेत । जागणा त्रैअवस्थातीत । फिरोनि साठी घटिकात । निजस्थळासी आलों ॥६२॥ मग तेथ येऊनि क्षणेक । स्थिरावलों स्वस्थानीं कांहीं येक । आपुले ठाईं परम सुख । तिये वेळे मानिलें ॥६३॥ जेवि अल्प धनाचेनि व्याजें । अल्पकुं निजमानसीं माजे । कीं तो वोहळे गर्जे । अल्पोदकें ॥६४॥ किंवा तो अपूर्ण कुंभ । अथवा थिल्लरीचें जेवि अंभ । कां तो सरसावे कोंभ । सांबरीचा ॥ ६५ ॥ इयापरि आपुले ठाईं । लाहोनि पूर्णतेची नवाई । तेणें स्वसुखाचा डोहीं । बुचकळतसे ॥ ६६ ॥ मी येक सर्वगुणेंसीं सपन्न । भूमडळीं मी येक सज्ञान । या देहदुर्गीं बळकटपण । आजि माझें चि ॥ ६७ ॥ ऐसा ज्ञानाभिमानगर्वें । ह्मणे

---

१ उत्कर्ष, स्वस्थता. २ एक हजार अजपाजप होईपर्यंत. ३ शृंगारला. ४ २१६०० इतकी सख्या. ५ जागृत. ६ व्याज=मीष, निमित्त. ७ दरिद्री ८ उन्मत्त होतो. ९ उथळ पाण्याला खळखळ फार अशी ह्मण आहे. १० डबक्यांतलें. ११ पाणी. १२ साबरकाडें नावाचें कांटेरी झुडुप आहे त्याचा. १३ अपूर्वता.

मजसीं बोलतां कोण तडेवे । असिजे विद्यावैभवें । ठाईं माझे चि ॥ ६८ ॥ आतां श्रीगुरुपरिस मी चि थोर । ऐसा बोलोनि बडिवार । सज्ञानपणाचा गर्व फार । भरला आंगीं ॥ ६९ ॥ ऐसा ज्ञानाभिमानसुखेवाडें । विश्व मानिलें तृणाचेनि पाडें । ह्मणे इयें सपत्नीनसी कोडें । श्रीगुरूसी भेटों ॥ ७० ॥ ह्मणौनि चालिला लवेंडसवडीं । भेटी घ्यावयाचे तातडीं । सपत्तिजाताची परवडी । घेऊनि सगें ॥ ७१ ॥ तव तो श्रीगुरु न दिसे पुढें । हा मीपणेसीं पाहे चहुकडे । परि तो कोठें हि न सपडे । मीपणेसीं पाहातां ॥ ७२ ॥ पाहीन ह्मणौनि भांबावला । सकळ सैन्यें परिवारला । मुळींहूनि चालिला । शोध घेत पैं ॥ ७३ ॥ पाताळापासूनि वैकुंठवेऱ्हीं । मीपणें शोधी दशदिशाचा आवारीं । परि यया श्रीगुरूची वारी । न लभे चि कोठें ॥ ७४ ॥ ऐसा पडिला ब्रह्मारण्यांत । तऱ्हि चालिला शुद्धि घेत । तव सैन्यपरिवार समस्त । गळोनि गेला ॥ ७५ ॥ जेवि होतां द्वापारात । धर्में स्त्री आणि बधुसमवेत । निजधामा जाता मार्गांत । गळाली सर्व हि ॥ ७६ ॥ मग स्वदेहेंसीं धर्म । ऐक्यत्वें पावला निजद्दाम । तेवि याची गति निसीम । जालीसे पाहाता ॥ ७७ ॥ ज्ञानाभिमान समवेत । परिवार सैन्य होतें चालत । तें आटलें जेथील तेथ । येक मीपण उरलें ॥७८॥ मग जिकडे पाहे तिकडे । सारिखें चि दिसे चहुंकडे । मग मीपण हि होऊनि वेडें । चाकटेलें पैं ॥७९॥ तव कृपाळुवाचा राणा । श्रीगुरु सर्व देखणा । पैंबोनि शिष्याचिया निदाना । रक्षिलें कैसें ॥ ८० ॥ आधीं दिधलें नामनिशाण । भजनाचें अभयपत्रदान । सोहमुद्रांकित चिन्ह । स्वानुभवदिनकरीं ॥८१॥ तें लाधोनिया जाला सावध । पाहों इछी श्रीगुरुनिजपद । विगळित ज्ञानमद । होऊनि ठेला ॥ ८२ ॥

---

१ तडणें=त्रासून बोलणें. २ ज्ञानाभिमानाच्या स्वाधीन होऊन. ३ मोलानें. ४ कौतुकानें. ५ लगबगीनें. ६ प्रकार, उपचार. सर्व प्रकारची सपत्ति बरोबर घेऊन ७ धर्मराज. ( दासबोध ४-१०-७ ) ८ धर्मराजाखेरीज बाकीचे सर्व पाडव. ९ चकित झाले. १० प्रसन्न होऊन.

आतां पुढिलिये कळापकीर्णीं। श्रीगुरुकृपा लाधोनि। चतुर्विध ज्ञान पावोनि। स्वानुभवदिनकरीं ॥ ८३ ॥ लाधोनि चतुर्विध ज्ञान। देहचतुष्टयनिर्शन। महावाक्याचें विवरण। पंचीकर्णेंसीं ॥ ८४ ॥ तेथ अन्यथाज्ञानेंसीं अज्ञान। निरसूनि प्राप्त होईल ज्ञान। पावोनि सहजस्थिति विज्ञान। दिनकर रामदासीं ॥ ८५ ॥ स्वस्ति श्रीस्वानुभवदिनकरे गुरुशिष्यान्वये दशम कळापे सप्तमचक्रविवरणं नाम पंचम कीर्ण प्रकाशः ॥ ५ ॥ येकुण कळापवोवीसख्या ॥३७१॥ श्रीराम ॥

---

## ॥ चतुर्विध ज्ञान कळाप अक्रावा ॥ ११ ॥

### ॥ श्रीरामचंद्र समर्थ ॥

ॐ नमो जी श्रीगुरु दातार। आद्यंत अवघा तूं चि साचार। हें हि ह्मणतां जी माझें अंतर। कंपायमान होतसे ॥ १ ॥ कां जे तुजवीण दुसरें देखावें। मग तुज आदि अंत कल्पावें। तरि स्वामी दुसरेंपण तुवां आघवें। निर्शन केलें पहिलें चि ॥ २ ॥ ह्मणौनि जी आदि मध्य अंत। नेणोनि बोले स्वरूपप्रांतें। तूं मुळींचा अनादि अनंत। हें विसरलेंपणें जी ॥ ३ ॥ जेवि कां येकांतीं बैसोनि तो निदैवें। करी स्वयें अमरावतीची राणीवें। तेवि जी तुज न जाणोनि स्वयमेव। नानापरी भावितसे ॥ ४ ॥ का तें मश्यक नेणोनि आपुलें मानें। करूं धावे मेरूचें गणन। कीं तें घुंगरडुं आक्रमी गगन। स्वसामर्थ्य नेणुनी ॥ ५ ॥ किंवा खद्योत न विचारूनि स्वतेज। घालू पाहे दिवाकरेंसीं पैज। तेवि जी मी तुज नेणोनि सहज। पाहातसे आद्यंत ॥६॥ तरि जी या प्रकारें विजातीयेंपणें। तूतें सहसा न घडे जी पाहाणें।

---

१ अन्यथाज्ञान, अज्ञान, ज्ञान व विज्ञान. २ पिंडाचे चार देह. ३ कारण, आदीं अंतीं तूं च आहेस असें ह्मटल्यानें, मध्यें तुजपेक्षां कोणीतरी निराळा आहे असें कल्पावें लागेल, परंतु तुझी खरोखर अद्वैत स्थिति आहे ४ स्वरूपमर्यादा. ५ दुर्दैवी प्राणी, भिकारी. ६ राज्यसुख. ७ शक्याशक्य विचार. ८ काजवा. ९ तुजपेक्षां निराळा राहून.

आकाशा पाषाणा ऐक्य होणें । कधीं हि न घडे जी ॥ ७ ॥ तेवि जी मी येक तुजवेगळेपणें । आद्यत अवघा तू चि ह्मणें । जेवि का मोतीं फोडूनि दीजे सादेंणें । बिलोराचें तया ॥ ८ ॥ अथवा सूर्य मळ-ळासे ह्मणौन । कोळिसेन पाहिजे उजळून । कां तें द्विधा करूनि आधीं गगन । मग अभ्रथिगळ देइजे ॥ ९ ॥ तेवि तू जो अनादि अप्रमेय अनत । त्या तुज मी वेगळेपणें पाहातसे आद्यत । तरि या अन्यायासी जी प्रायश्चित्त । न उपजेल कैसें ॥ १० ॥ पाहातां मुळीं च तू अनादि । ह्मणौनि तुजहूनि काहीं नसे आदि । अप्रमेयत्वें प्रमाणसि-द्धि । स्वरूपीं न दिसे ॥ ११ ॥ स्वरूपाचा न कळे सहसा अत । ह्मणौनि जी तुझें नाम अनत । त्या तुज मी न जाणूनि आद्यत । न कळोनि पाहातसे ॥ १२ ॥ तरि जी दयाळा हा महदन्याय । जाणोनि ऐक्यता स्मरें तुझे पाय । तेणें अवश्य क्षमापनीय । करणें लागे तुह्मां ॥ १३ ॥ ऐसें ह्मणता लज्जायमान । चाकाटोनि विस्मित अत:करण । मुळीं मीप-णेसीं अन्याय न विचारूनें । क्षमा करा ह्मणे तुह्मां ॥ १४ ॥ आधीं तूपण मीपण कल्पावें । मग अन्याय क्षमा करा ह्मणावें । परि मीं तू हें सहजस्वभावें । पहिलें चि निर्शिलें ॥ १५ ॥ आता नसतें धरूनि कठीणपण । उदकीं झगटू जाय जेवि लवण । तव स्वजातीयत्वें आपणासी आपण । मुलोनि जाय तत्काळ ॥ १६ ॥ का ते जळगारा गगनींहूनि सुटे । कठीणपणें सागरीं झगटे । तव आपणा विसरोनि प्रगटे । उदक चि अवघें ॥ १७ ॥ तेवि नसतें मीपण धरूनि । आद्यत पाहे तुजलागूनि । तें उपसाहिजो जी ऐक्यपणीं । श्रीगुरु कृपा-ळुवा ॥ १८ ॥ तरग तरगपणें गाजे । स्वयें समुद्र ह्मणतां लाजे । तेवि मी आद्यत पाहे स्वरूप तुझें । तें उपसाहिजो जी ॥ १९ ॥ ऐसा निजात्मस्थितीं स्वानुभवदिनकर । बोलता आद्यत श्रीगुरु दातार । रामदासीं

---

१ साधणें, जोड. २ प्रमाणास अतीत तें. ३ अपनयन=दूर करणें, नाहींसें करणें. महदन्याय क्षमा करून त्याचें निर्मूलन करावें लागेल. ४ चकित होऊन. ५ आधीं 'मी अन्यायी' असें ह्मणणें च मुळीं खोटें. ६ खोटें. ७ क्षमा करावी.

निजऐक्यता साचार । सहजस्थिति ऐक्यत्वें ॥ २० ॥ असो ऐसिया प्रकारें सहजस्थितीं । दिनकरें बोलता आत्मसंवित्ति । स्वानुभवदिनकरानुवृत्तिं[२] । रामदासीं निजऐक्य ॥ २१ ॥ ऐसें शिष्य लडिवाळपणें । निजऐक्यता ऐकोनि बोलणें । श्रीगुरु पूर्ण कृपावलोकनें । आळगिजे प्रीतीं ॥ २२ ॥ आलिंगूनि बोलिजे कृपावचन । ऐक गा शिष्या सावधान । तुज अपेक्षा[३] असेल जे गहन । ते बोल पा निशंक ॥ २३ ॥ ऐसें ऐकता कृपावचन । शिष्य सद्भावें घाली लोटांगण । ह्मणे जी कृपाळुवा अतरसाक्षी पूर्ण । करुणाकर दीनाचा ॥ २४ ॥ तरि जी अन्यथाज्ञान ह्मणिजे काय । आणि अज्ञानाची कैसी सोय । आणि ज्ञानलक्षणाचा अन्वय । विज्ञान तें काय ह्मणिजे ॥ २५ ॥ ज्ञानाभिधान तत्व मुळींचें येक । आणि चतुर्धा विभागलें किमात्मक । काय मुळीं चि यासी असे वेगळिक । किं वरिच्यावरि फांकलें हें ॥ २६ ॥ काय हें येक चि असोनि नामें च्यारि । पावले वेगळवेगळेपरी । किं स्वसंवेद्यें[४] चहु प्रकारीं । भिन्न चि असे हें ॥ २७ ॥ ऐसा शिष्यज्ञानास्तहृदयसाजवेळे । संदेहरूप आशंकातम खवळे । तव प्रबोधचद्रोदय उदेला सोज्वळें । गुरुकृपापूर्णिमेसी ॥ २८ ॥ त्याचा प्रकाश नित्य निरस्तें[५] । स्वानुभवदिनकराऐसा उद्यत[६] । होऊनि शिष्यसंदेहतम विध्वसित । चमत्कार सिद्ध ॥ २९ ॥ जें ज्ञान ब्रह्मादिकांसी दुर्लभ । वेद नइतिपणें जेथ स्वयभ । शंकरासी परम वालभ[७] । आत्मज्ञानविषईं ॥ ३० ॥ ज्या ज्ञानें विष्णूसी सुखसमाधी । सनकादिका निजसुखावधी । ब्रह्मर्षिदेवर्षिराजर्षिवृंदीं । सुख पाविजे ज्या ज्ञानें ॥ ३१ ॥ सिद्ध साधु संत महत । सांख्यज्ञानी हटयोगी अनत । सुर नर वानर जे[८] समस्त । ज्ञानीं विश्रांति पावती ॥ ३२ ॥ असो ऐसें ज्ञान अति समर्थ । ज्ञानें साजिरा प्रपच परमार्थ । आब्रह्मादि होइजे कृतार्थ । जया ज्ञानविचारें ॥ ३३ ॥ जया ब्रह्मज्ञानविचारासाठीं । गुरुशिष्यत्वाची

१ आत्म्याचें ज्ञान २ अनुवृत्ति=अन्वय=व्याप्ति. ३ इच्छा. ४ ज्ञानस्वरूप वस्तु. ५ अस्तरहित. ६ उद्युक्त. ७ आवड, प्रीति. ८ याचा सबध 'ज्ञानीं' या शब्दाकडे.

परिपाठी । नाना साधनीं साक्षेपें संकटीं । आत्मज्ञान साधावें ॥ ३४ ॥ रिघावें सद्गुरूसी शरण । विचारावें शुद्ध आत्मज्ञान । तेणें चुके आकल्प जन्ममरण । गर्भवासादि यातना ॥ ३५ ॥ ऐसें जें आत्मज्ञान अति अगाध । ज्या ज्ञानें साधक चि होती सिद्ध । आत्मज्ञानेवीण केवळ बद्ध । संसारबंधनयोगें ॥ ३६ ॥ मी[2] आणि माझेपणें भांबावला । नाना संसारसुखें सुखावला । आत्मज्ञानविचार नसे ज्याला । तो प्राणी बद्ध बोलिजे ॥ ३७ ॥ ऐसें जाणोनिया अवश्यक । आत्मज्ञान विचारणें सम्यक । सारासारविचारें करी विवेक । मुमुक्ष बोलिजे तयासी ॥ ३८ ॥ मग सद्गुरूसी शरण रिघोनि । पचीकर्ण महावाक्य विचारूनि । साधन-चतुष्टयें आत्मज्ञान साधूनि । या नांव बोलिजे साधक ॥ ३९ ॥ वेरि[3] तें चि ज्ञान स्वरूपसमावेशें । महावाक्याचिया स्वयप्रकाशें । ब्रह्मानुभव घेऊनि सुखसंतोषें । परब्रह्म चि स्वतसिद्ध ॥ ४० ॥ ह्मणौनि ज्ञान नसतां केवळ बद्ध । ज्ञानानुभवें साधक चि सिद्ध । तें आत्मज्ञान सांगि-जेल शुद्ध । चतुर्विध प्रकारें ॥ ४१ ॥ तेथ विपरीत भावना तें अन्यथा-ज्ञान । केवळ नेणपण तें अज्ञान । स्वरूपजाणीवेसी ह्मणावें ज्ञान । विज्ञान तें लयस्थिति ॥ ४२ ॥ तेथ प्रथम जें कां अन्यथाज्ञान । त्याचें जाणिजे एवविध लक्षण । जेवि कां तो चित्रीं प्रदीप्त हुताशन । परि तापन पाचन न घडे ॥ ४३ ॥ धगधगीत पैं अति तेजाळा । धूम्र-रहित दिसती ज्वाळा । परतु तापनपाचनादि उष्ण कळा । तेथ न दिसे कदापि ॥ ४४ ॥ तेवि अन्यथाज्ञानासी नामाभिधान । जेवि कां मेखळेचा सिंह विराजमान । अत्यत आवेशें चवडा उभारी गुण-। परा-क्रमविवर्जित ॥ ४५ ॥ कां तें गगनीं इद्रधनुष्य निघालें । परि शर-

---

१ गुरूचें गुरुत्व व शिष्याचें शिष्यत्व तेव्हा च सार्थ ह्मणावें, की जेव्हां ते दोघे हि ब्रह्मज्ञानविचारांत सदैव निमग्न राहतील. २ खालील चारी अवस्थांच्या व्याख्या ध्यानात ठेवण्यासारख्या आहेत. ३ शिवाय, आणि. ४ आत्मज्ञान आपल्या स्वतःच्या ठिकाणीं पूर्णपणें बाणून घेऊन ५ सदैव ब्रह्मानदात निमग्न राह-णेची स्थिति ६ विपरीत ज्ञान. ७ योगीजन आपल्या आसनाकरितां किंवा अंगावर घेण्याकरिता व्याघ्र अगर सिंहचर्म घेतात त्याला मेखळा ह्मणतात.

सधानेंवीण व्यर्थ गेलें । तेवि अन्यथाज्ञानासी वाखाणिलें । ज्ञानाचिया अभिधानें ॥ ४६ ॥ कां तो गधर्वनगरीचा हुडा[२] । तत्काळ खचे न होता झगडा । किं रात्रीं उदकामाजीं नक्षत्रसडा । दिनोदयपर्यंत ॥४७॥ कां तो बहुरूपीचा रामदेराव । असत्य परि सत्यत्वें दाखवितां टेवं[३] । अथवा हस्ति करूनिया स्वयमेव । कुंभार दाखवी वरापुढें ॥ ४८ ॥ तेवि अन्यथाज्ञानासी नामाभिधान । नेणोनि बोलती ते अज्ञान । जेवि वध्यापुत्रें सस्याचें सिंग मोडून । गगनाचें नाक टोंचिलें ॥ ४९ ॥ तैसें हें अन्यथा ह्मणिजे केवळ लटिकें । असत्यपणें चि भासे अँसकें[४] । स्थूळ सूक्ष्म देहद्वयात्मकें । त्यासी अन्यथाज्ञान बोलिजे ॥ ५० ॥ अन्यथा ह्मणिजे ज्ञानेसीं विपरीत । भास भासला जो अशाश्वत । स्थूळ-सूक्ष्मत्वें विलासत । देहद्वय कार्यरूपें ॥ ५१ ॥ हें देहद्वयात्मक अन्यथा-ज्ञान । कार्यरूपें याचें कारण अज्ञान । जेवि बीजतरुभावें कार्यकारण । व्यष्टिसमष्टिरूपें[५] ॥ ५२ ॥ अज्ञान बीज अन्यथाज्ञान तरु । अज्ञान सुवर्ण अन्यथाज्ञान अळकारु । अज्ञान पृथ्वी अन्यथाज्ञान घटाकारु । कारणकार्यरूपें ॥ ५३ ॥ तेथ बीजापासूनि जैसा निफजे तरु । कीं पृथ्वीमाजीं घट सुवर्णी अळंकारु । तेवि अज्ञानीं निफजे देहद्वयाकारु । त्यासी अन्यथाज्ञान ह्मणावें ॥ ५४ ॥ तें अन्यथाज्ञान देहद्वयात्मक । पन्नासा[६] तत्वीं पचभौतिक । कार्यरूप हें याचें कारण निश्चंकं[७] । तें अज्ञान परिछिन्न ॥ ५५ ॥ आता तें अज्ञान किमात्मक । तें हि सागिजेल सकौतुक । जेवि वध्यापुत्राचें केलें जातक । गधर्वनगरवासियें[८] ॥ ५६ ॥ का ते नेत्रद्वयांतील बाहुला बाहुली । त्यांची तीळपुतळीनें[९] सोयरीक केली । आणि त्याची मिरवणूक काहाडिली । गधर्वनगरामाजीं पैं ॥५७॥ अथवा मृगजळा पूर आला । तेथें वध्यापुत्र पोहोन गेला । आणि आरिस्यातिल पुरुष बुडाला । तये नदीमाजीं ॥ ५८ ॥ कां जेवि

---

१ नावानें. २ बुरुज ३ सोंगाची बतावणी. ४ असिकें, सर्व. ५ पिंडब्रह्मां-डरूपानें. ६ प्रत्येक देहाची पचवीस तत्वें याप्रमाणें. ७ निश्चयेंकरून. ८ आकाशातील ढग हें च कोणीएक नगर, त्यात राहणाऱ्या लोकानीं, ह्मणजे लटक्या लोकानीं. ९ नेत्रांतील काळा बिंदु त्यास तीळ ह्मणतात.

सध्यारागें साक्षेपें । तोडूनि गगनाचीं पुष्पें । गुफूनि भरिलीं खोपे । वध्यापुत्रवधूचे ॥ ५९ ॥ तेवि अज्ञानाचें साकल्य रूप । सागतां कौतुक वाटे अमूप । नाहींपणें चि मिथ्या आरोप । जळतरगवत ॥ ६० ॥ तथापि अज्ञानाचें रूप काहींयेक । आठवलें तें सांगों कौतुक । आपणासी आपण नेणणें जें निष्टक । तया नांव अज्ञान ॥ ६१ ॥ आपण मुळीं परब्रह्मींचा अश असोन । नसतें चि धरी जीवपण । केवळ नेणिवेमार्जी राहे दडोन । यासी अज्ञान बोलिजे ॥ ६२ ॥ जेवि कां स्वप्नामाजीं ब्राह्मण । अत्यजगृहीं करी भोजन । कीं तो राजा रक होऊनि भिक्षाटण । घरोघरीं करितसे ॥ ६३ ॥ तेवि सस्वरूपीं विसरलेपणें । मी जीव माझें हें सर्व ह्मणे । ससारीं गुतोनि करी प्रपंचसूचने । या नांव अज्ञान बोलिजे ॥ ६४ ॥ का तो शुक बैसतां नळिकेवरी । नळी फिरे मग आधिकें आवरीं । अर्धा तोडूनि नेला जन्हि । तन्हि न सोडी नळिकेतें ॥ ६५ ॥ तेवि प्राणी मिथ्या संकल्पें बाधला । मीमाझेपणें भांबावला । केवळ नेणपणें सैरा भ्रमला । या नाव अज्ञान ॥ ६६ ॥ नरदेहाऐसें लाधोनि रत्न । सत्सग न धरी करूनि प्रेत्न । न करी आत्मज्ञानविचाराचा यत्न । या नाव अज्ञान ॥६७॥ तरी नरदेहासी आला जो प्राणी । तेणें सत्सग धरावा यत्न करूनि । तेथ सद्गुरूसी शरण जाऊनि । आत्मज्ञान साधावें ॥ ६८ ॥ ससारयातना परम कठिण । अंतीं नरकपात अति दारुण । ऐसें जाणोनियां परिछिन्न । आत्मज्ञान साधावें ॥ ६९ ॥ वैराग्य करावें विवेकयुक्त । सत्कर्म धर्म यथोचित । भक्तिउपासनेसहित । आत्मज्ञान साधावें ॥ ७० ॥ तें आत्मज्ञान किलक्षण । त्याचें सांगिजैल निरोपण । उत्तम पाहोनि गुरुअधिष्ठान । वर्णाश्रमधर्मेंसीं ॥ ७१ ॥ भक्तिज्ञानवैराग्ययुक्त । स्वधर्माचरण शास्त्रविहित । सत्कर्मश्रेणी यथोचित । आचरणीय सर्वस्वें ॥ ७२ ॥

---

१ उत्कंठेनें, प्रयत्नानें. २ वेणीच्या वुचड्यात. ३ नित्यानित्यविचारयुक्त विरक्ति. ४ गुरूचा आश्रय. ५ एकामागून एक सत्कर्में घडत आहेत ज्याकडून.

ऐसया सर्वज्ञ श्रीगुरूसी । शरण रिघोनि निजभावेंसीं । विचारू- नियां मुख्य देवासी । मी कोण हें पुसावें ॥ ७३ ॥ तेथ सद्गुरु अभयकर उभारून । ह्मणतिलें शिष्या सावधान । ब्रह्माहमस्मि वाक्य[2]प्रमाण । गुरुआत्मशास्त्र[3]प्रचिती ॥ ७४ ॥ करूनि देहचतुष्टय- निरशन । जीवपणेंसीं छेदूनि अहपण । लाऊनि स्वरूपीं अनु- संधान । आत्मज्ञान[4] यासी बोलिजे ॥ ७५ ॥ मी ब्रह्म ऐसें महावाक्य- प्रमाण । याचें दृढ करावें विवरण । जालिया विकल्पछेदन । आत्मज्ञान बोलिजे ॥ ७६ ॥ अविद्याझोंपें होता जाकळला । तेथ अज्ञानें जीव- स्वप्न देखिला । तो ब्रह्मस्मरणें अकस्मात जागा जाला । या नांव ज्ञान बोलिजे ॥ ७७ ॥ मग शनै शनै अनुसंधानीं[6] वृत्ति[5] । सस्वरूपाची होता संविति । ब्रह्माकार स्फुरे स्फूर्ति[7] । यासी ज्ञान बोलिजे ॥ ७८ ॥ जेवि कष्टासी होतां अग्निस्पर्श । काष्टपण जळोनि अग्नीचा चि प्रकाश । तेवि ब्रह्माकार होता वृत्तीस । यासी ज्ञान ह्मणावें ॥ ७९ ॥ का ते भृंगदर्शे[8] तृणअळिका । वेधमात्रें भृंग होय देखा । तेवि ब्रह्मीं वृत्ति जालिया समरसिका[9] । आत्मज्ञान बोलिजे ॥ ८० ॥ मग तो इधनीं जैसा अग्नि लागला । इधन जाळूनि स्वयें प्रकाश जाला । पुढें जाळावया न दिसे मग आपणाला । भक्षी फिरोनि मागुता ॥ ८१ ॥ तेवि आत्मज्ञान प्राप्त जालयां । अन्यथाज्ञानेंसीं अज्ञान जाय विलया । मग ज्ञान हि हळु हळु जाऊनि लया । विज्ञानस्थिति प्रगटे ॥ ८२ ॥ जेथ ज्ञानाचा होय विलय । त्यासी विज्ञान ह्मणावें हा निश्चय । लोणी

---

१ सद्गुरूस शरण गेल्यावर त्यांना काय पुसावें? तर श्रीसमर्थ सांगतात, त्यांना दोन गोष्टी पुसाव्या. आधीं मुख्य देव तो कोण । मग आपण भक्त तो कोण । पंचीकर्ण माहावाक्यविवरण । केलेंचि करावें ॥ दास. १२–३–५. सकळ केलियाचें सार्थक । देव वोळखावा येक । आपण कोण हा विवेक । पाहिला पाहिजे ॥ ९–१०–१३. २ महावाक्य. ३ प्रतीति=अनुभव, साक्षात्कार, तो तीन प्रका- रचा आहे. ४ दासबोध द. ५ स. ६ यांत आत्मज्ञानाचें लक्षण आहे तें पहावें. ५ व्यापला. ६ ध्यानामध्यें. ७ स्फुरण. ८ भृंगकीटकन्याय ह्मणतात तो. ९ एकस्वरूप.

कढवितां घृत परिपक्क होय । तें नाशेचिना जेवि ॥ ८३ ॥ तेवि ज्ञानासी आलियां पक्कता । तें विज्ञान बोलिजे स्वभावता । आंबा कोंडी-सी लागलिया मधुरता । प्रगटे आधिक ॥ ८४ ॥ असो जळीं लवण विरोनि गेलें । परि क्षारतेसीं होतें उरलें । तें हि हळु हळु मधुरता आंतलें । या नाव विज्ञानस्थिति ॥ ८५ ॥ अज्ञानकर्पुरीं ज्ञानवन्हि । लागतां स्वयप्रकाशें प्रगटोनि । सवें चि कर्पूर काजळी ना अग्नि । या नाव विज्ञान बोलिजे ॥ ८६ ॥ एवं चतुर्विध प्रकारें येक ज्ञान । सागि॰तलें यथाविभागें परिछिन्न । आता याचें साकल्य पुढें निरूपण । यथा-न्वयें सांगिजेल ॥ ८७ ॥ अन्यथाज्ञान देहद्वयेसीं । तथा अज्ञान कारणदेहेसीं । तैसें चि ज्ञान महाकारणेसीं । विज्ञानसहित ॥ ८८ ॥ ऐसा कार्यकारणरूपें ज्ञानतरु । अन्यथाज्ञानेसीं अज्ञान याचा विस्तारु । विज्ञानफळेंसीं लगडला अपार । आब्रह्मपर्यंत ॥ ८९ ॥ यया तरूवरी दिसे विश्व गुफलें । कोण्ही विरुळे तरुमूळीं लिगटले । त्याहिमाजीं कोण्ही फळीं झोंबिले । कित्तेक फिरती वरिच्यावरी ॥९०॥ अन्य वृक्षीं मुळाकडूनि अग्रासी जाणें । तैसें नव्हे या वृक्षाचें देखणें । येथें अग्रा-कडूनि मुळासी येणें । ह्मणिजे तत्काळ हा फळप्रद ॥ ९१ ॥ तेथ देह-द्वयात्मक अन्यथाज्ञान । याचें पुढिला कीर्णीं कीजेल निरोपण । पुढें अनुक्रमें अज्ञान ज्ञान विज्ञान । यथान्वयें सागिजेल ॥ ९२ ॥ दिनकर रामींरामदासीं । अनन्य कायावाचामनेंसीं । स्वानुभवदिनकरीं ऐक्यतेसीं । सहजस्थिति विलसे ॥ ९३ ॥ स्वस्ति श्रीस्वानुभवदिनकरे गुरुशिष्यान्वये येकादश कळापे चतुर्विधज्ञानलक्षणनिरूपण नाम प्रथम कीर्णे प्रकाशः ॥ १ ॥

---

॥ श्रीराम ॥

आतां पूर्वकीर्णप्रासादशिखरीं । चतुर्विधज्ञानरत्नप्रभा साजिरी । ते चि अन्यथाज्ञानमय वक्ष्माण कीर्णावरि । प्रभा फाकली सतेज ॥१॥

---

१ झाडावर च पक्क होऊं लागला तर. २ आतणें=स्पर्शणें. ३ क्वचित्. ४ प्रासाद=मंदिर. ५ चालू.

ते चि प्रमेचा धरूनि अन्वयें। अन्यथाज्ञानात्मक जें देहद्वय। पन्नास तत्वें मिळोनि समुदाय। पचभूतीं उभारलें ॥ २ ॥ तेथ पचीकृत प्रकारें यथान्वय। पचभूतात्मक देहद्वय। कार्यकारणत्वें समकाय। स्थूळ आणि सुक्ष्म ॥ ३ ॥ प्रथम कार्यरूप स्थूळदेह। त्याचें कारण जाणिजे सुक्ष्म देह। तेथ आधीं पचभूतांचा समूह। यथाक्रमें सागिजेल ॥ ४ ॥ आकाश वायु तेज उदक। पृथ्वि एवं भूतपंचक। येकयेका भूतीं तत्वपचक। यथाक्रमें सागितलीं ॥ ५ ॥ तेथ काम क्रोध शोक मोह भय। हा गगनतत्वपंचसमुच्चय। चळन वळन प्रासारण आकोचन निरोधान्वय। वायुतत्वपंचक ॥ ६ ॥ क्षुधा तृषा आळस्य निद्रा मैथुन। हें तेजतत्वें पांच मिळोन। लाळ मूत्र शुक्र श्रोणित मज्जा एव मिळोन। उदकाश पांच ॥७॥ अस्थि मास त्वचा नाडी रोम। हा पृथ्वीपचतत्वोद्गम। एव मिळोनि पचवीसतत्वकर्दम। पंचभूत स्थूळदेह ॥ ८ ॥ स्थूळदेह अवस्था जागृति। विश्वअभिमानी नेत्रस्थानीं वस्ति। स्थूळभोग रजोगुण क्रियाशक्ति। अकारमात्रा प्रणवजन्य ॥ ९ ॥ सांगितलीं पचवीस तत्वनामें। आता कैसीं स्वरूपें आणि कर्में। तें सांगिजतील यथाक्रमें। आद्यंत अवघीं ॥ १० ॥ तेथ गगनाचा प्रथम गुण काम। कदर्परूप जो व्यापक निसीम। चरांचरीं प्राणिमात्राचा उद्गम। ज्याचेनि योगें ॥ ११ ॥ त्रैलोक्यावरी ज्याचें शासन। जेणें शंकरादिक केले दीन। अमरेपतीसी सहस्र नयन। जयाचेनि योगें ॥ १२ ॥ नारदासी जेणें धाबिरें केलें। विष्णूसी लछन लाविलें। चंद्रासी प्रयत्नें भोगविलें। गुरुपत्नीसी ॥ १३ ॥ थोर थोर रुषी छळिले। पुरश्चरणी अपाई घातले। चतुराननांसी भ्रशविलें। बुद्धीपासूनि ॥ १४ ॥ असो ज्यायोगें प्राणीमात्र उत्पन्न। शिस्नेंद्रिंई ज्याचें अधिष्ठान। ज्यासी विषयभोगाची आगवण। त्रैलोक्यापरती ॥ १५ ॥ ज्यासी धैर्यवत हि

---

१ व्यासि, सदर्प. २ सम आहे काया ह्मणजे शरीर, रूप ज्याचें असे स्थूल व सूक्ष्म असे दोन देह. ३ भोगेच्छारूप. ४ स्थावरजगम सृष्टीमध्यें. ५ इंद्रास. ६ ब्रह्मदेवास. ७ इच्छा.

चळीं कांपे । जेणें योगी छळिले प्रतापें । ययापासूनि अति सांक्षेपें । विरळागत निघाले ॥ १६ ॥ ऐसा हा परम प्रतापी काम । जो जगदीशाचा अंश निभ्रम । यदर्थीं दशमाध्याईं पुरुषोत्तम । भगवद्गीतेमाजीं बोलिला ॥ १७ ॥ असो ऐसा स्थूळदेहीं प्रथम । गगनाचा गुण जाणिजे काम । शबळ अंतःकर्ण जें निसीम । तें चि रूप जयाचें ॥१८॥ असो यानतर गगनीं गुण दुजा । क्रोध जाणावा पैं वोजा । धीरवीरशूरांवरी घेऊनि पैजा । जीणावया धावतसे ॥ १९ ॥ शातादांतांवरि ज्याचा प्रताप । कृपेदयेवरि परम सांटोप । काम पूर्ण न होतां खटाटोप । त्रिभुवनीं ज्याचा ॥ २० ॥ मज पाहोंतां जें सबळ मन । तें चि रूप ज्याचें परिछिन्न । भ्रूमध्य ज्याचें निवासस्थान । भ्याडावारि बळ ज्याचें ॥ २१ ॥ असो हे अतरीं काम क्रोध खवळता । स्वधर्मासी पळ सुटे स्वभावता । सत्कर्म थरथरा कांपे तत्वता । पुण्य उभ्यां चि प्राण सांडी ॥ २२ ॥ धैर्याची मुरकुंडी वळे । शांति ठाईंचा ठाईं च गळे । विवेक हातोहातीं पळे । जिकडील तिकडे ॥ २३ ॥ ज्यासी देखोनि क्षमा भयभीत । दया उपरति अति लज्जित । सतोष बारावाटीं पळत । सुखास हि ते चि दशा ॥ २४ ॥ पाप ज्याकरितां सबळ । निंदाद्वेषादि अतुर्बळ । तृष्णा कामना होती प्रबळ । ज्याचेनि संगें ॥ २५ ॥ ह्मणौनि सत्संग धरावयासी कारण । जेयाचें जालें पाहिजे शांतवन । श्रवण मनन अध्यात्मनिरूपण । विवेकयुक्त ॥ २६ ॥ असो आकाशीं तिजा शोक गुण । जो शबळ बुद्धि त्याचें सांगिजेल लक्षण । तारें ससारीं कांहीं होता चि विलक्षण । शोक उत्पन्न होये ॥ २७ ॥ स्वशरिरासी कांहीं दुःख होतां । अथवा कुटुंबींचें कोण्ही नाशतां । कठगत उत्पन्न होय स्वभावता । तो शोक शबळ

---

१ प्रयत्नानें. २ प्रजनश्चास्मि कदर्पः । गीता १०–२८. ३ औपाधिक, विकारयुक्त. ४ वोजें=उत्तम, शुद्ध, स्वच्छ. ५ दांत=इंद्रियदमन करणारे. ६ अति नेट. ७ पाहणारें. ८ बलयुक्त. ९ अगणित, बलाढ्य. १० ज्या क्रोधाचें. ११ मृत झालें असतां.

बुद्धि ॥ २८ ॥ यानंतर गगनीं चौथा मोह गुण । जो केवळ शबळ चित्त जाण । ज्याचे सांगता असाधारण । गुण पराक्रम ॥ २९ ॥ जेणें सचराचर प्राणियांचा । समूह धरिला[१] असे साचा । साटोप[२] ज्यामाजीं विश्वाचा । ममतेचिया योगें ॥ ३० ॥ माझी स्त्री माझे पुत्र गृह धन । सकळ परिवार सुहृदजन । इष्टमित्र सोयरे बंधुगण । प्रपंचपरमार्थीं ॥ ३१ ॥ ऐसा माझेपणें सर्व संजोगी । विकळ होता प्राण त्यागी । या नाव मोह जाणिजे जगीं । ज्याचें मुखामाजीं वास्तव्य ॥ ३२ ॥ आतां भय जो का पांचवा गुण । ज्याचें हृदईं निवासस्थान । कांहीं अन्याय कारितां होय निर्माण । स्मरण नसता हि ॥ ३३ ॥ अथवा शत्रूचें होता प्रदीपन । किंवा घातपातें होता छळण । किं काळगतीं पडता आवर्षण । अंतरीं निर्माण होय जें ॥ ३४ ॥ किंवा तो राजविग्रह[३] होतां । किं अकस्मात अग्नि लागता । किं नाना सावजें[४] दृष्टी पडतां । व्याघ्रसर्पवृश्चिकादि ॥ ३५ ॥ किं ते चोर दृष्टीसी पडतां । कां पर्जन्यामाजीं सापडतां । किं ते शरीरव्यथा निर्माण होतां । अंतरीं प्रगटे ॥ ३६ ॥ काहीं विपरीत ऐकतां अंतरीं उपजे । तया नांव भय बोलिजे । शबळ अहंकार मूर्तिमंत जें । प्राणिमात्रीं वसे ॥ ३७ ॥ एवं स्थूळदेहीं पंचधा आकाश । काम क्रोध शोक मोह भय पंचगुणांश । अंतःकर्णपंचकीचे शबळांश । ते चि हे यथान्वयें ॥ ३८ ॥ प्रथम संकल्परूप वृत्तीचें स्फुरण । तें चि शुद्धशबळत्वें द्विधा उत्पन्न । शुद्ध भाग तें केवळ अंतःकरण । शबळ भाग तो काम ॥ ३९ ॥ पुढें संकल्पीं विकल्पात्मक जे वृत्ति । तेथें हि शुद्ध शबळ द्विधाकृति । शुद्ध भागें मनाची संभूति[५] । शबळ भागें क्रोध ॥ ४० ॥ शावरि वृत्तीचा होतां कृतनिश्चय । तेथें हि शुद्ध शबळ भागद्वय । शुद्ध भागें बुद्धीचा अन्वय । शबळ तो शोक ॥ ४१ ॥ तैसें चि निजवृत्तीचा ठाईं चेतव्य[६] । शुद्ध शबळ भागें कर्तव्य । शुद्ध भागें चित्ता[७] मंतव्य[८] । शबळ बोलिजे मोह ॥ ४२ ॥ मग कार्यकर्तृत्वाचिया अंकुरें ।

---

१ सिद्ध करतो. २ तेजी, भरभराट. ३ विग्रह=युद्ध. ४ श्वापदें. ५ उत्पत्ति. ६ चेतना. ७ चित्त. ८ जाणावें.

निजवृत्तीचें स्फुरण स्फुरे । तेथ शुद्ध भागेसीं अहंकारें । शबळ भाग तें भय ॥ ४३ ॥ एव जन्यजनकभावें कार्यकारण । स्थूळसुक्ष्मात्मक आचरण । द्विदेही दशधा होऊनि गगन । शुद्धशबळत्वें व्यापलें ॥ ४४ ॥ असो यावरि स्थूळ देहीं प्रभजन । येक चि विभागला पचगुण । चळण वळण प्रासारण । आकोचन निरोध ॥ ४५ ॥ तरी चळण ह्मणिजे सर्व शरीर चळे । वळण तें सर्व संधिमात्र वळे । प्रासारण ह्मणिजे हस्तपाद यथाकाळें । पसरती स्वेछा ॥ ४६ ॥ आकोचन तें शरीर आवरिजे । निरोधन ह्मणिजे वायु स्तब्ध कीजे । सूक्ष्मदेहींच्या पचधा वायुव्यांजें । चेष्टा होती सर्व हि ॥ ४७ ॥ व्यानें होय सर्व शरीर चळण । उदानें सर्व सधी वळण । समानें होय प्रासारण । आकोचन प्राणयोगें ॥ ४८ ॥ अपानयोगें घडे निरोध । एवं स्थूळसुक्ष्मीं मिळोनि दशविध । कार्यकारणत्वें चेष्टा करी विविध । स्थूळ देहीं प्रभजन ॥ ४९ ॥ यानतर स्थूळ देहीं पचविध । तेज सांगिजेल विविध । क्षुधा तृषा आळस्य आणि निद । तथा मैथुन तें ॥ ५० ॥ तेथ नाभिस्थानाचिया नेहेंटें । जठराग्नीचें असे आगिठें । तये स्थळीं क्षुधा धरूनि वसौटे । अन्नें इछी चतुर्विधें ॥ ५१ ॥ तिचिया सल्लग्नवेधें कठस्थानीं । तृषा जळ शोषितसे अनुदिनीं । आळस्य वसे पुष्टिस्थानीं । तेणें पाठी भरता मोडी आंग ॥ ५२ ॥ जांभया येताती कडकडां । पाठी पिळूनिया देइजे आगमोडा । इतुकेनि आळस्याचा निवाडा । पुष्टिस्थानीं यथार्थे ॥ ५३ ॥ निद्रा विलसे नेत्रपातीं । मैथुनस्थान तें उपस्थीं । एवं तेजतत्वाची उपपत्ति । पचधा निरोपिली ॥ ५४ ॥ तैसें चि पचविध उदक वोजों । लाळ मुत्र शुक्र श्रोणीत मज्जा । त्यांचिया स्थानस्वरूपसमाजें । दाऊ रूप करूनि ॥ ५५ ॥ लाळ

---

१ शुद्ध आणि शबल या दोन रूपामुळे गगनाचे दहा प्रकार झाले. २ वायु. ३ व्याज=मिष, निमित्त ४ जवळ. ५ आगटी. ६ वस्ति ७ वरील प्रमाणावरून. ८ कारण; स्थान, स्वरूप इत्यादि. ९ उत्तम, स्वच्छ, शुद्ध. १० स्थान, स्वरूप इत्यादिकांचें.

मुखीं मुत्र शुक्र शिस्नीं । रक्त सिरादळीं मज्जा सर्वांगसंधिस्थानीं । एवं पांच हि मिळोनि । स्थूल देहीं उदक ॥ ५६ ॥ आतां पृथ्वी पंचगुणी यथाक्रम । अस्थि मांस त्वचा नाडी रोम । तेथ अस्थियुक्त सर्व शरीरोद्गम । मांस सर्वांगसंधीमाजीं ॥ ५७ ॥ त्वचेनें सर्व शरीर आवेरिलें । सिरानाडीनें गुंडाळिलें । रोम सर्वांगीं विस्फारले । औंठ कोटी गणित ॥ ५८ ॥ एवं स्थूळ देह पंचवीस तत्वात्मक । नामरूप-कर्मेंसीं पृथक । अवस्था अभिमानी स्थान भोग सम्यक । गुण शक्ति प्रणवांगेंसीं ॥ ५९ ॥ असो स्थूळ देह सांगितला कार्यरूप । याचें कारण तो सूक्ष्म देह तद्रूप । तो हि पंचभूतात्मक त्याचा संक्षेप । यथाक्रमें सांगिजेल ॥ ६० ॥ तेथ हि आकाश वायु तेज आप पृथ्वी । येक येक भूत प्रसवलें पंचतत्वीं । त्याची यथाक्रमें उभवणी आववी । संक्षेपमात्र सांगिजेल ॥ ६१ ॥ तरि अंतःकर्ण मन बुद्धि चित्त अहं-कार । इतुकें मिळोनि आकाश साचार । व्यान समान उदान प्राण अपानाकुर । पंचधा हे वायूचे ॥ ६२ ॥ श्रोत्र त्वचा चक्षु जिव्हा नाशिक । हें तेजतत्वींचें ज्ञानेंद्रियपंचक । वाचा पाणी पाद शिस्न गुद हें संम्यक । कर्मेंद्रिय आपजन्य ॥६३॥ शब्द स्पर्श रूप रस गंध । हे पृथ्वीचे पंचगुण प्रसिद्ध । एवं पंचवीस तत्वें यथाविध । सुक्षम देहींचीं ॥ ६४ ॥ आतां यांचीं पृथकत्वें रूपकर्में । सांगिजतील यथाक्रमें । श्रोतीं अंतःकर्ण येकाग्र संयेमें । श्रवण करावीं ॥ ६५ ॥ प्रथम शुद्ध-संकल्पात्मक वृत्तीचें स्फुरण । नाभिस्थानीं उद्भवे तें चि अंतःकरण । परेवाचेसहित शब्दरूपें गगन । प्रसवे निजांगें तयासी ॥ ६६ ॥ ना-भिस्थान सर्व शरीराचा मध्यभाग । पंचप्राणाचा होतसे जेथ संयोग । तये अवकाशीं शब्दरूपें सवेग । वृत्ति उठे हवाईसारिखी ॥ ६७ ॥ तयेसी ह्मणावें अंतःकरण । तें पश्यंतीसीं आक्रमी हृदयभुवन ।

१ आच्छादलें. २ उभारले, पसरले. ३ उद्भव, उभारणी ४ निग्रहानें. ५ स्थानीं, जागीं. ६ दारूचे नळे, चंद्रज्योती प्रमाणें. ७ पश्यंति वाणीसह.

तेथ विकल्पाचा वारा लागतां मन । संकल्पविकल्पेंसीं ॥ ६८ ॥ तेथ निजवृत्ति सरसावली । मध्यमेसहित कंठस्थानासी आली । तेथ निश्चयेंसीं स्थिरावली । तयेसी बुद्धि ह्मणती ॥ ६९ ॥ तेथून परा पश्यंति मध्यमेसी । वृत्ति आली समत्वें ब्रह्मरंध्रासी । तेथ चेतईतव्यें चित्त ह्मणती तिसी । सज्ञान पंडित ॥ ७० ॥ तेथूनि वृत्ति शब्दरूपें वैखरीसी येता । अहंकार तयेसी ह्मणावें तत्वता । या चि प्रकारें प्रणवोच्चार स्वभावता । उपासनारहस्यीं असे ॥ ७१ ॥ एवं शब्दरूप निजवृत्तीचें स्फुरण । तें चि पंचधा विभागिलें गगन । आतां शब्देंसीं स्पर्शरूप वायूचें लक्षण । तें हि जालें पंचधा ॥ ७२ ॥ तेथ हृदईं प्राण गुदद्वारीं अपान । या दोहींमाजीं नाभिस्थानीं समान । सर्वांगसंधींमाजीं व्यापक व्यान । उदान तो कंठगत ॥ ७३ ॥ मुख्य प्राण बैसोनि हृदईं । चालवी स्वासोस्वास नवलाई । क्षुधातृषादि व्यवसाईं । व्यवहार करितसे ॥ ७४ ॥ अपान गुदद्वारीं बैसोनि । करी मळमूत्रशुक्राची उत्सर्जनी । समान बैसोनि नाभिस्थानीं । अन्नपाचनादि करित ॥ ७५ ॥ उदान कंठीं बैसोनि शब्दोच्चार करी । व्यान चाळितसे सर्व शरीरीं । या पांचाचे पांच उपवायु हि व्यापारीं । आपुलाल्या प्रवर्त्तती ॥ ७६ ॥ नाग कूर्म आणि कुकुर । देवदत्त धनंजय हे पंच उपसमीर । सिंक जांभई उचकी ढेंकर । आणि नयनोन्मीलन ॥ ७७ ॥ असो यानंतर पंचगुण तेजतत्वाचे । ज्ञानेंद्रियपंचक जें साचें । श्रोत्र त्वचा चक्षु जिव्हा घ्राणाचें । रूप करूनि दाऊं ॥ ७८ ॥ तरि श्रोत्र ह्मणिजे दोन्ही कान । तेथ गीत वाद्य स्तुति निंदादि श्रवण । त्वचेनें सर्वांग धरिलें आवरून । मृदकठिणत्व जे जाणे ॥ ७९ ॥ चक्षु ह्मणिजे डोळियासी ह्मणावें । तेणें सुंदरकुरूपादि नाना जिनस पाहावे । जिव्हानामें जिभेसी ह्मणावें । जे जाणे षड्रसचवीतें ॥ ८० ॥ कडु गोड मधुर तिखट तुरट । नाना चवी जाणे खारट आंबट । आणि नाना शब्द-

---

१ कुकल्पनेचा. २ मस्तकाचे ठिकाणी. ३ चेतविते, चेतना देते ह्मणून. ४ विसर्जन.

श्रेणीकचाट । बोलणें पडे तियेसी ॥ ८१ ॥ तिचिये मस्तकीं अगुळ येक सलब । तियेसी ह्मणावें पैं पडजीभ । उभयतायोगें कार्यकारण स्वयंभ । शरीरसजीवनी चाले ॥ ८२ ॥ यानतर घ्राणासी ह्मणिजे नाशिक । तेणें जाणिजे सुगंधदुर्गंधादिक । येव तेजतत्व पचगुणेसीं संम्यक । यथाक्रमें निरोपिलें ॥८३॥ आता उदक ह्मणिजे तें पंचविध । वाचा पाणी पाद शिस्न गुद । तेथ वाचा जाणावी चतुर्विध । परा पश्यंति मध्यमा वैखरी ॥ ८४ ॥ तेथ परेचा उद्भव नाभिस्थानीं । पश्यति प्रगटे हृदयभुवनीं । मध्यमा जे प्रगटे कठीं ध्वनी । वैखरी शब्द उच्चारे ॥८५॥ मध्यमा ह्मणिजे लंबिकेसी । वैखरी बोलिजे प्रत्यक्ष जिव्हेसी । उभयतायोगें स्वरवर्णउच्चारासी । होऊनि शब्दश्रेणी घडे ॥ ८६ ॥ तेथ मुख्य प्रणवाचा उद्भव परेपासूनि । वोष्टपर्यंत त्याची होय घडणी । त्यावरि सोळा स्वर अनुक्रमें कठस्थानीं । जिव्हावोष्ठें कठगत ॥ ८७ ॥ वरि जिव्हा स्पर्शतां मूर्ध्नीसी । क पंचक उच्चारे अनुक्रमेसीं । तालुसी जिव्हाग्र स्पर्शतां च पंचकेसी । उच्चार घडे यथाक्रमें ॥ ८८ ॥ तालु-मूर्ध्नीमाजीं जिव्हाग्र स्पर्शतां । ट पचक उच्चार घडे तत्वता । तथा दतीं जिव्हाग्र लागतां । तवर्ग उत्पन्न होये ॥ ८९ ॥ जिव्हेविना वोष्ठद्वयस्पर्शें । पवर्ग उच्चारे अधरद्वयवशें । पुन्हा कंठ तालु दंतोष्ट जिव्हास्पर्शें । य पंचक उच्चारे ॥ ९० ॥ पुन्हा दत तालु मूर्ध्नी जिव्हास्पर्शें । सकारत्रय घडती यथावशें । हकार केवळ कठवशें । भारी-पणें उच्चारे ॥ ९१ ॥ पुन्हा तालुमूर्ध्नीसी जिव्हा लागतां । ळ क्ष उच्चार घडे तत्वता । ज्ञकार जिव्हास्पर्शें स्वभावता । उपवर्ण घडे पैं ॥ ९२ ॥ एव सोळा स्वर पचतीस वर्ण । मिळोनि वेद शास्त्र पुराण । याचें कठापासूनि वोष्टपर्यंत उच्चारण । जिव्हाद्वययोगें ॥ ९३ ॥ यानंतर पाणी ह्मणिजे दोन्ही हात । तेणें कार्यकर्तृत्व करावें समस्त । घेणें देणें

---

१ श्रेणी=पक्ति. कचाट=खटपट. २ पडजिभेला. ३ ज्ञ ला उपवर्ण ह्मट-ल्यामुळें १६ स्वर व ३५ वर्ण मिळून ५१ मातृकांचीं वेदशास्त्रपुराणें इत्यादि सर्व बनलेलीं आहेत.

स्नान भक्षणादि कार्यजात । शरीररक्षणाचें ॥ ९४ ॥ यावरि पद ह्मणावें दोहीं पायांसी । येहीं चालोनि जावें पडिल्या कार्यासी । शिस्न-गुदीं करूनि मळमूत्रोत्सर्जनासी । तथा रतिकार्य संपादणें ॥ ९५ ॥ एवं कर्मेंद्रियपंचकेसीं पृथकत्व । यथाक्रमें सांगितलें आप तत्व । आतां पृथिवीयेचें पंचगुणत्व । यथाक्रमें आइका ॥ ९६ ॥ शब्द स्पर्श रूप रस गंध । पृथ्वी जाणिजे पंचविध । पंचविषय निर्व्यवाद । यांस चि ह्मणावें ॥ ९७ ॥ त्याचीं ज्ञानेंद्रियपंचकें संभूति । कर्मेंद्रियपंचकें निर्मती । याची असंभाव्य त्रिभुवनीं ख्याति । स्वर्गनर्कदायक हे ॥ ९८ ॥ जरि यथाविधीं नीतीनें सेविले । तरि तें उत्तमपद प्राप्त होय वहिलें । जरि अविधीं अनीतीनें सेविले । तरि अधोगति प्राप्त ॥ ९९ ॥ जेवि खरें चि मारक होय विष । परि रसेंरीतीं सेवितां तें पीयूष । अथवा सर्प वृश्चिक इतरांसी करिती दंश । मंत्रज्ञा त्याचें निर्भय ॥ १०० ॥ तेवि विषय सेविता शास्त्रयुक्तीं । हे कदापि बाधक नव्हती । बाष्कळ जालियां हे चि मारक होती । जीवमात्रासी पैं ॥ १ ॥ जेवि कां अन्न चि सकळां तारक । विशेष भक्षितां तें चि होय मारक । केवळ न भक्षिता हि मृत्यु होय अवश्यक । ह्मणौनि यथायुक्त भक्षावें ॥ २ ॥ तेवि विषय टाकितां शरीर पडे । विशेष होता अन्याय घडे । ह्मणौनि यथाविधीं शास्त्रसुरवाडें । विध्युक्त आचरणें ॥ ३ ॥ ज्ञानेंद्रिय ह्मणिजे विषय जाणावे । जाणोनि यथाविधीं स्वीकारावे । त्यांचें कर्मेंद्रियें कार्य करावें । ग्रहणगमनत्यागादि ॥ ४ ॥ स्तुति-निंदात्मक शब्द कानीं ऐकावे । त्यांचें वाचेनें विहित उत्तर द्यावें । त्वचेसीं मृदकठीणत्व जाणावें । हातें त्यांचा स्वीकार त्याग ॥ ५ ॥ नेत्रीं सुंदर कुरूप पाहावें । पदीं तेथवरी चालोनि जावें । जिव्हाघ्राणें

१ सर्व प्रकारचें कर्म. २ उत्पत्ति; ज्ञानेंद्रियपंचकापासून. ३ निर्माण होतात. ४ यांचें 'पंचविषय' हें कर्म. ५ रसायणरूपानें. ६ अमृत. ७ मांत्रिकाना. ८ न होती. ९ अप्रमाणिक. १० मुळीं च न सेविले तर. ११ सुरवाड= स्वाधीनपण. १२ योग्य.

स्वादगंध घ्यावे । शिस्नगुदीं मळमुत्रउत्सर्ग ॥ ६ ॥ एवं पृथ्वी पंच-गुणेंसीं । सांगितली नामरूपकर्मेसीं । याप्रकारें पचभूतें पंचवीसा तत्वासी । सूक्ष्मदेहीं प्रसवलीं ॥ ७ ॥ सूक्ष्मदेह स्वप्नावस्था तैजसाभि-मानी । कंठस्थान प्रविविक्तभोग सत्वगुणी । ज्ञानशक्ति उकार चरण मिळोनी । अष्टकोशदेह प्रसिद्ध ॥ ८ ॥ इतुकें आयत मिळोनि अन्य-थाज्ञान । देहद्वयषोडशकोशेंसीं परिछिन्न । या सर्वांचा साक्षी ह्मणौनि आत्मा भिन्न । स्थूळसूक्ष्मातीत ॥ ९ ॥ ऐसें श्रीगुरुराजें वाक्य बोलतां । शिष्य तत्काळ चमकला अवचिता । ह्मणे स्वामी तरि मी कोण हें मज तत्वता । सांगितलें पाहिजे ॥ ११० ॥ इतुकें शिष्य निजभावें बोले जव । तवं कृपा द्रवले श्रीगुरुराव । शिष्यासी निजस्वानंदाची टेवं । देऊनि निजपदीं स्थापिला ॥ ११ ॥ तो संवाद पुढें असे नागर । गुरुशिष्यांचा स्वानुभवदिनकर । अन्यथाज्ञानेंसीं अज्ञान निरसूनि साचार । ज्ञानेंसीं विज्ञानप्राप्ति ॥ १२ ॥ दिनकर रामदासीं शरण । रिघोनि निरसिलें अन्यथाज्ञान । आतां पुढिलिये कीर्णीं निरसूनि अज्ञान । ज्ञानप्राप्ति होईल ॥ ११३ ॥ स्वस्ति श्रीस्वानुभवदिनकरे गुरुशिष्यान्वये येकादश कळापे स्थूळसूक्ष्मदेहद्वयअन्यथाज्ञाननिरशननिरूपणं नाम द्वितीय कीर्ण प्रकाशः ॥ २ ॥

---

॥ श्रीराम ॥

तवं शिष्य बोले करद्वय जोडून । ह्मणे स्वामी देहद्वयासी मज वेगळेपण । तरी मी मुळींचा आहे कोण । आणि देह हें कोणाचें ॥१॥ ऐसा ऐकोनि शिष्याचा आक्षेप । सद्गुरु सर्वांगें होऊनि सकृप । हृदईं आलिंगूनि वाक्यदीप । बोलों आरंभिले ॥ २ ॥ अरे जो तू आप-

---

१ वरील दोन्ही ओव्यांतील चरण १ व ३ यांत ज्ञानेंद्रियें व चरण २ व ४ यांत कर्मेंद्रियें सांगितली आहेत २ स्वप्नदेहाचा अभिमान धरणारा जीव ३ स्व-प्नस्थान किंवा मनोराज्य यांतील अस्पष्ट भाग. ४ चकित झाला. ५ स्वाद, कल्पना, लळा, छंद

णासी नेणे ह्मणसी । तो तू जाणपणें त्याचा साक्षी होसी । तरी तू त्या नेणपणा हि वेगळा आहेसी । तत्साक्षित्वें चि पैं ॥ ३ ॥ तथापि आपणासी आपण जें नेणपण । तयासी ह्मणावें केवळ अज्ञान । बीजरूप जें देहद्वयाचें कारण । तें हि पचभूतात्मक ॥ ४ ॥ आकाश वायु तेज आप पृथिवी । या पाचाचीं पंचवीस तत्वें जाणावीं । कोण कोण तें यथाक्रमें श्रवण करावीं । सागिजती तैसीं ॥ ५ ॥ कारण-देहीं पचगुणी नभ । आतां सांगिजेल प्रथमारभ । तरी मद मत्सर आणि दभ । कृत्रिमत्व तथा अनित्य ॥ ६ ॥ आतां उन्माद वासना वाछा चिंता । चेष्टा एवं पचगुण वायु तत्वता । निद्रा मरण अभि-ळाश भ्रम विस्मरणता । पचगुणी तेज जाणावें ॥ ७ ॥ करुणा कल्पना भ्राति प्रमाद । अनर्थ एवं आपाचे पच भेद । आतां कारणदेहीं पृथ्वी पचविध । कैसी ते ऐकावी ॥ ८ ॥ अवकाश अज्ञान अवि-वेक । वचनें मूर्छा एवं पृथ्वीपचक । आतां याची रूप कर्मे पृथक । करूनि दाऊ यथाक्रमें ॥ ९ ॥ तरी प्रथम मद ह्मणिजे कोरडा चि ताठा । त्याचा सदैव मानेसी वसौटा । मत्सर हृदईचा आधिष्ठाता । दभ वसे त्वचेसीं ॥ १० ॥ सांगिजेल मत्सराचें लक्षण । दुसरा देखिला आपणासमान । त्यासी करी द्वंद्वचाळण । या नांव मत्सर बोलिजे ॥ ११ ॥ आता दभ कैसा किलक्षण । बहुतीं बोल-वितां नेदी प्रतिवचन । प्राणिमात्रालागीं मानी जैसें तृण । निर्भर्त्सूनि टाकी बडिलां ॥ १२ ॥ कृत्रिमत्वाचें अतरीं अधिष्ठान । सदां कापट्य-बुद्धीचें वर्तन । अतरीं वसे येक बोलणें आन । या नाव कृत्रिमत्व ॥ १३ ॥ आता अनित्यता पाचवा गुण । ह्मणिजे क्षणभंगुर ज्याचें वचन । एव पचधा रूपेंसीं गगन । आतां वायु सागों पंचधा ॥ १४ ॥ प्रथम उन्माद ह्मणिजे सदा मस्त । दृष्टीसी कोण्हास हि नाणित । तथा

१ कारणदेह हें च स्थूलसूक्ष्मदेहांचें कारण आहे; तें हि पचभूतात्मक अर्थात् अज्ञानात्मक आहे. २ फसविण्याची बुद्धि. ३ स्थान. ४ प्रतिस्पर्धता. ५ याचा रूढ अर्थ ढोंग असा आहे. ६ दुसरें, निराळें.

जो जो पदार्थ उत्तम देखत । तेथें धांवे ते वासना ॥ १५ ॥ वांछा ह्मणिजे नसतें चि इछी । चिंता जे अंतरीं सदा शोची । चेष्टा ह्मणिजे येक क्षणाची । शरीरीं नाहीं निश्चळता ॥ १६ ॥ इतुकेनि वायुपंचक संपलें । आता तेजपचक सांगों वेहिलें । तरी निद्रेचें स्थळ हृदईं बोलिलें । परि पापणीपासीं आगमन ॥ १७ ॥ तथा देहपात होतां मरण । हा तेजीं बोलिजे दुजा गुण । आतां तिजें जें का परवस्तु अभिळाशणें । परद्रव्य परदारादि ॥ १८ ॥ भ्रम ह्मणिजे शरीरीं बावरेपण । विस्मृति ते चि जें स्वयें विसरण । एवं तेजपंचक आतां सलक्षण । उदकपचक सांगों ॥ १९ ॥ करुणा वसे मुखीं आणि करद्वईं । कल्पनेसी वास्तव्य नाभीचा ठाईं । भ्रांतीचें स्थळ तें हृदईं । प्रमाद वसे सर्वांगीं ॥ २० ॥ अनर्थ वसे निज मानसीं । एव उदक सांगितलें पचगुणेंसीं । तैसी चि पृथ्वी हि पचगु-णेंसीं । यथाक्रमें सागिजेल ॥ २१ ॥ प्रथम अवकाश ह्मणिजे शून्यं-पण । दुजें अज्ञान ह्मणिजे नेणपण । तिजें अविवेक ह्मणिजे विचार-हीन । चौथें वचन तें आपपरी ॥ २२ ॥ पाचवें मूर्छा ह्मणिजे अक-स्मात पतन । एवं पृथ्वी जाणावी पंचगुण । इतुकिया पचवीसा तत्वीं मिळोनि कारण । अज्ञानात्मक देह तिजा ॥ २३ ॥ याची अवस्था सुषुप्ति प्राज्ञअभिमानी । हृदयस्थान आनदभोग तमोगुणी । द्रव्यशक्ति मकार चरण एव मिळोनि । कारणदेह अष्टकोशेंसीं ॥ २४ ॥ ऐसें अज्ञानात्मक कारणदेह । अष्टकोशेंसीं पंचवीस तत्वसमूह । अन्य-थाज्ञान त्याचें कारण निसदेह । बीजरूप अज्ञान ॥ २५ ॥ तरी तू याचा साक्षी आहेसी । कीं तूं चि हें स्वयें होसी । श्रीगुरु कडसूनि गोष्टी पुसतां ऐसी । शिष्य अंतरीं चमत्कारला ॥ २६ ॥ ह्मणे जी जी

---

१ दिसत नाहीं तें, अप्राप्य. २ सत्वर, लौकर. ३ निराकारत्व, निरवय-वत्व. ४ हें आपलें, तें परक्याचें, असा द्विधा भाव; परतु वचन याचा अर्थ लबाडी, फसवेगिरी असा आहे. ५ नेणीव दशेचा अभिमान धरणारा सुषुप्तिगत जीव. ६ सुषुप्तिसुख. ७ कस लावून, सावध करून.

स्वामी करुणाकरा । कृपाळुवा श्रीगुरु दातारा । भलें फेडिलें[1] जी या अज्ञानकेरा । मळिकटापासूनि ॥ २७ ॥ मी तरि हें चि ह्मणौनि बैसलों । येथें चि दृढ होतों विश्वासलों । तव अकस्मात जी सोडविलों । या देहबंधणापासूनि ॥ २८ ॥ जी मी स्थूळदेह हें माझें ह्मणे । तें निरसिलें अष्टकोशेसीं ह्मणें । तैसें चि सुक्ष्मदेहाचिये सोडवणें । पासूनि केलें मज ॥ २९ ॥ मग होतों कारणदेहाचें वोझें वाहात । अज्ञानपणें वायां चि भरंगळत । तव तेथून हि सोडविलों अकस्मात । स्वसामर्थ्यें खर्चूनि ॥ ३० ॥ परि जी येक सदेह माझे मनीं । कीं या देहाचें येवढेंपैण काइसेनि । हें काह्याचें घडिले आणि कोठूनि । कोणाचें हें आणिलें ॥ ३१ ॥ काय पहिलें ऐसें चि होतें । कीं हें मेळविलें देवा आईतें । काय मेळऊनि पाचें सोतें । उभें केलें जायाचें ॥ ३२ ॥ हा जी सदेह मज थोर गमला । इतुका हा पाहिजे काढिला । ह्मणिजे उपकारें थोर कृतार्थ जाला । तुमचेनि देवा ॥ ३३ ॥ ऐसा शिष्य संदेहसागरीं विचारनौका । बुडतबुडता फोकारिला धावा निका । तवं अकस्मात अभयंकर उभारूनी आवांका । सद्गुरु तारू देतसे ॥ ३४ ॥ अरे आलों धैर्य धरीं बाळका । दृढ सावरूनि विचारनौका । सावधपणें पुसिला तो प्रश्न ऐक निको । स्वानुभवदिनकरीं ॥ ३५ ॥ श्रीगुरु ह्मणे निज शिष्यासी । तुवा पुसिलें देहउभारणीसी । तरी त्रिगुण आणि पचभूतेंसीं । उभविलें हें अष्टधा ॥ ३६ ॥ तेथ सत्व रज तम हे त्रिगुण । पृथ्वी आप तेज वायु गगन । एव पाच आणि तीन मिळोन । अष्टधा प्रकृति हे ॥ ३७ ॥ तरी देहमात्र त्रिगुणीं व्यापलें । प्रकृतिसारिखे गुण वर्त्तती विहिले[10] । आता पचभूतात्मक देहमूसेसी वोतिलें । तें समूळ सागिजेल ॥ ३८ ॥ पाचां भूतीं पचवीसाचे । गुण

---

१ दूर केलें. २ याचा सबध 'देहाचिये' या शब्दाकडे. ३ एवढा मोठेपणा, बडेजाव ४ स्वतःसिद्ध, आयासावांचून. ५ पचप्राण व सप्तधातु मिळून. ६ अस्थिर, नाशवत. ७ फोकरणें=प्रगट करणें ८ आवांकणें=अगत्यरूप. ९ नेटका, बरा. १० विहित=योग्य कीं वहिलें=सत्वर, लौकर?

आगांतुक घेऊनि जायाचे । शरीरउभारणी करूनि आत्मयाचें अंश-
सत्तेनें वर्त्ततसे ॥ ३९ ॥ तरी कोण कोण गुण कोणाचे । घेतले ते
आइका साचे । हिरण्यगर्भात्मक ब्रह्मांडीचें । अपंचीकृत देह जें ॥ ४० ॥
तेथ विष्णूचा निजगुण अंतःकरण । मन चंद्रमा बुद्धि चतुरानन ।
चित्त नारायण अहंकार त्रिनयन । इतुके मिळोनि आकाश ॥ ४१ ॥
व्यान समान उदान प्राण अपान । हे पांच हि वायूचे अंश जाण ।
श्रोत्र दिशों त्वचा पवनें । चक्षु सूर्यांश जाणिजे ॥ ४२ ॥ जिव्हा
तत्व हें वरुणाचें । घ्राण अंश आश्विनौ देवाचें । वाचा तत्व हें अग्नीचें ।
इंद्रांश ते करद्वय ॥ ४३ ॥ पदद्वय अंश त्रिविक्रमाचे । शिस्नोपस्थ
हें प्रजापतीचें । गुद हें नैरुत्येशाचें । अंश जाणिजे ॥ ४४ ॥ शब्दगुण
तो आकाशाचा । स्पर्शगुण जाणिजे प्रभंजनाचा । रूपगुण तो बोलिजे
तेजाचा । आपपृथ्वीचे रसगंध ॥ ४५ ॥ एवं पंचवीस तत्वें पंचवी-
सांचीं । आणूनि उभारणी केली शरीराची । त्यांत चाळकसत्ता
आत्मयाची । ते शरीर चालवितसे ॥ ४६ ॥ जेवि उदकीं प्रति-
बिंब सूर्याचें । बिंबोनि दुसरेपणें साचें । तेवि शरीरामाजीं आत्मयाचें ।
सत्तारूपें प्रतिबिंब ॥ ४७ ॥ ते आत्मसत्ता देहामाजीं । प्रतिबिंबतां
ह्मणवी दुजी । मग अहंकर्तृत्वाचा समाजीं । फुंजों लागे जीवपणें ॥ ४८ ॥
आपुलें मुळींचें आत्मत्व सोडूनि । नसतें चि बैसे जीवपण धरूनि ।
अहं सुखी अहं दुखी ऐसें मानी । हर्ष विषाद अंतरीं ॥ ४९ ॥ जेवि
कां तो तरंग सागरीं । अकस्मात उद्भवे तरंगाकारी । मग तरंगपण
धरूनि अंतरीं । सागरपण विसरे ॥ ५० ॥ तेवि हा प्राणी देहसंगें ।
नसतें चि जीवपण अँवगे । तें निरसावया धरणें लागे । सतसंगासी
॥ ५१ ॥ तव पूर्वपुण्यें सत्संग लाधला । परि तेथें सद्भाव न धरी
वहिला । तरी संग धरिला चि न धरिला । तैसें जालें चि कीं ॥५२॥

---

१ जे केव्हां आहेत व केव्हां नाहीत २ सूक्ष्म पंचतत्वयुक्त. ३ शंकर. ४ दिग्पालाचें. ५ पवनाचें. ६ अभिमान धारण करते. ७ अवगणें=अवगमणें= भासणें. ८ ' असून ' या अर्थानें.

ह्मणौनि कोणीयेकें ऐसें न करावें । सत्संगासी दृढ विश्वासें धरावें । धरूनि सांगती तैसें करावें । येकाग्रता सावध ॥ ५३ ॥ जो सावध साक्षपी आणि दक्ष । तयासी तत्काळ चि प्राप्त मोक्ष । हातींचे हातीं प्रत्यक्ष । कैवल्यपदप्राप्ति ॥ ५४ ॥ तरी सखया तुवा पुसिलें । देह काह्याचें कैसें निर्मिलें । ह्मणौनि सांगणें लागलें तुज समजावया ॥ ५५ ॥ त्रिगुण आणि पञ्चभूताचें । बोलिलें शभरा तत्वाचें । बत्तीस कोश आणि चौदेहाचें । मिळोनि देह येक हें ॥ ५६ ॥ इतुकें करूनि हें जौयाचें । परंतु येक असे महत्कार्य याचें । का जे आत्मज्ञान जें कां साचें । तें येचेनि प्राप्त ॥ ५७ ॥ येऱ्हवीं यासी क्षणभंगुरपण । क्षण न लगतां जाय नाशोन । ह्मणौनि अवश्यमेव आत्मसाधन । याचेनि संगें करावें ॥ ५८ ॥ इतुकें बोलेना जंव गुरुराणा । तंव शिष्य विनटला निजचरणा । ह्मणे स्वामी कैसेन जी उत्तीर्णपणा । होइजेल तुमचिया ॥ ५९ ॥ जें जें मज स्वामी संकट पडे । तें तत्काळ चि निजकृपा बहुडे । आणि थोर होतें संसारसांकडें । तें हेळां चि फेडिलें ॥ ६० ॥ प्रस्तुत अन्यथाज्ञानेंसीं । देहद्वय निरसिलें कौतुकेंसीं । तैसें चि अज्ञानात्मक कारणदेहासी । क्षणमात्रें निरसिलें ॥ ६१ ॥ तरि मी देहत्रयाचा होऊनि साक्षी । साक्षित्वें वेगळेपणें यातें निरीक्षी । तो मी स्वानुभवदिनकराऐसा परीक्षी । ऐसें केलें पाहिजे ॥ ६२ ॥ ऐसी शिष्याची देखोनि विनीतता । श्रीगुरु कृपाघन बोलिला स्वभावता । आतां कृपापीयूषें स्वानंदपूर्णता । शिष्यसागर तुबंलेल ॥ ६३ ॥ तया स्वानंदभरित अमृतसागरीं । श्रवणमननरूप स्नान जो करी ।

---

१ दासबोध ८×६×४९, ८×७×५९, ६×९×२९. २ मागें सांगितल्याप्रमाणें प्रत्येक देहाचे ८ कोश याप्रमाणें ३ चंचल, नाशवत. ४ याचकरितां दासबोधांत ठिकठिकाणी नरदेहाचें स्तवन केलेलें आहे. द. १ स. १० पहा. ५ मागें सरतें, निरसन होतें. ६ सहज, लीलेनें. ७ स्वानुभवाप्रमाणें आपला आपणास शोध घेतां आला पाहिजे. ८ प्राप्त झाला.

तो अनयासें निजध्यासें साक्षात्कारीं । ब्रह्मपदीं अमर होईल ॥ ६४ ॥ तें अमरत्व असेल ज्यासी लाहाणें । तेणें स्वानुभवदिनकरीं ऐक्यें पाहाणें । पाहोनि परब्रह्मीं राहाणें । सहजस्थिति येकात्मता ॥ ६५ ॥ एव कार्यकारणेंसीं देहत्रयसागर । शिष्यअगस्तीनें करूनि आचमन येकंदर । दुसऱ्या आचमनासी जव करू पाहे सादर । तव ज्ञानक्षीराब्धि देखिला ॥ ६६ ॥ मग त्याचें हि आचमन करूं धाविला । तव तेथें सद्गुरुजॅळसेन देखिला । सद्भावशेषतुळिकेवरीं निजेला । भक्तिसुख सेजेसीं ॥ ६७ ॥ अनतभुज परब्रह्म सावळा । कासे कासिला चिदबरसोनसळा । सच्चिदानंदत्वें मुगुट शोभला आगळा । निरायुधेंसीं सायुध ॥ ६८ ॥ अळकार शोभले निजांगीं मुक्तलग । इछालक्ष्मी चरणसवाहनीं सुरंग । प्रणवचतुरानन नाभिकमळीं अभ्यंग । हात जोडूनिया उभा ॥ ६९ ॥ प्रबोधगरुड उभा पुढें । बृहत्सामगायन होतसे निवाडें[10] । सा च्यारि अठरा बदीजेन पवाडे । परोपरीं पढती ॥ ७० ॥ तें देखिलें शिष्यअगस्तीनें अकस्मात । देखोनि स्वानुभवदिनकरीं ठेला समाधिस्त । ह्मणे मी हें काय नवल स्वप्न देखत । कीं ऐसें चि असेल हें ॥ ७१ ॥ तेणें घाबिरेपणें सभोंवतें पाहे । तव चित्त चाकाटलें चकित राहे । मग धैर्यें चि धरूनि बाहे । बैसे निवांत होऊनि ॥ ७२ ॥ आंग सर्वांगीं रोमांचित । तेणें स्वेदबिंदु रॅवरावित । आनंदाश्रु नेत्रीं श्रवत । चित्त चैतन्यें विरमॅलें ॥ ७३ ॥ तेणें स्वानंद न समाय पोटीं । सुखोर्मिबाष्प दाटे कठीं । अर्द्धोन्मीलित जाली दृष्टि । ब्रह्मानंदें मूर्छित ॥ ७४ ॥ अहो केळीतें झगटी पवन । तैसें शरीर कंपायमान । चहूं

१ गुरुकृपामृताचा लाभ झाल्यानतर अमर किंवा मुक्त होण्याकरितां ज्ञानमार्गांतील करावीं लागणारीं चत्वार साधनें. २ प्राप्त होणेंची इच्छा. ३ 'येकद्धर' असें मुळांत आहे. एकदम, एके वेळेस असा अर्थ. ४ जलशयन=विष्णु. ५ सद्भावरूपी शेषाच्या शरीरावर. ६ भक्तिरूप सुखशय्येवर. ७ चिद्रूपरूपी पीतांबर. ८ अधिकत्वानें. ९ मोत्याचे घोस. १० निवडक. ११ सहा शास्त्रें, चार वेद व अठरा पुराणें हे च कोणी भाट १२ बाहु. १३ डवडवित ? १४ विरलें, लीन झालें १५ मनाच्या स्वानंदयुक्त तरंगामुळें आलेले जलबिंदु.

वाचांसी पडिलें मौन । देहभाव विसरला ॥ ७५ ॥ सत्वगुणांचे भरितें भरे । सर्वें चि आपेंआप वोसरे । विस्मयाचेनि अनुकारें । स्मित हास्य येतसे ॥ ७६ ॥ ऐसा दाटलेनि स्वानंदें । फुंजों लागे परमानंदें । सर्वें चि साष्टांगाभिवादें । दडवत पडिला ॥ ७७ ॥ सत्रें चि उठोनि लवड-सवडीं । संतोषाची उभऊनि गुढी । निजभावें करद्वय जोडी । जयजयकार करीतसे ॥ ७८ ॥ ह्मणे जय जय जी पुरुषोत्तमा । जगज्जनका सुखधामा । अनादि आद्या परब्रह्मा । श्रीसद्गुरुस्वामी ॥ ७९ ॥ तुमचिया कृपा स्वसुख लाधलों । स्वानंदें साम्राज्यपद पावलों । या भवबंधापासूनि सोडविलों । हेळामात्रें समर्था ॥ ८० ॥ स्थूळसूक्ष्मेंसीं अन्यथाज्ञान । निरसिलें कारणदेहेंसीं अज्ञान । आता देऊनि निज आत्मज्ञान । मज सनाथ केलें पाहिजे ॥ ८१ ॥ ऐसी निजशिष्यें करितां विनती । सद्गुरु सर्वस्वें समर्थ ज्ञानसंपत्ति । तें सर्वस्व दान करूनि शिष्याप्रति । आपणाऐसें करील ॥ ८२ ॥ तें ज्ञान प्राप्त पुढिलिये कीर्णीं । शिष्य लाधेल महाकारणीं । दिनकर रामदासीं समरसोनि । स्वानुभवदिनकरीं ऐक्यत्वें ॥ ८३ ॥ स्वस्ति श्रीस्वानुभवदिनकरे गुरुशिष्यान्वये येकादश कळापे अज्ञानात्मककारणदेहनिरसननिरूपण नाम तृतीय कीर्ण प्रकाशः ॥ ३ ॥ श्रीराम जयराम जयजयराम ॥

---

॥ श्रीराम ॥

निजशिष्याचा जाणोनि अनन्यभाव । ज्ञानपदेशीं सादर श्रीगुरुराव । तेथ आधीं महाकारणदेहप्रभव । निर्शनासी उद्यत ॥ १ ॥ देहत्रयाचें जालें निर्शन । चौथें उरलें महाकारण । तें हि पंचभूतात्मक परिछिन्न । पंचवीसा तत्वासीं ॥ २ ॥ तेथ प्रथम अज्ञानाचें लक्षण । आपणासी नेणोनि ह्मणे मी कोण । स्वस्वरूपीं जें विसरलेंपण । त्या नांव अज्ञान बोलिजे ॥ ३ ॥ त्या अज्ञानें आपणासी नेणोन । सद्गु-

---

१ स्वरूपानें. २ लगबगीनें. ३ ध्वजा, निशाण. ४ क्षण न लागतां. ५ उत्पत्ति. ६ उद्युक्त.

रूसी पुसे मी कोण । ते ह्मणती तू ब्रह्म पूर्ण । निर्गुण निसंग जें ॥ ४ ॥ जें ब्रह्म शब्दासी आकळेना । मनासी तर्कितां तर्केना । दशेंद्रियांसी गोचरें होयना । तें परब्रह्म चि स्वयें तू ॥५॥ जें निर्गुण निसग निरामय । निरोपम निरुपाधि अप्रमेय । अप्रतर्क्य असभवनीय । तें परब्रह्म तूं चि स्वयें ॥६॥ जें नित्य शुद्ध सनातन । जें अखड अजरामर पूर्ण । नाना मायादि मळविहीन । तें परब्रह्म तूं चि स्वयें ॥ ७ ॥ जें सत्य स्वयप्रकाश । स्वसवेद्य जें सावकाश । अनिर्वचनीय अपार निर्दोष । तें परब्रह्म तू चि स्वयें ॥८॥ जें शस्त्राचेनि तुटेना । अग्निचेनि जाळवेना । उदकेकरूनि कालवेना । तें परब्रह्म तू ॥९॥ वारयाचेनि जें न उडे । गगनामाजीं जें न सापडे । इतुकें नाशळया हि जें न वहुडे । तें परब्रह्म तू ॥१०॥ जें सत्वरजतमविहीन । शुद्धसत्वातीत जें परिछिन्न । दृश्याभासाहूनि भिन्न । तें परब्रह्म तूं ॥ ११ ॥ जेथ स्थूळ सूक्ष्मेंसीं अन्यथाज्ञान । निरसूनि कारणदेहेंसीं अज्ञान । ज्ञानरूप जें महाकारण । तें परब्रह्म तूं ॥ १२ ॥ ऐसी श्रीगुरूनें करिता बोली । शिष्यें चमत्कारोनि अशका घेतली । जी महाकारणदेहाची कैसी किल्ली । ते सविस्तर मज सांगिजो ॥ १३ ॥ तेथ सद्गुरु ह्मणतिलें आइक । महाकारण पचभूतात्मक । ऐसें ऐकता शिष्य अधिक । सदेहसागरीं पडिला ॥ १४ ॥ ह्मणे जी देह-द्वयेंसीं अन्यथाज्ञान । तें होय पचभौतिक परिछिन्न । आणि याच्या बीजभावयोगें अज्ञान । तें हि केदापि घडेल ॥ १५ ॥ परतु जें केवळ पाहातां ज्ञानरूप । ज्यायोगें शिष्य होय ब्रह्मस्वरूप । तेथ पचभूतांचा बोलता संक्षेप । मज सदेह गमला ॥ १६ ॥ तरि याचें कैसें असेल निरूपण । तें मज सांगिजो जी कृपा करून । केवळ ज्ञानरूप जें महाकारण । तें पचभूतात्मक कैसें ॥ १७ ॥ बीज अज्ञान तरु अन्यथाज्ञान । याचें पूर्णपणें फळ जें ज्ञान । त्यासी कैसें जी घडेल

---

१ प्रगट. २ अनिर्वाच्य, बोलतां येत नाहीं असें. ३ नैन छिंदन्ति शस्त्राणि । वगैरे गीतावाक्याप्रमाणें. ४ मागें फिरे. ५ तें हि कदाचित् पंचभौतिक असू शकेल.

आरोपण । या पंचभूतांचें ॥ १८ ॥ ऐसें शिष्य करितां विज्ञापन । सद्गुरु कृपाद्रवलेनि पूर्ण । ह्मणिजे ऐक बापा सावधान । महाकारण पंचभौतिक ॥ १९ ॥ तूं चि आतां बोलिलासी वचन । कीं अज्ञान बीज अन्यथाज्ञान तरु पूर्ण । याचें पूर्णपणें फळ केवळ ज्ञान । जें महाकारणरूप ॥ २० ॥ तरि तुझ्या चि मुखें जाला निवाड । जैसें बीज त्याचें तैसें चि झाड । त्यासी पुष्पफळाचा हि घड । तेणें चि रीतीं ॥ २१ ॥ निंब कडु निंबोळी सोंकर । ऐसें बोलता चि मूर्ख मानिती चतुर । कटुकीचें फळ पाहातां मधुर । स्वप्नीं हि न दिसे ॥२२॥ तेवि अज्ञानअन्यथाज्ञानेंसीं । पंचभौतिक देहत्रय निश्चयेंसीं । तेथ ज्ञानात्मक महाकारणासी । दशा ते चि दिसे पैं ॥ २३ ॥ परंतु शुद्धशबळभागें पंचभौतिक । देहचतुष्टय विस्तारलें सम्यक । देहत्रय हें शबळ शुद्धभागें येक । महाकारण जें चौथें ॥ २४ ॥ स्थूळ सूक्ष्म आणि कारण । हें देहत्रय शबळ पंचभौतिक जाण । शुद्ध भागाचें महाकारण । चतुर्थ देह जें ॥ २५ ॥ जेवि शुद्ध ब्रह्म जें कां निर्गुण । तदंगें चि शबळत्वें ईश्वर सगुण । तेवि शुद्ध पंचभूतांचें महाकारण । शबळात्मक देहत्रय ॥ २६ ॥ या दृष्टांतीं अशंका उठिली गहन । जे ब्रह्म निसंग निर्विकार निर्गुण । तेथ तदंगत्वें चि ईश्वरत्व सगुण । कैसें घडो शकेल ॥ २७ ॥ तरि ये अशंकेचें प्रतारण । स्वानुभवदिनकरीं परिछिन्न । त्रयोदश कळापाचें द्वितीय कीर्ण । तेथ निरोपिलें असे ॥ २८ ॥ असो देहत्रय पूर्वीं निरोपिलें । अज्ञानअन्यथाज्ञानें विकाशलें । कार्यकारणत्वें प्रगटलें । पंचभूतात्मक ॥ २९ ॥ प्रथम स्थूळ देह पंचभौतिक । पंचवीस तत्वें अष्ट कोशात्मक । आणि सुक्षम देह हि सम्यक । तितुकें तैसें चि ॥ ३० ॥ त्यानंतर तिसरें कारण देह । तें हि पंचभूतात्मक निसंदेह । आणि पंचवीसा तत्वाचा समूह । अष्टकोशसहित ॥ ३१ ॥ हें तुज निरोपिलें गतकीर्णीं । आतां महाकारण

---

१ साखरेसारखी गोड. २ कुटकी=एक कडु औषधी वनस्पति. ३ संशययुक्त प्रश्न

देह आर्कणीं। पचवीसा तत्वीं पचभूतात्मक विभागूनि। अष्टकोशेंसीं साकल्य ॥ ३२ ॥ तेथ प्रथम आकाश पचविध। पूर्ण अज अदाह्य अक्लेद्य। पांचवें अशोष्यत्व प्रसिद्ध। एव गगन पचधा ॥ ३३ ॥ पूर्ण ह्मणिजे सर्वत्र संचलें। अज ह्मणिजे नाहीं जन्मलें। अदाह्य ह्मणिजे नवजाय जाळिलें। महातेजाचेन हि ॥ ३४ ॥ अक्लेद्य ह्मणिजे आवर्णोदकीं न कालवे। अशोष्यत्वें महावातें न शोषवे। यां पचगुणेंसीं गगन जाणावें। महाकारण देहींचें ॥३५॥ आता वायु बोलिजे पचगुण। असग अछेद्य ऊर्ध्व जीवन कारण। याचें स्वरूपकर्माभिधान। पृथक प्रकारें असे ॥३६॥ असग ह्मणिजे संगीं सापडेना। अछेद्य शस्त्रें तोडिता तुटेना। ऊर्ध्व ह्मणिजे काहीं कळेना। वरता कीं खालता ॥ ३७ ॥ जीवन ह्मणिजे प्राणीमात्रीं चाळक। कारण ह्मणिजे सचराचरीं पाळक। एव महाकारणीं वायु पचगुणात्मक। आतां पचधा तेज कैसें ॥ ३८ ॥ तरी व्यापक परात्पर प्रकाशरूप। ज्योतिर्मय पावनस्वरूप। एव पचधा तेज याचें पचधा स्वरूप। सक्षेपें दाविजेल ॥ ३९ ॥ व्यापक ह्मणिजे चराचर व्यापिलें। परात्पर ह्मणिजे यावेगळें उरलें। प्रकाश ह्मणिजे सदा संचलें। स्वप्रकाशरूप ॥ ४० ॥ ज्योतिर्मय ह्मणिजे स्वयज्योति। पावन ह्मणिजे सकळाची गति। एव तेजाची पंचधा व्यक्ति। आता उदक सांगों ॥ ४१ ॥ सर्वजीवन निर्मळ चैतन्य। अमृत समृद्ध एव पंचगुण आप जन्य। याचया पृथक्स्वरूपाचें सौजन्य। सागों सकळित ॥ ४२ ॥ सर्वजीवन ह्मणिजे जीवन सर्वांचें। निर्मळ ह्मणिजे मळरहित साचें। चैतन्य ह्मणिजे प्राणिमात्राचें। चाळक पाळक ॥ ४३ ॥ अमृत ह्मणिजे मृत्यु नसे। समृद्धि ह्मणिजे वृद्धिकारक असे। एव पचधा आप स्वरूपवशें। आता पृथ्वी किमात्मक ॥ ४४ ॥ अखड अजर आणि अनर्घ्य। कृपाण आधार एव पच समोघ। याचिया स्वरूपाचा संयोग। यथाक्रमें दाऊ ॥ ४५ ॥ तरि अखड ह्मणिजे खडिली जायना।

---

१ लक्ष देऊन ऐक. २ नवजणें = नवचणें = न जाणें. ३ अमोल. ४ 'कृपावान' शब्दाचा अपभ्रंश असावा.

अजर ह्मणिजे ह्मातारी होयना । अनर्थ ह्मणिजे करवेना । मोलमान इयेचें ॥ ४६ ॥ कृपाण ह्मणिजे क्षमावंत । आधार ह्मणिजे सकळाधिष्ठित । एवं पृथ्वी पंचगुणी अति विख्यात । महाकारण देहींची ॥ ४७ ॥ एवं पंचभूतात्मक पंचवीस तत्वें । महाकारण देहींचीं पृथक्त्वें । शुद्धरूप केवळ अनंगत्वें । पंचभूतांश जाणावे ॥ ४८ ॥ असो शुद्धभागें पंचभूतांचें । महाकारण देह जीवाचें । पांच पंचकें पंचवीसां तत्वांचें । चतुर्थ देह ज्ञानमय ॥ ४९ ॥ महाकारण देह तुर्यावस्था । याचा अभिमानी प्रत्यगात्मा चौथा । ब्रह्मरंध्र स्थान भोग तत्वतां । आनंदावभास ॥ ५० ॥ शुद्धसत्वगुण इच्छाशक्ति । ॐकारें करूनि याची अभिव्यक्ति । एव अष्टकोशात्मक उत्पत्ति । महाकारणदेहींची ॥ ५१ ॥ असो निरसिलियां देहद्वयेंसीं अन्यथाज्ञान । तुवां पुसिलें नेणोनि मी कोण । त्यासी ह्मणावें केवळ अज्ञान । तो कारणदेह तिजा ॥ ५२ ॥ ऐसें शबळ पंचभूतांचें देहत्रय । पंच्याहत्तरी येकून तत्वसमुच्चय । निरसूनि सद्गुरूनें सप्रत्यय । ब्रह्मपदीं स्थापिला ॥ ५३ ॥ सद्गुरु ह्मणती सावधान । तुवां जें पुसिलें नेणोनि मी कोण । तरी तूं केवळ ब्रह्म पूर्ण । त्यातें स्मरसी अनुदिनीं ॥ ५४ ॥ अहर्निशीं करिसी आपुलें स्मरण । तदनुसार नित्य तुझें तुज ध्यान । ऐसें असोनि पुससी मी कोण । तो तूं मूर्ख कीं स्याहाणा ॥ ५५ ॥ इतुकें महावाक्य निजकर्णीं ऐकतां । शिष्य चमत्कारोनि ह्मणे तत्वतां । जी माझें निज मजजवळीं च असतां । मी नेणपणें भांबावलों ॥ ५६ ॥ जेवि कां तें नेणपणीं व्याघ्रपिलें । धरूनि सेळक्यानें अजास्तनीं लाविलें । तें दुग्धसुखें तेथें चि रातलें । आपणा सेळी ह्मणवितसे ॥ ५७ ॥ विसरोनि मुळींचें निजरूप । सेळयातें ह्मणे आपुलीं मायबाप । स्त्री पुत्र सुहृदत्वें मानूनि पडप । सुख मानी आपुले ठाईं ॥ ५८ ॥ ऐसिया निजसुखें अरण्यांत विचरतां । ते तृणपाले चरती निजस्वभावता । आपण सेळीपणें वृक्षाखालता । छायेसी वैसला राहे ॥५९॥

१ अंग असून नसल्याप्रमाणें. २ देहामध्यें व्यापून राहणारें ब्रह्म, कूटस्थ. ३ तुर्या अवस्थेचें सुख. ४ प्राकट्य, अनुभव. ५ रतलें, गुंगलें.

तव अकस्मात तेथें थोर व्याघ्र आला। त्यासी देखोनि येरु बाळभावें चमकला। मग हळु हळु पळों लागला। त्या व्याघ्रभयेंकरूनि ॥६०॥ त्यासी व्याघ्र ह्मणे तूं कोण आहेसी। मजला देखोनि कां पळसी। येरु ह्मणे मी सेळी तू मजलागीं भक्षिसी। ह्मणोनि भयें पळतसे॥ ६१॥ ऐसें आइकोनि पिलियाचें वचन। व्याघ्र हांसिला खदखदून। ह्मणे तू केवळ आहेसी अज्ञान। आपणा आपण नेणसी॥ ६२॥ तू मुळींचा स्वयें व्याघ्र असोन। मी सेळी ह्मणविसी हे बुद्धि कोण। ह्मणोनि सेळीपणाचे अवेध सपूर्ण। त्याच्या प्रत्ययें निराकारिले॥ ६३॥ मग निजरूपींचे अवयव ऐक्यत्वें। त्यासी बिंबविले व्याघ्ररूपत्वें। ऐक्यासी येऊनि समरसत्वें। त्यासमागमें चालिला॥ ६४॥ तेवि जी भावावलेपणें हा प्राणी। मुळींचें ब्रह्मत्व दिल्हें सोडूनि। बैसला नसतें जीवपण धरूनि। मीमाझेपणें भरंगळे ॥६५॥ तव निज स्वपददानी सद्गुरु समर्थ। निरसूनि देहचतुष्टय स्वरूपीं ऐक्यार्थ। करूनि महावाक्येंसीं कृतार्थ। शिष्य निजपदीं स्थापिला॥६६॥ तेणें महावाक्याचेनि समरसें। ब्रह्मीं ऐक्यत्व लाधला अनायासें। मग स्वानंदाचिया सौरसें। अनुसंधानीं बैसला॥ ६७॥ मी जीव हे भावना सोडिली। मी ब्रह्म हे भावना दृढ जाली। जेवि भृगदर्शें अळिका आली। भृगपणा निजवेधें॥ ६८॥ तेवि मी ब्रह्म हें अनुसंधान लागतां। ब्रह्मीं ऐक्यासी आला तत्वता। मग फिरोनि पाहे जंव स्वभावता। तव देहचतुष्टय वांव देखे॥ ६९॥ ह्मणे मी मुळींचा ब्रह्म असोनि। वळघोनि नसतें अन्यथाज्ञान। देहद्वयेंसी दृढ खरेंपण। मानूनि बैसलों होतों॥ ७०॥ तव सद्गुरूनें देहद्वय निरसिलें। मज

---

१ प्रत्यक्ष अनुभवानें नाहींसे केले. २ हा इसबनीतींतील दृष्टांत या ठिकाणीं किती समर्पक आहे. ३ वरील गोष्टींतील मोठ्या व्याघ्रानें ज्याप्रमाणें लहान पिलाचा शेळीपणाचा भ्रम दूर करून, निजरूपाची ओळख करून देऊन, त्याला आपल्यासारखा करून सोडला, त्याप्रमाणें. ४ ऐक्यभावानें. ५ आत्मध्यानात. ६ आस्तिक्यबुद्धि, विश्वास. ७ व्यर्थ. ८ हृदयीं दृढ धरून, आलिंगून.

साक्षित्वें यावेगळें केलें । मग आपणासी नेणोनि धरिलें । अज्ञानात्मक कारणदेह ॥ ७१ ॥ तें हि पञ्चवीसा तत्वेंसीं निरसिलें । साक्षित्वें त्या हि वेगळें केलें । महाकारणीं नेऊनि ठेविलें । मी परब्रह्म ह्मणोनि ॥ ७२ ॥ परंतु मी येक आणि परब्रह्म येक । महाकारणीं द्वैतत्व देखिलें निष्टंक । जेथ द्वैत तेथ कैंचें स्वसुख । समरसलेंपणाचें ॥ ७३ ॥ ह्मणौनि सदृढ मनीं विचारिलें । जे हें द्वैत कासियाचें उभारलें । तवं मीपणाचे मुळीं लिगटलें । समूळ द्वैत अवघें ॥ ७४ ॥ तेथ मीपण बोलिजे स्थूळदेहसगें । तरि तें निरसिलें अष्टकोशेंसीं अवघें । तैसें चि सूक्ष्मदेह हि अव्यगें । तदनुसार ॥ ७५ ॥ येव देहद्वयात्मक अन्यथा- ज्ञान- । निराशीं उरलें अज्ञान कारण । तें हि अष्टकोशेंसीं ज्ञानें निरसून । महाकारणीं ठेविलें ॥ ७६ ॥ महाकारणदेहीं अनुसधान । मी ब्रह्म स्वसवेद्य पूर्ण । तेथ मीपणाचें करिता शोधन । मीपण समूळ मिथ्या ॥ ७७ ॥ जोंवरि देह तोंवरि मीपण । देह निरसलिया ब्रह्म पूर्ण । तेथ अष्टकोशेंसीं महाकारण । निरसोनि गेलें ॥ ७८ ॥ जाली मीप- णाची बोळवण । तेथ ब्रह्म ह्मणावया उरलें कोण । उदकीं मिळालिया अबुकण । पाहावया कोण उरे ॥ ७९ ॥ स्फुलिंग वेगळा होता जाला । तो महातेजीं समरसला । ऐसें ह्मणावया कोण उरला । वेगळेपणेंसीं ॥ ८० ॥ लवण विरालिया सागरीं । त्याची वार्ता बाहेरी कोण करी । रजरेणु जडता पृथ्वीवरी । उरे कोण सांगावया ॥ ८१ ॥ तैसें देहचतु- ष्टयनिराशें । मीपण निरसलियां ब्रह्माऐसें । जालें ह्मणावया उरलें असे । कोण कथीं कैंचें पा ॥ ८२ ॥ देहचतुष्टयें होता जीवदशे । निर्शलियां ब्रह्म आंपैसें । वटमठीं बिंबतां घटमठाकाशें । घटमठभगीं महदाकाश ॥ ८३ ॥ उदक होतें तोंवरि प्रतिबिंब । उदक आटलिया महाबिंब । तेवि देह निरसलिया ब्रह्म स्वयंभ । सहजस्थिति ऐक्यत्वें ॥ ८४ ॥ एवं देहद्वयेंसीं अन्यथाज्ञान । निरसतां कारणदेहेंसीं अज्ञान । महाकारणीं

---

१ निश्चित. २ लागलें, स्पर्शलें. ३ पृथ्वीशीं मिळून जात असताना. ४ आपलें आपण.

प्राप्त होय ज्ञान । स्वानुभवें विज्ञानस्थिति ॥ ८५ ॥ ते पुढीलिये कीर्णी विज्ञानस्थिति । साकल्य सांगिजैल यथामति । स्वानुभवदिनकरीं सुखसंवित्ति । विज्ञानदशा सहजें चि ॥ ८६ ॥ अन्यथाज्ञानीं केवळ अहपण । तन्निरासीं अज्ञानीं प्रगटे कोहपण । ज्ञानप्राप्ति होतां सोहपण । नाहपणें विज्ञानस्थिति ॥ ८७ ॥ तें विज्ञानस्थितीचें लक्षण । सांगतां प्रगटेल विज्ञानकीर्ण । दिनकर रामींरामदासीं शरण । सहजस्थिति अनन्यत्वें ॥ ८८ ॥ स्वस्ति श्रीस्वानुभवदिनकरे गुरुशिष्यान्वये येकादश कळापे महाकारणदेहनिरशन ज्ञानप्राप्तिनिरूपणं नाम चतुर्थ कीर्ण प्रकाश: ॥ ४ ॥ श्रीराम जयराम जयजयराम ॥

---

॥ श्रीराम ॥

नरदेहासी आलियाचें कारण । भावें रिघावें सद्गुरूसी शरण । विचारूनिया आत्मज्ञान । विज्ञानस्थिति साधावी ॥ १ ॥ तरि ते विज्ञानस्थिति किंलक्षण । तियेचें सांगिजेल निरूपण । श्रोतीं होऊनियां सावधान । श्रवण केलें पाहिजे ॥ २ ॥ आतां संतांसी क्षणक्षणा सावध व्हा ह्मणणें । हें चि वाटे अति लाजिरवाणें । काय सूर्यासी सोज्वळ होणें । प्रतिदिनीं आहे ॥ ३ ॥ का तें कल्पतरूसी उदार होय ह्मणतां । आपणासी काय ते गोष्टीची [३]श्लाध्यता । चंद्रासी ह्मणितलया सीतळता । धरील कीं काय ॥ ४ ॥ अढळ होय ह्मणतां ध्रुवासी । मूर्खता येवों

---

१ आत्मज्ञान २ प्रत्येक जीवाच्या ज्या चार अवस्था असतात, त्यांपैकीं बद्ध ह्मणजे च अन्यथाज्ञानी, तो या जगात कोणी मोठा असेल तर तो मी च असें समजतो कर्मधर्मसंयोगानें तो मुमुक्षु दशेंत आल्यावर भांबावून जातो ह्मणजे वस्तुस्थितिसंबंधानें अज्ञानी बनतो व प्रश्न करतो कीं मी मोठा नव्हे तर मग मोठा कोण व मी कोण ? पुढें गुरुमुखानें ज्ञानप्राप्ति झाल्यावर तो साधक दशेंत येतो व सर्वांत मोठा, सर्वशक्तिमान असा परमेश्वर ह्मणून कोणीएक आहे व वस्तुतः पाहतां तो मी च आहे असें ज्ञान त्यास होतें; व नंतर याच ज्ञानाचा अभ्यास करतांकरतां मी किंवा इतर वस्तु या कांहींएक नसून एक परमेश्वर अर्थात् ब्रह्मस्वरूप सर्वत्र भरलें आहे, त्याव्यतिरिक्त कांहीं नाहीं, असा जो अनुभव येतो, ती च विज्ञानस्थिति, तिला च सिद्धदशा असें ह्मणतात. ३ योग्यता.

पाहे आपणासी । काय गंभीरता तया सागरासी । देणें घडेल ॥ ५ ॥ तरि ज्याचे ठाईं जो असे सहजगुण । त्यासी आरोपितां लागे दूषण । संतांसी व्हा ह्मणतां सावधान । ह्मणतां चि मूर्ख दिसे ॥ ६ ॥ कां जे ज्याचा जो असे नित्य व्यासग । तेथ न सागतां सहज चि तें अव्यग। गगनासी चचळ होय ह्मणता चांग । आग्रहो चि उरे ॥ ७ ॥ वायूसी करितां हि निश्चळ । स्थिर न होय येक घटी पळ । अग्नीसी होय ह्मणतां सीतळ । तें ह्मणणें चि मूर्खत्व ॥ ८ ॥ तेवि ज्याचा जो सहज स्वभाविक गुण । त्यासी उपलक्षण देतां लागे दूषण । संत त्रैअवस्थीं नित्य सावधान । तुर्यारूप जे कां ॥ ९ ॥ जे विश्वातीत विश्वदेखणे । त्यांसी सावध व्हा ऐसें कोण ह्मणे । काई महातेजासी उटणें । देणें घडेल ॥ १० ॥ अहो संताचिया सावधपणें । ग्रंथमात्रीं जगमान्य होणें । वेद शास्त्रें स्मृति पुराणें । ज्यांकरितां थोरावलीं ॥ ११ ॥ जरि हे संत सावध नसते । तरि ग्रंथमात्र कोण आइकते । आणि सारासार विचार करिते । संतांवीण कोण तऱ्हि ॥ १२ ॥ ह्मणौनि संत या विश्वाचे तारक । अनाथदीनजनसंरक्षक । शरणागतवत्सळ मोक्षदायक । भावीक जनांसी ॥ १३ ॥ सत केवळ स्वानुभवदिनकर । वंगरहित अक्षई सुधाकर । सच्चरित गुणरत्नाकर । सत्कृपापयोद ॥ १४ ॥ संत सात्विकांची कामधेनु । संत मुक्तिपाथिकां सतेज भानु । संसार-हिंवें हिंवेलीयां हुताशनु । त्रितापोपशम सत ॥ १५ ॥ सत विरक्तीचें भाडार । संत निजदयेचे आगर । शांतीचें सदैव बिढार । या सतांपासीं ॥ १६ ॥ सत क्षमेचें येकायतन । सत कैवल्यपदाचें वतन । सत साम्राज्यसुखनिधान । स्वपददानी ॥ १७ ॥ सत शर-णागतां मोक्षदायक । संत भाविकांचे नित्य तारक । सत सुखसंतो-

---

१ रूप लावण्य अभ्यासिता न ये । सहज गुणास न चले उपाये । कांहीं तरी धरावी सोये । अगांतुक गुणाची ॥ दास १४-६-१. २ अगातुक गुण. ३ विश्वापासून निराळे राहून. ४ सर्व विश्वातें अवलोकन करणारे ५ कलंकरहित. ६ चद्र. ७ समुद्र. ८ सत्कृपारूपी पाणी देणारे. ९ ससाररूपी हिंवानें ( थडीनें ) पछाडलेल्यांना. १० स्थान ११ एक च स्थान.

षाचें बीकें । स्वानंदाचे वोतले ॥ १८ ॥ ऐसें ऐकतां संतस्तवन । स्वानदाचेनि बीकें सतोषोन । ह्मणतिलें ग्रथामाजीं वेवधानें । स्तवनाचें किंनिमित्य ॥ १९ ॥ सखया तू जें जें सहज बोलसी । तेणें दोंदें निघती स्वसुखासी । गोडां आणि आर्ंषा बोलासी । ऐकावें चि वाटे ॥ २० ॥ तरि तू जें सतलक्षणें बोलसी । तें यथार्थ पैं सर्वस्वेंसीं । परि तुझिया मुखें विज्ञानस्थितीसी । ऐकावें चि वाटे ॥ २१ ॥ इतुकें सतवाक्य ऐकतां । जी जी ह्मणौनि दिनकर नम्रता । रामदासीं शरण स्वभावता । बोले स्वानुभवदिनकर ॥ २२ ॥ असो यानतर अन्यथाज्ञानेंसीं । आत्मा वेगळेपणें साक्षी देहद्वयासी । पन्नासां तत्वीं षोडश कोशेंसीं । कैसा तो सागिजेल ॥ २३ ॥ मुळीं पचभूतांचें स्थूळ सुक्षम देह । दोन्ही मिळोनि पन्नास तत्वसमूह । यावेगळा आत्मा निःसदेह । तत्साक्षित्वें चि वर्ते ॥ २४ ॥ तेथ पाचां भूतांचीं पचवीस तत्वें । स्थूळ देहीं असती पृथकत्वें । काम क्रोध शोक मोह भय पचकत्वें । आकाशजनित ॥ २५ ॥ चळण वळण प्रासारण आकोचन । निरोधन एव पचकें प्रभंजन । क्षुधा तृषा आळस्य निद्रा मैथुन । मिळोनि तेजपंचक ॥ २६ ॥ लाळ मूत्र शुक्र श्रोणीत मज्जा । अस्थि मांस त्वचा नाडी रोम समाजा । मिळोनि उदक आणि पृथ्वी वोजा । दों पचकेंसीं ॥ २७ ॥ इतुकें मिळोनि स्थूळ देह । आत्मा याचा साक्षी निसंदेह । का जे वेगळेपणें सुखदुखावरोह । याचेनि सगें भोगी ॥ २८ ॥ ह्मणे मज काम क्रोध निर्माण जाले । शोक मोहें माझें अतर व्यापिलें । ऐसें ह्मणता सहजें चि साक्षित्व आलें । वेगळेपणें यालागीं ॥२९॥ जरि हा कामक्रोधस्वरूप स्वयें असता । तरि येरयेरांच्या सुखदुखें स्वयें न बुझता । आणि माझेंपणें फुंजों न लागता । शरीराचेनि सगें ॥३०॥ ह्मणौनि हा साक्षी होय परिछिन्न । नाचों लागे स्थूळ देह माझें ह्मणोन ।

---

१ शोभा, तेज. २ अडथळा. ३ स्वसुखाचें पोट फुगलें ह्म० सुखाचा अतिरेक झाला. ४ बोबडे, लडिवाळपणाचे. ५ समुच्चय. ६ अवरोह=उतरणें, कमी कमी होणें; कमजास्तपणा. ७ परस्परांच्या. ८ दचकला नसता किंवा भिऊन न पळता.

माझेंपणें यासी वेगळेपण । दिसोनि आलें सहजें ॥ ३१ ॥ ज्या ज्या तत्वावरी हा हात ठेवी । त्यासी वेगळेपणें चि बुझावी । ह्मणोनि आत्म्यासी वेगळेपणाची पदवी । स्थूळदेहेंसी सहजें ॥ ३२ ॥ जेथ स्थूळदेहींचें साक्षित्व आलें । तेथ जागृतावस्थेस हि तें चि जालें । जागृतीमाजीं जें जें कर्म केलें । त्याचें साक्षित्वें सुख दुख भोगी ॥ ३३ ॥ आतां जागृतिअवस्थेचा विश्वअभिमानी । ब्रह्याचा अंश स्थूळदेहीं वर्ते अनुदिनीं । त्याचा हि साक्षी आत्मा वेगळेपणीं । सहजें चि जाला ॥ ३४ ॥ स्थूळदेहीं जागृतिअवस्था विश्वअभिमानी । त्याचें वास्तव्य नेत्रस्थानीं । त्याचा हि साक्षी आत्मा वेगळेपणीं । सहज चि जाला ॥ ३५ ॥ स्थूळदेहीं जागृतिअवस्थेसी सुखदुखभोग । आत्मा त्याचा हि साक्षी होय अव्यंग । स्थूळदेहीं रजोगुण क्रियाशक्तीसीं भिन्नांग । आत्मा सहजें चि कीं ॥ ३६ ॥ या इतुकियांचा प्रणवीं अकार चरण । त्याहूनि आत्मा साक्षित्वें विलक्षण । एव अष्टकोशसहित होय भिन्न । स्थूळदेहेंसीं आत्मा ॥३७॥ आतां लिंगदेह जें सुक्षमात्मक । पचवीसा तत्वीं पंचभौतिक । त्रिगुणजन्य जें अष्टकोशात्मक । त्यासी हि आत्मा साक्षित्वें ॥ ३८ ॥ प्रथम सत्वगुणाची ज्ञानशक्ति । तीपासाव अतःकर्णपचक आलें व्यक्ती । अतःकर्ण मन बुद्धि चित्त अहंकाराकृति । हें आकाशाचें तत्वपचक ॥ ३९ ॥ मग रजोगुण क्रियाशक्तीसी । प्रसवला पधरा तत्वांसी । ज्ञानेंद्रियें कर्मेंद्रियें प्राणपंचकेंसीं । येकुन जालीं पधरा ॥ ४० ॥ व्यान समान उदान प्राण अपान । श्रोत्र त्वचा चक्षु जिव्हा घ्राण । वाचा पाणी पाद शिस्न गुद मिळोन । रजोगुणजन्य पधरा ॥ ४१ ॥ मग तमोगुण द्रव्यशक्तीसीं । प्रसवला पचविषयांसी । शब्द स्पर्श रूप रस गंधासी । येव मिळोनि पांच ॥ ४२ ॥ एवं त्रिगुण आणि पचभूतांचीं । मिळोनि पचवीस तत्वें लिंगदेहींचीं । आत्मा साक्षित्वें यावेगळा चि । वर्ते कार्यकारणत्वें ॥४३॥ ज्या ज्या तत्वाचें जें जें कार्य । तेथें वेगळेपणें

---

१ समजे. २ मी, माझें असा जागृतिअवस्थेंतील अभिमान धरणारा जीव.

आत्मा आचार्य[1] । कारणानुसार कार्य अकार्य । तत्साक्षित्वें चि संपादी ॥४४॥ अंत:करणसगें व्यानाधारें । श्रोत्रेंद्रिईं आत्मा संचरे । शब्द आयकोनि तदनुसारें । उत्तर दे निज वाचे ॥ ४५॥ तैसें चि मनाचेनि सगें समानाधारें । आत्मा त्वचेंद्रियामार्जीं सञ्चरे । स्पर्शविषय घेऊनि निजकरें । करी स्वीकार त्याग ॥ ४६ ॥ तैसें चि बुद्धीचेनि संगें उदानाधारें । आत्मा चक्षुइंद्रियामार्जीं सचरे । रूपविषय पाहोनि आदरें । निजपदीं गमन करी ॥ ४७ ॥ तैसें चि चित्ताचेनि सगें प्राणाधारें । आत्मा जिव्हेंद्रियामार्जीं सचरे । रसविषय घेऊनि आदरें । शिस्नेंद्रिईं त्याग करी ॥ ४८ ॥ तैसें चि अहकारसगें अपानाधारें । आत्मा घ्राणेंद्रियामार्जीं संचरे । गधविषय घेऊनि त्याचा गुदद्वारें । त्याग करी मळ दुर्गंधी ॥ ४९ ॥ एव सूक्ष्म देहीं पंचवीसा तत्वेंसीं[2] । आत्मा साक्षित्वें वर्त्ते कार्यकारणेंसीं । ह्मणिजे त्यावेगळा चि होय निश्चयेंसीं । यदर्थी सदेह काय ॥ ५० ॥ जेथें देहीं च आत्म्यासी वेगळेपण । तेथ सूक्ष्म देहींची अवस्था स्वप्न । तरि तें[3] चि आत्मा हें कदापि वचन । बोलों ये काय ॥५१॥ सूक्ष्म देहीं स्वप्नावस्था[4] तैजसाभिमानी[5] । त्याचा हि आत्मा साक्षी भवसेनि । वस्माचें वास्तव्य कंठस्थानीं । आत्मा त्या हि वेगळा असे ॥ ५२ ॥ सूक्ष्म देहीं प्रविविक्तभोग[6] वसे । त्याचा हि साक्षी आत्मा असे । ज्ञानशक्तीसीं सत्वगुण विलसे । आत्मा त्या हि वेगळा चि ॥ ५३ ॥ सूक्ष्म देह अष्ट कोशेसीं मिळोन । प्रणवाचा उकार द्वितीय चरण । आत्मा त्याहिहून विलक्षण । वेगळेपणें साक्षी ॥ ५४ ॥ एव स्थूळसूक्ष्मात्मक अन्यथाज्ञान । आत्मा साक्षित्वें देहद्वयविलक्षण[7] । तरी अज्ञानात्मक जें देह कारण । तें कदाचित आत्मा होईल[8] ॥ ५५ ॥ तेथ आपणासी नेणोनि

---

१ श्रीगुरु. २ आत्मा सूक्ष्म देहांत वास करीत असताना कशा रीतीनें व्यवहार करतो, तें या खालच्या पांच ओव्यांत दाखविलें आहे. ३ देह ह्मटला, मग तो कोणता हि असो, कीं तो आत्म्याहून वेगळा, हा सिद्धांत आहे. ४ स्वप्नावस्था. ५ स्वप्नदेहाचा अभिमान धरणारा जीव. ६ स्वप्नस्थान किंवा मनोराज्य यांतील अस्पष्ट भोग ते. ७ स्थूल सूक्ष्म देहाहून निराळा. ८ ही शंका घेतली आहे.

ह्मणे मी कोण । त्या नांव केवळ मुख्य अज्ञान । अज्ञान ह्मणिजे वृत्ति शून्यें । शून्यत्वीं आकाश जडलें ॥ ५६ ॥ शून्य ऐसें आकाशासी ह्मणावें । आकाश पचभूतात्मक जाणावें । पचभूतीं तत्वसमुचय आघवे । पाचां पंचकेसीं ॥ ५७ ॥ येथें अशका गूढ उठिली । जे[३] आकाशीं पचभूतें कैसीं देखिलीं । भूतें केवळ गुणांत आलीं । आकाश निर्गुण असे ॥ ५८ ॥ परब्रह्म आणि आकाशासी । वेगळिक न दिसे निश्चयेंसीं । ऐसें असोनि पचभूतें आकाशीं । किंलक्षण देखिलीं जी ॥५९॥ तर ये अशंकेचें प्रत्युत्तर । चतुर्दश कळापीं[४] देइजेल सादर । प्रस्तुत कारणदेहींचा तत्वप्रकार । पचभूतान्वय सांगिजेल ॥ ६० ॥ तेथ कारणदेह पचभूतात्मक । पांचांचीं पंचवीस तत्वें अवश्यक । कोणतीं तें यथानुमक्रणिक । अष्टकोशेंसीं दाऊं ॥ ६१ ॥ तरि मद मत्सर दभ कृत्रिम अनित्य । हें कारणदेहींचें आकाशपंचक सत्य । उन्माद वासना वाछा चिंता चेष्टा हें कृत्य । वायुपचकाचें ॥ ६२ ॥ निद्रा भ्रम अभिळाश विस्मृति । हे कारणदेहीं तेजपंचक सभूंति[६] । करुणा कल्पना भ्राति प्रमाद अनर्थी । मिळोनि उदकपंचक ॥ ६३ ॥ आता अवकाश अज्ञान अविवेक । वंचन मूर्छा मिळोनि पृथ्वीपचक । यांसी आणि आत्म्यासी उदड वेगळिक । याच्या साक्षित्वें वर्त्ते आत्मा ॥ ६४ ॥ हा आपणासी नेणोनि ह्मणे मी कोण । हें केवळ अज्ञानाचें लक्षण । अहो मी मज न कळे हें काय ह्मणे जाणोन । किं नेणपणें बोलतसे ॥६५॥ तरि मी मज न कळे हें जाणोनि ह्मणे । तेथ आत्मा साक्षित्वें वेगळेपणें । कारणदेहासी परिछिन्न जाणे । तो आत्मा [७]तें चि कैसा ॥ ६६ ॥ ह्मणौनि आत्मा कारणदेहाचा साक्षी । वेगळेपणें त्यासी निरीक्षी । कारणदेहींची सुषुप्तिअवस्था तीस हि लक्षी । आत्मा वेगळेपणें ॥ ६७ ॥ ह्मणे मज निद्रा होती लागली । का ते माझी झोंप येणें मोडिली । येव

---

१ शून्यवृत्ति=कांहींएक न करतां स्वस्थ राहणें. २ एकदर सर्व ३ कीं. ४ कलाप १४ किरण ३ यात. ५ या पचकातील 'मरण' हा शब्द चुकून गळाला असावा. ६ उत्पत्ति. ७ कारणदेह.

वेगळेपणें अवस्था लक्षिली । तेथ सुषुप्तीचा साक्षी आत्मा ॥ ६८ ॥ कारणदेह सुषुप्तिअवस्था प्राज्ञअभिमानी । त्याचा आत्मा साक्षी भर्व-सेनि । सुषुप्ति वसे हृदयभुवनीं । आत्मा हृदयासी वेगळा ॥ ६९ ॥ कारणदेहीं आनदभोग । आत्मा साक्षित्वें आनदभोगीं अव्यग । तमोगुण आणि द्रव्यशक्तीसीं अभग । आत्मा वेगळेपणें असे ॥ ७० ॥ एव अष्टकोशेसीं कारणदेह । प्रणवाचा तृतीय[1] चरण निसदेह । आत्मा साक्षित्वें वर्ते समूह । देहत्रयांचा लक्षूनि ॥ ७१ ॥ एवं शबळ पचभूतात्मक देहत्रय । पच्याहत्तरि तत्वाचा समुदाय । आत्मा अतिक्रमूनि साक्षित्वें अन्यय । चोविसां हि कोशेंसीं ॥ ७२ ॥ क्रमूनि[2] अन्यथाज्ञानेंसीं अज्ञान । आत्मा साक्षित्वें यावेगळा परिछिन्न[3] । तरि कदाचित शुद्ध पंचभौतिक महाकारण । आत्मा तें[4] चि होईल ॥ ७३ ॥ जेव्हां आत्मा या देहत्रयांसी विलक्षण । तेव्हां होईल शुद्ध महाकारण । याची वोळखी व्हावयासी आत्मज्ञान[5] । गुरुमुखें विचारावें ॥ ७४ ॥ गुरुमुखें विचारितां आत्मज्ञान । आत्मा परब्रह्म होय परिछिन्न । महावाक्याचें केलियां विवरण । आत्मगुरुशास्त्रप्रचिति[6] ॥ ७५ ॥ तेथ देहत्रयां विलक्षण[7] । अहं ब्रह्म ऐसें जें स्मरण । तें चि देह महाकारण । ज्ञानात्मक चतुर्थ ॥७६॥ परि तेथ मी येक आणि ब्रह्म येक । हा नित्य स्मरणाचा करिता घोक । मीपणें द्वैत उभारलें सम्यक । तें निरसिलें पाहिजे ॥ ७७ ॥ मी जीव हें शबळ मीपण सुटलें । परि मी आत्मा हें शुद्ध मीपण जडलें । शुद्ध मीपणीं अवश्य उभारलें । पचभौतिक महाकारण ॥ ७८ ॥ तेथ पांचा भूतीं पचवीस गुण । त्याचें कीजेल शुद्ध विवर्ण[8] । शुद्ध पचभूतात्मक महाकारण । अष्टकोशसहित ॥ ७९ ॥ तेथ प्रथम आकाश पचगुण । पूर्ण अज अदाह्य अक्लेद्य अशोष्य मिळोन । असग अछेद्य ऊर्ध्व जीवन कारण । एवं पचधा वायु ॥ ८० ॥ व्यापक परात्पर प्रकाश

---

१ मकार मात्रा. २ ओलाङून. ३ व्याप्ति, सदर्प. ४ महाकारण देह. ५ इतर सर्व ज्ञान वाचून, लिहून, मनन करून वगैरे साधनानें होईल, परतु आत्मज्ञान गुरुमुखें च विचारावें. ६ त्रिविधा प्रतीति. ७ निराळें. ८ सविस्तर निरूपण.

ज्योति पावन । एवं महाकारणीं तेज पचगुण । सर्वजीवन निर्मळ चैतन्य अमृत समृद्ध मिळोन । पचधा उदक ॥ ८१ ॥ अखड अजर अनर्घ्य कृपाण आधार । एवं मिळोनि पृथ्वी पचगुण साचार । पचभौतिक पचवीस तत्वप्रकार । महाकारण देहींचे हे ॥ ८२ ॥ सोहं ब्रह्म हें अनुसधान । जीवासी अहर्निश असता जाण । तें विसरोनि देहसगें अहंपण । धरूनि बैसला नसतें चि ॥ ८३ ॥ तेथ देहत्रयाचें होतां निरशन । जीवाचें सुटलें अहकोहंपण । परंतु महाकारणीं जडलें सोहपण । तें निरशलें पाहिजे ॥ ८४ ॥ तरि सोह या शब्दाचें अर्थ-विवरण । तो मी आत्मा परिछिन्न । जो ब्रह्माचा अंश पूर्ण । निर्गुण निरामय जो ॥ ८५ ॥ तरि महाकारण देह माझें । ऐसें आत्मा वाहे मीपणाचें वोझें । तेथ सत्वनिराशें मीपण वोजें । आत्मयाचें निरशलें ॥ ८६ ॥ आत्मा महाकारणाचा साक्षी जाला । तेथ कोण पुसे तुर्या-वस्थेलों । तियेचा हि हा साक्षी जाला । वेगळेपणें सहजें ॥ ८७ ॥ तुर्येचा अभिमानी प्रत्यगात्मा । प्रत्यक् ह्मणिजे वेगळा आत्मा । तरि हा वेगळेपणाची हि सीमा । क्रमूनि गेला पैलाड ॥ ८८ ॥ महाकारण देहीं तुर्यावस्थेचें । ब्रह्मरध्र स्थान जें कां साचें । तें येकदेशीपणें प्रत्य-गात्मयाचें । ह्मणौनि येणें सोडिलें ॥ ८९ ॥ प्रत्यगात्म्याचा आनदाव-भास भोग । तो येणें साक्षित्वें जाणोनि सवेग । अतरात्मपणें स्वानद-भोग । उन्मनिरूप सहजस्थिति ॥ ९० ॥ इछाशक्तीसीं शुद्ध सत्वगुण । अर्द्धमात्रात्मक चतुर्थ चरण । आत्मा यांचा साक्षी परिछिन्न । तो चि हे कैसेनि ॥ ९१ ॥ येव साक्षित्वें निरशलें महाकारण । तुर्यावस्था प्रत्यगात्मा मूर्ध्निस्थान । आनदावभास इछाशक्ति शुद्ध सत्वगुण । अर्द्धमात्रेसहित ॥ ९२ ॥ असो अष्टकोशेंसीं निरशतां महाकारण । नाहपणें निरसिलें सोहपण । सहजें आत्मा परब्रह्म परिपूर्ण । विज्ञानस्थिति ऐक्यत्वें ॥ ९३ ॥ मग

---

१ स्थूल सूक्ष्म देहांच्या सहवासानें अहपण व कारण देहामुळें कोहपण. २ याचा सबध 'ब्रह्म' शब्दाकडे. ३ वर ओव्या ८०, ८१, ८२ यात सागित-लेल्या २५ तत्त्वांचें निरसन झालें ह्मणजे. ४ समाधिरूप चौथ्या अवस्थेला. ५ पलीकडे. ६ मनाचें लीनत्व होतें अशी पांचवी अवस्था ती.

नाहंपणें सहजस्थिति । आत्मानुसंधानाचिया संविर्त्ति[1] । परब्रह्मैक्यें स्वसुखानुभूति । स्वानुभवदिनकरीं ॥ ९४ ॥ परब्रह्मीं लाहोनि ऐक्यता । स्वानुभवदिनकरीं स्वभावता । स्वानंदसाम्राज्यसुख भोगितां । सहजस्थिति संतोष ॥ ९५ ॥ मग सहजस्थितीं सावकाशें । स्वानंदसुख भोगिजे संतोषें । स्वानुभवदिनकरीं स्वयंप्रकाशें । रामींरामदासकृपा ॥९६॥ रामदासकृपेचा लाधतां अन्वय । स्वानुभवदिनकरीं स्वानंदमय । अन्यथाज्ञानेंसीं अज्ञानाचा होऊनि लय । आत्मज्ञानें विज्ञानस्थिति ॥ ९७ ॥ अहो अज्ञानकाष्ठीं ज्ञानाग्नि स्पर्शतां । काष्ठाकारें ज्ञानाग्नि प्रगटोनि तत्वता । ज्ञानाग्नि अज्ञानकाष्ठ पुढें न दिसतां । सस्वरूपीं लय विज्ञानस्थिति ॥९८॥ प्रत्यावृत्ति[2] स्वरूपानुसंधान । फिरोनि पाहाणें आपणासी आपण । सस्वरूपीं केवळ समरसलेंपण । त्या नांव बोलिजे विज्ञानस्थिति ॥ ९९ ॥ उदकस्पर्शीं मीठपण हारपलें । परि क्षारतेसीं होतें अल्पत्वें राहिलें । तें महार्णवीं जेवि मधुरत्व आंतलें[3] । तेवि जाणिजे विज्ञानस्थिति ॥१००॥ का जेवि दीपसंगें कर्पुर बबाळला । सर्वें चि कर्पुर काजळी ना दीप देखिला । तेवि अज्ञानेंसीं ज्ञानाचा लय जाला । या नांव बोलिजे विज्ञानस्थिति ॥ १ ॥ असो ऐसी हे विज्ञानस्थिति । रामींरामदासकृपा आत्मसंवित्ति । स्वानुभवदिनकरीं सहजस्थिति । रामचंद्रीं निज ऐक्य ॥ २ ॥ एवं सहजस्थिति रामदासीं । स्वानुभवसुख दिनकरासी । निजऐक्यता समरसी । दिनकर रामींरामदास ॥ ३ ॥ सहजस्थिति दिनकररामदासीं । ज्ञान समरसे विज्ञानेंसीं । स्वभावता कार्यकारणेंसीं । ब्रह्मैक्यबोधें रामचंद्र ॥ ४ ॥[4] असो ब्रह्मैक्यबोधें सहजस्थितीसीं । स्वानुभवदिनकर रामदासीं । समरसला हें हि ह्मणावयासी । न दिसे चि कोण्ही ॥ ५ ॥ आतां दिसणें न दिसणें दोन्ही । दिनकरें रामदासीं

---

१ आत्मानुसंधानाच्या ज्ञानानें ह्मणण्यापेक्षां अभ्यासानें. २ प्रत्यगावृत्ति=स्वस्वरूपाकार वृत्ति ती. ३ आतणें=स्पर्शणें. ४ ब्रह्मैक्यबोधानें, ज्ञान कारण, विज्ञान कार्य, हीं दोन्हीं एकरूप झाल्यामुळें, दिनकर व श्रीरामदास समरसून केवळ रामरूप बनले

समरसूनि । स्वानुभवदिनकर निजवदनीं । उद्गार देतसे सुखें ॥ ६ ॥ उद्गार देतां सहजस्थितीं । रामदासीं ठसावली वृत्ति । तेणें अतर्बाह्य त्रिज्ञानाकृति । दिनकर रामीरामदास ॥ ७ ॥ स्वानुभवदिनकरीं रामदास । अतर्बाह्य व्यापले सावकाश । दिनकराचे हृदईं स्वयप्रकाश । रामीरामदास स्वलीळा ॥ ८ ॥ तेणें वाटे मुखीं रामदास गावे । जिव्हे रामदास उच्चारावे । निजकरीं रामदास पुजावे । अनता उपचारीं ॥९॥ नेत्रीं रामदास पाहावे । कानीं रामदासचरित्र ऐकावें । रामदासपदींचें जिघ्रावें । निर्माल्य घ्राणें ॥ ११० ॥ वोष्ठीं रामदासपदीं चुंबन । पदांगुष्ठ चोखावे चुरचुरून । रामदासांपुढें करावें नर्त्तन । निजपदीं सहजस्थितीं ॥ ११ ॥ मस्तकीं रामदास वदावे । हृदईं रामदास आलिंगावे । कडकडूनि सर्वांगेंसीं भेटावें । रामदासीं सहजास्थितीं ॥ १२ ॥ निजहृदईं रामदास सांटवावे । स्कधीं रामदास बैसवावे । पाठीसीं रामदास घालावे । वाम सव्य सहजस्थितीं ॥१३॥ एवं विज्ञानस्थितीचिया संतोषें । सहजस्थितीचिया अवकाशें । स्वानुभवदिनकरीं स्वयंप्रकाशे । श्रीरामदासकृपा ॥१४॥ ते कृपेचा लाहोनि सावेवो । अन्यथाज्ञानेंसीं अज्ञान वोवो । ज्ञानेंसीं विज्ञानस्थितीसीं आवो । ब्रह्मैक्यबोधें घातला ॥१५॥ केलें देहचतुष्ट्यनिरशन । पंचीकर्ण महावाक्यविवरण । ब्रह्मैक्यबोधें ऐक्यपण । दिनकररामीरामदासीं ॥ १६ ॥ या रीतीं दिनकरें कार्यकारणीं । अतर्वृत्तीसी सयम करूनि । रामदासीं ऐक्यत्वें समरसोनि । आत्मानुसंधानेंसीं ॥ १७ ॥ एवं येकात्मता अंतर्वृत्तीसी सयम । होतां बाह्येंद्रियां सहज चि नियम । सकळ हि कामना छेदूनि निःकाम । रामदासीं सहजस्थिति ॥ १८ ॥ आत्मप्रत्याहारें दिनकरासी । ध्यान सहज चि प्राप्त रामदासीं । आत्मानुसधानाचिये धारणेसी । रामदासीं सहजस्थिति ॥१९॥ मग सहजें चि साधे आसनजय । दिनकर रामदासीं धरितां निश्चय ।

---

१ हुगावें. २ सामर्थ्यानें. ३ वरील १०९ ते ११३ ओंव्या वाचून दिनकरांची सद्गुरुभक्ति किती उच्च प्रकारची होती व त्यांच्या वाणींत प्रेमळता किती ओतप्रोत भरली आहे याची कल्पना होते. ४ साह्य. ५ व्यर्थ. ६ आकार, डौल.

तेणें समाधीचा हि लाभे अन्वय । रामदासीं सहजस्थिति ॥ १२० ॥ ऐसी दिनकरासी अखड समाधि । रामदासीं सहज भजनविधि । समाधिव्युथ्थानाची सिद्धि । रामदासीं सहजस्थिति ॥ २१ ॥ येथ स्वानुभवदिनकरीं आयतीं । ज्ञानेंसीं विज्ञानदशा सहजस्थिति । दिनकररामदासीं भजनसंवित्ति । अष्टांगयोग सहज ॥ २२ ॥ असो अन्यथाज्ञान अज्ञान ज्ञान । सांगोनि देहचतुष्टयविवरण । महावाक्याचें लागतां अनुसंधानें । विज्ञानस्थिति सहजें चि ॥ २३ ॥ येथ कोण्ही धरील अंतरीं संशय । जे सेंभरां तत्वांसीं देहचतुष्टय । सांगितला यासी काय आश्रय । तरि निराश्रय कोण बोलेल जी ॥ २४ ॥ सकळ शास्त्रात मुख्य शास्त्र । वेदांतशास्त्र अति पवित्र । तेथ पंचीकर्णमहावाक्य स्वतंत्र । तदनुसार हें बोलिलें ॥ २५ ॥ ज्याचिये मनीं संदेह उद्भवे । तेणें वेदांतशास्त्र विचारावें । विचारूनि पचीकर्णमहावाक्यें पावावें । निज समाधान ॥ २६ ॥ दिनकर समदासीं शरण । रिघोनि स्वानुभवदिनकरीं विज्ञान । सहजस्थिति सुखसमाधान । स्वानदसाम्राज्यसंतोषें ॥ १२७ ॥ स्वस्ति श्रीस्वानुभवदिनकरे गुरुशिष्यान्वये येकादश कळापे देहचतुष्टय महावाक्यविवरण विज्ञानस्थिति निरूपणं नाम पचम कीर्ण प्रकाशः ॥ ५ ॥ कळापवोवीसख्या ५०५ ॥

---

## ॥ ब्रह्मांडदेहचतुष्टयनिरास, पिंडब्रह्मांडऐक्य ॥
## ॥ आणि मायाब्रह्मनिवाड कलाप बारावा ॥

॥ श्रीरामचंद्र ॥

ॐ नमो सद्गुरु ब्रह्मांडनायक । अनत ब्रह्मांडें करूनि संम्यक । सेवटीं अकर्तेपणाचें बीक । न मोडे आंगीचें ॥ १ ॥ जैसी कां ते

---

१ आपोआप. सद्गुरुस्वरूपी परमेश्वराच्या ठिकाणीं एकरूपता बाणल्यावर अष्टांगयोगाचें साधन करण्याचे प्रयास करावयास नको; तीं सहजरूपानें च घडत असतात. २ ध्यान. ३ विचारयुक्त पाहावें. ४ तेज.

औदुंबरवल्ली । निजांगीं उबरें दिसती लगडलीं । तैसीं तुमचा आंगीं ब्रह्मांडें अनंत जडलीं । परि निसगपणेंसीं ॥ २ ॥ का ते गगनीं जेवि गंधर्वनगरें । होती क्षणामाजीं नानाकारें । तेवि तुमचा स्वरूपीं क्षणावसरें । लयोद्भव अनेक ॥ ३ ॥ अथवा ते जळावरी नाना तरंग । का ते सुवर्णीं अळंकार अनेग । कीं महातेजीं नानाकारें स्फुलिंग । उठिती असंख्य ॥ ४ ॥ तेवि जी श्रीगुरुराया चक्रवर्ती । अनंत ब्रह्मांडें तुमचा आंगीं उद्भवती । पुन्हा सर्वे चि विलया जाती । देखतदेखता चि ॥ ५ ॥ का ते पृथ्वीचे आंगीं नानाकारें घट । होती जाती अनेक प्रकारें सवाट । परि ते पृथ्वीसी कर्त्तेपणाचें कचाट । काय लागेल तन्हि ॥ ६ ॥ पाहा राजाज्ञेनें सकळ जग चाले । परि त्याच्या कर्त्तत्वें राजा न हाले । सूर्यप्रकाशामाजीं प्राणिमात्र खेळे । परि शुभाशुभीं तो अलिप्त ॥ ७ ॥ तेवि जी अनंता ब्रह्मांडांचें वालभ । तुह्माविण व्यर्थ चि त्यांची भांभ । परि तुमचा आंगीं कर्त्तृत्वाचा अवष्टंभ । तिळमात्र न लगे जी ॥ ८ ॥ ह्मणौनि सकळ करूनि अकर्त्तेपण । हें तुह्मास चि जी साजे भूपण । जेवि ते समुद्रीं नाना पर्वत पाषाण । रामनामें चि तरले ॥ ९ ॥ कां ते चरणस्पर्शें दीर्घ शिळा । येक श्रीरामें चि केली दिव्य अबळा । आणिकाचेनि हा प्रताप आगळा । केला न जाय सहसा ॥ १० ॥ तेवि अनंत ब्रह्मांडांचें कर्त्तेपण । हें तुह्माविण कोणासी साजे भूषण । ह्मणौनि त्या ब्रह्मांडाचें चक्रवर्तीपण । तुह्मास चि आलें जी ॥ ११ ॥ जेवि का ते गगनामाजीं तारांगणें । ध्रुवासी अहर्निश करिती प्रदक्षिणे । तेवि अनंत ब्रह्मांडमाळेसी भ्रमणें । तुमचा चि आंगीं ॥ १२ ॥ ह्मणौनि अनंत ब्रह्मांडांचे नायेक । चक्रवर्ती जी तुह्मी चि येक । सकळ करूनि अकर्त्तेपणाचें कौतुक । शोभे

---

१ एका क्षणाच्या अवकाशांत सृष्टीचे उत्पत्ति, स्थिति, लय कितीतरी होऊन जातात. २ अनेक. ३ ठिणग्या ४ निरनिराळ्या घाटाचीं मडकीं ५ खटपट. ६ व्यवहार करतात. ७ आवड. ८ भांब, शोभा ९ अहंकार. १० अहल्याशिळा राघवें मुक्त केली । पदीं लागतां दिव्य होऊनि गेली ॥. ११ प्रभुत्व, स्वामित्व. १२ अधिपति.

तुह्मास चि जी ॥ १३ ॥ जेवि कां येक स्त्री आणि येक बाण । प्रतिज्ञापणें निश्चयें येक वचन । आणि तें विजयप्रतापें अभग ठाणें । श्रीरामचद्रास चि शोभे ॥ १४ ॥ तेवि जी अनता ब्रह्मांडाचें कर्त्तृत्व । हें तुह्मांस चि शोभे अभगत्व । सेवटीं अकर्त्तेपणाचें हि महत्त्व । तें तुह्मा चि योग्य जी ॥ १५ ॥ जेवि हनुमतें अर्जुनेंसीं प्रतिज्ञा बोलतां । शरसेतु भगिला क्षण न लगतां । तेथें देवें ब्राह्मणरूपें स्वभावता । शख घातला त्यातळीं ॥ १६ ॥ तेणें तो शरसेतु जाला अभंग । तेथ हनुमतें उदड करिता लागें । परि तो न भगे ह्मणौनि दास्यत्व अगें । अगिकारूनि ध्वजीं राहिला ॥ १७ ॥ देवें कर्तृत्व केलें तें कोण्हा न कळलें । आपण अकर्तेपणें वेगळे राहिले । हनुमतासी दास्यत्वें तेथ गोविलें । अर्जुनासी रक्षावया ॥ १८ ॥ तेवि जी तुमचें करूनि अकर्त्तेपण । ब्रह्मादि हरिहरा अकळ विंदान । सूर्य चंद्र इद्रादि सकळ सुरगण । स्तविताती अखड ॥ १९ ॥ कर्मउपासनाज्ञानकांडेंसीं । वेद बोलों गेला त्रिविध बडेंसीं । परि येक हि सेवटीं न जाय निश्चयेंसीं । मग नेतिपणें समाधिस्त ॥ २० ॥ वर्णीन स्वयें सद्गुरूचा महिमा । ह्मणौनि शेषाआंगीं थोर गरिमा । वर्णितां जिव्हा चिरोनि गेली श्रमा । पात्र जाला सेवटीं ॥ २१ ॥ निजागीं ज्ञातेपण धरूनि वहिलें । जे सद्गुरुस्वरूपासी वर्णूं गेले । तव ते जेथील तेथें आटोनि जाले । ठाईंचा ठाईं अंवाच्य ॥ २२ ॥ जेहीं त्रिशुद्धि सोडूनि अहज्ञातेपण । नाहपणें केलें सद्गुरुवर्णन । ते काया वाचा मनसा होऊनि पावन । सरेते जाले स्वरूपीं ॥ २३ ॥ वसिष्ठसनकादि नाना सत । व्यासवाल्मिकादि सकळ महंत । शकरकपिलादि हनुमत । सद्गुरुस्वरूपीं निमग्न ॥ २४ ॥ आणिक हि भूत भविष्य वर्त्तमान । महापुरुष साधु सज्जन । जाले सद्गुरुस्वरूपीं निमग्न ।

---

१ आकृति, शरीरबाधा, किंवा स्थान, ठिकाण. २ खटपट, प्रयत्न. ३ नवविधाभक्तीपैकीं एक प्रकार. ४ गुतविलें. ५ कौतुक. ६ त्रिकांडात्मक ( कर्म, उपासना, ज्ञान. ) ७ मोठेपणा, महत्त्व किंवा भरवसा. ८ थिजून. ९ स्तब्ध. १० निश्चयेंकरून. ११ कृतकृत्य, वश, पुढारी.

स्वानुभवदिनकरीं ॥ २५ ॥ त्या सकळ संतांचा अनुचर । रामीरामदासीं ऐक्यता दिनकर । सद्गुरुस्वरूप पाहोनि साचार । निमग्नता बोले जव ॥ २६ ॥ तव अकस्मात निरोळीं शब्द उठिले । कीं ते गगनासी कोंभ निघाले । तेवि निजरूपा बोलों आरंभिलें । श्रीगुरु निजवाणीं ॥ २७ ॥ सखया तूं जें बोलिलासि हें साचें । तैसें चि महिमान श्रीगुरूचें । प्रस्तुत काय असेल जें तुझिये मनींचें । तें बोल पां तूं सत्वर ॥ २८ ॥ येर बोलण्याचें नाहीं काज । काय चित्तीं असेल तें चि बोलें गुज । तें सकळ ओरत पुरेल सहज । कार्यकारणसहित ॥ २९ ॥ इतुकें श्रीवाक्य श्रवणीं ऐकतां । शिष्य जी जी ह्मणोनि पुढारला तत्वतां । ह्मणे स्वामी चतुर्विधज्ञान स्वभावता । कळों सरलें मज ॥ ३० ॥ जीव अहंपणें होता भ्रमला । तो देहचतुष्टयनिर्शनें वहिलों । मुळींचें ईश्वरपद पावला । महावाक्यविचारें ॥ ३१ ॥ तरि त्या ईश्वराचें देहचतुष्टय । त्याचा कैसा जी असे मूळान्वय । आणि जेथूनि उद्भवती पिंडसमुच्चय । तें निजरूप कैसें तुमचें ॥ ३२ ॥ इतुका शिष्यें करितां आशंकाआक्षेप । स्वामी सर्वांगें होऊनि सक्रुप । दाविते जाले आपुलें निजरूप । ब्रह्मांडात्मक जें अनंत ॥ ३३ ॥ जें पूर्वी रामावतारीं कौशल्येसी । श्रीरामें दाविलें निजरूपासी । कीं तें वामनावतारीं बळीसी । त्रिविक्रमरूपें दाविलें ॥ ३४ ॥ किंवा श्रीकृष्णें दाविजे यशोदेसी । तैसें चि युद्धसमईं अर्जुनासी । तें चि जी निजरूप मज निश्चयेंसीं । दाखविलें पाहिजे ॥ ३५ ॥ इतुका आळ घेना जव आवडीसीं । दिनकर येकात्मता रामदासीं । तव स्वानुभवदिनकर निजरूपेंसीं । रामचंद्रीं सहजें ऐक्यता ॥ ३६ ॥ तेथ भक्ताचिया निजधामें । वाक्य ऐकोनि पुरुषोत्तमें । वेदांतवेद्यें सद्गुरुसर्वोत्तमें । ह्मणितलें पाहें ॥ ३७ ॥ जें कां

---

१ सेवक २ निराळ=आकाश, निराकारस्वरूप. ३ अंकुर. ४ आवड. ५ तावडतोब. ६ संशययुक्त शंका. ७ गीता अ. ११ यांत ८ आरोप परंतु या ठिकाणीं हट्ट ९ भक्तांचें निजस्वरूप च जो पुरुषोत्तम त्यानें

निजरूप अनादि । परि विश्वात्मक विश्वाची सिद्धि[1] । तें दिव्य ज्ञानचक्षु[2] घेऊनि अवधि[3] । पुरे तव देख ॥ ३८ ॥ ऐसें श्रीगुरु सर्वोत्तम जव बोलों सरे । तव येकला अनेकत्वें येकसरें । नाना वर्णव्यक्तीचिया आकारें । प्रसवता जाला ॥ ३९ ॥ धुरे करूनि कैळास सत्य[4] वैकुंठा- । पासूनि पाताळवरि शेषकमठा[5]- । पर्यंत सर्व हि मध्यपीठां[6] । देखता जाला ॥ ४० ॥ नाना वर्ण नाना जाती । अनेक रूपाचिया आकृति । तितुकिया हि अभिव्यक्ति[7] । कीजैल सुखें ॥ ४१ ॥ नाना स्थूळें नाना पृथुळें[8] । लवे दीर्घे वक्रे वर्तुळें । खुजटें रूपडीं विशाळें । देखिलीं अनेकें ॥ ४२ ॥ नाना जिनसाचीं शरीरें । लाहानें थोरें सुकुमारें । वस्त्राभरणीं परिकरें[9] । शोभताती ॥ ४३ ॥ अनेकां वेषांचें सुदर । मस्तक देखिलें पैं अपार । मुकुट कुंडलें सतेजाकार । भाळीं सुरेख गंधाक्षतें ॥ ४४ ॥ सलोक ब्रह्मादि हरि हर । गण गंधर्व यक्ष किन्नर । तारागणेंसीं ग्रह चंद्र दिनकर । निजांगीं देखिले ॥ ४५ ॥ तेथ नेत्र जाणों ते चंद्र सूर्य । श्रवणाकृतीसीं दिशान्वय । मुखें देखिलीं अग्निमय । कीं ब्राह्मणासारिखीं[10] ॥ ४६ ॥ जाणो वैकुंठकैळासा- चियापरी । दिसे अनंतां कपाळाची फैरारी । देखों नाशिकाची उच- थोरी । सत्यलोकपर्यंत ॥ ४७ ॥ तैसी चि मुखाची जव थोरी पाहे । तव अनंतपणें व्यापलें आहे । क्षणामाजीं विश्व सगळें हें । ग्राशील नेणों ॥ ४८ ॥ जैसे का ते वरुणसमूह । तैसे देखो जिव्हा- कटाह । आणि दंत दाढा[11] निसदेह । काळकूटदांतासम ॥ ४९ ॥ अनेकपणें स्वर्गभुवनें । कीं नाना तें दिक्पाळस्थानें । मग तें पाहोनि मी ह्मणे । काय ग्रीवे[12] चि इया ॥ ५० ॥ मग अपारपणें देव स्वर्गींचे । तैसे कर हि देखे आयुधाचे । नानीं[13] ते काय पैं क्षत्रियांचे । अवतार चि

---

१ इहजन्मीं तपादि केल्यानें प्राप्त होतें अंगीं सामर्थ्य जें तें. २ दिव्यं ददामि ते चक्षुः पश्य मे योगमैश्वरम् ॥ गीता ११-८. ३ पुढें, आरंभ. ४ सत्य. लोक ५ कमठ=कांसव ६ मर्धील सर्व हि स्थानें. ७ प्रगट, स्पष्ट. ८ जाड, लठ्ठ. ९ चांगली. १० ब्राह्मणोऽस्य मुखमासीत् । ११ ओढ. १२ मान, गळा. १३ किंवा.

हो ॥ ५१ ॥ आतां धर्म जात जेवि सकळ । तैसें शोभे स्तनयुगुळ । सत्कर्मस्वार्थदुग्धें[1] बहळ[2] । भरलें दिसे ॥ ५२ ॥ अनुक्रमें निज हृदई जव पाहे । तव साकार विश्व सकळ देखताहे । ह्मणे काय केवळ विस्तारलें हें । सगुण ब्रह्म चि अवघें ॥ ५३ ॥ तैसीं पाहे जव तें नाभिमंडळें । तव देखिलीं मेरूसारिखीं ढिसाळें । खोली शोधिजे जव सत्यलोकभूपाळें[3] । तव तेथें चि गुतिजे ॥ ५४ ॥ भूर्लोक आदिकरूनि सकळ । देखे तिये उदरीं विशाळें । तैसा चि पाहे जव आंलुमाळें[4] । तव देखे आणिक हि ॥ ५५ ॥ आवर्णोदक सप्त हि सागर । नद नदिया गंगादि अपार । सप्त धातु आणि नाडींचा प्रकार । ऐसा चि गमे ॥ ५६ ॥ लोकालोकादि नाना पर्वतसमूह । काय तैसे चि शोभती अंगकटाह । जैसे अठराभार वनस्पति निसंदेह । नखरोमकेशादि ॥ ५७ ॥ जेवि का चंद्र निर्मळ सीतळ । ऐसें मानस दिसे आलुमाळ । यक्षकिन्नरादि वसु[5] दिक्पाळ । करांगुळें शोभती ॥ ५८ ॥ ऋषी मुनी गण गंधर्व । सिद्ध साधु समुदाव । सकळ हि शरीरींचे अवयव । देखिले अमूप[6] ॥ ५९ ॥ भूर्लोकाऐसें कटि विशाळ । पदद्वय तें सप्तपाताळ । कीं तें शोभे उरुयुगुळ । वैश्यवर्णांकित ॥ ६० ॥ केवळ जे का वर्णों शूद्र । ते शोभले पदनुपुर । अनेका जातींचे तोडर[7] । स्वधर्मनादें गर्जती ॥ ६१ ॥ कमठ[8] वाराह शेष । हें चि आसन पैं निःशेष । ऐसें विश्वरूप सुंदर सुवेष । देखता जाला ॥ ६२ ॥ ह्मणे मी जों पाहें येकदेशीपणें । तव श्रीगुरु दाखविजे अनंत गुणें । मग तें सर्व देखें ऐसें देखणें । सामर्थ्य हि दिल्हें ॥ ६३ ॥ मग मी परम हरिखें[9] । पाहातेनि आरांणुकें[10] । पाहों गेलों तव आणिकें । कौतुकें देखिलीं ॥ ६४ ॥ कीं अनेका प्रकारींचे रुद्र । तैसे चि वसु आणि

---

१ जें दूध प्याल्यापासून नेहमी सत्कर्म करीत राहणें हाच ज्याचा स्वार्थ बनतो, असे पुरुष निपजतात. २ मोठा ३ ब्रह्मदेव. ४ किंचित्. ५ अष्टसंख्याक देव. ६ पुष्कळ. ७ पायांतील तोरड्या. ८ कासव. ९ आनंदानें. १० आवडीनें, तृप्त होऊन.

इंद्र । तारागणासहित अनेक चंद्र । सूर्य हि देखें ॥ ६५ ॥ मरुद्गण आणि आश्विनौदेव । नाना देखिले सुरसमुदाव । ऐसें तेजोमय सर्व । धवळलें देखें ॥ ६६ ॥ अनंत शीर्षे अनंत कर । अनंत चक्षु परिकर । श्रवणांचे हि प्रकार । अनंत देखे ॥ ६७ ॥ अनेक मुखें अनेक उदर । पदें हि दिसताती बहुत फार । ऐसें अनंतात्मक शरीर । देखिलें अवघें ॥ ६८ ॥ ऐसें आद्यंत जवं पाहे निश्चित । तव तें आदिमध्यांतरहित । अनादि असोनि अपरमित । परि तें सगुणपणें ॥ ६९ ॥ मग होऊनिया निवांत । पाहें जव तें इथंभूत । तव पांचा आणि तीचें[1] मूर्तिमंत । विकार अवघे ॥ ७० ॥ मग तेथ चमत्कारोनि जवं । पाहे तव देखिलें अपूर्व । जे नवल या रूपाची ठेव । असंभवनीय ॥ ७१ ॥ परि हें साकार कीं निराकार । ऐसा निश्चयें करिता निर्द्धार । तव अष्टधेचें चि साकार । घोतलें[3] दिसे ॥ ७२ ॥ जो जो कांहीं स्थूळाभास । तो तो दृष्टीचा चि दृश्यांश । तरि देवें निजरूप ह्मणोनि आह्मांस । काय झकविलें न कळे ॥ ७३ ॥ ऐसें विचारूनि दृढ चित्तीं । निहाळूनि पाहिली विश्वाकृति । तव स्थूळाभासें देहाकृति । विराटमय[4] देखिली ॥ ७४ ॥ तरि जितुकें दृष्टीनें देखिलें । तितुकें पंचभूतांमध्यें आलें । तरि देवाचें रूप पंचभूतांवेगळें बोलिलें । तें चि हें कैसेनि ॥ ७५ ॥ तथापि जितुका स्थूळस्वभाव । तितुका रजोगुणीं सावेव । तरि काय हे दाखविली मावं[5] । श्रीगुरूनें आह्मा ॥ ७६ ॥ मग मनीं धरूनियां निका[6] । पुसावयाचा आवांका[7] । बोलों पाहे तव कौतुका । देखिलें आणिक ॥ ७७ ॥ रजोगुणात्मक जो व्यवहार । त्याचा चतुर्मुख[8] अभिमानी निरंतर । उत्पत्तिअवस्थेचा प्रकार । सदैव जया ॥ ७८ ॥ तैसें चि ब्रह्मयाचें स्थान जव पाहें । तव सत्यलोक चि देखताहें । महा सुखदुःखावभासें लाहें । स्थूळ भोग सकळ ॥ ७९ ॥ देखें अकारमात्रेची तेथ सज्ञों[9] ।

---

१ पंचभूतें+त्रिगुण=मूळमाया. २ विस्तार. ३ फसविलें. ४ परमेश्वराचा स्थूल देह. ५ माया, कपट ६ बरवा. ७ धैर्य, अभिप्राय. ८ ब्रह्मदेव. ९ खूण.

एवं विश्वरूप सर्व आपुलिया प्रज्ञा । तथ देखे निकामी मग प्रतिज्ञा । बोलों आरंभिलें ॥ ८० ॥ जी जी सद्गुरु सर्वोत्तमा । निजजनमानस-विश्रामा । जगज्जनका मेघश्यामा । पुराणपुरुषा ॥ ८१ ॥ जी जी समर्था आत्मयारामा । नवल इया विश्वरूपाची गरिमा । हें खरें चि कीं झकविसी आह्मा । हें न कळे देवा ॥ ८२ ॥ देवा तुमचें जें निजरूप । त्याचें आह्मांसी तरि अति पडेप[2] । आणि देव तरि दाखविताती संक्षेप । अष्टधेचा चि पैं ॥ ८३ ॥ हें तरि विराटात्मक स्थूळ देह । ईश्वराचें ब्रह्मांडमय निसदेह । याची अवस्था उत्पत्ति नाना जीवसमूह । निर्माण होती जीकरितां ॥ ८४ ॥ याचा अभिमानी तरि दिसे ब्रह्मा । सत्यलोक स्थान सुखसद्मा । स्थूळभोग रजोगुणनामा । क्रियाशक्ति अकारमात्रा ॥ ८५ ॥ तरि हें अष्ट-कोशात्मक सकळ । दिसे या विश्वरूपाचा गोंधळ । तरि मग निजरूप तुमचें विमळ । तें केव्हां दावाल जी ॥ ८६ ॥ किंवा हें चि तुमचें निजरूप होये । किं यावेगळी आणिक असे कांहीं सोये । कीं संदिग्ध-पणें पाहातसां भोये[4] । हें जी न कळे आह्मां ॥ ८७ ॥ तरि जी स्वामी ऐसें न करावें । जें सत्य असेल तें चि दावावें । ऐसें बोलोनि केलें अष्टांगभावें । दंडवत सावकाश ॥८८॥ देवा मियां तुह्मांसी विज्ञप्ति । करू-निया अति प्रीतीं । का जे विश्वरूपाची उन्नति । होआवी गोचर ॥ ८९ ॥ तेणें निजरूपदर्शनें । होईल निज डोळयां पारणें । मग येकात्मता सुख भोगणें । सदैव आपण ॥ ९० ॥ यया लाभाचिया आशा । प्रार्थिलासी जी सर्वेशा । तो तुवां भयाचिया पाशा । वरपडें केलें ॥ ९१ ॥ यया दर्शनें जी मज । व्हावें कीं सुखाचें भोजें । तें न होनि[10] अंतरीं गजबज । जाली भयें बहुत ॥ ९२ ॥ जी तुमचिया

---

१ बुद्धि २ आवड. आह्माला आपले रूप पाहण्याची आवड आणि आपण तर मायारूप च दाखवितां ! ३ ज्या मायेमुळें. ४ भूमि. ५ वृद्धि, वर्चस्व. ६ व्हावी. ७ प्रगट, प्रत्यक्ष. ८ गुतविलें. ९ राज्य. १० न होऊन.

सगुणरूपाची ठेव¹ । यापरिस वाटे बरव । तेणें अत्यंत सुखवैभव । भोगीत होतों ॥ ९३ ॥ तवं मध्यें चि हे विश्वेसी² । निर्माण जाली पां कैसी । जेथि³ तिर्थां सुखासी । अंतरलों मी ॥ ९४ ॥ तरि देवा हें⁴ अद्भुत । देखोनि भय वाटे मज बहुत । आतां झांकीं झांकीं पैं प्रस्तुत । प्राण वाचवीं ॥ ९५ ॥ ऐसें भयाव्रलेनि आर्त्तप्रेमें । बोलणें ऐकोनि सद्गुरु सर्वोत्तमें । कृपामृतें वाक्यसंभ्रमें । प्राण रक्षिले ॥ ९६ ॥ अरे या विश्वरूपाकारणें । बहुतीं घेइजे पैं धरणें । परि आपण हे बहुत जतनें । ठेविलें होतें ॥ ९७ ॥ जें कां अपरमित अनाद्य । अप्रमेय स्वसंवेद्य । अगण्य आणि जें अभेद्य । सर्वात्मकत्वें ॥ ९८ ॥ जें शंकरादिकां दुर्लभ । तें आजि तुज परम सुलभ । कां जे भक्तीचें मज बहुत वाल्लभ । इयास्तव कीं ॥ ९९ ॥ ऐसें असोनिया अगाध । थोरपणें अति प्रसिद्ध । तयासी तू कां निषेध । देऊं पाहासी ॥ १०० ॥ तरि तुवां हें ऐसें न करावें । येथें चि सदैव स्थिर असावें । हें वाक्य बोलतां देवें । म्यां हि नमिजे तेथ ॥ १ ॥ नमस्कारूनियां अति प्रीतीं । ह्मणें जी जी देवा कैवल्यपति । तुमचिया निजरूपाची⁵ उन्नति । दावावी मज ॥ २ ॥ हें ऐकोनियां श्रीप्रभु । आवडीचा परम वाल्लभु । मग सूक्ष्मरूपें हिरण्यगर्भु । दाविते जाले ॥ ३ ॥ ते पुढिलिये कीर्णीं हिरण्यगर्भ । ब्रह्मांडींचें⁶ द्वितीय देह स्वयंभ । ईश्वरासी जें अति वाल्लभ । निजार्गीं आवडे ॥ ४ ॥ त्याची साकल्य⁷ अभिव्यक्ति । स्वानुभवदिनकरीं सहजस्थितीं । दिनकर रामदासीं अति प्रीतीं । निजसुख पावेल ॥ १०५ ॥ स्वस्ति श्रीस्वानुभवदिनकरे गुरुशिष्यान्वये द्वादश कळापे ब्रह्माडात्मक ईश्वरतनुचतुष्टय विराटदेहनिरशन निरूपणं नाम प्रथम कीर्ण प्रकाश: ॥ १ ॥ श्रीराम जयराम जयजयराम ॥

---

१ ठेवण. २ विश्वदेवता. ३ जीमुळें ? ४ सगुणरूपदर्शनाच्या. ५ विराट स्वरूप. ६ ब्रह्मांडस्वरूपाचा ( दुसरा ) सूक्ष्म देह. ७ सविस्तरपणें.

॥ श्रीराम ॥

आ रे तूं सखया सावध । होऊनिया निजरूपीं शुद्ध । माझें निजरूप शुद्धबुद्ध । तें देख देख ॥ १ ॥ ऐसें जव श्रीगुरु बोलों सरे । तवं विश्वरूपाचें चि जोंवळें खरें । हिरण्यगर्भमय येकसरें । देखता जाला ॥ २ ॥ पाहें निडारलियां दिठीं[२] । तव मूर्ति दिसे पहि-लियाहूनि मोठी । सुंदरपणें अति गोमटी । विराजमान ॥ ३ ॥ पहिलें चि अवलोकिला मस्तक । तवं तो केवळ हिरण्यात्मक । श्रोत्रस्थानीं अति सम्यक । दिशा देखिलिया ॥ ४ ॥ मग करीं त्वचे उजूं अवलोकन । तव तो आद्यत अवघा पवन । पाहें तैसें चि जव चक्षुस्थान । तवं सूर्य चि देखें ॥ ५ ॥ मुखाकडे जव पाहें । तव जिव्हा वरुण चि देखताहे । घ्राणीं अश्विनौदेव हे । अति सत्वपणें ॥ ६ ॥ मग बोलती जे का वाचा । पाहें जव प्रसग तियेचा । तव तेथ बढिवार अग्नीचा । देखिजतसे ॥ ७ ॥ सर्वां हि कार्याचा इत्यर्थ । करणें जयां ते द्वय हस्त । पाहें तव इंद्र शोभत । तये स्थानीं पैं ॥ ८ ॥ तैसी चि चालावयाची गति । पाहात ठेलों जव निगुती । तवं केवळ त्रिविक्रम मूर्त्ति । देखिजे तेथ ॥ ९ ॥ जो हा विश्वोत्पत्तीसी वीर्योद्भव । करी अष्टधाप्रकृतिगर्भी संभव । तें लिंग पाहें तव सावेव । प्रजापति चि हा ॥ १० ॥ सर्व हि जो हा दुरितवर्ग । निरयें अपानद्वारें मळोत्सर्ग । तये गुदद्वारीं देखिला चांग । नैरुत्यनाथ हा ॥ ११ ॥ एवं पाहातेपणें समग्र । अवयवेंसीं देखिलें शरीर । तैसा चि पचविषयांचा हि प्रसर । अत्यंत देखिला ॥ १२ ॥ मग मी आपुले मनीं विचारीं । हे विषयपचक यैगें मारेकरी । हे इया ईश्वरस्वरूपीं निर्द्धारीं । आहेत कीं ना ॥ १३ ॥ ऐसें जवं अतरीं ह्मणोनि पाहें । तव ईश्वर हि विषयरूप चि देखताहे । केवळ

---

१ भावंड. २ टक लावून पाहे. ३ चांगली. ४ सुवर्णात्मक. ५ नीट. ६ मोठेपणा. ७ यथार्थपणें. ८ उत्पत्ति. ९ पातकें, अशुद्ध भाग. १० नर्क. ११ विस्तार. १२ 'यै' हें अक्षर खालीं समासात लिहिलेलें आहे एकदर मिळून काय शब्द आहे न कळे.

शब्दमय आकाश हें। आयत अवघें ॥ १४ ॥ तैसा चि स्पर्शविषय जों निरीक्षीं। तव सर्वांगीं हि वायूची साक्षी। नामरूपविषय जों पाहों अपेक्षीं। तव निजतेज देदिप्यमान ॥ १५ ॥ यानंतर रसविषय जों पाहें। तवं सर्व उदकमय देखताहें। आणि गंध-विषयाचिया आयणीं हे। पृथ्वी चि देखिली ॥ १६ ॥ ऐसे पांच हि विषय ईश्वरीं देखिले। देखोनि मनीं होतें तें समजलें। मग शरीरचाळका अवलोकिलें। तथा प्राणासी ॥ १७ ॥ तव पंचधा जो कां वायु। नाग कूर्म कुकुर देवदत्त धनंजयु। हा पंचप्राणयोगें सावयवु। देखिला समग्र ॥ १८ ॥ तव तो व्यानांशें सर्व संधीं। समानयोगें नाभीं र्‍हदीं। उदानांशें कंठावरोधीं। स्थिरावला पैं ॥ १९ ॥ तैसा चि प्राणांशें हृत्कमळीं। अपानें गुदलिंगमेळीं। वायु व्यापला देखें समूळीं। पंचधा रूपेंसीं ॥ २० ॥ आतां यावरी इया रूपाचें। निजवृत्यात्मक आयणीचें। अंतःकरण जें कां साचें। कोण कैसें ॥ २१ ॥ ह्मणौनियां लवडस-वडीं। पाहों गेलों जवं तातडीं। तव तत्काळ वळली वेंगडी। पाहातेपणेंसीं ॥ २२ ॥ मग होऊनि पाहें निवांत। निडळावरी ठेऊनि हात। तव दृष्टि ठेली तटस्थ। जेथील तेथ ॥ २३ ॥ पाहातां येकदेशी जें मनुष्याचें अंतःकर्ण। त्याचा ठाईं परम चंचळपण। तें न निरीक्षवे येकक्षण। अति सूक्ष्मास हि ॥ २४ ॥ मा केवळ जो कां परात्पर। निजरूपें साक्षात् ईश्वर। अगम्य अबाध्य अगोचर। ब्रह्मादिकासी जो ॥ २५ ॥ त्याचें हि पैं निज अंतःकरण। व्यापकपणें जें परिपूर्ण। जें अनंत ब्रह्मांडें न लगतां क्षण। रची खची स्वलीळा ॥ २६ ॥ ऐसें जें त्रैलोक्यनिधान। विश्वबीजाचें जें येकायतन। तें न दिसे मग श्रीगुरुचरण। स्मरिलें हृदईं ॥ २७ ॥ तव तिया स्मरणा चि सरिसें। ह्मणे दृष्टीचा मळ लागेल ऐसें। देदिप्यमान वृत्तिसमरसें। देखिलें तेजोमय ॥ २८ ॥ मेघश्याम सुंदर मूर्ति।

---

१ इच्छा केली. २ तत्वनिर्णयेच्छेनें ३ स्वस्वरूपस्फुरद्रूप. ४ आयणी=प्रसर, समुदाय. ५ लगबगीनें. ६ कपाळावर. ७ अधिष्ठान ब्रह्म.

मुगुट कुंडलें वैजयंती । पीतांबर परिधान चरणीं गर्जती । तोडर नुपुरें ॥ २९ ॥ च्यान्ही भुजा सायुधा । शंख चक्र पद्म गदा । हृदईं धरिलें द्विजपदा । मान्यपणें अति ॥ ३० ॥ नाभिकमळीं ब्रह्मा । लक्ष्मी संवाहन करी पदपद्मा । गरुड उभा पुढें बृहत्सामा । गाती नारद तुंबर ॥ ३१ ॥ ऐसें सावयव मूर्तिमंत । देखिलें ध्यान घवघवीत । वैकुंठभुवनीं परिवारयुक्त । विलासें बसिजे ॥ ३२ ॥ एवं देखिलें परम सावधान । निजरूपाचें अंतःकरण । आतां परम चंचळ जें कां मन । तें पाहों लाणितलें ॥ ३३ ॥ तरि जो कां अत्रिअनुसय्यात्मज । ब्रह्म-याचा अवतार सहज । त्रैलोक्याचें नित्य भोजें । अमृतमय जो ॥३४॥ पाहातां जयाचें चंचळपण । बोलतां दिसे असाधारण । परि कांहींयेक ज्योतिषमतें गणन । दृष्टांतें दाऊं ॥ ३५ ॥ दोनी सहस्र दोनसे दोन । इतुकीं योजनें सूर्यासी गमन । उन्निमिष्यार्द्धें क्रमे गगन । पोकळीमध्यें ॥ ३६ ॥ ऐसीं दों अर्धीं येक उन्निमिष्य । दों उन्निमिष्यां येक निमिष्य । दों निमिष्या येकदां होय स्पर्श । पापणियासी ॥ ३७ ॥ ऐसा सहजस्थितीं साठी वेळ स्पर्श । तैं होय येकाक्षर गणनेस । भरतां साठी अक्षरास । पळ येक होतसे ॥ ३८ ॥ साठी पळां येकी घटिका । साठी घटिकां अहोरात्र देखा । ऐसीं पंधरा अहोरात्रें मिळोनि नक्षत्रा येका । सूर्यें क्रमिजे ॥ ३९ ॥ तें येक नक्षत्र प्रतिदिनीं । भोगिजेतसे चंद्रें गगनीं । या चंचळपणाची मवणी । श्रेष्ठ करोतु सुखें ॥ ४० ॥ एवं तेरा महिने भरोवरी । सूर्यें क्रमिजे सत्तावीसां नक्षत्रीं । तें सर्व हि सत्तावीसां अहोरात्रीं । क्रमिजेतसे चंद्रें ॥ ४१ ॥ चंचळपण आंगीं असोनि इतुकें । सर्वांगीं धरूनि अमृत कौतुकें । त्रैलोक्यासी देतसे भातुकें । अति उदारपणें जो ॥ ४२ ॥ चतुर्भुज धवळ वसन ।

---

१ श्रीवत्सलांछन. २ आवडता, ज्याला नित्य पाहिल्यानें त्रैलोक्याला संतोष होतो. ३ गणना. ४ श्रमानें. ५ दिनकर उत्तम ज्योतिषी होते, त्याला हा वरील प्रत्यंतर पुरावा आहे. ६ सर्व प्रकारच्या वनस्पतींस चंद्रकिरणापासून पोषक द्रव्य मिळतें व अशा वनस्पतींपासून सर्व जगास आरोग्य प्राप्त होतें.

सर्वांगकांति देदिप्यमान । सदैव गगनीं मृगवहन । लीळा विचरे जो ॥ ४३ ॥ जेव्हा सकल्पातें अंगिकारी । तेव्हां सोळा कळीं पूर्णत्व धरी । सर्वे चि विकल्पोनिया विखरी । सर्वा हि कळा त्या ॥ ४४ ॥ ऐसा सकल्पविकल्पात्मक । आगीं धरिलासे जेणें कळंक । तो चद्र निजरूपीं मन निष्टंकें । आपण देखिलें ॥ ४५ ॥ आतां केवळ जे का निश्चयाची । बुद्धि तो हा जाणिजे विरची । जयासी सर्व हि सृष्टीची । उभारणी करणें ॥ ४६ ॥ सत्यलोकीं असे वसतेस्थान । परि त्रैलोकीं अंशाशें व्यापकपण । बुद्धीचें जो केवळ येकायतन । सर्वज्ञपणें ॥ ४७ ॥ कर्म उपासना आणि ज्ञान । त्रिकाडयुक्त वेद परिछिन्न । तया चतुराननीं विभागून । पृथकत्वें स्थापिला ॥ ४८ ॥ मग स्वबुद्धीचेनि प्रसरें । वर्णाश्रमयाति अनुकारें । षट्कर्माचेया अध्वरें । प्रशंसिला पैं ॥ ४९ ॥ ह्मणौनि येणेंसीं जो योजला । तो त्रैलोक्यामाजीं मान्य जाला । आणि स्वरूपींहि समरसला । निजात्मबुद्धीं ॥ ५० ॥ यावेगळे जे कां उर्वरित । इये वेदविधीसीं वैर चाळितें । ते समूळत्वें कीर समस्त । निरईं पचती ॥ ५१ ॥ मग ते अंतसमयावसरें । लाहूनिया कर्मशरीरें । भोगें भोगिती निर्द्धारें । यथासांगत्वें ॥ ५२ ॥ असिपत्रांचिया तरूवरी । ते ठेविजती युगकल्पवरी । किं तप्त लोहस्तभ शरीरीं । आलिंगिजती ॥ ५३ ॥ किंवा तया तप्त तैलांत । तळिजतील दिवस असख्यात । किं भूमि तप्त लोहांकित । तयावरी निद्रा ॥ ५४ ॥ किं इष्टेचियें कढत आधणीं । पचिजेतीं हि क्रिमी होऊनि । किं लोहफुटाणे तप्त करूनि । भक्षिजती सुखें ॥ ५५ ॥ किंवा तप्त लोहाचे कटक । तयावरी चालिजेल निशक । विंचुवाचा पेंवीं अवश्यक । समाधि घेइजे ॥ ५६ ॥ सर्व विषाचा बासेंट करूनि । सुखें घेइजेल उदकपानीं । तप्तलोहरसवैतरणीं ।

---

१ दोष. २ निश्चित. ३ अभ्रदेवानें ४ स्वरूपानें. ५ यज्ञयागादिकांनीं. ६ वेदशास्त्रादिकानीं जो युक्त झाला. ७ चालवित. ८ निश्चयेंकरून. ९ पुढील दहा ओव्यांत सांगितलेले नरकभोग भोगतात १० विष्ठान्नर्के. ११ ओशट किंवा एकत्रपणा. १२ नदींत.

पविजैल सुखें ॥ ५७ ॥ किं तप्तचर्मांचा मोटकेळी । बांधोनि टाकितील नरकमेळीं । येमदूतांचया चरणांतळीं । प्रहार बैसती ॥ ५८ ॥ यम ताडितील दडवरी । गीध तोडिती चांचूवरी । तेथ फाडिजेल न्हीसव्याघ्रीं । शरीर अवघें ॥ ५९ ॥ काळसर्प दंश करिती । काउळे सर्वांग टोंचिती । स्वेछा यमदूत ढकलूनि देती । पर्वतपडणीं ॥ ६० ॥ पुन्हां बांधती यमपाशीं । गेळीं लावितील आकाशीं । इष्टेचीं भक्षें पैं क्षुधेसी । लागलिया देती ॥ ६१ ॥ ऐसऐसिया त्या यातना । भोगणें लागतील तया नाना । जे कां अविधीचया व्यसना । वरेपडे होती ॥ ६२ ॥ हे निरयभोग पैं समस्त । तयांसी निश्चयेंसीं प्राप्त । जे अखड द्वेष चाळित । वेदविधींसीं ॥६३॥ ह्मणौनि बुद्धिवंत जे का नर । तेहीं न टाकावी वेदांची मोहर । येणें चि निजपद साचार । पाविजैल सुखें ॥ ६४ ॥ असो आता पैं ययावरी । निजरूपात्मक बुद्धि निर्धारीं । पाहों गेलों तों आणिके चि भरीं । सरसावलों ॥६५॥ तरि या अपराधीं पूर्ण क्षमावंत । पाहातां येक स्वामी श्रीगुरु समर्थ । तरि क्षमूनिया मज सर्वस्वें सनाथ । निजकृपा करणें ॥६६॥ इया बोलणियाचीं वार्ता । श्रीप्रभू निजकर्णीं ऐकतां । ह्मणतिलें बापा हा परिहार सूचिता । ह्मणें वेळु लागेल ॥ ६७ ॥ तव माझिया श्रवणसुखा । मध्यें चि पडेल कीं उपखा । ह्मणौनिया परिहारसूचका । वाक्या न बोलें ॥ ६८ ॥ माझें जें कां केवळ निजरूप । जें मज चि अतर्क्यपणें अमूप । ऐसियाचा हि परि दाविसी सक्षेप । यथायुक्तिसहित ॥ ६९ ॥ तरि धन्य धन्य गा तुझी वाणी । जेथ पुरतसे माझिया सुखाची सिरोंणी । याचें फळ स्वानुभवदिनकर पूर्णपणीं । तुज फळेल सुखें ॥ ७० ॥ इया सतवाक्यलेशासरिसें । दिनकररामदासीं पूर्णत्व कैसें । आत्मानुसधानिया जैसें । परब्रह्म होणें ॥ ७१ ॥ हे खूण स्वानु-

---

१ पोहतां येईल. २ गाठोडें. ३ लाथा. ४ पर्वताच्या घरसणीवरून. ५ मानफांस. ६ गुतले जातील. ७ मार्ग. ८ अपराधाचा निरास करण्याचा प्रयत्न करण्यांत. ९ श्रम, खर्च, खळ. १० श्रेष्ठता.

भवी चि स्वयें जाणती । येर उरले ते टकमकां पाहाती । वांचूनि येथ आणिका दृष्टांतीं । न शोभिजे सहसा ॥ ७२ ॥ असो यावरि निजरूपाची । निश्चयात्मक बुद्धि विरची । यानंतर आता तया चित्ताची । स्थिति पाहों पैं ॥ ७३ ॥ तरि जीवमात्राचीं जें चैतन्यें । तें जयाचिया[1] येकांशें सामान्यें । परि विश्वामाजीं तें होती मान्यें । अवतारशक्तीसीं ॥ ७४ ॥ पाहातां योनी तरि अति तिर्यकें[2] । मत्स कूर्म कां सिंह सुकरादिक । परि चैतन्याचिया सत्ता आधिक । या विश्वामाजीं ॥ ७५ ॥ चैतन्यसत्ता निजभक्तांलागीं । अवतार घेऊनियां बहु युगीं । आदिनारायणें हें विश्व अभ्यंगीं[3] । चित्तचैतन्यें सुखी केलें ॥ ७६ ॥ मत्सरूपें शखासुर वधिला । कूर्मरूपें पृथ्वीसी आधार केला । वाराहवेष धरूनि मारिला । हिरण्याक्ष दैत्य ॥ ७७ ॥ नृसिंहरूपें हिरण्यकश्यपा मारिलें । भक्तशिरोमणी प्रह्रादा रक्षिलें । वामनरूपें बळीसी पाताळीं घातलें । आपण द्वारपाळ होऊनि ॥ ७८ ॥ फरशरामरूपें सहस्रार्जुनासी । मारूनि निक्षत्री केलें पृथ्वीसी । रामचंद्ररूपें रावणासी । सपरिवारीं मारिलें ॥ ७९ ॥ ज्याचिया नामें शंकरा विश्राति । स्मरतियां[4] तत्काळ होय मुक्ति । आसमुद्रवळयांकिती[5] । कीजे सार्वभौमत्व ॥ ८० ॥ दिनकरवंशाचें[6] जो मंडण[7] । अजाचें[8] जयासी पौत्रपण । दसरथ आणि कौशल्यानंदन । श्रीरामचंद्र ॥ ८१ ॥ तैसें चि वसुदेवदेवकिया उदरीं । श्रीकृष्णावतार मथुरेमाझारीं । नाना लीळालाघवें क्रीडा करी । विश्वदुरितदहनार्थ ॥ ८२ ॥ गोकुळीं क्रीडिजे स्वलीळा । पूतनादि नाना दैत्य बधिजे हेळा । कंस काळयवन बधूनि कुशस्थळा[9] । येइजे सुखें ॥ ८३ ॥ वसऊनि अनुपम्य नगर । द्वारिका या नामाचा बडिवार । स्त्रिया शत येक आणि सोळा सहस्र । आठ पट्टाचिया ॥ ८४ ॥ येके बरिचे छपन कोटी यादववीर । यां इतुकियांचा पृथक् परिवार । लीळा लाघव

---

१ ज्या एका चित्ताच्या. २ कीटकादि नीच योनी. ३ पूर्णपणें. ४ जे स्मरण करितील त्यांना. ५ समुद्ररूपी कड्याच्या आतील सर्व प्रदेशाचें. ६ सूर्यवंशाचें. ७ भूषण. ८ अज=एक राजा व दशरथाचा बाप. ९ द्वारकेला.

चरित्रांचा पार । न करवे कोण्हा ॥ ८५ ॥ शुशुपाळ वक्रदंता मारिलें । प्रतिज्ञा पांडवाचें साह्य केलें । असंख्य दैत्य मारिले । उद्धरिले अनेक ॥ ८६ ॥ भयें वैरें भक्तीं कां प्रीतीं । सेवा कुमरत्वें दास्यें कामासक्तीं । यां सर्वां येक चि फळप्राप्ति । कृपावरें दीजे ॥ ८७ ॥ ऐसीं अनेका प्रकारींचीं चरित्रें । न बोलवती सहस्रां वक्रें । ऐसें जाणोनि रामकृष्ण या मत्रें । विश्रांति मज ॥ ८८ ॥ ह्मणौनि सर्वां अवतारामाजीं श्रेष्ठ । राम कृष्ण उभयतां अति वरिष्ठ । ऐसें जाणोनि दिनकरें स्पष्ट । हृदई धरिले ॥ ८९ ॥ असो कळीचा प्रातुर्भव देखोनि । बौद्धावतार घेइजे उगेपणीं । पुढें म्लेंछांचा उत्कर्ष देखोनि । कल्की अवतार होईल ॥ ९० ॥ यावेगळे हंस दत्त आणि हयग्रीव । कपिल व्यास रुषभदेव । नरनारायणादि अपूर्व । नाना अवतार ॥ ९१ ॥ जेथें देखिजे विशेषें सामर्थ्य । तो नारायणाचा अवतार सत्य । ऐसे अनेक अवतार धरूनि भक्तकृत्य । प्रेत्नपूर्वक संपादलें ॥ ९२ ॥ इत्यादि अवतारशक्तीचें कृत्य । तें येका आदिनारायणीं च सत्य । जयासी क्षीरसागरीं नित्य । वास्तव्य असे ॥ ९३ ॥ सहस्रा मुखांचा शेष । तयाचें आस्तरणें निशेष । तेथ निद्रा केली सावकाश । लक्ष्मीसहित ॥ ९४ ॥ ऐसा सर्वगुणेंसीं समर्थ । आदिनारायण मूर्त्तिमंत । तें साळकृत निजरूपाचें चित्त । देखिलें आपण ॥ ९५ ॥ यावरी निजरूपीं अहंकार । आहे कीं नाहीं हा केला विचार । तवं मूर्त्तिमंत देखिला शकर । सावंत अवघा ॥ ९६ ॥ पचवदन त्रिनेत्र दशभुज । वामांकीं शोभे शैलजा भोज । व्याघ्रांबर परिधान तेजःपुंज । कर्पुरोज्वळ ॥ ९७ ॥ रुडांकित माळा कंठीं । भाळीं चद्र गंगा जटीं । सर्पभूषणें कटितटीं । दिव्य वसन ॥ ९८ ॥ त्रिशुळ डमरु पिनाकी चाप । असि परशु खट्वांग बाण सर्प । वरदहस्तीं होऊनि सकृप । निजभक्तांकारणें

१ अंत. २ प्रादुर्भाव=संभव, प्रगटता. ३ जेथें दिसती विशेष गुण । ते सद्गुरूचें अधिष्ठान ॥ दास. ४-६-९. ४ आथरुण. ५ भार्या. ६ शकराचें धनुष्य. ७ तरवार. ८ खडा नामक दुधारी तरवार.

॥ ९९ ॥ नदी जयाचें वहन । कैळास निज राज्यभुवन । सैन्यपरिवार भूतगण । असंख्य जया ॥ १०० ॥ ऐसा साधतपणें शंकर । निजरूपीं देखिला अहंकार । एवं मूर्ति लक्षिजे अपार । हिरण्यगर्भात्मक ॥ १ ॥ मग जों सूक्ष्मदृष्टीं सम्यक । याची पाहे विचारणुक । तव त्रिगुण आणि भूतपंचक । समूळ देखें ॥ २ ॥ मग ह्मणे जी श्रीगुरुदेवा । जो तुह्मीं दाविला निजरूपाचा येवा । तव हा तरि देवतामय आघवा । गुणभूतात्मक ॥ ३ ॥ तरि गुणभूतीं जें सांपडलें । तयासी स्थिरतर हि ठसावलें । स्थितियोगें देहत्व हि ठाकलें । सूक्ष्मात्मक चि ॥ ४ ॥ तेथ सूक्ष्मात्मक बोलिजे हिरण्यगर्भ । दिसे केवळ देहाकृति स्वयंभ । देहीं अवस्थेचें दिसे डिंभ । स्थिति हे पाहातां ॥ ५ ॥ स्थिति अवस्था परि सत्वगुणात्मक । सत्वाभिमानी विष्णु सम्यक । विष्णूचें स्थान वैकुंठलोक । प्रविविक्तभोग पैं ॥ ६ ॥ सत्वगुण आणि ज्ञानशक्ति । उकारमात्रेची अभिव्यक्ति । येवं येथ अष्टकोशात्मक गुणभूतयुक्ति । देखिली परिछिन्न ॥ ७ ॥ तरि जी पाहातां हे हि ग्रामणीक । दिसोनि येतसे कीं निष्टंक । मग श्रीप्रभूसीं निशंक । बोलों आरंभिलें ॥ ८ ॥ जी जी स्वामी कैवल्यपति । तुह्मीं जे दाविली निजरूपाकृति । तेथ देखिली द्विदेहोत्पत्ति । स्वानुभवें पाहातां ॥ ९ ॥ तरि पूर्वीं देव बोलिले होते वचन । कीं तुज निजरूप दाखवीन ह्मणोन । तें आजि माझें आर्त्त पुरऊन । सुखिया कीजो ॥ ११० ॥ तरि जी कीजे ऐसी सत्ता । करणें ते चि मूर्खता । माझी मज चि पाहातां । दिसोनि आली ॥ ११ ॥ का जे तुह्मी सर्वज्ञ गोसावी । आणि मी तव येकदेशी मानवी । ऐसिये स्थितीसी साम्यतेची पदवी । घडेल कीं काय ॥ १२ ॥ येथ जी तैसें दिसोनि आलें । जे स्फुलिंगें महातेजासी प्रथिलें । किं दुधें क्षीरसमुद्रासी ह्मणितलें । कीं होई मज-

---

१ उदय, प्राप्ति. २ स्थिति=अस्तित्व. ३ आकृति, प्रतिभास ४ ग्रामिणी=हरामखोरपणा ५ विराट व हिरण्यगर्भ असे दोन देह. ६ मला सुखी करा असें जोरानें ह्मणणें ह्मणजे मूर्खपणा दिसतो ७ ठिणगीनें.

सारिखा ॥ १३ ॥ किं सोमकांतें तया चद्रातें । किं जळबिंदु प्राथिजे जळाब्धीतें । कीं तें सेंधवें क्षारसिंधूतें । ह्मणावें आहे ॥ १४ ॥ अळंकारें काय सुवर्णातें । बोलों येईल पैं निरुतें । जे करीं मज आपणासवेंतें । ह्मणोनियां ॥ १५ ॥ तेवि जी म्या बोलिकेपणें सर्वज्ञा । जे[3] मज दावीं निजरूपसंज्ञा । हे चि कीं जी परम अवज्ञा । दिसोनि आली ॥ १६ ॥ आतां असो देवा काहीं तन्हि । परि मज निजरूपाची बहुत आवसरी । ते स्वामीविना पूर्णत्वाची उर्जरी । करील कोण ॥ १७ ॥ ऐसें ऐकतां चि वचन श्रीगुरु । जो निर्विकल्प कल्पतरु । किं तो उदेला सुबोधसुधाकरु । आर्त्तचकोरतृप्तीद ॥ १८ ॥ मग तेणें उदैजलेर्पणें । फांकलीं बोधामृतमय कीर्णें । ते सर्व हि मम आर्त्तचकोरें घेणें । येक वेळे चि ॥ १९ ॥ मग तेणें तृप्तीचेनि आनदें । नाचों लागे निजछंदें । जे मिया बोलिजे श्रीगुरुप्रसादें । स्वानुभवदिनकर ॥ १२० ॥ दिनकर रामदासीं शरण । रिघोनि केलें ईश्वरद्विदेहविवरण । आतां तृतीय देहेसी पुढील कीर्ण । प्रकाशेल स्वानदें ॥ १२१ ॥ स्वस्ति श्रीस्वानुभवदिनकरे गुरुशिष्यान्वये द्वादश कळापे हिरण्यगर्भ ईश्वरतनुचतुष्टयनिर्शन निरूपणं नाम द्वितीय कीर्ण प्रकाशः ॥ २ ॥

---

॥ श्रीराम ॥

आतां यावरि सद्गुरुसर्वोत्तमें । निजजनयाचककल्पद्रुमें । निजरूप दाविजतसे अति सभ्रमें । ब्रह्मांडात्मक जें ॥ १ ॥ परम आवडीचेनि भरें । बोलिजेल निगमागमदातारें । तें निज अवधानाचेनि पसरें । श्रोतीं कीजे श्रवण ॥ २ ॥ तरि ऐक गा तू शिष्यशिरोमणी । तुवां जें पुसिलें आह्मांलागोनि । विश्वरूपाची आळी घेऊनि । दावा ह्मणतिलें ॥ ३ ॥ तिया ह्मणनयां चि सरिसें । आह्मी दाविजे चि अति उल्हासें । का जे

---

१ खरेपणानें २ तुजपासून निराळें. ३ ( सांगितलें ) कीं ४ सज्ञा=खूण. ५ आवसरी=मोह. ६ स्वस्थता. ७ उपदेशामृत स्रवणारा चद्र च. ८ उदय होण्याचा समय झाला असें समजून. ९ वेद व शास्त्रे यांते देणारा.

भक्तांचया प्रेमाचें पिसें[1] । आह्मासी बहुत ॥ ४ ॥ अरे आपुलें सर्वस्व जावें । परि भक्तांचें प्रेम रक्षावें । जें ह्मणतील तें करावें । आवडीनियां ॥ ५ ॥ ते गणिकेनें आह्मा काय दिधलें । अती शुकमीसें नाम मात्र घेतलें । तिजला अक्षई करूनि ठेविलें । निजपदीं आपले ॥ ६ ॥ तें तन्हि होतें मानवी शरीर । पशु होतसाते गज नक्र । स्मरणासाठीं दोघांस हि उद्धार । केला आवडीं ॥ ७ ॥ पाहें भृगूनें आह्मां काय द्यावें । जे म्यां हृदईं लातेसी साहावें । तें सोसून हि मान्यपणें मिरवावें । भूषण अद्यापि ॥ ८ ॥ अजामेळ ब्राह्मणाचें आचरण । पाहातां दिसे असाधारण । परि पुत्रमीसें हि नारायण । ह्मणता उद्धरिजे ॥ ९ ॥ पाहे पां निशाचर बिभीषण । बंधुभयें मज रिघाला शरण । तो स्थापिला अक्षई राज्य देऊन । चंद्रार्कपर्यंत ॥ १० ॥ सुग्रीव स्त्रीराज्यें साडवला । बंधूच्या रोषें मज शरण रिघाला । तयासाठीं निरापराध वाळी मारिला । उसणें हि देऊनि ॥ ११ ॥ जातीचा तरी कोळी वाल्हा । नारदसंगें उफराटें नाम स्मरला । तो मम चरित्र त्रैलोक्यपावन वदला । शतकोटी भविष्य ॥ १२ ॥ येहीं जाणता नेणता नामोच्चार । केला थोडा अथवा फार । केवळ शिळारूपें जाला अहिल्याउद्धार । मम वेधमात्रें ॥ १३ ॥ वानरीं काय केलें अनुष्ठान । भक्ति तप अथवा साधन । परि संगमात्रें परम पावन । जाले चि निश्चयें ॥ १४ ॥ त्यांसी तन्हि जाला होता संग । राक्षसीं तरि वैर केलें अनेग । परि शत्रुत्वें हि पद तया अभंग । दिधलें साम्राज्य ॥ १५ ॥ तया भ्रवें अचरण काय केलें । त्यासी अढळ चि करूनि बैसविलें ।

---

१ वेड २ शुकाकारणें कुंटणी रामवाणी । मुखें बोलतां ख्याति जाली पुराणीं ॥. ३ सर्व देवामध्यें पूज्य देव कोण हें पाहण्यास्तव, भृगुऋषी देवांची परीक्षा पाहतां पाहतां श्रीविष्णूकडे आला व विष्णु निद्रिस्त असतां त्यांच्या छातींत लत्ताप्रहार केला; परंतु त्याबद्दल विष्णूनें न रागावतां त्याचें भूषण मानून ऋषीचे चरण वंदन केलें. त्यावरून विष्णू हें दैवत सर्व जगास व देवानां हि वंदनीय आहे असें ठरलें. ४ अजामेळ पापी वदे पुत्रकामें । तया मुक्ति नारायणाचेनि नामें ॥. ५ तें व वाल्मिकी रामायण.

प्रह्रादें सहज नाम स्मरिलें । जालों नृसिंह त्यासाठीं ॥ १६ ॥ बळीनें तीन पाडे[1] भूमिदान दिल्हें । त्यासाठीं त्यासी पाताळ चि दिधलें । आणि सेवटीं द्वारपाळपण केलें । वेतनरहित ॥ १७ ॥ पृथ्वी जातां रसातळा । कूर्मरूपें धरिली अवलीळा । हिरण्याक्षापासूनिया भूगोळा । वाराहरूपें सोडविलें ॥ १८ ॥ ब्रह्मा शखभयें वेद विसरला । त्यासाठीं मी जळीं मासा जाला । दुधासाठीं क्षीरसागर चि दिल्हा । उपमन्यासी ॥ १९ ॥ सहस्त्रार्जुनें गोहरण केलें । आणि जमदग्नि-रेणुकेसी छळिलें । त्यासाठीं त्यासी मारूनि म्या केलें । निक्षत्री पृथ्वीसी ॥ २० ॥ पांडव त्रिशुद्धीं[2] मातें भजले । म्या परोपरीं त्यासी रक्षिलें । गोकुळ द्वारिकेसी ह्मणविलें । भूवैकुंठ चि हें ॥ २१ ॥ हें येक येक मी काय सांगें । त्या अयोध्येचिया लोकाचें काय लागे । कीं येकवेळा चि सर्वां हि आपणासगें । वैकुंठा नेइजे ॥ २२ ॥ ऐसा मी भक्तीचेनि भुललेपणें । न पाहें भक्त थोर कीं साने । ते जें ह्मण-तील तें अवश्य करणें । हा आपला स्वभाव ॥ २३ ॥ काय सीता निजांगें होती उघडी । जे मागावी हेममृगकचुकी चोखडी[3] । मग म्यां हि प्रेमाचेनि पैरवडीं[4] । धाविजेना काय ॥ २४ ॥ तरि प्रेमाचें पिसें मज असत । जो मज निजभावें शरणागत । तो मज जें जें ह्मणे मी पुरवीत । तयाचिये मनींचें ॥ २५ ॥ भयें वैरें कामें दास्यें प्रीतीं । जे अखंड मजसीं वेधती[5] । त्यासी आवडीं कोण्हीयेका युक्तीं । उद्धरिजे चि आपण ॥ २६ ॥ निजभावें काया वाचा मनसा । मजसीं अनुसरला जो जैसा । त्यासी म्या निजपद देऊनि सहसा । आपैता[6] कीजे ॥२७॥ असो आतां चि पैं प्रस्तुत तुवां । बैसोनि प्रश्नाचिया राणिवां[7] । पुसिला माझा निजरूपठेवा । जन्मजन्मांतरींचा ॥ २८ ॥ मग तुझया प्रश्ना चि सरिसें । मियां उल्हासलेनि मानसें । ब्रह्मांड शोधून निजरूप दिधसें ।

---

१ 'पाद' बद्दल असावें. वामनानें त्रिपाद भूमिदान मागितलें अशी कथा आहे. २ निश्चयेंकरून. ३ चांगली. ४ उपचार, प्रकार. ५ मला वेधून घेतात. ६ ऐता. ७ राज्यसुखावर

दाविजे तुज ॥ २९ ॥ परि तें तुवां कैसें पाहिजे । जेवि बाळा निज-पतीतें आलिंगिजे । मग लज्जाभयाबळेंनि चित्तें न घेइजे । अनुभव पतिसुखाचा ॥ ३० ॥ किं लेंकरूवां जन्मतिये वेळे । लाविता हि मुख स्तनमेळें । परि पान करावें हें न कळे । तयासी जैसें ॥ ३१ ॥ किं तया अर्डजनित लघुपक्षा । घालिता हि चारा न घेंटे चि का जैसा । किं साधकासी प्रथम दशा । प्रातकाळीं होतसे ॥ ३२ ॥ तेवि पाहातां आजि तुझा ठाईं । देखिली आपण अति नेवाई । जें आमुचें निजसुख अविर्नेई । तया देहत्वें भाविसी ॥ ३३ ॥ जेथूनि आमचे अनेक जन्म । आह्मां हि पाहातेपणें जें निर्सीम । ब्रह्मांडात्मक हें निजधाम । केवळ आमुचें ॥ ३४ ॥ ऐसें हि परि असख्यात । दाविलें तुज स्वरूप अद्भुत । येवढें परि तू तें न मानत । अल्पका बुद्धीं ॥ ३५ ॥ आह्मीं आहेपणें तुज दाविलें । तें तूतें न माने पैं वाहिलें । तें मग देह-पण तुवां भाविलें । इछा आपुलेया ॥ ३६ ॥ तरि आता जेथ हें काहीं हि । समूळत्वें पाहातां नाहीं । तें चि आमुचें निजरूप पाहीं । डोळे उघडूनि ॥ ३७ ॥ विश्वात्मक सगुण रूपाचिया दर्शनें । ह्मणसी हें गुणभूतात्मक देखणें । तरि आतां अव्याकृतपणें । नाहीं हें चि देख ॥ ३८ ॥ तुझा आह्मांसी होता बहुत भ्रम । जे तू जाणता आहेसी निभ्रम । इया हेतुस्तव निजवर्म । दाविलें तुज ॥ ३९ ॥ तें तुवां उब-गेंलेनि मानसें । अव्हेरिलें मर्कटें नारेळ जैसें । किं डुडुळें जेवि डोळेंसें । न लखिजे सूर्या ॥ ४० ॥ किंवा वायसीं जेवि चंद्रामृत । कीं भ्रमरें चंपकपुष्प सुगंधित । केवळ अमृत परि ज्वरित । न मनूनि साडी ॥ ४१ ॥ तेवि असंभवनीय माझें विश्वरूप । तया लाविसी गुणभूताचा आरोप । तरि केवळ निजरूपाचा सक्षेप । ऐकिजे आतां ॥ ४२ ॥

---

१ तरुण स्त्री. २ लेंकरांना. ३ जन्मल्याबरोबर. ४ कोंबडीच्या किंवा चिमणीच्या अंड्यातून नुकत्या च बाहेर पडलेल्या पिलाना. ५ नवीनपणा. ६ अति उच्च प्रकारचें, थोरपणाचें. ७ आहेपण, अस्तित्व. ८ दृश्य नाहीं अशा रूपानें. ९ आपलें गुह्य. १० कंटाळून, त्रासून. ११ घुबडानें. १२ डोळे असून देखील. १३ कावळ्यांनीं.

या ब्रह्मांडात्मक विश्वरूपावेगळें । नाहींपणें जितुलें आडळे । तें चि निजरूप माझें सगळें । मूर्तिपणावेगळें जें ॥ ४३ ॥ जेथ नाहींत पैं हे त्रिगुण । सत्वरजतमादि भानें । तैसें चि भूतपंचक हि जाण । समुळी नाहीं ॥ ४४ ॥ ऐसें सर्वांचें जें मूळभूत । जयासी ह्मणती अव्याकृत । आद्यंतीं विकृतिरहित । सर्वादि जें का ॥ ४५ ॥ जेथूनि उद्भवती ब्रह्मांडें । होती जाती नाना बंडें । जेवि देहाकरितां निवांडें । छाया हे दिसे ॥ ४६ ॥ जैसें कां येका सुवर्णाचे । अलंकार होती नाना परींचे । कीं सूर्यास्तव जेवि मृगांबुचे । वाहाती पूर ॥ ४७ ॥ किं ते उदकाकरिता होती तरंग । अथवा पृथ्वीपासूनि घट अनेग । किं आकाशाचिये आगीं मेघ । उदंड होती ॥ ४८ ॥ किं बीजीं उपजे जेवि वृक्षत्व । का तें दोरियोगें भासे सर्पत्व । किं आकाशापासूनि पंचतत्व । निफजे जेवि ॥ ४९ ॥ तेवि माझें मुळींचें निजरूप । नाहींपणें चि जें अमूप । अनेका ब्रह्मांडांचे आरोप । जयापासूनि ॥ ५० ॥ तें परम प्रेमाचिया आवेशें । निजरूप ह्मणौनीयां विश्वेशें । दाविजे तव गदगदूनि हासे । निजांगें शिष्यराणा ॥ ५१ ॥ ह्मणे जी स्वामी सद्गुरु सर्वेशा । निजरूप पाहावयाचिया आशा । मज होता बहुत भरवसा । तो पुरला आजी ॥ ५२ ॥ देखोनि निजकृपेचा पडिभरु । आह्मी निजरूपाचा आक्षेपं करूं । तव क्षोभलेनि मानसें दातारु । बोलती आह्मा ॥ ५३ ॥ तरि हें जी अपूर्व देखिलें । जे रोषें निजरूप दाविलें । परि हें निकें बहुत जालें । आह्मालागीं जी ॥ ५४ ॥ जेवि बाळकासी कोपलेपणें निजमाता । अहितीं हि रागें मारूं जातां । परि तें होय तयाचया स्वहिता । उपयोग्य कीं ॥ ५५ ॥ अथवा लेसीचे दांत अति तीख । येरां दिसती परि पिलियां सुख । का सूर्यकीर्ण सर्वरसशोषक । परि कमळा प्रिय ॥ ५६ ॥ अथवा शिष्यासी

---

१ अदृश्य तेवढें सर्व. २ स्मरण. ३ अव्याकृत याचा अर्थ, विकाररहित. ४ निर्विवादपणें. ५ मृगजळाचे. ६ अधिकपण. ७ आक्षेप करणें=आकर्षण करणें. ८ नेटकें, चांगलें. ९ मार्जारीचे.

साधनदशे । श्रीगुरु आहाटिती अति आवेशें । परि तें परपदप्राप्तीचिया संतोषें । घेइजे चि येरें ॥ ५७ ॥ तेवि विश्वरूपदर्शनाल्हादें । देवें बोलिजे हर्षविषादें । परि तेणें पाविजती निजपदें । आह्मी येकसरीं चि ॥५८॥ परतु देव बोलिले येक वचन । दाऊनि निजरूपाचें विंदान । तयाचें कौतुक अति गहन । वाटलें आह्मा ॥ ५९ ॥ जें नाहींपणें चि जेथ सर्व । तो चि दावितसा निजरूपगौरव । तरि खरें चि किं हे माव । न कळे देवा ॥ ६० ॥ किंवा पाहातसा आमुचें मन । किं सत्यत्वें यथा नाहींपण । हें जी तुमचें निज महिमान । तुह्मी च जाणा ॥ ६१ ॥ येऱ्हवीं पाहातां सखोलैं दृष्टीं । नाहीं या शब्दार्चीं करितां ठीं । नास्तिकत्वाची परिपाठी । दिसोनि आली ॥ ६२ ॥ नाहींपणें केवळ शून्यासारिखें । वर्तुळ करूनि दाविती अंकलेखें । त्या शून्यत्वीं भलता हि देखे । नेणीवरूपें अज्ञान ॥ ६३ ॥ त्या अज्ञानाचें पाहातां रूप । केवळ जडत्वाचा दिसे साटोप । जडत्वीं दिसे खटाटोप । सत्त विकारांचा ॥ ६४ ॥ मुख्य नाहींपणें जें निजरूप । तरि नास्तिकीं शून्यत्वाचा आरोप । केवळ नेणपणें अज्ञानर्पडप । भावना भाविजे ॥ ६५ ॥ आतां तें विचारितां अज्ञान । अज्ञानीं शून्यत्वें दिसे नेणपण । जेवि आकाश न दिसे परि सघन । सबळत्वें दिसे ॥ ६६ ॥ अहो ईश्वर सस्वरूपीं भुललेपणें । अष्टधेमाजीं बिंबोनि हें मी चि ह्मणे । त्यासी बुद्धिवतीं अव्याकृतपणें । अज्ञान बोलिजे ॥ ६७ ॥ तरि अव्याकृतपणें जें केवळ अज्ञान । तें दावितसा निजरूप ह्मणोन । तरि तेथ आह्मीं सात विकार परिछिन्न । देखिले असती ॥ ६८ ॥ बोलीं बोलता त्यांचें महिमान । सांगितलें न जाय असाधारण । तें यथामति सविस्तर सांगेन । कळेल तैसें ॥ ६९ ॥ पाहाता सूक्ष्म करूनि दृष्टि । शुद्धशबळत्वाचिया परिपाठीं । तव शून्यत्व शब्दाची कसवटी । अद्भुत दिसे ॥ ७० ॥

---

१ सिद्ध करतात (शिक्षा वगैरे करून) २ एकाएकीं. ३ लक्षण. ४ अतिसूक्ष्म. ५ ठिकाण, स्थिति किंवा छाननी ६ रीति. ७ अति नेट. ८ अज्ञानाचें आवरण. ९ ओवी ७१ चरण ३।४ यांत सांगितलेले. १० विशेष. ११ परीक्षा.

या ब्रह्मांडात्मक विश्वरूपावेगळें । नाहींपणें जितुलें आडळे । तें चि निजरूप माझें सगळें । मूर्तिपणावेगळें जें ॥ ४३ ॥ जेथ नाहींत पैं. हे त्रिगुण । सत्वरजतमादि भानें । तैसें चि भूतपंचक हि जाण । समुळीं नाहीं ॥ ४४ ॥ ऐसें सर्वांचें जें मूळभूत । जयासी ह्मणती अव्याकृत । आद्यतीं विकृतिरहित । सर्वादि जें का ॥ ४५ ॥ जेथूनि उद्भवती ब्रह्मांडें । होती जाती नाना बडें । जेवि देहाकरितां निर्वाडें । छाया हे दिसे ॥ ४६ ॥ जैसे कां येका सुवर्णाचे । अळंकार होती नाना परीचे । कीं सूर्यास्तव जेवि मृगांबुचे । वाहाती पूर ॥ ४७ ॥ किं ते उदकाकरितां होती तरग । अथवा पृथ्वीपासूनि घट अनेग । किं आकाशाचिये आगीं मेघ । उदड होती ॥ ४८ ॥ किं बीजीं उपजे जेवि वृक्षत्व । कां तें दोरियोगें भासे सर्पत्व । किं आकाशापासूनि पचतत्व । निफजे जेवि ॥ ४९ ॥ तेवि माझे मुळींचें निजरूप । नाहींपणें चि जें अमूप । अनेका ब्रह्मांडांचे आरोप । जयापासूनि ॥ ५० ॥ तें परम प्रेमाचिया आवेशें । निजरूप ह्मणौनियां विश्वेशें । दाविजे तव गदगदूनि हासे । निजांगें शिष्यराणा ॥ ५१ ॥ ह्मणे जी स्वामी सद्गुरु सर्वेशा । निजरूप पाहावयाचिया आशा । मज होता बहुत भरवसा । तो पुरला आजी ॥ ५२ ॥ देखोनि निजकृपेचा पडिभरु । आह्मी निजरूपाचा आक्षेप करूं । तव क्षोभलेनि मानसें दातारु । बोलती आह्मां ॥ ५३ ॥ तरि हें जी अपूर्व दाखिलें । जे रोषें निजरूप दाविलें । परि हें निकें बहुत जालें । आह्मांलागीं जी ॥ ५४ ॥ जेवि बाळकासी कोपलेपणें निजमाता । अहितीं हि रागें मारूं जातां । परि तें होय तयाचया स्वहिता । उपयोग्य कीं ॥ ५५ ॥ अथवा ठासीचे दात अति तीख । येरां दिसती परि पिलियां सुख । का सूर्यकीर्ण सर्वरसशोषक । परि कमळा प्रिय ॥ ५६ ॥ अथवा शिष्यासी

---

१ अदृश्य तेवढें सर्व. २ स्मरण. ३ अव्याकृत याचा अर्थ, विकाररहित. ४ निर्विवादपणें. ५ मृगजळाचे. ६ अधिकपण. ७ आक्षेप करणें=आकर्षण करणें. ८ नेटकें, चागलें. ९ माजरीचे.

साधनदशे । श्रीगुरु आह्लाटिती अति आवेशें । परि तें परपदप्राप्तीचिया संतोषें । घेइजे चि येरें ॥ ५७ ॥ तेवि विश्वरूपदर्शनाल्हादें । देवें बोलिजे हर्षविषादें । परि तेणें पाविजती निजपदें । आह्मी येकसरीं चि॥५८॥ परंतु देव बोलिले येक वचन । दाऊनि निजरूपाचें विंदान । तयाचें कौतुक अति गहन । वाटलें आह्मां ॥ ५९ ॥ जें नाहींपणें चि जेथ सर्व । तो चि दावितसा निजरूपगौरव । तरि खरें चि किं हे मात्र । न कळे देवा ॥ ६० ॥ किंवा पाहातसा आमुचें मन । किं सत्यत्वें यथा नाहींपण । हें जी तुमचें निज महिमान । तुह्मी च जाणा ॥ ६१ ॥ येऱ्हवीं पाहातां सखोलें दृष्टीं । नाहीं या शब्दाची करितां ठीं । नास्तिकत्वाची परिपाठी । दिसोनि आली ॥ ६२ ॥ नाहींपणें केवळ शून्यासारिखें । वर्तुळ करूनि दाविती अकलेखें । त्या शून्यत्वीं भलता हि देखे । नेणीवरूपें अज्ञान ॥ ६३ ॥ त्या अज्ञानाचें पाहातां रूप । केवळ जडत्वाचा दिसे सांटोप । जडत्वीं दिसे खटाटोप । सप्त विकाराचा ॥ ६४ ॥ मुख्य नाहींपणें जें निजरूप । तरि नास्तिकीं शून्यत्वाचा आरोप । केवळ नेणपणें अज्ञानपडप । भावना भाविजे ॥ ६५ ॥ आता तें विचारितां अज्ञान । अज्ञानीं शून्यत्वें दिसे नेणपण । जेवि आकाश न दिसे परि सघन । सबळत्वें दिसे ॥ ६६ ॥ अहो ईश्वर सस्वरूपीं भुललेपणें । अष्टधेमाजीं बिंबोनि हें मी चि ह्मणे । त्यासी बुद्धिवंतीं अव्याकृतपणें । अज्ञान बोलिजे ॥ ६७ ॥ तरि अव्याकृतपणें जें केवळ अज्ञान । तें दावितसा निजरूप ह्मणोन । तरि तेथ आह्मीं सात विकार परिछिन्न । देखिले असती ॥ ६८ ॥ बोलीं बोलता त्यांचें महिमान । सांगितलें न जाय असाधारण । तें यथामति सविस्तर सांगेन । कळेल तैसें ॥ ६९ ॥ पाहातां सूक्ष्म करूनि दृष्टि । शुद्धशबळत्वाचिया परिपाठीं । तव शून्यत्व शब्दाची कसवटी । अद्भुत दिसे ॥ ७० ॥

---

१ सिद्ध करतात ( शिक्षा वगैरे करून ) २ एकाएकीं. ३ लक्षण. ४ अतिसूक्ष्म. ५ ठिकाण, स्थिति किंवा छाननी. ६ रीति. ७ अति नेट. ८ अज्ञानाचें आवरण. ९ ओवी ७१ चरण ३।४ यात सांगितलेले. १० विशेष. ११ परीक्षा.

या ब्रह्मांडात्मक विश्वरूपावेगळें । नाहींपणें जितुलें आडळे । तें चि निजरूप माझें सगळें । मूर्तिपणावेगळें जें ॥ ४३ ॥ जेथ नाहींत पैं. हे त्रिगुण । सत्वरजतमादि मानें । तैसें चि भूतपंचक हि जाण । समुळीं नाहीं ॥ ४४ ॥ ऐसें सर्वांचें जें मूळभूत । जयासी ह्मणती अव्याकृत । आद्यंतीं विकृतिरहित । सर्वादि जें का ॥ ४५ ॥ जेथूनि उद्भवती ब्रह्मांडें । होती जाती नाना बंडें । जेवि देहाकारितां निर्वाडें । छाया हे दिसे ॥ ४६ ॥ जैसे कां येका सुवर्णाचे । अळंकार होती नाना परींचे । कीं सूर्यास्तव जेवि मृगांबुचे । वाहाती पूर ॥ ४७ ॥ किं ते उदकाकारिता होती तरंग । अथवा पृथ्वीपासूनि घट अनेग । किं आकाशाचिये आगीं मेघ । उदंड होती ॥ ४८ ॥ किं बीजीं उपजे जेवि वृक्षत्व । का तें दोरियोगें भासे सर्पत्व । किं आकाशापासूनि पंचतत्व । निफजे जेवि ॥ ४९ ॥ तेवि माझें मुळींचें निजरूप । नाहींपणें चि जें अमूप । अनेका ब्रह्मांडांचे आरोप । जयापासूनि ॥ ५० ॥ तें परम प्रेमाचिया आवेशें । निजरूप ह्मणौनीयां विश्वेशें । दाविजे तव गदगदूनि हासे । निजांगें शिष्यराणा ॥ ५१ ॥ ह्मणे जी स्वामी सद्गुरु सर्वेशा । निजरूप पाहावयाचिया आशा । मज होता बहुत भरवसा । तो पुरला आजी ॥ ५२ ॥ देखोनि निजकृपेचा पडिभरु । आह्मी निजरूपाचा आक्षेप करूं । तव क्षोभलेनि मानसें दातारु । बोलती आह्मा ॥ ५३ ॥ तरि हें जी अपूर्व देखिलें । जे रोषें निजरूप दाविलें । पारि हें निकें बहुत जालें । आह्मांलागीं जी ॥ ५४ ॥ जेवि बाळकासी कोपलेपणें निजमाता । अहितीं हि रागें मारूं जातां । परि तें होय तयाच्या स्वहिता । उपयोग्य कीं ॥ ५५ ॥ अथवा लेसीचे दात अति तीख । येरां दिसती परि पिलियां सुख । कां सूर्यकीर्ण सर्वरसशोषक । परि कमळा प्रिय ॥ ५६ ॥ अथवा शिष्यासी

१ अदृश्य तेवढें सर्व. २ स्मरण. ३ अव्याकृत याचा अर्थ, विकाररहित. ४ निर्विवादपणें. ५ मृगजळाचे. ६ अधिकपण. ७ आक्षेप करणें=आकर्षण करणें. ८ नेटकें, चांगलें. ९ माजरींचे.

साधनदशे । श्रीगुरु त्राहाटिती अति आवेशें । परि तें परपदप्राप्तीचिया संतोषें । घेइजे चि येरें ॥ ५७ ॥ तेंवि विश्वरूपदर्शनाल्हादें । देवें बोलिजे हर्षविषादें । परि तेणें पाविजती निजपदें । आह्मी येकसरीं चि॥५८॥ परतु देव बोलिले येक वचन । दाऊनि निजरूपाचें विंदान । तयाचें कौतुक अति गहन । वाटलें आह्मा ॥ ५९ ॥ जें नाहींपणें चि जेथ सर्व । तो चि दावितसा निजरूपगौरव । तरि खरें चि किं हे माव । न कळे देवा ॥ ६० ॥ किंवा पाहातसा आमुचें मन । किं सत्यत्वें यथा नाहींपण । हें जी तुमचें निज महिमान । तुह्मी च जाणा ॥ ६१ ॥ येऱ्हवीं पाहातां सखोलें दृष्टीं । नाहीं या शब्दाची करितां ठीं । नास्तिकत्वाची परिपाठी । दिसोनि आली ॥ ६२ ॥ नाहींपणें केवळ शून्यासारिखें । वर्तुळ करूनि दाविती अंकलेखें । त्या शून्यत्वीं भलता हि देखे । नेणीवरूपें अज्ञान ॥ ६३ ॥ त्या अज्ञानाचें पाहातां रूप । केवळ जडत्वाचा दिसे सांटोप । जडत्वीं दिसे खटाटोप । सप्त विकारांचा ॥ ६४ ॥ मुख्य नाहींपणें जें निजरूप । तरि नास्तिकीं शून्यत्वाचा आरोप । केवळ नेणपणें अज्ञानपडप । भावना भाविजे ॥ ६५ ॥ आता तें विचारिता अज्ञान । अज्ञानीं शून्यत्वें दिसे नेणपण । जेवि आकाश न दिसे परि सघन । सबळत्वें दिसे ॥ ६६ ॥ अहो ईश्वर सस्वरूपीं भुललेपणें । अष्टधेमाजीं बिंबोनि हें मी चि ह्मणे । त्यासी बुद्धिवर्ती अव्याकृतपणें । अज्ञान बोलिजे ॥ ६७ ॥ तरि अव्याकृतपणें जें केवळ अज्ञान । तें दावितसा निजरूप ह्मणोन । तरि तेथ आह्मीं सात विकार परिछिन्न । देखिले असती ॥ ६८ ॥ बोलीं बोलता त्यांचें महिमान । सांगितलें न जाय असाधारण । तें यथामति सविस्तर सांगेन । कळेल तैसें ॥ ६९ ॥ पाहाता सूक्ष्म करूनि दृष्टि । शुद्धशबळत्वाचिया परिपाठीं । तव शून्यत्व शब्दाची कसवटी । अद्भुत दिसे ॥ ७० ॥

१ सिद्ध करतात ( शिक्षा वगैरे करून ). २ एकाएकीं. ३ लक्षण. ४ अतिसूक्ष्म. ५ ठिकाण, स्थिति किंवा छाननी. ६ रीति ७ अति नेट. ८ अज्ञानाचें आवरण. ९ ओंवी ७१ चरण ३।४ यात सांगितलेले. १० विशेष. ११ परीक्षा.

या ब्रह्मांडात्मक विश्वरूपावेगळें । नाहींपणें जितुलें आडळे । तें चि निजरूप माझें सगळें । मूर्तिपणावेगळें जें ॥ ४३ ॥ जेथ नाहींत पैं. हे त्रिगुण । सत्वरजतमादि माने । तैसें चि भूतपंचक हि जाण । समुळीं नाहीं ॥ ४४ ॥ ऐसें सर्वांचें जें मूळभूत । जयासी ह्मणती अव्याकृत । आद्यंतीं विकृतिरहित । सर्वादि जें का ॥ ४५ ॥ जेथूनि उद्भवती ब्रह्मांडें । होती जाती नाना बंडें । जेवि देहाकरितां निर्वाडें । छाया हे दिसे ॥ ४६ ॥ जैसे कां येका सुवर्णाचे । अळंकार होती नाना परीचे । कीं सूर्यास्तव जेवि मृगांबुचे । वाहाती पूर ॥ ४७ ॥ किं ते उदकाकारिता होती तरग । अथवा पृथ्वीपासूनि घट अनेग । किं आकाशाचिये आगीं मेघ । उदड होती ॥ ४८ ॥ किं बीजीं उपजे जेवि वृक्षत्व । का तें दोरियोगें भासे सर्पत्व । किं आकाशापासूनि पचतत्व । निफजे जेवि ॥ ४९ ॥ तेवि माझें मुळींचें निजरूप । नाहींपणें चि जें अमूप । अनेका ब्रह्मांडांचे आरोप । जयापासूनि ॥ ५० ॥ तें परम प्रेमाचिया आवेशें । निजरूप ह्मणौनियां विश्वेशें । दाविजे तव गद्गदूनि हासे । निजांगें शिष्यराणा ॥ ५१ ॥ ह्मणे जी स्वामी सद्गुरु सर्वेशा । निजरूप पाहावयाचिया आशा । मज होता बहुत भरवसा । तो पुरला आजी ॥ ५२ ॥ देखोनि निजकृपेच्या पडिभरु । आह्मी निजरूपाचा आक्षेप करूं । तव क्षोभलेनि मानसें दातारु । बोलती आह्मां ॥ ५३ ॥ तरि हें जी अपूर्व देखिलें । जे रोषें निजरूप दाविलें । परि हें निकें बहुत जालें । आह्मालागीं जी ॥५४ ॥ जेवि बाळकासी कोपलेपणें निजमाता । अहितीं हि रागें मारूं जातां । परि तें होय तयाचया स्वहिता । उपयोग्य कीं ॥ ५५ ॥ अथवा लेंसीचे दांत अति तीख । येरां दिसती परि पिलियां सुख । कां सूर्यकीर्ण सर्वरसशोषक । परि कमळा प्रिय ॥ ५६ ॥ अथवा शिष्यासी

---

१ अदृश्य तेवढें सर्व. २ स्मरण. ३ अव्याकृत याचा अर्थ, विकाररहित. ४ निर्विवादपणें. ५ मृगजळाचे. ६ अधिकपण. ७ आक्षेप करणें=आकर्षण करणें. ८ नेटकें, चांगलें. ९ मांजरीचे.

साधनदशे । श्रीगुरु श्राहाटिती अति आवेशें । परि तें परपदप्राप्तीचिया संतोषें । घेइजे चि येरें ॥ ५७ ॥ तैवि विश्वरूपदर्शनाल्हादें । देवें बोलिजे हर्षविषादें । परि तेणें पाविजती निजपदें । आह्मी येकसरीं चि॥५८॥ परतु देव बोलिले येक वचन । दाऊनि निजरूपाचें विंदान । तयाचें कौतुक अति गहन । वाटलें आह्मा ॥ ५९ ॥ जें नाहींपणें चि जेथ सर्व । तो चि दावितसा निजरूपगौरव । तरि खरें चि किं हे भाव । न कळे देवा ॥ ६० ॥ किंवा पाहातसा आमुचें मन । किं सत्यत्वें यथा नाहींपण । हें जी तुमचें निज महिमान । तुह्मी च जाणा ॥ ६१ ॥ येऱ्हवीं पाहाता सखोलीं दृष्टीं । नाहीं या शब्दाची करितां ठीं । नास्तिकत्वाची परिपाठी । दिसोनि आली ॥ ६२ ॥ नाहींपणें केवळ शून्यासारिखें । वर्तुळ करूनि दाविती अंकलेखें । त्या शून्यत्वीं भलता हि देखे । नेणीवरूपें अज्ञान ॥ ६३ ॥ त्या अज्ञानाचें पाहाता रूप । केवळ जडत्वाचा दिसे सांटोप । जडत्वीं दिसे खटाटोप । सप्त विकारांचा ॥ ६४ ॥ मुख्य नाहींपणें जें निजरूप । तरि नास्तिकीं शून्यत्वाचा आरोप । केवळ नेणपणें अज्ञानपंडप । भावना भाविजे ॥ ६५ ॥ आतां तें विचारिता अज्ञान । अज्ञानीं शून्यत्वें दिसे नेणपण । जेवि आकाश न दिसे परि सघन । सबळत्वें दिसे ॥ ६६ ॥ अहो ईश्वर सस्वरूपीं भुललेपणें । अष्टधेमाजीं बिंबोनि हें मी चि ह्मणे । त्यासी बुद्धिवतीं अव्याकृतपणें । अज्ञान बोलिजे ॥ ६७ ॥ तरि अव्याकृतपणें जें केवळ अज्ञान । तें दावितसा निजरूप ह्मणोन । तरि तेथ आह्मीं सात विकार परिछिन्न । देखिले असती ॥ ६८ ॥ बोलीं बोलतां त्यांचें महिमान । सांगितलें न जाय असाधारण । तें यथामति सविस्तर सांगेन । कळेल तैसें ॥ ६९ ॥ पाहाता सूक्ष्म करूनि दृष्टि । शुद्धशबळत्वाचिया परिपाठीं । तव शून्यत्व शब्दाची कसवटी । अद्भुत दिसे ॥ ७० ॥

---

१ सिद्ध करतात (शिक्षा वगैरे करून) २ एकाएकीं. ३ लक्षण. ४ अतिसूक्ष्म. ५ ठिकाण, स्थिति किंवा छाननी. ६ रीति. ७ अति नेट. ८ अज्ञानाचें आवरण. ९ ओवी ७१ चरण ३।४ यात सांगितलेले. १० विशेष. ११ परीक्षा.

या ब्रह्मांडात्मक विश्वरूपावेगळें । नाहींपणें जितुलें आडळे । तें चि निजरूप माझें सगळें । मूर्तिपणावेगळें जें ॥ ४३ ॥ जेथ नाहींत पैं. हे त्रिगुण । सत्वरजतमादि भानें । तैसें चि भूतपंचक हि जाण । समुळी नाहीं ॥ ४४ ॥ ऐसें सर्वांचें जें मूळभूत । जयासी ह्मणती अव्याकृत । आद्यतां विकृतिरहित । सर्वादि जें कां ॥ ४५ ॥ जेथूनि उद्भवती ब्रह्मांडें । होती जाती नाना बंडें । जेवि देहाकारितां निर्वाडें । छाया हे दिसे ॥ ४६ ॥ जैसे कां येका सुवर्णाचे । अळंकार होती नाना परीचे । कीं सूर्यास्तव जेवि मृगांबुचे । वाहाती पूर ॥ ४७ ॥ किं ते उदकाकारिता होती तरग । अथवा पृथ्वीपासूनि घट अनेग । किं आकाशाचिये आगीं मेघ । उदड होती ॥ ४८ ॥ किं बीजीं उपजे जेवि वृक्षत्व । का तें दोरियोगें भासे सर्पत्व । किं आकाशापासूनि पचतत्व । निफजे जेवि ॥ ४९ ॥ तेवि माझें मुळीचें निजरूप । नाहींपणें चि जें अमूप । अनेका ब्रह्मांडांचे आरोप । जयापासूनि ॥ ५० ॥ तें परम प्रेमाचिया आवेशें । निजरूप ह्मणौनीयां विश्वेशें । दाविजे तव गदगदूनि हासे । निजांगें शिष्यराणा ॥ ५१ ॥ ह्मणे जी स्वामी सद्गुरु सर्वेशा । निजरूप पाहावयाचिया आशा । मज होता बहुत भरवसा । तो पुरला आजी ॥ ५२ ॥ देखोनि निजकृपेचा पडिभरु । आह्मी निजरूपाचा आक्षेप करूं । तव क्षोभलेनि मानसें दातारु । बोलती आह्मा ॥ ५३ ॥ तरि हें जी अपूर्व देखिलें । जे रोषें निजरूप दाविलें । परि हें निकें बहुत जालें । आह्मालागीं जी ॥ ५४ ॥ जेवि बाळकासी कोपलेपणें निजमाता । अहितीं हि रागें मारूं जातां । परि तें होय तयाचया स्वहिता । उपयोग्य कीं ॥ ५५ ॥ अथवा लेंसीचे दात अति तीख । येरां दिसती परि पिलियां सुख । का सूर्यकीर्ण सर्वरसशोषक । परि कमळा प्रिय ॥ ५६ ॥ अथवा शिष्यासी

---

१ अदृश्य तेवढें सर्व. २ स्मरण. ३ अव्याकृत याचा अर्थ, विकाररहित. ४ निर्विवादपणें. ५ मृगजळाचे. ६ अधिकपण. ७ आक्षेप करणें=आकर्षण करणें. ८ नेटकें, चांगलें. ९ मांजरीचे.

साधनदशे । श्रीगुरु आहाटिती अति आवेशें । परि तें परपदप्राप्तीचिया संतोषें । घेइजे चि येरें ॥ ५७ ॥ तेवि विश्वरूपदर्शनाल्हादें । देवें बोलिजे हर्षविषादें । परि तेणें पाविजती निजपदें । आह्मी येकसरीं चि ॥ ५८ ॥ परतु देव बोलिले येक वचन । दाऊनि निजरूपाचें विंदान । तयाचें कौतुक अति गहन । वाटलें आह्मा ॥ ५९ ॥ जें नाहींपणें चि जेथ सर्व । तो चि दावितसा निजरूपगौरव । तरि खरें चि किं हे मात्र । न कळे देवा ॥ ६० ॥ किंवा पाहातसा आमुचें मन । किं सत्यत्वें यथा नाहींपण । हें जी तुमचें निज महिमान । तुह्मी च जाणा ॥ ६१ ॥ येऱ्हवीं पाहातां सखोलें दृष्टीं । नाहीं या शब्दाची करिता ठीं । नास्तिकत्वाची परिपाठी । दिसोनि आली ॥ ६२ ॥ नाहींपणें केवळ शून्यासारिखें । वर्तुळ करूनि दाविती अंकलेखें । त्या शून्यत्वीं भलता हि देखे । नेणीवरूपें अज्ञान ॥ ६३ ॥ त्या अज्ञानाचें पाहातां रूप । केवळ जडत्वाचा दिसे साटोप । जडत्वीं दिसे खटाटोप । सप्त विकारांचा ॥ ६४ ॥ मुख्य नाहींपणें जें निजरूप । तरि नास्तिकीं शून्यत्वाचा आरोप । केवळ नेणपणें अज्ञानपडप । भावना भाविजे ॥ ६५ ॥ आतां तें विचारितां अज्ञान । अज्ञानीं शून्यत्वें दिसे नेणपण । जेवि आकाश न दिसे परि सघन । सबळत्वें दिसे ॥ ६६ ॥ अहो ईश्वर सस्वरूपीं भुललेपणें । अष्टधेमाजीं बिंबोनि हें मी चि ह्मणे । त्यासी बुद्धिवर्ती अव्याकृतपणें । अज्ञान बोलिजे ॥ ६७ ॥ तरि अव्याकृतपणें जें केवळ अज्ञान । तें दावितसा निजरूप ह्मणोन । तरि तेथ आह्मीं सात विकार परिछिन्न । देखिले असती ॥ ६८ ॥ बोलीं बोलतां त्याचें महिमान । सांगितलें न जाय असाधारण । तें यथामति सविस्तर सांगेन । कळेल तैसें ॥ ६९ ॥ पाहातां सूक्ष्म करूनि दृष्टि । शुद्धशबळत्वाचिया परिपाठीं । तव शून्यत्व शब्दाची कसवटी । अद्भुत दिसे ॥ ७० ॥

१ सिद्ध करतात (शिक्षा वगैरे करून) २ एकाएकीं. ३ लक्षण. ४ अतिसूक्ष्म. ५ ठिकाण, स्थिति किंवा छाननी ६ रीति. ७ अति नेट. ८ अज्ञानाचें आवरण. ९ ओवी ७१ चरण ३।४ यांत सांगितलेले. १० विशेष. ११ परीक्षा.

या ब्रह्मांडात्मक विश्वरूपावेगळें । नाहींपणें जितुलें आडळे । तें चि निजरूप माझें सगळें । मूर्तिपणावेगळें जें ॥ ४३ ॥ जेथ नाहींत पैं. हे त्रिगुण । सत्वरजतमादि भान । तैसें चि भूतपंचक हि जाण । समुळीं नाहीं ॥ ४४ ॥ ऐसें सर्वांचें जें मूळभूत । जयासी ह्मणती अव्याकृत । आद्यंतीं विकृतिरहित । सर्वादि जें का ॥ ४५ ॥ जेथूनि उद्भवती ब्रह्मांडें । होती जाती नाना बडें । जेवि देहाकरितां निर्वाडें । छाया हे दिसे ॥ ४६ ॥ जैसे कां येका सुवर्णाचे । अळकार होती नाना परीचे । कीं सूर्यास्तव जेवि मृगांबुचे । वाहाती पूर ॥ ४७ ॥ किं ते उदकाकरिता होती तरग । अथवा पृथ्वीपासूनि घट अनेग । किं आकाशाचिये आंगी मेघ । उदड होती ॥ ४८ ॥ किं बीजीं उपजे जेवि वृक्षत्व । का तें दोरियोगें भासे सर्पत्व । किं आकाशापासूनि पचतत्व । निफजे जेवि ॥ ४९ ॥ तेवि माझें मुळींचें निजरूप । नाहींपणें चि जें अमूप । अनेका ब्रह्मांडांचे आरोप । जयापासूनि ॥ ५० ॥ तें परम प्रेमाचिया आवेशें । निजरूप ह्मणौनियां विशेषें । दाविजे तव गदगदूनि हासे । निजांगें शिष्यराणा ॥ ५१ ॥ ह्मणे जी स्वामी सद्गुरु सर्वेशा । निजरूप पाहावयाचिया आशा । मज होता बहुत भरवसा । तो पुरला आजी ॥ ५२ ॥ देखोनि निजकृपेचा पडिभरु । आह्मी निजरूपाचा आक्षेप करूं । तव क्षोभलेनि मानसें दातारु । बोलती आह्मा ॥ ५३ ॥ तरि हें जी अपूर्व देखिलें । जे रोषें निजरूप दाविलें । पारि हें निर्कें बहुत जालें । आह्मांलागीं जी ॥५४ ॥ जेवि बाळकासी कोपलेपणें निजमाता । अहितीं हि रागें मारूं जातां । परि तें होय तयाचया स्वहिता । उपयोग्य कीं ॥ ५५ ॥ अथवा ळेसीचे दात अति तीख । येरां दिसती परि पिलिया सुख । कां सूर्यकीर्ण सर्वरसशोषक । परि कमळा प्रिय ॥ ५६ ॥ अथवा शिष्यासी

---

१ अदृश्य तेवढें सर्व. २ स्मरण. ३ अव्याकृत याचा अर्थ, विकाररहित. ४ निर्विवादपणें. ५ मृगजळाचे. ६ अधिकपण. ७ आक्षेप करणें=आकर्षण करणें. ८ नेटकें, चागलें. ९ माजरीचे.

साधनदशे । श्रीगुरु आहाटिती अति आवेशें । परि तें परपदप्राप्तीचिया संतोषें । घेइजे चि येरें ॥ ५७ ॥ तेवि विश्वरूपदर्शनाल्हादें । देवें बोलिजे हर्षविषादें । परि तेणें पाविजती निजपदें । आह्मी येकसरीं चि॥५८॥ परतु देव बोलिले येक वचन । दाऊनि निजरूपाचें विंदान । तयाचें कौतुक अति गहन । वाटलें आह्मा ॥ ५९ ॥ जें नाहींपणें चि जेथ सर्व । तो चि दावितसा निजरूपगौरव । तरि खरें चि किं हे मात्र । न कळे देवा ॥ ६० ॥ किंवा पाहातसा आमुचें मन । किं सत्यत्वें यथा नाहींपण । हें जी तुमचें निज महिमान । तुह्मी च जाणा ॥ ६१ ॥ येऱ्हवीं पाहातां सखोलैं दृष्टीं । नाहीं या शब्दाची करितां ठीं । नास्तिकत्वाची परिपाठी । दिसोनि आली ॥ ६२ ॥ नाहींपणें केवळ शून्यासारिखें । वर्तुळ करूनि दाविती अंकलेखें । त्या शून्यत्वीं भलता हि देखे । नेणीवरूपें अज्ञान ॥ ६३ ॥ त्या अज्ञानाचें पाहातां रूप । केवळ जडत्वाचा दिसे साटोप । जडत्वीं दिसे खटाटोप । सप्त विकारांचा ॥ ६४ ॥ मुख्य नाहींपणें जें निजरूप । तरि नास्तिकीं शून्यत्वाचा आरोप । केवळ नेणपणें अज्ञानर्पडप । भावना भाविजे ॥ ६५ ॥ आता तें विचारिता अज्ञान । अज्ञानीं शून्यत्वें दिसे नेणपण । जेवि आकाश न दिसे परि सघन । सबळत्वें दिसे ॥ ६६ ॥ अहो ईश्वर सस्वरूपीं भुललेपणें । अष्टधेमाजीं बिंबोनि हें मी चि ह्मणे । त्यासी बुद्धिवर्ती अव्याकृतपणें । अज्ञान बोलिजे ॥ ६७ ॥ तरि अव्याकृतपणें जें केवळ अज्ञान । तें दावितसा निजरूप ह्मणोन । तरि तेथ आह्मीं सात विकार परिछिन्न । देखिले असती ॥ ६८ ॥ बोलीं बोलतां त्याचें महिमान । सांगितलें न जाय असाधरिण । तें यथामति सविस्तर सांगेन । कळेल तैसें ॥ ६९ ॥ पाहातां सूक्ष्म करूनि दृष्टि । शुद्धशबळत्वाचिया परिपाठीं । तव शून्यत्व शब्दाची कसवटी । अद्भुत दिसे ॥ ७० ॥

१ सिद्ध करतात (शिक्षा वगैरे करून) २ एकाएकीं. ३ लक्षण. ४ अतिसूक्ष्म. ५ ठिकाण, स्थिति किंवा छाननी ६ रीति. ७ अति नेट. ८ अज्ञानाचे आवरण. ९ ओंवी ७१ चरण ३।४ यांत सांगितलेले. १० विशेष. ११ परीक्षा.

या ब्रह्मांडात्मक विश्वरूपावेगळें । नाहींपणें जितुलें आडळे । तें चि निजरूप माझें सगळें । मूर्तिपणावेगळें जें ॥ ४३ ॥ जेथ नाहींत पैं-हे त्रिगुण । सत्वरजतमादि भानें । तैसें चि भूतपंचक हि जाण । समुळीं नाहीं ॥ ४४ ॥ ऐसें सर्वांचें जें मूळभूत । जयासी ह्मणती अव्याकृत । आद्यतां विकृतिरहित । सर्वादि जें कां ॥ ४५ ॥ जेथूनि उद्भवती ब्रह्माडें । होती जाती नाना बडें । जेवि देहाकरितां निर्वाडें । छाया हे दिसे ॥ ४६ ॥ जैसे कां येका सुवर्णाचे । अळंकार होती नाना परीचे । कीं सूर्यास्तव जेवि मृगांबुचे । वाहाती पूर ॥ ४७ ॥ किं ते उदकाकरिता होती तरग । अथवा पृथ्वीपासूनि घट अनेग । किं आकाशाचिये आगी मेघ । उदड होती ॥ ४८ ॥ किं बीजीं उपजे जेवि वृक्षत्व । का तें दोरियोगें भासे सर्पत्व । किं आकाशापासूनि पचतत्व । निफजे जेवि ॥ ४९ ॥ तेवि माझें मुळींचें निजरूप । नाहीं-पणें चि जें अमूप । अनेका ब्रह्माडांचे आरोप । जयापासूनि ॥ ५० ॥ तें परम प्रेमाचिया आवेशें । निजरूप ह्मणौनिया विश्वेशें । दाविजे तव गदगदूनि हासे । निजांगें शिष्यराणा ॥ ५१ ॥ ह्मणे जी स्वामी सद्गुरु सर्वेशा । निजरूप पाहावयाचिया आशा । मज होता बहुत भरवसा । तो पुरला आजी ॥ ५२ ॥ देखोनि निजकृपेचा पडिभरु । आह्मी निजरूपाचा आक्षेप करूं । तव क्षोभलेनि मानसें दातारु । बोलती आह्मा ॥ ५३ ॥ तरि हें जी अपूर्व देखिलें । जे रोषें निजरूप दाविलें । परि हें निकें बहुत जालें । आह्मालागीं जी ॥ ५४ ॥ जेवि बाळकासी कोपलेपणें निजमाता । अहितीं हि रागें मारूं जातां । परि तें होय तयाचया स्वहिता । उपयोग्य कीं ॥ ५५ ॥ अथवा लांसीचे दात अति तीख । येरां दिसती परि पिलियां सुख । का सूर्यकीर्ण सर्वरसशोषक । परि कमळा प्रिय ॥ ५६ ॥ अथवा शिष्यासी

---

१ अदृश्य तेवढें सर्व. २ स्मरण. ३ अव्याकृत याचा अर्थ, विकाररहित. ४ निर्विवादपणें. ५ मृगजळाचे. ६ अधिकपण. ७ आक्षेप करणें=आकर्षण करणें. ८ नेटकें, चागलें. ९ मांजरीचे.

साधनदशे । श्रीगुरु आहाटिती अति आवेशें । परि तें परपदप्राप्तीचिया सतोषें । घेइजे चि येरें ॥ ५७ ॥ तेंवि विश्वरूपदर्शनाल्हादें । देवें बोलिजे हर्षविषादें । परि तेणें पाविजती निजपदें । आह्मी येकसरीं चि॥५८॥ परतु देव बोलिले येक वचन । दाऊनि निजरूपाचें विंदान । तयाचें कौतुक अति गहन । वाटलें आह्मा ॥ ५९ ॥ जें नाहींपणें चि जेथ सर्व । तो चि दावितसा निजरूपगौरव । तरि खरें चि किं हे मात्र । न कळे देवा ॥ ६० ॥ किंवा पाहातसा आमुचें मन । किं सत्यत्वें यथा नाहींपण । हें जी तुमचें निज महिमान । तुह्मी च जाणा ॥ ६१ ॥ येऱ्हवीं पाहातां सखोलें दृष्टीं । नाहीं या शब्दाची करिता ठीं । नास्तिकत्वाची परिपाठी । दिसोनि आली ॥ ६२ ॥ नाहींपणें केवळ शून्यासारिखें । वर्तुळ करूनि दाविती अंकलेखें । त्या शून्यत्वीं भलता हि देखे । नेणीवरूपें अज्ञान ॥ ६३ ॥ त्या अज्ञानाचें पाहातां रूप । केवळ जडत्वाचा दिसे सांटोप । जडत्वीं दिसे खटाटोप । सप्त विकारांचा ॥ ६४ ॥ मुख्य नाहींपणें जें निजरूप । तरि नास्तिकीं शून्यत्वाचा आरोप । केवळ नेणपणें अज्ञानपडप । भावना भाविजे ॥ ६५ ॥ आतां तें विचारितां अज्ञान । अज्ञानीं शून्यत्वें दिसे नेणपण । जेवि आकाश न दिसे परि सघन । सबळत्वें दिसे ॥ ६६ ॥ अहो ईश्वर सस्वरूपीं भुललेपणें । अष्टधेमाजीं बिंबोनि हें मी चि ह्मणे । त्यासी बुद्धिवर्ती अव्याकृतपणें । अज्ञान बोलिजे ॥ ६७ ॥ तरि अव्याकृतपणें जें केवळ अज्ञान । तें दावितसा निजरूप ह्मणोन । तरि तेथ आह्मीं सात विकार परिछिन्न । देखिले असती ॥ ६८ ॥ बोलीं बोलता त्यांचें महिमान । सांगितलें न जाय असाधारण । तें यथामति सविस्तर सांगेन । कळेल तैसें ॥ ६९ ॥ पाहाता सूक्ष्म करूनि दृष्टि । शुद्धशबळत्वाचिया परिपाठीं । तव शून्यत्व शब्दाची कसवटी । अद्भुत दिसे ॥ ७० ॥

१ सिद्ध करतात ( शिक्षा वगैरे करून ) २ एकाएकीं. ३ लक्षण. ४ अतिसूक्ष्म. ५ ठिकाण, स्थिति किंवा छाननी. ६ रीति ७ अति नेट. ८ अज्ञानाचे आवरण. ९ ओवी ७१ चरण ३।४ यात सांगितलेले. १० विशेष. ११ परीक्षा.

मग तया शब्दाचिया गुणें । अनेकां विकारासी निर्माण होणें । काम क्रोध शोक मोह मद सत्राणें । लोभभयादिक ॥ ७१ ॥ तेवि जी ये अज्ञानीं विकार । पाहातां दिसती बहुत फार । जयांस्तव हा जगडंबर । जाला खरेंपणें ॥ ७२ ॥ ऐसें नास्तित्वें जें केवळ अज्ञान । अव्याकृतपणें दिसे संपूर्ण । अव्याकृतीं आद्यंत नेणपण । तमोगुणासारिखें ॥ ७३ ॥ तया तमोगुणाची अभिव्यक्ति । करितां केवळ रुद्रमूर्ति । जया अवस्थेची सदैव उन्नत्ति । प्रळयात्मक ॥ ७४ ॥ तेथ जो कां मकारमात्रात्मक शंकर । तो अव्याकृतीं अभिमानी साचार । त्याचिया निवासस्थानाचा करितां विचार । तव तो कैळासवासी ॥ ७५ ॥ कैळासीं असोनि आनंदभोग । द्रव्यशक्तीसीं भोगितसे अव्यंग । एवं अष्टकोशेंसीं सांग । ब्रह्मांडीं अव्याकृत हें ॥ ७६ ॥ ऐसियासी ह्मणतसा आपुलें निजरूप । आणि दृष्टांत हि देतसा अमूप । तरि आतां फळलें पुण्य कीं पाप । ह्मणों जी देवा ॥ ७७ ॥ आह्मी नेणपणें पुसों ठेवा । तव तुह्मी सर्वज्ञपणें आह्मां झेंकवा । आणि थोरपणें तरि आनवा । आह्माआपणांसी ॥ ७८ ॥ तरि कृपाळुवा कृपामूर्ति । येकी असे जी तुह्मासी विनति । जें आह्मा निजरूप सहदृष्टांतीं । दाविलें देवें ॥७९॥ तें आद्यतीं मियां पाहिलें । पाहोनि स्वानुभवें विचारिलें । तवं विकाराचें चि वोतलें । समूळ अवघें ॥ ८० ॥ जेवि का पाहों जातां बीजभाव । तवं तें वृक्षाकारें चि सावेव । कीं सुवर्णी च अळंकारत्व । अनेकपणें ॥ ८१ ॥ कीं ते घटरूप पृथिवी । विकाराची च दिसे आघवी । कीं सूर्यकीर्णास्तव उखरवीं । मृगजळें दिसती ॥ ८२ ॥ किं तया सगुण शरीराकरितां । दिसे छायारूप तत्वता । किंवा आकाशाचया अवकाशता । शब्द करिती मेघ ॥ ८३ ॥ तेवि विश्वरूपात्मक जें हें आघवें ।

---

१ सवेग. २ फसवितां. ३ अनव=वृद्ध,जुनाट, किंवा अनवा=अतिशयितपणानें आणि वास्तविक आपला आणि आमचा परस्पर संबंध तर अतिशय थोरपणाचा (सज्जनपणाचा) आहे, असा अर्थ. ४ अव्याकृतस्वरूप. ५ कार्यरूपानें. ६ पोकळीमुळें.

अन्यथाज्ञानाचया गौरवें । पाहातां आद्यंत दिसे बरवें । अज्ञानीं इये ॥ ८४ ॥ ऐसें कार्यकारणभावें । जें येरयेरांतें प्रसवे । पाहाता गुणभूताचें चि आघवें । दिसे मुळींहूनि ॥ ८५ ॥ तरि गुणभूतांचें जें बोतलें । कार्यकारणभावें असे संचलें । येथ कर्त्तेपण तव राहिलें । यावेगळें चि ॥ ८६ ॥ जया कर्त्तयाचा आगीं । कार्यरूपें कारणाची आंगी । देहत्रयाचिया सर्गीं । लेइला असे जो ॥ ८७ ॥ अहो विराट आणि हिरण्यगर्भ । हें कार्यरूपें अन्यथाज्ञान देहद्वयडिंभ । मग याचें अव्याकृतपणें अज्ञान स्वयंभ । कारणरूप ॥ ८८ ॥ ऐसें समूळ कार्यकारण । हें जरि देहत्रय तुह्मी चि संपूर्ण । तरि मग कर्त्ता तो असे कोण । तुह्मांवेगळा ॥ ८९ ॥ आणि येचिविषईं जी श्रुतिस्मृति । नाना ग्रंथांचिया संमतीं । बोलिली स्वरूपसंवित्ति । स्वानुभवैक ॥ ९० ॥ कीं जो हा सकळ चराचरभावें । ययाचा कर्त्ता तो चि देव । आणि पाहों जातां निरावेव । निर्गुणरूप ॥ ९१ ॥ तरि नवल नव्हे जी हें देवा । जें वंध्यापुत्र बैसला राणिवा । आणि खपुष्पाचा बरवा । तुरा खोविला ॥ ९२ ॥ तेवि जी सर्वकर्त्ता तो चि देव । पाहों जाता निरावेव । या वचनाचा अभिप्राव । न कळे आह्मां ॥ ९३ ॥ तरि निजजनकृपाळुत्वें । वेदांतवेद्यें श्रीदेवें । सांगिजे मज आघवें । उमजे ऐसें ॥ ९४ ॥ लडिवाळपणें बोलणें ऐसें । ऐकोनि उल्हासलेनि मानसें । निजमोक्षश्रीनिवासें । बोलों आरंभिलें ॥ ९५ ॥ तरि ऐक गा श्रोतयांच्या नरेंद्रा । सत्वचकोरसुचंद्रा । श्रवणसौभाग्यरत्नसमुद्रा । प्रश्नुनिधी ॥ ९६ ॥ अरे आमुचा चि समूळ शोध । करूं पाहासी एवंविध । परि आपणाकडे पाहोनि शुद्ध । न विचारिसी आपणा ॥ ९७ ॥ अरे जें माझें निजांचें विश्वरूप । तयाचा तुवां चि केला

---

१ परस्परास. २ अंगी=अगडें. ३ डिंब=आकृति, प्रतिभास. ४ अनुमोदनानें. ५ अनुभविलेलें स्वरूपज्ञान. ६ भाव=रूप. स्थावरजंगमात्मक सृष्टि. ७ की. ८ राज्यावर. ९ मोक्षलक्ष्मीचे ठायीं वास करणारानें. १० राजा. ११ आत्मस्वरूपाचें किंवा निजजन ह्मणजे भक्त त्यांचे आवडतें.

आक्षेप । म्हणोनि आह्मी तुज संक्षेपें । दाविला तयाचा ॥ ९८ ॥ तयासी ह्मणसी हें सगुण । तरि तें असो आमुचें आह्मालागून । प्रस्तुत आपणासी आधीं विचारून । पाहें सम्यक ॥ ९९ ॥ मग आमुचें हि निजरूप । कळेल तुज आपेंआप । तेणें होसील निष्पाप । निःसंदेह ॥ १०० ॥ ऐसें बोलतां चि श्रीगुरुराव । जो जगद्गुरु देवादिदेव । तें ऐकतां चि साधकाआंगीं सद्भाव । प्रगटले कैसे ॥ १ ॥ जेवि स्पर्शतां चि चंद्रकर । सोमकांता सुटती पाझर । अथवा वर्षाकाळीं मयूर । आनंदती ॥ २ ॥ किं जेवि वसंतागमें वनमाधवीं । रंगडूनि ये पुष्पपल्लवीं । किं नवघनें अंकुरे पृथ्वी । बहुवसपणें ॥ ३ ॥ अथवा होतां सूर्योदय । कमळिणी जेवि विकासमय । तेवि होतां श्रीगुरुकृपापसाय । स्वानुभव-दिनकरीं ॥ ४ ॥ असो ब्रह्मांडींचे देहत्रय प्रस्तुत । विराट हिरण्यगर्भ अव्याकृत । अन्यथाज्ञानेंसीं अज्ञानजनित । शबळ पंचभौतिक ॥ ५ ॥ ते यथान्वयें अष्टकोशेंसीं । सांगितले ईश्वरदेहत्रयासी । पुढिलिये कीर्णी दिनकरें रामदासीं । चतुर्थ देह सांगिजे ॥ १०६ ॥ स्वस्ति श्रीस्वानुभव-दिनकरे गुरुशिष्यान्वये द्वादश कळापे ईश्वरतनु अव्याकृत ब्रह्मांडदेह तृतीय कथन निरूपण नाम तृतीय कीर्ण प्रकाशः ॥ ३ ॥

---

॥ श्रीराम ॥

ब्रह्मीं अहं ब्रह्म ऐसें जें स्फुरण । तें चि मूळमायेचें अधिष्ठान । ते मूळमायेसीं वेगळेपणें असोनि अभिन्न । वर्त्ते जो पुरुष ॥ १ ॥ तो मूळपुरुष ते मूळप्रकृति । द्विधा असोनि येकांगें वर्त्तती । जेवि सूर्य आणि प्रभा शोभती । द्वैतत्वें अद्वैत ॥ २ ॥ अर्द्धनारीनटेश्वर बोलिजे । तो हा व्यवहारें जाणिजे । महावाक्यशब्द निफजे । ययाचिपासीं ॥३॥ ब्रह्मोऽहमस्मि हें महावाक्य । येथींचा अर्थ अति अतर्क्य । विचारितां

---

१ संशय. २ सूक्ष्मरूप, हिरण्यगर्भ, अव्याकृत वगैरे. ३ सात्विक भाव, कंप रोमांचादि आठ आहेत ते. ४ वनश्री. ५ पसाय=प्रसाद. ६ पिंडब्रह्मांडाची घडामोड. ७ दासबोध ५×६×४४.

जीवशिवाचें पा[१]र्थैक्य । ऐक्यासी येतसे ॥ ४ ॥ असो ऐसें जें अखंड स्मरण । ते चि मूळमाया महाकारण । स्मरणानतरें विस्मरण । ते चि कारण अव्याकृत ॥ ५ ॥ तें अव्याकृत पूर्वीं[२] निरोपिलें । जें निजरूप ह्मणौनि दाविलें । तें तुवां अन्हेरूनि सोडिलें । हें गुणभूतात्मक ह्मणौनि ॥ ६ ॥ तरि तें असो आता प्रस्तुत । आमचें निजरूप जें हें सतत । मूळमायेचा जो ईश्वर आधि[३]ष्ठित । तें चि आमुचें निजरूप ॥ ७ ॥ ऐसें श्रीगुरूचें ऐकोनि वचन । शिष्याआगीं सात्विकादि भाव निर्माण । जालें महावाक्यश्रवणविवरण । यथान्वयें सा[४]र्कल्य ॥ ८ ॥ स्वकीय सप्रदायप्र[५]माण । केलिया महावाक्यविवरण । येथें शिष्यप्रज्ञा पाहिजे कारण । ते फळेल स्वानुभवेंसीं ॥ ९ ॥ तेथें अज्ञानतमासी नाश जाला । ज्ञानसूर्य अखडैक प्रकाशला । ब्रह्मानुभवाश्रियें विकाशला । [६]भावाष्टकळिकासमूह ॥ १० ॥ स्वानदाश्रु नेत्रकमळीं । पाडुरता उत्पन्न गडस्थळीं । कठीं बाष्प हृदयकमळीं । दाटलें स्वेद ॥ ११ ॥ जवाद्वई प्रकंप थरथरा । रोमाकुर उभारले सर्व शरीरा । निःसज्ञता बाणली अतरा । स्वानदउभवणी होतसे ॥ १२ ॥ तेथें शरीरासी कोण सावरी । तथापि अवस्[७]था जिरऊनि अंतरीं । येऊनि प्रत्य[८]गावृत्तीवरी । श्रीगुरुमूर्ति अवलोकिलें ॥ १३ ॥ अत्यत भा[९]वाथिलेनि विमळ । देवदर्शनालागीं उतावेळ । तवं देवत्व चि पावलें केवळ । आपणाचिपासीं ॥ १४ ॥ या सुखासी कैंची समता । कोठें जीवत्व कोठें निजात्मता । पूर्व ससारश्रमीं [१०]कृतार्थता । मानिता जाला ॥ १५ ॥ मिथ्यामय मायापटळ । सत्य चि भासलें होतें केवळ । जैसें नौ[११]थिलें चि मृगजळ । दाटलें दिसे ॥ १६ ॥ विचारितां तें काहीं च नाहीं । शुद्ध सुप्रकाश चि पाहीं । तैसें मिथ्या प्रपंचभान सर्व हि । सत्य ब्रह्म चि असे ॥ १७ ॥

---

१ पृथकत्व. २ दास० १५-७-३५ वरील टीप पहा ३ अधिष्ठाता ४ पूर्णपणें, विस्तृतपणानें. ५ साप्रदायास अनुसरून. ६ कप रोमाचादि सात्विक भाव, ह्या च कोणी कला, त्यांच्या समूह. ७ देहातीत अवस्था. ८ स्वस्वरूपाकार वृत्तीवर. ९ प्रेमयुक्त होऊन. १० पूर्वी केलेल्या ससाराच्या श्रमाचें सार्थक झालें असें. ११ खोटें, लटकें.

ऐसा अवस्थात्रयांचा पावोनि प्रांत । चतुर्थीसी जाला सुविश्रांत । असंत चि विश्व मिथ्याभूत । सस्वरूप प्रकाशलें ॥ १८ ॥ निराकार निराभास निर्गुण । निर्मळ निश्चळ नित्य संपूर्ण । अनंताकाश व्यापूनि पूर्ण । अपरांपर ॥ १९ ॥ आकार उत्पत्ति स्थिति नाशिवंत । आत्मा निर्विकार सत्य शाश्वत । जेवि कां विराटनाशीं असंत । आकाश अविकंपें ॥२०॥ नव्हे स्वेत पीत हरित नीळ । परि स्वप्रकाशवत अति तेजाळ । स्पर्शासी न कळे परि अविचळ । चित्तातीत निसग जें ॥ २१ ॥ ऐसिया स्वरूपानंतसागरीं । तन्मयत्वें चढली चित्तलहरी । निशेष ससारिक सपरिवारीं । बुडोनि गेले ॥ २२ ॥ करिता निरावलंबीं अवलंबन । अर्द्धोन्मीळित जाले नयन । अंत:कर्णचतुष्टयेंसीं मन । उन्मन जालें ॥ २३ ॥ ऐसे स्वानंदाचा सुकाळ । जाला जेथें नाहीं काळवेळ । त्यासी उपमावया केवळ । विषयसुख आडळे ॥ २४ ॥ परंतु आब्रह्मादि विषयानंद । न घडे तयासी वियोगदुखाचा प्रमाद । आणि सेवित असताचि होय मंद । विकृति वाटे ॥ २५ ॥ ऐसिया सुखाची समता । केवि घडे स्वानंदा शाश्वता । तें निजानंदसुख स्वता । अनुभवैकवेद्य ॥ २६ ॥ स्वानंद तुकावया काटाळें । सर्व जीवानंद तुकिता तुळे । परि पाल्लेडें गेलें अंतराळें । स्वानंद तुकेना ॥ २७ ॥ ऐसिये स्वानंदसुरंवाडीं । आपेंआप अनुभविता गोडी । प्रत्यगावृत्तीनें आवडीं । शरीर सावरिलें ॥ २८ ॥ जैसें भ्रंष्ठ भूपासी राज्य आलें । तेणें दुर्बळ सख्यांसी सांभाळिलें । तत्काळ आपणाऐसें समर्थ केलें । आपुलिया सामर्थ्यें ॥ २९ ॥ सावध जालें अंत:कर्णपंचक । तेणें चेतवला इंद्रियदशक । परंतु स्वानुभवाचें वीक । चढलें चि असे ॥ ३० ॥ तो जागा ना निदसुरा ।

---

१ तुर्यावस्थेस आल्यावर. २ अशाश्वत. ३ अपरंपार. ४ असतें ५ स्थिर. ६ मनाचें भान नाहींसें झालें इतकें स्वरूपीं लीन झालें. ७ अतिशय मोह. ८ बाधक होतो. ९ पारडें. १० सुखात निमग्न असतां. ११ सहज. १२ पदच्युत झालेल्या. १३ गरीब मित्रांना. १४ तेज, सौंदर्य.

येकायेकी ना दुसरा । अद्वैतें द्वैतप्रचारा । देखत असे ॥ ३१ ॥ जैसें स्वप्नीं सत्यत्वें देखिलें जग । आणि जागा होऊनि पाहे मग । तें स्मरत असे परि दृश्य भाग । मिथ्यामय सकळ ॥ ३२ ॥ तैसें प्रपंचत्व जें होतें किडाळ । तें निरशलें जैसें नभींचें सुनीळें । केवळ भासे अतराळ । तैसें ब्रह्म अनुभवलें ॥ ३३ ॥ कृतकृत्यता ब्रह्मसाक्षात्कारें । निःशेष फिटलें भवभुरेरें । दाटला सद्गुरुचेनि उपकारें । लोटला चरणावरी ॥ ३४ ॥ सप्रेम साष्टांग नमस्कार घाली । प्रदक्षिणा करी मंद पाउलीं । नाचे वाजवी करताळी । जय सद्गुरु ह्मणोनिया ॥ ३५ ॥ उभा राहोनि कृतांजुळी । स्तुति करितसे मजुळी । जी जी सद्गुरु तू परब्रह्ममंडळीं । अमूर्त मूर्तिमत ॥ ३६ ॥ तू केवळ निर्गुण निर्विकार । परि भक्तोद्धरणार्थ धरिला आकार । शरणागतांचा करूनि अंगिकार । निजकृपां उद्धरिसी ॥ ३७ ॥ असो निजरूपदर्शनालागून । स्वामी बोलिले येक वचन । तयाचें विचारिता विंदान । ब्रह्मादि हरिहरा सुसेव्य ॥ ३८ ॥ तरि ब्रह्मीं अहं ब्रह्म ऐसें जें स्मरण । तें चि प्रकृतिपुरुषाचें लक्षण । तेथ अष्टधा सूक्ष्म स्वरूपें आत्मज्ञान । अव्यक्तरूप बोलिजे ॥ ३९ ॥ तरि जी देवा हें तैसें जालें । नाम सुवर्ण परि वर्गा ऐसें देखिलें । किं तें अमृत चवीसी उत्तम आलें । काजीसारिखें चि ॥ ४० ॥ तैसें देवा तुमचें स्वरूप । निर्गुण निराकार अमूप । तेथ मिथ्या मायामय आरोप । प्रकृतिपुरुषात्मक हा ॥ ४१ ॥ तरि जी निर्गुणीं हें सकळ माईक । तेथ अर्द्धनारीनटेश्वर हें किमात्मक । आणि अहं ब्रह्म हें स्मरणाचें कौतुक । कवण स्मरे जी ॥ ४२ ॥ जेथ स्फुरणत्वें स्मरणाभास जाला । तेथ मूळमायेसीं ईश्वर अधिष्ठिला । तरि तो गुणभूतीं अवश्य सांपडला । येथ सदेह काय जी ॥ ४३ ॥ जैसें पूर्वीं निजरूप ह्मणौनि दाविलें । तें गुणभूतत्वें दिसे आकारलें । ऐसे चि देहत्रय यथान्वयें निरशले । अन्यथाज्ञान अज्ञानेंसीं ॥ ४४ ॥

---

१ निःसंग. २ खोटें, लटिकें. ३ नीलिमा. ४ भुरेरें–चेडें, चेटुक. ५ वर्मी लक्ष्य, लक्षण. ६ कथिलाप्रमाणें.

विराट हिरण्यगर्भ अव्याकृत । तैसें चि मूळमायामय हें चतुर्थ । ईश्वराचें देह भासत । ब्रह्मांडात्मक ज्ञानजन्य ॥ ४५ ॥ जेथ देहत्व यासी उभारलें । तेथ अवस्थेस हि सर्वसाक्षित्व आलें । मग सहज चि अभिमानी होणें लागलें । सर्वेश्वरासी च पैं ॥ ४६ ॥ सर्वेश्वराचें स्थान निळारंभ । आनंदावभास भोग स्वयंभ । मग तेथें शुद्धसत्वगुणाचा अवष्टंभे । इच्छाशक्तिसमवेत ॥ ४७ ॥ तेथ देखिली सहजें अर्द्धमात्रा । जे कां साक्षात्प्रणवजन्य स्वतंत्रा । एवं अष्टकोशेंसीं मूळमायेचिया यंत्रा । ईश्वरसहित देखिलें ॥ ४८ ॥ ऐसियासी ह्मणतसा आपुलें निजरूप । तरि फळलें आमचें भाग्य अमूप । ईश्वरतनुचतुष्टयासी सत्स्वरूप । आमचेनि ह्मणवेल कैसें ॥ ४९ ॥ पूर्वी येकादश कळापामाझारीं । निरोपिलीं जीवचतुष्टयकुसरी । ते पिंडात्मक पंचीकृत साजिरी । हे ब्रह्मांडात्मक अपंचीकृत ॥ ५० ॥ ब्रह्मांडीं देहचतुष्टय ईश्वराचें । तदंश पिंडीं देहचतुष्टय जीवाचें । उभयतां परस्परें करितां ऐक्य यांचें । जीवेश्वरीं सहजें ऐक्यतां ॥ ५१ ॥ आतां ब्रह्मांडीं प्रथम देह ईश्वराचें । विराट जाणिजे विश्वरूपेंसीं साचें । तदंश पिंडीं स्थूळ देह जीवाचें । पंचवीसा तत्वेंसीं ॥ ५२ ॥ ब्रह्मांडीं अवस्था विराटदेहाची । उत्पत्ति तदंश जागृति पिंडींची । ब्रह्मांडीं ब्रह्मा अभिमानी तैसा चि । तदंश पिंडीं विश्व बोलिजे ॥ ५३ ॥ ब्रह्मांडीं सत्यलोक निवासस्थान । पिंडीं स्थान बोलिजे नयन । ब्रह्मांडीं क्रियाशक्तीसीं रजोगुण । तो चि पिंडीं बोलिजे ॥ ५४ ॥ ब्रह्मांडीं सुखदुःखात्मक स्थूळभोग निफजे । तो चि भोग पिंडींहि बोलिजे । उभयतां अकारमात्रेचिया व्याजें । अष्टकोशेंसीं ऐक्यत्व ॥ ५५ ॥ आतां देवतामय अपंचीकृत । ब्रह्मांडीं हिरण्यगर्भ विलसत । ईश्वराचें द्वितीय देह तदंश पंचीकृत । सूक्ष्म पंचवीसेंसीं ॥ ५६ ॥ ब्रह्मांडीं हिरण्यगर्भ देहाची । स्थिती पाळनअवस्था साची । तदंश पिंडीं सूक्ष्म देहाची । स्वप्नावस्था बोलिजे ॥ ५७ ॥

---

१ (?) २ अहंकार, प्रपंच. ३ चातुर्य. ४ दृश्य, स्थूल पंचतत्वें. ५ सूक्ष्म. ६ मिषानें, निमित्तानें.

ब्रह्मांडीं स्थिति अवस्था विष्णु अभिमानी। पिंडीं तदंश तैजसाभिमानी[1]। विष्णूचें स्थान वैकुंठभुवनीं। तदंश पिंडीं कंठगत ॥ ५८ ॥ सत्वगुण विलसे ज्ञानशक्तीसीं। प्रविविक्तभोग अर्द्धमात्रेसीं। पिंडब्रह्मांडऐक्यता अष्टकोशेंसीं। जीवेश्वरऐक्य विलसे ॥ ५९ ॥ देहद्वयेंसीं सपलें अन्यथाज्ञान। आतां सांगिजेल तृतीय देह अज्ञान। पिंडब्रह्मांडाचा निरास करून। जीवेश्वरऐक्य सहजें ॥ ६० ॥ ब्रह्मांडीं तृतीय देह अव्याकृत। तदंश पिंडीं कारणदेह विलसत। अव्याकृतीं प्रळयावस्था बोलिजत। तदंश सुषुप्ति पिंडीं ॥ ६१ ॥ ब्रह्मांडीं अभिमानी सदाशिव। पिंडीं तदंश प्राज्ञ स्वयमेव। कैळासस्थान तदंश सुषुप्तिठाव। हृदयभुवनीं ॥ ६२ ॥ द्रव्यशक्तिसहित तमोगुण। मकार मात्रा आनंदभोगायतन। पिंडब्रह्मांडीं ऐक्यत्व येकून। अष्टकोशेंसीं जीवेश्वर ॥ ६३ ॥ एवं अन्यथाज्ञानेंसीं अज्ञान। निरसूनि देहत्रय अभिन्न। आतां मूळमायेसीं महाकारण। जीवेश्वराचें विलसे ॥ ६४ ॥ ब्रह्मांडीं चतुर्थ देह ईश्वराचें। मूळमायात्मक जाणिजे साचें। तदंश पिंडीं महाकारण जीवाचें। अनुसंधानात्मक[2] ॥ ६५ ॥ जेथ अनुसंधान परमात्मयाचें। जीवासी अखंडित असे साचें। अनुसंधानें निरसन देहचतुष्टयाचें। मी आणि माझेंपण सांडूनि ॥ ६६ ॥ येव जेथ देह चि मिथ्यारूप जालें। तेथ तुर्यावस्थेसी पंकपण आलें। पंक्तता येऊनि सहजें मुरालें। सर्वसाक्षित्व हि ॥ ६७ ॥ महाकारणदेहनिरासें। स्मरणांचा[3] चि ठाव पुसे। तेणें मूळमायेस हि आपैसें। नाहींपण सहजें ॥ ६८ ॥ मूळमायेची अवस्था सर्वसाक्षिणी। तिची हि सहज चि जाली आटणी। तेथ प्रत्यगात्मयासगट अभिमानी। सर्वेश्वरेंसीं लयस्थ[5] ॥ ६९ ॥ मग ब्रह्मांडींचें स्थान निळारंभ। पिंडीचें मूर्ध्निस्थान स्वयंभ। यांचा वेगळेपणाचा अवष्टंभ[4]। ऐक्यासी आला सहजें ॥ ७० ॥ जेथ स्थान मान अवघें राहिलें। तेथ शुद्धसत्व इच्छाशक्तीसीं

---

१ स्वप्नदेहाचा अभिमान धरणारा जीव. २ ध्यानात्मक. ३ मुळींचे अहंब्रह्म असें जें स्मरण त्याचा. ४ मूस. ५ निद्रिस्त, लीन.

हारपलें । मग आनंदावभासासी वहिलें । कोण लेखी तेथ ॥ ७१ ॥ जेथें आनंदाचा अवभास जिराला । तेथ अर्द्धमात्रेंसीं प्रणव मुराला । एवं अष्टकोशेंसीं लय जाला । महाकारण मूळमायेसी ॥ ७२ ॥ एवं पिंडब्रह्मांडऐक्येंसीं । ऐक्यता जाली जीवेश्वरासी । जेवि घटमठभंगीं महदाकाशीं । समरसिजे आकाशें ॥ ७३ ॥ यां सकळ पदार्थांचें जाणणेपण । तया नाव बोलिजे केवळ ज्ञान । पिंडब्रह्मांडींचें करूनि शोधन । आत्मज्ञानविचारें ॥ ७४ ॥ त्या आत्मज्ञाना हि सगट । अवघें जालें सरसपाट । तेथ मूळमाया चि तुमची येकट । कोठें राहील जी ॥ ७५ ॥ अन्यथाज्ञान अज्ञानेंसीं । आत्मज्ञानीं गेलें विलयासी । तें ज्ञान हि आलें विज्ञानस्थितीसी । स्वानुभवदिनकरीं ॥ ७६ ॥ जालयां स्वानुभव दिनकराऐसा । सहज चि न देखिजे दृश्याभासा । ईश्वर चि ब्रह्मीं सुलीन सहसा । विज्ञानस्थितीसीं ॥ ७७ ॥ ऐसें असोनि जी गुरु-राया । आपुलें निजरूप ह्मणतसा मूळमाया । तरि जी समर्था झकवणीं इया । आह्मा झकवीतसां कां जी ॥ ७८ ॥ आह्मी तुमचीं ह्मणियागतें । जें सांगतसां तें मानूनि हितें । काया वाचा मनसा तुमतें । अनन्यभावें शरण जी ॥ ७९ ॥ इतुकीं शिष्य बोलिला करुणावचनें । अतरीं सगद्गद सजळनयनें । तें देखोनि श्रीगुरु करुणाघनें । कृपामृतें सिंचिजे ॥ ८० ॥ बारे सखया शिष्यटिळका । आपण तुझा पाहिला बहुत आवांका । परि तू निधडा देखिलासि निका । कळिकाळा नागवसी ॥ ८१ ॥ ज्ञानी जालासी असाधारेंण । तुझिये बुद्धीची नेणवे आग-वणें । गुरुकृपा तुज फळली संपूर्ण । विज्ञानस्थितीसीं ॥ ८२ ॥ इतुके-नि आह्मा जाला भरवसा । निश्चयें स्वानुभवदिनकराऐसा । जे जे तू इछा धरिसील सहसा । ते ओंरेंभीं चि फळेल ॥ ८३ ॥ इतुकें श्रीगुरु-वाक्य ऐकोन । शिष्य शकुनग्रंथी बांधे सुखावोन । ह्मणे स्वामीचया

१ पुसेल, गणना करील. २ जिरला. ३ घटाकाश व मठाकाश हीं दोन्ही. ४ एकसारखें, एकरूप. ५ फसवणुकीनें. ६ वाक्यें, ह्मणणें. ह्मणगत=भाषण. ७ धैर्यपरीक्षा. ८ शूर, पराक्रमी, धैर्यवान. ९ नाटोपसी. १० विशेषपणानें. ११ इच्छा. १२ तत्काल, प्रयत्न न करिता.